शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दूर शिक्षण केंद्र

विशेष साहित्यकृतींचा अभ्यास

एम. ए. भाग १ : मराठी

सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्र. २.१

सत्र दुसरे : अभ्यासपत्रिका क्र. ६.१

(शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून)

विशेष साहित्यकृतींचा अभ्यास
एम.ए.भाग १: मराठी
अभ्यासपत्रिका क्रमांक २.१ व ६.१
२०१८ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
प्रथमावृत्ती : २०१८
एम. ए. भाग-१ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

प्रती : ४००

■

प्रकाशक :
डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

मुद्रक :
श्री. बी. पी. पाटील
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-81-939381-3-3

★ दूर शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४. (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ सल्लागार समिती ■

प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

प्रा. पी. प्रकाश
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

प्रा. (डॉ.) सीमा येवले
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) भारती पाटील
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. एम. ए. काकडे
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

श्री. व्ही. टी. पाटील
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे (सदस्य सचिव)
संचालक, दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ समन्वय समिती : मराठी ■

अध्यक्ष - **डॉ. राजन गवस**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. डी. ए. देसाई**
  विवेकानंद कॉलेज,
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. डी. के. वळवी**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
  कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,	**विशेष साहित्यकृतींचा अभ्यास**
शिवाजी विद्यापीठ,	एम.ए.भाग १: मराठी
कोल्हापूर	अभ्यासपत्रिका क्रमांक २.१ व ६.१

अभ्यास घटकांचे लेखक

लेखक		**घटक क्रमांक आणि शीर्षक**
सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्रमांक २.१ : विशेष साहित्यकृतींचा अभ्यास		
डॉ. गणपत हराळे गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली	१.	**लीळाचरित्र : एकांक** - संपा. शं. गो. तुळपुळे
डॉ. अरुण शिंदे नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर	२.	**आज्ञापत्र** - संपा. विलास खोले
प्रा. डॉ. तातोबा बदामे पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव	३.	**हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ** - भालचंद्र नेमाडे
डॉ. सर्जेराव पद्माकर डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, पेठ वडगाव	४.	**शोभायात्रा** - शफाअत खान
सत्र दुसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक ६.१ : विशेष साहित्यकृतींचा अभ्यास		
डॉ. शामसुंदर मिरजकर कला, वाणिज्य महाविद्यालय, मायणी	१.	**जनाबाईचे अभंग** - संपा. रा. चि. ढेरे
	२.	**मराठी गौळण** - संपा. वसंत स. जोशी
डॉ. प्रवीण सखाराम लोंढे समन्वयक, दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	३.	**आठवणींचे पक्षी** - प्र. ई. सोनकांबळे
डॉ. नामदेव विक्रम गपाटे बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी	४.	**चाळेगत** - प्रवीण दशरथ बांदेकर

■ संपादक ■

डॉ. अरुण शिंदे
नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स,
कोल्हापूर

डॉ. शामसुंदर मिरजकर
कला, वाणिज्य महाविद्यालय,
मायणी

संपादकीय

'विशेष साहित्यकृतींचा अभ्यास' ही अभ्यासपत्रिका एम. ए. भाग-१ च्या सत्र-१ व सत्र-२ साठी आहे. या अभ्यासपत्रिकेमध्ये सत्र एक साठी १. लीळाचरित्र : एकांक, २. आज्ञापत्र, ३. हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ, ४. शोभायात्रा; तसेच सत्र दोन साठी १. जनाबाईचे अभंग २. मराठी गौळण, ३. आठवणींचे पक्षी, ४. चाळेगत या कलाकृती अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या आहेत. प्रस्तुत स्वयंअध्ययन साहित्यामध्ये अभ्यासक्रमासाठी नियुक्त कलाकृतींचे घटकनिहाय लेखन केलेले आहे. प्रत्येक घटकाचे लेखन अभ्यासपूर्ण रीतीने व आकलनसुलभ भाषेत केलेले आहे. घटकाच्या प्रारंभी उद्दिष्ट्ये नमूद केलेली असून उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी प्रस्तुत घटकलेखनातील विषय विवेचन व मूल्यमापन आपणास दिशादर्शक आहे. अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या पुस्तकांचा आशय व्यापक असून त्यांचा सूत्रबद्ध आढावा घेण्याचा प्रयत्न घटकलेखनामध्ये केलेला आहे.

या घटकांच्या अध्ययनाबरोबरच आपण अभ्यासक्रमासाठी नियुक्त कलाकृती व अनुषंगिक संदर्भग्रंथ वाचावेत. त्यामुळे आपल्या भाषिक व वाङ्मयीन कक्षा व्यापक होतील. मराठी विषयातून पदव्युत्तर पदवी संपादन करताना आपण मराठी वाङ्मयातील विविध प्रवाहांचे व साहित्यकृतींचे सूक्ष्म अध्ययन करावे व आपली एक विवेचन समीक्षादृष्टी तयार व्हावी, या उद्देशाने प्रस्तुत अभ्यासपत्रिकेचा अभ्यास आपण करावा, अशी आमची अपेक्षा आहे.

■ संपादक ■

डॉ. अरुण शिंदे
नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स,
कोल्हापूर

डॉ. शामसुंदर मिरजकर
कला, वाणिज्य महाविद्यालय,
मायणी

अभ्यासमंडळ : मराठी

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **प्रा. डॉ. राजन गवस**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. रणधीर शिंदे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली

- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा

- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर

- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा

- **प्रा. डॉ. दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद

- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. गोपाळ ओमाण्णा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

- **श्री. के. एस. अटकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद

अनुक्रमणिका

सत्र पहिले : अभ्यासपत्रिका क्रमांक २.१
विशेष साहित्यकृतींचा अभ्यास

घटक १	लीळाचरित्र : एकांक – (संपा.) शं. गो. तुळपुळे	१
घटक २	आज्ञापत्र – (संपा.) विलास खोले	४१
घटक ३	हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ – भालचंद्र नेमाडे	६६
घटक ४	शोभायात्रा – शफाअत खान	९७

सत्र दुसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक ६.१
विशेष साहित्यकृतींचा अभ्यास

घटक १	जनाबाईचे अभंग – (संपा.) रां. चि. ढेरे	११७
घटक २	मराठी गौळण – (संपा.) वसंत स. जोशी	१५१
घटक ३	आठवणींचे पक्षी – प्र. ई. सोनकांबळे	१८५
घटक ४	चाळेगत – प्रवीण दशरथ बांदेकर	२०७

■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे?

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे?

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे?

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या अभ्यासपत्रिकेसाठी एक पूरक अभ्याससाहित्य आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१७-१८ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या अभ्यासपत्रिकेच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र १ : घटक १

(विभाग १ Module I)

लीळाचरित्र : एकांक

संपादक शं. गो. तुळपुळे

१.१ उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो या घटकाच्या अभ्यासानंतर,

- महानुभाव संप्रदायाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी यांचा जीवनपट माहीत होईल.
- यादवकालीन मराठी गद्याचे आकलन होईल.
- 'लीळाचरित्र : एकांका'तील आशयसूत्रे आणि आविष्कारशैली सांगता येईल.
- 'लीळाचरित्र : एकांका'तील यादवकालीन ऐतिहासिक, राजकीय, धार्मिक व सामाजिक जीवन समजण्यास मदत होईल.
- 'लीळाचरित्रा'च्या एकांकातील भाषा आणि भाषाशैलीची वैशिष्ट्ये सांगता येतील.
- 'लीळाचरित्र : एकांका'चे वाङ्मयीन रूप समजून घेता येईल.

१.२ प्रास्ताविक

मध्ययुगीन मराठी समाज व मराठी साहित्यामध्ये महानुभाव संप्रदायाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. महानुभाव संप्रदायाचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी तत्कालीन कर्मठ वैदिक धर्मव्यवस्थेच्या जोखडातून जनसामान्यांना मुक्त करतानाचा आध्यात्मिक व भाषिक अभिव्यक्तीचा अधिकार सर्वांना दिला. महानुभावांनी लोकभाषेचा जाणीवपूर्वक पुरस्कार करून सर्वसामान्य लोकांपर्यंत अध्यात्मविचार बोलीभाषेमध्ये पोहचविण्याचा प्रयत्न केला. महानुभवांनी गद्य व पद्य लेखनप्रकारामध्ये विपूल ग्रंथरचना केलेली असून या ग्रंथांमधून पंथप्रवर्तकांचे चरित्र व पंथविचार प्रकटतो. महानुभावसंप्रदायामध्ये त्याकाळातील सर्वस्तरीय लोक सहभागी झाले होते. म्हाइंभटासारख्या विद्वानाचा महानुभाव संप्रदायातील प्रवेश व त्यांने केलेले वाङ्मयनिर्मितीचे महत् कार्य थक्क करणारे आहे. म्हाइंभट्टकृत 'लीळाचरित्र : एकाक' हा ग्रंथ चक्रधरस्वामींच्या जीवनकार्याचा परिचय घडवतो. तसेच तत्कालीन मराठी गद्याचे रूप आपणांसमोर ठेवतो. भाषा व वाङ्मयाबरोबरच समाजिक-सांस्कृतिक संदर्भसाधन म्हणून या ग्रंथाचे मोल मोठे आहे. प्रस्तुत घटकामध्ये आपण 'लीळाचरित्र : एकांक'चे स्वरूपविशेष अभ्यासणार आहोत.

१.३ विषय विवेचन

१.३.१ म्हाइंभटांचा जीवनपट

'लीळाचरित्र'कार म्हाइंभट हे मुळचे सराळे या गावाचे होते. गणपती आपयो नावाच्या गुरूजवळ अध्ययन करून पुढील शास्त्राभ्यासासाठी ते तेलंगणातील विद्यानगरीला जातात. तेलंगणात 'प्रभाकर-दर्शन' नामक शास्त्र शिकून सर्व विद्यासंपन्न होऊन महाराष्ट्रात परत आल्यावर त्यांना स्वतःच्या विद्वत्तेचा प्रचंड गर्व चढतो. तो इतरांना अत्यंत तृणवत लेखत असे. त्याचेच गमक म्हणून तो पायात गवताची वाकी घालून फिरत असतो. पुढे गणपती आपयोच्या सुचनेवरून त्यांने डोमेग्राम येथे जाऊन चक्रधरांची भेट घेतली. या भेटीचा प्रसंग 'लीळाचरित्रा'च्या उत्तरार्धात सविस्तरपणे वर्णिलेला आहे. वाटेने जाताना चक्रधरांशी वाद कसा करावयाचा याविषयी पंडित महिन्द्रभटांनी पुष्कळ मनोरथ रचलेले असतात. परंतु प्रत्यक्ष भेटीत चक्रधरांनीच त्यांना 'एथोनि आत्यंतिक संसृतिछेदु होए ऐसी काइ प्रतीति आति?' असा प्रश्न विचारून वादात शेवटी त्यांना निरूत्तर करतात. स्वामींनी संस्कृत व मराठी या दोन्ही भाषांतून केलेल्या प्रभावी निरूपणामुळे अखेरीस म्हाइंभटास बोध होऊन त्यांच्याविषयी 'हा ईश्वरू' अशी प्रतीती आली, व स्वामींना दंडवते घालून तो तेथून उठला. या प्रसंगाने त्याची वृत्ती एकदम पालटली व तो देहाने जरी स्वगृही परतला तरी त्याचे मन मात्र चक्रधरांपाशीच राहिले. ही वृत्ती हळूहळू वाढत गेली व त्यानंतर वर्षभराने सरळ रिधपुरला जाऊन त्याने गोविंद प्रभूंकडून पंथाची दीक्षा घेतली. त्या दिवशी भावैची चतुर्दशी असल्यामुळे म्हाइंभटांनी गूळ व 'सोनेसळा फुटा' म्हणजे सोनसळी वस्त्र गोविंदप्रभूस अर्पण करून दंडवत घातलेले आहे आणि 'मजचुलीची राख पुंजा सांडुं देयावा' अशी विनवणी करून ते त्यांचे सेवादास्य करू लागतात. अशा प्रकारे म्हाइंभटांनी महानुभाव पंथात प्रवेश घेतलेला आहे. त्यांच्या पंथप्रवेशाचा वृत्तान्त 'लीळाचरित्रा'च्या उत्तरार्धात वाचावयास मिळतो.

म्हाइंभट हे मूळचे गर्भश्रीमंत असल्यामुळे गोविंदप्रभूजवळ राहू लागल्यावर तेथील भिक्षान्न खाणे त्यांना सुरुवातीला फार जड जाते. परंतु लवकरच ते त्या कदान्नाची स्वतःला सवय करून घेतात. म्हाइंभटानी आपली सर्व संपत्ती गोविंदप्रभूंच्या चरणी अपर्ण केलेली आहे. रिधपूर येथील राजमठाभोवतालचा परिसर ते स्वतः खरेदी करून त्या देवळावर 'तांबेयाचे पत्रे' चढवितात. तसेच रिधपूर येथे असताना त्यांनी सोन्याचांदीचा व्यापारही केलेला आहे. त्यामुळेच त्या गावामध्ये त्यांना सोवणी म्हणजे सौवर्णि असे संबोधले जाई. परंतु या सराफीत मिळालेला सर्व पैसा ते गुरूसेवेकडे खर्च करीत असल्याने या अर्थार्जनाचा डाग त्यांच्या विरक्तीस लागत नाही.

परंतु इतके झाले तरी म्हाइंभटांच्या ठिकाणी अहंकार अद्यापि होताच. चक्रधरांनी प्रथम भेटीत त्यांचा विद्येचा गर्व नाहीसा केल्यामुळे स्वामींच्यापुढे ते नेहमी नम्रतेने वागतात. परंतु इतरांशी वागताना त्यांचा अहंभाव जागृत होई. नागदेवाचार्यांस ते तुच्छतेने 'सुंठदेव' म्हणत व स्वतःला मात्र 'योगभ्रष्ट' समजतात. इतकेच नव्हे तर नागदेवांना ते नमस्कारही करीत नसत. परंतु एकदा नागदेवाचार्यांच्या तोंडून ''योगभ्रष्ट तवं माझीये दसेचा नव्हेः मा तुमचीये दसेचा काइ होईल?'' अशी स्पष्टोक्ती

ऐकल्यानंतर ते मनात वरमतात. खऱ्या अर्थाने तेव्हापासून नागदेवाचार्यांप्रति त्यांचे वर्तन बदलते. कालांतराने नागदेवायार्यांचे वादकौशल्य पाहून त्यांच्या श्रेष्ठत्वाची जाणीव त्यांना झाली. तेव्हापासूनच म्हाइंभट हे नागदेवायार्चांना नमस्कार करू लागले. विद्येप्रमाणेच स्वतःच्या श्रीमंतीचाही म्हाइंभटांना गर्व होता. विरक्त होऊन गोविंदप्रभूंजवळ राहू लागल्यानंतरही आपण गुरूसेवेप्रीत्यर्थ आपले द्रव्य वेचतो याचा म्हाइंभटांना अत्यंत अभिमान आहे. परंतु तोही गोंविदप्रभूंनी दूर केला. एकदा म्हाइंभटांनी गोविंदप्रभूसाठी 'श्वेत उपहार' सिद्ध केला व मनात म्हटले. ''मी सदैवुः माझें ईश्वरीं ऐसे होत असेः'' (मी सुदैवी आहे, कारण माझ्याकडून ईश्वराची सेवा होत आहे.) परंतु श्रीप्रभूंनी तिकडे पाहिलेही नाही. तेव्हा भटोबास म्हाइंभटांना म्हणाले, ''आहाः वोखटें भाविलेंः कोणीकडे ईश्वरूः आणि कोणीकडे तुमचा पदार्थुः आणि जीवातेंः काई असे? हे आवघें ईश्वरीचे'' अशाप्रकारे म्हाइंभटाचा विद्या आणि वैभवाचा थोडाबहूत गर्व गोविंदप्रभूंच्या सहवासात नष्ट झाला.

म्हाइंभट हे विद्वान व बुद्धिमान होते यात शंकाच नाही. इतर विद्वानांच्या बरोबर वाद करण्याचा प्रसंग येई तेव्हा पुढाकार तेच घेत असत. एकदा ते विहिरीवर पाणी भरत असताना तेथे एक विद्वान आला व त्यांना अनुलक्षून म्हणाला. ''शुद्रस्य शुभं नास्ति'' त्यावर म्हाइंभटांनी तत्काळ 'ब्राह्मणास्य विशेषतः' असे उत्तर देऊन त्याला फजित केलेले आहे. तसेच चक्रधरांच्या पश्चात त्यांच्यासारखा दिसणारा कोणी एक तोतया येऊन मठात बसला तेव्हा त्याला खुणेचा प्रश्न विचारून त्यांचे सोंग उघडकीस आणण्याचे काम म्हाइंभटांनी केलेले आहे.

म्हाइंभटांबरोबर त्यांची पत्नी देमाइसा ही महानुभाव पंथात आली. परंतु तिची वागणूक बरी नव्हती असा उल्लेख 'गोविंदप्रभू चरित्रा'मध्ये आलेला आहे. मात्र स्वतः म्हाइंभट हे गुरूकुलाशी अखेरपर्यंत एकनिष्ठ राहिलेले आहेत. ते नेहमी गोविंदप्रभूंच्या सेवेत असावयाचे. म्हणूनच ''म्हाइंभटातें श्रीप्रभुदास्यावेगळें जो दाखवीः तयासि मी महावाक्य वाखानीन''अशी होड (पैज) भटोबासांनी घातली होती. म्हाइंभटाविषयी 'तुम्ही माझेचा चक्रस्वामीचिया धुरा' हा आडसेने व्यक्त केलेला अभिप्राय अत्यंत मोलाचा आहे. अशाप्रकारे श्रीचक्रधरस्वामी व श्रीगोविंदप्रभू यांचे सान्निध्य व सेवा करण्याची संधी म्हाइंभटाना लाभली. गोंविदप्रभू व चक्रधरस्वामी या दोन्ही देवांची आमरण सेवा करून या दोघांची चरित्रे त्यांनी लिहिली. त्यांनी 'लीळाचरित्र' (शके १२०५) व 'गोविंदप्रभूचरित्र' गोविंदप्रभूंच्या निधनानंतर (शके १२१०) लिहिले. याशिवाय एक गद्य 'श्रीकृष्णचरित्र' हेही म्हाइंभटाचेच आहे असे वि. भि. कोलते यांचे मत आहे. याशिवाय महदंबेच्या 'पूर्वार्धा'नंतरचा 'उत्तरार्ध' हा ''म्हाइंभटी रुक्मिणी सैंवर करणें'' (स्मृतिस्थळ १७४) या लीळेत म्हाइंभटाच्या नावे उल्लेखिलेला आहे. म्हाइंभटांनी 'जातीचा दशकु' म्हणजे काही आरत्याही लिहिलेल्या आहेत. काव्यलेखनाची क्षमता त्यांच्याजवळ असल्यामुळे गीतेवर व्याख्यान करतानाच तत्काळ पदे रचण्याएवढे शीघ्रकवित्व त्यांच्या ठिकाणी असल्याचेही काही पुरावे 'गोविंदप्रभूचरित्रा'मध्ये आढळून येतात.

म्हाइंभट हे शके १२२५ च्या सुमारास मरण पावले. त्यांच्या देहावसानाचा प्रसंग ‘स्मृतिस्थळा’मध्ये अतिशय सरसतेने वर्णिलेला आहे. आपला अंतकाळ जवळ आल्याचे त्यांच्या लक्षात येताच म्हाइंभटांनी ‘‘भटोः मज देव होईल?’’ असे भटोबासांना चरणस्पर्श करून सांगितले. तेव्हा दोन्ही देवांचे सन्निधानदास्य लाभले असताना ते असे का म्हणतात याचे भटोबासांना आश्चर्य वाटले व ते आश्वासनपूर्वक त्यांना म्हणाले, ‘‘तुम्हां जरि देवो नव्हेः तरी कोव्हाही देव नव्हेः म्हणौनि तुम्हां देवो होईलः’’ यावर समाधान पावून ‘‘माझे कांही वोखटें नेघावें’’ अशी प्रार्थना करून म्हाइंभटांनी हात जोडले व देह ठेवला.

म्हाइंभटाचे नाव मुख्यतः चरित्रकार म्हणून प्रसिद्ध आहे. किंबहुना जे जसे आद्य मराठी गद्यकार तसेच आद्य मराठी चरित्रकारही आहेत. संस्कृत पंडीत असूनही त्यांनी आपली सर्व रचना मराठी भाषेत केली हे त्यांचे महाराष्ट्रावरील उपकार आहेत. म्हाइंभटांचे गद्य चरित्रग्रंथ मुख्यतः ‘लीळाचरित्र’ व ‘ऋद्धिपूरचरित्र’ किंवा ‘गोविंदप्रभुचरित्र’ हे दोन आहेत. ही दोन्ही चरित्रे लीळांच्या किंवा आठवणींच्या स्वरूपाची असून त्यांतील लीळा म्हाइंभटांनी अनेकांच्याकडून मिळवून संकलित केलेल्या आहेत. अर्थात त्यांच्या या चरित्रग्रंथाचे स्वरूप काही अंशी संकलनात्मक आहे. परंतु तेवढ्यामुळे त्यांच्या ग्रंथकर्तृत्वाला काही कमीपणा येतो असे मात्र नाही. ‘श्रीकृष्णचरित्र’ हाही ग्रंथ म्हाइंभटांनेच लिहिलेला आहे असे म्हणतात. परंतु या चरित्रग्रंथाचे कर्तृत्व हा एक विवाद्य प्रश्न आहे. ‘धवळ्यां’चा काही भाग व स्फुट स्वरूपाची काही पद्यरचना सोडल्यास म्हाइंभटाचे खरे कर्तृत्व गद्यरचनेतच दिसून येते. महानुभाव पंथाच्या संस्थापकाचे सविस्तर चरित्र त्याच्या शेकडो आठवणींचा संग्रह व संकलन करून सिद्ध करणे हे म्हाइंभटांचे कार्य आहे. ते पूर्ण करून त्यांनी गोविंदप्रभू व चक्रधर या दोन महापुरुषांच्या अमर अशा वाङ्मयीन मूर्तीच निर्माण केल्या आहेत.

‘लीळाचरित्रा’च्या रचनेसाठी म्हाइंभटांनी किती अफाट परिश्रम घेतले त्याची कल्पना ‘स्मृतिस्थळा’तील काही आठवणींवरून आपणाला आल्याशिवाय रहात नाही. या कार्याविषयी म्हाइंभटांना केवढी तळमळ होती ते ‘स्मृतिस्थळा’तील एका प्रसंगातूनही कळते. म्हाइंभटाचे मौनव्रत असताना यादवांचे भांडारी गदोनायक त्यांना भेटावयास आले. परंतु त्यांचे मौनव्रत असल्यामुळे त्यांच्याशी बोलण्याची संधी त्यांनी गमावली. गदोनायक म्हाइंभटांना नमस्कार करून निघून गेले. पुढे ते चक्रधरस्वामींचे भक्त असून त्यांच्याकडून स्वामींच्या काही आठवणी मिळणे शक्य आहे हे कळल्यावर म्हाइंभटांना मौन धरल्याचा पश्चात्ताप झाला आणि ते म्हणाले, ‘‘आहा कटकटा: मी पापीया बोलतां कां तरि यातें गोसावियांचिया लीळा पुसता?’’ (स्मृतिस्थळ १३९) अशाप्रकारे लीळा संग्रह करण्याच्या त्यांच्या कार्यातील मनःपूर्वकताही लक्षणीय असल्याचे आपणाला दिसून येते. तसेच चक्रधरांच्या आठवणी मिळतील तेथून आणण्याची त्यांची तयारी होती. खेइंभटाकडून आठवणी गोळा करण्यासाठी ते त्यांच्या गावी गेले. तेव्हा खेइंभट शेतावर गेल्याचे समजताच तेही शेतावर गेले. अर्थात् त्यांच्या मागे हिंडत त्यांच्याकडून आठवणी गोळा करण्याची म्हाइंभटांची तयारी होतीच, त्या संदर्भात ‘स्मृतिस्थळ’कार लिहितात– ‘‘खेइंभट कृषीकर्म करीतिः आणि म्हाइंभट तयां मागां मागां

गोसावियांचिया लीळा पुसतिः खेईभट सांघतिः त्या म्हाइंभट नमस्करूनि घेतिः मग भिक्षा करुनि जेवीतिः त्यांचें कांही नेघतिः''

तसेच एकदा माइंभट हे लीळा शोधत पैठणला गेले असता तेथे त्यांना सारंगपंडित हा स्वामींचा एकेकाळचा भक्त भेटला. पुढे पुढे तो स्वामींना पराङःमुख झाला होता हे म्हाइंभटांना ठाऊक होते. तरीसुद्धा पैठणला गेल्यावर त्याने जेव्हा जेवणाचे आमंत्रण दिले, तेव्हा त्यांनी ते स्वीकारले, पण एका अटीवर. ते म्हणाले, ''आधी मज गोसावीयांची लीळा सांघाः मग येइनः'' त्याप्रमाणे सारंगपंडिताने त्यांना काही लीळा सांगितल्या व मगच ते त्याच्याकडे भोजनास गेले. पण भोजनसमयीसुद्धा दोन घास खाऊन ते वमनाच्या मिषाने पानावरून उठून गावात भिक्षा मागून गोदावरी नदीच्या काठावर येऊन जेवण करतात. म्हाइंभटांची ही असीम निष्ठा पाहून त्यांच्याच चरित्रातील एका पूर्वीच्या प्रसंगाची आठवण आपणाला आल्याशिवाय रहात नाही. चक्रधरस्वामींकडे येऊन त्यांना अनुसरण्यापूर्वी त्यांच्या भेटीचा योग म्हाइंभटाच्या आयुष्यात आलेला असतानाही त्यावेळी ते स्वामींच्या दर्शनास जात नाहीत. तेव्हा त्या प्रसंगी चक्रधरांनी म्हाइंभटाबद्दल ''येइल तैं तोचि येऊं जाणे'' असे उद्‌गार काढले होते. चक्रधरस्वामींनी वर्तविलेले हे भविष्य म्हाइंभटांनी आपल्या कर्तृत्वाने खरे करून दाखविले हे त्यांचे खरे मोठेपण आहे.

'लीळाचरित्र' म्हणजे शब्दरूप आदर्शात क्षणोक्षणी प्रतिबिंबित झालेली महानुभावीयांची व चक्रधरांसंबंधीची स्मरणभक्तीच आहे, असेच म्हणावे लागेल. अशा या स्मरणरूपी लीळाचरित्राचे स्वरूप 'संकलन-संपादन-निवेदनात्मक' अशा त्रिविध स्वरूपाचे आहे. आणि या निर्मितीचे सारे श्रेय शेवटी महाइंभटांना द्यावे लागते. ह्या लीळांचे संकलन जर म्हाइंभटांने केले नसते तर महानुभावपंथाचा हा आधारग्रंथ निर्माणच झाला नसता. एखाद्या संशोधकांने अत्यंत सचोटीने, दक्षतेने, साक्षेपाने, निरलसपणे कार्य करावे त्याप्रमाणे म्हाइंभटांनी हे कार्य केलेले आहे. आपल्या कार्याप्रति आत्यंतिक निष्ठा तर त्यांना होतीच, पण त्याखेरीज श्रीचक्रधरस्वामींविषयीच्या भक्तिप्रेमाचीही जोड त्याला होती. या सर्व कारणांमुळेच त्यांच्या कार्याचे महत्त्व सर्वमान्य झालेले आहे.

१.३.२ 'लीळाचरित्रा'ची पार्श्वभूमी

'लीळाचरित्र' हा ग्रंथ एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्ध याप्रमाणे तीन भागात विभागलेला आहे. त्यापैकी एकांकाच्या लीळा ७४. पूर्वार्धाच्या लीळा ३५८ आणि उत्तरार्धाच्या ४८८ आहेत. म्हणजेच संपूर्ण 'लीळाचरित्रा'तील लीळांची संख्या सुमारे साडे-नऊशेच्या आसपास इतकी आहे. चक्रधरांच्या आयुष्याक्रमात अवतार स्वीकार, शक्ती स्वीकार, नागांबिकेला प्रेमदान, नागदेवाचार्याचे अनुसरून व शेवटी प्रयाण अशा पाच प्रमुख घटना असून त्या 'लीळाचरित्रा'च्या वरील तीन भागांत मिळून सांगितल्या आहेत. 'लीळाचरित्रा'च्या 'एकांका'मध्ये चक्रधरांनी भरवस किंवा भडोच येथील प्रधानपुत्राच्या मृत देहात प्रवेश करून अवतार धारण केल्यापासून तो त्यांच्या पैठण येथे आगमनापर्यंतचा भाग आला असून तो आकाराच्या दृष्टीने लहान आहे. या भागाला 'एकांक' म्हणण्याचे कारण म्हणजे वैराग्य उत्पन्न झाल्यापासूनची त्या काळातील चक्रधरांची भ्रमंती एकाकी

अवस्थेत झालेली आहे. ही अवस्था एखाददुसरा अपवाद वगळल्यास ते 'एकांका'च्या अखेरीस पैठण येथे पोहोचेपर्यंत चालू होती. पैठणला प्रथम ते एकांकातून लोकांतात आले व तेथून त्यांच्या आयुष्याचे एक निराळे पर्व सुरू झाले. हे पर्व पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा दोन कालखंडांत विभागलेले आहे. 'पूर्वार्धा'चा प्रारंभ चक्रधरांनी पैठण येथे आल्यावर नागांषिकेला केलेल्या प्रेमदानाने व शेवट खडेकुली येथे नागदेव किंवा भटोबास यांना केलेल्या बोधदानाने होतो. तेथून चक्रधरांच्या आयुष्याचा 'उत्तरार्ध' सुरू होऊन तो त्यांच्या प्रमाणकाळापर्यंत चालतो व त्यांच्या 'उत्तरापंथे गमना'ने त्यांची आणि त्यांच्या ज्ञात जीवनाची समप्ती होते.

चक्रधरांचे उत्तरापंथे गमन झाल्यावर त्यांची नागदेवादि शिष्यमंडळी रिधपुरास गोविंदप्रभूंच्या आश्रयास आल्यापासून ते त्यांच्या निर्याणकालापर्यंत म्हणजेच शके १२०८ पर्यंत राहतात. चक्रधरांच्या सर्व शिष्यमंडळींना त्यांच्या वियोगाचे दुःख फारच असह्य झाल्यामुळे त्यांच्या पश्चात अशा स्थितीत स्वामींच्या लीळा आठवत राहणे यासारखा दुसरा विरंगुळा नव्हता. या उद्योगातूनच कालांतराणे 'लीळाचरित्रा'ची निर्मिती झालेली आहे. चक्रधरांच्या शिष्यांपैकी म्हाइंभट हे मोठे कल्पक व संग्राहकवृत्तीचे होते. त्यांना स्वामींच्या आठवणी गोळा करण्याची कल्पना सुचली व ती त्यांनी मुख्यतः नागदेवाचार्यांच्या मदतीने प्रत्यक्षातही आणली. ज्यांना म्हणून चक्रधरांची प्रत्यक्ष माहिती होती अशा अनेक जणांना समक्ष भेटून त्यांच्याकडून त्यांनी या गुरुचरित्राची रचना करण्याच्या हेतूने कणकण गोळा केले. म्हाइंभटांनी ही जी चरित्रविषयक सामग्री गोळा केलेली आहे ती नागदेवाचार्यांना दाखवून तिचे खरेखोटेपण पारखून घेतलेली आहे. नागदेवाचार्यांना चक्रधरस्वामींचा निकट सहवास शेवटची चार वर्षे अखंड लाभल्याने व स्वामींच्या अंतरंगाची त्यांना पूर्ण कल्पना असल्याने त्यांच्याविषयी ते अधिकारवाणीने बोलू शकतात. विशेषतः स्वामींचा संबंध कोणाशी, केव्हा व कसा आला, प्रसंग कोणता होता, त्यावेळी त्यांच्या बोलण्याचा रोख नेमका कोणता होता, त्यांचे मनोगत काय होते इत्यादी गोष्टी नागदेवांना फार जवळून ठाऊक असल्यामुळे चक्रधर-चरित्राविषयी बोलण्यास त्यांच्या इतकी अधिकारी व्यक्ती दुसरी नव्हती. साहजिकच त्यांचे मार्गदर्शन म्हाइंभटास विशेष उपकारक ठरले असणार यात संशय नाही. ज्या लीळा किंवा गोष्टी ज्याच्या अनुभवाची ती त्याला विचारून आपल्या चरित्रग्रंथास प्रामाण्य आणण्याचीही म्हाइंभटांनी पराकाष्ठा केलेली आहे. चक्रधरांच्या लीळांचा संग्रह तयार करून त्याचे 'उत्तरार्ध-पूर्वार्ध' असे दोन विभाग तयार करण्यात आले.

वास्तविक आधी पूर्वार्ध व नंतर उत्तरार्ध असा नेहमीचा क्रम असताना 'लीळाचरित्रा'च्या आठवणीत तो उलटा का व्हावा? याचे उत्तर हेच की, आधी 'उत्तरार्ध' तयार झाला व 'पूर्वार्धा'ची तयारी मागाहून झालेली आहे. याचे एक कारण म्हणजे चक्रधरांच्या चरित्रातील 'उत्तरार्धा'च्या आठवणी सर्वांच्याच मनात ताज्या होत्या. त्यामुळे तेव्हा म्हाइंभटांनी त्यांच्या आठवणीत ताजा असलेला चक्रधराच्या चरित्राचा 'उत्तरार्ध' प्रथम हाती घेतला असावा. शिवाय दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, स्वतः म्हाइंभटाचा काय किंवा त्यांचे मार्गदर्शक नागदेवाचार्य यांचा काय, चक्रधरांशी जो संबंध आला तो त्यांच्या चरित्राच्या 'पूर्वार्धा'नंतरच आलेला आहे. त्यापूर्वी या दोघांनाही त्यांची

विशेष माहिती नव्हती. 'पूर्वार्धा'ची समाप्तीच मुळी नागदेवांच्या अनुसरणाच्या प्रसंगाने होते. त्यापूर्वी उभयतांच्या भेटीगाठी झालेल्या होत्या हे खरे असले तरी नागदेवांनी स्वामींचे शिष्यत्व पत्करले ते 'पूर्वार्धा'च्या अखेरीसच. म्हाइंभटाच्या बाबतीत तर 'पूर्वार्धा'ची समाप्तीच मुळी नागदेवांच्या अनुसरणाच्या प्रसंगाने होते. त्यापूर्वी उभयतांच्या भेटीगाठी झालेल्या होत्या हे खरे असले तरी नागदेवांनी स्वामींचे शिष्यत्व पत्करले ते 'पूर्वार्धा'च्या अखेरीसच. म्हाइंभटाच्या बाबतीत तर 'पूर्वार्धा'चा प्रश्नच उद्‌भवत नाही. कारण त्यांची आणि चक्रधरांची पहिली भेटच मुळी 'उत्तरार्धा'चा काही काळ लोटल्यानंतर झालेली आहे. अर्थात त्यापूर्वी घडलेले स्वामींचे चरित्र त्यांना दुसऱ्याकडून ऐकूनच माहिती असणार. अशा परिस्थितीत ज्याची माहिती प्रत्यक्ष आहे असा 'उत्तरार्धा'चा भाग त्यांनी प्रथम हाती घेतला तर त्यात नवल नाही. म्हणूनच आधी उत्तरार्ध व मागाहून पूर्वार्ध या क्रमाने लीळांचा संग्रह सिद्ध झाला असा त्यामागील इतिहास आहे.

पूर्वार्ध-उत्तरार्धामध्ये चक्रधरांच्या ज्या 'लीळा' किंवा आठवणी आल्या आहेत त्यांची प्रत्यक्ष म्हणा किंवा ऐकीव म्हणा, माहिती असणारी शिष्यमंडळी अनेक होती. महदाइसा, नागदेव, म्हाइंभट, दादोस, आडसे इत्यादी शिष्यमंडळी स्वामींना अधूनमधून माहिती विचारून त्यांच्याही अनुभवाच्या काहीएक लीळा गोळा करून ठेवलेल्या आहेत. चक्रधरांच्या एकाकी अवस्थेतील त्यांचे पूर्वचरित्र कोणी स्वतः पाहिलेले नसले व त्याची त्याची ऐकीव माहितीही विशेष कोणास नसली तरी स्वतः चक्रधर प्रसंगानुसार किंवा कोणी विचारल्यास आपल्या पूर्वचरित्रातील एखाददुसरा प्रसंग निकटवर्तीयांना सांगितलेला आहे, परंतु असा योग फार क्वचित प्रसंगी आलेला आहे. साहजिकच त्यांच्या चरित्राचा 'एकांक' आकाराने फार लहान आहे. पूर्वार्ध-उत्तरार्ध मिळून एकूण लीळा सुमारे साडेआठशे आहेत, तर 'एकांका'मध्ये सुमारे पाउणशे लीळा आहेत. म्हणजे 'एकांक' एकूण लीळाचरित्राच्या एकदशांशाइतकाही नाही. 'आधी कळस आणि मग पाया', अशा 'उत्तरार्धा'नंतर 'पूर्वार्ध' व शेवटी 'एकांक' अशा क्रमाने उभारलेले हे चरित्रमंदिर अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे.

म्हाइंभटानी 'लीळाचरित्र' लिहून पूर्ण केल्यानंतर लवकरच दक्षिणेवर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या. अशाच एक स्वारीत (खालसैयाच्या धाडीत) महानुभाव पंथीयांची धावपळ झाल्यामुळे त्या गडबडीत 'लीळाचरित्रा'ची हस्तलिखित प्रत कोठेतरी हरवली. ही घटना नागदेवाचार्यांच्या निधनानंतर, म्हणजे शके १२२८-२९ च्या सुमारास घडलेली आहे. कारण त्याचवर्षी दिल्लीच्या अल्लाउद्दीन खिलजीचा सेनापती मलिक कपूर याने देवगिरीवर स्वारी केल्याचा दाखला मिळतो. साहजिकच महानुभाव महंतांना घोकलेल्या लीळांच्या आधाराने या ग्रंथाचे संशोधन करणे भाग पडले. सुदैवाने हिराइसे किंवा हिरांबा यासारखी काही मंडळी संप्रदायात होती. त्यांनी संपूर्ण 'लीळाचरित्र' मुखोद्‌गत असल्यामुळे तिने सांगितलेल्या लीळांच्या आधाराने परशरामबासांनी हा ग्रंथ पुन्हा लिहून काढलेला आहे. या हिराइसेप्रमाणेच इतरही काही जणांना 'लीळाचरित्रा'तील काही भाग तोंडपाठ होता. त्यांचीही मदत परशरामबासांनी घेतली व सर्वांच्या 'वासना' म्हणजे मते एकत्रित करून त्यांनी या चरित्रग्रंथाचा एक पाठ तयार केलेला आहे.

'लीळाचरित्रा'चा हा पिढीपाठ तयार करण्याच्या कामी परशरामबासांना रामेश्वरबास यांचेही साहाय्य झालेले आहे. मात्र 'लीळाचरित्रा'चे हे संशोधनकार्य येथेचे संपले नाही. अचळमुरारीचे शिष्य शिवबास यांनी चरित्राची 'शोधनी' (संशोधन) करून वरील पिढीपाठाची नवीन संहिता तयार केली, तीही 'पिढीपाठ' म्हणूनच प्रसिद्ध आहे. या शिवबासाप्रमाणे पारमांडल्य आम्नायातील नागनाथबासांनीही चरित्राचा एक पाठ तयार केला. शिवबासनाथ व नागनाथबास यांच्या या पाठांना महानुभाव पंथात मान्यता होती असे सिद्धान्ते हरिबास व धाकुटे सोंगोबास यांच्या 'अन्वयस्थळा'तील एका उताऱ्यावरून पहावयास मिळते. ते म्हणतात- ''हीराइसाची शोधनी मुळः मग शिवबासाचा पिढीपाठः आन पारमांडल्ये आम्नाइ आनोबासांचिया नागनाथाचा पाठः ऐसिया तिनः तिन्ही रुपाचिया चरित्र सोधनीया सर्वांसी प्रमाणः एर कांहीहि प्रमाण नोहेः क्षेपक जाणावेः का पांः क्रांतदर्शी पूर्वजीं एथार्थ ईश्वरहेतु तोचि घेतलाः एर नाही घेतलेः'' यावरून सिद्धान्ते हरिबास व धाकुटे सोंगोबास यांच्या काळापर्यंत, म्हणजे शके १३२५ पर्यंत तरी शिवबासांचा पिढीपाठ व पारमांडल्य आम्नायातील नागनाथाबासांचा पाठ या दोनच पाठांना प्रामाण्य होते असे दिसते.

याप्रमाणे 'लीळाचरित्रा'चा इतिहास पाहता या ग्रंथाचे आजपर्यंत खालीलप्रमाणे अवतार झालेले दिसतात.

१. म्हाइंभटांनी लिहिलेला मूळ चरित्रग्रंथ (शके १२०५)

२. परशरामबासांनी हिराइसेच्या साहाय्याने तयार केलेला पिढीपाठ (शके १२३५)

३. शिवबासांनी चरित्राची 'शोधनी' करून वरील 'पिढी'पाठाची तयार केलेली नवीन संहिता (शके १३२५)

४. नागनाथबासांनी तयार केलेला पाठ (शके १३२५)

५. दत्तोबास तळेगावकर यांनी तयार केलेला पाठ (शके १३५०)

६. वाइंदेशकर यांनी तयार केलेला पाठ

लीळाचरित्राच्या वरील आवृत्त्यांपैकी पहिली, म्हणजे म्हाइंभटांचे मूळ हस्तलिखित उपलब्ध नाही. दुसरी, तिसरी व चवथी या आवृत्त्यांना महानुभाव पंथात मान्यता आहे. अखेरच्या दोन मागाहून भर घालून वाढविल्याप्रमाणे वाटतात. अर्थात त्यांना प्रामाण्य नाही. 'लीळाचरित्रा'चा हा इतिहास राघव नावाच्या कवीने आपल्या 'चरित्र-अवाब' या काव्यग्रंथात सांगितलेला आहे. ते लिहितात-

''प्रथम आरंभी लीळांचे शोधनः केलें पूर्वजानें माहीभटीं।।

दुसरी शोधनीः परशुरामबासांनीः लीळांची करूनि बंद केला।।

मग तिसऱ्याने सीवाची शोधनीः मुरारीमल्लानी चवथेन।।''

वरीलपैकी चवथे शोधनीकार मुरारीमल्ल यांचा काळ म्हणजे शके १५१० च्या सुमारास आहे. याचा अर्थ 'लीळाचरित्रा'ची रचना झाल्यापासून पुढे जवळजवळ तीनशे वर्षेपर्यंत निरनिराळ्या संशोधकांकडून त्याचे संस्करण होत होते. या प्रदीर्घ काळात 'लीळाचरित्रा'तील व्यक्ती, स्थळे, प्रसंग, घटना, शब्द अशा अनेक गोष्टींचे संशोधन होऊन गेले. तसेच या काळात 'लीळाचरित्रा'वर आधारलेले सूत्रपाठ, दृष्टान्तपाठ, स्थानपोथी इत्यादी ग्रंथ निर्माण झाल्यामुळे व त्यांत मुळातील काही भाग समाविष्ट झाल्याने, मुख्य 'लीळाचरित्रा'चे संपादन करताना त्या त्या भागाचा संक्षेप केला गेला. याचा एक पुरावा 'दृष्टान्तपाठा'च्या अभ्यासात हाती आलेला आहे. त्यात काही दृष्टान्त असे आहेत की, त्यांचा उल्लेखच तेवढा 'लीळाचरित्रा'त मिळतो, प्रत्यक्ष दृष्टान्त मिळत नाहीत. त्याचबरोबर 'दृष्टान्तपाठा'त समाविष्ट झाल्याने मुळातील काही भाग 'लीळाचरित्रा'च्या पुढील आवृत्त्यांत संक्षिप्त झाला हा खुलासाही समर्थनीय आहे. या चरित्रग्रंथाचे संशोधन व संस्करण होत असतानाच काही गोष्टींची त्यात भर पडत गेली. उदाहरणार्थ - लीळांना 'आदी' म्हणजे प्रारंभीची शीर्षके किंवा मथळे देण्यात आले. तसेच नवीन पिढीला कळणार नाहीत अशा काही जुन्या उल्लेखांचे स्पष्टीकरण करण्यात आले. अर्थात त्यामुळे काही लीळांचा विस्तार थोडा वाढला व काही ठिकाणी एका लीळेच्या दोन-तीन लीळा झाल्या. त्यातच निरनिराळ्या 'वासना'ची म्हणजे मतमतांतरांची भर पडत गेल्यामुळे हा चरित्रग्रंथ आकाराने विस्तृत बनलेला आहे. आज आपल्या हाती असलेले 'लीळाचरित्र' याप्रमाणे काही ठिकाणी संक्षेप तर काही ठिकाणी विस्तारांनी युक्त आहे.

१.३.३ 'लीळाचरित्रा'तील 'एकांका'चा आशय

'लीळाचरित्र' हा म्हाइंभटानी शके १२०५ च्या सुमारास लिहिलेला मराठी सारस्वतातील एक बहुमोल असा आद्य चरित्रग्रंथ आहे. महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधरस्वामी याचे सविस्तर चरित्र त्यांच्या आठवणी व आख्यायिका यांच्या रूपाने या चरित्रग्रंथात वर्णिलेले आहे.

'लीळाचरित्रा'तील 'एकांका'त चक्रधरस्वामींच्या जीवनाचा एकाकी कालखंड आलेला आहे. 'एकांका'मध्ये चक्रधरांच्या जीवनाचा पूर्वभाग आलेला असून त्याचा प्रारंभ त्यांच्या गुरूपरंपरेच्या निवेदनाने केलेला आहे. श्रीचांगदेव राऊळ यांनी फलटण येथे कऱ्हाडे ब्राह्मणाच्या घरी जन्म घेतला, परंतु श्राद्धाच्या दिवशी त्यांच्या पत्नीने 'रतिचिया चाडा' विनवल्यामुळे या प्रसंगाने त्यांच्यात ब्रह्मचर्यवृत्ती उत्पन्न होऊन ते मातापुरास म्हणजेच माहूरकडे प्रस्थान होतात. तेथे आदिगुरू श्रीदत्तात्रेयप्रभुंनी त्यांना वाघाच्या रुपात दर्शन दिले. आणि त्याच्या श्रीमुकुटावर आपला पंजा (चवडा) ठेऊन त्याच्या ठिकाणी ज्ञानशक्तीचा संचार करतात. शक्ती स्वीकारानंतर चांगदेव राऊळ हे द्वारावतीस म्हणजेच द्वारकेस जाऊन रस्ते खराट्याने झाडून स्वच्छतेचे कार्य करू लागतात. डोक्यावर सूप ठेवून खराट्याने पाठीत मारून तेथेच ते ज्ञानसंचाराचे कार्य करतात. अशारीतीने चांगदेव राऊळांपासून शक्ती स्वीकार करून गोविंदप्रभू रिधपुरास परत जातात. गोमतीच्या काठावर त्यांची गोविंदप्रभूंशी भेट झालेली आहे. द्वारावतीस काउरळीची कामाख्या या नावाची एक स्त्री चांगदेव राउळांच्या दाराशी विषयसुखाच्या इच्छेने धरणे धरून बसली होती. परंतु त्यांची प्रवृत्ती ब्रह्मचर्याची असल्यामुळे या

स्त्रीचा दुराग्रह पाहून त्यांनी आपल्या देहाचाच त्याग केला व त्याचसमयी गुजरातमधील भडोच येथे मृत झालेल्या प्रधानपुत्राच्या म्हणजेच हरिपाळदेवाच्या देहात प्रवेश करून तो देह त्यांनी स्वीकारला. म्हणजेच द्वारावतीचे चांगदेव राऊळ भडोचच्या हरिपाळ देवाच्या रूपाने पुनः अवतरले.

स्मशानामध्ये आणलेला हरिपाळदेव जिवंत झालेला पाहून साहजिकच सर्वांना अतिशय आनंद झाला. एकदा त्याच्या बापाला थोडा संशय आल्यावर एखाद्या सिद्ध अथवा योगी पुरुषाने तर हरिपाळदेवाच्या मृत शरीरात प्रवेश केला नसेल ना या शंकेने त्यांने आसपास पुष्कळ शोध घेतला; परंतु तसे काही घडल्याचे त्याला आढळून आले नाही. शिवाय जिवंत झालेल्या हरिपाळदेवात त्यांची पूर्वीची सर्व वैशिष्ट्ये (गोपाळमंत्री दीक्षा, नेहमी गोपाळाची आण घेण्याची सवय, द्युतक्रीडेचे व्यसन आणि पत्नीविषयी आवड) ही तशीच होती. सर्वात मुख्य म्हणजे त्याच्या पत्नीने-कमळाइसेने - पूर्वी एकांतात केलेल्या विहरणाच्या खुणा पटल्याचे सांगितले. तेव्हा संशयाला जागा उरली नाही व पूर्वीचा हरिपाळदेवच पुन्हा जिवंत होऊन आला अशी सर्वांची खात्री पटली. वास्तविक पाहता तो हरिपाळदेव नसून तो द्वारावतीच्या चांगदेव राऊळांचा, म्हणजे एका ईश्वरी पुरुषाचा अवतार होता. त्याने काही दिवस कमळाइसेबरोबर संसार केला, मग काही दिवसांनी त्यांना मुलगा झाला. हरिपाळदेवाला जुगार खेळण्याची प्रचंड आवड होती, परंतु कालांतराने त्या व्यसनापोटी तो दररोज जुगार खेळू लागला. त्यात एक दिवस तो सपाटून हरल्यानंतर ते देणे फेडण्यासाठी त्याने कमळाइसेपाशी तिच्या दागिन्यांची मागणी केली. तिनेही हट्टाला पेटून त्याना दागिने देण्याचे साफ नाकारले. तेव्हापासून हरिपाळदेवाचे मन संसाराला विटले आणि त्याची आनंदी वृत्ती जाऊन दिवसेंदिवस तो अधिकच उदास दिसू लागला.

उदास झालेला हरिपाळदेव रामटेकच्या यात्रेचे निमित्त करून घर सोडून निघून जातात. परंतु रामटेकला न जाता बरोबरच्या सेवकांना झोकांडी देऊन सरळ रिधपुरचा रस्ता पकडतात. रिधपूरला रांधवणहाटात त्यांना गोविंदप्रभूचे दर्शन घडले. याप्रसंगी त्यांनी त्याच्याकडे जे 'सेंगुळें बुडडें' (भजे) फेकले ते वरच्यावर झेलून त्याच्या रूपाने त्याने त्यांच्यापासून ज्ञानशक्तीचा स्वीकार केला. हरिपाळदेवाची गोविंदप्रभूशी झालेली ही भेट त्यांच्या पुढील जीवनक्रमाच्यादृष्टीने क्रांतिकारक ठरली. कारण त्यांच्यापासून ज्ञानशक्ती स्वीकारल्यानंतर हरिपाळदेवाचे हरिपाळपण नाहीसे होऊन त्याचे चक्रधरात रुपांतर झाले, परंतु त्यांचा देह तोच राहिला. मात्र त्यांचे संपूर्ण अंतरंगच पालटून गेले त्यानंतर त्यांनी 'अवस्था' स्वीकारली आणि तेव्हापासून त्यांनी वैराग्य धारण करून त्यांची भ्रमंती सुरू झाली. अशा अवस्थेत विंध्य पर्वताच्या भागात त्यांनी बारा वर्षे तप केले. तेथे असतानाच त्यांना मुक्ताबाई या नावाची एक वृद्ध तपस्विनी भेटली. तिने त्यांना आपल्या आश्रमात नेऊन कंदमुळे-फळांची आरोगणा दिली. तेथून चक्रधर हे काटोलला (कांतीस) जातात. काटोलला त्यांचे परमगुरू चांगदेव राऊळ यांचे उधळीनाथ या नावाचे एक शिष्य राजगुरू होऊन राहत असत. त्यांच्याकडून चक्रधरांनी 'वयस्तंभिनी' विद्या घेतलेली आहे. त्यानंतर चक्रधर स्वामी हे आंध्रप्रदेशात गेले. 'एकांका'तील तैल्यकाराची, वरंगळच्या भक्ताची व मालू या नावाच्या श्रीमंताची या तीन लीळा चक्रधरांच्या आध्रप्रदेशातील भ्रमणकाळातील आहेत. याच भ्रमणकाळात त्यांच्या द्वितीय विवाहाची घटना घडून आलेली आहे. भ्रमंती करत ते वरंगळास आले असताना तेथील एका सधन सावकाराच्या

हंसांबा या नावाच्या मुलीशी त्यांचा केवळ योगायोगाने द्वितीय विवाह झाला. या हंसांबेबरोबर चक्रधरांनी काही दिवस संसार केल्यानंतर लवकरच सर्वसंगपरित्याग केलेल्या एका अवधूताचे दर्शन घडताच त्यांच्या मनाने पुन्हा उचल खाल्ली व द्वितीय पत्नीस सोडून देऊन त्यांनी पुनश्च भ्रमंती धरली.

आंध्रप्रदेशातून महाराष्ट्रात येताना त्यांनी वाटेत डांकराम येथील भिवेश्वराच्या देवळास होणारा वाघाचा उपद्रव बंद करतात व ते स्थान वसते करून चक्रधर घोडाचुडी नावाच्या सिद्ध पुरुषाच्या दर्शनार्थ त्याच्या शिष्याबरोबर किष्किंध पर्वताकडे जाण्यास वळतात. परंतु वाटेत त्या शिष्याची हिंसावृत्ती पाहून चक्रधरांना त्यांची घृणा आल्यानंतर ते त्याची संगत सोडून सरळ रिधपूरला आपल्या गुरूकडे जातात. यावेळीस त्यांचा मुक्काम रिधपूरजवळच दाभविहीर किंवा दाभेरी येथे सुमारे वीस दिवस होता व तेथून हे रोज रिधपुरास गोविंदप्रभूंच्या दर्शनाला जात असत. श्रीचक्रधरस्वामी हे विंध्य पर्वतावरील भागात असताना काही काळ गोंडवाड्यात म्हणजे गोंडलोकांच्या वस्तीत काढतात. याच मुक्कामात चक्रधरस्वामींनी पारध्याच्या हातून सुटलेला ससा त्यांच्या मांडीखाली लपून बसला म्हणून 'शरण आलेया काइ मरण असे' या भूमिकेतून त्यांनी अहिंसा तत्त्वाचे महत्त्व पारध्यांना पटवून दिले. चक्रधरस्वामी हे रिधपूरहून भटकत भटकत सेंदुर्जणीस गेले होते, त्या प्रदेशात त्यांचा वास सुमारे १२ वर्षे होता असे मासोपवासिनीची लीळा सूचित करते. परंतु याबाबतीत निश्चितपणे काही सांगता येत नाही. कारण त्या लीळेतील 'तिसि बारा वरीखें अनोदकें नाहीति' व त्या बारा वर्षानंतर 'गोसावी तीएचि प्रदेशीं भेटले' हे दोन उल्लेख किती परस्परावलंबी आहेत याविषयी संदेह आहे.

वेरुळच्या लखुदेवोबा नावाच्या शिष्याला चक्रधरस्वामींच्या केवळ नामश्रवणाने 'स्थित्यानंद' लाभला हे ऐकून चक्रधरांनी 'एसी एके सूक्षेत्रें असति' असे उद्‌गार काढून एक आध्यात्मिक सिद्धांत शेतीच्या रुपकाने मांडतात. त्यांच्या मते साधकाचे मन हे एक क्षेत्र आहे. लखुदेवोबांप्रमाणे ते सुपीक असेल तर त्यात बी पेरताच अमाप पीक येईल; आणि नापीक किंवा बरड जमिनीसारखे असेल तर त्याची मशागत करूनही काही मिळणार नाही. स्वामींचा त्यानंतरचा मुक्काम रामटेक येथे झाला. तेथे काही दिवस राहून ते प्रथम मनसीळेला किंवा मनसरला व त्यानंतर ते भंडाऱ्याला गेले. भंडाऱ्याला गेल्यावर त्यांना नीळकंठ भांडारेकर भेटले. त्याठिकाणी काही वर्षे त्यांच्याबरोबर राहून प्रथम अळजपुरास व तेथून पुढे नांदेडला जातात. भांडारेकरांना इंगळी चावली असताना श्रीचक्रधरांची स्तुती केल्यावर मनाची एकाग्रता झाल्याने त्यांना वेदना वाटेनाशा झाल्या. घरदार सोडून चक्रधरांजवळ राहू लागलेला असा नीळभट भांडारेकर हा त्यांचा पहिला शिष्य होय. बेलापुरी असताना श्रीचक्रधर हे वानरेया म्हणजे भटोबास उर्फ नागदेवाचार्यांना आपली पुजा कर्तव्यभावनेने करण्यास सांगतात. नांदेड येथील मुक्कामात नरसिंहाच्या देवळात एका पडशाळेत मुले अभ्यास करत असताना भांडारेकर त्या मुलांना तेथून ताबडतोब उठवतात. त्यानंतर लगेचच ती पडशाळा कोसळते. त्यांचे लोकांना विशेष आश्चर्य वाटते. तेंव्हा भांडारेकरांनी 'मला भविष्य अगोदर समजू नये', अशी विनवणी करतात. तेव्हा 'ज्ञान आवश्यक आहे, पण ते दाखवून लोकांची श्रद्धा मिळवे नये' असा उपदेश चक्रधरस्वामी करतात. नांदेडला असताना भांडारेकरांचा मृत्यू झाला, तेव्हा त्यांच्या देहाचा जळनिक्षेप करून चक्रधरांनी नांदेड सोडले. चक्रधर एका गावी पोरांत पोर होऊन रानभेरीचा खेळ खेळत असताना

त्यांच्या स्पर्शाने तेथील बालगोपाळांना अपूर्व सुख म्हणजेच स्थित्यानंद झालेला आहे. चक्रधरांनी गोपाळांशी केलेली आणखी एक क्रीडा म्हणजे गाळात रुतलेल्या मुलांना म्हणजेच पाण्यात शिरून अदृश्य झालेल्या मुलांना आपल्या अद्भूत प्रभावाने जीवन लाभ मिळवून देतात.

एका म्हाताऱ्या स्त्रीचा मुलगा आजारी पडल्यावर तिचे गुरे राखण्याचे काम कोण करेल असा तिला प्रश्न पडतो. आणि तिला आपला चरितार्थ चालविणेही अवघड होऊन बसते. हे कळल्यावर श्रीचक्रधर त्याचा ज्वर (ताप) आपल्या अंगावर घेऊन त्या वयोवृद्ध महिलेला तिच्या विवंचनेतून मुक्त करतात. कान्हरदेया व साहाणेया या दोन्ही गावात एका गुराख्याने दुसऱ्याच्या शिवारात गुरे चारली म्हणून गावातील दोन गटात भांडणे होतात. गुराख्यांना धडा शिकविण्यासाठी स्वतः श्रीचक्रधरस्वामी हिरिरीने त्या भांडणात भाग घेतात. त्यावेळी एका गुराख्याच्या डोळ्यास सपाटून मार बसल्यामुळे त्याचा निकामी झालेला डोळा खाली गळून पडतो. तेव्हा चक्रधरस्वामी तो डोळा उचलून त्या गुराख्याला तांबूळ बांधून डोळा नीट करून देतात. मंडलिक किंवा नाथोबा हा चक्रधरांचा शिष्य जेव्हा भिक्षेसाठी बाहेर पडे तेव्हा एक बाई त्याच्याशी बराच वेळ गोष्टी करीत उभी राही व त्यामुळे त्याला परत येण्यास उशीर होई. हे ऐकून एक दिवस चक्रधरांनी त्याला विचारले, 'अशा परिस्थितीत तू त्या घरी का जातोस?' त्यावर नाथोबांने 'ती बाई आपल्याला वेळणीभर भात भिक्षा म्हणून घालते, म्हणून आपण जातो' असे सांगितल्यानंतर स्वामींनी स्वतःच्या पूर्वायुष्यात घडलेली कळावीबिरवीची गोष्ट सांगून त्याला त्या घरी जाण्यापासून परावृत्त करतात. आपणासारख्या निवृत्त तपस्व्याला किंवा प्रत्यक्ष ईश्वरावताराला पाहून सुद्धा जेथे स्त्रियांच्या ठिकाणी विषयवासना जागृत होतात, तेथे इतर सामान्य जीवांच्या संबंधात ती जागृत होईल यात आश्चर्य नाही, म्हणून साधकाने या बाबतीत सावध असावे असा स्वामींचा अभिप्राय आहे. चक्रधरप्रणीत आचारधर्मात संग व सांघात यांना विशेष महत्त्व आहे. साधकांनी एकमेकांच्या पारमार्थिक उन्नतीसाठी एकमेकांच्या सहवासात राहिले पाहिजे अशी त्यांची शिकवण होती. सांघातधर्माचे विवेचन करताना चक्रधरांनी आपला 'एकांका'तील अनुभव शिष्यांना सांगितलेला आहे. ही गोष्ट पारमार्थिक 'सांघातधर्मा'विषयी नसून साध्या मित्रधर्माविषयी आहे. चक्रधरांनी भेदभाव न करता जे उपचार स्वतःला तेच आपल्या सांगाती चोरालाही करविलेले आहेत.

चक्रधरस्वामी हे नेहमीच विशेषतः एकांकावस्थेत 'आलिया भोगासी असावे सादर' या वृत्तीने राहत असल्यामुळे काहीवेळा त्यांच्यावर काही चमत्कारिक प्रसंग आलेला आहेत. एकदा चक्रधरस्वामी एका गावात घराच्या पडवीमध्ये झोपले असताना सकाळ होताच त्या पडवीच्या मालकाने त्यांना वेठीस धरून कामाला लावले. कारण नसताना त्यांना इतर मजुरांबरोबर वेठीला धरून नेले आणि शेतातील कापणीला लावले पण हे ईश्वरी अवतार असल्याने त्यांच्या नुसत्या अस्तित्वाने त्या शेतात अपार पीक निघाले. चक्रधरांच्या सान्निंध्यात गाईंनासुद्धा 'स्थित्यानंद' लाभलेला आहे. चक्रधरांचा मुक्काम लोणार (ता. मेहेकर, जि. बुलढाणा) येथील भैरवाच्या देवळात असताना तारातीर्थावर त्यांची व यादवनृप कान्हरदेव यांच्या झालेल्या भेटीला ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाचे स्थान आहे. त्याप्रसंगी कान्हरदेवाने देऊ केलेली सुवर्णनाण्यांची (आसु) दक्षिणा स्वामींनी नाकारून आपले निःस्पृहत्व सिद्ध केलेले आहे. चक्रधरस्वामी तेथून निघून गेल्यानंतर कान्हरदेवाने तो दानाचा

पैसा धर्मकृत्यासाठी खर्च करण्याचा निर्णय घेतला आणि कुमारेश्वराच्या देवळाच्या सभोवतालची भिंत बांधली. चक्रधरांनी हिंस्र पशूंचाही रोष घालविलेला आहे. ते एकदा एका गावाला जात असताना ''देव व्हो : या वाटा न वचा : न वचा : एथें अरण्यम्हैसा असें : तो माणुसें मारी :'' असा सल्ला लोक त्यांना देतात. पण तरीही त्याच मार्गाने चक्रधरस्वामी जात असताना तेथे मार्गात म्हैसा आला, पण श्रीप्रभूंना पाहताच तोच शांत झाला व निघून गेला. त्या दिवसापासून त्या रानम्हैशाची हिंस्रवृत्ती नाहीशी झाली व त्यामुळे त्या रस्त्यावरून माणसांची ये-जा पूर्वीप्रमाणे सुरू झाली.

चक्रधरस्वामी हे एकदा रानाच्या जाळीत गेल्यावर तेथील वाघिणीची पिल्ले खेळवत असतात. तेवढ्यात त्या ठिकाणी वाघीण येऊनही त्यांना पाहताच तिचा रोष मावळतो. नंतर चक्रधरस्वामी ही पिल्ले तेथेच सोडून निघून जातात. म्हणजेच हिंस्र पशूंना आपली हिंस्रता विसरावयास लावणारे सामर्थ्य त्यांच्या ठायी वसलेले होते. चक्रधरांच्याजवळ नैष्ठिक ब्रह्मचर्य व निपुत्रिक स्त्रीला पुत्रदान करण्याचे दैवी सामर्थ्य एकवटलेले आहे. एक ठाकूर आपल्या दोन्ही पत्नीला चक्रधरस्वामींच्या सेवेकरिता पाठवतो. परंतु चक्रधरस्वामी त्या दोन्ही स्त्रियांना परत पाठवतात. मग ठाकूराने 'आपल्याला पुत्र नाही' हे दुःख बोलून दाखविल्यानंतर तेव्हा त्यांनी मोठ्या स्त्रीबरोबर विहरण केल्यास पुत्र होईल असा आशीर्वाद दिलेला आहे. चक्रधरांनी आपल्या अंगी 'काळवंचना' करण्याचे म्हणजेच मरण चुकविण्याचे सामर्थ्य असल्याचेही सूचित केलेले आहे. लोणार सोडून रायरीस आल्यानंतर त्या गावच्या वामनपेंद्यी नावाच्या एका ब्राह्मणाच्या मृत पत्नीस जिवंत केलेले आहे. याच रायरीच्या मुक्कामात त्यांनी विष्णु स्वामींचा शिष्य गोविंदस्वामी यास चक्रधरस्वामींनी स्थित्यानंद दिल्याचीही हकिगत आहे. गोविंदस्वामींचे गुरू विष्णुस्वामी यांना 'घुटिकासिद्धी' अवगत असल्यामुळे तोंडात घुटिका घालून ते आकाशात संचार करून लोकांना चमत्कार करवून दाखवत असतात. एकदा घुटिका तोंडात ठेवून आकाशात संचार करीत असताना विष्णुस्वामींना शिंक आल्यामुळे त्यांच्या तोंडातील घुटिका खाली पडल्याने ते स्वतःही जमिनीवर कोसळतात. आणि त्यांचा पाय मोडतो.

एकदा सीमंतपूजनार्थ वऱ्हाड देवळात उतरले असताना लग्नातील दोन्ही पक्षांचा चक्रधरांना उत्तम दर्जाचा पाहुणचार मिळतो. वरपक्षाला वाटले, की हे वधूपक्षाचे आहेत; आणि वधुपक्षाला वाटले की, हे वरपक्षाकडील आहेत. साहजिकच उभय पक्षांनी त्यांना मानसन्मान केला. स्वतः निर्मम वृत्तीने राहणारे चक्रधरस्वामी मात्र त्यांना स्पष्टपणे म्हणाले की, 'मी तुमचाही नाही आणि त्यांचाही नाही; मी कोणाचाच नाही.' त्यावर उभय पक्षांकडील वऱ्हाड्यांनी 'महाराज, आम्हीच सर्वजण आपली आहेत' असे नम्रभावाने म्हणतात. आणखी एका लग्नमंडपात जाऊन आपण ईश्वरावतार आहोत हे सिद्ध करून दाखवतात आणि हे स्वतःला 'सिद्ध' म्हणवून घेतात. एकाकी अवस्थेत भ्रमंती चालू असताना चक्रधरांच्या वृत्तीतील बालोन्मत पिशाच्चवृत्ती उफाळून आलेली आहे. उकिरड्यावर झोपले असताना 'उकिरडा व्याला, माणूस झाले' म्हणून गावकरी चक्रधरस्वामीसह गावजेवण घालतात. चक्रधरस्वामींच्या अंगी उत्कृष्ट सभाकौशल्यही होते. म्हणूनच दोन संन्याशी वादविवाद करताना जो पराभूत आहे त्याच्याकडे गोसाव्यांनी पाहिले तर दुसऱ्याला विवाद सूचत नसे. चक्रधरस्वामी जेव्हा पराभूत होऊ घातलेल्या संन्याशाकडे पहात तेव्हा त्याला नवीन नवीन मुद्दे सूचत. अशारीतीने स्वामींनी

दोघांनाही विजयाचा आनंद मिळवून दिलेला आहे. 'पराजित मठ प्रतिष्ठा' या लीळेमध्ये दोन संन्याशात वादविवाद झाल्यानंतर स्थानिक संन्याशाचा विजय होऊन त्याच्या साऱ्या चीजवस्तू त्याला परत मिळवून देतात. रायरी सोडल्यावर चक्रधरांचा पुढील प्रवास झाडीमंडळातून झालेला आहे. या झाडीमंडळात श्रीचक्रधरांना आळजपूरचा-एलिचपूरचा संस्थानिक रामदरणा भेटला. आणि तो त्यांना आपल्या नगरीस म्हणजे एलिचपुरास घेऊन गेला. तेथे चक्रधरस्वामींचा मुक्काम रामदरण्याच्या देव्हार चौकात सुमारे दहा महिने असताना गरुड-घोड्याला 'स्थिती' देणे व चुनेजातीचे निरुपण कसे करायचे हे त्यांनी तेथील समजावून सांगितले आहे. चक्रधरांसारखा राजबिंडापुरूष व त्याचा राजाकडून होत असलेला सत्कार पाहून अळजपूरच्या नागरिकांना हा रामदरण्याचा नियोजित जावई असावा असे वाटले असल्यास त्यात नवल नाही. अळजपुरास चक्रधरांनी रामदरण्याच्या मुलीशी आपला तृतीय विवाह केला अशी माहिती 'लीळाचरित्रा'च्या वाइंदेशकर पाठामध्ये उल्लेखित आहे; परंतु ती चुकीची आहे असे शं. गो. तुळपुळे म्हणतात.

चक्रधर स्वामींना महानुभाव पंथामध्ये 'सर्वज्ञ' असे संबोधले जाते. कारण त्यांना सर्व शास्त्रें व कला अवगत होत्या. त्यांच्यातील स्थापत्य शास्त्रविषयक ज्ञानाची कल्पना काही लीळांमध्ये सांगितलेली आहे. अळजपुराहून स्वामी वडनेर करून आंबजईस आले. तेथे त्यांची वडनेरच्या रामदेवाची पहिली भेट झालेली आहे. हा रामदेव किंवा दादोस स्वामींचा पहिला शिष्य होय. तो त्यांच्या प्रयाणकाळापर्यंत अधूनमधून त्यांच्याकडे जात राहतात. वडनेरहून चक्रधर आंबजई, वासनी, पातुरडी, वीसई किंवा इसवी वगैरे गाव करीत मेहकरला जातात. मेहकर येथे त्यांना बोणेबाई या नावाची एक विरक्त म्हातारी भेटली. ती भिक्षेवर निर्वाह करून ईश्वरभक्तीत काळ कंठीत होती. तिन चक्रधरांचे मौनव्रत पाहून त्यांना 'मौनिदेव' असे नाव दिलेले आहे. तिच्या आग्रहावरून स्वामी त्या गावी बरेच दिवस राहतात. बरेच दिवस बाणेश्वराच्या देवळात राहून पुढे सिंहस्थ यात्रेच्या निमित्ताने ते तिच्याबरोबर पैठणकडे निघतात. दैवी सामर्थ्याने स्वतःचे शरीर वाढवून ते भीतिदायक करण्याचीही कला चक्रधरस्वामींना अवगत होती. चक्रधर स्वतःला ईश्वरावतार-श्रीकृष्णाचा अवतारच समजतात. स्वामींच्या वेधाने गाई अमाप दूध देतात हे पाहून एका ब्राह्मणाने त्यांना 'साक्षात श्रीकृष्ण' म्हटले आहे. नैष्ठिक ब्रह्मचर्य व सात्त्विक मनोवृत्ती त्यांच्या ठायीठायी वसलेली आहे. 'सामान्य स्त्रियां भेटी' या लीळेतून स्वामी मायबाप आहेत, त्यांच्याकडे वैषयिकदृष्ट्या पहाणे बरोबर नाही, असे एका वेश्येने दुसरीला म्हटले. ती हकिगत चक्रधरांनी म्हदाइसेला सांगितलेली आहे. स्वतः श्रीकृष्ण होऊन व बोणेबाईला देवकी करून त्यांनी गोकुळ अष्टमी साजरी केली. ती मेहकरच्या या मुक्कामातच केलेली आहे. चक्रधर हे स्वतः अहिंसक होतेच, पण हिंसकाची हिंसावृत्ती नष्ट करण्याचे सामर्थ्य श्रीचक्रधरांच्या ठिकाणी कसे होते यासंबंधीचा वृत्तांत 'महीषयुद्ध नीवारण' या लीळेत सांगितलेला आहे. मेहकरहून श्रीचक्रधर लोणार येथे 'सोमवार' यात्रेनिमित्त जाऊन येतात. तेथे चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावीत होऊन चोरांनीही चौर्यवृत्तीचा कसा त्याग केला याची कथा आलेली आहे. सिंहस्थ यात्रेच्या निमित्ताने चक्रधरांनी मेहकर सोडले व ते त्र्यंबकेश्वरच्या वाटेस लागतात. ही घटना त्यांच्या कालनिर्णयाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. बोणेबाईने स्वामींना घेऊन त्र्यंबकेच्या यात्रेला

जाण्याची तयारी चालविली. परंतु असंग्रही वृत्तीच्या चक्रधरांनी तिला बरोबर काही सामान घेऊ दिले नाही. प्रवासात असतानासुद्धा चक्रधरांची भ्रमंती सतत चालूच असे. बोणेबाईची सोबत जेवणखाणापुरतीच होती. एरव्ही ते स्वतंत्र व असंग्रही वृत्तीने राहत. ज्या मुक्कामाला जी शिधासामुग्री मिळेल ती तेथेच सर्व संपवून टाकावी, त्यात काही शिल्लक ठेवू नये, असे स्वामींचे मत आहे.

मेहकरहून निघाल्यावर मजल दरमजल करीत चक्रधरस्वामी आणि बोणेबाई हे दोघेही रावसगावी जातात. त्र्यंबकच्या वाटेवर रावसगाव येथे महादेव पाठक यांचे घरी 'पाणीभात बाबूळशेंगा' खाण्याच्या प्रसंगाचा उल्लेख या लीळेत आलेला आहे. एकाकी भ्रमंती करत शेवटी प्रतिष्ठानास म्हणजे पैठणला पोहचतात. पैठण येथे चक्रधरांच्या पुढील आयुष्यात महत्त्वाची ठरलेली एक घटना घडली ती म्हणजे नागुबाईची किंवा बाईसांची भेट होय. नागुबाई ही पैठणात विरक्त वृत्तीने राहात असे. बोणेबाईंच्या तोंडून चक्रधरांचे वर्णन ऐकून ती त्यांना आपल्या मठात घेऊन जातात. तेथे त्यांना बसायला पायपुसणे आणि खायला पाणीभात व तोही दुधी करट्यात देऊन तिने त्यांचा आदरसत्कार केलेला आहे. परंतु या प्रसंगाने तिने चक्रधरस्वामींचे शिष्यत्व पत्करले व ती त्यांची एकनिष्ठ भक्त झाली.

म्हाइंभट लिखित 'लीळाचरित्रा'च्या 'एकांका'तील भागामध्ये चक्रधरांचे अत्यंत विलोभनीय दर्शन घडविलेले आहे. 'एकांका'मध्ये चक्रधरस्वामींच्या जीवनाचा एकाकी कालखंड आलेला आहे. थोडक्यात, चक्रधरांच्या आयुष्याचा अर्थात जीवनाचा पूर्वभाग त्रोटक व रोचक पद्धतीने म्हइंभटांनी 'एकांका'मध्ये चित्रित केलेला आहे.

१.३.४ 'लीळाचरित्र एकांका'तील चक्रधरस्वामीचे व्यक्तिमत्त्व

चक्रधरांचे 'एकांक' भागात घडणारे दर्शन विलोभनीय आहे. लीळाचरित्राच्या एकांकातून श्रीचक्रधरांचे मनुष्यत्व आणि अवतारित्व असे दुहेरी व्यक्तिमत्त्व प्रकट झालेले आहे. एक तर ते त्यांच्या जीवनाची एकाकी अवस्था दर्शविते आणि या अवस्थेबद्दल प्रत्येकालाच एक प्रकारचे आकर्षण असते. दुसरे म्हणजे चक्रधरांच्या अद्‌भूतरम्य चरित्राला 'एकांक' भागात लोकविलक्षण अशा घटनांनी प्रारंभ झालेला आहे. श्रीचक्रधरस्वामी हा लीळाचरित्राचा विषय आहे. जिवांचे उद्धरण करण्याच्या हेतूने 'अवतार' घेतल्याने 'जीवोद्धारव्यसनी अवतार' असे त्यांना संबांधले जाते. ऐन पंचविशीतील मृत प्रधानपुत्र हरिपाळदेव यांची जिवंत झालेली मूर्ती तरुण चक्रधरांच्या स्वरूपात आपल्या दृष्टीसमोर एकदम उभी राहिल्यामुळे हा प्रसंग घडून येण्यापूर्वीच्या त्यांच्या आयुष्यक्रमावर कायमचा पडदा पडतो. हरिपाळदेवाचे चक्रधरांच्या रुपाने जिवंत होण्यापूर्वीचे चरित्र आपणांस सर्वस्वी अज्ञात आहे व याच गोष्टीत त्यांच्या भावी चरित्रातील गूढरम्यतेचे बीज आहे. त्यांचे घराणे, जन्म, बालपण, शिक्षण, मित्रमंडळ, आवडीनिवडी इत्यादी गोष्टींविषयी पूर्ण अंधार आहे. त्या अंधारातूनच एकदम 'गोपाळमंत्री दीक्षाः गोपाळण्ही आणः जोआंचें व्यसनः राणियेचा पाठीयावोः हरिपाळ नांव' या वर्णनाची एक सुंदर, सतेत तरुणाची मूर्ती अकस्मात् पुढे येऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतल्याशिवाय राहत नाही.

श्रीचक्रधरस्वामी हे ‘पर’ आणि ‘अपर’ या दोन्ही विद्या जाणणारे असे ‘उभयदृश्यावतारी’ होते. महानुभावीय तर श्रीचक्रधरांना ‘द्वारावतीचे चांगदेव राऊळ’ यांचे अवतार म्हणजे श्रीकृष्णाचे प्रत्यक्षावतारच मानतात. ‘गर्भ’, ‘पतित’ आणि ‘दवडणे’ या तीन अवतारांपैकी श्रीचक्रधर ‘पतितावतार’ समजतात. कारण द्वारावतीच्या चांगदेव राऊळ यांनी प्रधानपुत्राच्या-हरपाळदेवाच्या मृत म्हणजेच ‘पतित’ शरीरात प्रवेश केल्याने हा अवतार झालेला आहे. श्री चांगदेव राऊळ यांना व्याघ्रवेशाने श्रीदत्तात्रेयांनी अनुग्रह करणे, गोविंदप्रभूंना श्रीचांगदेवांकडून मिळालेला अनुग्रह (ली. २-३) या प्रसंगनिवेदनाने श्रीचक्रधरांची गुरुपरंपरा स्पष्ट होते. नंतर पंचवीस वर्षाच्या तरूण प्रधानपुत्राचे, हरिपाळदेवाचे निधन आणि श्रीचक्रधरांनी त्याच्या देहात परकायाप्रवेश करणे व श्रीचक्रधररूपाने प्रकटणे (ली. ५), अधिकारी व्यक्तींना शोधणे, योग्यतेनुसार त्यांना ज्ञान किंवा प्रेम देणे, अनधिकारी व्यक्ती असतील तर त्यांच्याकडून घडलेल्या पापकृत्यांचा पापमळ धुवून काढणे, त्यांना अधिकारी बनविणे आणि अन्य देवतांच्या कचाट्यातून सोडविणे हेच या अवताराचे जीवितकार्य होते. ‘लीळाचरित्रा’तील ‘एकांका’तून एक सामान्य माणूस ते अवतारित्व असा त्यांचा प्रवास आपल्याला पहायला मिळतो. पंथप्रवर्तक-प्रचारक असा त्यांचा प्रवास पुढल्या पूर्वार्ध आणि उत्तरार्धात आपल्याला पहायला मिळतो.

श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वात परमेश्वरी अंश आहे. नव्हे, ते प्रत्यक्ष परमेश्वरच आहेत. त्यामुळे त्यांच्या दर्शनाने प्राणिमात्रांनासुद्धा स्थित्यानंद होत असे. हिंस्त्र पशुंची हिंस्त्रता कमी होई, गाईंना दृष्टिसुख देऊन ते आनंदित करीत. एका ब्राह्मणाने ‘आमचेया गाई राखते तो साक्षात श्रीकृष्ण’ असे विधान केले आहे. स्वामींनी गरूड घोड्यासही स्थित्यानंद दिला आहे. चक्रधरांनी एकाकी काळात अद्‌भुत गोष्टी केल्या आहेत, चमत्कार केले आहेत. पण श्रीचक्रधरांना कधी याचा अहंकार वाटला नाही. ते शांतचित्त, प्रसन्न व्यक्तीमत्त्व असलेले आणि तर्कशुद्ध विचार प्रतिपादन करणारे आहेत. आपल्या एकाकी जीवनकाळात ते काट्याकुट्यातून आडमार्गाने जात असत. उकिरड्यावर झोपणे, तेलीणीच्या घरी जाऊन तिच्या बाजेवर झोपणे, श्रीमुखीचा तांबूत देणे अशा घटनांमधून त्यांची निरासक्त वृत्ती स्पष्ट होते. हंसाबाईशी विवाह करणे व पुढे तिचा त्याग करणे अशा काही गोष्टींमधून त्यांच्या वर्तनाची नेमकी संगती लागत नाही, पण जीवनाबद्दलचे औदासीन्य आणि वैराग्यवृत्तीने ते भारलेले होते. हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

इतर अवतारी पुरुषांप्रमाणे चक्रधरांच्या अंगीही अनेक सामर्थ्ये एकवटलेली होती. उदाहरणार्थ- दुसऱ्याचा ज्वर आपल्या अंगावर घेणे (३३), माणसांना अदृश्य करणे (३२), खाली पडलेला डोळा पुन्हा जागच्या जागी लावणे (३४), हिंस्त्र पशूंची हिंस्त्रता घालवणे (४०, ४१), निपुत्रिकास पुत्र देणे (४२), मृतास जिवंत करणे (४३), वाद करणाऱ्या पंडितांना नुसत्या दृष्टिक्षेपाने स्फूर्ती देणे (४९, ५०) अशा काही शक्ती ‘एकांक’ भागात दिसून येतात. तसेच चक्रधरांच्या शिक्षणाविषयी ‘एकांका’त उल्लेख नसला तरी त्यांच्या विविध ज्ञानांचा पुरावा काही लीळातून पहावयास मिळतो. उदाहरणार्थ - द्यूतविद्या (१३), अश्वविद्या (१६), चुर्णविद्या म्हणजे चुना तयार करण्याच्या कृतीचे ज्ञान (५४) इत्यादी. दोन संन्याशांमधील वादात ‘सभा’ होण्याची, म्हणजे निवाडा करणारा अध्यक्ष होण्याची

त्यांची पात्रता असल्याचा उल्लेख काही लीळामध्ये आलेला आहे, त्यावरून त्यांच्या पांडित्याची, बुद्धिमत्तेची आणि विद्वत्तेची कल्पना आपणाला आल्याशिवाय राहत नाही. वरील विद्यांबरोबरच गायन-नर्तनासारख्या कलांचीही त्यांनी आवड असल्याची काही दाखले मिळतात. उदाहरणार्थ - ''पुराण आइकति: पेखणें अवलोकीति'' (५३) या सर्व विद्याकला चक्रधरांनी स्वतः अवगत केल्या असल्या पाहिजेत.

चक्रधरस्वामी हे स्वतः ईश्वरी अवतार असल्यामुळे ते नित्य आनंदात असत. तसेच हा आनंद किंवा स्थित्यानंद दुसऱ्याच्या ठिकाणी उत्पन्न करण्याची शक्तीही त्यांच्यापाशी असून त्यांच्यापासून अनेकांना स्थिती झाल्याचे काही दाखले 'एकांका'मध्ये पहावयास मिळतात. ही विदेहावस्था कोणाला चक्रधरांच्या दर्शनाने (चांभार, तेली-तेलीण), तर कोणाला त्यांच्या नामश्रवणाने (लखुदेवोबा), कोणाला त्यांच्या स्पर्शाने (त्यांच्याबरोबर रानभेरीचा खेळ खेळणारे गोपाळ) तसेच ते रामटेक येथे असताना ज्या ओट्यावर बसत त्या ठिकाणी बसलेल्या एका ब्राह्मणालाही 'स्थिती' झाल्याचा उल्लेख आहे. तसेच हा स्थित्यानंद मानवसृष्टीप्रमाणे पशुसृष्टीलाही होत असे हे स्वामींनी केवळ आपले दृष्टिसुख देऊन गाई चारल्याचेही काही उल्लेख सापडतात. आपला स्थित्यानंद दुसऱ्यास देण्याच्या या शक्तीबरोबरच त्यांच्या ठिकाणी एक प्रकारची बालोन्मत्त पिशाच्यवृतीही असल्याचेही काही दाखले 'एकांका'मध्ये पहावयास मिळतात. किंबहुना 'एकांका'च्या प्रारंभीच त्यांनी 'अवस्थास्वीकार' केल्यावर त्यांचे जे दर्शन घडते ते त्याच वृत्तीचे द्योतक आहे. चक्रधरांच्या या विक्षिप्त वृत्तीमुळे त्यांच्या हातून क्वचित लौकिकदृष्ट्या विपरित वर्तन होऊन ते लोकापवादास कारण ठरलेले होते. यादृष्टीने त्यांचे एका तेलिणीच्या घरी जाऊन तिच्या बाजेवर तिच्यापाशी निजणे (११) वरंगळ येथे असताना एका ब्राह्मणाच्या बहिणीकडून एकांतात 'सेवादास्य' स्वीकारणे (१४) हे दोन प्रसंग उल्लेखनीय आहेत. या दोन्ही प्रसंगांत चक्रधरांची वृत्ती निर्लेप व निर्मळ असेलही परंतु त्यामुळे त्यांनी लोकांना 'भकों देण्यास' म्हणजेच वाटेल ते बोलण्यास वाव दिला यात शंकाच नाही.

'एकांका'तील असा एखाददुसरा प्रसंग सोडल्यास चक्रधर हे खरे विरक्त सत्पुरुष वाटतात. ही विरक्ती त्यांच्या ठिकाणी मुलतः असून ती ऐन तारुण्यातील एका प्रसंगाने उपाळून आलेली आहे. आपणांस जुगाऱ्यांच्या ऋणातून मुक्त करण्यासाठी आपली प्रिय पत्नी स्वतःच्या अलंकारांचा त्याग करण्यास तयार नाही. स्वतःच्या पतीपेक्षा तिला अलंकार अधिक प्रिय आहेत, हे पाहून तरूण चक्रधरांच्या मनात प्रपंचाविषयी एक प्रकारचा उबग निर्माण झाला व तेव्हा त्यांनी रामयात्रेचे निमित्त करून गृहत्याग करण्याचे ठरविले. हंसाबाईशी विवाह करणे व पुढे तिचा त्याग करणे अशा काही गोष्टींमधून त्यांच्या वर्तनाची नेमकी संगती लागत नाही, पण जीवनाबद्दलचे औदासीन्य व वैराग्यवृत्तीने ते भारलेले होते, हे लक्षात आल्याशिवाय राहत नाही. आंध्रप्रदेशातील तेल्याने पश्चातापपूर्वक केलेली सत्कारयुक्त पूजा ते स्वीकारतात; पण रात्री निजानीज झाल्यावर त्याला न सांगता त्याने दिलेली महावस्त्रे तेथेच ठेऊन त्याच्या घरी पाणीही न पिता ते सरळ नदी गाठतात. आणि पुरामध्ये शिरून यदृच्छ्या जेथे काठाला लागले तेथून ते पुढे चालू लागतात. रामदरण्यासारखा संस्थानिकांचा श्रीमंत पाहुणचार आटोपता घेऊन त्यांनी पुन्हा भ्रमंती धरली यातही त्यांच्या विरक्त वृत्तीचाच प्रत्यय येतो.

वैराग्य किंवा औदासीन्य हा चक्रधरांच्या चरित्राचा गाभा आहे. त्यांच्या मौनातूनही हाच भाव सर्वत्र प्रकट झालेला आहे. बोणेबाई त्यांना 'मौनिदेया' म्हणतात. त्यातही पुष्कळ अर्थ आहे. परंतु चक्रधर विरक्त किंवा उदासवृत्तीने राहत याचा अर्थ ते माणुसकीला किंवा सुखदुःखादि मानवी भावनांना पारखे झाले होते असे मात्र नाही. उलट त्यांच्या ठिकाणी सर्वभावना व काही काळ त्याच्याबरोबर असलेल्या भांडारेकारांच्या निधनाने ते दुःखी होतात व 'मग यासि तेथ राहावेंचि ना' असे म्हणून ते तेथून निघतात.

श्रचक्रधर स्वामींचा विरक्तावस्थेतही स्वामींचा सारासारविवेक जागा आहे याची साक्ष काही लीळा देतात. उदाहरणार्थ - स्वामींच्या निधनाची खोटीच वार्ता सांगून एका भक्ताच्या मृत्यूस कारणीभूत होणाऱ्या ब्राह्मणाला 'ऐसा सत्यही अर्थु न बोलिजेः मा एसणें असत्य कैसेनि तुम्हा बोलविले?' असे ते परखडपणे विचारतात (१४). आपला पहिला शिष्य नीळभट भांडारेकर हा भविष्य सांगून लोकांना आश्चर्यचकित करतो हे पाहून 'ऐसे न कीजें की' असे स्वामी त्याला बजावतात. अशा सर्व प्रसंगातून चक्रधरस्वामींची विवेकबुद्धी जागृत असल्याची काही उदाहरणे पहावयास मिळतात. त्याचबरोबर ही भ्रमंती चालू असताना स्वामींची अवलोकनशक्तीही जागृत होती. यादृष्टीने त्यांनी गोंडवाड्यातील गोंडलोकांच्या राहणीचे केलेले सूक्ष्म अवलोकन उल्लेख करण्याजोगे आहे. चक्रधरस्वामी हे विरक्त असले तरी विनोदालाही पारखे झालेले नाहीत. उदाहरणार्थ - जन्माष्टमीच्या दिवशी बोणेबाईला मातीचे गोकुळ करताना पाहून स्वामींनी 'श्रीकृष्ण आणि देवकी ही काय मातीची होती काय?' असे म्हणून तिची थट्टा केलेली आहे. चक्रधरांची परोपकारी वृत्ती या वैराग्यदशेतही जागी होती याचे एक उदाहरण 'गोवारी ज्वर-निवृत्ति' या लीळेत आढळून आलेले आहे.

चक्रधरांच्यातील साधुत्वाच्याही काही खुणा 'एकांका'मध्ये उमटलेल्या आढळून येतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विलक्षण साधेपणा असून ते कोठेही जातात व कोणातही मिसळतात. साधेपणा तर त्यांच्या ठिकाणी मूर्तिमंत होता. ज्या बाईसेने प्रथम भेटीत त्यांना साधे पायपुसणे बसावयास देऊन दुधीकरत्या पाणीभात घालून तो त्यांच्यापुढे केला, तीच बाईसा पुढे स्वामींची प्रमुख शिष्या झालेली आहे हे पाहण्यासारखे आहे. त्यांच्यातील भूतदया व प्रियंवदित्व हे गुणही साधूस शोभणारेच आहेत. भूतदयेच्या दृष्टीने 'ससीक-रक्षण' ही लीळा अत्यंत महत्त्वाची आहे. या लीळेमध्ये पारध्याचे भक्ष्य होऊ पाहणाऱ्या एका सशाला स्वामी आसरा देतात आणि त्या पारध्याला म्हणतात- ''हां गाः ए रानीं असतिः पाणी पीतिः यातें तुम्ही कां मारा?'' असे म्हणून ते सशाला तर अभय तर देतातच पण चोरालाही 'माहात्मे' म्हणून संबोधतात. यावरून श्रीचक्रधरस्वामींच्यातील प्रियंवदित्वाची प्रचिती आपणाला आल्याशिवाय राहत नाही. सशाची ही लीळा त्यांच्या अहिंसावृत्तीचीही द्योतक आहे. घोडाचुडीच्या शिष्यांच्या हातावर कोण्या एका बाईंनी कढत आंबिल घातल्यामुळे हात भाजल्याने तो संतापाने तोच हात तिच्या घरातील वळचणीला पुसतो आणि त्याबरोबर त्या केवळ घरालाच नव्हे तर त्या संपूर्ण गावालाच लागलेली आग पाहून चक्रधर त्याच्या या कृत्याबद्दल निषेध व्यक्त करताना

म्हणतात- ''माहात्मे होः वाखट केलेंः एसेनी भूतहींसा नेलींः जाली.'' इतके म्हणूनच स्वामी थांबत नाहीत, तर त्या हिंसकाचा संगही टाळतात.

अहिंसेचे व्रत धारण केलेल्या चक्रधरस्वामींच्या हृदयात समत्वभावही ठायीठायी वसलेला आहे. उदाहरणार्थ-वेठीस धरून नेलेल्या मजुरांच्या मेळाव्यात असतानाही त्यांच्या चित्ताचे समत्व ढळत नाही. इतकेच नव्हे, तर चोरांबरोबर आपणही धरलो गेलो तर दोघांनाही सारखीच वागणूक मिळावी अशी अपेक्षा ठेवतात. साधूच्या ठिकाणी असणारा अविरोध चक्रधरांपाशी आहे. केवळ रात्रीच्यावेळी मजुरांमध्ये निजल्यामुळे सकाळी उठल्यावर त्यांच्याबरोबर आपणासही धरून नेल्याबद्दल ते यत्किंचितही खेद वा खंत करत नाहीत. उलट मुकाट्याने त्या मजुरांबरोबर शेतावर कापणीच्या कामाला जातात. स्वामींच्या अंगच्या निःस्पृहतेचा प्रत्यय त्यांची लोणार मुक्कामी कान्हरदेव यादवाशी झालेल्या भेटीच्या प्रसंगातून आपणांस पहावयास मिळतो. सिंघणाचा कान्हा प्रसन्न झाला असताना त्यांने देऊ केलेल्या सुवर्णद्रव्याला ते हातही लावत नाहीत. कृष्णदेव यादवाने अर्पण केलेल्या या सुवर्णद्रव्याचाच काय पण कशाचाच संग्रह स्वामींनी कधीच केलेला नाही.

निष्कलंक चारित्र्य हे चक्रधरस्वामीच्या व्यक्तिमत्त्वाचा अनन्यसाधारण गुण आहे. मोहविकारवश होणाऱ्या घटना त्यांच्या जीवनात घडल्या नाहीत असे नाही, परंतु त्यांनी या प्रत्येकवेळी संयम पाळलेला आहे. नैष्ठिक ब्रह्मचर्य हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील हा अंगभूत गुण आहे. कळावी-वीरवी या नावाची व्यभिचारास प्रवृत्त करणारी एक स्त्री, एका ठाकुराने पुत्रलाभाच्या इच्छेने त्यांच्याकडे 'सेवा' करण्यासाठी पाठविलेल्या त्याच्या दोन स्त्रिया आणि मेहकर येथील एक सामान्य स्त्री म्हणजे वेश्या, यांच्या प्रलोभनास चक्रधर यत्किंचितही बळी पडले नाहीत असा उल्लेख आहे. पासोडीचे वस्त्र पांघरणे, वृक्षातली आसन, स्मशान जीर्णवस्त्र स्वीकारणे, अंगीटोपरी व वहाणा असा त्यांचा सर्वसाधारण पोषाख असल्याचा उल्लेख अनेक लीळांमध्ये सापडतो. कपडेलत्ते व अलंकारांची हौस त्यांनी कधीच बाळगलेली नाही. कोणत्याही एखाद्या ठिकाणी ते तीन दिवसांपेक्षा अधिक काळ वास्तव्य करत नव्हते. भिक्षेवरच त्यांचा उदरनिर्वाह असूनही ते भिक्षा मागताना एकाच ठिकाणी जास्त वेळ उभे राहून बोलत राहू नये असा संकेत त्यांनी पंथियांना घालून दिलेला होता.

श्रीचक्रधरांची गुरुभक्ती ही त्यांच्या आध्यात्मिक जीवनाचा पायाच आहे. श्रीगोविंदप्रभूंच्या प्रमाणेच क्रांतीचे म्हणजेच काटोलचे, द्वारावतीकारांचे अनुग्रहीत राजगुरू हे आपले गुरू होत असे चक्रधरांनी एका प्रसंगी म्हटले असले तरी ते अर्थवादात्मक समजण्यास हरकत नाही. कारण त्यांनी रिद्धपूरच्या गोविंदप्रभूंकडूनच ज्ञानशक्तीचा स्वीकार केलेला असून तेच त्यांचे प्रत्यक्ष गुरू होत. द्वारावतीकारांचे अनुग्रहित असलेल्या तेथील राजगुरूपासून त्यांनी वयस्तंभिनी विद्या घेतलेली असली, तरी ते देऊ करीत असलेल्या आध्यात्मिक किंवा ईश्वरी विद्येचा मात्र त्यांनी स्वीकार केलेला नाही. याचे कारण त्यांची गोविंदप्रभूंविषयीची निष्ठा हेच होय. गोविंदप्रभूंनी खाऊन उरलेल्या एका मातंगाकडील हुरड्या-सोल्याचे शेषकण चक्रधर आवडीने खातात व त्यांची मूर्ती दिसेपर्यंत त्यांच्याकडे पहात उभे राहतात. चक्रधरांचा मुक्काम दामविहीर या गावी असताना ते प्रतिदिनी

श्रीगोविंदप्रभूच्या दर्शनासाठी रिधपुरास जात असल्याचाही उल्लेख २१ व्या लीळेत आलेला आहे. अशा प्रसंगातून चक्रधरांची गोविंदप्रभूंवरील म्हणजेच आपल्या गुरुवरील अढळनिष्ठा व्यक्त झाल्याशिवाय राहत नाही. चक्रधरांचे हे एकाकी अवस्थेतील भ्रमण मनात गुरुध्यान धरूनच होत असले पाहिजे याविषयी मनात संदेह वाटत नाही.

१.३.५ 'लीळाचरित्र एकांका'तील सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब

यादवकालीन महाराष्ट्रातील सामाजिक जीवनाच्या अभ्यासाचे साधन या दृष्टीने 'लीळाचरित्र' हा ग्रंथ केवळ अपूर्व आहे. 'लीळाचरित्रा'चा प्रमुख विषय असलेले चक्रधरस्वामी हे स्वतः सामान्यजनांत वावरणारे असल्यामुळे त्यांच्या चरित्रकाराने सांगितलेल्या त्यांच्या शेकडो लीळांतून किंवा आठवणींतून तेव्हाच्या समाजजीवनाच्या विविध अंगाचे विस्तृत चित्रण यामध्ये चित्रित झालेले आहे. साहित्य हे समाज जीवनाचा आरसा असते, याचा प्रत्यय आपणाला 'लीळाचरित्रा'च्या 'एकांका'तून आल्याशिवाय राहत नाही. यादवकालीन समाज चातुर्वर्ण्याच्या कल्पनेवर उभा आहे, यांची एक-दोन गमके 'एकांका'त आहेत.

उदाहरणार्थ- श्रीचक्रधरांच्या दर्शनाने स्थित्यानंद लाभलेल्या एका चांभाराची ईश्वरपुरूष म्हणून पूजा होत असल्याचे पाहून 'एणें गावो विटाळला' असे त्याच्याच गावचे इतर चांभार ओरड करत असतात व त्याच्या या कृत्याबद्दल त्याला सरकारी अधिकाऱ्यांकडून शिक्षाही झालेली आहे. (लीळा : १२). गोविंदप्रभूसारख्या अवतारी पुरुषाने एका मांगाकडील हुरडा आणि ओले खाणे चक्रधरांना नसले तरी त्याकाळी इतरांना ते अमान्यच असणार हे उघड आहे. (लीळा : २१). स्मशानातील वस्त्रावर तेथे राहणाऱ्या महाराचा हक्क असतो हे सूचविणारी लीळाही सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची आहे. (लीळा : ६०).

लीळा चरित्राच्या एकांकातून तत्कालीन समाजातील काही व्यवसाय व व्यावसायिक यांचेही उल्लेख आलेले आहेत. उदाहरणार्थ- २५ व्या लीळेत चक्रधरांनी आर्त भक्ताच्या मनोभूमिकेस दिलेला 'सुक्षेत्रा'चा दृष्टांत शेतीच्या व्यवसायाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. तसेच ५६ व्या लीळेतील 'फु भोरडीए' अशी शिवीवजा हाक देऊन हातातील वस्त्र हवेत फडकावून कांटी 'सोकरण्या'ची, म्हणजे पिकाचे राखण करण्याची कृतीही याच व्यवसायाची वाचक आहे. शेतीला जवळ असणारा व्यवसाय गुरे राखण्याचा. तो करणाऱ्या गुराख्यांची गरिबी ३३ व्या लीळेत व्यक्त झाली आहे. त्यातील गुराखी आजारी पडतो तेव्हा त्याची म्हातारी आई आता लोक आपली गुरे दुसऱ्याकडे सोपवतील या भीतीने 'आम्ही मेलो' असे जे उद्‌गार काढते ते या व्यवसायातील दारिद्र्याचे सूचक आहेत. हे गुराखी आपली गुरे दुसऱ्याच्या शिवारात दडपून चारीत व त्यामुळे त्यांच्यात मारामाऱ्याही होत (३४). गुराख्याच्या जीवनक्रमाचे दर्शन 'द्विजगोरक्षण' या ३८ व्या लीळेत घडते. तो लोकांची गुरे सोडून रानात नेतो, चारतो, पुन्हा आणून बांधतो आणि त्यांची धारही काढतो. या कामाच्या मोबदल्यात गुरांचा मालक त्याला दुपारची शिदोरी बांधून देतो, आणि फारच खूष झाला तर शिदोरीत दही घालून वर त्याला खायला लोणी देतो. या गुराख्यांचा वेष म्हणजे अंगावर 'पांगुरण' आणि पायात

वहाणा (३२). तेल्याच्या व्यवसाय करणाऱ्यांचा उल्लेख दोन लीळांत आढळतो (११.१८). पैकी पहिलीतील 'तैल्याकार' आंध्र देशातील असून तो लिंगोपासना करणारा आहे. दुसरीतील तेली स्वतःला 'तीळमारा' तेली म्हणवतो व त्याच्या बायकोचा उल्लेखही 'तिळतेलीण' असा येतो. यावरून तेल्यांतही ज्या पदार्थापासून तेल काढायचे त्यांवरून काही पोटभेद निर्माण झालेले असावेत असे वाटते. 'रांधवणहाट' व त्यातील रांधवणे, म्हणजे खाद्यपदार्थ तयार करून विकणारे हलवाई यांचा निर्देश दोन लीळांत आढळतो (७, १३). 'दुसे' किंवा 'दांडी' उभारून वस्त्रांचा व्यापार करणाऱ्या दुकानदाराचे चित्र ५६ व्या लीळेत पहावयास मिळते. तो आपल्या मालाची किंमत गिऱ्हाइकाला 'हातासन' करून, म्हणजे गुप्त रीतीने सांगतो व प्रथम अधिक सांगून शेवटी त्याला तो कमी किमतीत देतो. 'हेडाऊ' म्हणजे घोड्यांचे व्यापारी, यांचा उल्लेख एका लीळेत आहे (१६). मजुरांना वेठीस धरून कामाला लावण्याची पद्धत तेव्हाही होती असे 'वेठी गमन' या लीळेवरून कळते. तेथे इतर मोलकऱ्यांच्या बरोबर चक्रधरांनाही वेठीस धरून शेतकापणीला लावल्याचा उल्लेख आहे (३७). शरीरविक्रय हाही एका दृष्टीने एक व्यवसायच. त्याचा निर्देश ६९ व्या लीळेत असून तेथे वेश्यांना 'सामान्यस्त्रिया' व त्यांच्या वसतीस 'सामान्य-स्त्रीहाट' म्हटले आहे. तसेच त्यावरून त्यांची वृत्ती व श्रीमंती या गोष्टीही दिसून येतात.

यादवकालीन समाजाच्या अंधश्रद्धा व भूताखेतांवरील विश्वास यासंदर्भातील सूचक लीळा विचारात घेणे याठिकाणी संयुक्तिक ठरेल. एकोणिसाच्या लीळेत स्वतः चक्रधरांनी भूतपिशाच्यादि योनींवरील श्रद्धेच्या दृष्टीने सांगितलेली पंचकौळाचार्यांची गोष्ट अत्यंत उल्लेखनीय आहे. आपल्या शिष्याने दुसरा गुरू केलेला पाहून हा मांत्रिक त्याच्यावर विषप्रयोग करतो व त्या पापामुळे स्वतः गृह होऊन इतरांना त्रास देतो, कोणत्याही मंत्रतंत्राने तो जात नाही व शेवटी चक्रधरासारख्या सत्पुरूषाच्या भेटीने पिशाच्चयोनीतून मुक्त होतो, अशी ही कथा आहे. तसेच चक्रधरांच्या दर्शनाने स्थित्यानंद झालेली एक व्रतस्थ स्त्री देहभान विसरून बारा वर्षांपर्यंत अन्नोदकावाचून राहते हे पाहून तिचे आप्त हा 'वायु तथा वारा', म्हणजे भूतबाधा असेल या कल्पनेने तिच्यावर उपचार करतात ही गोष्टही वरील वृत्तीचीच सूचक आहे (२४). असाच विदेहावस्थेतील एक चांभार 'विचरत विचरत' खोलनायकाच्या आंब्यास येतो व तेथील लोक त्याची ही वृत्ती पाहून त्याचे देव्हारे माजवितात. वरंगळचा एक धनाढ्य सावकार पुत्रप्राप्तीसाठी चक्रधरांनी 'पाचां सहस्त्रांची पूजा करतो' (१५), तर एक ठाकूर याच इच्छेने स्वतःची बायको चक्रधरांकडे त्यांची सेवा करण्यासाठी पाठवितो (४२). एकदा चक्रधरस्वामींना उकिरड्यात पडून राहण्याची लहर येते व काही वेळाने त्यांना तेथून बाहेर पडताना पाहून 'आरे : उकरडा व्याला : माणूस जालें : हें गावां अरिष्ट जालें : आता शांति करा' असे गावचे लोक म्हणू लागतात. इतकेच नव्हे तर त्या आरिष्टाच्या शमनार्थ 'खीचपुरियां'चा स्वयंपाक करून बैराग्यांना जेवू घालतात (४८). वरील सर्व गोष्टी त्या समाजाच्या अंधश्रद्धाच सुचवितात.

महाराष्ट्रीय समाज हा सण आणि उत्सवप्रिय असलेला समाज आहे. सामाजिक समारंभ व चालीरीती यांचा विचार करता प्रथमतः पुत्रजन्म, बारसे, व उष्टावण यांचाही उल्लेख 'एकांका'त आलेला अहे. तत्कालीन विवाह समारंभाचे वर्णन करणाऱ्या दोन 'लीळा' 'एकांका'त पहावयास

मिळतात. विवाहापूर्वी नियोजित वरास आपल्या गोत्रकुटुंबियांना नेऊन दाखविणे (१५). आणि 'गोधोळी' म्हणजे गोरज मुहूर्ताचे लग्न होऊन पुढे चार दिवस 'वऱ्हाडिक' होणे इत्यादी गोष्टींचे उल्लेख यात आलेले आहेत. बेचाळीसाच्या लीळेत वऱ्हाडी, वऱ्हाडिक, त्यांचा पाहुणचार, मानपान, मांडव, 'सेवंत' म्हणजे सीमान्तपूजन, मूळ पाठविणे इत्यादी विवाहासंदर्भातील लोकरूढींचे वर्णन यावरून यादवकालीन समाजाच्या विवाहाच्या चालीरीती, रुढीपरंपरा पहावयास मिळतात. 'सेस भरणे' म्हणजे कपाळी मळवट भरणे, हे सौभाग्यदर्शक मानले जाई. त्याप्रमाणे प्रधानपुत्र हरिपाळदेव जिवंत झाल्यावर त्याची बायको कमळाइसे हिची सेस भरली असा उल्लेख पाचव्या लीळेत आहे. खालच्या जातीत काडीमोड घेणे किती सोपे होते याची कल्पना १२ व्या लीळेवरून येते. त्यातील चांभार चक्रधरांच्या नादी लागून घरी परत येत नाही असे पाहून त्याची बायको त्याला सरळ 'न ये तरि माझिए माथाचां हातु फेडी' म्हणते व तोही स्वामींच्या साक्षीने 'हा फेडला' असे सांगून निराळा होतो (१२). चालीरीतींचा विचार करता पित्याच्या मृत्यूनंतर त्याच्या पुत्राने क्षौर करणे व 'दैवीक' म्हणजे सूतक पाळून शिवाशिव न करणे अशा चालीरीतींचे उल्लेखही आढळतात (५९). चौदाव्या व तिसाव्या लीळेमध्ये मृत देहाचा 'निक्षेप' म्हणजे विल्हेवाट पुरून टाकणे किंवा पाण्यात टाकून देणे अशा पद्धतीने लावली जात असे असा उल्लेख येतो. चक्रधरांसारख्या अवतारी पुरुषाच्या भेटीस जाताना बरोबर काही 'दर्शन' म्हणजे नजराणा, घेऊन जाण्याची रीत होती (२५). यादवनृप कान्हरदेव सुद्धा त्यांची भेट आसूंचे 'पूजादर्सन' करूनच घेतो (३९).

त्या समाजातील मनोरंजनाच्या क्रीडादि प्रकारांत जुगारीच्या खेळाचा उल्लेख सर्वप्रथम केला पाहिजे. चक्रधरांना, म्हणजे पूर्वाश्रमीच्या हरिपाळदेवाला, वैराग्य आले ते जुवा खेळण्याच्या अशाच एका प्रसंगाने आले, हे प्रसिद्ध आहे (६). स्वतःच्या पूर्वायुष्यातील ही जुवेबाजीची वृत्ती त्यांनी अन्यत्रही सांगितली आहे (१३). त्यावरून 'सारीचें जुं' म्हणजे पैसे लावून सोंगट्या खेळणे, 'जुआग', म्ह. जुआरी अड्डा, तेथील 'जुवारी' लोकांची, म्ह. जुवेबाजांची विशिष्ट नीती, अशा काही गोष्टी करून येतात. ६३ व्या लीळेवरून या लोकांचा चक्रधरांसारख्या विरक्तपणे राहणाऱ्या पुरूषासही कधी उपद्रव होई असे दिसते. पारध्यांनी आपले कुत्रे सोडून केलेली 'होडे'च्या म्हणजे पैजेच्या सशाची पारध हाही क्रीडेचाच एक प्रकार होय (२३). गुराख्यांची पोरे रानात जो 'रानभेरी' चा खेळ खेळत त्याचे विस्तृत वर्णन ३१ व्या लीळेत वाचावयास मिळते. रस्त्यात लागलेली दोन म्हैशांची झुंज हाही एक मनोरंजनाचाच भाग असल्याने लोक ती घराच्या माळवधावर चढून पहात (६८). त्या काळात सामाजिक सुरक्षितता बेताचीच दिसते. आपेगावच्या कोणा अनंतदेव ब्राह्मणावर कसला तरी 'अभियोग' म्हणजे आळ येतो, आणि लोक त्याला मारायला त्याच्या मागे लागतात (११). चोरांचा उपद्रव तर पुष्कळच होता. कधी ते एखाद्या अधिकाऱ्याची घोडी चोरतात (३६) तर कधी बोणेबाईसारख्या विरक्त म्हातारीच्या गुंफेत शिरून तिचे सामान पळवतात (६४). वाटमारीचा प्रकारही नेहेमीचा दिसतो. चक्रधरांचा पहिला शिष्य रामदेव याच्या बापाला चोरांनी असेच वाटमारी करून ठार केले होते (५९). स्वतः चक्रधरांच्यावरही लोणारची यात्रा करून मेहकरला परत जाताना असा प्रसंग आला होता; परंतु त्यांचे साधुत्व व चोरांची विशिष्ट नीती यामुळे ते त्यातून वाचले. या

चोरांचेच काही साथीदार पुढेही मार्गात होते; परंतु आपल्यापैकीच काही जणांनी स्वामींनी पाठीशी घातल्यामुळे त्यांनीही त्यांना काही केले नाही (६९). गुन्हा म्हटला की शिक्षा आलीच. पैकी चोर पकडून त्यांना तात्पुरते खोडाबेडीत घालणे आणि चोरांचे 'पुरावे' शोधणे यांचा उल्लेख एका लीळेत आहे (३६). तसेच एका चांभाराने देव होऊन गाव विटाळला या गुन्ह्याबद्दल अधिकारी 'स्मार्त' म्हणजे स्मृतिग्रंथ जाणणारे बोलावून त्यांच्याकडून 'निबंध काढवितात', म्हणजे नियम पाहतात, व त्याप्रमाणे या गुन्हेगाराला चुनखडीत बसवून वर पाणी सोडण्याची शिक्षा देतात (१२).

शिक्षण हे संस्कृतीचे एक अंग आहे व नांदेड येथील पडशाळेत शिकत असलेल्या मुलांच्या उल्लेखाच्या रूपाने ते व्यक्तही झालेले आहे. विद्वतचर्चा हेही संस्कृतीचे एक अंग मानले जाते. दिग्विजय करत निघालेला संन्याशी, त्याची दुसऱ्या संन्याशाशी झालेली 'उघाणी' म्हणजे वाद, व वादात हरल्यामुळे स्वतःचा मठ, पोथ्यापुस्तके, मळा, वाडी (संपत्ती) इत्यादींना मुकण्याचा त्यांच्यावर आलेला प्रसंग इत्यादी गोष्ट कळतात. अशाप्रसंगी चक्रधरांसारख्या पुरुषास 'सभा' म्हणजे अध्यक्ष करून आपले मत सिद्ध करण्याचा (स्थळनिर्धार) आणि प्रतिपक्षाला निरूत्तर करण्याचा प्रयत्न केल्याचा उल्लेख याठिकाणी पहावयास मिळतो. विद्याकलांपैकी 'एकांका'त चुना तयार करण्याच्या कृतीचा तेवढा उल्लेख सापडतो. जीवनोपयोगी वस्तूंचे उल्लेख एकांकात आलेले आहेत.

उदाहरणार्थ- कुत्र्याला दहीभाताचा उंडा वाटावा असा चुना करणे, वस्त्रप्रकारात दुटी, पाटाड, वोलिसाडला, त्रिवडी, जाडी, दुणीची आंगी आणि टोपरे इत्यादींचे उल्लेख आहेत. पायात घालण्यासाठी वहाणा मुद्दाम बांधवून घेण्याची प्रथा होती (७१). प्रापंचिक वस्तुंमध्ये 'सागळ' म्हणजे पाण्याची पिशवी (११) 'कळदिवा' म्हणजे कंदिलासारखा कळीचा दिवसा (५२) व पायपुसणे या वस्तूंचाही उल्लेख येतो.

यादवकालीन समाजातील खाद्यपदार्थ व आहार (जेवण) यांचाही उल्लेख काही लीळामध्ये स्पष्टपणे आलेला आहे. उदाहरणार्थ- जेवणासाठी थोरामोठ्यांना ताट, तर इतरांना 'ठाय' म्हणजे केळीचे पान वगैरे दिले जाई. त्यावरून 'ताट करणे' व 'ठाय करणे' असे स्वतंत्र वाक्प्रचारही रूढ झालेले दिसतात. ('वरिलीकडे ताट गोसावीयासि केलें : खालिलीकडे ठाए एरांसी केलें', ४६) कधी 'पातळी'वर म्हणजे पत्रावळीवरही जेवण होई (२१, २२, ४८). जोगी, बैरागी वगैरे 'दुधीकरट्या'त म्हणजे वाळलेल्या भोपळ्याच्या भांड्यात जेवत (७४). भिक्षेसाठी कित्येकदा पात्र न घेता भिक्षा हातावरच घेत. या दृष्टीने 'भिक्षा मागणे' या अर्थी 'पाणिपात्र करणे' हा रूढ असलेला वाक्प्रचार ध्यानात घेण्यासारखा आहे. गोंडवाड्यामध्ये चिंचकरट्यात किंवा आतून कोरून काढलेल्या वेळूच्या कांडोऱ्यात तांदुळ शिजविण्याची पद्धती असल्याचा उल्लेख आहे (२२). खाद्यपदार्थात ताकभात, दहीभात, पाणीभात, वरणभात, आंबील, व बाभूळशेंगा इत्यादींचा निर्देश आहे. मुखशुद्धीसाठी भोजनोत्तर 'फोडी' म्हणजे सुपारीची खांडे व 'वीडीया' म्हणजे पानाचे विडे देण्याची पद्धत असल्याचाही उल्लेख 'एकांका'मध्ये सापडतो. इतर खाद्यपदार्थात सेंगुळे-बुड्डें (७) व लाडू (६२) यांचा उल्लेख सापडतो. रस्त्याच्या कडेला वाटसरूंसाठी द्रोणांतून हुरडा व सोले भरून विकायला

ठेवण्याची प्रथा असल्याचाही उल्लेख आहे. प्रवासात अगदी लहानसहान गावे सोडली तर वाटेवर जेवणाचा शिधा विकत मिळत असत. प्रवासात वाटेवर यात्रेकरूंसाठी 'पव्हे' पाणपोयीही असत. त्याकाळी गावामध्ये पाणवठा असून तेथे पाणी भरताना माणसे एकमेकांच्या 'घागरीस घागरी लावत' (६८) असल्याचाही उल्लेख या लीळेत सापडतो.

यादवकालीन समाज मानस, मनुष्यस्वभाव आणि लोकप्रवादासंबंधीचाही उल्लेख 'एकांका'तील लीळामध्ये आढळतो. ३६ च्या लीळेत, एक गवळी आपली गुरे दुसऱ्या गावच्या शिवारात दडपून चारी व त्याबद्दल त्याच्या गावचे लोक त्याला 'लाच' देत असे म्हटले आहे. त्याकाळीही स्त्री अर्थातच स्वतंत्र नव्हती. भांडाऱ्याचे नीळभट गृहत्याग करून चक्रधरांच्या मागे निघाले तेव्हा त्यांच्या बायकोने त्यांना एकदा विचारले; परंतु त्यांचा जाण्याचा निर्धार पाहून ती बिचारी निमूटपणे मागे राहिली, हा प्रसंग सांगताना चक्रधरांनी मोठ्या मार्मिकपणे 'अज्ञाधरें : मग तियें राहिली' असे म्हटले आहे. मनुष्यस्वभाव आणखी एका बाबतीत सारखा दिसतो व तो म्हणजे लोकप्रवादासंबंधी. सेंदुर्जणीस नारायणाच्या देवळात राहून मासोपवासाचे व्रत करणाऱ्या एका बाईंने चक्रधरांपाशी त्यांच्या मुखातील तांबुळाचा प्रसाद मागितला व त्यांनी तिला तो दिला, पण देण्यापुर्वी एकदा 'लोकांकडे दाखविलें' म्हणजे आसपासचे लोक पहात आहेत याची जाणीव तिला करून दिली (२४).

'एकांका'मध्ये शिल्पकलेविषयी उल्लेख आलेला नसला तरी तत्कालीन घरे व देवळे यांच्याविषयीचे काही उल्लेख आलेले आहेत. घरे माळवधी (माळाची घरे) असून त्याला 'उपरी' म्हणजे ओसरी व पडवी हे दोन भाग असत. विरक्त स्त्रीपुरूष मात्र 'गुंफा' म्हणजे झोपडी बांधून त्यात राहत असत. देवळांच्या प्रकारात देऊळ, देऊळी (५७), मढ (२५) व साजें (२४) म्हणजे लहान कोनाडेवजा देऊळ इतक्यांचे उल्लेख सापडतात. देवळांच्या सभोवती 'पाळी' किंवा पौळी (३९, ५७) म्हणजे आवाराची भिंत व जवळ एखादी 'पोखरणी' म्हणजे तळेही असल्याचा उल्लेख सापडतो. देवळाच्या दारापुढे दोन बाजूंचे कठडे हत्तीच्या सोंडेप्रमाणे असून त्याला देवळाचे सोंड असे म्हटले जात असल्याचा उल्लेख आहे.

यादवकालन राजेलोकांच्या स्वाऱ्या पालखीतून निघत असल्याचा उल्लेख 'एकांका'त आढळतो. उदाहरणार्थ– हरिपाळदेवाने रामयात्रेस जाण्याचे ठरविले तेव्हा त्याला 'दुवाही राडत पाइक जाति तैसा पाठवावा' अशी त्याच्या आईने म्हणजे प्रधानपत्नीने सूचना केल्यानंतर प्रत्यक्षात त्याची स्वारी निघाली तीही 'उगाणा, कोठी, चाटे, बुडुवू' इत्यादी परिवारासह (७). कान्हरदेव यादवही लोणारतीर्थावर आला तेव्हा त्याच्याबरोबर त्याचे 'हडूप' म्हणजे सेवकजण होतेच (३९). अळजपुरच्या रामदरण्याची 'कटकै' म्हणजे मोहीमही उल्लेखनीय आहे. या मोहिमेत त्याच्याबरोबर त्याचा परिवार आहे, गरुडघोड्यासारखा वेगवान घोडा आहे. चक्रधरांसारख्या पुरुषास नेऊन पाहुणचार करू शकेल असा ताणवे देऊन उभारलेला 'दुस' म्हणजे तंबूही आहे. तसेच टप्प्याटप्प्यांवर जासूदांकरवी 'लिखिते' (जाळ्या) पाठविण्याची पद्धत असल्याचाही उल्लेख 'एकांका'त काही ठिकाणी पहावयास मिळतो.

अशाप्रकारे म्हइंभट लिखित 'लीळाचरित्र : एकांक'मधील हे सामाजिक जीवन समृद्ध होते असे तत्कालिक भान ठेवून म्हणता येईल.

१.३.६ 'लीळाचरित्र एकांका'तून प्रतिबिंबीत धार्मिक जीवन

यादवकालीन महाराष्ट्राच्या समाजाच्या सांस्कृतिक जीवनाचा गाभा धर्म हा असल्याने 'लीळाचरित्रा'सारख्या ग्रंथात तेव्हाच्या धार्मिक आचारविचारांचे प्रतिबिंब स्पष्टपणे उमटलेले आहे. अनेक देवदैवते व त्यांच्या नानाविध पूजाअर्चा हे त्या समाजाच्या धर्मविचाराचे बाह्य स्वरूप असून त्याचे दर्शन जवळजवळ प्रत्येक लीळेतून घडते. एक 'एकांक' घेतला तर त्यात सुमारे वीस दैवतांचे उल्लेख आढळतात. प्रामुख्याने अळजपुरचा अंभीनाथ व सोमनाथ (५३, ५४, ५५), लोणारच्या धारातीर्थावरील कुमारेश्वर व दैत्यसदन (३९, ६९), वासनीचा गोपाळ (५१), बीड येथील दक्षिणेश्वर (१९), नांदेडचा नरसिंह व नंदेश्वर (२९, ३०), सेंदुर्जणीचा नारायण (२४), मेहकरचा बाणेश्वर (६१, ६२), डाकरामचा भिवेश्वर (१७), रामटेकचा भोगराम (२५), पैठणचा भोगनारायण ७४), वडनेरचा वटेश्वर (५७, ५८, ५९), पातुरडीचा वाळुकेश्वर (६०) आणि रावसगावचा सिद्धांत (७३) अशा विविध देवता आढळतात. तत्कालीन गावागावातून भैरवाचे देऊळे पुष्कळ असल्याचेही उल्लेख 'एकांका'त आढळतात. अशा लहानशा 'एकांका'त एक अळजपूरचा (२८, २९), दुसरा दाभविहीरीचा (२१) आणि तिसरा मेहकरचा असे तीन भैरव आढळतात. याशिवाय वरंगळचा भैरवनाथ (१५) आहे तो निराळाच.

त्या काळात विशिष्ट समाजाची विशिष्ट दैवते असल्याचेही काही लीळामध्ये आढळते. उदाहरणार्थ– ११ व्या लीळेतील तैल्यकाराच्या तोंडचे 'एया लींगा : माझेया घरा सोमनाथु आला : मालीनाथु आला' हे उद्‌गार पाहून आंध्रप्रदेशातील तेली समाज शिवाची उपासना करणारा असावा असे वाटते. तसेच, २८ व्या लीळेतील 'निर्वाणे'च्या देवळाचा उल्लेख सूचक आहे.

या निरनिराळ्या देवतांची लहानमोठे देवळे होती व त्यातून पुराण आणि 'पेखणे', म्हणजे नृत्य, चालू असत, पैकी अळजपूर येथील अंबीनाथाच्या देवळात चक्रधरांनी पुराणश्रवण व नृत्यावलोकन केल्याचा उल्लेख एका लीळेत आहे (५३) याच लीळेत स्वामींनी देवास विडा अर्पण केल्याचाही उल्लेख आहे, त्यावरून ही लोकरीत कळून येते. या देवळांतून 'गुरव' 'बडुवे' असत त्यांचा निर्देश काही लीळा करतात (२५, ३९, ५८, ६३). पैकी धुपार्ती करण्याचे बडव्याकडे असावे (२५). त्याकाळी श्रीचक्रधरांसारख्या महात्म्याची पूजा ही केली जात असल्याचे उल्लेखही काही लीळांध्ये आढळतात. 'सांप्रदायिक पूजा' आणि 'आगमिक पूजा' असे पूजांचे दोन प्रकार केले जात. काहीतून देवाची त्रिकाळ पूजाअर्चा, नैवेद्य वगैरे सर्व यथासांग होई तर काही लहान देवळे नाममात्रच असत. पैकी पहिल्या प्रकारच्या देवळास 'भोगस्थान' म्हणत व त्यात मरण येणे अनिष्ट मानले जाई, असे चक्रधरांनी मरणोन्मुख झालेल्या भांडारेकारांस नृसिंहाच्या भोगस्थानातून दुसऱ्या देवळात हलवले त्यावरून कळते (३०) देवाप्रमाणे चक्रधरांसारख्या महात्म्यांचीही पूजा त्यांचे भक्त करीत. या दृष्टीने ११ व्या लीळेत एका तेल्याने केलेली त्यांची 'सांप्रदायिक' पूजा, व २१ व्या लीळेत रूपनायकाने

केलेली ‘आगमिक’ पूजा उल्लेखनीय आहेत. तसेच ५७ व्या लीळेत अळजपूरच्या रामदरव्याच्या आईने स्वामींच्या पायांवर तुळसी वाहून आपल्या उपासाचे पारणे केल्याचा निर्देश आहे. त्या काळात जोगी, महात्मे, सिद्ध हे तर गावोगावी असल्याचे दिसतात. अशाच एका ‘अवधूता’ला भिक्षा मागताना पाहून नव्याने गृहस्थाश्रम स्वीकारलेल्या चक्रधरांना वैराग्याचा उमाळा आला व त्यासरशी ते पुन्हा संसारास पाठिमोरे झाले (१६).

तत्कालिन सिद्ध पुरुषांना अनेक प्रकारच्या सिद्धी अवगत असल्याचे काही दाखले लीळाचरित्रातील एकांकातील जागोजागी पहावयास मिळतात. उदाहरणार्थ- कांतीचे,म्हणजे काटोलचे राजगुरू यांच्याशी ‘वयस्तंभिनी’ विद्या असून ती त्यांनी चक्रधरांना दिली असे एक लीळा सांगते (१०). अन्यत्र ‘घुटिकासिद्धी’ असणाऱ्या कोणा विष्णुस्वामीचा उल्लेख असून तिच्या जोरावर तो आकाशात संचार करून सर्वांना कसा थक्क करीत असे ते सांगितले आहे (४५). घोडाचुडी नावाच्या सिद्धाच्या शिष्यापाशी अशीच एक सिद्धी असून साध्या हस्तस्पर्शाने तो आग कशी लावीत असे त्याचे वर्णन एका लीळेत आहे (२०). खुद्द चक्रधरांनी गुरूपरंपराही एका दृष्टीने सिद्धांचीच आहे. त्यांचे परमगुरू चांगदेव राउळ दुसऱ्याच्या डोक्यावर सूप ठेवून आणि वर खराट्याने हाणून त्याच्या ठिकाणी विद्यासंचार करीत (२, ३). चक्रधरांना गोविंदप्रभूंच्या कडून ज्ञानशक्ती लाभली तीही त्यांनी त्यांच्याकडे फेकलेल्या ‘सेंगळे-बुड्ड्या’च्या रूपानेच (७), स्वतः चक्रधरांच्या ठायीही अनेक प्रकारच्या सिद्धी होत्या पैकी ‘काळ-वंचना’ करण्याची म्हणजे दुसऱ्याचे मरण चुकविण्याची सिद्धी उल्लेखनीय आहे (३०).

काही गुरुंमध्ये एकमेकाविषयी मत्सरभाव असलेला दिसून येतो. या दृष्टीने ‘शिष्याभिमानु म्हैळीयाचा’ हा सिद्धान्त स्पष्ट करून दाखविताना चक्रधरांनी १९ व्या लीळेत सांगितलेली पंचकौळाचार्याची गोष्ट महत्त्वाची आहे. आपला शिष्य दुसऱ्या अवधूताकडे गेला म्हणून तो त्याच्यावर विषप्रयोग करतो. तसेच, ४४ व्या लीळेत आपल्यामुळे ‘स्थित्यानंद’ लाभलेल्या गोविंदस्वामीने ही गोष्ट स्वतःच्या गुरूस सांगू नये अशी सूचना त्याला देतांना चक्रधरांच्या मनातही हाच अभिप्राय असावा सत्पुरूषांचे स्तवन केल्यास शारीरिक दुःख जाईल ही श्रद्धा नीळभट भांडारेकरांसारख्या विद्वानाच्या ठिकाणीही असल्याचे दिसते. एकदा इंगळी डसल्याने असह्य पीडा होऊ लागली. तेव्हा त्यांनी चक्रधरस्वामींना विचारले, ‘जी जी : मी स्तुति करू?’ स्तुति केल्यावर इंगळी उतरली हे निराळे सांगणे नकोच. तसेच एखादे अरिष्ट आले असता त्याच्या शमनार्थ ‘शांतिक’ करण्याची प्रथा होती हे ५० च्या लीळेवरून कळते. त्याकाळात पित्रांचे श्राद्ध श्रद्धेने केले जात असत. पहिल्याच लीळेत फलटण येथे अवतार घेतलेल्या चांगदेव राउळांनी घरी श्राद्ध असल्यामुळे त्या दिवशी पत्नीशी समागम करण्याचे नाकारले ही हकीकत आली आहे. पोथीवाचन हा धार्मिक आचाराचाच एक भाग होता. परंतु २७ व्या लीळेतील भांडाऱ्याचे निळभट स्नानाच्या आधीच ‘वस्त्रधोत्र घालून’ पोथी वाचत बसतात याचे मात्र थोडे आश्चर्य वाटते.

'एकांक'चे एकंदर वातावरण धर्मश्रद्धेने भारलेले आहे. त्यात 'कणवृत्ती'ने राहणारे ब्राह्मण आहेत (१४), देवळात राहून दीर्घ उपवास करणाऱ्या 'मासोपवासिनी' आहेत (२४) चक्रधरांसारख्या विरक्त पुरूषास पाच सहस्त्रांचा 'जोगवटा' अर्पण करणारे मालूसारखे श्रीमंत भक्त आहेत (१५), स्वतःच्या बायकोवरील अत्याचाराचे वृत्त ऐकून सुद्धा प्रथम आपला नित्यनियम उरकून नंतर तिच्याकडे धाव घेणारा तेली आहे (११) गोपाळमंत्राची दीक्षा घेतलेला आणि गोपाळाची 'आण' घेणारा प्रधानपुत्र हरिपाळदेव आहे (५), आणि जन्माष्टमीच्या दिवशी मातीचे गोकूळ करून उपवास करणारी मेहकरची बोणेबाईही आहे. 'एकांका'त काही यात्रांचेही उल्लेख सापडतात. पैकी मातापुर किंवा माहूर (१), रामटेक (७), लोणार (६१), आणि त्र्यंबक (७०) या चार ठिकाणच्या यात्रा अद्यापिही चालू आहेत.

१.३.७ 'लीळाचरित्र 'एकांका'तील ऐतिहासिक आणि राजकीय संदर्भ

लीळाचरित्र हा यादवकालीन ग्रंथ असल्यामुळे साहजिकच या ग्रंथात ऐतिहासिक स्वरूपाच्या ज्ञानाचे काही कण सापडतात. तसेच तत्कालिन राजकीय स्थितीगतीचे उल्लेखही एकांकात येणे अगदी अपरिहार्य असल्याचे पहावयास मिळते. गुजरातचे राजे व देवगिरीकर यादव यांचे आपसात वैर असल्याचे सातव्या लीळेवरून समजते. गुजरातच्या प्रधानाचा पुत्र हरपाळदेव याने रामटेकच्या यात्रेस जाण्याचे ठरविल्यानंतर त्याच्या पित्याने (प्रधानाने) 'तो देसू पारका : तेथ जाओं नै ए' असे सांगून त्याच्या रामटेक यात्रेला विरोध केलेला आहे. सध्याचे जोगाईचे आंबे त्यावेळी खोलनायकाचे आंबे म्हणून ओळखले जात असल्याचा उल्लेख १२ व्या लीळेत आलेला आहे. हा खोलनायक किंवा खोलेश्वर देवगिरीच्या यादवांचा सेनापती असून आंबे हे त्याचे मुख्य ठाणे होते. त्याच्या शौर्यादि गुणामुळे तो इतका प्रसिद्ध झाला, की हा गाव त्याच्या नावाने ओळखला जाऊ लागला. आजही तेथे खोलेश्वराचा मठ म्हणजे देऊळ आहे. त्यात शके ११६२ मध्ये खोदलेला खोलेश्वर – प्रशस्तिपर शिलालेखही आहे. ग. ह. खरे संपादित 'खोलेश्वराचे आंबे येथील चार शिलालेख' (द. म. इ. साधने, खं. १, पृ. ६४, ७४) या ग्रंथात खोलेश्वराने 'भृगुकच्छ', भडोच येथील अधिपती सीहडि याला ठार मारून तेथे जयस्तंभ उभारल्याचा उल्लेख आढळतो. १२ व्या लीळेत उल्लेखिलेल्या आंबे येथील जगळदेव व विंझदेव या दोन अधिकाऱ्यांविषयी अधिक माहिती मिळत नाही. 'लीळाचरित्रा'च्या वाइदेशकरपाठात मात्र हे दोघे व मायिदेव असे तिघेजण सिंघण यादवाच्या हाताखाली असून त्याने त्यांना गुजरातच्या स्वारीवर पाठविल्याचा उल्लेख आहे.

'एकांका'चा काळ शके ११८९ पर्यंतचा असल्याने त्यात यादवनृप कान्हरदेव किंवा कृष्णदेव शके (११६९ ते ८२) याचा उल्लेख येणे कालदृष्ट्या बरोबर आहे. ३९ वी लीळा ('कुंडी रांजेया दरिसन') या कान्हरदेवाविषयी असून तीत तो लोणार येथे आला असताना तेथील धारातीर्थावर त्याची व चक्रधरस्वामींची भेट झाल्याचा निर्देश आहे. या भेटप्रसंगी त्याने 'दर्शन' म्हणून स्वामींना आसू (सुवर्णमुद्रा) अर्पण करून त्यांची पूजा केली; परंतु त्या चक्रधरांनी स्वीकारल्या नाहीत. तेव्हा राजाच्या निकटवर्तीयांनी त्यांना म्हटले, ''देव हो, घ्या, हे द्रव्य घ्या. सिंघणाचा (पुत्र) कान्हु तुमच्यावर प्रसन्न झाला आहे.'' ते ऐकून स्वतः कान्हरदेवानेच त्यांना मोडून काढले. तो म्हणाला,

‘‘सरा, बाजूला व्हा, तुम्ही हे काय म्हणता?’ अरे हा कान्हु तुमच्या दृष्टीने मोठा असेल, पण स्वामींना तो कोण?’’ इतके झाल्यावर कान्हरदेवाने काही वेळ चक्रधरस्वामींवर पाळत ठेवली. त्यानंतर चक्रधरस्वामी तेथून निघून गेले आणि ही भेट येथेच संपली. स्वामींनी नाकारलेल्या या द्रव्यातून कान्हरदेवाने लोणार येथील कुमारेश्वराच्या देवळाची पाळी म्हणजे आवाराची भिंत बांधविली.

अखेरचा ऐतिहासिक स्वरूपाचा उल्लेख रामदरणा या नावाच्या एका मांडलिक राजाचा किंवा संस्थानिकाचा आहे (५४). अळजपूरच्या (आजचे एलिचपूर) या राजाची व चक्रधरांची भेट झाडीमंडळात तो एका मोहिमेवर निघालेला असताना झाली होती. योगायोगाने ही मोहीम परतावी अशी ‘जाळ्या’ म्हणजे लिखिते आली. चक्रधरांकडे आकृष्ट झालेला रामदरणा त्यांना आपल्या गावी, म्हणजे अळजपुरास घेऊन जातो. त्याठिकाणी ते काही काळपर्यंत राहून नंतर अळजपूर सोडतात. याच रामदरण्याच्या उमादेवी नावाच्या मुलीशी चक्रधरांचा विवाह झाल्याची हकीकत ‘लीळाचरित्रा’च्या वाइंदेशकर पाठात आढळते.

‘एकांका’च्या अखेरीस श्रीचक्रधरस्वामी हे पैठणास (शके ११८९) आले असताना त्यावेळी देवगिरीस महादेवराव यादवाची राजवट असा संदर्भ आलेला आहे.

१.३.८ ‘लीळाचरित्र एकांकां’च्या भाषाशैलीचे विशेष

म्हाइंभटांनी लिहिलेल्या ‘लीळाचरित्रा’च्या ‘एकांकातून यादवकालीन बोलीभाषेचे स्वरूप यथार्थपणे व्यक्त झालेले आहे. एकंदरीत ‘लीळाचरित्रा’ची भाषा फार साधी, सोपी व सरळ असून त्या गुणांतच तिचे सौंदर्य एकवटले आहे. ‘लीळाचरित्रा’चे सौंदर्य त्याच्या साधेपणात आहे. अत्यंत उच्चप्रतीचा विषय असला तरी सोप्या, सरळ भाषेमुळे आशयाचे मर्म गमावले जात नाही. श्रीचक्रधरस्वामींचे महानुभावित्त्व, त्यांचा आचारधर्म व तत्त्वज्ञान साध्या, सोप्या भाषेत मांडणे अवघड असूनही अत्यंत सोप्या भाषेत म्हाइंभटाने मांडलेले आहे. सोप्या भाषेमुळेच ‘लीळाचरित्रा’चा आशय आपल्या सर्व रंगच्छटासह शब्दांतून जसाच्या तसा उतरतो. स्वामी ‘मऱ्हाटी अनावर बोलताति’ अशी चक्रधरांची कीर्ती होती व ‘एकांका’चा बराचसा भाग त्यांच्या तोंडचा असल्याने त्याची भाषा सहजच सुंदर उतरली आहे. ‘एकांक’ म्हणजे एका दृष्टीने चक्रधरांचे आत्मचरित्र आहे व ते संक्षेपाने, परंतु अतिशय मोकळेपणाने सांगितले असल्यामुळे त्याची गोडी वाढलेली आहे. एकाकी अवस्थेत परिभ्रमण चालू असताना स्वामींना जे नाना प्रकारचे अनुभव आले त्यांची उजळणी त्यांनी पुढे आपल्या शिष्यांपाशी प्रसंगोपात्र केलेली असून ती ऐकून त्यांच्या चतुरस्त्र शिष्याने, म्हणजे म्हाइंभटानी, त्या अनुभवांना वाङ्मयीन रूप दिलेले आहे. मूळ अनुभव सरस, ते सांगणारा वाणीचा गोड आणि त्यातच त्यांना ग्रंथरूप देणाऱ्याची हातवटी अपूर्व, याप्रमाणे सर्व मेळ जमून आल्यामुळे ‘लीळाचरित्रा’चा हा पहिला भाग साहित्याच्या दृष्टीने पाहता उत्कृष्ट उतरला आहे यात नवल नाही.

कोणत्या प्रसंगी कोणता शब्द वापरावा याविषयी म्हइंभट फार मर्मज्ञ आहेत. उचित व समर्पक शब्दांची निवड हे ‘लीळाचरित्रा’च्या ‘एकांका’चे एक अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. आपल्या

दृष्टीने ताट आणि ठाय, आरोगणा आणि जेवण, तांबूळ आणि विडा, मर्दना आणि उटणे, पहुडणे आणि निजणे या शब्दांच्या जोड्यांत अर्थाच्या दृष्टीने विशेष फरक नाही. परंतु म्हाइंभट मात्र त्यांतील पहिला शब्द चक्रधरस्वामीविषयी आणि दुसरा सामान्यजनांविषयी वापरण्याचा बारकावा दाखवितात. उदाहरणार्थ – चक्रधर आणि इतरेजन यांना मिळालेल्या पाहुणचाराची पुढील भेदभावयुक्त वर्णने पहा:–

''गोसावीयासि मर्दना मादने : सांगाती उटीला न्हाणिला : गोसावीयासि आरोगणा : सांगातीया जेवण जालें : गोसावी पहुड : सांगाती नीजैला'' (ली. ३६)

''(गोसावीयासि) मांडवी वरिलीकडे बैसों घातलें : खालिलीकडे वऱ्हाडी बैसले : गोसावीया मर्दना दीधली : एराची आंगे उटीली वरिलीकडे ताट गोसावीयासि केलें : खालिलीकडे ठाए एरांसी केले : गोसावीयासि आरोगण जाली : वीडा वोगळवीला : एरां तांबुळें दीधली :'' (ली. ४६)

वरील उताऱ्यांमधील शब्दयोजनेचा भेद स्पष्ट आहे. तसेच आपल्या दृष्टीने 'आसन', 'वसती' व 'अवस्थान' या तीन शब्दांचा अर्थ साधारणपणे एकच व तो म्हणजे मुक्काम. परंतु चक्रधरांच्या प्रवासाचे वर्णन करतांना म्हाइंभट त्यांत अर्थाच्या दृष्टीने सूक्ष्म भेद करतात. 'आसन' म्हणजे घटका दोन घटका विश्रांती (''गावी एकी वीहीरीसि आसन'' ३२), 'वसती' म्हणजे रात्रीचा मुक्काम (''मग वासनीए बीजें केलें : तेथ वसति जाली'' ५९) व 'अवस्थान' म्हणजे एकाहून अधिक दिवसांचा निवास, (''दीस वीस अनुमान अवस्थान'' २१), याप्रमाणे लेखकाचा शब्दयोजनेतील साक्षेप पहाण्यासारखा आहे.

तसेच त्याच्या ठिकाणी विविध प्रकारांनी सामासिक शब्द तयार करण्याचेही सामर्थ्य आहे. 'एकांक' वरवर चाळला असता सुद्धा खुंटदावे, गोत्रकुटुंब, जातिकुळ, थाळाताटी, दैव्यभाग्य, पाणिपात्र, दांडी-डोळेकार, बाज-सूपवती, पुडुवाटवा, दरेदरकुटे, पाहानपटी, वस्त्रद्योत्र, सेवादास्य, मासापाखां, तीळतेलीण, हाडगुड, हेतुधातु यांसारखे अनेक सुंदर जोडशब्द डोळ्यांत भरतात. काही शब्दांची तर त्यांच्याकडे मिरासच असल्याप्रमाणे वाटते. उदाहरणार्थ – अवस्था, आरोगणा, गुंफा, पाणिपात्र, किंवा स्थिती यांसारखे शब्द पाहावे. त्यांचा 'एकांका'तील वापर वैशिष्ट्यपूर्ण आहे यात शंकाच नाही. म्हाइंभटांचा शब्दसंग्रही समृद्ध आहे. साधी संबोधके घेतली तर 'एकांका'त 'जी, जी जी, हां जी, रे, हा, रे, गा, हां, गा, ए, आगा ए, वो, एया, वा, बापेया, हो' अशी दहापंधरा तरी मिळतात. तसेच शब्दरूपांची विविधताही पुष्कळ आहे.

लीळाचरित्राच्या एकांकातील भाषेचे लेखन अत्यंत अनियमित अशा स्वरूपाचे आहे. ऱ्हस्वदीर्घत्व व अनस्वार या दोन गोष्टीविषयी तर इतका स्वैरपणा आहे की त्या काळात भाषेच्या लेखनाविषयी काही नियम होते किंवा नाही, याचीच शंका वाटते. भाषा उच्चारानुसारी पद्धतीने लिहीत म्हणावे तर तसेही दिसत नाही. लेखनात अशुद्धताही भरपूर आढळते. या दृष्टीने माहाराष्ट्री (महाराष्ट्री) ४, समसाना (स्मशाना) ४, असूध (अशुद्ध) ८), सीधी (सिद्धी) ४५, यांसारख्या तत्सम शब्दांचे लेखन पाहाण्यासारखे आहे. बरे, त्या भाषेला संस्कृतची ओळख नव्हती म्हणावे तर काही

ठिकाणी मराठी रूपांच्या बरोबरीने शुद्ध संस्कृत रूपे आढळतात. उदाहरणार्थ 'वाहाणां'च्या (३२) जोडीने 'उपानहौ' हे द्विवचनाचे रूप येते (७०). विरामचिन्हे म्हणून एकाखाली एक अशा उभ्या टिंबद्वयाचा केलेला सर्वगामी उपयोगही उल्लेखनीय आहे. वाक्य आज्ञार्थक, प्रश्नार्थक, उद्‌गारवाची किंवा अवतरणात्मक कसेही असो, सर्वत्र एकच प्रकारचे विरामचिन्ह वापरलेले आहेत. ही लेखनपद्धती प्रस्तुत आवृत्तीत तशीच ठेवली आहे. फक्त लीळांतील संवाद किंवा प्रश्नोत्तरे नीटपणे कळावी म्हणून अवतरणचिन्हांचा उपयोग नव्याने केला आहे. ही चिन्हे मुळात नाहीत. 'एकांका'चे भाषादृष्ट्या आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात आढळणारी भूतकाळाच्या रूपांसारखी दिसणारी भविष्यकाळाची रूपे. उदाहरणार्थ – ''हे आम्ही परीसों नेणों : मग जाणौनि काइ'' (५४), ''आम्ही बांधौनि : आम्ही दोहौनि'' (३८); ''आम्ही आपुलेया गोसावीयासि आरोगण देउनि : मग आम्ही जेउनि'' (६१) वरील वाक्यातील धातुसाधिते भूतकालदर्शक 'ऊन' कृदन्ताप्रमाणे वाटतात; परंतु वास्तविक ती भविष्यार्थी आहेत. तसेच 'जो' प्रत्ययाने सिद्ध होणारी आज्ञार्थी रूपेही उल्लेखनीय आहेत. उदाहरणार्थ – ''हारविलें असे तें वेचिजो । दीजो : मग खेळिजो'' (६); ''एइजो जी'' (१३); ''हें असों दीजो जो'' (५१), हीच रूपे, पण भविष्यकाळ दाखविणारी, सध्याच्या वऱ्हाडी बोलीत कशी प्रचलित आहेत ते डॉ. कोलते यांनी दाखवून दिलेच आहे.

वाक्यरचनेचा विचार करता 'लीळाचरित्र'काराना लहानलहान, आटोपशीर वाक्यांची फार आवड दिसते. किंबहुना लांब पल्लेदार वाक्ये तो लिहीतच नाही. तसेच प्रश्नोत्तरे किंवा संवाद तो अतिशय स्वाभाविकपणे रंगवितो. त्यात कृत्रिमता कोठेही दिसत नाही. उदाहरणार्थ, ४ थ्या लीळेतील महदायिसे व द्वारावतीचे महात्मे यांच्यात झालेला संवाद नाट्यरूपाने पुढीलप्रमाणे मांडून दाखविता येईल:–

'आपणयांसि नाव काइ?'

'माहादेओ मूनि :'

'आपण कवणाचेया अनोग्रहित ?'

'अनंत मूनीचेया :'

'ते कवणाचे?'

'ते श्रीचांगदेओ राउळाचे :'

'श्रीचांगदेओ राउळी बीजे खैसेयापरी केले?'

'ते आम्ही नेणों'

'तरि तुमचे अनंतमूनि काइ म्हणति?'

'वीद्या आणि पुरूष् माहाराष्ट्री असे:'

'तुम्ही काइ म्हणा?'

'आम्ही अनंतु अनंतु म्हणो:'

म्हाइंभटांच्या एकंदर शैलीतच एक प्रकारचा ताजेपणा आहे. त्यांचे साधे लिहिणेही गोड वाटावे असा मोहकपणा त्यांच्या वाणीत आहे. एखादी भावना किंवा प्रसंग ते अगदी थोडक्या शब्दांत मूर्तिमंत करू शकतात.

शब्दचित्रे रेखाटण्यात तर त्यांचा हात धरू शकणारे फार थोडे सापडतील. गद्यसुद्धा काव्यमय होऊ शकते यांचा प्रत्यय म्हाइंभटांनी आणून दिला व मराठी भाषेला तिच्या बालपणातच वैभवशाली करून सोडले. तो तो प्रसंग किंवा विचार अवघ्या दोनचार शब्दांत ते कसा साकार करतात ते पुढे दिलेल्या 'एकांकां'तील काही वाक्यांवरून दिसेल:-

''ते पैऱ्हां हाटाआंतू गळां माळ : तोंडी तांबूळ : ऐसे खेळत असति : तयांचिए गळांची माळ सूकेचि ना :'' (१२)

''स्त्रियां पुरूषाचा ऐसा वेधु नाही : पुरूषां पुरुषाचा काइसा वेधु पां :'' (१०४)

''एथ सरण आलेया काइ मरण असे :'' (२६)

''ऐसी एके सुक्षेत्रे असति : भूमी बिया मेळापकू कीजे : आणि भारू आथौनि पीकति : एकें नागरवेऱ्ही उलखीजति : घाटे वापे पेरीजति : परि तेथे बींही न निगे :'' (२५)

''आज्ञाधरे : मग तिये राहिली :'' (२६)

''आरे : तुज काइसे सूख : सूख जें मज होत असे :'' (३१)

''हे जैसे तेयाचे ओठावेठीचे पाइक :'' (३४)

''हे राखैल : परि दोहे ना : सोडील : परि बांधे ना :'' (३८)

एखादा लहानसा प्रसंग किंवा घटना अगदी कमीत कमी शब्दात मांडणे हे तर 'लीळाचरित्र'चे खास वैशिष्ट्य आहे. एकांकातील काही वाक्यांचा निर्देश करण्याचा मोह येथे आवरत नाही. ती वाक्ये अशी- उदाहरणार्थ- ''ते पैऱ्हां हाटाआंतु गळां माळ : तोंडी तांबूक, ऐसे खेळत असति तयांचिए गळांचि माळ सूकेचि ना:'' (१२)

''ऐसी एके सुक्षेत्रे असति : भुमी बिया मेळापकू कीजे : आणि भारू आथौनि पीकति : एकें नांगरवेऱ्ही उलखीजति : घाटे वापे पेरिजति : परि तेथे बीही न निगे :'' (२५)

''पोरू पाणयांतु पडिला : म्हणौनि पावो मोडला : यऱ्हवी भडीए पडतां तरि हाडगुड नुरतें : मरता :'' (४५)

''बाबा : कवणिचि कुसी उसासुनि निगालासि बा : ऐसी कपणि पापीण वीसंवली :'' (६२)

येथे अर्थ पुनरावृत्ती करणारे शब्द येतात. तरीही त्यामुळे मनातील अभिप्राय नेमका व्यक्त होतो. महानुभावीय गद्याच्या प्रारंभकाली शब्द, वाक्य, वाक्यसमूह यांची पुनरावृत्ती या भाषाशैलीत आढळते. याचे कारण, ती 'मुखपाठ' व्हावी हाच हेतू असणार हे उघड आहे.

'लीळाचरित्रा'तील गद्यात नामाचा वारंवार उल्लेख करणारी वाक्ये आढळतात. श्रीचक्रधरांचा उल्लेख सर्वनामाने फारच थोड्या ठिकाणी झालेला आढळतो. त्यांना गोसावी, सर्वज्ञ ही नामे योजली जातात. उदाहरणार्थ; 'पिंपळातळि गोसाविया आसन : येकू ब्राह्मणु... तेणे येता गोसावीयाते देखिले:... आरोगणे गासावीयाते वीनविले : गोसावी तेयाचेया घरा बीजें केले' येथे गोसावी शब्द पुनरावृत्त झाल्याचे दिसते. कदाचित त्यांच्या प्रतीचा आदरभाव याला कारण असावा. 'लीळाचरित्रा'त शुद्ध वाक्य आले तरी क्वचित सुट्या-सुट्या शुद्ध वाक्याच्या रूपात ते मांडले जाते. उदाहरणार्थ; 'गोविंदस्वामी स्नान व करिति : देवपूजा न करिति : विष्णुस्वामीसि नमस्कारू न करीति : ऐसे कर्म कांहीचि न करीति :' येथे 'न करीति' या अकराणात्मक क्रियेवर भर दिला जातो. त्यामुळे गोविंदस्वामीची अकर्मव्यता लक्षात येते पण क्वचित 'देमाइसी पाने पोकळे केले : नारिएळें दर्शन केली' असे कर्मयुक्त वाक्यही लक्षात येते. परंतु अशा रचनेमुळे गद्यात परिणामकारकता आल्याशिवाय राहत नाही. अशा रूपाची वाक्यरचना हे तत्कालीन गद्याचे वैशिष्ट्य ठरते. कधी कर्माप्रमाणे सुटे वाक्ये तर कधी कर्ते अनेक तर कर्म व क्रियापद एकच असते. कधी कधी क्रियापदाची पुनरूक्तीही आढळते. उदाहरणार्थ; 'एयचि नीद्रा कीजे : कीजे सुखे संतोखे' येथे 'कीजे' ही यमकात्मक रचना वाटावी, तर 'सुख-संतोष' अनुप्रासात्मक रचना वाटते. 'सर्वज्ञे म्हणितले : पाहीजे : पुसीजे : चर्चिजे :' किंवा 'जि-जि : हारविलें असे ते वेचिजो : दीजो : मग खेळिजो :' अशी क्रियापदांची चढती श्रेणी काही वाक्यांत आढळते. सार अलंकारात्मक अशी ही रचना लक्षणीय ठरल्याशिवाय राहत नाही.

वर्णनात्मक रचनेत 'प्रत्यक्षाभिनयाकुलता' आहे. जसे 'एणे हाते हा फेडिला : एणें हाते हा फेडीला :' ही रचना भिन्नार्थदर्शक आहे. हाच अर्थ दोन रेड्यांच्या मध्ये श्रीचक्रधर उभे राहतात तेव्हा 'एकू एसा नीगाला : एकू तसा नीगाला :' या वाक्याचाही घ्यावा लागतो. काही वाक्ये प्रश्नार्थक स्वरूपाचीही आहेत. उदाहरणार्थ; 'एथ सरण आलेया काइ मरण असे :', 'बाइ श्रीकृष्ण काइ मातीएचा : देवकी देवी काइ मातीएची :' या प्रश्नांमधून अपेक्षित अर्थ ध्वनित होतो. काही वाक्ये अतिसंक्षिप्तही असतात. 'साळैंचे घर मेणांचे : काउळेयाचे घर सेणाचे :', 'तुटकी ऐसी बाज : तियेवरी फाटकी ऐसी वाकळ :' यात 'तुटकी' व 'फाटकी' ही विशेषणे महत्त्वाची आहेत. यातूनही पदांचा समान क्रम वाक्यात एक ठसका निर्माण करतो, शिवाय त्यातून दरिद्री ब्राह्मणाचे चित्र उभे राहते.

'लीळाचरित्रा'च्या 'एकांका'तील शब्दांची ध्वन्यानुकारी पुनरावृत्ती अर्थव्यक्त करणारी आहे. उदाहरणार्थ - कंटकटीयमान, तीटत - तीटत, (बोणेबाई) लवलव करुति भीक्षा घेऊनि आली इत्यादी किंवा पाईकपरिवार, पालापाणी, सांदीसवडी, खुंटदावे यासारखे सामासिक शब्द; आंगी-टोपरे, गोरा-गोमटा, पुड-बाटवा यासारखे जोडशब्द; पहुडणे-उपहुडणे, वोखटे-गोमटे यासारखे विरोधी शब्द निवेदनाचे बोलीरूप व प्रवाहीत्व स्पष्ट करतात. तसेच खडे-खुबटे, दांडी-डोळी, दैवभाग्य, तिळ-तेलीण, गोत्र-कुटुंब. पाणिपात्र इत्यादी द्विरूक्तीपर शब्दही यात आलेले आहेत. जाणिजे-नेणिजे, ने-घे असे अकरणशब्द, अर्थगोचरता आणि नेत्रगोचरता हे या शब्दांचे वैशिष्ट्य आहे.

'लीळाचरित्रा'च्या 'एकांकां'मध्ये एक विशिष्ट प्रकारची अवतरणक्षमता आहे. सुभाषित स्वरूपी सूत्ररूप वाक्ये प्रसंगनिमित्ताने 'एकांका'त अगदी सहजपणे येतात 'बाइ : प्राणियें एथ आलेयां जळतां जावें तरि निवावे कोठे :', 'जीवाचा वागरा नावेक ढिला करों नये :', 'ताकीची माशी ताका वेगळी जाताए :', 'भरलेया गाड्या काइ सुप जड :' अशी उपमास्वरूपी वाक्ये यात आहेत तशीच सुभाषितरूपी रूपकात्मक वाक्येही आढळतात. उदाहरणार्थ; 'जीवु स्फटिकाकारू', 'संसारू हा दीर्घस्वप्न गा', 'स्त्री भणिजे मत्तद्रव्याचा रावो गा', 'कोमळ ज्ञानीं विखो विघ्न' इत्यादी. 'अहंतेचे मूळ सकंदी उपडावे नाएका : एरव्ही अंकुर निगति : मग शांतीचे रोप लावावें :' यातील पारंपरिक रूपक लक्षणीय आहे.

श्रीचक्रधरांच्या भाषेत संस्कृत शब्दही येतात, पण त्यामुळे 'यादवकालीन मराठी गद्या'चे वेगळेपण प्रभावित होत नाही. एकूणच 'लीळाचरित्रा'त 'श्रमनिवृत्ती', 'एषणात्रय', 'क्षुधानिवृत्ती', 'घृणात्याग', 'शीतोष्णपरिधर', 'कर्मजड', 'विधिकिंकर', 'प्रियवक्ता' इत्यादी संस्कृत सामासिक शब्द येतात तसेच तद्वित-तत्सम शब्दांचे समासही येतात. उदाहरणार्थ; श्वानकुंडली, कर्मचांडाळ वगैरे. 'लीळाचरित्रा'त काही शब्द वारंवार येतात. उदाहरणार्थ; एकीवासना (एकमत), वासना (आणखी एक मत), दुसरी वासना (दुसरे मत), बीजे केले (प्रस्थान केले), आरोगणा करणे (भोजन करणे), पहुड स्वीकारणे (विश्रांती घेणे, झोपणे), ज्ञानशक्ती स्वीकरीली (ज्ञानप्राप्ती होणे) पाणिमात्र (हातावर भोजन करणे, हाताचा वापर भोजनासाठी, पाणी पिण्यासाठी करणे). अशा शब्दांनी 'लीळाचरित्रा'च्या भाषावैभवात भर घातलेली आहे. 'लीळाचरित्रा'त काही संस्कृत शब्दांना मराठी अर्थगंध लाभलेला दिसतो. उदाहरणार्थ - महात्मे, राऊळ, केसकळाप, अवतारू इत्यादी. या शब्दांबरोबरच देश बोली शब्दांना नागरत्व लाभलेले आढळते. उदाहरणार्थ - बुड्डे, सेंगुळे, पासवडी, जोगवटा इत्यादी शब्द या दृष्टीने लक्षणीय आहेत. संस्कृत आणि मराठी शब्द एकमेकांजवळ बंधुत्वाच्या नात्याने वावरताना आढळतात. काही क्रियापदे भाषेचा डौल वाढविणारी आहेत. उदाहरणार्थ - वास पहाणे, निबंध काढणे, सेस भरणे, मोटी घालणे, काळवंचना करणे, धुमकेसी उठणे इत्यादी क्रियापद, शब्दयोजना उल्लेखनीय आहे.

'लीळाचरित्रा'तील वाक्यरचना अत्यंत मनोज्ञ आहे. 'शुद्ध' व 'केवल' वाक्यांची रचना अत्यंत कमी शब्दांची असून वाक्यांमध्ये एकप्रकारची गतिमानता आहे. दोन किंवा तीन पदे असणे हे या वाक्यांचे वैशिष्ट्य आहे. उदाहरणार्थ- 'देव व्हो : एथ न वचा : न वचा : एथ वाघु असे :' 'गोसावी आइकौनि बीजें केलें : तवं तेथ वाघु आला होता : तेणें हाक दीधली : गोसावी सींहनीदु केला : मग तो वघु पळाला :' (१७) तसेच लघु वाक्यांप्रमाणे क्वचित दीर्घ शुद्ध वाक्येही याठिकाणी पहावयास मिळतात. उदाहरणार्थ - 'डांकरामी पाणीपात्र करुनि पहुडावेया भिळेश्वराचेया देउळा बीजें करीत होतें : (१७), 'आंध्रदेशीं एकाकी असता एकी गावीं तेलीया एकाचेया घरा पाहानपटीं बीजें केलें :' (११) इत्यादी वाक्ये शुद्ध वाक्याची उदाहरणे म्हणून सांगता येतील.

स्थलकालदर्शक सप्तम्यन्त पदे ही वाक्याच्या आरंभी आलेली आहेत. नंतर प्रथमान्त पद कर्ता, मग तृतीयान्त करणदर्शक पद, पुढे चतुर्थ्यन्त गौणकर्म आणि द्वितीयान्त प्रधान कर्म असा पदक्रम दिसतो. वाक्यान्ती क्रियापद येते. पंचमीचे रूप क्रियापदाच्या आधी येते. उदाहरणार्थ; 'साधीतें एयौनिचि नेहजैल कीं :' (ए. ली. २९-३०) ही सारी वाक्यरचना प्रचलित मराठीतील शुद्ध (प्रमाण) वाक्याशी जुळणारी अशीच आहे. 'लीळाचरित्रा'तील गद्याचे स्वरूप बोलीभाषेचे आहे. जसे 'हा घोडा अमुकीये जातीचा : अमूका गुण : अमूकें लक्षण :', 'गोसावी तयाचे गुणधर्म स्वीकारीले : गोपाळमंत्री दीक्षा : गोपाळव्ही आण : जोआंचे व्यसन : राणियेचा पढीयावो : हरिपाळ नावं :' यात कर्ता, कर्म, क्रियापद ही तीन पदे असतात आणि नंतर कर्माचा तपशील दिलेला असतो.

'लीळाचरित्रा'ची भाषा वाक्यप्रचारांनी समृद्ध आहे. त्याचा 'एकांक' आकाराने लहान असला तरी त्यात सुद्धा भाषेचे हे वाक्यप्रचारवैभव जाणवते. त्यातील काही वाक्यप्रचार भाषेत अद्यापि जिवंत आहेत, तर काही काळाच्या ओघात वापरामधून गेले आहेत. उदाहरणार्थ - अपूर्व अपूर्व स्फुरणे (नवनीत कल्पना किंवा विचार सुचणे) ४९; आडवे जाणे (दुसऱ्यास चुकवून किंवा टाळून जाणे) १९; काळवंचना करणे (मरण चुकविणे) ३०; किलुकील करणे (आनंदोद्गार करणे) २२; कुसी उसासून निघणे (जन्म घेणे) ६२; कृत्याकृत्य होणे (धन्यता वाटणे) १६; क्रीडा करणे (विहार करणे; आनंदात हिंडणे) ७; खुंटदावे नसणे (कोणताही पाश नसणे; निःसंग असणे) १६ धुमरीसी उठणें (भरपूर पीक येणे) २५; ठाय करणें (जेवणाचे पान तयार करणे) ४६; डोळा लागणें (झोप येणे; डुलकी लागणे) १४; पथ्य करणे (आजाऱ्याची औषधपाणी करणे) ३३; पाणिपात्र करणे (भिक्षा मागणे) १०; माथाचां हात फेडणे (एखाद्यावरील अधिकार सोडून देणे) १२; लवलव करणे (घाई करणे) ६२; व्यथा काढणे (शारीरिक पीडा दूर करणे) २७; व्रत घेणें (निश्चय किंवा प्रतिज्ञा करणे) ७; शांतिक करणें (अरिष्टशमनार्थ शांत करणे) ४८; सेस भरणे (कपाळावर सौभाग्यदर्शक मळवट भरणे) ५; हातासन दाखविणे (दुसऱ्याचां हात वस्त्राखाली घेऊन त्यावर गुप्तरीतीने खूण करणे) ५६; अशाप्रकारे 'एकांका'ची भाषा विविध वाक्प्रचारांनी समृद्ध आहे. याशिवाय 'वाणी पडली आणि म्हैसा आला' (४०) सारखी एखादी योगायोगवाचक सुंदर म्हणींनी 'एकांका'च्या भाषिक सौंदर्यात निश्चितच भर पडलेली आहे.

'लीळाचरित्रा'च्या 'एकांका'तील वर्णनशैलीचे स्वरूपही अत्यंत चित्ताकर्षक आहे. चक्रधरांच्या विरक्तावस्थेचे 'अवस्था स्वीकारू' या लीळेतील वर्णन. उदाहरणार्थ- ''गोसावी अवस्था स्वीकारली : ते वारेनि उगवति : कां कव्हणी मनुष्य उगवी तेव्हळि : मूर्ति बोरखडे : कांटे रुपति : असूधाचे बींदू नीगति : ते साहाज पन्हरेयावरी मानकूली तैसीं मीरवतिः।।' (८) मुक्ताबाई नावाच्या एका वृद्धेच्या तपस्येचे वर्णनही असेच प्रत्ययकारी उतरलेले आहे. उदाहरणार्थ- 'पर्वती बारा वरिषे क्रीडा केली : एक दिनीं मुक्ताबाइसी दर्सन जाले : आपुलेया आस्रमा घेउनि आली : वनपुस्याची पूजा केली : कंदमूळफळाची आरोगणा दीधली : तयासि म्हणीतले : 'एतुके दीस तप केले : तयाचे फळ आजि जालें :' पाहाळी गेली लोव : चुंभळी पळीती नखें : भुई काढिती जटै : मुक्ताबाई ऐसें नांवः।। (ली. ९)

म्हाइंभटाची भाषा सरळ, रसयुक्त, प्रसंग व घटनांचे नेमके शब्दचित्रण करणारी आहे. एखाद्या व्यक्तिचित्रणापासून तर अगदी साध्या प्रसंगवर्णनाशी ती एकरूप झालेली आहे. म्हाइंभटाच्या ठिकाणी भाषाप्रभुत्व असल्याचा पूर्ण प्रत्यय 'एकांका'सारख्या लहान प्रकरणातही आल्याशिवाय राहत नाही. एका दृष्टीने ही 'लीळाचरित्रा'ची वानगीच म्हटले पाहिजे. 'नाहीं घाटावें लागत, एका शितें कळें भात' या तुकारामांच्या म्हणण्याप्रमाणे संपूर्ण 'लीळाचरित्र' कसे असेल याची कल्पना 'एकांका'मधून आपणाला आल्याशिवाय राहत नाही.

'लीळाचरित्राच्या एकांका'चे भाषिक स्वरूप न्याहाळतानाच ते कधी वृत्तांत निवेदनरूपी, कधी टिपणासारखे, कधी दृष्टांतरूप, कधी नाट्यात्मक, संवादात्मक, कधी हास्यविनोदरूप तर कधी केवळ संभाषणस्वरूपी असल्याचे आढळून येते. थोडक्यात, विषय, प्रसंग, प्रवृत्ती यानुसार लीळाचरित्र एकांकाच्या भाषाशैलीचे रूप बदलत जाते असे आपणाला निश्चितपणे सांगता येईल.

१.३.९ 'लीळाचरित्र – एकांका'चे रचनाविशेष

'एकांका'चे एक अत्यंत महत्वाचा वैशिष्ट्य म्हणजे हा भाग फारच त्रोटक व त्रुटितही आहे. हा त्रोटकपणा केवळ त्याच्या आकारापुरताच मर्यादित नसून तो त्याच्या निवेदन पद्धतीतही जाणवतो. चक्रधरांची पूर्व परंपरा अवघ्या चार लीळांत व तीही अतिशय त्रोटकपणे सांगितलेली आहे. स्वतः चक्रधरांच्या तारूण्यकाळाचा व प्रापंचिक जीवनाचा समावेश एक किंवा दोन लीळांमध्ये केलेला आहे. त्यांची गोविंदप्रभूशी, म्हणजे प्रत्यक्ष गुरूशी झालेली पहिली भेट चारसहा ओळीत वर्णिलेली आहे. काव्हर देवासारख्या यादवनृपाच्या भेटीच्या प्रसंगाला अवघी एक लीळा पुरली आहे. चक्रधरांसारख्या अलौकिक पुरुषाचे पूर्वचरित्र कळण्याच्या दृष्टीने 'एकांक' फार अपूरा वाटतो. 'एकांका'च्या रचनेतील हा त्रोटकपणा त्यात आलेले चक्रधर-चरित्र नीटपणे कळण्याच्या क्वचित आड येतो असेही वाचकांना वाटेल. उदाहरणार्थ- पहिल्या लीळेतील पहिलेच वाक्य पाहण्याजोगे आहे. 'फलेठाणी कऱ्हाडेचा ब्राह्मणा घरी अवतारू स्वीकारीला' असे आहे. या वाक्याचा अर्थ कळला तरी अवतार कोणी स्वीकारला हे चरित्रकार जोवर सांगत नाही तोपर्यंत वाचक मुग्ध्यातच राहतो. तिसऱ्या लीळेतील श्रीप्रभूंचा उल्लेखही असाच संदिग्ध स्वरूपाचा आहे. 'एकांका'तील या पहिल्या पहिल्या लीळा, वाचकांना थोडीफार माहिती आधीच आहे असे गृहित धरून लिहिल्याप्रमाणे वाटतात. अर्थात ज्याला ती माहिती नाही त्याला त्यांतील मजकूर काही ठिकाणी तरी अनाकलनीय वाटेल यात आश्चर्य नाही.

'एकांक' भागाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, त्यात मागील व पुढील घटनांची सरमिसळ झालेली असून त्यामुळेही काही लीळांतील आशय नीटपणे कळणे कठीण झालेले आहे. चरित्रकाराला चक्रधरांच्या 'एकांक' भागातील म्हणजे त्यांच्या पूर्वचरित्रातीलच एखादा प्रसंग सांगवयाचा असतो; परंतु तो त्याने स्वतः पहिलेला किंवा त्यांच्या तोंडून ऐकलेलाही नसल्यामुळे त्याला तो स्वतंत्रपणे सांगता येत नाही. कारण मग प्रामाण्याचा प्रश्न उभा राहतो. म्हणून पुढे पूर्वार्धात किंवा उत्तरार्धात स्वतः चक्रधरांनी आपल्या पूर्वायुष्यातील हा प्रसंग कोणास संभाषणाच्या ओघात सांगितला असेल तर

तो धागा घेऊन 'लीळाचरित्र'कार 'एकांका'तील लीळेचा प्रारंभ तेथपासून म्हणजे पुढे केव्हातरी घडलेल्या प्रसंगापासून करतो. मग तो प्रसंग सांगताना स्वतः चक्रधरांनी सांगितलेली पूर्वीची 'एकांका'ची लीळा ओघानेच येते.

प्रारंभी पूर्वार्ध-उत्तरार्धातील एखादी घटना, मध्यभागी 'एकांका'ची लीळा, आणि शेवटी पुन्हा पूर्वार्ध-उत्तरार्धातील प्रसंग याप्रमाणे काही लीळांची रचना झालेली आहे. मग वाचकालाही जरूरीप्रमाणे वर्तमान-भूत-भविष्य अशा तीन काळात फिरावे लागते. 'एकांका'तील चौथी लीळा या दृष्टीने पाहण्यासाठी आहे. तिचा प्रारंभ 'पूर्वार्ध' काळातील आहे. हिरवळी येथे महदाइसे चक्रधरांना द्वारावतीच्या चांगदेवराउळांची हकिकत विचारते तो प्रसंग 'पूर्वार्धा'तील आहे. स्वामी तिला आपले चरित्र सांगण्याच्या ओघात चांगदेवराउळांनी कामाख्येच्या प्रसंगाच्या निमित्ताने देहत्याग करून गुजरातच्या प्रधानपुत्राच्या मृतदेहात प्रवेश केला त्या घटनेपर्यंत आले. नेमकी हीच घटना 'एकांका'च्या दृष्टीने महत्वाची असल्याने 'कामाख्येच्या गोष्टी' च्या रुपाने या लीळेचा मध्यभाग सिद्ध झाला. परंतु चरित्रकार तेथेच थांबत नाहीत तर स्वामींच्या तोंडून त्यांच्या पूर्वायुष्यातील कामाख्येची गोष्ट ऐकून 'द्वारावतीचे चांगदेव राउळ म्हणजेच चक्रधरस्वामी' या वस्तुस्थितीची प्रचिती आल्याने महादाइसे आश्चर्यचकित होऊन ही गोष्ट सर्वांना सांगत कशी सुटते व स्वामी तिला तसे करण्यापासून परावृत्त कसे करतात हा 'पूर्वार्धा'तील भागही 'लीळाचरित्र'कार येथेच सांगून टाकतात. म्हणजे या एकाच लीळेत एकदा चक्रधरांच्या 'पूर्वार्ध' काळात, नंतर त्यामागील द्वारावतीकार चांगदेव राउळांच्या काळात व शेवटी पुन्हा त्यांच्या 'पूर्वार्ध' काळात याप्रमाणे आपली ये-जा होते. ११ व्या लीळेतही काहीसा असाच प्रकार आहे. या लीळेतील पूर्वचरित्राचा भाग म्हणजे स्वामींच्या एकाकी अवस्थेत आंध्रप्रदेशात घडलेल्या तेल्याची गोष्ट. ही गोष्ट या लीळेच्या मध्यभागात आली आहे. प्रारंभी ती ज्या प्रसंगाने आठवली तो पंचाळेश्वर येथे 'पूर्वार्ध' काळात घडलेला प्रसंग सांगितलेला आहे. आणि लीळेच्या शेवटी या दोन प्रसंगात व्यक्त झालेल्या आपल्या दोन भिन्न प्रवृत्तींची तुलना स्वतः चक्रधरांनीच 'बाइः तैं तैसी प्रवृत्तिः जेंः तान्हैलेयां पाणी पेओं न मगीजेः आता इथें ऐसी प्रवृत्तिः घेया घेया बापेयाः वेगु करा' या शब्दांत केली आहे. म्हणजे म्हाइंभट 'एकांक' भागात केवळ 'तैलकाराची गोष्ट' सांगून थांबत नाहीत; तर ती सांगण्यासाठी उद्‌भवलेला प्रसंग, जिला सांगितली ती व्यक्ती, गोष्ट सांगण्याचा हेतू आणि तिचा समारोप याप्रमाणे अनेक विषयाचे मिश्रण ते एकाच लीळेत करतात. व त्यामुळेच वाचक गोंधळात पडतो.

'अळजपुरीं भैरवीं अवस्थानः भांडारेकाराची पूजा स्वीकार' या २८ व्या लीळेतही हाच प्रकार पुन्हा घडलेला आहे. या लीळेत सांगितलेली नीळभट भांडारेकाराची गोष्ट चक्रधरांना पुढे 'उत्तरार्ध' काळात भटोबासांच्या म्हणजे नागदेवांच्या एका प्रसंगावरून आठवली व ती स्वामींनी त्यांना त्याच प्रसंगी सांगितलेली आहे. साहजिकच लीळेच्या 'उत्तरार्धातील भटोबासांचा प्रसंग येतो', नंतर भांडारेकारांची गोष्ट येते, व शेवटी पुन्हा या गोष्टीच्या निमित्ताने झालेला चक्रधर व म्हाइंभट यांचा संवाद आलेला आहे. अशा प्रकारच्या त्रि-स्थळी व त्रिकाळी यात्रा 'एकांक' वाचताना अनेकदा कराव्या लागतात. वाचकाला पूर्वज्ञान आहे अशा समजुतीने म्हाइंभटांनी त्याची रचना केलेली आहे.

'एकांका'चा आणखी एक विशेष म्हणजे त्यातील निरनिराळ्या घटनांमध्ये कालावधी किती लोटला याविषयी चरित्रकाराने स्वीकारलेले मौन हा होय. 'लीळाचरित्र' हा एक चरित्रग्रंथ, म्हणजे इतिहास आहे. अर्थात त्यात कालविषयक नोंदी वास्तविक असायला पाहिजे होत्या. परंतु म्हाइंभट त्या सहसा करीत नाहीत आणि चुकून एखादी नोंद केलीच तर ती अतिशय स्थूल स्वरूपाची असते. 'एकांका'तील पहिल्या पहिल्या लीळांतून कालविषयक जाणिवेचा हा अभाव चांगलाच जाणवतो व त्यामुळे या ऐतिहासिक काळातील आपला वावर अगदी चाचपडत होतो. चांगदेव राऊळांनी फलटण येथे कऱ्हाडे ब्राह्मणाच्या घरी अवतार केव्हा स्वीकारला, त्यांच्या ठिकाणी देवगिरीकर श्रीदत्तात्रेयप्रभूंनी शक्तीसंचार केव्हा केला, त्यानंतर ते द्वारावतीस गेले ते तेथे किती काळ होते, गोविंदप्रभूंना ते केव्हा भेटले, त्यांच्या चरित्रातील कामाख्येचा प्रसंग नेमका केव्हाचा इत्यादी गोष्टींविषयी 'एकांक' वाचूनही आपण आज्ञानातच राहतो. 'हे फार पूर्वी केव्हा तरी घडलेले आहे.' असे म्हणून आपल्याला आपले समाधान करून घ्यावे लागते. कारण चांगदेव राऊळांच्या चरित्राचा हा सर्व भाग एखाद्या पौराणिक कथेप्रमाणे वाटतो. आपण इतिहास वाचित आहोत असे थोड्या प्रमाणात प्रथम चौथ्या लीळेत जाणवते. कारण तेथे गुजरातच्या प्रधानपुत्राच्या निधनाचा प्रसंग आहे. 'एकांका'तील काही उल्लेख दीर्घकालसूचक आहेत. उदाहरणार्थ - ९ व्या लीळेतील 'पर्वती बारा वारिखें क्रीडा केली' व २४ व्या लीळेतील 'तिसि बारा वरीखें अनोदकें नाहीति' हे उल्लेख पहावे लागतील. परंतु यांतूनही दीर्घकाळ लोटला याशिवाय अधिक काही कळत नाही. पुढे ५२ व्या लीळेत चक्रधरांनी अळजपुरच्या रामदरव्याशी भेट झाली तेव्हापासून त्यांच्या मेहकर येथे आगमनापर्यंतचा व त्यापुढील म्हणजे मेहकर ते पैठण या बोणेबाईबरोबर केलेल्या प्रवासाचा वृत्तांत मात्र काळाची जाणीव ठेऊन लिहिला आहे. परंतु चक्रधरांचे अळजपूर येथे आगमन होईपर्यंतचा त्यांच्या चरित्राचा 'एकांका'तील आराखडा कालानुक्रमदृष्ट्या फारच स्थूल, किंबहुना काही ठिकाणी तर मुग्ध स्वरूपाचा वाटतो हे मान्य केले पाहिजे. अर्थात् यात चरित्रकारांचा दोष नाही हेही तितकेच खरे आहे. कारण त्यांनी 'पूर्वार्ध' व 'उत्तरार्ध' तयार झाल्यावर त्यात आढळलेल्या चक्रधरांच्या पूर्वचरित्राविषयी त्यांनी स्वतः सांगितलेल्या माहितीचे प्रसंग संकलित करून, त्या त्या घटनांचा कालानुक्रम लावून, त्या त्या प्रसंगासह ती ती घटना अनुक्रमाने मांडली व मधून मधून काही सांधेजोड करून अशाप्रकारे 'एकांक' भाग सिद्ध केलेला आहे. त्यापेक्षाही अधिक नविन असे 'एकांक' भागात काहीही आलेले नाही. ज्या घटनेची ऐकीव माहिती देणारी व्यक्ती नाही, ती घटना म्हाइंभटांनी चरित्रात घेतली नाही. म्हणून 'एकांका'मधील माहिती फार थोडी, त्रोटक व कालदृष्ट्या खंडित स्वरूपाची वाटते.

'एकांका'तील चरित्र बोलूनचालून पूर्वार्ध-उत्तरार्धात स्वतः चक्रधरांनी प्रसंगोपात्र सांगितलेल्या आपल्या पूर्वायुष्यातील गोष्टींच्या आधारावर रचलेले आहे. स्वामींच्या विशिष्ट स्वभावामुळे व आपल्या आयुष्यातील हा एकाकी एकांक तसाच राहू द्यावा, तो विशेष प्रगट करू नये, या त्यांच्या वृत्तीमुळे त्यांनी आपण होऊन स्वतःचे पूर्वचरित्र सांगण्याचे प्रसंग फार क्वचित येत. जे काही आले तेवढे साक्षेपाने टिपून त्यांच्या आधारे म्हाइंभटांनी चक्रधरस्वामींनी एकाकी अवस्थेत कंठलेल्या व

म्हणून गुढरम्य वाटणाऱ्या त्यांच्या पूर्वचरित्राचा एक आराखडा आपल्यापुढे उभा केला यासाठी आपण त्यांचे ऋणी असले पाहिजे.

१.४ वाचनासाठी काही लीळा

लीळा १ : सैह्याद्री व्याघ्रवेषें भेटि

श्रीपरेशाय नमः ।।०।। फलेठाणी कऱ्हाडेया ब्राह्मणाचां घरीं अवतारू स्वीकरीला : मग केतुले एक दीस राज्य केलें: एकदिनीं श्राध जालें: तैं गोसावियां भार्या रतीचीया चाडा विनविलें: आणि गोसावियासि तेव्हंळि ब्रह्मचर्याची प्रवृत्तीः मग तें निमीत्य करूनि मातापुरा बीजें केलें: तेथें देवगीरीवरी बीजें करीतां: श्रीदत्तात्रयप्रभु व्याघ्राचा वेखु धरुनि जाळि तळुनि बीजें केलें: हाक दीधली: श्रीमुगुटीं चवडा ठेविला: लोकु भीणाला: तो पर्ता केला: तेथे शक्ति स्वीकारली।। जवं लोकू द्वारावतीए जाए तवं गोसावी तेथे होते: मग बीजें केले: द्वारावतीए।।

लीळा २ : द्वारावतीए अवस्थान

गोसावी द्वारावतिएसि खराटेवरि बीदी झाडीति: मग सूपीं पुंजे भरिति: श्रीमुगुटावरि ठेविती: गोमतीए मध्यें घालिती: सूपें मार्गु प्रगटे: खराटेनि विद्या:।।

लीळा ३ : अळजपुरीं भैरवीं अवस्थानः भांडारेकराची पूजा स्वीकार

बेलोपुरीं भटोबासातें म्हणीतलें१ 'वानरेया: तुम्हांसि करणीये एकु असे गा': तवं भटी म्हणीतलें: 'जी जी: गोसावी जाणत असति कीं: मातें द्रव्य नाहीं': सर्वजें म्हणीतलें: 'तु उभा ठाकलासीचि पुरे: सीधीतें एथौनिचि नेइजैल कीं: पुरूषु आपुलें कारणीये म्हणौनि प्रवर्ते: तयासि द्रव्याची सतें मिळति': मग भांडारेकराची गोष्ट सांघीतली।।

'एथ भांडोरकर होत: तथासि करणीयें वीहींले: ते एथौनिचि सीधी नेलें': अळजपुरीं भैरवीं अवस्थान:।। भांडारेकारा निर्वाणेचेया नेऊळा पाठविलें: 'कव्हणी कांही म्हणैल: तें आइकावें: मग भांडारेकार निर्वाणेचेया देउळा मागें बैसले: पंचोळीची स्त्री धागाबाई: तीयेसि निर्वाणेची भक्ति: ते प्रदक्षणे आली: तं भांडारेकारातें देखीलें: तेयांसि नमस्कारू केला: आवारा घेउनि गेली: पुजा करूं आदरीली: तवं तेहीं म्हणीतलें: 'हे काइ कराल': तीयां म्हणीतलें: 'पुजा करुनि': मग तेहीं म्हणीतलें: 'पुजा तरि आमुचेया गोसावियासि करा': तीया म्हणीतलें: 'तुम्हांइ आणि गोसावी असति': 'तरि काइ आम्हा आणिक गोसावी असति': 'तरि तयातें बोलाऊ पाठवीन: दांडी डोळेकार पाठवीन': तेहीं म्हणीतलें: 'ना: आम्हीचि बोलाउनि' : मग भांडारेकारी अवघें वृतांत सांघीतलें: जी जी: तरि तेथ बीजें करावें': गोसावीं तेथ बीजे केलें: तिया गोसावीयासि देखीलें: आणि भांडारेकराचेया पसि उचें बरवीं पूजाद्रव्यें आणौनि पुजा करूं आदरीली: तवं सर्वज्ञे भणीतलें: 'तुम्ही यांचां हाती वोणा: हें एथ पुजा करीति: हें याचें की' : मग तीयें भांडारेकाराचीए हातीं देति: ते गोसावीयासि पुजाकरीति: मंग भांडारेकाराचीं पुजाद्रव्यें तीहीं आणिलीः तूजा केली: तें तेयाची तयासि देवों आदरीली तींहीं म्हणीतलें:

'जी जीः ईश्वरीं अर्पीलें तें माघौतें कैसें घेयावें': सर्वज्ञें म्हणीतलें: 'एथौनि तुम्हां देइजत असीजे': तेहीं मानीलेः मग त्यें परित्यजुनि वीजें केलें : मग सर्वज्ञें म्हणीतलें : 'भटो : तुमचें करणीयें चरितार्थ हो'।। तेथ म्हाइंभटीं म्हणीतलें : 'जी जी : मज वीहीजो : मातें द्रव्य असे': 'तुम्हांसि आणिक करणीयें : यासिं आणिक करणीये : हा संनिधान पातला असे : तुम्हां संनिधान करावें असे':।।

१.५ समारोप

प्रस्तुत घटकामध्ये आपण 'लीळाचरित्र-एकांक'चे स्वरूप व वाङ्मयीन विशेष यांचा सविस्तर परामर्श घेतला. 'लीळाचरित्रा'चे कर्ते म्हाइंभटांचा जीवनपट अभ्यासल्यानंतर आपल्या लक्षात येते की, आयुष्याच्या पूर्वार्धात आपल्या ज्ञानाचा आणि ज्ञातीचा अहंकार झालेल्या म्हाइंभटांचे जीवन चक्रधरांच्या भेटीनंतर बदलून जाते व ते चक्रधरांचे अनुयायी बनतात. म्हाइंभट्टांनी अत्यंत कष्टपूर्वक स्वामींच्या लीळा संकलित करून चरित्रलेखनाचा एक आदर्श वस्तुपाठ निर्माण केला आहे. 'लीळाचरित्र-एकांक'मध्ये चक्रधरस्वामींच्या जीवनाचा पूर्वभाग आलेला आहे. 'एकांका'तील पाऊणशे लीळांमधून चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचे व कार्याचे अनेकविध विलोभनीय पैलू उजागर होतात. तसेच तत्कालीन सामाजिक-धार्मिक-सांस्कृतिक जीवनाचे काहीएक दर्शन घडते. यादवकालीन मराठी गद्याचा अस्सल नमुना म्हणून 'एकांक'चे महत्त्व खूप मोठे आहे. भाषिक, वाङ्मयीन व सामाजिकदृष्ट्या मौलिक असणारा हा ग्रंथ सांप्रदायिकतेच्या चौकटी मोडून सामाजिक दस्तऐवज म्हणून उपयुक्त ठरतो.

१.६ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

अ) योग्य पर्याय निवडा.

१) खालीलपैकी कोणास 'लीळाचरित्र' हा संपूर्ण ग्रंथ मुखोद्‌गत होता?

अ) हिराइसे (हिरांबा) ब) नागुबाई

क) बोणेबाई ड) महदाइसा

२) महानुभाव पंथात चक्रधरस्वामींनी 'वानरेया' असा कोणाचा उल्लेख केलेला आहे?

अ) भटोबास किंवा नागदेव ब) म्हाइंभट

क) दादोस ड) रामदेव

३) सालबर्डीच्या डोंगरात चक्रधरांना भेटलेल्या योगिनीचे नाव काय?

अ) मुक्ताबाई ब) म्हादंबा क) हांसूबाई ड) बोणेबाई

४) महानुभाव संप्रदायात 'परमेश्वरपूर' म्हणून खालीलपैकी कोणत्या ठिकाणाचा उल्लेख केला जातो?

अ) द्वारावती ब) रिधपूर क) देवगिरी ड) आपेगांव

५) चक्रधरांनी ‘म्हातारी जीज्ञासक : म्हातारी चर्चक : म्हातारी एथ कांही पूसतचि असे’ असे गौरवोद्गार कोणाबद्दल काढलेले आहेत?

अ) नागांबिका ब) आबाइसा क) धानाबाई ड) महदाइसा

उत्तरे : १) हिराइसे (हिरांबा) २) भटोबास किंवा नागदेव ३) मुक्ताबाई

४) रिधपूर ५) महादाइसा

ब) लघुत्तरी प्रश्न

१) ‘लीळाचरित्र एकांक’चे भाषिक विशेष स्पष्ट करा.

२) म्हाइंभटाचे वाङ्मयीन कार्य स्पष्ट करा.

क) दीर्घोत्तरी प्रश्न

१) ‘लीळाचरित्र एकांक’च्या आधारे चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष सांगा.

२) ‘लीळाचरित्र एकांक’मधून तत्कालीन सामाजिक-धार्मिक जीवनाचे प्रतिबिंब कसे पडले आहे, ते लिहा.

३) ‘लीळाचरित्र एकांक’मधून यादवकालीन मराठी गद्यांचे दर्शन कसे घडते, ते सोदाहरण लिहा.

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१) तुळपुळे शं. गो. (संपा.); लीळाचरित्र : एकांक

२) कोलते वि. भि. - महानुभाव संशोधन

३) कुंदप कन्हैय्या - पंचकृष्ण पंचअवतार

४) कुंदप कन्हैय्या - फलटण महात्म्य (कृष्ण मुनी हिंबकृत)

५) कुंदप कोमल - श्रचक्रधर तिरुपित दृष्टांतपाठ विवेचन

१.८ उपक्रम

महानुभवांचे गद्य ग्रंथ वाचून त्यांमधील तत्कालीन सामाजिक-धार्मिक जीवनाचे चित्रण व भाषिक विशेष अभ्यासा.

❑❑❑

सत्र १ : घटक २

(विभाग २ Module II)

आज्ञापत्र

२.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थीमित्रांनो, या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस,

- शिवकालीन मराठी गद्याचे स्वरूप सांगता येईल.
- 'आज्ञापत्र'चे स्वरूप व वाङ्मयीन विशेष सांगता येतील.
- मराठाकालीन राजनीतीचे स्वरूप सांगता येईल.

२.२ प्रास्ताविक

मध्ययुगीन मराठी साहित्यामध्ये महानुभवांचे गद्य ग्रंथ, बखरवाङ्मय, आज्ञापत्र आदी गद्यवाङ्मय निर्माण झाले आहे. यावरून तत्कालीन मराठी गद्याचे स्वरूप समजते. 'आज्ञापत्र' हा शिवकालीन राजनीतीचे स्वरूप स्पष्ट करणारा महत्वाचा ग्रंथ आहे. प्रस्तुत घटकामध्ये आपण 'आज्ञापत्राचा' कर्ता, लेखनकाल, स्वरूप, आशय, वाङ्मयीन वैशिष्ट्ये इत्यादींचा अभ्यास करणार आहोत.

२.३ विषय विवेचन

आज्ञापत्र म्हणजे छत्रपतींची आज्ञा सांगणारे राजपत्र. सामान्यतः छत्रपतींच्याकडून दिल्या जाणाऱ्या आज्ञांवर राज्याभिषेक शक, छत्रपतींचे नाव, मुद्रा वगैरे असतात. परंतु सदरचे 'आज्ञापत्र' हे राजदप्तरातील अधिकृत आज्ञापत्र नाही. कारण यावर राजशकाखेरीज आरंभीच्या मुद्रा व समाप्तीच्या मर्यादा वगैरे नाहीत. त्यामुळे या ग्रंथाचे नाव आज्ञापत्र असले तरी हा ग्रंथ छत्रपतींच्या खाजगी बाबीत मोडणारा आहे. मागील छत्रपतींच्या राजवटीतील राजनीतीचे स्वरूप विद्यमान छत्रपतींना सांगण्याच्या हेतूने 'आज्ञापत्रांचे' लेखन झाले आहे. 'चिरंजीव राजश्री राजकुमार राजकार्यी सुशिक्षित व्हावे' अशी छत्रपतींची इच्छा व्यक्त झाली आहे.

'आज्ञापत्र' या ग्रंथामध्ये एकूण नऊ प्रकरणे आहेत. पहिल्या दोन प्रकरणांमध्ये शिवाजी महाराजांची स्वराज्य स्थापना, स्वराज्यावर आलेली संकटे, छत्रपती संभाजी व राजाराम यांचा पराक्रम वगैरेचे वर्णन येते. पुढील सात प्रकरणांमधून राज्यकारभाराच्या विविध भागांचे विवेचन येते.

२.३.१ आज्ञापत्राचा कर्ता

'आज्ञापत्र' हा ग्रंथ रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिला आहे, असे मत रियासतकार गो. स. सरदेसाई, द. वा. पोतदार, त्र्यं. श. शेजवलकर, व. दी. राव, शं. ना. जोशी, रा. चि. ढेरे यांनी

व्यक्त केले आहे. तर वि. भि. कोलते, श्री. ना. बनहट्टी यांनी वेगळे मत व्यक्त केले आहे. वि. भि. कोलते यांच्या मते, नीळकंठ मोरेश्वर यांनी आज्ञापत्राचे लेखन केले आहे. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या मते, खुद्द शिवाजी महाराजांनी आपल्या राजनीतीचे विवेचन केले व लेखनिकांनी ते शब्दबद्ध केले असावे. आज्ञापत्राचा कर्ता कोण याबाबतीत अभ्यासकांमध्ये मतभिन्नता आहे. अर्थात कोलते आणि बनहट्टी यांखेरीज आज्ञापत्राचे अन्य अभ्यासक ग्रंथांचे कर्तृत्व रामचंद्रपंत अमात्यांना देतात. आज्ञापत्राचे श्रेय रामचंद्रपंतांना देण्याची दोन प्रमुख कारणे आहेत. पहिले म्हणजे परंपरेने रामचंद्रपंतांना दिलेले श्रेय अन्य कोणास द्यावे असा सबळ पुरावा अद्याप उपलब्ध नाही. दुसरे म्हणजे आज्ञापत्रांमधून प्रतिबिंबित झालेले शिवकालीन राजनीतीचे सूक्ष्म ज्ञान असणारी व शिवछत्रपतींपासून दुसऱ्या शंभूछत्रपतींपर्यंतच्या कालावधीतील मराठेशाहीचा तपशील स्वानुभवाने माहित असलेली जाणकार व्यक्ती रामचंद्रपंत अमात्यांवाचून दुसरी आढळत नाही. त्यांनी शिवाजीमहाराजांच्या अष्ट प्रधानमंडळातील दुसऱ्या क्रमांकाचे अमात्यपद सांभाळले होते. संभाजींच्या कारकीर्दीत जबाबदारीचे प्रधानपद सांभाळले होते व राजारामांच्या काळी महाराष्ट्राच्या राजकारणाची धुरा सांभाळली होती. तसेच अमात्यांच्या दप्तरात शिवाजीमहाराजांची सापडलेली दोन पत्रे व आज्ञापत्राची भाषा यांमध्ये विलक्षण साम्य आढळते. आणखी एक महत्वाची बाब म्हणजे इ. स. १७१५ साली म्हणजे आज्ञापत्राच्या निर्मितीसमयी आरमारविषयक कामकाजाचा अनुभव असणारी रामचंद्रपंत अमात्यांवाचून दुसरी कोणी व्यक्ती हयात नव्हती. सारांश, आज्ञापत्राच्या अन्य ग्रंथकर्त्याबाबत निश्चित सबळ पुरावे उपलब्ध होत नाहीत, तोपर्यंत या ग्रंथाच्या लेखनाचे श्रेय रामचंद्रपंत अमात्यांना द्यायला हवे, असा मतप्रवाह बळकट आहे.

२.३.२ आज्ञापत्राचा लेखनकाल

आज्ञापत्राच्या पहिल्या प्रकरणातील पहिल्या वाक्यात राज्याभिषेक शके ४२ असा सुस्पष्ट कालनिर्देश आहे. शिवाजीमहाराजांनी ६ जून १६७४ रोजी स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. यावेळी त्यांनी 'राज्याभिषेक शक' सुरू केला. तेंव्हापासून ४२ वर्षे म्हणजे इ. स. १७१५ साली 'आज्ञापत्रां' च्या लेखनाची आज्ञा झाली. कालगणना पद्धतीनुसार आज्ञापत्राचा दिनांक १९ नोव्हेंबर १७१५ असा येतो.

आज्ञापत्राच्या लेखकाच्या वादामुळे व आज्ञापत्रातील काही शंकास्पद विधानांमुळे आज्ञापत्राच्या लेखनकालासंबंधी भिन्न मते व्यक्त झालेली आहेत. प्रा. श्री. ना. बनहट्टी यांच्या मते, खुद्द शिवाजी महाराजांनीच आज्ञापत्र सांगून लिहवून घेतले असावे अणि राजारामकाली त्याच्यावर पहिले संस्करण आणि शंभूछत्रपतीं (दुसरे) च्या काळात दुसरे संस्करण होऊन सध्याचे रूप सिद्ध झाले असावे. व दी. राव यांच्या मतानुसार आज्ञापत्राच्या विषयाचा संकल्प शिवछत्रपतींच्या हयातीत, लेखन राजारामाच्या वेळी व प्रकाशन दुसऱ्या संभाजीच्या आज्ञेने झाले. शं. ना. जोशी यांना आज्ञापत्रात तीन कालिक स्तर आढळतात. १) प्रत्यक्ष उल्लेखित कालसंबद्ध मजकुराचा दुसऱ्या संभाजीच्या कारकीर्दीतील, २) राजनीतीच्या रचनेचा राजारामकालीन, ३) आज्ञापत्राच्या रचनेचा शाहू (आरंभ) कालीन. वरील

विवेचनावरून आपल्या लक्षात येते की, निश्चित पुराव्या अभावी आज्ञापत्राच्या रचनाकालाविषयी मतमतांतरे आहेत.

२.३.३ आज्ञापत्राची ग्रंथरूपाने प्रकाशने

आज्ञापत्राची पहिली हस्तलिखित प्रत १८०१ मधील उपलब्ध आहे. 'विविधज्ञानविस्तार' मासिकात १८७२ ते १८७४ या काळात आज्ञापत्रातील प्रकरणे क्रमश प्रसिद्ध झाली. तेंव्हा मराठी वाचकाना ते मुद्रित स्वरूपात पहिल्याप्रथम उपलब्ध झाले. 'विविध ज्ञान विस्तार' मधून ते १८९०-९१ साली पुनःप्रकाशित करण्यात आले. १८२३ साली अनंत आत्माराम मोरमकर यांनी आज्ञापत्राचे पुस्तकरूपाने पहिल्यांदा प्रकाशन केले. इ. स. १९२९ साली प्रा. श्रीकृष्ण व्यंकटेश पुणतांबेकर यांनी आज्ञापत्राचा इंग्रजी अनुवाद केला. इ.स. १९३७ साली पंत अमात्य बावडा दप्तराच्या पहिल्या भागात आज्ञापत्र प्रसिद्ध केले गेले. यानंतर प्रा. वामन गोपाळ ऊर्ध्वरेषे (१९३९), ब. गो. गर्गे व द्वा. वा. घाटे (१९३९), श्री. मा. कुलकर्णी (१९५०) व. दी. राव (१९५५), रा. चिं. ढेरे व प्र. शं. जोशी (१९६०) शं. ना. जोशी व ल. म. भिंगारे (१९६०), प्र. न. जोशी (१९६०), ग. ह. खरे व श्री. र. भिडे(१९६०) श्री. ना. बनहट्टी (१९६१) विलास खोले (१९८८) अशा मान्यवर अभ्यासक संशोधकांनी आज्ञापत्राची संपादने प्रसिद्ध केली आहेत. त्यांनी लिहिलेल्या अभ्यासपूर्ण प्रस्तावनामधून आज्ञापत्रांच्या विविध बाजू संशोधनात्मक रूपाने उजेडात आल्या आहेत.

२.३.४ रामचंद्रपंत अमात्य-परिचय

आज्ञापत्राचे लेखन रामचंद्रपंत अमात्य यांनी केले आहे, असे मत सध्या प्रचलित आहे. त्यांचे पूर्ण नाव रामचंद्र नीळकंठ भादाणेकर. बहुतकर या आडनावानेही त्यांना क्वचित संबोधले गेले आहे. इ. स. १६६२ मध्ये रामचंद्रपंतांचे वडील निळोपंत सोनदेव शिवाजी महाराजांचे अमात्य झाले. इ. स. १६७२ मध्ये निळो सोनदेव यांच्या मृत्यूनंतर रामचंद्रपंत अमात्य झाले.

अमात्य म्हणजे मुजुमदार. 'अमात्य स्थान् मुजमदारो'. अमा म्हणजे जवळ, अमा भवः अमात्यः। राजाच्या जवळ असणारा मंत्री, प्रधान, सल्लागार. अमात्य हा अष्ट प्रधानांपैकी एक प्रधान. प्रधानाच्या खालोखाल त्यांचे स्थान. शिवाजी महाराजांच्या काळात त्यांना बारा हजार होन वार्षिक वेतन होते. मुज्मूदार या फारशी नावास शिवाजी महाराजांनी अमात्य हे संस्कृत नाव दिले. 'अमात्य यांनी सर्व राज्यातील जमाखर्चावर देखरेख ठेवणे, राज्यातील दफ्तरदार व फडणीस यांच्यावर नियंत्रण ठेवणे. राज्याचा हिशोब तपासणे, फडणिसी व चिटणिसी पत्रावर आपले निशाण करणे' इ. कामे अमात्यांकडे असत.

राजाराममहाराजांनी रामचंद्रपंताना 'हुकूमतपन्हा' म्हणजे 'हुकूम चालविणारा' असा किताब दिला. रामचंद्रपंत अमात्यांचा मृत्यू केंव्हा झाला, हे नक्की सांगता येत नाही. त्यांची समाधी पन्हाळगडावर आहे. आज्ञापत्रात येणारा 'तुम्ही' हा शब्द रामचंद्रपंतांचा निर्देश करतो.

२.३.५ आज्ञापत्राच्या लेखनाचा हेतू

आज्ञापत्रातील दुसऱ्या प्रकरणाच्या शेवटी, ''तुम्हास राजकार्य, नीति, मर्यादा अवगत आहेत. तथापि चिरंजीव राजश्री राजकुमार राजकार्यी सुशिक्षित व्हावे व वरकड देशोदेशीं देशाधिकारी पारपत्यगार यांणी नीतीने वर्तोन राज्यसंरक्षण करावें, यास्तव स्वामींनी यथाशास्त्र राजनीति या आज्ञापत्रावरून केली आहे. ती सकल चित्तांत आणून चिरंजीव राजकुमार तदनुसार अधीन होत असे करावे'' असा उल्लेख आला आहे. यावरून असे दिसून येते की, राजकुमाराना शिवकालीन राजनीतीची जाणीव करून देऊन, प्राप्त परिस्थितीत राजाने (वा राजकुमाराने) स्वराज्यरक्षण व स्वराज्यसंवर्धन यादृष्टीने कसे आचरण ठेवले पाहिजे, कोणत्या तत्वांना अनुसरले पाहिजे यांचे सूत्रबद्ध मार्गदर्शन करण्याच्या हेतूने आज्ञापत्राचे लेखन झाले आहे.

स्वराज्यउभारणीसाठी शिवछत्रपतींनी अवलंबिलेली धोरणे, मार्ग, नीती वगैरेंचे प्रतिबिंब आज्ञापत्रात पडले आहे. शिवछत्रपतींची राजनीती व आदर्श समोर ठेवून आज्ञापत्राचे लेखन झाले आहे. आज्ञापत्रात लिहिल्याप्रमाणे शिवाजीमहाराजांनी 'केवळ नूतन सृष्टिच निर्माण केली. शिवरायांच्या या युगप्रवर्तक कार्याचे शास्त्र विद्यमान राजकुमारांसमोर वा राज्यकर्त्यांसमोर ठेवण्यासाठी आज्ञापत्र लिहिले गेले.

२.३.६ आज्ञापत्राचे स्वरूप

आज्ञापत्र हा ग्रंथ नऊ प्रकरणांमध्ये विभागलेला आहे. आता आपण प्रकरणनिहाय आशयाचे स्वरूप थोडक्यात पाहू या.

२.३.७ शिवाजी महाराजांचे राज्य व संकटांचा प्रतिकार

पहिल्या प्रकरणामध्ये शिवाजीमहाराजांच्या राज्याचे वर्णन आले आहे. पहिल्या प्रकरणाच्या पहिल्या ओळीत आज्ञापत्र कोणी, कोणास, कोणत्या कारणास्तव सांगितले व कोणत्या वर्षी लिहिले गेले, याची माहिती येते. शिवाजी महाराजांचे पूत्र राजाराम महाराज (१६७०-१७००) यांना राजसबाईपासून झालेले पुत्र दुसरे संभाजी (१६९८-१७६०) यांच्या सांगण्यावरून रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्र लिहिले. याशिवाय या प्रकरणामध्ये दुसरे शंभू छत्रपती यांच्या काळातील राज्यस्थितीचेही वर्णन येते. तसेच औरंगजेबाच्या स्वारीचे परिणामही सांगितिले आहेत.

त्यानंतर शिवाजीमहाराजांनी हे राज्य कोणत्या साहसाने व प्रतापाने निर्माण केले, याचे मोठे मार्मीक व बहारदार वर्णन केले आहे. शिवरायांनी स्वकियांशी व परकीयांशी संघर्ष करून स्वराज्य उभारले. शिवछत्रपतींच्या पराक्रमाचे वर्णन करताना आज्ञापत्रकार लिहितात, ''.... ज्या ज्या उपायें जो जो शत्रु आकळावा त्या त्या उपाये तो तो शत्रू पादाक्रांत करून सालेरी अहिवंतापासून चंजी कावेरी तीरापर्यंत निष्कंटक राज्य, शतावधि किल्ले, तसेच जलदुर्ग, कितीएक विशाल स्थळे, चाळीस हजार पागा, व साठसत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाति, कोट्यवधि खजिना, तसेच उत्तम जवाहीर, सकळ वस्तुजात संपादिले. शाणव कुळीचे मराठे यांचा उद्धार केला. सिंहासनारूढ होऊन

छत्र धरून 'छत्रपति' म्हणविले. धर्मोद्धार करून देव-ब्राह्मण संस्थानी स्थापून यजनयाजनादि षट्कर्मे वर्णविभागे चालविली. तस्करादि अन्यायी यांचे नाव राज्यांत नाहीसें केले. देशदुर्गादि सैन्यादि बंद नवेच निर्माण करून एकरूप अव्याहत शासन चालविले. केवळ नूतन सृष्टिच निर्माण केली.''

दुसऱ्या प्रकरणामध्ये संभाजी व राजाराम महाराजांच्या राजवटीत स्वराज्यावर आलेली संकटे व त्यांचा केलेला बंदोबस्त यांचे वर्णन येते. प्रकरणाच्या प्रारंभी थोरल्या संभाजीमहाराजांची कारकीर्द थोडक्यात येते. संभाजीराजांनी ''असाधारण श्रमसाहस करून औरंगझेब चालोन आला असतां युद्ध प्रसंगी त्याचे कित्येक प्रमुख सैनिक रणास आणिले, कित्येक हतदर्प करून पराङ्मुख केले. कित्येक शरणागत करून शहाजादे आदिकरून मुक्त केले.'' संभाजीराजांच्या काळात औरंगजेबाचा झालेला हल्ला व राजांनी त्याचा केलेला प्रतिकार यांचे मोजक्या शब्दात मार्मीक वर्णन आज्ञापत्रकारांनी केले आहे.

औरंगजेबाच्या हल्ल्यामुळे राज्यावर बिकट प्रसंग आला. ''संपूर्ण देशदुर्ग पादाक्रांत जाहले. राज्य असे नांव मात्र सावशेष उरलें. प्रजा अनेक क्षुद्रोपद्रवांमुळे बहुत पीडा पावली..... राजसत्ताच उडोन गेली कित्येक अनाथ होऊन गेले'' अशा शब्दात तत्कालीन आणीबाणीचे वर्णन आज्ञापत्रकारांनी केले आहे. त्यानंतर राजाराम महाराजांनी राज्यव्यवस्था सावरण्याचा केलेला प्रयत्न व त्यांची कामगिरी यांचे वर्णन येते. संभाजीमहाराजांच्या काळात औरंगजेबांबरोबरील संघर्षामुळे वाताहत झालेल्या स्वराज्याची घडी बसविण्याचा प्रयत्न राजाराम महाराजांनी केला. प्रजेस होणारा उपद्रव दूर केला. राज्याचा बंदोबस्त केला. सरकारकून, सरदार, लहानथोर सेवक यांचा यथोचित बहुमान करून त्यांचे समाधान केले. नवीन सेवक कार्यकर्ते पाहून त्यांचा गौरव केला. ''सकळांची चित्ते हाती घेऊन एकाचा एकास द्वेष करू न देता यथायोग्य यथानुक्रमे राजकार्यास प्रवर्तविले. संपूर्ण प्रजेस अभय देऊन निरुपद्रव केली. तमाम किल्लेकोटांची राहिली इमारत नवी चालीस लावून, गल्ला, दारूगोळे, बाण, हुके, भांडी इत्यादि सामान चढवून संपूर्ण देश दुर्ग सामानपूर केले..... राज्य आब्बादान केले'' असे वर्णन आज्ञापत्रकारांनी केले आहे.

यानंतर राजाराम महाराजांनी जंजिऱ्याच्या सिद्धीचा बंदोबस्त केला. त्यानंतर त्यांनी दक्षिणेकडे मोठा पराक्रम केला. राज्याच्या संकटास कारणीभूत झालेल्या सरदारांचा निःपात केला. राज्य निष्कंटक केले. सर्व दिशांच्या शत्रूंचा बंदोबस्त केला. सालेरी अहिवंतापासून चंजी कावेरीपर्यंत गेलेले राज्य परत मिळविले. विजापूर, भागानगर स्वराज्यास जोडले.

यानंतर राजारामांच्या उत्तरेकडील पराक्रमाचे वर्णन येते. राजारामांनी बऱ्हाणपूरवर हल्ला करून यवनांचा पराभव केला. औरंगाबाद, बऱ्हाणपूरादि प्रांत हस्तगत केला. ''नर्मदेपासून रामेश्वरापर्यंत स्वामींचे राज्य निष्कंटक जाहले.'' असे बखरकार म्हणतात.

पहिले व दुसरे प्रकरण प्रस्तावनावजा असून शिवाजी महाराज, संभाजी व राजाराम महाराज यांच्या कारकीर्दीची संक्षिप्त माहिती येथे येते.

२.३.८ राजकर्तव्ये

आज्ञापत्राच्या तीन ते नऊ प्रकरणामध्ये राजनीती विषयक विवेचन आलेले आहे. 'राजकर्तव्ये' या प्रकरणामध्ये राजसंस्थेची ईश्वराधीनता, राजाची कर्तव्ये, राजाची वैयक्तिक संरक्षणव्यवस्था व नित्यकर्मे, राजाने कलावंतांना द्यावयाचे उत्तेजन, बुद्धिमंतांशी सल्लामसलत, अर्थप्राप्तीविषयीची त्याची भूमिका, राजा व सेवकसंबंध, हुजराज, लोकसंग्रह, राजकुमारांचे शिक्षण, राजाची सहिष्णुता इ. विषयांसंबंधीचे सर्वसाधारण नियम आले आहेत.

'राजकर्तव्ये' या प्रकरणाच्या प्रारंभी प्रजेच्या कल्याणासाठी व धर्मरक्षणासाठी ईश्वराने राजाला हे राज्य दिले आहे, असे सांगून राजपदाचा ईश्वराशी संबंध जोडला आहे. ''प्रजेचे करुणेस्तव हे राज्य ईश्वरे दिले आहे.... राज्यमदारुढ न होता सर्वकाल अप्रमत्त होऊन प्रजेच्या हितकार्यी सादर असावे'', अशा शब्दात राजकर्तव्याची जाणीव करून दिली आहे. राजाने ''यथान्याये यथाधिकारे यथोचित सेवक लोकांचे मनोधारण करून वर्तावे'' असे म्हंटले आहे. त्यामधील 'यथान्याय, यथाधिकार व यथोचित' या शब्दांमागील सूक्ष्म तारतम्यभाव व विवेकदृष्टी महत्वाची आहे. राजाची कर्तव्ये सांगताना आज्ञापत्रकारांनी ''परंपरागत जो उत्तम, वाडवडील आचरत आले असतील तोच धर्म आचरोन जेणेंकरून कीर्तिलाभ होय तेंच करावे'' असे म्हटले आहे. राजाने धर्माचरण, प्रजापालन करीत कीर्तिमान झाले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. येथे धर्माचा पारंपरिक रूपाने हिंदू किंवा मुसलमान किंवा ख्रिश्चन धर्म असा अर्थ अभिप्रेत नाही, तर प्रजेच्या ठायी जेणेकरून परस्पर अविरोध राखला जाईल, त्या धर्माचे आचरण, असा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. ''पुष्कळांच्या प्रकृति भिन्न, त्यांस एक नियम करून संरक्षणकर्ता नसता परस्परविरोध पावून नाशातें पावतील असें न व्हावे, आपली सकल प्रजा निरुपद्रव होत्साती धर्मपथप्रवर्तक असावी, या प्रजेचे करुणेस्तव ईश्वरे संपूर्ण कृपानुग्रहे आपणांस राज्य दिले आहे.'' या विधानाचा संदर्भ या साऱ्या दंडकांना आहे. शिवाजी महाराजांचा आदर्श व त्यांची राजनीती समोर ठेवून आज्ञापत्राचे लेखन झाले आहे; हे लक्षात घेतले म्हणजे धर्माचरणाचा व्यापक अर्थ आपल्या सहज लक्षात येतो. सर्वधर्मसहिष्णुता व प्रजेचे कल्याण हे धर्माचरणामध्ये अपेक्षित आहे. शिवरायांच्या राजनीतीचे हे मुख्य सूत्र होते. याच संदर्भात ''अंध पंगु, आतुर, अनाथ, अनुत्पन्न असतील त्यांचे ठायी भूतदया धरून ते जिवंत असती जो, तों त्यांचा जीवनोपाय करून देऊन चालवीत जावे'' असे जाणीवपूर्वक म्हटले आहे. भूतदया हे व्यापक सहानुभूतीचे, मोठ्या मनाचे लक्षण आहे, राजा असाच असावयास हवा, अशी अपेक्षा केली आहे.

२.३.९ राजा आणि त्यांचे सेवक

राजाने नोकरांची नेमणूक कशी करावी, नोकरांशी कसे वागावे, यासंदर्भात अत्यंत महत्वाचे, व्यवहारज्ञानाने परिपूर्ण व सूत्रबद्ध विवेचन केलेले आहे. राजाने 'स्वशरीर संरक्षण विषयी सर्वकाळ अत्यंत सावध असावें', 'सकलांवर सारखा लोभ' ठेवावा, स्वयंपाक घर, भोजनगृह, वस्त्रालय, आदि नाजूक ठिकाणी नेमले जाणारे सेवक 'परम विश्वासू, अलालुची, प्रामाणिक', असावेत. सर्व नोकरांचे कौतुक करून त्यांना पुरेसे वेतन द्यावे. गैरकृत्य करणाऱ्या नोकरांचा शोध घेऊन 'शासनार्ह असलिया

शासन करावे'. राजाने जवळचे नोकर अत्यंत विश्वासू, व जाणकार ठेवावेत. सेवक मर्यादेत राहतील, आज्ञाभंग करणार नाहीत, लावालाव्या करणार नाहीत, निष्ठावंत राहतील, यांकडे लक्ष पुरवावे. या ठिकाणी सावधपणा, समत्वबुद्धी, कठोर शिस्त, करडी जरब हे गुण राजांच्या ठायी असावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

२.३.१० राजाचा आचारधर्म

राजाची वैयक्तिक नित्यकर्मे कशी असावीत, याचीही माहिती आज्ञापत्रकारांनी दिली आहे. राजाने भोजन आणि अल्पोपहाराच्या वेळा पाळाव्यात. 'उन्मत्त द्रव्य सर्व थैव भक्षूं नयें', राजाने सदासर्वकाळ हत्यार जवळ बाळगावे. धनुष्यबाण, बंदुकादि हत्यारे नूतन करावीत. दारूगोळा, अन्य युद्ध सामग्री, जीन, खोगीर व कापडी चिलखत यांच्या निर्मितीचे ज्ञान करून घ्यावे. कलावंत, गवई, कोल्हाटीण यांच्या नृत्यगायनाचे उत्सव होऊ द्यावेत. परंतु दरबारात ह्या बाबींना थारा देऊ नये. राजाने 'स्वतः श्रवण अवलोकन करूं नये. काय म्हणाने की, यांस चित्त आसक्त झाले नाही तोंच बरें. काही एक आसक्ति, जाहल्यानें चित्त आवरीन म्हणतां आवरले जात नाही' असे मनुष्य स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण आज्ञापत्रकारांनी नोंदवले आहे. 'व्यसन प्राप्त होऊन राजकार्ये अंतरतात' असा स्पष्ट इशाराही दिला आहे. राजाने कलावंत व गुणीजनांचा संग्रह करावा, हे सांगताना आज्ञापत्रकार म्हणतात, ''कवीश्वरामुळे कीर्ती प्रसरती .... याकरितां कवीश्वरगुणी, शास्त्रज्ञ प्रामाणिक निर्व्यसनी असे पाहून त्यांचा आपल्या सामर्थ्यानुरुप संग्रह करून त्यांचे यथायोग्य बहुमानपुरःसर चालवून ते संतोषरूप राहून स्वउद्योगांत तत्पर राहत ते करावे.'' गुणिजनाचा संग्रह करावा, हे सांगतानाच 'केवळ स्वस्तुतिप्रियता हाही दोष मोठाच आहे.' अशा शब्दात स्तुतिप्रियता व भाटांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. निर्णयप्रक्रियेपासून या लोकांना दूर ठेवावे. कारण राजकीय निर्णयातील गुप्तता राखली पाहिजे. राजाने विनोदापासून स्वतःला दूर ठेवावे. सेवकांबरोबर वगैरे विनोद करताना मर्यादा राहत नाही. 'तेव्हां आपली मर्यादा आपण उणी करून घेतली असे होते' राजाने बुद्धिमंतांशी सल्लामसलत करून ''ज्याची जी अधिक युक्ति असेल ती घेऊन जेणेंकरून योजिले कार्य सिद्धीस जाय ते करावे.'' ''कार्यभागी बुद्धिमंत असतील त्यासीं पुसावे'' असे सांगताना कार्यसिद्धीस महत्व दिले आहे. राज्याची घडी बसविण्याबरोबरच 'नित्य नूतन संपादावे'. अखंड उदयमशीलतेची कास धरावी. ''आयव्यय विचार पाहून जेणेंकरून दिवसंदिवस राज्यांत खजीना होय ते करावें. खजीना म्हणजे राज्याचे जीवन. पडले प्रसंगी खजीना असल्याने सर्व संकटाचा परिहार केला जातो. याकरिता हा अर्थ अगोदर चित्तांत आणून खजीना संग्रह करावा'' असे आज्ञापत्रकारांनी म्हटले आहे.

२.३.११ हुजुरात

हुजुरात म्हणजे राजाचे निवडक सैन्य. ''स्वशौर्यपराक्रमाचे प्रगटीकरणाचे साधन व सैन्यादि देशदुर्गाचे सरंक्षणांचे आदिकारण ते हुजुरात आहे. जे जे राजे व सेनानायक मागें होऊन गेले व वर्तमान आहेत, त्याणीं आधी हुजरात सजोन त्या बळावर पुढे साधीत साधीत विशेष जमाव मिळवले; देश

कोशा संपादिले..... ज्यांचे पदरीं हुजरात बळकट नाही ते सत्तापराधीन.'' असे सैन्याचे महत्व आज्ञापत्रकारांनी सांगितले आहे. ''जो स्वतः उद्योगी आणि शूर, ज्याशी नित्य नूतन संपादीन, ही हिंमत, त्यानें आधीं हुजरात सजावी, लष्कर, हशम आडाव, बंदुकी, तिरंदाजी करोल असा पंचरूढ जमाव ठेवावा. हुजरातील माणूस ठेवावें ते परम शूर, आस्काऱ्याचें, निवडक, निवडक, ज्याचें नाव ऐकिल्याने लष्करांत व मुलुखांत सकळही पसंत करितील.... लक्षणीक मनुष्ये एक समयावच्छेदें मिळतात असे नाही. याकरितां देशात, लष्करांत, गडांत, किल्ल्यांत, फिरतेसमयी मनुष्यांची आस्था धरून.... जेथें जे उत्तम प्रतीचे मनुष्य आढळेल ते समागमे घेऊन, माया लावून, परीक्षा करून मग हुजरातीत ठेवावे'' असे आज्ञापत्रकारांनी म्हटले आहे. सैनिकांची निवड चोखंदळपणे करण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. सैनिकांकडे सर्व प्रकारची उत्कृष्ठ हत्यारे असावीत. तलवारी, कट्यारी, दांडपट्टे, भाले, बिचवे, धनुष्यबाण, बंदुका ही हत्यारे तसेच चिलखते, दुपट्टे, बाण, हुक्के, शिरस्त्राण, दारुगोळा आदी युद्धविषयक सामग्री सदैव सज्ज ठेवावी... त्यामुळे ''आत्मसंरक्षणाची निश्चिंती होऊन इतर कार्यास बुद्धि चालते.... आपले शूरत्वाचा व उद्योगाचा अस्कारा वाढतो; शत्रू आदि करून सकलही वचक माणून हालखुद असतात. याकरितां हुजुरातीची उपेक्षा न करितां सकल राजकार्यात हे अग्रेसर कार्य असें जाणून.... हुजुरात सजवावी.''

२.३.१२ लोकसंग्रह

राजाने उत्तम मनुष्यसंग्रह करावा, यावर आज्ञापत्रकारांनी भर दिला आहे. 'जेणेकरून निखालस पणे मनुष्यसंग्रह होय ते करावें' या भूमिकेचे आग्रही प्रतिपादन केले आहे. ''झाल्या मनुष्यसंग्रहात यथाधिकारें सर्वांची भीड वागवीत जावी, पण थोरा मनुष्यास साधारण मनुष्याची बरोबरी होंऊ न देता एकाचा एकापासून उपमर्द होऊं न द्यावा. आपल्या हितकार्यावर दृष्टि ठेवून, साधारण मनुष्य आणि कार्यकर्तेही उद्योगी त्यांस नांवाजून त्यांची भीड स्वतां वागवून.... जेणेंकरून आपले हितकार्य होय ते करावे.'' असे आज्ञापत्रकारांनी म्हटले आहे. एखादा चाकर पदरी ठेवतानाही त्याची बारीकसारीक माहिती काढावी. राजाने 'परिमित बोलत जावे.' कामाशिवाय इतरांशी बोलत बसू नये. सेवकांचे दोष दुसऱ्याजवळ बोलू नयेत. ते मनात ठेवून दूर करण्याचा प्रयत्न करावा. सर्व प्रकारच्या मर्यादांचे पालन करावे, अशा प्रकारची अपेक्षा आज्ञापत्रकारांनी व्यक्त केली आहे.

२.३.१३ राजकुमारांचे शिक्षण

राजाने गुणांचा संग्रह व अवगुणांचा त्याग करावा. यासाठी राजकुमारांना चांगले संस्कारसंपन्न शिक्षण देण्याची व्यवस्था करावी. त्यासाठी अनुभवी, सभ्य शिक्षक नेमावेत. राजकुमारांकडून शास्त्राभ्यास व लेखनाभ्यास कडक शिस्तीमध्ये करून घ्यावा. 'माया धरून अभ्यासास अंतर करुं नये'. राजकुमारांचे गुणदोष समजावून सांगणारी 'सभ्यं', 'प्रामाणिक', 'विचारवंत', 'सूक्ष्मज्ञ' अशी एकदोन माणसे त्यांच्या सहवासात असावीत. त्यांनी 'वरचेवर पडले अंतरविषयी सावध करीत जावें'.

राजा सोशिक असावा. लोक नाना स्वभावाचे असतात. त्यांच्याशी शांतपणे, सुहास्य वदने संभाषण करून त्यांच्यावरील अन्यायाचे निवारण करावे.

२.३.१४ प्रधानांचे महत्त्व

सर्वसामान्यपणे राजाची कार्ये सांगताना आज्ञापत्रकार लिहितात, ''हुजरात, गड, किल्ले, लष्कर, हशम यांचा नियम करणे, प्रजार्तिनिवारण करणे, प्रजा संरक्षणें, धर्माधर्म विचारून पाहणें, यथाकालीं दान देणे, सेवक लोकांची केली वेतने पावविणें, समयाचे समयी प्रजेपासून करभार घेणे, संपादिले पदार्थांचा संग्रह करणें, नित्यानित्य राज्याचा आयव्यय पाहणे, परचक्रादि आरिष्टाचा परिहार योजणें, न्यायान्याय पाहून यथाशास्त्र शासनाचा निश्चय करून शासन करणें, देशोदेशीं वार्तिक पेरुन वर्तमान आणविणें, आहे राज्य याचे संरक्षण करून नूतन संपादणें, समयविशेषें शत्रूशीं संधिविग्रह उपेक्षा जे कर्तव्य त्याचा यथोचित विवेक करून तदनुरुप प्रवर्तन करणे, अंतःपुरादी नाजूक नियम ते यथोचित संरक्षणे,... धर्माभिवृद्धि करून शाश्वत लोक आर्जिणे इत्यादी.'' परंतु एवढे कार्य राजा व्यक्तिगतरित्या करू शकत नाही. याकरिता राज्यकारभार चालविण्यासाठी आपला प्रतिनिधी म्हणून राजाला प्रधानाची नियुक्ती करावी लागते. 'प्रधानविरहित राज्यकारभार चालणेच नाहीत' असे आज्ञापत्रकार म्हणतात.

प्रधानाचे महत्व सांगताना आज्ञापत्रामध्ये म्हटले आहे की, प्रधान म्हणजे राज्यलक्षणगृहाचे स्तंभ, नृपसत्ताप्रसारक, प्रजापालन धर्मसंरक्षणाचे अध्यक्ष, राजमदजनित अन्याय सागराची मर्यादा, हत्तीचे अंकुश, नृपाची विश्रांत, परलोकपंथाची दीपिका. राजाच्या खालोखाल प्रधानाचे स्थान कारण प्रत्यक्ष कारभारात प्रधानच दैनंदिन कामकाज पाहात असतो. तो राजाचे प्रतिनिधित्व करीत असतो. सर्व नोकरात त्याचे स्थान सर्वोच्च असते. राजाने लहान थोर राज्य कार्ये त्याचेच विचारें करावीत. 'त्याची भीड सर्वापेक्षा अधिकोत्तर वागवावी' असा दंडक राजाला घालून दिला आहे.

२.३.१५ प्रधानाचे गुण

प्रधान म्हणजे सरकारकून. ''नृप पदवीउपरी सरकारकुनाची पदवी. तदनुरुपच यथोक्त नुपगुणतुल्य सरकारकुनाचे गुण असावे. सरकारकून म्हणजे कुलीन, कार्याकार्य विचक्षण, शास्त्रज्ञ, राजधर्मविशारद पापभीरु, स्वामीसेवक भाव जाणून वर्तेत, शूर, सधैर्य, समंजय, स्फुटवक्ता, निरालस्य, निराग्रही, निर्व्यसनी, निष्पाप, पुण्यशील, उद्योगशील, कार्यसूचक, अलालुची, साम, दाम, दंड, भेद, संधि, विग्रह, मित्रसंधानादि अनेक उपायें शत्रुसंधानी चतुर इत्यादि गुणसंपन्न असे पाहून त्यांस सरकारकुनी सांगावी.'' राजाने प्रधानाचा कधीही अवमान करू नये. प्रधानाच्या एखादा दोष नजरेस आल्यास राजाने तो कौशल्याने घालवावा. त्याची कोठेही वाच्यता करू नये. राजाने प्रधानावर पूर्ण विश्वास ठेवावा. सरकारकुनास मुतालिक म्हणजे दुय्यम अधिकारी द्यावा. तो राजनिष्ठ व गुणसंपन्न असावा. असे प्रधानाचे महत्व आज्ञापत्रामध्ये सांगितले आहे.

२.३.१६ प्रधानाची कार्ये

प्रधानाने स्वामी-सेवक भावाने स्वतः वर्तन करून इतरांनाही तसे वागण्यास भाग पाडावे. 'यथाव्याय शोधून बंदोबस्त करणे; यथाशास्त्र न्यायान्याय पाहून पारिपत्य करणे,' ही प्रधानाची मुख्य कामे आहेत. राजाने संपूर्ण राज्याचा कारभार व किल्ल्यांची व्यवस्था प्रधानाच्या हाती द्यावा. सेनापतीला त्याच्या अखत्यारीत ठेवावे. प्रधान, किल्लेदार व सेनापती एकमेकांच्या विचाराने राज्यकारभार चांगला चालवितात. न्यायव्यवस्था चोख ठेवणे, अनुचित कामे करणाऱ्यांना धाकात ठेवणे व वेळप्रसंगी त्यांना शासन करणे ही प्रधानाची कार्ये आहेत. प्रजेचे पालन, धर्मरक्षण, शत्रूंचा बंदोबस्त, राज्याचे व किल्ल्यांचे संरक्षण, शास्त्राप्रमाणे न्याय, पापपुण्याचे भय मनात धरून वर्तन ही प्रधानाची कार्ये आज्ञापत्रामध्ये सांगितली आहे.

२.३.१७ साहुकाराचे महत्त्व

आज्ञापत्राच्या पाचव्या प्रकरणामध्ये सावकाराचे महत्व सांगितले आहे. ''साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा. साहुकाराच्या योगाने राज्य आबादान होते. न मिळे त्या वस्तुजात राज्यांत येतात. ते राज्य श्रीमंत होते. पडले संकटप्रसंगी पाहिजे ते कर्जवाम मिळते. तेणेंकरून आले संकट परिहारिजेते. साहुकाराचे संरक्षणामध्ये बहुत फायदा आहे. याकरितां साहुकाराचा बहुमान चालवावा''. असे सावकारांचे महत्त्व आज्ञापत्रामध्ये येते. राजाने सावकारांना व्यापारउदिम करण्यासाठी, बाजारपेठेमध्ये दुकाने काढण्यासाठी उत्तेजन द्यावे. वेळप्रसंगी सावकारांचा सन्मान करावा. ''परमुलुखी जे जे साहुकार असतील त्यांची समाधाने करून आणावे. तसे झाले नाही तर ते असतील त्या प्रांतात, त्यांचे समाधान करून, माया लावून त्यांना जागा दुकाने द्यावीत. तसेच किनारपट्टीवरील दर्यावर्दी सावकारांना बंदराबंदरामध्ये अभय पाठवून त्यांच्याशी दळणवळण ठेवावे.'' असे म्हटले आहे.

२.३.१८ परकीय व्यापाऱ्यांबाबतचे धोरण

सावकारांमध्ये पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच आणि डॅनिश असे परकीय व्यापारी असतात. परंतु ते आपल्याकडील व्यापाऱ्यासारखे नसतात. ''यांचे खावंद प्रत्येक प्रत्येक राज्यच करीत आहेत. त्यांचे हुकुमाने त्यांचे होत्साते हे लोक या प्रांती साहुकारीस येतात. राज्य कारणारास स्थळलोभ नाही असे काय घडों पाहतें? तथापि टोपीकरांस या प्रांती प्रवेश करावा, राज्यं वाढवावे, स्वमते प्रतिष्ठावी, हा पूर्णाभिमान.... त्यास ही हट्टी जात, हातात आले स्थळ मेल्यानेंही सोडावयाचे नव्हेत.'' असे सजग निरीक्षण आज्ञापत्रकारांनी नोंदविले आहे.

परकीय व्यापाऱ्यांबाबत सावध भूमिका आज्ञापत्रामध्ये घेतलेली दिसते. परकीय व्यापाऱ्यांशी यथातथाच संबंध ठेवावेत. त्यांना नेहमीसाठी जागा देऊ नये. जंजिऱ्यासमीप तों या लोकांचे येणें जाणें सहसा होऊ देऊ नये. कदाचित वखारीस जागा देणे झाली तर खाडीचे मोबारी समुद्रतीरीं न द्यावी. तसे ठिकाणी जागा दिल्याने जोपर्यंत आपले मर्यादेने आहेत तो आहेत, नाही ते समयीं आरमार, तोफा,

दारूगोळी हेच त्यांचे बळ. आरमार पाठीशी देऊन त्यांचे बळे त्या बंदरी नूतन किल्लाच निर्माण करणार तेव्हा इतके स्थळ राज्यातून गेले'' असा इशारा आज्ञापत्रकारांनी दिला आहे. या सूचनांमागील दूरदृष्टी, बारीक निरीक्षण शक्ती आणि सावधानतेची परिसीमा वाखाणण्याजोगी आहे. परीकय व्यापाऱ्यांचा राज्यलोभ व सागरी वर्चस्व ध्यानात घेता, त्यांना जलदुर्गापासून लांब खाडीमध्ये जागा द्यावी, त्या जागेवर वखारीसाठी त्यांना इमारत बांधू देऊ नये. शत्रूच्या प्रदेशावर ताबा मिळविल्यास तेथील सावकारांकडून त्यांच्या इच्छेप्रमाणे खंड घ्यावा, असे परकीय व्यापाऱ्यासंबंधी धोरण आज्ञापत्रात सांगितले आहे.

२.३.१९ वतनदार व वृत्ती

आज्ञापत्राच्या सहाव्या व सातव्या प्रकरणामध्ये वतनदार व वृत्ती यांविषयी विवेचन आले आहे. राज्यव्यवस्थापन व राज्यसंरक्षण या दोन्ही दृष्टीने हे महत्त्वाचे आहे. ''राज्यांतील वतनदार, देशमुख व देश कुळकर्णी पाटील, आदि करून यांस वतनदार म्हणावे'' अशी वतनदारांची व्याख्या केली आहे व पुढे ''हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत; आहे वतन इतकियावर कालक्रमणा करावी, सर्व देशांचा स्वामी म्हणजे राजा, त्याशी निष्ठेने वर्तावे, कोणाचा अन्याय न करावा, ही यांची बुद्धी नाही.'' त्यामुळे एकंदर राज्याचे नुकसान होते. ''नूतन संपादावें व बळकट व्हावें, बळकट झाले म्हणजे एकाचें घ्यावें, दावे दरवडे करावे हा यांचा सहज हव्यास.'' या शब्दात वतनदाराचा स्वभावधर्म सांगितला आहे. पुढे ''परचक्र आलें म्हणजे वतनाच्या आशेनें अगोदर सलूख करितात, स्वतां भेटतात, तिकडील भेद इकडे, इकडील भेद तिकडे करून राज्यात शत्रूचा प्रवेश करितात. मग तेच राज्याचे अपायभूत होऊन दुःसाध्य होऊन जातात.'' ही वतनदारांची प्रवृत्ती निःसंदिग्ध शब्दात वर्णन केलेली आहे. अर्थात असे असले तरी ''वतने बुडवावी म्हणता हा ही परत अन्याय'' असे म्हणून ''यांस स्नेह आणि दंड या दोहोंमध्ये निक्षून ठेवावे लागतात'' असा व्यावहारिक सल्ला दिला आहे. प्रामाणिक वतनदारविषयी आज्ञापत्रकार म्हणतात, ''वतनदारांमध्ये कार्यकर्ते प्रामाणिक मनुष्य असल्यास तसे सेवक मिळणे परम कठीण. आधी वतनदार हा एक विश्वास, ततोपि प्रामाणिक म्हणजे सोने आणि सुगंध, याकरितां तशांचा अत्यादरें संग्रह करावा. मेहरबानी करावी. बहुमान वाढवावा, हुजूरसेवा सांगावी; किंबहुना जें नाजूक कार्य असेल तशा कार्यावर ठेवावे.'' येथे राजकारणातील व्यावहारिकता दिसून येते.

वतनदारांप्रमाणेच वृत्तिवंतांविषयीचे धोरणही सावधपणाचे व व्यवहारवादी आहे. वृत्ति म्हणजे राजसत्ता अथवा ग्रामशासन यांजकडून मिळालेले वंशपरंपरागत निर्वाहाचे साधन. यात जमिनीची इनामे, ग्रामव्यवस्थेतील उत्पन्नाचे काही हक्क, रोख उत्पन्नाच्या वार्षिक नेमणुका इत्यादींचा समावेश होतो. ''न्याया-न्यायें दुसऱ्याचा वृत्यपहार करावा हे क्षुद्र बुद्धि सहसा धरुं नये'' असे सर्वसाधारण धोरण सांगून झाल्यावर ''नुतन वृत्ति करून देऊं नये'' कारण ''तितका महसूल वंशपरंपरेने न्यून होतो; महसूल न्यून होणें हीच राज्याची जीर्णता, तोच राज्यलक्ष्मीचा पराभव'' या शब्दात वृत्तिविषयक निश्चित भूमिका स्पष्ट केली आहे. या मागे असणारी प्रशासकीय दृष्टी भेदक आहे. ''राजास भूपति

असे भूमीकरितां म्हणावें, ते भूमीच गेल्यावर राज्य कशाचे करणार? पति कोणाचे होणार?'' हे प्रश्न खरोखर निरुत्तर करणारे आहेत. वृत्तिविषयक नियमांना ''धर्मार्थ भूमिदान देणें याचे पुण्य अनंत आहे'' हा अपवाद केला आहे.

२.३.२० दुर्ग

दुर्ग, गट, कोट, किल्ले हे शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. मध्ययुगीन काळात दुर्गांना राज्यव्यवस्थेमध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. दुर्गांचे साधारणतः सोळा प्रकार सांगितले जातात. त्यामधील गिरिदुर्ग, महीदुर्ग, जलदुर्ग, वनदुर्ग हे महत्त्वाचे आहेत. जलदुर्गांना जंजिरा असेही म्हणत असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी दुर्गाचे महत्त्व जाणून त्यांचे बांधकाम, जतन, संवर्धन, संरक्षण यासाठी विशेष लक्ष दिले. शिवरायांच्या राजनीतीचे विवेचन आज्ञापत्रामध्ये आले असल्याने एकप्रकारे शिवछत्रपतींचा दुर्गविषयक दृष्टिकोन यांमधून प्रतित होतो. किल्ल्यांचे महत्त्व सांगताना आज्ञापत्रामध्ये म्हटले आहे की, ''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उध्दस होतो. देश उध्दस झाल्यावरी राज्य असें कोणास म्हणावें?... ज्यास राज्य पाहिजे त्यांणी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गटकोड म्हणजे खजिना, गटकोट म्हणजे सैन्याचे बल, गटकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गटकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गटकोट म्हणजे आपलें प्राणसंरक्षण, असे पूर्ण चित्तांत आणून कोणाचे भरंवशावर न राहतां आहे त्याचे संरक्षण करणे; व नूतन बांधण्याचा हव्यास स्वतांच करावा.'' स्वराज्याच्या उभारणीमध्ये गटकोटांचे स्थानही आज्ञापत्रकारांनी विशद केले आहे. ''हे राज्य तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडावरूनच निर्माण केले. जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशीं स्थलविशेष पाहून गड बांधिले. तसेंच जलदुर्ग बांधिले. त्यावरून आक्रमण करीत करीत सालेरी अहिवंतापासून कावेरी तीरापर्यंत निष्कंटक राज्य संपादिले.'' औरंगजेबासारख्या महाशत्रूशी मराठ्यांनी किल्ल्यांच्या सहाय्याने तीस वर्षे लढा दिला. आज्ञापत्रकारांनी विविध उदाहरणे देऊन किल्ल्यांचे राज्यव्यवस्थेतील अनन्यसाधारण महत्त्व पटवून दिले आहे.

२.३.२१ दुर्गाधिकारी आणि दुर्गांची व्यवस्था

गटकोटांच्या संरक्षणाबाबत अत्यंत तपशीलवार माहिती आज्ञापत्रामध्ये येते. गटकोटसंरक्षणाचे कार्य फार नाजूक असते. गडावरील एखाद्या अधिकाऱ्याने फितुरी केल्यास संपूर्ण गडाला धोका पोहचू शकतो. इतकेच नाही तर राज्यासही धोका निर्माण होऊ शकतो. ''या कारणे किल्ले कोट जतन करणें ही गोष्ट सामान्य आहे असे न समजतां, तेथील उस्तवारी व शासन यांस तिळतुल्य अंतर न पडो द्यावे'' असे आज्ञापत्रकार बजावतात.

किल्ल्यावरील अधिकारी कसें असावेत, यासंदर्भात आज्ञापत्रकारांनी मार्गदर्शन केले आहे. किल्ल्यावरील हवालदार हा किल्ल्याचा जीव असतो. तसेच सरनोबत म्हणजे सेनापती; सबनीस आणि कारखानीस हे अधिकारी अत्यंत महत्त्वाचे असतात. या शीर्षस्थानी असणाऱ्या अधिकाऱ्यांची

पात्रता सांगताना आज्ञापत्रकार लिहितात, ''कबीलेदार, विश्वासू, उद्योगी, अलालुची, अनिद्रिस्त, सकल लोकांचे समाधान रक्षून यथोचित सर्वांपासून स्वामिकार्य घेत, हे स्थळ म्हणजे धन्याने ही परमप्रिय ठेवी दिली आहे, आपले प्राणान्त यास दगा होऊं नयें, असे पूर्ण चित्तांत आणून जे धन्यांनी लावून दिली मर्यादा तीस तिळांश अंतर पडों न देतां, दिवसाचा उद्योग दिवसा, रात्रीचा उद्योग रात्री, निरालस्यपणें करून सर्व प्रयत्नें स्थळ जतन करीत, असे ठेवावे.'' या बरोबरच तटसरनोबत, बारगीर, नाईकवाडी, रजपूत 'जे ठेवणे ते बरे मर्दान काबिलेदार, विश्वासू असे पाहून नजर गुजार करून ठेवीत जावे' असे आज्ञापत्रकारांनी म्हटले आहे.

किल्ल्यांवरील अधिकाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भातील धोरणही आज्ञापत्रामध्ये नमूद केलेले आहे. दर तीन वर्षांनी हवालदाराची, चार वर्षानी सरनोबतांची आणि पाच वर्षांनी सबनीस, कारखानीस यांची बदली करावी. जर किल्ल्यावरील एखाद्या अधिकाऱ्याचा सेवेत असताना मृत्यू झाला तर त्याच्या जागेवर त्याच्या वारसास नेमू नये. त्याच्या मुलाचे सांत्वन करून त्याच्या योग्यतेचे दुसरे एखादे पद द्यावे. तसेच एकाच घरातील किंवा भावकीतील दोघा-तिघांना एकाच किल्ल्यावर न नेमता त्यांना दूरदूरच्या किल्ल्यावर नेमावे. किल्ल्याखालील प्रदेशात राहात असलेल्या देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, चौगुले इ. वतनदारांना त्यांच्या वतनापासून दहा पाच गावे दूर असलेल्या किल्ल्यावर नेमावे. ''तेच वतन आणि समीपतेची सेवा जाहलियावरी चाकरीवर दुरुस्त न राहतां क्षणाक्षणा घरास जाणार, किंबहुना समयविशेषीं वतनाचे आशेने स्थळास भेद करून दगाही करणार, याकरिता किल्ल्याजवळील लोक किल्ल्यावर न ठेवावे.'' असा अत्यंत महत्त्वाचा विचार आज्ञापत्रकारांनी मांडला आहे.

दगाबाजांना शासन करण्यासंदर्भात अत्यंत कडक भूमिका घेतलेली आहे. किल्ल्यावरील एखाद्या अधिकाऱ्याने अथवा ''हरएकाने स्थळास दगा होई अशी दुर्बुद्धी धरली आहे असे वर्तमान आले तरी आधी खरे खोटे न पाहता, प्रलापावरि न घालितां, त्यास सावध होऊं न देतां, तत्क्षणीं काम हातीचे न जाय असा उपाय योजून, कोणासही कळो न देता त्यास काढून आपणाजवळ आणावे. हुजूर आलियावर रास्ती न्याय करून अन्याय खरा जाहला तर तात्काळ बेमुलाहिजा त्याचा शिरच्छेद करावा आणि तें मस्तक गडोगडी फिरवावे. असे जो करील त्यास हा नतीजा म्हणोंन दांडोरा पिटवावा. वाजवी न्याय करितां निरपराध झाला तर, त्याचें आपणांस काढून आणिलेला डाग चित्तांतून जायें असे बहुता रीतीने समाधान करावें'' अशी शासनसंहिता आज्ञापत्रामध्ये सांगितली आहे.

गडास शत्रूचा वेढा पडल्यावर शस्त्रास्त्रांच्या व रसदीच्या जोरावर गड हरतऱ्हेने लढवावा. शस्त्रास्त्रे व रसद संपल्यावर, नाईलाज झाल्यावर धन्याने (राजाने) आवश्यक त्या उपायांनी गडावरील अधिकारी व सैनिक यांचे प्राण वाचवावेत. राजाची मदत मिळत नसेल तर सर्वांनी एकत्र लढून मरावे. गडावरील सैनिकांनी कठीण प्रसंग आला तरी गड शत्रूच्या ताब्यात देऊ नये. जो अधिकारी असे करील त्याला पुन्हा कामावर ठेवू नये. एखादा अधिकारी गड शत्रूच्या ताब्यात देऊन आपला जीव वाचवून शत्रूच्या पक्षात गेला तर प्रयत्नपूर्वक त्याला पकडावे. किल्ल्यावरील शिस्तीचे महत्त्व

सांगताना आज्ञापत्रकार लिहितात, ''किल्ल्याची सेवा परम कठीण, शासन परम उग्र, शासन न करिता किल्ल्याचे काम सर्वसाधारण होऊन जाणार, असे सर्वथैव न करावे, शरीरसंबंधी, आप्तविषयी अथवा त्यांचे निसबतीचे लोक अंतर पडलिया शासन करितां आपणांस संकोच, असे लोकास किल्ल्याचे मामले सर्वथैव न सांगावे, शासनास अंतर जाहलिया दुसरियास अर्ज करावयास जागा होतो. भिडेने भीड वाढते. केली मर्यादा ते भंगते. तेच राज्यनाशाचे कारण. याकरिता मर्यादा भंग सहसा होऊ न द्यावा.''

२.३.२२ किल्ल्याची बांधणी

राज्यरक्षणामध्ये किल्ल्याचे असाधारण महत्त्व जाणून किल्ल्याची रचना, बांधणी, राखण वगैरे संदर्भात सविस्तर विवेचन आज्ञापत्रामध्ये केलेले आहे. गडाच्या जवळ दुसरा पर्वत गडापेक्षा उंच असू नये किंवा बरोबरीचा असू नये. जर असलाच तर तो सुरुंग लावून गडापेक्षा उंचीने कमी करावा. सुरुंग लावता येणे शक्य नसल्यास ती जागा मोकळी न सोडता मजबूत बांधून घ्यावी. ''तट, बुरुज, चिलखते, पाहारे, पडकोट जेथे जेथे असावे ते बरे मजबूत बांधावे.'' गडावर एक, दोन, तीन दरवाजे असावेत, तशाच चोरदिंड्या असाव्यात. गडाच्या मुख्य दरवाजापुढे बुरुज बांधावेत काही पर्वतावर एखाद्या कोनाकोपऱ्यातील उंच जागा पाहून गड बांधावा लागतो. त्याच्या दरवाजासमोरील किंवा तटाखाली मैदानासारखी जमीन असते. म्हणजे तो पर्वत उंच असूनही भुईकोटासारखा असतो. म्हणून तटाखाली खोल खंदक खणून त्याच्यापुढे पडंकोट मजबूत बांधून त्यावर लहानमोठ्या तोफा ठेवून खंदकाजवळ शत्रूसैन्य पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी. गडास येण्याचे मार्ग कठीण असावेत. तसेच अडचणीच्या वेळी चोरवाटा असाव्यात.

२.३.२३ गडाची राखण

गडाच्या रक्षणासाठी कलारग्याची झाडे असावीत. ती महत्प्रयासाने वाढवावीत. त्यातील एकही झाड तोडू देऊ नये. संकटसमयी त्या झाडीत बंदुका चालविण्यासाठी सैनिक जागरूक असावेत. गडाभोवती पहाऱ्यासाठी चौक्या असाव्यात. गडाच्या घेऱ्यात सतत पहारा असावा. गडाखाली इमारती किंवा बांधकामे असू नयेत कारण त्यात शत्रू आश्रय घेऊन गडावर आक्रमण करू शकतो.

गडावरील माणसांसाठी पाण्याची व्यवस्था अत्यंत गरजेची असते. पाण्याबाबत आज्ञापत्रकार लिहितात, ''गडावर अधीं उदक पाहून किल्ला बांधावा... आधी खडक फोडून तळी, टांकी पर्ज्यन्यकाळापर्यंत संपूर्ण गडास पाणी पुरे अशी मजबूत बांधावी. गडावरी झराही आहे, जसे तसे पाणीही पुरते, म्हणून तितकियावरीच निश्चिंती न मानावी... गडाचे पाणी बहुत जतन राखावें.''

गडावरील इमारतींच्या रचनेसंदर्भातही आज्ञापत्रामध्ये मार्गदर्शन केलेले आहे. गडावर राजवाड्याहून कोणतीही इमारत उंच असू नये. राजवाड्याच्या भिंती विटांच्या बांधून त्यांना दाट चुना लावावा. राजवाड्यावर कोठे उंदीर, विंचू, किडा, मुंगी राहतील, एवढ्यासुद्धा फटी ठेवू नयेत. राजवाड्याचे कुंपण निरगुडीसारख्या झाडाचे घालावे. गडावरील राजवाड्यात राजा सर्वकाळ नसला

तरी तेथे वहिवाट ठेवून जीवजंतू राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. गडावर राजा येत आहे असे कळताच गडावरील अधिकाऱ्याने स्वतः उभे राहून संपूर्ण इमारत सारवून रांगोळी घालून राजाचे स्वागत करावे. गडावरील धान्याची कोठारे, युद्धसामग्रीची घरे यांना अग्नी, उंदीर, किडा, मुंगी, वाळवी यांचा उपद्रव होणार नाही, याची व्यवस्था करावी. गडावर दारूगोळ्याचे कोठार राजवाड्याजवळ असू नये. राजवाड्यापासून दूर अंतरावर निरगुडीच्या झाडाचे कुंपण घालून आत बांधावे. त्यात मजबूत तळघर असावे. त्यात माल घालून त्यावर दारूगोळ्याचे साहित्य ठेवावे. त्याला ओल किंवा थंडी लागू नये.

२.३.२४ गडावरील सुसज्जता

दारूगोळ्याचे कोठार तसेच युद्धसामग्री सुसज्ज ठेवण्याची दक्षता घ्यावी. दारूगोळ्याच्या कोठाराच्या आसपास इतरांना फिरकू देऊ नये. तोफा आणि बंदुका चालविणारे कुशल सैनिक किल्ल्यावर असावेत. तटसरनोबत, बारगीर, सदरसरनोबत, हवालदार यांनाही बंदुका व तोफा चालवता आल्या पाहिजेत. गडावरील पायदळातील सैनिकांनी तलवार, भाले ही हत्यारे बाळगावीत. गडावरील असुरक्षित जागा पाहून त्या त्या जागी, गडाच्या उंच जागी त्यांना योग्य अशा लहान मोठ्या तोफा, चरक्या इ. शस्त्रे बुरजाबुरजावर टपेगुजरे पाहून ठेवावीत. दारूगोळा ठेवावयाच्या थैल्या, तोफगोळे, नदीतील लहान मोठे दगडगोटे तोफांच्या गाड्याजवळ नेहमी असावेत. लोखंडी, दगडी वस्तू, बाण पाहऱ्यात ठेवावेत. गनिमाच्या म्हणजे शत्रूच्या आक्रमणाच्या वेळीही सुसज्जता करू म्हणणाऱ्या आळशी अधिकाऱ्यावरही जबाबदारी सोपवू नये. आज्ञेचे पालन करून धन्यावर निष्ठा ठेवून जागरूकतेने राहिले तरच गडाचे संरक्षण होऊ शकते.

२.३.२५ गडाची निगा व गडावरील सेवक

गडावरील इमारतींची निगा कशी राखावी, याचेही सूक्ष्म विवेचन आज्ञापत्रामध्ये आले अहे. बुरूज, तट, पाहारे, कोट यांची वरचेवर दुरूस्ती करून ते मजबूत ठेवावेत. तटाच्या भिंतीवर उगवलेली झाडे वरचेवर खणून काढावीत. ''गडावरी झाडे जी असतील ती राखावी; याविरहित जीं जीं झाडे आहेत ती फणस, चिंचा, वड, पिंपळ, आदि करून थोर वृक्ष, निंबे, नारिंगे आदिकरून लहान वृक्ष तसेच पुष्पवृक्ष वल्ली किंबहुना प्रयोजक अप्रयोजक जे झाड होत असेल ते गडावर लावावे, जतन करावे.' अशी पर्यावरणीय सजग जाणीव आज्ञापत्रामध्ये व्यक्त झाली आहे.

गडावर सैनिकांव्यतिरिक्त इतर सेवकांचीही गरज लागत असते. म्हणून गडावर ब्राह्मण, ज्योतिषी, वैदिक, पंडित, रसायनी, वैद्य तसेच झाडपाल्याचे वैद्य, शस्त्रे दुरुस्त करणारे तज्ज्ञ, पंचाक्षरी, सैनिकांच्या जखमा बांधणारी माणसे, लोहार, सुतार, पाथरवट, चांभार अशा व्यक्तींची नेमणूक करावी. ज्यावेळी त्यांच्या कामाची गरज नसेल तेव्हा त्यांना इतर कामे लावावीत. त्यांना रिकामे ठेवू नये. गडावर युद्धसामग्री, खजीना इ.ची आवश्यकता असते. या सर्वांची जुळणी करून

ठेवावी आणि आज्ञेप्रमाणे गडाची काळजी घ्यावी. अशा गडासंबंधी समग्र माहिती आज्ञापत्रामध्ये आलेली आहे.

२.३.२६ आरमार

मध्ययुगात आरमाराचे महत्त्व ओळखून आपल्या स्वतंत्र आरमाराची उभारणी करणारे शिवाजी महाराज हे एकमेव राजे होते. आरमाराची निर्मिती हे शिवाजी महाराजांचे एक असामान्य कार्य होते. आपल्या आरमाराच्या बळावर त्यांनी सागरी किनारपट्टीवर वर्चस्व मिळवले व इंग्रज, पोर्तुगीज, फिरंग्यावर नियंत्रण ठेवले. आरमाराचे महत्त्व व आरमाराच्या व्यवस्थेसंदर्भात महत्त्वपूर्ण विवेचन आज्ञापत्रामध्ये आले आहे. ''आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. जसें ज्यास अश्वबल तसी त्याची पृथ्वीप्रजा आहे. तद्वतच ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र. याकरिता आरमार अवश्यमेव करावे.'' अशा शब्दात आरमाराचे महत्त्व अगदी सुरुवातीलाच सांगितले आहे.

आरमाराची बांधणी कशी करावी आणि आरमार सुसज्ज कसे ठेवावे, याबाबतचा विचारही आज्ञापत्रामध्ये येतो. चालीचा गुराबा म्हणजे वापरात असलेले जहाज फार मोठे किंवा फार लहान न करता मध्यम आकाराचे करून सजवावे. मोठी लढाऊ जहाजे, जी वाऱ्याशिवाय हलू शकत नाहीत, ती उपयोगाची नाहीत. अशा गलबतांवर लढवय्ये, शिपाई, तोफा, बंदुका. दारूगोळा, सुरूंग इ. आरमारासाठी आवश्यक साहित्य ठेवावे.

२.३.२७ आरमाराची व्यवस्था

आरमाराचे वेगवेगळे सुभे करावेत. प्रत्येक सुभ्यात पाच गुराबे व पंधरा गलबते असावीत. त्यांच्यावर एक सरसुभा (मुख्य सरदार) असावा. त्याच्या आज्ञेत सर्वांनी राहावे. आरमारातील सैनिकांचा पगार मुलखांत (म्हणजे जो वसूल येतो त्यातून) नेमून द्यावा. सावकारी (व्यापारी) वाढवावी. सावकारीमुळे जकातीचे उत्पन्न वाढेल. आरमारावरील सैनिकांनी समुद्रात संचार करून शत्रूला जवळ येऊ देऊ नये. जलदुर्गासाठी लागणारे साहित्य व दारूगोळा वरचेवर पोहोचेल, अशी व्यवस्था करावी. दर्यावर्दींनी सर्वकाळ शत्रूंच्या समाचाराला सज्ज राहून शत्रूचा प्रदेश जिंकावा. शत्रूच्या प्रदेशातील बातम्या गुप्तहेरांकडून जमा करून शत्रूच्या प्रदेशातून निघून जावे.

२.३.२८ व्यापारी गलबते

समुद्रात सरकारी परवाना घेऊन संचार करणाऱ्या व्यापारी जहाजांना दळणवळणाची मुभा द्यावी, असे आज्ञापत्रामध्ये म्हटले आहे. यावरून व्यापाराला प्रोत्साहन देण्याची शिवाजी महाराजांची दृष्टी दिसून येते. याबाबत आज्ञापत्रात पुढे म्हटले आहे की, परवानाधारक सावकारांच्या वाटेला जाऊ नये. त्यांना कोणाचा उपद्रव होत असेल तर तो दूर करावा. शत्रूच्या मुलखातली सावकारी जहाजे आपल्या परिसरात आली तर ती पकडून बंदरास आणावीत. सर्व माल जप्त करावा व राजाच्या आज्ञेनुसार त्यांच्याशी वर्तन करावे.

२.३.२९ आरमारी युद्ध

आरमाराची शत्रूसी गाठ पडून युद्ध सुरू झाले तर ''सर्वांनी कस्त करून एक जमून गनीमाशी झुंजावे.'' आपले गलबत वाऱ्यावर चालत नाही असे वाटले तर काहीही करून शत्रूच्या तावडीत न सापडता आपल्या जंजिऱ्याच्या (जलदुर्गाच्या) आश्रयाला जावे. आपल्या गलबताला अपाय होऊ देऊ नये. आपले संरक्षण करून शत्रू जिंकावा. शत्रू दमगीर झाला (दमला) आणि शरण येऊ लागला तर चोहोबाजूंनी तोफांचा मारा करत राहावे व दुरूनच त्याच्या शरणागतीला मान्यता द्यावी किंवा तोफांचा मारा करून त्याचे तरांडे फोडून धाक निर्माण करावा.

आरमाराची छावणी दर्याला उधाण यायच्या आठपंधरा दिवस आधी करावी. तीसुद्धा प्रतिवर्षी एकाच बंदरात किंवा जलदुर्गाजवळ किंवा उघड्यावर करू नये. प्रत्येक वर्षी एकाच बंदरात छावणी केली तर शत्रूला माहिती कळून त्याच्याकडून आगी लावल्या जातील किंवा फंदफितुरीचाही धोका होऊ शकतो. ''याकरिता आरमाराची छावणी करणे तें प्रतिवर्षी नूतन बंदरी, ज्या बंदरास मोहरी किल्ला, किल्ल्याचे दहशतीने गनीम खाडीत शिरो न शके, अथवा खाडीस खाडीत आरमाराची छावणी करावी. तेंही सारे आरमार एकाच जागी न ठेवावें.. जागां जागां छावणी ठेवावी.'' अशा महत्त्वाच्या सूचना केलेल्या अहेत.

२.३.३० आरमाराला लागणारे साहित्य

आरमारासाठी मोठ्या प्रमाणावर लाकूड लागते. आपल्या राज्यातील अरण्यातील लाकूड राजाच्या परवानगीने तोडावे. याशिवाय आणखी लाकूड लागल्यास परमुलुखातून खरेदी करून आणावे. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरून लाकडे आरमाराच्या उपयोगाची असतात परंतु त्यास हात लावू नये. ''काय म्हणोन, की ही झाडे वर्षा दोन वर्षांनी होतात असे नाही. रयतांनी ही झाडें लावून लेकरांसारखी बहुतकाळ जतन करून वाढविली. ती झाडे तोडिल्यावर त्यांचे दुःखास पारावार काय?'' यामुळे प्रजेस पीडा दिल्याचा दोष राजावर येतो. या वृक्षांच्या अभावी पर्यावरणाची हानीही होते. ''याकरितां हे गोष्टी सर्वथैव होऊ न द्यावी.'' कदाचित एखादे झाड जीर्ण झाले असेल आणि कामातून गेले असेल, तर त्याच्या मालकास त्याची किंमत देऊन त्याला संतुष्ट करून तोडावे. प्रजेवर कोणत्याही प्रकारची बळजबरी करू नये. यावरून शिवरायांचा पर्यावरणविषयक प्रगल्भ दृष्टिकोन दिसून येतो.

२.३.३१ 'आज्ञापत्रा'ची वाङ्मयीन वैशिष्ट्ये

सतराव्या शतकातील मराठी गद्याचा प्रभावी आविष्कार आज्ञापत्रामधून झालेला आहे. छ. शिवाजी महाराजांचे उत्तुंग कर्तृत्व, प्रभावी व्यक्तिमत्त्व, स्वराज्यस्थापना व स्वराज्य संवर्धनाची भूमिका, राजनीती वगैरेंचे दर्शन आज्ञापत्रामधून घडते. आज्ञापत्रामधील आखीव, रेखीव, ताशीव भाषेमधून प्रगल्भ जाणिवा, अनन्यसाधारण स्वराज्यनिष्ठा, कर्तव्यदक्ष विचार व समाजहितैषी उत्कट भावना आविष्कृत झालेल्या आहेत.

आज्ञापत्राच्या पहिल्याच प्रकरणात ''तीर्थरूप श्रीमन्महाराज शककर्ते कैलासवासी स्वामी यांणी हे राज्य साहसें व कोणं प्रतापे निर्माण केलें... केवळ नूतन सृष्टिच निर्माण केली. औरंगजेबासारखा महान् शत्रु परितापसागरीं निमग्न करून दिगंत विख्यात कीर्ति संपादिली तें हें राज्य'' अशा शब्दात शिवछत्रपतींचा सारा पराक्रम डौलदार चढ्या भाषेत वर्णन केला आहे. स्वातंत्र्याची दुर्दम्य आकांक्षा, त्या आकांक्षेपोटी केलेले अहर्निश कष्ट, त्यासाठी 'नित्यनूतन संपादावे' अशी अंतरी वागवलेली भावना यांतूनच 'केवळ नूतन सृष्टिच निर्माण झाली...'' स्वराज्याच्या उभारणीमागील भूमिका, स्वराज्याची निर्मिती व लोककल्याणकारी राजकारणाची नीती यामुळे फुलून गेलेले आज्ञापत्रकारांचे अंतःकरण नीतीयुक्त शब्दांतून व्यक्त होते. त्याचबरोबर शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाच्या हल्ल्यामुळे उद्ध्वस्त झालेल्या स्वराज्याचे दारूण चित्रण केलेले आहेत. ''राज्य असें नाव मात्र सावशेष उरले व तेही निर्मर्याद... राज्यांतील प्रजा म्हणजे तोच राज्याचा जीवनोपाय, तीच प्रजा अनेक क्षुद्रोपद्रवांमुळें बहुत पीडा पावली... राजसत्ताच उडोन गेली. कित्येक अनाथ होऊन गेले.'' या विधानातून राज्याच्या व प्रजेच्या दुरावस्थेचे, उद्ध्वस्ततेचे विषण्ण करणारे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. 'आरमार' या प्रकरणामध्ये रयतेने लावलेली झाडे तोडू नयेत हे सांगताना जसा सारा कनवाळूपणा उफाळून येतो, तसेच गडकोटच्या दगाबाज मामलेदाराचा 'बेमुलाहिजा शिरच्छेद करावा' असे कठोर शासन सांगताना आज्ञापत्रकारांची वाणी कचरत नाही. भावांदोलनाबरोबरच आंदोलित होणारे अशा प्रकारचे प्रत्ययकारी गद्य आज्ञापत्रामध्ये आढळते.

स्वराज्यसंरक्षणाच्या आत्यंतिक प्रेरणेमधून आज्ञापत्राची निर्मिती झालेली आहे. आज्ञापत्राच्या बाह्यरुपावर आणि आंतररचनेवर या प्रेरणेचे संपूर्ण नियंत्रण आहे. त्यामुळे संरक्षणाची सर्वंकष सिद्धता व चौफेर दृष्टी प्रधान, साहुकार, वतनदार, दुर्ग, आरमार या महत्त्वाच्या राज्यांगांसंबंधींच्या विवेचनातून प्रकटली आहे. या विवेचनातील तर्कशुद्धता, सूक्ष्मता व एकसंघता वाखाणण्याजोगी आहे. आज्ञापत्रामधील विवेचनाला, आशयाला तत्कालीन प्रासंगीक संदर्भ असले तरी त्या निमित्ताने जे सांगितले वा सूचित केले आहे ते शाश्वत स्वरूपाचे आहे. या लेखनास राजकारणातील अनुभवाचा स्पर्श जसा आहे, तसेच समकालीन राजकीय घडामोडींचे सजग भान आहे. स्वराज्यस्थापनेच्या उद्दिष्टानुरूप कृतिप्रवणतेची दीक्षा देणे व स्वराज्य संरक्षण व संवर्धनाची चेतना प्रज्वलीत करणे, या हेतूने आज्ञापत्राचे लेखन झालेले आहे.

आज्ञापत्रातील ऐतिहासिक तपशील शिवकाल व शिवोत्तरकाल यांमधील घटनांशी, व्यक्तींशी व वातावरणाशीं संबंधित आहे. निरंतर संघर्ष हा या कालखंडाचा स्थायिभाव आहे. संरक्षणासाठी अत्यावश्यक अशी दक्षता आणि 'नित्य नूतन संपादण्या'साठी परम आवश्यक अशी युद्धसज्जता हे या संघर्षाला जागते ठेवणारे सूत्र आहे. भूतकालीन राजकीय पार्श्वभूमीवर केलेल्या वर्तमान आणि भविष्यकालीन सावधगिरीच्या सूचना महत्त्वाच्या आहेत. उदा.

- सान्निधवासी शत्रु म्हणजे केवळ उदरांतील व्याधि
- सकल कार्यामध्ये आपकीर्तीचे भय बहुत वागवावे.

- महसूल न्यून होणे हीच राज्याची जीर्णता, तोच राज्यलक्ष्मीचा पराभव.
- यवोदरप्रमाण भूमि तीही इनाम देऊ नये.
- भिडेने भीड वाढते. केली मर्यादा ते भंगतेच. तेच राज्यनाशाचे कारण

अशा सूचनांमधून जबाबदारीची जाणीव, अखंड सावधानता, युयुत्सू वृत्ती, चिरसज्जता व्यक्त होते.

२.३.३२ सामर्थ्याची स्पंदने

सामर्थ्य हे राजनीती घडविणारे तत्त्व आहे. त्यामुळे सामर्थ्याची स्पंदने व्यक्त करणारे कोणतेही लेखन प्रायः आवेशयुक्त व गतिमान होते. शिवकालीन राजनीतीचे उत्कट, भावस्पर्शी अविष्करण करणारे आज्ञापत्रातील गद्य स्वराज्याच्या सामर्थ्याची स्पंदने दाखविणारे आहे. यादृष्टीने पुढील काही विधाने पाहता येतील-

- संपादिले पाठिशी घालून नित्य नूतन संपादावे.
- (वतनदार) हे लोक म्हणजे राज्याचे दायादच आहेत.
- गडकोट हे राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी.
- ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र.

अशी आस्मितायुक्त, सामर्थ्याची जाग आणणारी शब्दयोजना हे आज्ञापत्राचे वैशिष्ट्य आहे. निवेदनाबरोबरच भावजागृतीचे कार्य ती सहज पार पाडते.

२.३.३३ परिणामनिष्ठ लेखन

आज्ञापत्रातील लेखन परिणामनिष्ठ आहे. विचारांच्या निश्चितार्थ-प्रकटीकरणासाठी विशेषणे व गुणसमुच्चयांची मालिका योजलेली आहे. सरकारकुनाचे गुण सांगताना ''कुलीन, कृतकर्मे, कार्याकार्य विचक्षण, शास्त्रज्ञ, राजधर्मविशारद, पापभीरू, शूर, सधैर्य, समंजस, निरालस्य, निर्व्यसनी, पुण्यशील, उद्योगशील, अलालुची, चतुर इत्यादी सव्वीस विशेषणे वापरलेली आहेत. त्याचप्रमाणे राजांनी जवळ बाळगावयाचे सेवक, हुजरातीत ठेवावयाची माणसे, किल्ल्यावर ठेवायचे अधिकारी, यांच्या बाबतीतही गुणविशेषणांचा वापर केलेला आढळतो. परिणामनिष्ठ लेखनाचे दुसरे अंग म्हणून तत्त्वसूचक विधानांची रचना याकडे अंगुलिनिर्देश करता येईल. 'राजेलोकीं बहुत सोसक असावे', 'खजीना म्हणजे राज्याचे जीवन', 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग', 'साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा', 'बंदरें राहिलीं पाहिजेत', यांसारखी अनेक विधाने आज्ञापत्रात जागोजाग आढळतात. त्यातून राजनीतीबरोबरच व्यापक जीवनसत्याचेही दर्शन घडते. आज्ञापत्रकारांनी काही ठिकाणी भाषेला दिलेली उपरोधाची जोड हे परिणामनिष्ठ लेखनाचे तिसरे अंग म्हणून दाखविता

येईल. ''राज्य करणारास स्थळलोभ नाहीं असे काय घडों पाहतें?'' ''राजास भूपति असे भूमीकरितां म्हणावें, ते भूमीच गेल्यावर राज्य कशाचें करणार? पति कोणाचा होणार?' यासारख्या प्रश्नार्थक रचनेतून राजनीतितत्त्वे परिणामकारकपणे मनावर ठसतात. 'शाश्वतलोकाश्रयित', 'स्वशासनवश', 'कार्याकार्यविलक्षण', 'संग्रामसामग्रीरहित', 'कुंठितबुद्धी', 'हतधैर्य' यांसारख्या अर्थवान सामासिक शब्दांनी आज्ञापत्राच्या आशयामध्ये भर पडलेली आहे. 'यथाशास्त्र', 'यथान्वय', 'यथाधिकार', 'यथोचित' यांसारख्या यथा या पूर्वपदाने युक्त शब्दांनी अर्थाचा काटेकोरपणा सूचित होतो. 'किंबहुना', 'काय म्हणोन कीं' 'यद्यपि', 'तथापि' इ. शब्दांमुळे वाक्यांच्या अर्थव्यंजक्ततेत अधिकच भर पडते.

आज्ञापत्रातील गद्यासंबंधी विलास खोले म्हणतात, ''या लेखनातील शब्द, वाक्यप्रयोग, घटना व कल्पना सारे काही परंपरेतील सत्व घेऊन येणारे सामर्थ्य घेऊन येणारे... सारे कसे सूत्रबद्ध, रेखीव, शिस्तबद्ध. येथे पाल्हाळ अजिबात नाही. कोणत्याही अर्थाने हे लेखन सांकेतिक, निर्जीव, निःसत्व नाही; उलट नवनवोन्मेशशालिनी, सजीव व सत्व संपन्न आहे. सामर्थ्यशाली आहे. नेटके रूप घेऊन उभे आहे. अर्थवान आणि उपयुक्त. सुबद्ध, सावध शक्तीची व सामर्थ्याची उपासना करणारे, आत्मसामर्थ्याचा - आत्मविश्वासाचा डौल घेऊन येणारे, सदैव सज्ज. शिवकालीन भावविश्वाचा प्रतिध्वनी.''

२.४ वाचन, उतारा– १

दुर्ग

संपूर्ण राज्याचें सार तें दुर्ग. दुर्ग नसतां मोकळा देश परचक्र येतांच निराश्रय, प्रजाभग्न होऊन देश उद्वस होतो. देश उद्वस झाल्यावरी राज्य असें कोणास म्हणावें? याकरितां पूर्वी जे जे राजे झाले त्यांणीं आधीं देशामध्यें दुर्ग बांधून तो तो देश शाश्वत करून घेतला, आणि आलें परचक्रसंकट दुर्गाश्रयीं परिहार केलें. हें राज्य तर तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनीं गडांवरूनच निर्माण केलें. जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशीं स्थलविशेष पाहून गड बांधिले, तसेंच जलदुर्ग बांधिले; त्यावरून आक्रम करीत करीत सालेरी अहिवंतापासून कावेरीतीरापर्यंत निष्कंटक राज्य संपादिलें. औरंगजेबासारखा महाशत्रु चालून येऊन विजापूर भागानगरांसारखीं महासंस्थानें आक्रमिलीं, संपूर्ण तीस-बत्तीस वर्षेपर्यंत या राज्यांशीं अति श्रम केला, त्याचे यत्नास असाध्य काय होतें? परंतु राज्यांत किल्ले होतें म्हणून अवशिष्ट तरी राज्य राहिलें. पुढें पूर्ववत् करावयास अवकाश जाहला. या उपरहि ज्यापेक्षां राज्य संरक्षण करणें आहे, त्यापेक्षां अधिकोत्तर साधनीं स्वतां गडकिल्ल्यांची उपेक्षा न करितां, परम सावधपणें असतील त्या गडकिल्यांची यथोक्त मजबुदी करावी. नूतन देश साधणें त्या देशांत जीं स्थळे असतील ती महत्प्रयत्नें हस्तवश करावीं. ज्या देशांत गडकोट नसतील त्या देशांत आपले राज्याचे सरहद्दीपासून पुढें जबरदस्तीने नूतन स्थळे बांधीत बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळांचे आश्रयीं सेना ठेवून पुढील देश स्वशासनें वश करावा. असें करीत करीत राज्य वाढवावें, गडकोटाचा आश्रय नसतां फौजेच्यानें परमुलखीं टिकाव धरून राहवत नाहीं. फौजेविरहित परमुलखीं

प्रवेश होणेंच नाहीं. इतक्याचें कारण ते गडकोटविरहित जें राज्य त्या राज्याची स्थिति म्हणजे अभ्रपटलन्याय आहे. याकरितां ज्यांस राज्य पाहिजे त्यांणीं गडकोट हेंच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचें मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचें बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळें, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपलें प्राणसंरक्षण, असें पूर्ण चित्तांत आणून कोणाचे भरंवशावर न राहतां आहे त्याचें संरक्षण करणें; व नूतन बांधण्याचा हव्यास स्वतांच करावा, कोणाचा विश्वास मानू नये.

किल्ल्यांची बांधणी

राज्यरक्षणाचें मुख्य कारण किल्ले, ते देशोदेशीं स्थळें पाहून बांधावे. किल्ल्यासमीप दुसरा पर्वत किल्ल्यासमुदायीं असूं नये. कदाचित् असला तरी सुरंग लावून पाडून गडाचे आहारीं आणावा. सुरंगास असाध्य असा असला तरी तोहि जागा मोकळी न सोडितां बांधून मजबूत करावा. गडाची इमारत गरजेची करूं नये. तट, बुरुज, चिलखतें, पाहारे, पडकोट जेथें जेथें असावे ते बरे मजबूत बांधावे, नाजूक जागे जे असतील ते सुरंगादि प्रयत्नें करून, अवघड करून, पक्की इमारत बांधोन गडाचा आयब काढावा. दरवाजे बांधावे, ते खालील मारा चुकवून, पुढें बुरुज देऊन, येतिजाती मार्ग बुरुजाचे आहारीं पडोन दरवाजे बांधावे. किल्ल्यास एक दरवाजा थोर आयब आहे, याकरितां गड पाहून, एक दोन तीन दरवाजे, तशाच चोरदिंड्या करून ठेवाव्या. त्यामध्ये हमेशा राबत्यास पाहिजे तितक्य ठेवून वरकड दरवाजे व दिंड्या चिणून टाकाव्या. इमारतीवरील मामलेदार वगैरे आदिकरून ठेवणें ते बरे शहाणे, कृतकर्मे निरालस्य पाहून ठेवावे. गडाची इमारत मुस्तेद करावी. कित्येक किल्ले प्रत्येक पर्वताचे आहेत. कित्येक पर्वत थोर थोर, त्याचा एखादा कोन कोपऱ्याची जागा पाहोन बांधावा लागतो. त्यास दरवाजापुढें अथवा तटाखाली मैदानभूमि लागते, म्हणजे तो गड भुईकोटांत दाखल जाहला. आला गनीम त्यांनी दरवाजास अथवा तटास लागावें असें होतें, ही गोष्ट बरी नव्हे. याकरितां या जातीचा किल्ला असेल त्यास आधीं सर्व प्रयत्नें दरवाज्यापुढें तटाखालीं जितकें मैदान असेल तितका खंदक खोल आणि रुंद खणून तटाचे पायीं दुसरा पडकोट मजबूत बांधोन त्यावर भांडीं, जुंबरे ठेवून, खंदकाचे कडेस एकाएकीं परकी फौज येऊन न पावे असे करावें. गडास यावयाचे मार्ग असतील ते सुगम नसावे. सुगम असेल तर ते मार्ग मोडून त्यावर झाडी वाढवून आणखी कडे परके फौजेस येतां कठीण असे मार्ग घालावे. याविरहित बलकुबलीस चोरवाटा ठेवाव्या. त्या सर्वकाळ चालू देऊं नयेत. समयास तेच खिंडी अथवा दरवाजाचा राबता करून सांजवादा चढवीत जावा.

उतारा–२

आरमार

आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. जसें ज्यास अश्वबल तसी त्याची पृथ्वीप्रजा आहे, तद्वतच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र, याकरितां आरमार अवश्यमेव करावें. चालीच्या गुरावा बहुत थोर ना बहुत लहान, ऐशिया मध्यरीतीनें सजाव्या. तशींच गलबतें करावीं. थोर बहुत वारसे जागांत जें वाऱ्याविणें प्रयोजनाचेच नव्हे असें करावयाचें प्रयोजन नाहीं. कदाचित् एक दोन सलाबतीमुळें केलें

तरी जें आरमार करावें त्यावर मर्दानी मारक माणूस, भांडीं, जंबुरें, बंदुका, दारूगोळी, होके आदिकरून आरमारी प्रयोजनी सामान यथेष्ट बरें सजुतें करावें.

आरमारास तक्ते, सोंट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लांकडें असावीं लागतात. आपले राज्यांत अरण्यांत सागवानादि वृक्ष आहेत त्यांचें जें अनुकूल पडेल ते हुजूरचे परवानगीनें तोडून न्यावें. याविरहित जें लागेल तें परमुलखींहून खरेदी करून आणवीत जावें. स्वराज्यांतील आंबे, फणस आदिकरून हेही लांकडें आरमाराच्या प्रयोजनाचीं, परंतु त्यांस हात लावूं देऊं नये. काय म्हणोन, कीं, हीं झाडें वर्षां दोन वर्षांनीं होतात असे नाही. रयतांनी हीं झाडें लावून लेंकरांसारखीं बहुत काळ जतन करून वाढविलीं. तीं झाडें तोडिल्यावर त्यांचें दुःखास पारावार काय? एकास दुःख देऊन जें कार्य करीन म्हणेल तें कार्य करणारासहित स्वल्पकाळाचें बुडोनं नाहींसेंच होतें; किंबहुना धनियाचे पदरीं प्रजा पीडण्याचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावें हानिही होते. याकरितां हे गोष्टी सर्वथैव होऊं न द्यावी. कदाचित् एखादें जें झाड बहुत जीर्ण होऊन कामांतून गेलें असलें तरी त्याचे धन्यास राजी करून घेऊन द्रव्य देऊन त्याचे संतोषें तोडून न्यावें. बलात्कार सर्वथैव न करावा.

२.५ शब्दार्थ व टीपा

अखत्यार - सत्ता, अधिकार, **अनर्गल** - स्वच्छंदी, उच्छृंखल, **अनुपदे** - मागोमाग, लगेच, **अप्रमदत्त** - सावध, **अमरदफ्ती** - दळणवळण, **अमीन** - विश्वासू अधिकारी, **अलालुची** - निर्लोभी, **अस्करा (अस्कारा)** - दरारा, लौकिक, **आकळावा** - जिंकावा, ताब्यात घ्यावा, **आयब** - दोष, व्यंग, **इस्ताद** - युद्धसामग्री, **उत्पाती** - साहसी, **उपरा** - उंचवटा, **उपराळा** - मदत, **एल्गार** - मोहीम, चढाई, **कठारा** - कट्यार, **कबिला** - बायका-मुले, कुटुंब, **कमरग्याची (कलारग्याची) झाडी** - पर्वताच्या मध्यभागाच्या पुढे आलेल्या भागातील झाडी, **करोळ** - बंदुकस्वार, **कसाला** - संकट, दुःख, **कस्त** - श्रम, कष्ट, **कौल** - अभय, अभयवचन, **कृतकर्मे** - अनुभवी, **खलित्या** - थैल्या, **गज** - बंदुकीत दारू ठासण्याची लोखंडी कांब, **गडवई** - एक प्रकारचे तारू, **गुल्म** - मुख्य जागा, आश्रयस्थान, **चौगीर्द** - चारी बाजूस, **जखिरियाचे** - साठ्याचे, पुरवठ्याचे, **जंबुरा** - लांब नळीची तोफ, **तट सरनोबत** - तटसंरक्षक, **तनखा** - पगार, **तरांडे** - मोठे जहाज, **दमानी घालून** - दमवून, **दांडोरा** - दवंडी, **दुराव्या** - तोफा, **दायाद** - वाटेकरी, वारस, भाऊबंद, **देवतायतने** - देवालय, **निस्बत** - योग्यता, संबंधी, **पदाति** - पायदळ, **परचक्र** - परकीय सैन्य, शत्रूचे सैन्य, **परितापसागरी** - दुःखाच्या समुद्रात, **परिहार** - निवारण, **पाळेगार** - बंडखोर, सरदार, **प्रजार्तिनिवारण** - प्रजेचे संकटनिवारण, **फरासिस** - फ्रेंच लोक, **फिरंगी** - पोर्तुगीज लोक, **फिलनाळा** - हत्तीवरील तोफा, **मिरास** - वंशपरंपरा वतन, **मुलाइजा** - पर्वा, **मोईन** - वार्षिक नेमणूक, **मुशाहिरा** - नक्त नेमणूक, **मोबार** - ओलांड्याची जागा, खाडीचे तोंड, **वलंदेज** - डच लोक, **वार्तिक** - बातमीदार, हेर, **विषमसंधि** - प्रतिकूल परिस्थिती, **शामल** - शिद्दी, हबशी, **शिलेदार** - स्वतःचे घोडे व शस्त्र घेऊन लढणारा, **संभावित** - श्रेष्ठ, थोर, **सदर** - कचेरी, **सुभा** - सरदार, वजीर, **हशम** - पायदळ,

हुकुमतपन्हा - हुकुमांचे आश्रयस्थान (रामचंद्र अमात्यांचा हुद्दा), **हुजरात** - राजाचे खास पगारी सैन्य, **हुडे** - बुरुज, तट, किल्ले, **क्षत्रिय कुलावतंस** - क्षत्रियकुलाचे शिरोभूषण, छत्रपतींनी घेतलेले बिरुद, **हुन्नर** - कला, युक्ती,

टीपा

राज्याभिषेक शके ४२ - शिवाजी महाराजांनी ६ जून १६७४ रोजी स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. यानिमित्ताने 'राज्याभिषेक शक' सुरू करून स्वतंत्र कालगणना सुरू केली. तेंव्हापासून ४२ वर्षे म्हणजे इ.स. १७१५ साली आज्ञापत्राच्या लेखनाची आज्ञा झाली. **साहुकार** - सावकार, मोठा व्यापारी, **सरनौबत**- सैन्याचा प्रमुख, **हवालदार** - विविध विभागांचे अधिकारी, **कारखानीस** - कारखान्यातील सामग्री-संभाराची व्यवस्था पाहणारा, **तटसरनोबत** - गडाच्या तटाची संरक्षणव्यवस्था पाहणारा सेनाप्रमुख, **बारगीर** - ज्याला राजाने घोडा वापरायला दिला आहे, असा घोडेस्वार शिपाई, **नाईकवाडी** - पायदळातील तुकडीचा प्रमुख, **चौगुला** - पाटलापेक्षा कनिष्ठ असा गावचा अधिकारी, **दहा टक्क्यांचा प्यादा** - पायदळातील अखेरच्या श्रेणीचा अधिकारी

२.६ समारोप

शिवकालीन राजनीतीचे सुत्रबद्ध विवरण करणारा 'आज्ञापत्र' हा मराठीतील एक महत्त्वाचा गद्यग्रंथ आहे. आज्ञापत्रामधून शिवरायांच्या राजनीतीबरोबरच मध्ययुगीन मराठी गद्याचे दर्शन घडते. रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्राचे लेखन केले, असे मानले जाते. आज्ञापत्राच्या नऊ प्रकरणांमधून राजनीतीचे निरुपण केलेले आहे. या राजनीतिनिरुपणाची तीन प्रमुख अंगे आहेत-

१) सर्वसामान्य प्रशासकीय व्यवस्था : यात राजकर्तव्ये, प्रधानांची कर्तव्ये, राजा-प्रधान संबंध आणि वतन-वृत्तिविषयक संबंध यांचा समावेश होतो.

२) अर्थव्यवस्था : खजीना, महसूल आणि सावकार यांविषयीचे नियम

३) संरक्षणव्यवस्था : हुजरात, दुर्ग, आरमार यांविषयीचे दंडक.

या तीन प्रमुख राज्यांगामधून शिवकालीन राजनीतीबरोबरच काही शाश्वत स्वरूपाची तत्त्वे व्यक्त झाली आहेत. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्यानिमित्ताने 'नूतन सृष्टिच' कशी निर्माण केली व पुढे संभाजी महाराज व राजाराममहाराज यांनी स्वराज्याचे संरक्षण कसे केले, याची माहिती पहिल्या व दुसऱ्या प्रकरणामध्ये येते. राजाची कर्तव्ये, राजाचे गुण, राजा आणि सेवक संबंध, राजा आणि बुद्धिमंत-कलावंत संबंध, लोकसंग्रह, राजकुमारांचे शिक्षण, आदींची माहिती 'राजकर्तव्ये' या प्रकरणामध्ये येते. 'प्रधान' या प्रकरणात प्रधानाचे महत्त्व, प्रधानाचे गुण, प्रधानाची कर्तव्ये, राजा-प्रधान संबंध आदींचे विवेचन येते. 'साहुकार' या प्रकरणामध्ये सावकार म्हणजे व्यापाऱ्यांचे महत्त्व व सावकारासंबंधी धोरण यांची माहिती येते. 'वतनदार' आणि 'वृत्ती' या प्रकरणामध्ये वतनदारी प्रथेचे दुष्परिणाम कथन करून वतने देऊ नयेत, याची सकारण मांडणी केलेली आहे. मध्ययुगीन काळात

राज्यव्यवस्थेत व संरक्षण व्यवस्थेत अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या दुर्गांचे महत्त्व, किल्ल्यांची रचना, बांधणी, अधिकाऱ्यांच्या नेमणुका, किल्ल्यावरील संरक्षणव्यवस्था, निगा, सामग्री आदींचे सूत्रबद्ध विवेचन 'दुर्ग' या प्रकरणामध्ये आले आहे. 'आरमार' या शेवटच्या प्रकरणामध्ये 'आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच... ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र' अशा शब्दात आरमाराचे महत्त्व विशद केले आहे. मध्ययुगामध्ये आरमाराची उभारणी करणारे शिवाजी महाराज हे एकमेव राजे होते, हे लक्षात घेतले म्हणजे शिवरायांची संरक्षणविषयक समग्र सिद्धता, दूरदृष्टी व सागरी वर्चस्व मिळवून स्वराज्याचा विस्तार करण्याची भूमिका यांचा प्रत्यय येतो. आरमाराचे महत्त्व, आरमाराची व्यवस्था, गलबते, आरमारी युद्ध, आरमारी छावणी, आरमारास लागणारे साहित्य आदींचे विवेचन येते. शिवरायांच्या राज्यकारभाराचे दर्शन घडविणारा अधिकृत दस्तऐवज म्हणून 'आज्ञापत्रा'चे महत्त्व खूप मोठे आहे. त्याचबरोबर राजकारणासारख्या गंभीर विषयाचेही सूत्रबद्ध, आटोपशीर, डौलदार, परिणामकारक, भाषेत निवेदन करणारा ग्रंथ म्हणून 'आज्ञापत्र' अभ्यसनीय आहे.

२.७ नमुना प्रश्नोत्तरे

■ वस्तुनिष्ठ प्रश्न

अ) बहुपर्यायी प्रश्न

१. राजाने सकल कार्यामध्ये कशाचे भय बहुत वागवावे?

अ) शत्रूचे ब) युद्धाचे क) पराभवाचे ड) अपकीर्तीचे

२. आज्ञापत्रामध्ये राज्यलक्षणगृहाचे स्तंभ कोणास म्हटले आहे?

अ) राजा ब) प्रधान क) सरनोबत ड) साहुकार

३. राज्याची व राजश्रीचा शोभा, असे कोणास म्हटले आहे?

अ) प्रधान ब) साहुकार क) मुतालिक ड) राजा

४. आज्ञापत्रकारांच्या मते, संपूर्ण राज्याचे सार कोण?

अ) आरमार ब) दुर्ग क) खजीना ड) राजा

५. आज्ञापत्रकारांनी एक स्वतंत्र राज्यांग म्हणून कशास संबोधले आहे?

अ) आरमार ब) घोडदळ क) पायदळ ड) दारूगोळा

उत्तरे : १) अपकीर्तीचे, २) प्रधान, ३) साहुकार, ४) दुर्ग, ५) आरमार

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

- आज्ञापत्रामध्ये राजा, प्रधान, साहुकार, यांच्या संदर्भात कोणते विवेचन केले आहे ते लिहा.

उत्तर : विषय विवेचन मधील मुद्दा क्र. २.३.८ ते २.३.१८ मधील आशयाचे विवेचन उत्तरासाठी अपेक्षित आहे.

क) लघुत्तरी प्रश्न

- आज्ञापत्राची वाङ्मयीन वैशिष्ट्ये सांगा.

उत्तर : विषय विवेचनासाठी २.३.३१ ते २.३.३३ मधील आशयाचे थोडक्यात लेखन उत्तरासाठी अपेक्षित आहे.

२.८ सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

- आज्ञापत्राचे स्वरूप विशेष स्पष्ट करा.

ब) लघुत्तरी प्रश्न

- आज्ञापत्रामध्ये किल्ल्यांचे महत्त्व व किल्ल्यांच्या बांधणीसंदर्भात कोणते विचार व्यक्त झाले आहेत ते लिहा.

२.९ उपक्रम

शिवाजी महाराजांच्या राजनीती तत्त्वाचे आज्ञापत्राच्या आधारे संकलन करा.

२.१० अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. खोले विलास (संपा.) आज्ञापत्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९८८.

२. बनहट्टी श्री. ना. (संपा.) आज्ञापत्र, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर व पुणे १९७४.

३. कोलते वि. भि – राजनीती अमात्यांची कशी? कुलकर्णी श्री. मा. (संपा.), आज्ञापत्र, वीणा प्रकाशन, नागपूर १९३९.

४. राव व. दी (संपा.) आज्ञापत्र, राजवाडे संशोधन मंडळ, धुळे १९५५.

५. ढेरे रा. चिं., जोशी प्र. पं. (संपा.) – आज्ञापत्र, वोरा आणि कंपनी पब्लिशर्स, प्रायव्हेट लि. मुंबई १९६०

❑❑❑

सत्र १ : घटक ३

(विभाग ३ Module III)

हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ

भालचंद्र नेमाडे

३.१ उद्दिष्टये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

- 'एका लेखकाचा अभ्यास' या अभ्यासपद्धतीचा परिचय होईल.
- लेखक भालचंद्र नेमाडे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आणि त्यांचा समकाल समजून येईल.
- भालचंद्र नेमाडे यांच्या कादंरीलेखनाचे स्वरूप विशेष सांगता येतील.
- 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीचा आशय व वाङ्मयीन वैशिष्ट्ये सांगता येतील.
- मराठी वाङ्मयीन परंपरेमध्ये भालचंद्र नेमाडे यांचे योगदान समजून येईल.

३.२ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो, भालचंद्र नेमाडे हे मराठी वाङ्मयातील महत्त्वाचे लेखक असून स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आघाडीचे कादंबरीकार, कवी व समीक्षक अशी त्यांची ख्याती आहे. 'कोसला', 'बिढार', 'जरीला', 'हूल', 'झूल' आणि 'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबऱ्या लिहून एक सशक्त देशीवादी कादंबरीकार म्हणून त्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. या सर्वच कादंबऱ्या बहुचर्चीत व वाचकप्रिय ठरल्या. कादंबरीखेरीज त्यांनी 'देखणी' सारख्या काव्यसंग्रहातून आशयघन अशा कविता लिहिल्या. समीक्षक म्हणून 'देशवादा'ची मांडणी करून मराठी समीक्षेला भरीव स्वरूपाचे योगदान दिले. अशा त्यांच्या चतुरस्र वाङ्मयीन कामगिरीमुळे त्यांना सन २०१५ साली ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले.

'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीच्या माध्यमातून एक लेखक म्हणून भालचंद्र नेमाडे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास तसेच समकालास हा लेखक कसा प्रतिसाद देतो, याचा अभ्यास आपण प्रस्तुत घटकामध्ये करणार आहोत.

३.३ विषय विवेचन :

विद्यार्थी मित्रांनो, साधारणपणे लेखक अभ्यासपद्धतीत पुढील मूल्यनिकष विचारात घ्यावे लागतात- लेखकाचा जीवनानुभव, लेखकाचे व्यक्तिमत्त्व, लेखकाचा समकाल, लेखकाची लेखनप्रवृत्ती, लेखकाचा मूल्यात्म दृष्टिकोण, लेखकावरील प्रभावाचे स्वरूप, समकालीन वाङ्मयीन वातावरण समजावून घेणे, लेखकाचे अनुभवविश्‍व, लेखकाचे योगदान, वाङ्मयेतिहासातील लेखकाचे स्थान शोधणे इत्यादी. अशा निकषांआधारे लेखकाच्या साहित्यकृतींची चिकित्सा अपेक्षीत असते.

या अनुषंगाने 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ'च्या आधारे लेखक भालचंद्र नेमाडे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास आपणास करावयाचा आहे. भालचंद्र नेमाडे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेण्यापूर्वी 'वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व' ही संकल्पना समजावून घेवूया.

३.३.१ वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची संकल्पना

'व्यक्तिमत्त्व' या मराठीतील शब्दास इंग्रजीत Personality असे म्हणतात. त्याचे मूळ लॅटीन भाषेतील Persona या शब्दात आहे. रोम आणि ग्रीक रंगभूमीवर अभिनय करणाऱ्या नटाच्या मुखवट्यास (Mask) Persona म्हटले जाते. प्रत्येक व्यक्तीच्या अंतरंगात वैशिष्ट्यपूर्ण गुणांचा संच आढळून येत असल्याने एखादी व्यक्ती दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीहून भिन्न आढळते. या अर्थाने प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र असे व्यक्तित्त्व असते. ज्या व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण विकास होतो, अशा व्यक्ती आपापल्या क्षेत्रात असामान्य असे कर्तृत्त्व गाजवितात आणि समाजामध्ये आपल्या उदाहरणाने आदर्श म्हणून प्रस्थापित होतात. अशा व्यक्तींनी आपल्या अंतःकरणातील 'स्व'चा शोध घेतलेला असतो. समाजातील अशा श्रेष्ठ समाजसुधारक, संत-महात्मे, कवी-लेखक, तत्त्वचिंतक, वैज्ञानिक या सर्वांनी आपापल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास प्रयत्नपूर्वक घडविलेला असतो. नॉर्मन मन यांनी केलेली व्यक्तिमत्त्वाची व्याख्या अशी - व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तीची शरीररचना, वर्तनविशेष, अभिरूची, अभिवृद्धीक्षमता, योग्यता आणि अभिक्षमता वांचे वैशिष्ट्यपूर्ण संघटन होय. अर्थात व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना मानसशास्त्रज्ञांनी व्यक्तीच्या बाह्यांगापेक्षा त्याच्या अंतरंगास अधिक महत्त्व दिले आहे. व्यक्तीच्या अंतरंगात व्यक्तीची 'अभिरूची', 'आवड', 'कल', 'प्रेरणा', 'आविष्कार', 'प्रतिक्रिया', 'भावना', 'विशेष क्षमता', 'वर्तनविशेष' इत्यादी अनेक घटकांचा समावेश होतो.

व्यक्तिमत्त्वाचे रूढार्थाने तीन प्रकार सांगता येतात. लौकिक व्यक्तिमत्त्व, अलौकिक व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व. सामान्यपणे प्रत्येक व्यक्ती समाजात विशिष्ट नीतीनियमांच्या चौकटीत कार्यरत असते त्यामुळे अशा समाजाच्या रूढ नीतीनियमांचे पालन करून प्रगती करू इच्छिणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व हे लौकिक व्यक्तिमत्त्व होय. अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्ती लौकिक जीवन जगत असतानाही अलौकिक, लोकोत्तर अशा प्रकारचे कार्य करतात. अशा व्यक्ती समाजात आपल्या व्यक्तिमत्त्वाने वेगवेगळ्या क्षेत्रात आदर्श निर्माण करतात. 'वाङ्मयन व्यक्तिमत्त्व' हा व्यक्तिमत्त्वाचा

तिसरा प्रकार होय. एखादी संवेदनशील व्यक्ती स्वतःला ओळखण्याच्या आधी आत्मप्रकटीकरणाचा प्रयत्न करत असते. हे आत्मप्रकटीकरण आणि आत्माविष्कार करण्याच्या त्यांच्या प्रयत्नात कधीकधी चांगल्या अथवा श्रेष्ठ कलाकृती निर्माण होण्याची शक्यता असते. श्रेष्ठ वाङ्मयकृतीत कलावंताचे वैशिष्ट्यपूर्ण आत्मप्रकटीकरण किंवा आत्माविष्कार आढळून येत असतो. त्याच्या सर्जनशील व्यक्तिमत्त्वातील वैशिष्ट्यपूर्ण गुण वैशिष्ट्यांच्या समुच्चयाचे प्रतिबिंब त्याने निर्माण केलेल्या वाङ्मयीन कलाकृतीत उमटत असते. अशा प्रतिभासंपन्न कलावंताची विशिष्ट अशी वैचारिक भूमिका आणि स्वतंत्र जीवनदृष्टी असते. त्याची शैली, अभिरूची, रसिकता, जीवनाचे सम्यक आकलन, त्याने जपलेल्याा श्रद्धा, स्वीकारलेली मूल्ये यांचा अभ्यास केल्यास त्याच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेता येतो. अलिकडच्या काळात डॉ. अनिल गवळी (सर्वात्मभावी तुकाराम) यांनी तुकारामांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेतला आहे.

वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व ही संकल्पना चरित्र लेखनाहून सर्वस्वी भिन्न ठरते. परंतु या दोन्ही संकल्पनांमध्ये बरेचसे साम्य आढळते. या दोन्ही संकल्पनांमधील आशय व्यक्ती भोवती केंद्रित होतो. परंतु या दोन्ही संकल्पनांचे उद्दिष्ट वेगवेगळे असते. चरित्रात व्यक्तिजीवनातील घटना, प्रसंग, त्याचा स्वभाव, त्याचे इतरांशी असलेले संबंध, त्याचे विविध क्षेत्रातील कार्य या गोष्टी येतात. तर वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेताना त्या व्यक्तीचा मनःपिंड, त्याची स्वभाववैशिष्ट्ये, त्याचे व्यक्तित्त्व या सर्वांचे वाङ्मयाच्या आधारे विश्लेषण करावे लागते. हा शोध मानसशास्त्र, समाजशास्त्र, नीतीशास्त्र या शास्त्रांच्या साहाय्याने घेता येतो. मनात, अंतरंगात प्रवेश करून त्या त्या परिस्थितीतील त्याचे वर्तन, कृती आणि प्रतिक्रियांमधील व्यक्तिमानसाचा शोध घ्यावा लागतो. आधी त्या व्यक्तीला त्याच्या वाङ्मयातून समजून घेणे हीच वाङ्मयीन व्यक्तित्त्वशोधाची पूर्व अट असते. चरित्रलेखनात व्यक्तीचे जीवनदर्शन येत असले, तरी त्याचा वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व हे त्या व्यक्तीच्या वाङ्मयाच्या अभ्यासातूनच समजून घ्यावे लागते. केवळ शब्दरचना म्हणजे वाङ्मय नव्हे तर वाङ्मयातून लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रकटीकरण होत असते. लेखकाचे अव्यक्त व्यक्तिमत्त्व त्याच्या भाषिक कृतीद्वारे व्यक्त होते.

श्रेष्ठ प्रकारची साहित्यनिर्मिती करणाऱ्या प्रतिभावंत कलावंताचे व्यक्तिमत्त्व बहुरंगी, बहुढंगी असते. त्याच्या कलाकृती ह्या स्थळ, काळ, संस्कृती यांच्या कसोटीवर टिकलेल्या असतात. वाङ्मयीन क्षेत्रात तर त्यांच्या कृतींचा दबदबा होतोच, परंतु सामाजिक, आध्यात्मिक, राजकीय, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रातही ह्या कलाकृतींनी वेगळे स्थान निर्माण केलेले असते. तेव्हा अशा थोर वाङ्मय निर्माण करणाऱ्या वाङ्मयीन व्यक्तित्त्वांचा अभ्यास करणे हा कलाव्यवहाराचा अपरिहार्य भाग होतो. उदा. मराठी साहित्यातील संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, महात्मा फुले, केशवसुत, बा. सी. मर्ढेकर, शरच्चंद्र मुक्तिबोध, साने गुरूजी, नारायण सुर्वे, भालचंद्र नेमाडे, नामदेव ढसाळ, भाऊ पाध्ये इत्यादी साहित्यिकांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे, हे मराठी वाङ्मयव्यवहारात गरजेचे ठरू शकते. येथे आपणास भालचंद्र नेमाडे यांना एक लेखक म्हणून समजून घेताना त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा विचार करावा लागेल.

३.३.२ भालचंद्र नेमाडे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व

सन १९६० नंतरच्या काळातील महत्त्वाचे कादंबरीकार अशी नेमाड्यांची ओळख असली तरी त्यांनी तितकीच सकस अशी कविता आणि समीक्षालेखनही केले आहे. त्यांच्या कादंबऱ्यांमधील पांडुरंग सांगवीकर, चांगदेव पाटील, नामदेव भोळे या व्यक्तिरेखांमधून आपणास भालचंद्र नेमाडे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेता येतो. या नायकांची प्रतिसृष्टी निर्माण करून समकालीन समाजव्यवस्थेला धक्के देण्याचा नेमाडे यांचा प्रयोग बऱ्याच अंशी यशस्वी झाला. सांगवीकर, पाटील, भोळे या नायकांची परात्मता नेमाडे स्वतः अनुभवत होते. समाजातील सरंजामशाही वृत्ती, दांभिकता, अप्रामाणिकपणा, स्वार्थलोलुपता, पैसा हेच श्रेष्ठ मूल्य मानण्याची माणसाची वृत्ती याबद्दल त्यांना असणारी चीड त्यांच्या नायकांमध्येही दिसून येते.

'देखणी' कविता संग्रहातून जीवनातील दुःखाची लय त्यांनी अचूकपणे व्यक्त केली. मानवी जीवनातील क्षणभंगूरता, मृत्यू आणि निरर्थकतेविषयीचे मूलभूत चिंतन विशुद्ध स्वरूपात त्यांच्या कवितेतून प्रकटते. स्त्रियांची विविध रूपे, स्त्री जीवनातील दुःख, स्त्रीचे मातृत्त्व, स्त्रीची सृजनशीलता इत्यादी चिंतन आपल्या कवितेतून ते व्यक्त करतात. त्यांच्या समग्र कवितेतून त्यांचा स्त्रीकडे पाहण्याचा मातृभावी दृष्टिकोन प्रतीत होतो.

'टीकास्वयंवर'सारख्या समीक्षा ग्रंथातून त्यांनी मराठी समीक्षाव्यवहाराला नवी दृष्टी प्राप्त करून देणारे मर्मग्राही समीक्षालेखन केले. मराठी समीक्षाक्षेत्रात देशीवाद, लेखकाची नवनैतिकता, वास्तवता, कृतिशिलता अशा नव्या सिद्धांत व संकल्पनांची भर घातली. समीक्षेतील विविध प्रश्नांची चर्चा करताना भविष्यात मराठीत नवे कसदार वाङ्मय निर्माण व्हावे, काळाच्या कसोटीवर टिकणारे श्रेष्ठ साहित्य निपजावे म्हणून साहित्याची भूमी नांगरून, भुसभुशीत करण्याचे कार्यही नेमाडे यांनी केले. यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील कर्तव्यकठोरता, बहुश्रुतता, बंडखोरवृत्ती, आस्वादकता, संस्कृतिप्रेम, वक्तृत्वक्षमता, अवतरणक्षमता, अस्तित्ववादीवृत्ती, सहृदयता, द्रष्टेपणा, हजरजबाबीपणा, परत्मता, भाषाप्रभुत्व, जबाबदार समीक्षक इत्यादी पैलूंचा प्रत्यय येतो. या पैलूंच्या आधारे त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेता येऊ शकेल.

३.३.३ वाङ्मयीन जडणघडण

नेमाडे यांचा जन्म खानदेशातील सांगवी या गावात दि. २७ मे १९३८ साली झाला. त्यांचे संपूर्ण नाव भालचंद्र वना नेमाडे. त्यांचे मॅट्रिकपर्यंतचे (१९५५) शालेय शिक्षण सांगवी (खानदेश) येथे, बी.ए. (१९५९) पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून, एम. ए. (१९६१) भाषाशास्त्र या विषयातून पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधून तर इंग्रजी साहित्यातही त्यांनी एम. ए. (१९६४) मुंबई विद्यापीठातून केले. पुढे जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातून पीएच.डी. पदवी प्राप्त केली. याच विद्यापीठाने त्यांच्या शैक्षणिक व साहित्यिक कार्याचा गौरव करून डी.लिट. ही मानद पदवी दिली.

नेमाड्यांचे आरंभीचे लेखन प्रामुख्याने कविता ‘छंद’, ‘रहस्यरंजन’, ‘प्रतिष्ठान’, ‘वाचा’, ‘अथर्व’ या अनियतकालिकांमधून प्रकाशित झाल्या. वयाच्या अवघ्या पंचविसाच्या वर्षी ‘कोसला’ (१९६३) ही पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. ‘कोसला’चा नायक पांडुरंग सांगवीकर यास वाचकांनी आपले मानले. सांगवीकर नैतिकतेच्या पातळीवर बाप, गाव, सगेसोयरे, विषम समाजव्यवस्थाा, शिक्षण क्षेत्रातील दांभिकता यांना नाकारतो. आत्मचरित्रात्मक मांडणी बरोबरच ‘कोसला’ची भाषा, कल्पनेऐवजी वास्तवाला सरळ भिडण्याची त्यांची ताकद अशा वैशिष्ट्यांमुळे ‘कोसला’नंतर मराठी कादंबरीला नवे वळण मिळाले.

‘कोसला’नंतर त्यांनी ‘बिढार’ (१९६७), ‘जरीला’ (१९७७) व ‘झूल’ १९७९ या कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांमध्ये ‘चांगदेव पाटील’ व ‘नामदेव भोळे’ हे नायक त्यांनी उभे केले. हे दोघेही प्राध्यापक म्हणून काम करताना आपल्या अवतीभवतीच्या समकालीन सामाजिक व्यवस्थेवर भाष्य करताना दिसून येतात. स्वतःची मूल्ये आणि नैतिकता सांभाळत सच्चेपणाने जगण्याचा प्रयत्न करणारे हे नायक संवेदनशील प्राध्यापक म्हणून प्रामाणिकपणे ज्ञानदानाचे कार्य करतात. ‘बिढार’पासून चांगदेवची भटकंती महाराष्ट्राच्या अनेक गावांमधून महाविद्यालये बदलत बदलत ‘झूल’मध्ये एका शहरातील महाविद्यालयात काहीकाळ का असेना चांगदेव स्थिरावतो. याच कादंबरीत त्याला प्रा. नामदेव भाळे हा त्याच्या विचारविश्वाशी साधर्म्य असणारा मित्र भेटतो.

‘बिढार’ भाग एक व दोन या कादंबरीचे दोन भाग स्वतंत्रपणे प्रकाशित करण्यात आले व बिढारचा दुसरा भाग ‘हूल’ या नावाने प्रकाशित झाला. नेमाड्यांच्या ‘बिढार’, ‘हूल’, ‘जरीला’ व ‘झूल’ या चार कादंबऱ्यांनी मराठी कादंबरीला भरीव योगदान दिले आहे. राजन गवस यांनी या चार कादंबऱ्यांना ‘चांगदेव चतुष्ट्य’ असे म्हटले आहे. ‘चांगदेव चतुष्ट्य’ या ग्रंथात त्यांनी या कादंबऱ्यांच्या योगदानाची सविस्तर चर्चा केली आहे.

नेमाड्यांनी कादंबऱ्यांमधून व्यामिश्र, सलग व व्यापक अशा प्रकारचे सामाजिक वास्तव रेखाटले असल्यामुळे समकालीन सामाजिक दस्तऐवज ठरावे, इतके महत्त्व या कादंबऱ्यांना प्राप्त झाले आहे. दोघेही प्राध्यापक असल्यामुळे या दोन्ही नायकांच्या माध्यमातून समकालीन शिक्षणव्यवस्थेतील अनागोंदी कारभारावर नेमाडे भाष्य करतात. या खेरीज शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातील जातीयता, भ्रष्टाचार, राजकारण या कादंबऱ्यांमध्ये येते. या नायकांच्या चिंतनशील वृत्तीमुळे या कादंबऱ्यांमध्ये येणारे समाजचिंतन, भटकंतीमुळे येणारी प्रत्येक ठिकाणची स्थानिक बोलीभाषा इत्यादी विविध अंगाने या कादंबऱ्यांचा अभ्यास करता येणे शक्य आहे.

‘हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ’ (जुलै २०१०) ही कादंबरी लिहिण्यापूर्वी नेमाड्यांनी तब्बल तीस वर्षे लेखन विश्रांती घेतली होती. ‘हिंदू...’ या त्यांच्या कादंबरीची प्रकाशनपूर्व व प्रकशनानंतरही खूप चर्चा झाली. टीकेबरोबरच भरभरून झालेले स्वागत या कोलाहलात ‘हिंदू...’ ही वाचकप्रिय कादंबरी ठरली. २०१५ साली याच कादंबरीला भारतातील साहित्यक्षेत्रातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला. या कादंबरीचा विचार पुढे आपणास विस्ताराने करावयाचा आहे.

'देखणी' व 'मेलडी' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. संख्येने अल्प स्वरूपाची असलेली त्यांची कविता गुणात्मकदृष्ट्या अत्यंत कसदार व दखलपात्र ठरते. भाषेचे विविध प्रयोग त्यांच्या काव्यलेखनातही आपणास पाहावयास मिळतात.

मराठी समीक्षेलाही नेमाड्यांनी भरीव योगदान दिले. 'टीकास्वयंवर' (१९९०) या त्यांच्या समीक्षा ग्रंथाची चर्चा मोठ्या प्रमाणात मराठी समीक्षेत झाली. त्यांना या ग्रंथात मराठी कादंबरीची मूलगामी चिकित्सा केली. 'मराठी कादंबरी : प्रेरणा व स्वरूप' या लेखात मराठी कादंबरीच्या तीन प्रवृत्ती १. यमुनापर्यटन प्रवृत्ती, २. मुक्तामाला प्रवृत्ती, ३. मोचनगड प्रवृत्ती अनुक्रमे वास्तवप्रधान, कल्पनारंजनप्रधान, ऐतिहासिक अशा मराठी कादंबरीच्या परंपराचे मर्मग्राही विश्लेषण केले.

साहित्यातील देशीयता किंवा देशीवाद हा नेमाड्यांनी मांडलेला महत्त्वाचा साहित्यसिद्धांत आहे. हा सिद्धांत म्हणजे नेमाड्यांच्या साहित्यचिंतनाचा गाभा आहे. ''देशी याचा अर्थ त्या त्या भूमीशी जोडलेले असणे... देशी नसलेल्या परक्या, बाहेरून येणाऱ्या अनेक मूल्यांचे, भाषांचे संस्कृतीचे देशी मूल्यांवर, भाषांवर व संस्कृतीवर जेव्हा आक्रमण होते तेव्हा स्वतःच्या अस्तित्वासाठी मानवी समूहांना देशीवादी व्हावे लागते.'' असे देशीवादाची संकल्पना स्पष्ट करताना ते लिहितात. (टीकास्वयंवर, १९९० पृष्ठ क्र. ८०)

नेमाड्यांच्या अशा चतुरस्र कामगिरीमुळे त्यांना आजवर साहित्य अकादमी, पद्मश्री व ज्ञानपीठ अशी राष्ट्रीय पातळीवरील पारितोषिके प्राप्त झाली. त्यांच्या कादंबऱ्या व कविता यांचे अन्य भाषांमध्ये अनुवाद झाले असून हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये त्यांचे अनुवादित झालेले वाङ्मय रसिक वाचकांनी उत्स्फूर्तपणे स्वीकारलेले आहे. अलिकडे मे २०१६ मध्ये नेमाड्यांच्या वाङ्मयीन कार्यावर माहितीपटही तयार झाला आहे.

३.३.४ बहुश्रुतता

बहुश्रुतता हे नेमाड्यांच्या व्यक्तिमत्त्वातील वेगळे वैशिष्ट्य आहे. लहानपणापासून असलेल्या अभ्यासाच्या सवयीतून भाषा आणि साहित्याची आवड त्यांच्यात निर्माण झाली आहे. इंग्रजी साहित्याचे वाचन ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष क्षमता होय. इंग्रजीतील पाश्चात्य साहित्यविचार, शेक्सपिअरसारखा जगप्रसिद्ध नाटककार, चेकॉव्ह, काम्पूसारखे, चायकोवस्कीसारखे रशियन कथा-कादंबरीकार, इटलीचा महाकवी दांते, प्राचीन भारतीय संस्कृत व मराठी साहित्याचे वाचन, संत-पंत-तंत साहित्याची मध्ययुगीन वाङ्मय परंपरा, हिंदीतील संत कबीर, मिर्जा गालिब इत्यादी हिंदी वाङ्मय परंपरेची सखोल जाण, संगीतशास्त्राचा आवडीने केलेला अभ्यास, आधुनिक मराठी व इंग्रजी साहित्य परंपरा यांचे ज्ञान याखेरीज ज्या-ज्या ठिकाणी नेमाडे प्राध्यापक म्हणून गेले त्या प्रत्येक प्रदेशातील बोली भाषा तिच्या अंतर्गत नजाकतीसह नेमाड्यांनी जीवंत करण्याचा प्रयत्न आपल्या साहित्यकृतींच्या माध्यमातून केला.

'हिंदू...'च्या नायकाच्या खंडेरावच्या चिंतनातून नेमाड्यांच्या बहुश्रुत व्यक्तिमत्त्वाची प्रचिती येते. या कादंबरीत पुरातत्त्वशास्त्राचा संशोधक अशा स्वरूपाची खंडेरावची मध्यवर्ती व्यक्तिरेखा उभी करताना अश्मयुग, नवाश्मयुग, प्राचीन काळ, ग्रीक, रोमन, सिंधुसंस्कृती, आर्य, कुशान, हुण इत्यादींच्या आगमनाचा इतिहास, मानववंशशास्त्र, भूगर्भशास्त्र, तुर्कस्तान, अफगाणिस्तान, पाकिस्तान, चीन, भूतान, नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंका, अंदमान, निकोबार बेटे इत्यादींचे संदर्भ नेमाडे जागोजागी देतात. याशिवाय मुघलकाळ, ब्रिटिशकाळ, स्वातंत्र्योत्तर काळ यातील विविध ऐतिहासिक घटना, युद्धे, कृषिसंस्कृती, आदिवासी संस्कृती, भटक्या जमाती, विविध पशू-पक्षांचे संदर्भ, विविध ऋतूनुसार बदलणारा सातपुड्यातील निसर्ग, वन्य जीवन, पिके, विधी-विधाने, इत्यादींचे कादंबरीतील सूक्ष्म तपशील वाचकाला स्तिमित करतात. यावरून लेखकाची बहुश्रुतता व अभ्यासाचा आवाका प्रतीत होतो.

३.३.५ प्रेरणा/प्रभाव

'हिंदू...'च्या निमित्ताने नेमाड्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना त्यांच्यावरील प्रभाव अथवा त्यांच्या साहित्यलेखनामागील प्रेरणांचा शोध घेणे गरजेचे वाटते. महानुभाव पंथप्रवर्तक श्रीचक्रधरस्वामी, वारकरी संप्रदायातील संत तुकाराम, म. गांधीजींचे तत्त्वज्ञान, विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मानव मुक्तीचे विचार, बौद्ध, जैन, सूफी तत्त्वज्ञान, व्यास, वाल्मिकी, हाल सातवाहन (गाथासप्तशती), मीर्जा गालिब, कथासरित्सागर, कुठोपनिषद, लोकसाहित्यातील धनगरांच्या ओव्या, गोंधळ गीते, वासुदेव, भराड्यांची गाणी, स्त्रीयांची लोकगीते आदिवासी लोकगीते इत्यादींच्या प्रभावातून भालचंद्र नेमाडे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण झाली आहे. या अस्सल भारतीय देशी प्रभावामुळे नेमाड्यांनी जी उच्च नैतिकता जोपासली ती त्यांच्या विविध कादंबऱ्यांमधील नायकांमध्येही दिसून येते. 'हिंदू...' तून याचा प्रत्यय अनेकवेळा येतो.

चक्रधरस्वामींची लीळाचरित्रातील वचने 'हिंदू'मध्ये येतात. खंडेरावच्या वडिलांच्या मृत्यूनंतर सर्व क्रियाकर्म होतात आणि मोरगावात त्याला वेळ काढणे कठिण होवून बसते, अशावेळी त्याला चक्रधरांच्या वचनाची आठवण होते, ''दिवस वंध्या जाऊ निदिजे: एका झाडाची सवे न होआवी: एका स्थानाची सवे न होआवीः आपल्या वडिलांनी आपल्याला चांगलाच खो दिला - आयुष्यभराचा आपण बरे एकुलते एक सुपुत्र सापडलो. आता आपल्याला खो द्यायला कुणीच नाही. आयुष्यभर ह्या प्रॉपर्टीच्या मैदानावर पळत राहायचं? छे. इथून निसटायचं बघावं.'' (हिंदू... पृष्ठ ६०१) खंडेरावला मोरगावातल्या जमीनजुमला, राजकीय-सामाजिक मानसन्मान, गावकी-भावकीतील चालुन येणारे नेतृत्व यापेक्षा संशोधन, पुस्तकं, पुरातत्त्वाच्या तक्षशिला, अजिंठ्याशी संबंधीत नोंदी या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. ज्याप्रमाणे पूर्वाश्रमीच्या हरपाळदेवाने ज्याप्रमाणे गुजरातमधील भडोचे ऐश्वर्यसंपन्न प्रधान असलेल्या आपल्या वडिलांचे राज्य त्यागून गोविंदप्रभुंकडे दीक्षा घेतली आणि महानुभाव पंथ प्रवर्तक बनले. त्याप्रमाणे कुठेतली खंडेराव देखील संपत्तीच्या काचातून मुक्त होवू पाहत आहे.

चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळेच नेमाडे हिंदू... मध्ये अशी त्यांची वचने उद्‌धृत करताना दिसून येतात.

वारकरी संप्रदायातील संताच्या वाङ्मयाचा प्रभाव नेमाड्यांवर सुरुवातीच्या 'कोसला' (१९६३) या कादंबरीपासून ते नंतरच्या सर्व कादंबऱ्या, कविता, समीक्षालेखनावरही दिसून येतो. 'तुकाराम' (१९९४) हे तुकारामांच्या अभंगांचा अन्वयार्थ स्पष्ट करणारे पुस्तक त्यांनी लिहिले. 'हिंदू...' मधूनही तुकारामांच्या अभंगांची अवतरणे अनेक ठिकाणी पाहावयास मिळतात. खंडेरावचे वडील विठ्ठलपंत हे वारकरी आहेत. त्यामुळे मोरगावातील हरिमंदिरात संध्याकाळी नित्यनियमाने हरिपाठाला त्यांची हजेरी असते. मृदंगावर थाप टाकून भजन-कीर्तनात नित्य देहभान विसरून जाणारे विठ्ठलपंत सदोदीत आपल्या मुलांना संत तुकारामांच्या अभंगांचे दाखले देतात. 'हिंदू...' तील हा प्रसंग पहा - ''वडील भावडूला आपली गीता सांगतच असतात. हे पाहा, आयुष्य हे मुळातच खडतर, फारच खडतर असतं, हे लहाणपणापासून उन्हातान्हात पोटापुरतं मिळवण्यात ह्या गरीब कष्टकऱ्यांच्या अंगी इतकं भिनलेलं असतं की, जगण्यातला खरा आनंद यांच्याइतका कोणालाच नसतो. आपले तुकाराम महाराज नाही का सांगत, मन करा रे प्रसन्न. तेच ते. आता हे बघ, घर म्हणजे मुळात काय असतं, सांग. चूल, मूल, बायको, आईबाप, शेजार, सुरक्षित भिंती, मायेचे स्पर्श, झोप- यांशिवाय आणखी वरचं किंवा मोठं, महान, सजवलेलं असंच काही घर असतं? मुंगी होऊन साकर खावी । निजवस्तूची भेट घ्यावी. निजवस्तू म्हणजे काय, हेच कळलं पाह्यजे रे भावड्या. गरीब शेतकरी पाहा. दारच्या कुत्र्याला, गोठ्यातल्या बैलाला, म्हशीला आपलंच समजतो. त्यांना भाकरीचा तुकडा, चारापाणी आधी करून मग जेवायला बसतो. फार काय, आपल्या इनामाच्या बांधावर केवढं निंबाचं झाड झालं आहे पाहतो नं आपण? हे लहानसं रोपटं होत बोटभर, तेव्हापासून आजीनं त्याला आपल्या वाट्याचं घोट घोट पाणी टाकून जगवलं आहे.'' (हिंदू... पृष्ठ १९९, २००)

वारकरी संप्रदायाचं साधसोपं तत्त्वज्ञान खेड्यातील कृषक समाजात एवढं भिनलं आहे की तो त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. वडीलांच वरील प्रबोधन भावडूबरोबर ऐकणारा खंडेराव वारकरी पंथावर चिंतन करू लागतो त्याच्या मनात विचार येतात, अशा खाऊन पिऊन सुखी गरीब कुणब्यांना वारकरी पंथ मोक्षाचा महामार्गच. एक पैसा खर्च नाही. रोज पहाटे आंघोळ करून स्वच्छ मनानं देवापुढे हात जोडायचे. फारच तगमग असली घरातली, दारातली, तर माथा टेकवायचा. सुखी ठेव देवबाप्पा, असं मोघम मागणं. आवडीनं पाठ केलेले वीस पंचवीस अभंग टाळ वाजवत मन लावून म्हणायचे. काय मानू मी या संतांचे उपकार. केवढा सोपा मार्ग केला आहे तरावया? वारीवरही घरच्या दशम्या चटण्या बांधून पायी. सगळच परवडणारं. रोजचा काबाड कार्यक्रम तर टळतो वारीवर. भक्ती देते मुक्ती, बोला पुंडलीक वर दे हारिविठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाऽऽराम.'' (हिंदू... पृ. २०१)

अशी अनेक उदाहरणे देऊन संत तुकारामांचा नेमाड्यांवरील असलेला प्रभाव स्पष्ट करता येईल.

मीर्जा गालिबच्या शेरो-शायरीचा प्रभावही नेमाड्यांच्या सुरुवातीच्या लेखनापासून आजतागायत दिसून येतो. हिंदूमध्ये गालीबच्या 'दीवाण' या संग्रहातील अनेक शेर विविध प्रसंगांमध्ये लेखक नेमाडे

वापरतात. खंडेरावांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर अनेक दिवसांनी कंटाळवाणे दिवस घालविणाऱ्या खंडेरावला वाटते, ''... मीच एकटा वेळ काढत सुन्न होऊन पडून राहायचो. पुस्तकं, संशोधन, तक्षशिला, अजिंठा. हजारो नोंदी, लेख, पत्रव्यवहार, कॉलेजमध्ये पडून राह्यलेली कामं-गालिबचा 'दीवाना' सुद्धा जवळ असता तर तळमळ कमी झाली असती.'' (हिंदू... पृष्ठ ६०१)

गालीबची अनेक अवतरणे हिंदूमध्ये दिसून येतात. औरंगाबादमध्ये एम. ए. इतिहास करताना मित्रांसमवेत अनेकवेळा खंडेराव 'नाज' मध्ये चहासाठी जातो. असेच एकदा नाजचे मालक बशरमियाँकडून ऐकलेला शेर त्याला खूप आवतो.

'ताब लाये ही बनेगी गालिब
वाकिया सख्त है और जान अजीज'

याचा अर्थही खंडेराव स्पष्ट करतो, सहन करणं भागच आहे, गालिब, प्रसंग कठिण आणि जान प्यारी... वा रे वा, काय योग्य उदाहरण शोधलंस रे तू. ग्रेट...'' (हिंदू... पृष्ठ ४९०)

भालचंद्र नेमाडे यांनी चक्रधर, तुकाराम, गालिब यांचे वाङ्मय खूप गंभीरपणे अभ्यासल्याची साक्ष या प्रभावावरून लक्षात येते. या प्रभावामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सुसंस्कृत झाले आहे. नेमाड्यांच्या कादंबऱ्यांमधील प्रत्येक नायकाच्या विचारांना एकप्रकारचे नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले आहे. त्यामुळेच घरातील ऐश्वर्याचा त्याग केवळ आवडीच्या अभ्यास-संशोधनाच्या क्षेत्रप्राप्तीसाठी करायची खंडेरावच्या मनाची झाली आहे.

या नैतिक अधिष्ठानाच्या ठाम बैठकीमुळे नेमाडे आपल्या नायकांच्या कादंबऱ्यामधील भूमिका पक्क्या करतात. त्यामुळेच नेमाड्यांनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये मुद्दाम ओढून ताणून स्त्री-पुरुष संबंध, शृंगारीक वर्णने केली नाहीत. नेमाड्यांचे समकालीन कवी लेखक - पु. शि. रेगे, चिं. त्र्यं. खानोलकर, पेंडशे यांच्या कादंबऱ्यांमध्ये मात्र अनेक ठिकाणी मुद्दाम अनेक प्रणयप्रसंग येतात. मात्र नेमाड्यांचे सर्व नायक सुसंस्कृत असल्याने नेमाड्यांच्या व्यक्तिमत्त्वास आपोआपच एक 'नैतिक अधिष्ठान' प्राप्त झाले आहे.

३.३.६ वैचारिकता

भालचंद्र नेमाडे हे वैचारिक मनोवृत्तीचे कलावंत आहेत. त्यांच्या सर्व कादंबऱ्या, कविता तसेच समीक्षालेखनातून त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वातील या वृत्तीचा प्रत्यय येतो. 'कोसला'तील पांडुरंग सांगवीकर, चांगदेव चतुष्ट्यातील प्रा. चांगदेव पाटील, प्रा. नामदेव भोळे ते 'हिंदू...' मधील खंडेराव ह्या व्यक्तिरेखा आपण आणि आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या व्यक्तींच्या वृत्तीः प्रवृत्तींचे सूक्ष्म निरीक्षण करताना दिसून येतात. हे नायक प्रसंगी या बऱ्या-वाईट प्रवृत्तीवर भाष्य करतानाही आढळतात. 'हिंदू...'मध्ये पानोपाणी नेमाड्यांच्या व्यक्तित्त्वातील वैचारिक मनोवृत्तीचे सुरम्य दर्शन घडते. 'हिंदू...'तील शेकडो व्यक्तिरेखा उभ्या करताना त्यांच्या वृत्ती-प्रवृत्तींवर ते भाष्य करतात. येथे डॉ. मंडी या व्यक्तिरेखेचे उदाहरण पाहता येईल. पुण्याच्या डेक्कन कॉलेजात सांखळीया सरांकडे

गेलेल्या खंडेरावची डॉ. मंडी ही लंडन विद्यापीठातली प्रचीन भारताच्या पुरातत्त्वाची प्राध्यापिका की जी युनेस्कोच्या एका भारी फेलोशिपवर वर्षभर संशोधन करण्यासाठी भारतात आली होती, तिच्याशी ओळख झाली. पहिल्याच भेटीत खंडेराव व सांखळीया सर यांची पीएच.डी.चा विषय निश्चित करताना जाणिवांना पुरातत्त्वात का स्थान असू नये या मुद्यावर दोन तीन तास भांडणासारखी पण अभ्यासपूर्ण चर्चा झाली. मंडी चकीत होऊन हा वाद नुसती ऐकत बसली. कारण तिनं असं इंग्लंडमध्ये ऐकलं होतं की, इंडियात गाईडचे बूट पुसून संशोधन करणारे विद्यार्थी पीएच.ड्या मिळवतात. खंडेरावसारख्या अभ्यासू संशोधकामुळे ती प्रभावित होते. या डॉ. मंडी बद्दल खंडेराव म्हणतो, ''डॉ. मंडी मात्र स्कॉटिश आणि विशेष म्हणजे प्राचीन भारताचे थोर अभ्यासक बॅशम यांची विद्यार्थीनी फार मोठी संशोधक होती. ती ठासून हडाप्पाच्या संपूर्ण भारतीय परंपरेवर भर देत शेकडो पुरावे मांडायची. सिंधू प्रदेशात सापडलेल्या प्रत्येक मुद्रेचा, अवशेषाचा भारतीय उपखंडात कानाकोपऱ्यात आढळणाऱ्या आकृतीबंधाशी जैविक संबंध आहे, याचा ती अखंड शोध घेत होती. नुकतीच ती आमच्या मोरगावला महिनाभर राहून आली होती आणि तिच्या मते तिथल्या व्यापाऱ्यांची ।।शुभ।। ।।लाभ।। अशी चिन्हं - ह्यातल्या उभ्या दोन रेघा सिंधु संस्कृतीतल्या व्यापाऱ्यांपासून चालत आलेल्या, त्याच लिपीतल्या आहेत. कुंभाराच्या अखजीच्या घागरीवरची नक्षी, बायकांच्या देवापुढच्या रांगोळ्या, पोळ्याचे मातीचे बैल, कानोडदेवी, आदिवासी गोंदणाचे आकार, आकृत्या-सगळं मोहनजो-दडोशी जुळणारंच आहे. हे तपशील तिनं गेल्या दहाबारा वर्षांत श्रीलंका, अंदमान-निकोबारामधल्या वेडा, ओंग लोकांपासून गोंड, मुंडा लोकांच्यात स्वतः राहून जमा केले होते.'' (हिंदू... पृष्ठ २०) नंतर ह्या डॉ. मंडीबद्दल मोरगावहून खंडेरावला भावडूचे पत्र येते. त्यात भावडूने तिच्याबद्दल लिहिलेल असतं. ''...ह्या युरोपातलया बाया केवढ्या आत्मनिर्भर? किती यांचा आत्मविश्वास? हा आत्मविश्वास ह्या बायकांना कशामुळे मिळतो? आपल्या बायका ह्या पातळीवर आणखी किती शतकांनी जातील? ह्या विदुषी बाईमुळेच मला कळलं की, लैंगिकदृष्ट्या मुक्त झाल्याशिवाय असा निधडेपणा बायकांना येणार नाही... आपण हिंदू पुरुषच या आपल्या बायकांच्या मागासलेपणाला जबाबदार आहोत.'' (हिंदू...पृ. २६)

मोरगावात राहून आलेली मंडी भारतीय खेड्यातील साध्या लोकांबद्दल आणि त्यांच्या हिंदू संस्कृतीबद्दल बोलू लागते. खंडेरावचा आणि तिचा संवाद पहा, ''साधेपणा किती उदात्त असू शकतो, हे आधुनिकतेच्या लाटेत नष्ट न होवो. ही खेडी अशी निष्पाप, साधी, उदार मनाची राहतील? राहतील. राहतील. हिंदू लोक काहीही फेकून देत नाहीत. सिंधु काळापासून सगळी अडगळ आम्ही तळघरात गच्च जपून ठेवलेली आहे. सगळं तिथे अंधारात कुठेतरी ठेवलेलं असतं. ते न दिसू दे. हरवू दे. स्मृतीतूनसुद्धा जाऊ दे. काही बिघडत नाही. केव्हा तरी सापडेलच. सिंधु धर्म आहे, बौद्ध धर्म आहे. जैन धर्म आहे. वैदिक ब्राह्मणही आहे. पिंपळाखालचा मुंजा आहे. दिवाळीची लव्हाळ्यांची धेंडवाळी आहे, बाशिंग आहे. आणि लभान्यांची नावं-हरखू हे शरयू नदीचं अफगाण पश्तू नाव आहे. खरखोती हे सरस्वतीचं पश्तू रूप. तुमच्या एवढ्याशा मोरगावात आठ धर्म आणि पंथ, २२ जाती आजही आहेत. आयुष्यभर शाकाहार, अहिंसा, एक जगण्याची रीत म्हणून आहे.

गोगलगायीसारखं बाहेरचा स्पर्श टाळण्यासाठी स्वतःच्या शरीराचंच घर का असू नये? अंदमानी, निकोबारी, भिल्ल, गोंड, लडाखी, तिबेट ह्या हजारो जमाती मागासलेल्या कशावरून, कोणी ठरवल्या? जोपर्यंत हिणवणारा नसतो, तोपर्यंत हिनपण नसतं. शोषण करणारे तेवढे पुढारलेले हे कोणी, कशावरून ठरवलं?'' (हिंदू... पृ. २७)

वैचारिकता, चिंतनशील मनोवृत्ती हा भालचंद्र नेमाड्यांचा मूळ पिंड असल्याने 'हिंदू...' मध्ये एखादी व्यक्तिरेखा रेखाटताना त्या पात्राच्या तोंडून ते आपले विचार व्यक्त करत असतात. डॉ. मंडी ही इंग्लंडमधील पुरातत्त्वशास्त्राची प्राध्यापिका तिचे पात्र रेखाटताना नेमाड्यांच्या वैचारिक मनोवृत्तीचा सघन प्रत्यय येतो. त्यांच्या विचारांमध्ये स्पष्टता, निर्भिडता, वास्तवाची तर्ककठोर मीमांसा पाहावयास मिळते. भारतीय व पाश्चात्त्य विचारव्युहांच्या तौलनिक परिशिलनातून व आयुष्यभराच्या अभ्यासातून प्रगल्भ झालेली ही वैचारिकता वाचकांना प्रभावित करते. त्यामुळेच भालचंद्र नेमाडे हे वाचकप्रिय कादंबरीकार म्हणून सुप्रसिद्ध आहेत.

३.३.७ बंडखोर व्यक्तिमत्त्व

भालचंद्र नेमाडे हे बंडखोर व वादग्रस्त लेखक म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. खोट्या, अनैतिक, दांभिक वृत्ती-प्रवृत्तींवर परखड भाष्य करणारे नेमाडे म्हणूनच अनेकदा वादाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. याबाबतीत संत तुकारामांच्या बंडखोर व्यक्तिमत्त्वाशी त्यांचे साधर्म्य दाखविता येईल. संत तुकारामांच्या अभंगवाणीच्या संस्कारातून झालेला हा प्रभाव असावा असे वाटते. 'हिंदू...'मधील पुरातत्त्व संशोधक खंडेरावची 'युनेस्को-मोहेनजो-दडो १९६३ या प्रोजेक्टसाठी निवड होते. खंडेराव हा कुशाग्र बुद्धिमत्ता व प्रचंड अभ्यास करणारा तरूण संशोधक आहे. त्याला रात्री झोपेत स्वप्ने पाहण्याची सवय आहे. स्वप्नात बडबडण्याची सवय आहे. सध्याच्या पाकिस्तानातील सिंध प्रांतात मोहेनजो-दडोच्या पाच किलोमिटर परिघात उत्खनन सुरू असलेल्या ठिकाणी रात्री तंबूत झोपल्यानंतर खंडेराव स्वप्न पाहातो. या स्वप्नात आर्य आणि एतद्देशीय अनार्य हिंदू आमनेसामने उभे ठाकलेले आहेत. आर्यांच्या वरातीचे नेतृत्त्व फरशाराम (परशुराम) करीत आहे. गेल्या पाच हजार वर्षांच्या कालपटावरील हा आर्य-अनार्य संस्कृती संघर्ष भालचंद्र नेमाडे यांनी खंडेरावच्या स्वप्नाद्वारे संज्ञाप्रवाही पद्धतीने मांडला आहे. ''... मागून दुतर्फा दिवट्यांच्या रांगांमध्ये इंद्र, वरुण, अग्नी, वायू, पूषण अशा कैलासवासी झालेल्या उदन्त्य देवतांचे जयघोष करत्साते मोठमोठ्या प्राचीन दाढ्या छातीवर रुळवणारे उघडेबंब काळे, गोरे, सावळे, पिवळे, अर्कतर्र, गोमांसभक्षक मधुपर्क ढेकरी, संस्कृत आपल्याला येते हे दाखविण्यासाठी मुद्दाम जुनी इराणी रचना वापरणारे याज्ञिक ऋत्विज मंत्रांचा प्रत्येक विराम, प्रत्येक मात्रा, वर्ण, उच्चार कुठेही किंचितही फरक होऊ न देता आपल्या सांघिक शक्तीची भीती निर्माण करत्साते दोन दांडग्या वृषभांच्या पुष्पसज्ज शकटामागून येताना दिसतात. पुरूंच्या आणि भारताच्या नऊ पिढ्यांची कविकुळं मिरवणारे हे अनूंचे पुरोहित आणि भृगूंचे कवी अफगाणिस्तानातल्या सरस्वती नदीपलीकडून आले तरी इकडच्या (भारतातल्या) सरस्वतीकाठचे म्हणवून घेत्साते असूरांचे पुरोहित अंगिरस मधल्या रांगेत चालताहेत, तर त्यांच्या मधोमध ज्याचा

पराभव आमच्या इक्ष्वाकुकुळी काळ्या मुंडावंशी रामानं केला तो इराणी परशू, सप्तचिरंजिवांपैकी एक फरशाराम जमसेदजी अग्निपूत्र स्वतःला सहावा अवतार म्हणवणारा, खांद्यावर फरशीचा दांडा टाकून चालतो आहे. आता फरशारामचे हे आर्य आम्हां पुरातत्त्ववाल्यांबद्दल अवहेलनाजन्य शब्द करतात, जणू आम्ही सिंधु प्रदेशातले एकशिंगी प्राणी दिसतो, असे आमच्याकडे पाहतात... माझा पुरातत्त्व टिकाव उगारून धावून जातो. अचानक वाजपी थांबतात. दिवट्यावाले पळापळ करतात. माझे सहकारीही ह्या सर्वांना शरयूपार सरस्वतीपार पळवून लावत्साते हळूहळू अज्ञात इतिहासपूर्व काळात लोटत नेतात. शतकांच्या सनावळ्यांची फेकाफेक होते. सहस्रकांची धक्काबुक्की होते. आम्ही ओरडायला लागतो, हे सोम पिऊन होम जाळणाऱ्या ब्राह्मण स्तोमड्यांनो, अर्कात गर्क होत तर्क करत राहणाऱ्या कर्कांनो, यज्ञातील सेवेसाठी ठेवलेल्या आमच्या सुंदरींना बेवारस संतती निर्मिनाऱ्या जुगाड्यांनो, द्यूतात विद्युतसदश्य बायका पणाला लावून हरून त्यांना पोरांसकट वाऱ्यावर सोडून देणाऱ्या जुगाऱ्यांनो, हा पाहा, एकवीस वेळा ही पृथ्वी निर्ब्राह्मण करण्यास्तव वैठ्ठल खंडेराव आला आहे.'' (हिंदू...पृ.१४)

अशाप्रकारे परखड अशी संस्कृती टीका करणारे बंडखोर व्यक्तिमत्त्व भालचंद्र नेमाडे यांचे आहे. लोकमत अथवा प्रस्थापित वैचारिक गुलामगिरीचे जोखड फेकून देवून जे योग्य आहे, मंगलमय आहे त्याची पुनर्स्थापना, पुनर्मांडणी करण्याचे धारिष्ट्य ते दाखवितात. त्यासाठी आपल्या तटस्थ प्रज्ञाचक्षूंनी पाच हजार वर्षांमधील सांस्कृतिक प्रस्थापित मानदंडांना आव्हान देतात. काळाच्या कसोटीवर सत्याचा शोध घेण्याचे कार्य अविरतपणे ते करताना दिसून येतात. त्यांच्या समीक्षालेखनातही त्यांच्या या सत्यान्वेशी बंडखोर व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येतो. त्यामुळेच मराठीत साठोत्तर कालखंडात नेमाड्यांच्या कादंबरीने स्वतंत्र परंपरा निर्माण केली. नेमाड्यांची प्रेरणा घेवून नंतर अनेक कादंबरीकार लिहू लागले.

३.३.८ देशीवादाचे पुरस्कर्ते

भालचंद्र नेमाडे यांनी मांडलेला एक महत्त्वपूर्ण सिद्धांत म्हणजे 'देशीवाद'. १९८० च्या सुमारास देशीवादाबद्दलची चर्चा नेमाड्यांनी सुरू केली. १९८८ साली 'साहित्यातील देशीयता' या लेखातून त्यांनी 'देशीवाद' ह्या सिद्धांताची मांडणी केली. परक्या संस्कृतीला किंवा परक्या व्यक्तीला नकार देऊ पाहणारी समाजामध्ये सर्वदूर पसरलेली देशीवाद ही एक प्रवृत्ती होय. यामध्ये संस्कृतीच्या पुनर्लेखनाचा एक प्रयत्न असल्याने त्याचा इतिहासाशी घनिष्ठ संबंध असतो. येथे वसाहतवादाला प्रतिकार करण्यासाठी इतिहासाच्या पुनर्लेखनाची गरज देशीवादास वाटते.

'प्रत्येक मानवी समूहाची स्वतःची अशी एक संस्कृती असते. ती इतर संस्कृतीपेक्षा वेगळी असते. कोणताही एखादा लेखक स्वतःच्या समाजाच्या, समुहाच्या, स्थळकाळाच्या, संस्कृतीच्या संदर्भातच लेखन करत असतो. आपल्या स्वसंस्कृतीत राहून तिचा वारसा ग्रहण करून लिहिल्या जाणाऱ्या साहित्याला देशी साहित्य असे म्हणता येईल. म्हणजे येथे संस्कृतीला मानाचे स्थान असते, तर परसांस्कृतिक आक्रमणाला प्रखर विरोध केला जातो. मग त्यासाठी 'प्रसंगी महानुभावपंथाचे आद्य

आचार्य नागदेवाचार्य म्हणतात त्याप्रमाणे, ''तुमचा अस्मात कस्मात मी नेणेचि गा। मज चक्रधरे निरुपिली मऱ्हाटी तियाची पुसा।'' अशी स्वभाषा, स्वसंस्कृतीविषयीची दुराग्रही भूमिका घ्यावी लागली तरी हरकत नाही. म्हणून देशी साहित्यात स्वसंस्कृतीचा अभिनिवेशही असू शकतो. वैश्विकतेचा सरधोपटपणे 'वसुधैव कुटुंबकम्' पद्धतीचा घेतला जाणारा अर्थ देशीवादास मान्य नसून वैश्विकता म्हणजे भिन्न भिन्न ठिकाणाच्या देशी शैलींचा भिन्न भिन्न स्थितींमध्ये आस्वाद घेणे हा अर्थ देशी वादास अभिप्रेत आहे. 'वसुधैव कुटुंबकम्'ची वृत्ती भिन्न भिन्न ठिकाणच्या कृतींमध्ये एकरूपता आणि एक जातीयता शोधण्याचा अनाठायी प्रयत्न केलेला असतो. तो देशी वादास मान्य न होणारा आहे. विशेषतः भारतावर दीडशेपेक्षा जास्त वर्षे राज्य करणाऱ्या ब्रिटिशांनी खोटी वसाहतवादी आंतरराष्ट्रीयता निर्माण केली. या आंतरराष्ट्रीयतेच्या खोट्या कल्पनेला असंख्य साहित्यिक, समीक्षक, विद्वान, तत्त्वज्ञ, राजकारणी बळी पडल्याने भाषा, स्वसंस्कृती, स्वसाहित्य यांचे अपरिमित नुकसान आजवर झाले आहे. आजही ही खोटी आंतरराष्ट्रीयता प्रचलित आहेच. ब्रिटिश गेल्यावरही वसाहतवादी मनोवृत्ती नष्ट न झाल्याने अनेक साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय पेच भारतासारख्या खंडप्राय देशात निर्माण झाले. म्हणून ही वसाहतवादी मनोवृत्ती नष्ट करून त्याजागी हिंदू संस्कृतीतील बहुजन समाजाची वैभवशाली परंपरा असलेली, समृद्ध सांस्कृतिक वारसा ग्रहण करून निर्माण होणारी रसरशीत जिवंत देशी साहित्य निर्मिती देशीवादी चळवळीस अभिप्रेत आहे. ही नेमाड्यांची 'देशीवादा'ची सैद्धांतिक भूमिका होय.

'हिंदू...'तून देशीवादी जाणीवेचा प्रत्यय येतो. वडीलांच्या मृत्यूच्या बातमीमुळे अस्वस्थ झालेल्या खंडेरावच्या मनात पुढील आयुष्यात काय करावं? हा विचार येतो. एका बाजूला पीएच.डी., ज्ञानार्जन, करियर या गोष्टी तर दुसऱ्या बाजूला शेतीवाडी, खेड्यातलं राजकारण, लोकसेवा यापैकी आयुष्यात आपण काय करावं याचा विचार खंडेराव करू लागतो, ''हा विचार डोकं काढून वर येतो. तोच दुसरा त्याला खाली बुडवत वर येतो. खंडेराव, तुझा वारसा केवळ तुझं घरदार जमीनजुमला शेतं शिवारं एवढाच नाही. गेल्या दहा हजार वर्षांपासून कृषि संस्कृतीचा हा सतत तुझ्यापर्यंत झिरपत आलेला वारसा आहे. तो तुला असा पालीच्या शेपटासारखा खटकन तोडून पुढे जाता येणार नाही. तोडताही येणार नाही. औद्योगिक व्यापारी महानगरी लोकांच्या उन्मूलित भुतावळीत शिरणं काही फार कठीण नसतं. लाखो लोक ते करतच असतात. पण खंडेराव तू इतका क्षुद्र नाही आहेस. घराला अंगण आणि दारी पिंपळ ही तुझी ओळख. ह्या गोष्ट नसलेलं भोवताल तुला चालेल? ऊन पाऊस चांदणं जमीन गवत पशुपक्षी प्राणी झाडं झुडपं लोकगीतं दंतकथा वाक्प्रचार हे काहीच नसलेला झगझगीत वांझ परिसर तुला चालेल? भरकटू नकोस. तुझे पाय शाबूत ठेव. सगळे रस्ते आपले पाय गिळण्याची वाटच पाहत असतात-हवाई, समुद्री, जमिनी, रूळ, महामार्ग, सडका, यंत्रांनी संध्याकाळपर्यंत कुठल्याकुठे नेऊन टाकणारे लंडन, न्युयॉर्क, चंद्रावरसुद्धा. पण तुला वाचवेल तुझी स्वतःची पायवाट. ती तुला कधी सोडून जाणार नाही. कारण तूच ती तयार करतोस. तीच घे. जहाजावरून सोडलेला कावळा जसा परत जहाजावर येतो, जशी वादळी पावसात मुंगी आपल्या पूर्वजांच्या वारुळाकडे लगबगीनं धावत येते.

खंडू, बेडर होऊन जगण्याच्या ह्या कोलाहलात भाग घे. जगणं ही प्रक्रिया आहे, तिच्यात भाग घेणं एवढंच खरं असतं. ते बरं का वाईट हे नंतर ठरतं. अडंगा भारती भावडूला मारूतीवर योगासनं शिकवतांना वारंवार सांगायचे : ध्यानात भावना कठोर करून नष्ट कराव्या. मुक्त व्हावं. अक्षोभकारक विचार करावे. अक्षोभकारक म्हणजे संतोषजनक नव्हे. जसं हुनाकाकांनी इंग्रजांविरुद्ध दहशतवादी होऊन स्वतःचं घर उद्ध्वस्त केलं, काकूचा संसार आंधळा केला, हे क्षोभकारक. परंतु त्यांनी हे बलिदान कोणत्या नैतिक भूमिकेवरून केलं– ते अक्षोभकारक. याच्या उलट जसे आपले सातवे पूर्वज नागोराव–खापरपणजोबांचे आजे स्वराज्यातली देशमुखी सोडून इंग्रजांना मिळाले आणि खानदेशात होळकर सरकार जाऊन कंपणी सरकारचा हुकुम लागू झाला. ही हरामखोरी क्षोभकारक. पण अशी फितुरी नागोराव पूर्वजांनी ज्या नैतिक भूमिकेवरून केली असेल, ते अक्षोभकारक. कोणती ती भूमिका? त्याहीपेक्षा नीट विचार कर की, झेंडीच्या निपणजीनं आपल्या कोवळ्या मुलीसह सगळ्या गावासाठी पेंढाऱ्यांच्या छावणीत जायला तयार व्हावं, याला केवढी नैतिक हिंमत लागली असेल?

तुनतुनतुनतुन ढमाक ढमाक. खंडू पळ, पळ, भिकरा गोंधळी वारूबाईचा पोवाडा म्हणतो आहे. मढीकडे.

ढमाक ढमाक ढम ढम ढमाक
आरं झाली वारूबाई तय्यार केला निर्धार
डोक्यावाटे आसवांची धारऽऽ हो जीऽ जी ऽ जीऽ
आन् रडतो सगळा मोरगावं रंऽऽ जी जी जी
तुनतुनतुनतुन तुनतुनतुनतुन'' (हिंदू... पृ. ९४, ९५)

अशाप्रकारे नेमाडे 'हिंदू...'मधून खंडेरावच्या मनातील करियर की गाव ही घालमेल मांडताना कृषिजीवनाचा पुरस्कार करतात. गावागावातला शेतकरी आणि त्याला शेतीसाठी मदत करणारे गावातील इतर सर्वसामान्य लोक हा कष्टकरी वर्ग शेतीतून धनधान्य पिकवून सर्वांचे पोट भरत असतो. याउलट शहरे ही सुस्तावलेल्या व ऐदिलोकांची वसतीस्थाने असतात. त्यामुळेच उत्खननात सापडलेली हडप्पा–मोहेनजो–दडो सारखी शहरे कालौघात नष्ट झाली. 'हिंदू...'तील खंडेराव शेती हा आपल्याकडे दहा हजार वर्षापासून चालत आलेला वारसा आहे; शेतकऱ्याची खरी ओळख घराला अंगण दारी पिंपळ हा आहे. खेड्यातील लोकगीते, बोलीभाषेचे विविध आविष्कार, म्हणी, वाक्प्रचार हे खरे आपले जीवन असे त्याला वाटणे हाच नेमाड्यांचा भूमिनिष्ठ देशीवाद होय. याच भूमिकेतून मोरगावावर पेंढाऱ्यांची धाड पडत असताना गावासाठी पेंढाऱ्यांकडे आपल्या मुलीसह जाणाऱ्या वारू ह्या लभाणी गणिकेचा पोवाडा भिकरा गोंधळी सादर करतो, वारूचे ते नैतिक धारिष्ट्य आणि भिकराचो तिच्यावरील पोवाडा 'हिंदू...'मध्ये देशीवादी भूमिकेतून नेमाडे समाविष्ठ करताना दिसून येतात. देशीवादाची अशी कितीतरी उदाहरणे 'हिंदू...' मध्ये आढळून येतात.

३.३.९ भाषेची जाण

भालचंद्र नेमाडे यांची भाषेची जाण किंवा त्यांची आविष्कारशैली अपूर्व अशीच आहे. कोणत्याही साहित्य रसिक वाचकाला नेमाड्यांचे साहित्य प्रथम भावते ते त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेमुळेच होय. त्यांची 'कोसला'तील आणि अन्य कादंबऱ्यांमधील भाषा असो, त्यांच्या 'देखणी'तील काव्याची भाषा असो, त्यांच्या टीकालेखनातील भाषा असो अथवा त्यांनी वेळोवेळी दिलेल्या मुलाखतींमधील, भाषणांमधील भाषा असो, त्यांची भाषा रसिक वाचकांचे लक्ष वेधून घेते.

'हिंदू...' मध्ये प्रामुख्याने ग्रामीण व्यक्तिरेखांच्या तोंडी खानदेशी बोली भाषेचा वापर नेमाडे करतात. खानदेशी बोलीचा जिवंतपणा, रसरशीतपणा जाणवतो तो नेमाड्यांनी ठिकठिकाणी विवेचनाच्या ओघात वापरलेल्या खानदेशी लोकगीते, म्हणी व वाक्प्रचार यांच्या वापरामुळे होय. आता अहिराणी आणि देखणी भाषेचा मिलाप झालेल्या भाषेचा नमुना पाहा.

''आजी डोळ्यांवर उबडा हात करून म्हणते, कोण वं बहीन? पिंजाऱ्याची सकीनाच दिसते कशी. ये सकीने. कैसा पहचाना वो चाची तूने मुझे? म्हणत सकीना प्रेमानं वडाच्या खोडाला पाठ लावून मळका पायजमा वर ओढत बसते. धाप लागल्यानं तुटक बोलते. काय येणं केलं सकीना येवढ्या उन्हाचं? मालूम नै चाची तेरे को? मेरे बडेभाई की, बलदार की शादी है नं परवाच्या दिशी? कल सुभे तो हल्लद लगनेवाली है नं. मै इकलौती बहेन म्हणल्यावर आनाच होना की नै? बरोबर आहे सकीने? मंग आहेर काय आनला भावाले? आहेर? आहेर क्या लाऊँ चाची? एकदम घुटमळत सकीना म्हणते, चुहे को बी घरात कुछ नही मिळून राह्यलं, असे दिवस पिंचाऱ्यांचे. घरमे सात आठ दांडगे जवान पोरं क्या करेंगे वो भी? काही नोकरी नै, धंदाचालत नै. कोणी कबुतरं पालतो, कोणी गाद्या पिंजायला धनकुली घेऊन फिरतो. हातेली पे पेट है देखो. दोन सासा, चार जेठ, तीन देर, जेठान्या, देरान्या, ननदा, तलाक दिलेली एक, सबके बच्चे-घर में तीस लोगाँ सोते. सगळ्यांची मर्जी संभाळते रहती मै - महिना झाला, तब मुझे मायके आने दीना मरदने. हमारे मे बाया कहती हैं नं-

बेटी का जन्म तूने काहे को दिये अल्ला,
भानचुले मे सदा जलता कोयल्ला

बायकांच असंच असतं माय, आमच्या असो तुमच्या असो- कित्ता बराबर बोली मौसी तू- तुम्हाऱ्या हो हमाऱ्या हो, औरतां किधरबी एकच्चे.'' (हिंदू... पृ. २६२)

असेच अस्सल अहिरानी बोलभाषेतील वाक्प्रचाराचे उदाहरण पाहा- ''एवढ्यात अंगणात लाल मुटका घालून मसलेली म्हातारी बहिरच्या दाराकडे नजर पुरवत म्हणाली, काण आहे ते? बघा ग, तोंडाचा पट्टा बंद करा आणि बघा... लंभान्यां नो, सवतीची फुगडी अन् फेडा एकमेकींची लुगडी.'' (हिंदू... पृ. २८०) अशाप्रकारे वैशिष्ट्यपूर्ण भाषेचा प्रत्यय नेमाड्यांच्या लेखनातून येतो.

नेमाड्यांच्या वाङ्मयीन व्यक्तमत्त्वाचे स्वरूप/विशेष आतापर्यंत आपण पाहिले. आता समकालीन लेखक म्हणून नेमाड्यांचा विचार करू.

३.४ 'हिंदू...'तील सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ

'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' ही कादंबरी २०१० साली प्रकाशित झाली. नेमाड्यांच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणेच 'हिंदू...'लाही वाचकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्यांच्या कादंबऱ्यांचे वैशिष्ट्य हे की त्या वाचकांना आपल्या वाटतात. याचे महत्त्वाचे कारण त्यांच्या कादंबऱ्यांमधून उमटणारे सामाजिक-सांस्कृतिक जीचनाचे प्रतिबिंब होय. एकेठिकाणी नेमाड्यांनीच म्हटल्याप्रमाणे मी जसा माझ्या जीवनात आहे तसाच लेखनातही आहे. म्हणजेच त्यांच्या जीवनात आणि लेखनात कमीत-कमी अंतर आले. कलासर्जनासाठी आवश्यक कल्पनेचा अंतर्भाव सोडला तर जीवनातील जळजळीत वास्तव त्यांच्या कादंबरीत असते. विसाव्या शतकातील अर्थातच समकाळातील अनेक वास्तव घटना-घडामोडींचे प्रतिबिंब आपणास 'हिंदू...'त पाहावयास मिळते. त्याचा विचार करण्यापूर्वी कादंबरीच्या शीर्षकाचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करू.

३.४.१ हिंदू... : शीर्षकाचा अन्वयार्थ

'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' असे या कादंबरीचे शीर्षक आहे. यातील 'हिंदू' म्हणजे 'धर्म' एवढा संकुचित अर्थ लेखकास अपेक्षित नाही. 'हिंदू'चा अर्थ येथे संपूर्ण भारतीयांची संस्कृती म्हणजेच 'हिंदू संस्कृती' असा अर्थ अपेक्षित आहे. 'हिंदू...'च्या तलपृष्ठावरील मजकुरात सांगितल्याप्रमाणे, ''कित्येक शतकांपूर्वी सिंधु नदीच्या तीरावर आर्यांच्या आगमनाबरोबर एका संस्कृतीची पाळेमुळे रूजली आणि नंतरच्या काळात संपूर्ण भारतीय उपखंडात 'हिंदू संस्कृती' म्हणून ती अनेक अंगांनी बहरली. वेगवेगळ्या काळातील समाजरचनेच्या गरजांनुसार आणि अनेक विचारवंत, तत्त्वज्ञानी मांडलेल्या तात्त्विक विचारधारांमुळे यात नवनवी भर पडत गेली, बदल होत गेले. संस्कृतीची मूळ बैठक कायम राहिली तरी येणारी प्रत्येक नवीन विचारधारणा सामावून घेण्याच्या प्रवृत्तीमुळे संस्कृतीची वीण बहुरंगी होत गेली आणि रूढी, परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा, चालीरीती, परस्पर नातेसंबंध, कुटुंब व्यवस्था यांचा एक पट निर्माण होत गेला. शतकानुशतके या संस्कृतीने माणसांचे अवघे जीवन व्यापून टाकले. या संस्कृतीचा सगळा पसारा, अनेक चांगल्या वाईट गोष्टींची ही अडगळ माणसाचे आयुष्य समृद्ध करीत असते. म्हणूनच ही जगण्याची समृद्ध अडगळ असे नेमाडे यांनी म्हटले आहे. या 'समृद्ध अडगळी'चे चकित करून सोडणारे सुरम्य दर्शन 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीतून घडते. जीवनाची व्यापकता, व्यामिश्रता यांचे दर्शन घडवणे जसे महाकाव्याकडून अपेक्षित आहे तसेच ते कादंबरीकडूनही अपेक्षित असते. 'कोसला' आणि नंतरच्या चांगदेव चतुष्ट्यामधल्या 'बिढार', 'हूल', 'जरीला', 'झूल' प्रमाणेच ही कादंबरीदेखील ही अपेक्षा पूर्ण करते...'' (हिंदू..., तलपृष्ठावरील मजकूर) हिंदू... च्या शीर्षकविचारानंतर आता समकाळाचे प्रतिबिंब या कादंबरीत कसे उमटले आहे याचा विचार करू.

३.४.२ कृषिजीवन

कृषिजीवन हे हिंदू कादंबरीचे मध्यवर्ती आशयसूत्र आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. सुमारे गेल्या दहा हजार वर्षांपासूनची शेतीची समृद्ध परंपरा या देशाला लाभली आहे. कसदार पिकावू जमिन, जंगले, बारमाही नद्या, तीन ऋतू, जैवविविधता या सर्व नैसर्गिक साधनसंपत्तीमुळे भारताची आजही ७०% लोकसंख्या खेड्यात राहते, शेती, पशुपालन व शेतीपूरक उद्योग-व्यवसाय करते. त्यामुळेच अन्नधान्य, सोने-नाणे यांनी संपन्न असलेल्या या देशावर आर्य, हुण, कुशान, तातीर, मोगल, पोर्तुगिज, डच, फ्रेंच व इंग्रज या परकीयांनी वेळोवेळी आक्रमणे केली. त्यामुळेच भारतात द्रविड, मंगोल, आर्य, मोगल संस्कृती संघर्षातून निर्माण झालेली सर्व वंशांची सरमिसळ पाहावयास मिळते.

यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे शेतीव्यवसाय करणारी खेडी हीच प्रामाणिकपणे शेतीत कष्ट करून सर्वांच्या पोटापाण्याची तरतूद करत असतात. तर शहरे ही ऐदी, आईतखाऊ लोकांची वसतीस्थाने असतात, नेमाड्यांची ही धारणा असल्याने त्यांनी हडाप्पा व मोहेनजो-दडो ही उत्खननात सापडलेली शहरे एकेकाळी ऐदीपणामुळेच नष्ट झाली, हे निरीक्षण त्यांनी 'हिंदू...' मध्ये नोंदविले आहे. इंग्रजी राजवटीत इतर राजवटींपेक्षा अत्यंत वाईट वागणूक शेतकऱ्याला मिळाली. शोषण करणारे इंग्रज लोक केवळ स्वतःचा स्वार्थ साधत. भारतातील शेतीचा कच्चा माल इंग्लंडमध्ये नेवून त्यावर प्रक्रिया करून पुन्हा भारतीय बाजारपेठेतच तो विकायचा. कवडीमोलाने शेतकऱ्यांकडून घेतलेल्या शेतीमालातून लाखो रुपये मिळविण्याचे तंत्र इंग्रजांना गवसले होते. इंग्रजांनी शेतकऱ्यांना लाचार करून ठेवले. आज इंग्रज नसले तरी त्यांनी निर्माण केलेली लाचारीची पद्धत आजही बंद झाली नाही. आजही सरकारी कार्यालयांत छोट्याशा कामासाठी अधिकाऱ्यांचे तोंड धरावे लागते. अपमान पचवावे लागतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळात शेतकऱ्याकडे पैसा सोडून सर्व काही असायचे. खेडोपाड्यात ब्रिटिश काळात ना चांगल्या शैक्षणिक सुविधा होत्या ना आरोग्याच्या सुविधा. कोणत्याच पायाभूत सुविधा खेड्यात नसायच्या याउलट शहरे मात्र इंग्रजांनी विकसित केली. तत्कालिन शेतकऱ्यांच्या अवस्थेचे प्रत्ययकारी चित्रण 'हिंदू...'मध्ये अनेक ठिकाणी येते. उदा. ''घरातले सगळे लहान बहिणींसकट शेतात, मळ्यात, कोणी खळ्यात राशीला झाडू लावते, कोणी बैल फिरवून झाल्यावर मदन डालींनी भरते. भावडू बैलांची पद्धतशीर गोल गोल पात चालवतो. उफणणी वडील तिव्हारावर उभे. सकाळपासून वारा पडलेला. वळनांचा पाऊस आला तर हे मदनाचे ढीग कुठे झाकायचे? वर्षाचे कष्ट पाण्यात जातील. वडील चिडचिड करत आहेत. लहानसा मी तिव्हाराखाली उभा राहून वर उंच वडलांकडे रागानं पाहत पाट्या भरून ठेवतो. शाळा बुडवावी लागल्यानं मी तिरसटासारखा करतो आहे. अंगावरती रज खाजवत आहे. भावडूला वडील किती दामटून घ्यायचे, पण तो मोठ्या मनाचा होता. प्रसन्न वृत्तीचा. ऋजू. कधीच कुणाबद्दल अढी नाही ठेवायचा. मी क्षुद्र मनाचाच आहे. वडलांवर डूक धरूनच हातात घमेली घेऊन उभा राहायचो. अचानक एखादी झुळुक आली की वडील भरभर पाटी रिकामी करून खाली फेकायचे. तोवर दुसरी खाली पायाशी मी धरून ठेवलेली असायची, ती उचलायचे. वारा येत

नाही म्हटल्यावर मी समोरच्या थोरातल्या सरड्याकडे डोळे लावून पाहतो. पाटी भरून ठेवायला विजेची चपळाई लागते. ती माझ्यात येत नाही. मी पळत जाईपर्यंत दुसरीही पाटी उपणलेली आणि तिसरी तर भरलेलीच नाही. सोन्यासारखा वारा जातो आहे. खंड्या ऽऽ, फाऽऽट थोबाडावर. आसवांनी मला पाटी कुठे ठेवायची ते नीट दिसत नाही. मी आता वेगाने पाट्या देतो पण डोक्यात शाळा, गुरुत्त्वाकर्षण आज कोणती कविता पाठ करून आणायला सांगितली होती?

> आली जरी कष्टदशा अपार
>
> न टाकिती धैर्य तदापि थोर
>
> केला जरी पोत-
>
> की केली जरी पोत? केला जरी पोत बळेचि खाली
>
> ज्वाला तरी तो वरती उफाळे

पुढे तो आलं म्हणजे केला जरी च असणार. पुन्हा खंयाऽऽ लक्ष कुठेय तुझं? फाऽट-फाऽट. पाय घसरून मी कुटावर उबडा पडतो. तोंडात कूट. सालदार सांडू आणि भावडू पळत येतात. मातेरं पाखडत बसलेली धनाबय महारीण मला जवळ घेते. सोनूफुई चांभारीण, अंबूमांगीण माय बलुत्यासाठी उभ्या असतात. त्या आपापसात म्हणतात, कुणब्याची जात अशी राक्षसच माय. मारतो किती रे इठू पोराले? एवढासा जीव दुपारभर अढी उभा आहे. आमची पोऱ्हं नाही एकणार भौ असं. मी हमसून हमसून धनाबयच्या ओच्यात रडतो.

वाऱ्याची वाट पाहा, पावसाची वाट पाहा. उन्हाचीही पाहा. वर्षभर असंच. हेच तिफणीमागून फसास्सा ओढापाय लटपटताहेत, पण आटपा अंधार व्हायच्या आत... खराब धंदा. बैल, म्हशी चारा पाणी. हे तर दिवसाचे तिन्ही वेळ डोक्यात ठेवूनच. अभ्यास, लिहिणं वाचणं सांभाळून. आपण आडातून पोहऱ्यामागून पोहरे ओढत राहतो. गुरं पीत राहतात. पाणी पाजतांना म्हशीनं पायावर पाय दिला तो अजून लालेलाल जळतो आहे. कोणाला सांगावं? घरी आहेच कोण? अंधार पडताना सगळे येतात, की रांधायची न् खायची गर्दी. उलट आपल्यावर ढेपातेल्याकडून ढेप आणली होतीस नं रे? फोडून ठेवलीयेस नां रे? चारा टाकलतास का नाही रे? जा, महारवाड्यात जा, आपल्या शांतू मावशीला उद्या रोजानं ये म्हणा. येतांना बैलायचं मीठ आण दुकानातून पाच किलो. पोतं बरोबर ने. शेतकऱ्याच्या घरातली मुलं म्हणजे घड्याळातली लहानलहान चाकं. सतत मोठ्या चाकांकडून गरगर फिरवली जाणारी. काय सालं नशीब. हे रोजचंच.'' (हिंदू... पृ. ६३ व ६४)

गावातील बलुतेदार-अलुतेदारांचा कैवारी शेतकरी सर्वांच्या पोटा-पाण्याची सोय त्यालाच करावी लागे. त्यामुळे शेतकऱ्याच्या घरादाराला प्रचंड कष्ट करावे लागत असत. एवढे काबाडकष्ट करूनही अनेकदा शेतकऱ्याच्या खिश्यात छदाम नसायचा. त्याच्या घरी धान्य असायचं पण पैसे नसायचे. स्वातंत्र्योत्तर काळात यामध्ये हळू-हळू सुधारणा झाली. लोकशाहीमुळे गावाचे नेतृत्व करणाऱ्या शेतकऱ्याला ग्रामपंचायत, सोसायट्या, विविध संस्था, आमदार, खासदार असे पुढारपण करायची संधी मिळू लागली. सन १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळालं. आणि नवनवीन योजनांच्या

माध्यमातून सुधारणा सुरू झाल्या. सन १९६३ च्या दरम्यान 'हिंदू...'तील नायक खंडेराव मोहेनजो-दडो उत्खननाच्या युनेस्को पुरस्कृत प्रोजेक्टरवर असताना त्याचे वडील विठ्ठलराव यांचा मृत्यू झाला. त्यामुळे तेथून घरी यायला तीन दिवस प्रवास करणाऱ्या खंडेरावच्या मनात वडिलांबद्दल, शेतीबद्दल भावी करियरबद्दल अनेक विचार येतात. स्वातंत्र्योत्तर बदलांचे प्रतिबिंब असलेले खंडेरावच्या वडिलांचे हे कादंबरीतील वर्णन पाहा. ''वडील जे शेकडो उलाढाली करत असायचे, हजारो गोष्टी करत असायचे ते आता शांत झाले. लवकर घरी पोहोचलं पाहिजे खंडेराव. इकडे तिकडे नोकरीसाठी गेलेल्या, खटल्यातल्या १५-२० चुलत्यांना, चुलत भावांना दरवर्षी शेतीचे खेळचे पैसे न चुकता मनीऑर्डर केले जायचे, हे हिशेब. रोजचे मजुरीचे हिशेब. शिवाय पंढरपूरच्या विठ्ठल मंदिर ट्रस्टचे हिशेब-एक पूर्ण भंडारी ह्या नुस्त्या हिशेबाच्या वह्यांनीच भरलेली. हरित क्रांतीमुळे आलेलं पुढारीपण. एकाच पिढीत केवढे उलटे सुलटे बदल. स्वातंत्र्य. राजकारण. आपल्या आपल्या लोकांसाठी झिजणं. सत्तेचा मोह टाळून वडलांच्या फुकट महाजनक्या. आधी आमच्या लहानपणी इंग्रजी राज्यात शेतकऱ्याला काय किमत होती? आता डझनभर सोसायट्यांची संचालक मंडळं, बँकांचे अध्यक्ष, आमदार-खासदार-पुढारी-किती लोकांचं वडलांच्याशिवाय पान हलायचं नाही. शंभर लोकांचं पोट सांभाळणारे. सकाळपासून भेटायला येणारेच किती-मजूर, रोजदार, महीनदार, सालदार, भाडेकरू, राखणदार, ट्रॅक्टर चालवणारे, पाण्याची इंजिनं चालवणारे, व्यापारी-असा जीवघेणा सामाजिक कारभार आपल्याला जमेल? एवढी धावपळ? किती लोकांना ते मदत करायचे? सोयरिका जुळवण्यापासून काडीमोड घेणारे सगळ्यांना आपल्याबरोबर लागायचे, आधार म्हणून.'' (हिंदू...पृ. ६१)

भारतीय खेड्यांमधील गावगाड्याचा आधारभूत कणा म्हणजे शेतकरी. अठरापगड जातींचा बहुजन समाज हजारो वर्षे गुण्यागोविंदाने गावात राहीला. शेतकऱ्याने गावाला आधार दिला आणि गावाने शेत करण्यासाठी त्याला बळ पुरविले, साधने उपलब्ध करून दिली. लोकशाहीत आपोआपच विविध संस्थात्मक राजकारणाच्या निमित्ताने नेतृत्व करण्याची संधी त्याला मिळाली. हरितक्रांतीमुळे त्याच्याकडे चांगला पैसा आला. सुधारणा झाल्या. पाण्यासाठी इंजिन, ट्रॅक्टर मशागतीसाठी. साखर कारखाने, दुध डेअऱ्या यामुळे निश्चितपणे त्याचा आर्थिक स्तर उंचावला. ह्या सर्व कृषिजीवनातील बदलांचे, समकालीन वास्तवाचे प्रतिबिंब 'हिंदू...'मध्ये उमटल्याचे दिसून येते.

३.४.३ इंग्रज-होळकर संघर्ष

खानदेशातील मोरगाव हा होळकरी सरदेशमुखीचा असल्याने मोरगावकरांना चोरांची अथवा होळकरांनी सांभाळलेल्या पेंढाऱ्यांचीही भीती मोरगावला नव्हती. होळकरांचे कर्तबगार वारस राजे यशवंतराव होळकर प्रयत्नांची शर्त करून ब्रिटिशांशी लढत होते. विहिरींमध्ये विष टाकून ब्रिटिश फौजा गारद करत होते. इंग्रज थकले. शिंदे, नागपूरचे भोसले, पुण्याचे पेशवे सर्वांनी इंग्रजांपुढे नमते घेतल्याचे चित्र दिसत होते. त्यामुळे या सर्वांवर राजे यशवंतराव होळकर चिडून होते. त्यांनी पाळलेले पेंढारी म्हणजे मुसलमान पठाणांची फौज. ही लुटमार करण्यात, गावांवर धाडी टाकण्यात, अत्याचार

करण्यात वाक्‌बगार. होळकरांचे निष्ठावंत पेंढारी इंग्रज धार्जिण्यांना गारद करण्याच्या इराद्याने धाडी टाकत असत. वास्तविक ''मराठ्यांनी देशभर पेंढारी संस्कृती जोपासली. मध्य आणि उत्तर हिंदुस्थानात शिद्यांचे पेंढारी. माळवा-खानदेश-नेमाडात होळकरांचे पेंढारी आणि पुण्याला पेशव्यांचे. इतरांना खाऊन टाकल्यानंतर ह्यांनी एकमेकांना खायला सुरुवात केली... मोरगावावर पेंढाऱ्यांची इतिहासप्रसिद्ध धाड पडण्याआधी हरिपुरा हे लभान्या लोकांचं पूर्ण गावचं गाव जमीनदोस्त झालं होतं.'' (हिंदू... पृष्ठ ९९)

या पार्श्वभूमीवर खंडेरावचे सातवे पूर्वज नागोराव हे विशीतले तरुण, सळसळते रक्त; ते इंग्रजांना जाऊन मिळाले व ब्रिटिशांनी मोरगावच्या मदतीला आपल्या फौजा पाठवल्या. तेव्हापासून मोरगाव इंग्रजी अमलाखाली आले. त्यानंतर इंग्रजांनी खेड्यातील शेतकरी वर्गाचे शोषण सुरू केले. जंगलातील वाघ मारले. रानटी जमातींचे उठाव दडपले. भयानक वृक्षतोड केली. अशा इंग्रजांना वेसण घालण्याचे प्रयत्न नंतर तात्या टोपे, तंट्या भिल्ले वगैरेंनी केले. कालांतराने खंडेरावचे चुलते हुनाकाकांनी स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान दिले. सशस्त्र उठाव करण्याच्या अनेक घटनांमध्ये हुनाकाका होते. त्यांना ब्रिटिशांनी पकडलं आणि फासावर लटकवलं. हा सर्व एतद्देशीय आणि इंग्रज संघर्ष या कादंबरीत समकालीन सामाजिक वास्तव म्हणून येतो.

३.४.४ फाळणी

सन १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळालं, परंतु मायदेशी जाताजाता इंग्रजांनी देशाचे दोन तुकडे करणारी भारत आणि पाकिस्तान अशी फाळणी केली. या फाळणीमुळे लाखो लोक विस्थापित झाले. आयुष्यभर पै पै करून जमवलेली इस्टेट अनेकांना सोडावी लागली. लाखो हिंदू आणि मुसलमान लोकांना फाळणीची झळ बसली. श्रीमंत लोकांना फारसा फरक पडला नसला तरी, सर्वहारा गरीब वर्गाला फाळणीची तुलनेने जास्त झळ बसली. हिंदू-मुसलमान दंगे सुरू झाले. खुलेआम कत्तली झाल्या, दोन्ही धर्मांतील मूलतत्त्ववाद्यांनी आपल्या धर्माबद्दल कडवे प्रेम व दुसऱ्या धर्मांबद्दल पराकोटीचा द्वेष सामान्य लोकांमध्ये निर्माण केला. दोन्हीकडच्या दीड कोटी लोकांना आपला देश सोडावा लागला. जवळपास वीस लाख लोक मारले गेले. फाळणीच्या परिणामांची चर्चा 'हिंदू...'मध्ये आली आहे. फाळणीमुळे निर्माण करण्याचेही अनेक प्रयत्न झाले. हे सर्व समकालीन वास्तव या कादंबरीत येते.

३.४.५ शिक्षण

भालचंद्र नेमाड्यांच्या सर्व कादंबऱ्यांचे नायक हे एक तर विद्यार्थी किंवा प्राध्यापक आहेत. 'कोसला'चा नायक चांगदेव पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजच्या बी.ए.चा विद्यार्थी आहे. तर 'बिढार', 'हुल', 'जरीला'. 'झूल'चा नायक चांगदेव पाटील हा प्राध्यापक आहे. नोकरीच्या निमित्ताने दरवर्षी भटकंती करावी लागल्याने महाराष्ट्राच्या विविध भागांतील समकालीन शैक्षणिक, सामाजिक वास्तव या कादंबऱ्यांच्या कथा भागात येते. त्यांच्या 'हिंदू...' या कादंबरीचा नायक खंडेरावही शिक्षण

क्षेत्राशी संबंधित आहे. तो पुण्याच्या डेक्कन कॉलेजचा पुरातत्त्वशास्त्राचा विद्यार्थी आहे. तत्पूर्वी औरंगाबादच्या विद्यापीठात त्याने इतिहास विषयातून एम. ए. केले आहे. तेथेही तो सुट्टीत पर्यटकांना माहिती देणाऱ्या गाईडचा एक कोर्स पूर्ण करतो. येथेच त्याची तेरच्या उत्खनन कॅम्पसाठी निवड होते.

औरंगाबादमध्ये शिक्षण घेताना नामांतराची चळवळ, विद्यापीठ प्रशासन, कुलगुरू, कुलसचिव यांच्या निवडीतील राजकारण, जातिवादी संघटना, प्राध्यापकांमधील अशैक्षणिक घटक, याउलट अशाही परिस्थितीत विद्यार्थी घडविण्यासाठी प्रामाणिकपणे अध्यापन आणि अध्यापनेतर कष्ट घेणारे प्राध्यापक हे सर्व वास्तव खंडेराव आपल्या तटस्थ दृष्टीने टिपतो.

सदोष परीक्षापद्धती, पेपर सेटिंगमध्ये प्रश्न कसेही टाकणारे, गलिच्छ राजकारण करणारे प्राध्यापक, योग्य मूल्यमापन केल्यास नापास मुलांना रिचेकिंगला अर्ज करून पैसे घेऊन मार्क वाढवून देणारे कुलसचिवांचे एजंट, गुणी प्राध्यापकांचे तीन-तीन वेळा प्रमोशन डावलणारे कुलगुरू, कुलसचिव व इतर घटक, सिनेटच्या मीटिंगमध्ये गोंधळ घालणारे सदस्य. चांगल्या प्राध्यापकांच्या विषयास विद्यार्थी मिळू न देणारे या व्यवसायातील कसलेले दांभिक प्राध्यापक इत्यादी अनेक घटनांनी खंडेराव अस्वस्थ होतो.

प्रा. दवे सरांसारखे चांगले लोकही या व्यवस्थेत असतात; परंतु आता दवे सर व मॅडम येथील अशैक्षणिक वातावरणास कंटाळून मुंबई विद्यापीठात जाणार आहेत. इतिहासाचे गुणी प्राध्यापक पवार सरांच्याही मनात विद्यापीठ सोडण्याचे विचार येतात. चांगली माणसे टिकलीच नाहीत तर विद्यापीठ नावाची उच्च शिक्षणातील मोठी संस्था कोलमडून पडल्याशिवाय राहणार नाही. दवे सर खंडेरावला चांगल्या वाचनाबद्दल मौलिक मार्गदर्शन करतात. ''एक : मूळ ग्रंथ वाचा. महाभारत, रामायण, उपनिषदं, कुराण, बायबल-मुळातूनच वाचा. याच्यावर बोलणाऱ्यांनी हे ग्रंथ मुळात वाचलेले नसतात. दोन : आधी भारी ग्रंथ वाचा, नंतर दुय्यम, हलके वगैरे. म्हणजे इलिएड, ओडिसी, अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी रेसीन, तोलस्तोय, रोस्तोवस्की, शेक्सपिअर, फ्लाबेर, सर्वान्तिस आणि आपल्या देशातले मघाशी दहाबारा सांगितलेले-तुकाराम, गालिब, भर्तृहरी वगैरे. हे वाटतात तितके फार नाहीत. माझ्या मते शंभरेक. तीन : केव्हाही आपल्या मातृभाषेतूनच हे सगळे ग्रंथ वाचावे. भाषांतरं खराब असली तरच इंग्रजी भाषांतरं वाचा, पण इंग्रजीच खराब येत असेल तर ते सारखंच पडतं. चार : आपल्या भाषेची म्हणून काही भारी पुस्तकं गणावीच लागतात, ती वाचलीच पाह्यजेत. उदाहरणार्थ, लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी-काही वेच्यांमधून, काही पूर्ण. पाच : शक्यतो पंचवीस वर्षांपूर्वीची पुस्तकंच वाचा. सहा : मासिकं, वर्तमानपत्र मुद्दाम होवून वाचू नयेत... विद्याव्यवसायात अध्यापन, संशोधन वगैरेंसाठी उपयुक्ततावादी खराबसुद्धा वाचावं लागतं, हे नाइलाजी वाचन वेगळं. खंडेराव, एक लक्षात ठेव- काहीही न वाचणं आणि खराब वाचणं ह्यात तसा काही फरक नाही उलट निरक्षर लोक, ज्यांनी काही वाचलेलंच नसतं, त्यांनी खराबसुद्धा काही वाचलेलं नसतं, म्हणून ते लोक जास्त शहाणे असतात. आपल्या देशात ह्या लोकांमुळेच सांस्कृतिक समतोल टिकून आहे. अर्थात आपल्या समृद्ध मौखिक अक्षरसाहित्याच्या प्रभावामुळे हे घडतं, हा मुद्दा वेगळा.'' (हिंदू... पृष्ठ ५०६ व

५०७) अशा प्रकारे शिक्षणव्यवस्थेचे अस्वस्थ करणारे समकालीन वर्तमान वास्तव नेमाडे 'हिंदू...'मध्ये टिपतात.

३.४.६ दुष्काळ

'हिंदू...'मध्ये खंडेरावच्या लहानपणी पडलेल्या दुष्काळाचे वर्णन प्रत्ययकारकपणे नेमाड्यांनी केलेले आहे. विसाव्या शतकात १९४० ते १९४५ च्या दरम्यान पडलेला हा भीषण दुष्काळ असावा. दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळेच मोहेनजो-दडोचं सगळं खोरं ओस पडलं असावं. ख्रिस्तपूर्व २००० मध्ये हे सर्व उजाड झालं असावं, असं निरीक्षण लेखक नोंदवितो. महाभारतातील दुष्काळाचे चित्रण, ख्रिस्तपूर्व पाचव्या शतकात अनेकवेळा पडलेले दुष्काळ, सहाव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत अनेकवेळा पडलेले दुष्काळ, सहाव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत अनेक वेळा दुष्काळ पडलेला आहे. काहीवेळा सलग दहादहा वर्षे दुष्काळ पडल्याची उदाहरणे आहेत. अशावेळी अन्न, धान्य, पाणी याविना माणसाने जगायचं कसं? युद्धांची चर्चा, दखल घेतली जाते पण दुष्काळात किती पटींनी लोक मरतात? याची दखल लोक घेत नाहीत. खरेतर युद्धांपेक्षा दुष्काळ भयानक संकट म्हणून माणसापुढे उभा असतो. व्यक्तीच्या माणुसकीची ती जणू परीक्षाच असते. अशा या दुष्काळात खंडेरावची मावशी टी.बी. झालेल्या नवऱ्याला तिथेच ठेवून आपली मुलगी सुधीला घेवून मोरगावला आपल्या बहिणीच्या घरी आश्रयाला येते. तिच्यावरून आई व सीताआजी या सासू-सुनांमध्ये भांडण झाल्याने ती आता जनावरांच्या गोठ्याला लागून असलेल्या सामानाच्या खोलीत राहू लागली. सरकारने सुरू केलेल्या रस्त्यावर खडी फोडण्याच्या कामावर जाऊ लागली. तिला जेवण देण्यासाठी खंडेराव तिच्या कामावर जात असे. या भीषण अशा दुष्काळाचे प्रदीर्घ वर्णन 'हिंदू...'त येते, ''एकसारखी तीन वर्षे आखाडीची गेली. पहिल्या वर्षी अतिवृष्टीनं पिकं गेली. वर्षभर घरातलं होतं ते रांधलं. महारामांगांनी, भिल्ल, पावरा, कोरकूंनी रानातला झाडपाला ओरबाडून पोटं भरली. त्यानंतरच्या वर्षी ढग नुस्ते वरून सरकताना दिसले होते. धोंड्या नाचवून, बेडक्या फिरवून काही उपयोग झाला नाही. दिवाळीत एक दिवा लागला नाही. कुणब्यांची घरं रिकामी झाली, तर शेतमजूर आणि बलुत्यांची काय पोटं भरणार? गुरंढोरंही मरायला लागली, त्यांना बाजारातसुद्धा कोणी घेईना. न विकल्या गेलेल्या आपल्या गुरांची नजर चुकवून शेतकरी त्यांना तिथेच बाजारात सोडून अपराधी चेहरे लपवत घरी परतायचे. त्यामुळे बाजाराच्या गावाभोवती मढीच मढी आणि घिरट्या घालणारी गिधाडं. लहान शेतकरी चिंचेचा पाला खाऊन, मुळं उकरून त्यावर जगत राह्यले. सातपुड्याच्या डोंगरातल्या वस्त्यांवरचे हाडांचे सापळे झालेले आदिवासी खाली उतरले. सकाळपासूनच गावात नवनव्या भिकाऱ्यांची रांग लागायची. हळूहळू गावविहिरींचं पाणीही आटलं. नदी खणून, झरे काढून गरीब लोक गढूळ पाणी प्यायचे, तेही आटलं. आता रात्री दरोडे पडायला लागले. हातात बरच्या, आसऱ्या, पहारी, सब्बळी घेऊन लोक आळपाळीनं झोपायला लागले. घरातल्या धान्याच्या कणग्या गोधड्यांनी झाकाव्या लागायच्या. मोठ्या शेतकऱ्यांची पेवांमधल्या धान्यावर गुजराण चालली. एकानं दुपारी, पेव उघडलं हे कळल्याबरोबर गावाबाहेरच्या लोकांच्या झुंडी धान्यावर तुटून पडल्या. तो शेतकरी तेव्हा डोक्याला हात लावून सगळं पाहत होता. (हिंदू... पृष्ठ १६७, १६८)

अशा प्रकारे समकीन वास्तवाची विविध रूपे भालचंद्र नेमाडे यांनी 'हिंदू...'मध्ये चित्रित केली आहेत.

३.५ 'हिंदू...'मधील स्त्रीचित्रण

भालचंद्र नेमाडे हे भारतीय स्त्रीचे दुःख सुरुवातीपासूनच आपल्या कादंबऱ्या व कवितांमधून मांडत आलेले आहेत. स्त्री विषयक त्यांचा दृष्टिकोन अतिशय मानवतावादी, उदार व निकोप आहे. पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रीवर होणाऱ्या अनन्वीत अत्याचाराविषयी ते नेहमीच कलेच्या माध्यमातून चीड व्यक्त करत आले आहेत. नैतिकतेच्या बुरख्याखाली भारतीय स्त्रीचा आत्मविश्वास खचविण्याचे कार्य पुरुषसत्ताक व्यवस्थेत अविरतपणे होत असते. अशाही अवस्थेत स्त्रीया जगण्याशी दोन हात करतात. अशा स्त्रीयांबद्दल कौतुक व आदराची भावना ते अनेकदा व्यक्त करतात. 'देखणी'मधील एका 'आत्महत्यारी' नावाच्या कवितेतील आत्महत्या करणाऱ्या स्त्रीला उद्देशून ते जगण्याच्या लढाईत जेव्हा जग आपल्याला सुखाने जगू देत नसेल तर असे आत्महत्या करून मरण्यापेक्षा त्यांच्या नाकावर टिच्चून जगणे हाच विजय असतो, असा नवा क्रांतीकारी सल्ला ते देतात. 'हिंदू...'मधूनही अशा असंख्य स्त्रीया विपरित परिस्थितीत जीवनसंघर्ष करत असल्याची उदाहरणे पाहावयास मिळतात. अशा काही स्त्रीयांची उदाहरणे पाहू-

३.५.१ तिरोणी आत्या

खंडेरावचे वडील विठ्ठलपंत सारखे आजारी पडायचे म्हणून सीता आजीने दत्ताचा नवस केला व मुलगी झाली तर तुला वाहीन. कालांतराने तिच्या पोटी तिरोणी आत्याचा जन्म झाला. चौदा वर्षे घरात लाडाने वाढलेल्या तिरोणी आत्याचा दीक्षाविधी मोठ्या धुमधडाक्यात पार पडला. तिचे नामकरण हिराईसा असे करण्यात आले. तेव्हा महानुभावियांचा मार्ग महाराष्ट्रातील रिधपूरपासून खंडवा, रतलाम, ग्वाल्हेर, मथुरा, जालंधर, लाहोर, पेशावर ते काबूलपर्यंत म्हणजे पाकिस्तानपर्यंत पोहोचलेला होता. खानदेशातील मोठे महंत सारंगधर जावळे बुवा यांच्या सोबत तिरोणी आत्याला दीक्षा विधीनंतर पाठवून देण्यात आले.

सिंधप्रांतात मोहेनजो-दडो प्राजेक्टवर तीन महिने काम करत असलेला खंडेराव इकडे पाकिस्तानातील प्रत्येक महानुभाव मठाला भेट देतो व आपली आत्या कोठे दिसते का ते पाहातो. त्याला दिलावर, सलीम, अली तसेच डॉ. मंडी ह्या सर्व सहकाऱ्यांनी तिरोणीचा शोध घेण्याकरिता खूप मेहनत घेतात. परंतु तिरोणीचा शोध घेण्यात सर्वजण अपयशी ठरतात. जन्माला येण्यापूर्वी आठ वर्षे आधीच तिला देवाला वाहण्याचे ठरविले असते. ''तिरोणी आत्या. आजन्म ब्रह्मचारी? जन्मापूर्वी पूर्वजन्म ब्रह्मचारी. देमती, दैवे करावे ते केले. पुरुषे करावे ते ढेले... ही नवसाची मुलगी, म्हणून तिरोनीला जन्मापासूनच महत्त्पन आलं. त्यातून तिचे दाट लांब केस त्रिवेणी नावासारखे... वाड्यात खेळणाऱ्या पोरींमध्ये उजळून निघणारं तिचं रूप पाहून पाहुणे कनवाळू हात तिच्या लांब केसांवर फिरवत म्हणायचे, ही का ती मानभावीण बाई? माय. माय. माय. खेळून घे माय थोडे दिवस.

एकदाची डोई बोडली नं् काजळीत भिजलेली काळी चिरगुंट अंगावर चढली...'' (हिंदू... पृ. ५२ व ५३)

अशा या तिरोणी आत्याची आठवण वारंवार खंडेरावला येते. एकदातरी ती कुठेतरी आपल्याला भेटेल, तिची विचारपूस करता येईल अशी भाबडी आशा वाटणाऱ्या खंडेरावास प्रयत्न करूनही अखेरपर्यंत तिरोणी आत्या सापडत नाही.

३.५.२ चिंधू आत्या

खंडेरावच्या आजोबांची पहिली पत्नी रखमाआजीच्या दोन मुली व एक मुलगा वारला. नंतर तिने चिंधू आत्याला जन्म दिला. पुढे ती गरोदरपणात वारली. ती वारली म्हणून कुंडलीक आजोबांनी सीता आजीशी लग्न केले. तिला विठ्ठल पंत, हुना आणि त्रिवेणी अशी तीन मुलं झाली. वास्तविक चिंधू आत्यालाच देवाला वाहावयाचे होते मात्र चिंधू आत्याच्या आजोळच्या लोकांनी लहानपणीच त्यांच्या गावातील देशमुखांच्या घरातील मुलाशी चिंधूचे लग्न निश्चित करून टाकले. त्यामुळे चिंधू आत्याला देवाला वाहता आले नाही. तिच्याऐवजी तिरोणीला देवाला वाहण्यात आले.

परंतु मोठी झाल्यानंतर धरनगावच्या उंटमारे देशमुखांच्या वाड्यात गेल्यानंतर बडा घर पोकळ वासा या वाक्प्रचाराचा प्रत्यय आला. मारहाण करणारा नवरा, सवती मत्सराने पछाडलेल्या दोन सासवा, बिनलग्नाच्या नणंदा, वाड्यातील अंधारी कोठारे हे सर्व असह्य झालेली चिंधी कशीबशी उंटमारे देशमुखांच्या घरात दिवस कंठू लागले. नंतर छळ असह्य झालेली चिंधू आत्या जत्रेत माडीया वैदूबाईने दिलेले वाघांच्या केसांचे औषध बासुंदीत घालून नवऱ्याला मारण्याचा प्रयत्न करते. त्यात यशस्वी होते. नंतर पंढरपुरच्या यात्रेत एक कोळीण बाई आत्याचा तातडीचा निरोप सीता आजीला देते व सीताआजी विठ्ठलाला चार दांडगे मध्यस्थ सोबत घेवून पाठविते व ते चिंधू आत्याला तिच्या तायडी व बायडी या मुलींसह सुखरूप मोरगावला माहेरी आणतात. चिंधू आत्याचे पुढील आयुष्य मोरगावातच जाते. तिच्या दोन्ही मुलींची लग्ने तिच्या म्हणण्याप्रमाणे शहरातील स्थळे पाहून करून दिली जातात.

३.५.३ सीता आजी

भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' कादंबरी, 'देखणी' काव्यसंग्रह तसेच इतर कादंबऱ्यांमध्येही अनेकदा आजीचे उल्लेख येतात. कधी तिच्याविषयी तक्रार व्यक्त करणारे तर कधी तिनं घरासाठी, शेतीसाठी उपसलेले कष्ट, मुला नातवंडावरील तिची निर्व्याज माया असे अनेक उल्लेख येतात. परंतु आजीची व्यक्तिरिखा हिंदू... तून ठळकपणे वाचकांसमोर येते. सवतीची मुलगी 'चिंधी'ला सख्ख्या आईच्या मायेची उब देणारी सीता आजीची व्यक्तिरेखा प्रभावीपणे नेमाडे उभी करतात.

'हिंदू...' चा नायक खंडेराव याची सख्खी आजी सीता आजी. खंडेरावचे आजोबा कुंडलीक यांची दुसरी पत्नी. पहिली पत्नी रखमाआजी म्हणजे चिंधू आत्याची आई. ऐन पावसाच्या मोसमात शेती कामाची घाई प्रत्येक शेतकऱ्याला असते. अशात आजारपणाचे निमित्त होवून एकाएकी

रखमाआजी वारली. कालांतराने तिचा एक वर्षाचा किरकिरा मुलगाही वारला. छोटी चिंधी खूप रडायची. अशावेळी कुंडलिक आजोबांच्या निवर्ती नावाच्या काकानं आपल्या सासुरवाडीतील नात्यातील सीता आजीचं स्थळ सुचविलं. तिचंही पाळण्यातच पहिलं लग्न झालेलं. पण तिच्या सासरी मटन खात, दारू पित, तिला मारहाण व्हायची. त्यामुळ त्या घरी ती नांदायला तयार नव्हती. सीता आजीला पाहून झाल्यावर लगेचच पाट लावून पोरगी दुसऱ्याच दिवशी मोरगावात आणली. मोरगावात नांदायला आल्यानंतर घरासाठी तिने प्रचंड कष्ट केले. तिची आठवण बडोद्याला कोर्ससाठी गेलेल्या खंडेरावला बडोदाआजी सांगताना म्हणते, ''खरं सांगू खंडेराव, सीताकाकूमुळेच तुमची शेती एवढी पिकत होती. तिला सगळं माहित-कोणत्या शेतात कोणत्या बाजूची जमीन हलकी, कोणती भारी, कुठे पाणी साचतं, कुठे बांध फुटतो, कुठे काय पेरावं, पिकं कोणत्यावर कोणती आलटून पालटून घ्यावी, तुरीत भड लावले की तुरीवर आळी पडत नाही, टमाट्यात झेंडू लावला की टमाट्यावर कीड पडत नाही. माणसांना धान्य लागतं तसं गुरांनाही चारा, गायी वासरांना पाला, म्हशीला दानं-सगळं पेरलं पाहिजे. खरंच, आजी म्हणजे घरातला शेतीचा विश्वकोश होता. मलाही लहानपणी आजी बांधावर लहानसं वावभर शेत पेरायला द्यायची... महिन्यातून एकदा आजी भावडूला आणि मला चौरंगावर नागडं बसवून चाऱ्ही बाजूंनी भांडी घासतात तसं खंगऱ्या विटकुरानं अंग लाल लाल होईपर्यंत घसडून काढते आहे, मी मोठमोठ्यानं रडत ओरडत वाड्यात मांजन आणतो. आजी म्हणतच असते- पाहा, कशा घामाच्या वळा निघताहेत, पाहा, मळ उमळतो आहे, घासू दे. सख्खी आई असो, बहिण असो, त्यांच्या तुमच्याकडून काही तरी अपेक्षा असतात. पण आजी? शुद्ध माया. कळवळा. लळा. उबदार कुस. हलकी फुंकर. ती आस्था दुसऱ्या कुणाकडूनच मिळणं शक्य नाही... खंडेराव, तुझ्या आजीचं बोलणंच गोड. दारच्या महारणीशी, चांभारणीशी, तीच आपुलकी. भाकर खाल्ली व बहीन? काय खाल्लं? हा कोण? तुहा नातू? का रे राघू, बैस. त्याच्या डोक्यावरून हात फिरवत हयाती राहो तुझ्या नाताले. दारी फुटाणे डाळवं विकायला येणाऱ्या भोइणींनाही सीतामाय मायेनं म्हणणार, तुले कसं दारोदारी फिरनं पडतं माय? तुही लेकरं तुही कशी वाट पाहात असतील माय घरी? कसं रांडपण कठलं माय तुनं? कशी लाल लाल परी दिसस नवरा मेलता तव्हा. जाणु कशी पद्मीण. असू दे. बहीन, दिवस का मुक्कामी येता? जातीलच हे बी दिवस. हे सुखाचे दिवस कधी मुक्कामी येतात? उलट म्हातारपणाचे शेवटचे दिवस सगळ्यांचे वाईट जातात. वर्षभर आजी नुस्ती खाटेवरच पडून राह्यची. घरातल्या कोणाला तिचा हा खाटपसारा आवडायचा नाही. घरात सगळा शेतीचा पसारा. सगळ्या प्रकारचं धान्य, पोती, कोठ्या, कणग्या, मडकी. शेतकऱ्याच्या घरात वेळोवेळी शेतमाल सगळ्या घराचा कब्जा घेतो. खाटभरजागासुद्धा अपव्यय ठरतो. फळीवरून इकडे तिकडे उंदीर धुडगूस घालतात. एकदा कोणीतरी फळीवर ठेवलेलं कुलूप आजीच्या डोक्यावर पडलं. शेवटच्या दिवसात ही न भरून येणारी जखम. माणसांचे शेवट असे व्हावेत, हे दुःखद आहे. ॐ मणी पद्मे हुम. दुःखाचा कोणी कोणी शोध घेतला याचा शोध घे. नाहीतर आपणी दुःखात मरू. आणि आनंदात मरणाऱ्यांचा शोध? गरज नाही. दुःखच श्रेष्ठ आहे. दुःखामुळेच माणसं मायाळू होतात. उदा.

आजी. ... खंडेराव, तुझ्या आजीनं किती सोसलं, किती सोसलं, तुला सांगून पटणार नाही. (हिंदू... पृ. २१६, २१७)

३.५.४ लभाणी स्त्रीया

वारू, गजरा, इरदंती, खरखोती, आवंती, झेंडी आणि हरखू या लभाणी भटक्या जमातीच्या स्त्रीया, 'हिंदू...' कादंबरीतील महत्त्वाच्या व्यक्तिरेखा आहेत. खंडेरावच्या सातव्या पिढीतील नागोराव यांच्यापासून मोरगावसाठी खपलेल्या त्या स्त्रीया होत. पेंढाऱ्यांच्या धाडीत हरिपूरा हे लाभाण्यांचे गाव नष्ट झाल्यानंतर वारू व तिची मुलगी गजरा कसाबसा जीव वाचवून आश्रयासाठी मोरगावला आल्या आणि कायमच्या मोरगावकर झाल्या. ''हरिपुऱ्याचे हे लाभाणे फार पूर्वीपासून बैलगाड्यांच्या तांड्यांनी उत्तरेत सैन्याला रसद पुरवणारे धाडसी व्यापारी म्हणून प्रसिद्ध होते. त्यांचे आठ आठ दहा दहा बैलांनी ओढले जाणारे मोठ मोठे गाडे लढे म्हणून संबोधले जातात. ते धावा बसवण्यासाठी आमच्या गावच्या लोहारांकडे यायचे. खानदेशातलं धान्य स्वस्तात खरीदून चारचार पाचपाच पटींनी महाग भावानं उत्तरेत लष्करी छावण्यांमध्ये विकणरे हे दीड-दोन हजार बैलांचे तांडे सगळ्या जोखमी पार पाडून परतले, की हरिपुऱ्यात स्त्रीपुरूष मिळून धिंगाणा घालायचे. नाचगाणी, दारू, हरीण मोर यांच्या मासांच्या कढ्या वगैरे असा रात्रंदिवस धुमाकूळ की, वारकरी आणि महानुभाव लोकांच्या आमच्या गावातल्या कुणब्यांना कल्पनेतही पडणार नाहीत, अशी इष्ट कामस्वप्नं पडत राहायची. एकूण हे इहवादी लोक टाळण्याची आणि त्यांच्याशी कामापुरते संबंध ठेवण्याची अनेक पिढ्यांची सवय मोरगावच्या लोकांना लागून गेली होती.'' (हिंदू... पृष्ठ १००)

पुढे पेंढाऱ्यांच्या धाडीचे संकट जेव्हा मोरगाववर येणार होते, तेव्हा पेंढाऱ्यांनी मोरगावकरांची कुरापत काढायची म्हणून दोन स्त्रीया मागितल्या तेव्हा मोरगावच्या हितरक्षणासाठी स्वतःच्या मुलीसह-गजरासह-वारू पेंढाऱ्यांच्या छावणीत जायला तयार झाली. परंतु दरम्यान नागोरावांनी ब्रिटिशांशी संधान साधल्यामुळे ब्रिटिश फौजा मोरगावच्या मदतीस धावून आल्या आणि हे संकट टळलं.

वारू, गजरा या लभाणी स्त्रीयांवर आता गावातील प्रतिष्ठित लोकांच्या रखेली म्हणून राहावे लागते. परंतु त्याचे या स्त्रीयांना काहीच वाटत नाही. इरदंती आणि तिच्या मुली खरखोती व आवंती यांनी गुप्त रोगांवर झाडपाल्यांची नाना तऱ्हेची औषधे माहित करून घेतली होती. त्यामुळे मोरगाव आणि परिसरातील निरक्षर, गोरगरीब स्त्रीयांना त्यांचा मोठा आधार मिळाला होता. प्रसूतीचेही ज्ञान त्यांचा चांगलेच अवगत असल्याने हमखास त्यांचा उपयोग गर्भवती मातांना व्हायचा. त्यामुळेच लैंगिकदृष्ट्या मुक्त असलेल्या या स्त्रीयांनी समाजस्वास्थ्य टिकविण्यासाठी योगदान दिल्याने खेडोपाड्यातील स्त्रीयांनीही त्यांचा कधी दुस्वास केला नाही. खंडेरावच्या तरूणपणातील हरखूला इतर मुलींसारखे शिकवून स्वतःच्या पायावर उभे करावे, असा विचार झेंडी करते. झेंडी काळाप्रमाणे बदलू पाहात होती. तिने आपली मुलगी हरखूला चांगले शिकविले, शिक्षकाचा कोर्स करायला लावला. हरखू खंडेरावला आवडायची परंतु आपल्या वारकरी परंपरेतील वडिलांना हे अजिबात सहन

होणार नाही, याचीही जाणीव त्याला होती. दरम्यान शहरातील एक मुलाशी हरखूचे लग्न झाले. डॉ. मंडी ही खंडेरावची पुरातत्त्व संशोधक असलेली मैत्रीण जेव्हा संशोधनासाठी मोरगावात महिनाभर येवून राहते. तेंव्हा झेंडीच्या घरी जावून गुप्त कामशास्त्रीय अशी बरीच माहिती मिळविते आणि आपल्या डायरीत नोंदी टिपून ठेवते.

३.५.५ 'हिंदू...' तील इतर स्त्रीया

स्त्रीयांचे खडतर आयुष्य आणि स्त्रीजीवनातील दुःखांना वाचा फोडणारा मातृभावी दृष्टिकोण भालचंद्र नेमाडे यांनी 'कोसला', 'बिढार', 'हूल', 'जरीला', 'झूल' या कादंबऱ्या, 'देखणी' हा काव्यसंग्रह या प्रत्येक कलाकृतीत अभिव्यक्त केला आहे, हे दिसून येते. खंडेरावच्या घरातील हुनाकाकाची बायको असलेली आंधळी काकू, नवऱ्याला स्वातंत्र्य लढ्यात ब्रिटिशांनी फाशी दिल्यानंतर आयुष्यभर घरातील लहानसहान कामे करत आयुष्य कंठते. खंडेरावच्या वडिलांनी पंढरपूरला धर्मशाळेत एक खोली बांधलेली असते. उर्वरित आयुष्य मोरगावातील कोळ्याच्या एका वारकरी स्त्रीबरोबर परमेश्वराच्या सानिध्यात भजन कीर्तनात घालवायचे ठरविते. खंडेरावची आई ही सद्धा खंडेरावच्या मोठ्या कुटुंबातील जबाबदार, कर्तव्यदक्ष स्त्री आहे. सासूशी-सीता आजीशी-तिचे अधूनमधून भांडण होत असले तरी सर्वांना बरोबर घेवून जाण्याचे कसब तिच्यात आहे. भावडू, खंडेराव, बिजा, छबी, लाडकी या आपल्या मुलांवर तिचे खूप प्रेम आहे. खंडेरावचे वडील वारल्यानंतर वडलोपार्जित सोने-नाणे व एक लाखाची रोकड ती मुलींना वाटते, परंतु हे करताना ती आपला मुलगा खंडेराव याला विश्वासात घेत नाही त्यामुळे आई व खंडेराव यांच्यामध्ये थोडे अंतर पडते.

सिंधु मावशीचा नवरा टि.बी. ने आजारी असल्याने आपल्या मुलीला-सुधीला-घेवून ऐन दुष्काळात ती मोरगावला येते. पण आपल्या बहिणीला त्रास होवू नये म्हणून सरकारच्या दुष्काळी कामावर जावून राबराब राबते. कधी कधी तिला उपासतापास सहन करावा लागतो. वास्तविक चांगल्या श्रीमंत घराण्यातील खंडेरावची आई व मावशी असतात. पण मावशीवर आता ही वेळ येते. मुलीच्या सुखी संसाराचे स्वप्न पाहणारी मावशी शहरातील चांगले स्थळ सुधीला मिळावे असा विचार करते. परंतु शेवटी गावातच सुधीला तिला द्यावे लागते. शेवटी तिचा नवराही मरतो.

गावातील बलुतेदारांपैकी गुणाफुई चांभारीण हिने खंडेरावच्या वडिलांना भाऊ मानलेले असते. दरवर्षी भाऊबिजेला आपला तालेवार भाऊ काहितरी आपल्याला देईल या भाबड्या आशेने खंडेरावच्या घरापुढील अंगणात तासन्तास येवून उभी राहत असे. अंबूमाय मांगीणीने खंडेरावचा जन्म झाल्यानंतर स्वतःच्या अंगावरील दूध पाजून त्याला मोठे केलेले असते. कारण खंडेरावच्या आईचे दूध अचानक कमी झालेले असते. धनाबय महारीण हिचा नवरा गावाला उपद्रव ठरणाऱ्या वाघाला मारायला जातो व संभू वाघाच्या हल्ल्यात मरतो. धनाबय आणि तिचा मुलगा हरचंद यांना खंडेरावचे वडील गोठ्यातील शेण काढण्याचे काम देतात. धनाबयचा खंडेराववर खूप जीव असतो. औरंगाबादला एम.ए.चे शिक्षण घ्यायला मराठवाड्यात गेलेल्या खंडेरावला विस्थापितांचे विद्यापीठ

परिसरातील वास्तव्य पहावया मिळते. या विस्थापितांमधील कमरून कडून खंडेराव अंडी विकत घेत असतो. एक दिवस कमरून दिसत नाही. तिच्या दोन लहान मुलींना तो विचारतो, तेव्हा मुलगी म्हणते ''एक दिन पापाने ऐसा मारा ऐसा मारा, मर गयी'' वास्तविक कमरून नवऱ्याच्या कचाट्यातून सुटून खंडेरावच्या घरी जिन्यावरून धापा टाकत आली होती, म्हणाली, ''हैद्राबाद केगाडी में मुझे बिठा देंगे? मेरेपास खाली इत्ते पैसे है.'' पण तेरच्या उत्खनन कॅम्पवर जाण्याच्या लगबगीत खंडेरावने तिच्याकडे दुर्लक्ष केले. आणि तिथून परत आपल्या झोपडीवर आलेल्या कमरूनला नवऱ्याने मारून टाकले. खंडेराव मनातल्या मनात विचार करतो ''खंडेराव, हा तुझ्या नामर्दपणाचा ताम्रपट म्हणून तू मनातल्या मनात चिणून टाकला आहेस. एक अत्यंत नीचेची गोष्ट.'' (हिंदू... पृ. ४८१)

अशा तऱ्हेने भारतीय समाजातील स्त्रीयांच्या व्यथांचे व संघर्षाचे विदारक वास्तव 'हिंदू....'मधून भालचंद्र नेमाडे मांडतात.

३.६ 'हिंदू...'चा नायक खंडेराव

खंडेराव ही 'हिंदू...' कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. कादंबरीच्या सुरुवातीस पुण्यातील डेक्कन कॉलेजमधील पुरातत्त्वशास्त्र विभागाचा विद्यार्थी असलेल्या खंडेरावची सिंध प्रांतात मोहेनजो-दडोच्या युनेस्कोच्या प्रोजेक्टरच्या माध्यमातून होणाऱ्या उत्खनन कार्यासाठी त्याची निवड झाली आहे. तरुण पुरातत्त्व संशोधक असणाऱ्या खंडेरावला मानवी जाणिवांच्या इतिहासावर पीएच.डी.चे संशोधन पूर्ण करावयाचे आहे. त्यासाठी केलेली तयारी तो साखळियाचा सर या त्याच्या मार्गदर्शक होऊ शकतील अशा गुरूंना सांगतो. ही जवळपास तीन तास साधकबाधक चर्चा इंग्लंडवरून संशोधनासाठी आलेल्या तीस वर्षीय स्कॉलर डॉ. मंडीपुढे होते व खंडेरावचा अभ्यास पाहून ती आश्चर्यचकित होते. तीन महिने या कॅम्पवर काम करणाऱ्या खंडेरावला वडील मृत्युशय्येवर असल्याची तार येते आणि तो गावी यावयास निघतो. तिथून निघाल्यानंतर पाकिस्तान सीमा ओलांडून आत येऊन पुन्हा दोन दिवस असे एकूण तीन दिवस त्याचा मोरगावपर्यंतचा प्रवास घडतो. या प्रवासात आयुष्यभराच्या सबंध आठवणी डोळ्यांसमोरून तरळून जातात.

वर्तमानाची मुळे भूतकाळात असल्याने 'हिंदू...' संस्कृतीच्या ५००० वर्षांपासूनच्या स्थितिप्रिय, संस्कृतिक इतिहासाचे अनेक संदर्भ त्याला त्याच्या अभ्यासामुळे तार्किक विश्लेषण करावयास भाग पाडतात. खेड्यातील कृषिजीवन, स्त्रियांचे अविरत शोषण, ब्रिटिश-एतद्देशीय संघर्ष, फाळणी, दुष्काळ आणि शिक्षणव्यवस्थेशी संबंधित अनेकविध घटनांकडे तटस्थपणे पाहणारा हा नायक खंडू. शेवटी संभ्रमावस्थेतच कादंबरी संपते. खंडूला एका बाजूला गेल्या दहा हजार वर्षांपासून आपल्याकडे असलेल्या कृषिजीवनाचा वारसा टिकवावा असे वाटते. तर दुसऱ्या बाजूला पुरातत्त्वाचा स्कॉलर असलेल्या खंडूला आपलीसुद्धा तितकीच महत्त्वाची वाटते. आपले करियरचे भावी काळचे स्वप्न त्याच्या डोळ्यात तरळून जाते. या संभ्रमावस्थेतच कादंबरी संपते. नव्हे 'हिंदू...' चतुष्ट्यामधील पुढील भागाची वाचकाला आस लावून जाते.

आतापर्यंत वडिलांना न जुमानणारा खंडेराव वडिलांच्या निधनामुळे व्याकूळ होतो. शेती, अलुतेदार-बलुतेदार, वारकरी कीर्तनात मृदंग्याची भूमिका वठवणारे सच्चे वारकरी, नातेवाइकांचे रूसवे-फुगवे दूर करून सर्वांना बरोबर घेऊन जाणारे, सहकारी संस्था, शाळा, कारखाना अशा अनेक गोष्टीत प्रत्यक्ष गुंतलेले, शेकडो जबाबदाऱ्या सांभाळणारे वडील त्याला अचानक खूप मोठे व्यक्ती वाटू लागतात आणि आता हे सर्व आपल्याला खुबीने पार पाडावे लागणार, या नुसत्या कल्पनेनेच खंडेराव स्तिमित होतो.

३.७ समारोप

आतापर्यंत आपण भालचंद्र नेमाडे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या 'हिंदू...' आणि इतर साहित्यातून उमटणाऱ्या समकालीन प्रतिबिंबाचा, 'हिंदू'चा नायक खंडेराव इत्यादी घटकांचा प्रामुख्याने विचार केला. Porsonility या इंग्रजी संज्ञेसाठी मराठीत 'व्यक्तिमत्त्व' हा शब्दप्रयोग वापरला जातो. बर्नाड शॉ, एच. जी. वेल्स इत्यादी अभ्यासकांनी कलावंतांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वांचा अभ्यास केला. 'वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व' या संकल्पनेच्याद्वारे एखाद्या सर्जनशील कलावंतांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्याच्या साहित्याच्या आधारे नेमकेपणाने वेध घेता येतो. लेखकाच्या अभ्यासात वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाच्या संकल्पनेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. एखाद्या साहित्यकृतीतून लेखकाच्या समकालाचे प्रतिबिंब कशा प्रकारे प्रकट होते याचा अभ्यास करणेही तितकेच महत्त्वाचे असते. या दृष्टीने पाहाता आपण येथे विस्ताराने 'हिंदू...' या कादंबरीत येणारे कृषिजीवनाचे समकालीन वास्तव, स्त्रियांवरील होणाऱ्या अन्यायाचे, स्त्रियांच्या दुःखभोगाचे वास्तव, एतद्देशीय आणि इंग्रज यांच्यातील संघर्ष, फाळणी, भारतीय स्वातंत्र्य, शिक्षण व्यवस्था, दुष्काळ या सर्व मुद्द्यांच्या आधारे समकालाचे 'हिंदू...'तील प्रतिबिंबाचा काही प्रमाणात शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

भालचंद्र नेमाडे हे द्रष्टे लेखक असून मराठी साहित्यात त्यांचे स्थान खूप मोठे आहे. 'कोसला' व इतर सर्वच वाङ्मयनिर्मितीपासून नेमाड्यांची एक परंपरा मराठीत निर्माण झाली. 'हिंदू' ही त्यांची कादंबरी अनेक अंगांनी अभ्यास करण्याजोगी कादंबरी आहे. तिचे यथायोग्य मूल्यमापन होणे ही काळाची गरज आहे. पण नेमाड्यांना 'हिंदू...' बद्दल २०१० साली साहित्यातील सर्वोच्च असा ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला. तो 'हिंदू' संस्कृतीच्या गेल्या पाच हजार वर्षांच्या सांस्कृतिक इतिहासाचे मंथन 'हिंदू...' चा काळ आणि अवकाश व्यापून टाकते अशा अद्वितीय कामगिरीबद्दल होय.

३.८ शब्दार्थ व टीपा

- **वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व :** वाङ्मयनिर्मात्याच्या आत्माभिव्यक्तीच्या आधारे त्याच्या वाङ्मयातून त्याच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा शोध घेता येतो. कोणत्याही कलावंताचे व्यक्तित्व त्याच्या साहित्यात प्रतिबिंबित होत असते.

- **देशीवाद :** या संकल्पनेचे मूळ भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' (१९६३) या कादंबरीत दिसून येते. भालचंद्र नेमाडे यांनी १९८३ साली प्रथम इंग्रजीतून व नंतर मराठीतून सैद्धांतिक स्वरूपात देशीवादाची मांडणी केली. ब्रिटिश राजवटीमुळे झालेले सांस्कृतिक खच्चीकरण व साहित्यातील इंग्रजी आणि परकी आक्रमण अथवा मानदंड नाकारून स्वसंस्कृतीतील संस्कारातून बळ घेऊन निर्माण झालेल्या देशी भाषेतील साहित्यनिर्मितीस देशीवाद असे साधारणपणे म्हणता येईल.

३.९ नमुना प्रश्नोत्तरे

■ **वस्तुनिष्ठ प्रश्न.**

अ) बहुपर्यायी प्रश्न

१. खंडेराव सिंध प्रांतात कोणत्या प्रोजेक्टवर जातो?

अ) युनेस्को-मोहेनजोदडो १९६३ ब) भारतवर्ष प्रकल्प १९६०

क) हडप्पा शोध प्रकल्प १९६५ ड) डेक्कन कॉलेज पुरातत्त्व संशोधन प्रकल्प १९७०

२. भालचंद्र नेमाडे यांच्या कोणत्या कादंबरीस ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला?

अ) कोसला ब) बिढार

क) हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ ड) झूल

३. देशीवादाची संकल्पना भालचंद्र नेमाडे यांनी कोणत्या वर्षी मांडली?

अ) १९८३ ब) १९८४ क) १९८९ ड) १९८५

४. महानुभाव संप्रदायाची दीक्षा घेतलेल्या खंडेरावच्या आत्याचे नाव काय?

अ) चिंधू ब) तिराणी क) बायडी ड) सीता

५. 'हिंदू...'चा नायक खंडेराव कोणत्या विद्याशाखेचा विद्यार्थी आहे?

अ) पुरातत्त्वशास्त्र ब) मानसशास्त्र क) समाजशास्त्र ड) इतिहास

उत्तरे : १) युनेस्को-मोहेनजदडो १९६३ २) हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ

३) १९८३ ४) तिरोणी ५) पुरातत्त्वशास्त्र

३.१० सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'हिंदू...'मधील सामाजिक-सांस्कृतिक संदर्भाचा आढावा घ्या.

२. मराठी साहित्यातील महत्त्वाची कादंबरी म्हणून 'हिंदू...' कादंबरीचे वेगळेपण अधोरेखित करा.

ब) लघुत्तरी प्रश्न

१. 'हिंदू...'मधील शेतकरी जीवन चित्रणाचे स्वरूप स्पष्ट करा.

२. ‘हिंदू...’मध्ये स्त्रियांची दुःखे कशा पद्धतीने येतात, ते लिहा.

३.११ उपक्रम

नेमाडे यांच्यावरील माहितीपट ‘यू-ट्यूब’वरून पहा.

३.१२ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

१) नेमाडे भालचंद्र, ‘निवडक मुलाखती’, लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००८.

२) नेमाडे भालचंद्र, सोळा भाषणे, ‘लोकवाङ्मयगृह, मुंबई, २००९.

❑❑❑

सत्र १ : घटक ४

(विभाग ४ Module IV)

शोभायात्रा

शफाअत खान

४.१ उद्दिष्ट्ये

विद्यार्थिमित्रांनो, या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस,

- नाटक या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप व वैशिष्ट्ये लक्षात येतील.
- १९८० नंतरच्या काळातील मराठी रंगभूमीचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये सांगता येतील.
- १९८० नंतरच्या मराठी नाटकाचे वेगळेपण लक्षात येईल.
- 'शोभायात्रा' या नाटकातील एक वेगळा आशय समजेल.
- नाटकाची संहिता आणि त्याचा प्रयोग यातील फरक समजेल.

४.२ प्रास्ताविक

इ. स. १८४३ साली विष्णुदास भावे यांनी मराठीतील पहिला नाट्यप्रयोग सांगलीमध्ये सादर केला. तेव्हापासून आजतागायत मराठी नाटक काळानुसार सतत बदलत व विकसित होत आले आहे. विष्णुदास भाव्यांच्या पौराणिक नाटकांपासून ते आजच्या नाटकापर्यंत मराठी नाटक आणि रंगभूमीचा प्रवास सतत परिवर्तनशील राहिला आहे. रंजन आणि उद्‌बोधन ही दोन मुख्य प्रयोजने नाटकाची असतात. नाटक हा दृकश्राव्य कलाप्रकार असल्याने हे दोन्ही उद्देश साध्य होण्यास मदत होते. मराठी नाटकाने बरीच स्थित्यंतरे अनुभवली आहेत. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन्ही कालखंडातील अनेक घटना, प्रसंग आणि त्यायोगे येणाऱ्या जीवनानुभवांना आपल्या लेखणीमध्ये पकडण्याचा प्रयत्न अनेक नाटककारांनी केलेला आहे. अनेकविध जीवनानुभवांचे चित्रण सर्वच कलाकृतींतून येत असताना नाटकातून मात्र ते प्रत्येक कालखंडात प्रभावीपणे मांडल्याचे लक्षात येते. किर्लोस्कर, देवळ, खाडीलकर, अत्रे, रांगणेकर, शिरवाडकर, कानेटकर, बेडेकर, मतकरी, कोल्हटकर इत्यादी नाटककारांनी मराठी नाट्यवाङ्मय समृद्ध केले आहे. विजय तेंडूलकर, चि. त्र्यं. खानोलकर, एलकुंचवार, सतीश आळेकर, गो. पु. देशपांडे, प्रेमानंद गज्वी, शाम मनोहर, शफाअत खान इत्यादी नाटककारांनी मराठी नाट्यविश्वाला वेगळ्या उंचीवर पोहचवले आहे. प्रस्तुत घटकामध्ये आपण 'शोभायात्रा' या शफाअतखान लिखित नाटकाचा अभ्यास करणार आहोत.

४.३ विषय विवेचन

स्वातंत्र्योत्तर कालखंडात मानवी जीवनामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्ये प्रवेशित झाल्याचे चित्र स्पष्ट होत असताना याच काळात स्वातंत्र्यापूर्वी पाहिलेली स्वप्ने पूर्ण झाली का? हा प्रश्न सतावतोय. माणसाच्या जीवनव्यवहारामध्ये अमूलाग्र बदल झाला आहे. मानवी जीवन उन्नत होणारी तत्त्वप्रणाली अधोरेखित होऊ पाहतेय. तितकीच तिला मागे टाकून मूल्यऱ्हासाची जीवनपद्धतीही डोके वर काढते आहे. 'आम्ही'ऐवजी 'मी'चा प्रवास वाढलेला आहे. भ्रष्टाचार, गुन्हेगारी, हिंसा, जातीयवाद, दंगली इत्यादी घातकी प्रवृत्तींचीही वाढ होते आहे. हेच जगणे प्रत्येक प्रतिभावंताला अस्वस्थ करते आहे व यातूनच अनेक कलाकृतींची निर्मिती होताना दिसते. माणूस असण्यासोबतच त्याच्यातील ढासळलेल्या माणूसपणाचे चित्रण नाटकाच्या प्रांतामध्ये अनेक नाटककारांनी केल्याचे दिसते. विजय तेंडूलकरांनी अशा गोष्टींना हात घातला. त्यांच्या सोबतच अनेकांनी या मानवी व्यवहारांच्या उद्ध्वस्त होत चाललेल्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकणारी नाट्य संहिता लिहिल्या आहेत. त्यांचे तितकेच प्रयोगही यशस्वी झाले आहेत. शफाअत खान हे यातीलच एका प्रतिभावंत लेखकाचं नाव. त्यांनी अनेक वेगवेगळ्या विषयांवर नाट्यरचना केली आहे. 'शोभायात्रा' या नाटकातून स्वातंत्र्याची पन्नास वर्षे उलटल्यानंतरच्या मानवी अवस्थांचे चित्रण करणाऱ्या एका गंभीर, चिंतनीय व आशयगर्भ अशा विषयाची मांडणी केलेली आहे.

लेखक परिचय

शफाअत खान यांचा जन्म २१ नोव्हेंबर १९५२ रोजी झाला. हे ऐंशीच्या दशकात पुढे आलेले नाट्यकर्मी. शास्त्र विषयात पदवी घेऊन नोकरी करीत असतानाच त्यांनी 'थिएटर, मुंबई' या नावाच्या नाट्यसंस्थेची स्थापना केली. 'भूमितीचा फार्स', 'शोभायात्रा', 'राहिलेले दूर घर माझे', 'पोपटपंची', 'गांधी आडवा येतोय' इत्यादी त्यांची महत्त्वाची नाटके. 'मुंबईचे कावळे', 'गर्दीत गर्दीताना' व 'किस्से' इत्यादी एकांकिका. त्यांच्या अनेक नाटकांचे इंग्रजी, बंगाली, हिंदी, गुजराती, कन्नड इत्यादी भाषेतून अनुवाद झाले आहेत. 'राहिले दूर घर माझे' या नाटकास महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

नाटकाची निर्मिती

शफाअत खान हे नाव भारतीय रंगभूमीला विषय, आशय व प्रयोग या सर्वच बाबतीत नेहमी अनोखे चित्रण घडवून देणारा नाटककार म्हणून परिचित आहे. त्यांचे 'शोभायात्रा' हे असेच एक नाटक. मुळात हे नाटक लिहायचे म्हणून लिहिले नाही तर त्याचा विषयगाभा हा नंतर तयार झाला आहे. उदयपूरच्या 'वेस्टझोन कल्चरल सेंटर, उदयपूर' या संस्थेने सिल्वासा येथे विविध राज्यातल्या नाटककारांसाठी निवासी शिबिर आयोजित केले होते व मराठी नाटककार म्हणून शफाअत खान यांची निवड झाली होती. आपल्या प्रांतातील स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या एखाद्या स्वातंत्र्यसैनिकाची वीरगाथा मांडणारे व स्वातंत्र्याचा रोमहर्षक इतिहास दाखवणारे नाटक असावे अशी त्या शिबिराची

अट होती व त्यानुसारच फक्त स्वातंत्र्याची पन्नास वर्षे लोटली असतानासुद्धा आपल्या देशात असणाऱ्या विदारक स्थितीचे दर्शन घडविणारे नाटक 'शोभायात्रा' हे साकार झालेले आहे.

या नाटकाचा १९९९ मध्ये प्रयोग झाला व सन २००२ मध्ये ते पुस्तकरूपाने वाचकांच्या हाती आले. या नाटकाचा पहिला प्रयोग २ मे रोजी परळ येथील दामोदर हॉलमध्ये सादर झाला. 'श्री चित्रलेखा' या संस्थेमार्फत हा प्रयोग झाला. हे दोन अंकी नाटक आहे. सुरुवातीला या नाटकाचे शीर्षक 'उजाडलं... पण सूर्य कुठे आहे?' असे होते. ज्यावेळी ते तेंडूलकरांना वाचायला दिले त्यावेळी त्यांनी 'शोभायात्रा' हे नाच सुचविले.

४.३.१ कथासूत्र

भारतीय स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली म्हणून निवडक स्वातंत्र्यवीरांची शोभायात्रा काढण्याचा प्रयोग परदेशी स्थायिक असणाऱ्या 'भाई'च्या सांगण्यावरून केला जातो. यामध्ये झाशीची राणी, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, लोकमान्य टिळक, सुभाषचंद्र बोस व बाबू गेनू इत्यादींचा समावेश आहे. पन्नास वर्षांनंतर आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळविताना कुणाचे व कसे कार्यकर्तृत्व अजरामर झाले त्याची आठवण करणे व त्याविषयी मनाने श्रद्धा व अभिमान बाळगण्याचे कर्तव्यनिष्ठ आणि जबाबदारीची जाणीव लोकांच्या मनामध्ये निर्माण व्हावी हा या पाठीमागचा हेतू आहे. हेतू अगदी चांगला आहे मात्र हे काम एका बड्या गुंडाकडून दुसऱ्या एका स्थानिक गुंडामार्फत पार पडते आहे ही बाब चिंतेची आहे.

ऐतिहासिक स्त्री-पुरुषांची वेशभूषा केलेली उपरनिर्देशित जी पात्रे आहेत, ती त्यांच्या लौकीक जीवनामध्ये विविध प्रश्नांनी ग्रस्त अहेत, ती आत्ममग्न आहेत. राणीचे पात्र करणारी शिक्षिका स्त्री घटस्फोट होण्याच्या भितीने चिंतीत आहे. जाधव वकीलसुद्धा तिच्या नवऱ्याच्या सांगण्यावरून तिला नोटिसीवर सह्या करण्यासाठी वारंवार त्रास देतो व ती त्याला नकार देवून नवऱ्याकडेच राहण्याचा विचार करत असते. महात्मा गांधींचे सोंग घेणारा बापट उद्योजक आहे. मात्र त्यांनी उद्योगात भागीदार असलेल्या हुसेन बाटलीवाला या मुस्लीम मित्राला पोलिसांना पैसे देऊन बॉम्बस्फोटाच्या आरोपाखाली अटक केलेली आहे. मात्र त्याचे गुंड मला कधीही घातपात करतील या भितीच्या छायेखाली तो आहे. व्यवसायाने वकील असणाऱ्या जाधवने सुभाषचंद्र बोस यांचे सोंग घेतलेले आहे व तो भाईच्या व इतर गुंडांना कायदेशीररित्या जामीन मंजूर करून अभय देण्याचे काम करतो म्हणजेच तो अप्रत्यक्षपणे गुन्हेगारीलाच सहकार्य करतो. तसेच प्राध्यापक असणाऱ्या व्यक्तीने टिळकांची भूमिका वटवली आहे; मात्र तो पेपरफुटीच्या गुन्ह्यात आपले नाव आल्यापासून स्वतः भितीच्या छायेखाली वावरतो आहे.

असेच इतरही सोंग घेतलेल्या व्यक्तींबाबत आहे. स्वातंत्र्यासाठी स्वतःला अर्पण केलेल्या वीरांचे पन्नास वर्षांनंतर आपण आठवण करत असताना त्यांच्या इतिहासाविषयी सांगायचे-बोलायचे राहू द्या. परंतु बापट, जाधव, सबनीस, प्राध्यापक, बाबू आणि छोट्या इत्यादीं माणसे किती भ्रष्ट, स्वत्वशून्य, संवेदनशून्य, भोगलोलूप आणि स्वार्थांध कशी आहे याचे चित्रण या नाटकात पहावयास मिळते. एका

जुनाट हॉलवजा वास्तूमध्ये या सोंगरूपी व्यक्तीच्या माध्यमातून हे नाटक साकारत जाते. पहिल्या अंकामध्ये ही सर्व सोंगे प्रत्यक्ष त्या व्यक्तिमत्त्वाची आणि लगेच आपली मूळ लौकिक ओळखीची-भूमिका जगताना दाखवलेली आहे. या सर्वांना हाताळतोय तो पावलस कारण बाई वगळता या सर्वांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे भाईशी कामानिमित्त संबंध आलेले आहेत. त्यामुळे सर्वजण हे काम करायला तयार आहेत. ज्यावेळी बाईला कळते की ह्या भाईंसाठी हे काम करणे सुरू आहे त्यावेळी ती नकार देते; मात्र पावलस हा तिला ढकलून देऊन व प्रसंगी धमकी देऊन काम करण्यास भाग पाडतो. बाबूला सांगतो, बंदुकीचा धाक दाखवून या सर्वांना घेऊन ये. मात्र शेवटी बाईच्या मातृत्वाच्या हाकेपोटी आणि छोट्याच्या विनवणीपोटी त्याच्या हातातून बंदूक खाली पडते. छोट्या मोठा तिरंगा घेऊन चालण्याचा प्रवास करतो त्याच्यासोबत बाई व बाबूसुद्धा सामील होऊन एका नव्या शोभायात्रेची सुरुवात करतात.

४.३.२ पात्र चित्रण / व्यक्तिरेखा

प्रस्तुत नाटकामध्ये प्रत्यक्ष रंगभूमीवर वावरणारी व काम करणारी मुख्य नऊ पात्रे म्हणजेच व्यक्तिरेखा आहेत. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाषचंद्र बोस, बाळ गंगाधळ टिळक, झाशीची राणी, बाबू गेनू, कृष्णा पावलस आणि छोट्या अशा या व्यक्तिरेखा संपूर्ण रंगमंचावर वावरताना दिसतात.

महात्मा गांधी

या नाटकामध्ये बापट या व्यक्तीने महात्मा गांधींचे सोंग घेतलेले आहे. बापट हे उद्योजक आहेत मात्र आपल्याच व्यवसायातील मित्राला त्यांनी खोट्या गुन्ह्याखाली तुरुंगात टाकले आहे. असे हे मूळ व्यक्तिमत्त्व आहे. या नाटकामध्ये त्यांनी गांधींची व्यक्तिरेखा साकारताना पंचा, चष्मा, घड्याळ इत्यादी साहित्यांसह ती वठवण्याचा प्रयत्न केला आहे मात्र मध्येच त्या मूळ भूमिकेत जाऊन लगेच लौकिक जीवनात प्रवास करतात. उदा. अंगावर घातलेल्या धोतराची मांड्यांना खाज उठणे, चष्मा कानाला टोचणे व त्यातून धुरकट दिसते हे बोलून जातात. बापट बाईला फोटोसाठी सुंदर पोझ देतात व हळूच आपल्या परदेशात असलेल्या मुलासाठी तिच्याकडे भावी सून म्हणूनसुद्धा बघतात. मित्राला फसविल्याने बापट भितीच्या छायेखाली वावरताना दिसतात. ज्यावेळी पेटाऱ्यातून शखसाण बाहेर पडतो त्यावेळी तर ते 'अहिंसेवर' हिंदीतून बोलायला लागतात. शिवाय छोट्याने एक गॉगलवाला सकाळपासून बापट नावाच्या माणसाला शोधतो आहे असे सांगितल्यावर तर बापट सुभाषबाबूच्या भूमिकेत आहे असे धडधडीत खोटे बोलतात. म्हणजे ज्या महात्मा गांधीनी असहकार, बहिष्कार व अहिंसा मार्गाने स्वातंत्र्य मिळवण्याचा प्रयत्न केला त्यांची भूमिका साकारताना लौकिक जीवनातील अत्यंत भ्रष्ट माणूस म्हणून बापट ही व्यक्तिरेखा येते.

बापटांचे गांधी वेशातील फोटो बार्बी ज्यावेळी घेते त्यावेळी बापट अत्यंत साळसूदपणे वागतात. ती त्यांना ज्यावेळी मि. गांधी म्हणजे त्यावेळी मला फक्त बापट म्हण असेही सुचवितात. आपल्याच मित्राला चुकीच्या आरोपाखाली 'टाडा'खाली अटक करून आपण मात्र गांधीचे फोटो देताना अत्यंत

व्यवस्थित पोज देतात. पण त्याच मित्राने आपल्याला संपवण्यासाठी गुंड पाठविलेले आहेत हे ज्यावेळी त्यांना समजते त्यावेळी मात्र त्यांची अस्वस्थता वाढायला चालू होते. त्यातही ते आपण गांधींच्या भूमिकेत नसून सुभाषबाबूंच्या भूमिकेत आहोत हे पसरविण्याचा प्रयत्न करतात व मारले गेले तर सुभाषबाबू म्हणजे जाधव मारले जावेत असा युक्तिवाद करतात. मात्र शेवटी ते सापडतात.

संपूर्ण भारत देश आणि देशाबाहेरही ज्या गांधी विचारांचा आदर व अभ्यास केला जातो. गांधींनी असहकार, अहिंसा, सत्य, बहिष्कार या मार्गाने स्वातंत्र्य मिळविणे आज पन्नास वर्षांनंतर गांधीजींचा नाटकीय भूमिका बजावताना मात्र बापट सारखे व्यक्तिमत्त्व प्रेक्षकांना चिंतन करायला भाग पाडते.

झाशीची राणी

नाटकामध्ये झाशीच्या राणींची वेशभूषा इतिहासाची शिक्षिका साकारताना दिसते. प्रेमविवाहास वीस वर्षे होऊनही मूल नाही म्हणून वंशवृद्धीसाठी तिचा पती तिच्याकडे घटस्फोट मागतो आहे मात्र ती तयार नाही. माझ्या पोटात बाळ आहे असे सांगून घटस्फोटाची कागदपत्रे फाडून टाकते. तुम्हाला त्रास देणाऱ्या माणसाला मी बघून घेतो असे बाबू बोलताच त्याला शांत बसवते. मातृत्वरूपी मायेने ती बाबू आणि छोट्याकडे बघताना दिसते. पावलस तर तिला त्या वेशभूषेत बघताच 'भारतमाता या सर्वावर लक्ष असू दे' असे म्हणून नमस्कार घालतो. मात्र ज्यावेळी बाईला हे कळते की, हा कार्यक्रम भाईसारख्या खुनी, गुंड माणसासाठी होतो आहे त्यावेळी ती काम करण्यास स्पष्ट नकार देते. मात्र त्यावेळी पावलस तिला धमकी देतो व हात पिरगाळून ढकलूनसुद्धा देतो. त्यावेळी गांधी, नेहरू, टिळक काहीच बोलत नाहीत.

स्वातंत्र्याची पन्नास वर्षे झाली तरी स्त्रीकडे कुणाचेच लक्ष नाही किंवा तिची ही विदारक अवस्था आणखी किती वर्षे? असा विचार प्रेक्षकांसमोर उभा राहतो. स्वतः व्यवसायाने इतिहासाच्या शिक्षिका असणाऱ्या बाई प्रत्यक्ष त्यांच्या आयुष्यात निर्माण झालेल्या कौटुंबिक आघाताकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. कारण वीस वर्षानंतरही बाळ नाही म्हणून नवरा घटस्फोट देतो आहे. त्यासाठी व्यवसायाने वकील असणारे व नाटकात सुभाषबाबूंची भूमिका करणारे जाधव हेही तिला घटस्फोटाच्या कागदपत्रांवर सही करायला सांगतात. मात्र बाई त्यासाठी तयार नाहीत कारण त्यांना घटस्फोटीत महिला म्हणून जीवन जगणे नको आहे. त्यासाठी नाटकामध्ये आपल्या पोटात बाळ आहे असे भासवून, झाशीच्या राणीच्या वेशभूषेत असताना स्वेटर विनण्याचा प्रवास तसेच छोट्या या पात्रांमार्फत पोटातील बाळाचा आवाज ऐकवण्याच्या प्रसंगातून बाई स्वतःला सुरक्षित मानसिकतेत व्यस्त ठेवतानाचा प्रयत्न करताना दिसतात. एकूणच वर्तमान जीवनव्यवहारातील एक असहाय भारतीय स्त्रीची अवस्था या पात्राद्वारे व्यक्त होताना दिसते.

पंडीत नेहरू

सबनीस नावाच्या व्यक्तीने ही वेशभूषा साकारलेली आहे. हा लौकिक जीवनात अत्यंत भोगलोलूप व स्त्रीलंपट असा मनुष्य आहे. पंडित नेहरूंसारखा दिसण्यासाठी पुन्हा-पुन्हा आरशात न्याहाळणे, लिपस्टिक लावणे इत्यादी गोष्टी करतो व जवळीक साधण्याचा प्रयत्न करतो. आपल्या मुलीच्या वयाची आहे असे म्हणून बार्बीच्या नको तितक्या जवळ जाण्याचा प्रयत्न करतो. मात्र बार्बीने झिडकारताच गुलाबाचे फूल घेऊन तो बाईंना देऊन त्यांनाही भुलवण्याचा प्रयत्न करतो.

स्वतःमध्ये मग्न असणारे सबनीस हे पात्र अत्यंत भोगलोलूप आहे. ज्या पंडीत नेहरूंची त्यांनी भूमिका केली आहे. त्यांच्याविषयी अथवा त्यांच्या राजकीय व्यक्तित्वाविषयी त्यांना माहिती नाही. मात्र 'चित्ररथाची' माणसे उभे राहण्याची मर्यादा ज्यावेळी समजते व या सर्वामध्ये एखादे पात्र रद्द करण्याचा विषय येतो त्यावेळी मात्र हे नेहरूंचा इतिहास आठवा असे धडधडीत बोलून स्वतःचे स्थान निश्चित करतात. गोड बोलून स्त्रीच्या जवळ जाणे व तिला वश करणे अथवा मी तसा नाही हे सांगतानाच बार्बी त्यांचा मूळ स्वभावचा पर्दाफाश करते. मुलीच्या वयाची असणारी अविवाहीत बार्बी तसेच मध्यमवयाची शिक्षिका या दोनही स्त्रियांकडे सबनीस भोगलोलूप भावनेनेच पाहतो. राष्ट्रवादी विचारसरणीचे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान असणारे पंडीत नेहरूंविषयी सबनीसांचे अज्ञान, हा विरोधाभास आणि वर्तनातील फोलपणा या व्यक्तिचित्रणातून स्पष्ट होते.

सुभाषचंद्र बोस

व्यवसायाने वकील व एका शाळेचा प्रमुख असलेल्या जाधव नावाच्या व्यक्तीने ही व्यक्तिरेखा साकारली आहे. सुभाषबाबूंची रुबाबदार कपडे घालून त्याच पद्धतीने संवाद साधण्याचा ते प्रयत्न करतात. त्यांची टोपी हरवण्याच्या वेळेसच बार्बी फोटो काढायला येते. त्यावेळी इतिहासात सुभाषबाबूंबाबतीत असेच झालंय असे मार्मिक बोलून जातात. लौकिक जीवनामध्ये भाईच्या व इतर गुंडांना जामीन व इतर गोष्टी देवून गुन्हेगारी जग सावरण्याचं काम जाधव करतात. शिक्षिका बाईना आपल्या मित्रासाठी घटस्फोट घेण्यासाठी, प्रसंगी पोटातील बाळ खाली करण्यासाठी तिला वारंवार त्रास देताना दिसतात.

न्यायव्यवस्थेमध्ये सर्वसामान्य माणसांना म्हणजेच अन्यायी व्यवस्थेविरुद्ध लढणारा व लोकांना संरक्षण व सुरक्षितता देणाऱ्या वकीली व्यवसायामध्ये काम करणारा जाधव प्रत्यक्ष मात्र याउलट वागताना दिसतो. गुंड प्रवृत्तीच्या लोकांसोबत त्यांचे संबंध आहेत. म्हणजे गुंडगिरी करणाऱ्या, सामान्य माणसांना लुटणाऱ्या अथवा सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या माणसांना न्यायालयाच्या ताब्यातून सोडवण्याचे काम जाधव करतो.

ज्या सुभाषबाबूंनी स्वातंत्र्यसंग्रामामध्ये तरुणांना स्वराज्यभावनेने प्रफुल्लीत केले. 'तूम मुझे खून दो, मै तुम्हे आझादी दुँगा' अशा प्रकारचे आवाहन करून इंग्रजांच्या अन्यायी व जुलमी सत्तेविरुद्ध

जहाल बंड पुकारले. त्या सुभाषबाबूंची भूमिका करणारा जाधव अगदी त्यांच्या विचारांच्या उलट वर्तन करताना दिसतो. गुंडप्रवृत्ती वाढण्यासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहकार्य करतो.

लोकमान्य टिळक

लोकमान्य टिळकांची भूमिका एका मराठी विषयाच्या प्राध्यापकाने केली आहे. ते मराठीची अस्मिता जोपासणारा एक स्वातंत्र्यवीर म्हणून स्वतःची ओळख करून देतात मात्र 'पगडीत अव्यवस्थित वाटतंय', 'कधी काढताय धिंडे' असे वैतागून उच्चारतात. त्या पाठीमागे कारणही तसे आहे. सबनिसांच्या मुलीला पास करण्यासाठी त्यांनी पेपरफुटी केलीय व वर्तमानपत्रात नाव आल्याने ते अस्वस्थ आहेत. तो पेपर फाडून त्याचे तुकडे पगडीत ठेवताहेत. आपल्या मुलीला कॉन्व्हेंटमध्ये प्रवेश घेण्यासाठी भाईचे उपकार आहेत, म्हणून प्राध्यापक निमूटपणे काम करताना दिसतात.

बाबू गेनू

बाबू नावाच्या तरुणाने हे काम केले आहे. पुन्हा-पुन्हा ट्रकखाली पडून हुतात्मा होण्याचं काम त्याच्याकडे आहे. धिप्पाड देहयष्टीचा बाबू प्रत्यक्षात व्यवस्थेने झिडकारल्याने भाईचा हस्तक म्हणून काम करतोय. तो बाईंचा विद्यार्थी आहे. पण आज तोच त्यांच्यावर बंदूक रोखतोय. चित्ररथात माणसे जास्त होतात म्हणून बाबूचेच पात्र रद्द करायचे ठरते; त्यावेळी तो खूप त्रागा करतो. पण पावलस त्याला मारतो व शांत बसवतो. परिस्थितीने गांजलेल्या बाबूला बार्बी खोटं आमिष दाखवते. पण शेवटी बाबू नव्या शोभायात्रेसाठी बंदूक टाकून बाई व छोट्याच्या पदयात्रेत सामील होतो.

बाबू हे पात्र अनेक गोष्टींना उजागर करणारे आहे. परिस्थितीने हतबल झालेल्या बाबूचा सर्वच अपमान करतात असे दिसते. मात्र तो अनेक प्रसंगावर आपल्या रागीट स्वभावाने कोरडे ओढतो. कुमारवयात म्हणजे शाळेच्या दिवसात इतिहासाच्या बाईकडे तो वेगळ्या भावनेने बघतो. पावलस या गुंडाकडे काम करताना त्याला प्रसंगी मारही खावा लागतो. सबनीस, बापट, जाधव यांचेकडून तुसडेपणाची बोलणी खावी लागतात. बाईवर अन्याय होतोय हे समजल्यावर मी तुमच्या नवऱ्याला तुमच्या पायावर आणून टेकवतो असे म्हणताच बाई त्यालाच फटकारतात. पावलससोबत नियोजनात असणाऱ्या बाबूला मात्र चित्ररथात स्वतःचे पात्र रद्द करायला सांगतात. यासोबतच बार्बी बाबूच्या भावनांशी खेळते. त्याला प्रेमाचं अमिष दाखवते व भाईचा फोन आल्यानंतर तू प्रेमात-वगैरे पडलास की काय? असे बोलून त्याची खिल्ली उडवते.

एकूणच बाबू हे पात्र येथे सर्वार्थाने दुय्यम ठरणारे पात्र म्हणून समोर येते. बाबू गेनूंच्या क्रांतीकार्याने प्रभावित होऊन ट्रकखाली सापडून मोठ्याने जिंदाबादची घोषणा देणारा बाबू त्याच्या लौकीक जीवनात वेड्यात निघताना दिसतो. अर्थात, बाईनी व छोट्याने सुरू केलेल्या नव्या शाभायात्रेत तो शेवटी स्वतःला सामील करून घेतो.

बार्बी

परकीय फोटोग्राफर म्हणून भारतीय स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षांनंतर होणाऱ्या कार्यक्रमाचे फोटो घेण्यासाठी आलेली ही तरुणी नाटकातील सर्वच पात्रांना आपल्या सौंदर्य व बेधडक वर्तनाने किंचित भाळवण्याचा प्रयत्न करते. बापट, जाधव, सबनिसांना ती स्पष्ट शब्दात धुडकावते तर बाबूच्या शरीरयष्टीकडे भाळून ती त्याच्या गळ्यात पडते. शिवाय वरच्या माळ्यावर घेऊन जाते. संपूर्ण नाटकभर ती सर्वांना उपरोधिकपणे बोलते. तिचे बिनधास्त वावरणे अनेकांना आश्चर्य करणारे ठरते. शेवटी भाईचा फोन येतो व ती निघून जाते हे बाबूला समजल्यावर तो अस्वस्थ होतो.

बार्बीच्या एकूणच व्यक्तिमत्त्वाचा विचार केला तर ती कमालीच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा अवलंब करणारी तरूणी आहे. फोटोग्राफर म्हणून जरी आली असली तरी नाटकातील सर्व भूमिका करणारी पात्रे आणि त्यासोबतच ती मूळ व्यक्तित्व यांना छेडताना दिसते. तिचा स्पष्ट आणि सडेतोड बोलण्याचा स्वभाव येथे अनेक गोष्टींना समोर आणतो... सबनीसांना मी तुमच्या मुलीच्या वयाची असूनही तुम्हाला हवी आहे. आकर्षण आहे हे लपवू नका असे सांगते. बापटांना ती तुम्ही माझ्याकडे सूनेच्या रूपात बघत आहात का? असं बोलते, बाबूला ती सरळ-सरळ झिडकारते. माईंड युवर बिझनेस असं सुनावते तर बाईंना ती घटस्फोटाचा निर्णय घ्यायला सांगते. मजेत रहायला सांगते. थोडक्यात, बार्बी हे पात्र या नाटकात मुख्य गाभ्यासोबतच अनेक व्यक्तीप्रवृत्तींना समोर आणते.

पावलस

भाईंच्या आदेशावरून शोभायात्रेचे नियोजन करणारा स्थानिक गुंड म्हणजे पावलस. सर्वप्रथम सर्वांना वेशभूषेत बघून तो नतमस्तक होतो. मात्र पोलिसांनी परवानगी नाकारल्यावर अस्वस्थ होतो. जाधवांना रागाने बोलतो. बाबूने पात्रगळतीस नकार दिल्यावर त्याला थोबाडीत मारतो. शिवाय मी काम करू शकत नाही म्हणून निघून जाणाऱ्या शिक्षिकेस सुरुवातीस विनंती व नंतर ऐकेना म्हणून हात पिरगाळून ढकलून देऊन धमकी देतो; शिवाय तयार न झाल्यास पेटवून दे, असे बाबूला सांगणारा पावलस नाटकात गुंड म्हणूनच वावरताना दिसतो.

कृष्णा पावलस ही व्यक्तिरेखा गुंड प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करते. परदेशात राहणाऱ्या भाईंच्या इशाऱ्याने पावलस नाटकातील सर्व पात्रांना त्याच्या पद्धतीने वागायला सांगतो. बाहेरच्या अनेक बेकायदेशीर गोष्टी तो बळाच्या जोरावर करून घेतोय. सुरुवातीला नम्र वाटणारा पावलस नंतर मात्र तो जाधव आणि शिक्षिका यांना धमकीवजा बोलतो. तसेच बाबूच्या कानशिलातही देतो. वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष व्यक्त असणाऱ्यांना पावलस स्वतःच्या पद्धतीने हाताळतो हे विशेष.

छोट्या

छोट्या हा हॉटेलमधील चायवाला पोऱ्या आहे. लहान आहे. पण व्यक्तिरेखा प्रभावी आहे. सुरुवातीला इतिहास माहिती नसल्याने चहा, कॉफीचे गणित चुकते. लवकर कळत नाही की, गांधी कोण? शिवाय शिक्षिकेकडे करुणेने पाहतो. तिच्या पोटातील बाळाचे गाणे ऐकतो. बापटांना शोधत

आलेल्या गुंडाला बापटाचे नाव सांगतो. शिवाय नाटकाच्या शेवटी छोट्याने मोठा तिरंगा झेंडा उचलून बाई व बाबूच्या सोबतीने नवीन शोभायात्रेची सुरुवात केल्याचे दिसते.

पन्नास वर्षानंतरसुद्धा छोट्यासारखा लहान मुलगा शाळेत न जाणे, शाळेत न गेल्याने आपल्या देशाचा इतिहास म्हणजेच गांधी, नेहरू, झांशीची राणी, सुभाष बाबू इत्यादी स्वातंत्र्यवीरांची ओळख न होणं, बाल कामगार व पर्यायाने गरीबी यांचे सूचन मिळते. छोट्या अनेक गोष्टींबद्दल बोलतो. प्रसंगी बापटांना शोधत आलेल्या गॉगलवाल्या गुंडाकडून शंभर रुपये घेवून बापटांना दाखवतो.

थोडक्यात, या नाटकातील बापट, सबनीस, जाधव, प्राध्यापक ही पात्रे प्रचंड स्वार्थी, आपमतलबी व सामान्य असून कर्तृत्वशून्य आहेत. फक्त स्वतःच्या सुखाचा विचार करणारी, भौतिक सुखवादी आहेत. स्वातंत्र्याच्या पन्नाशीतसुद्धा अशा स्वरूपाची माणसे इतरत्र वावरताहेत; त्याचे प्रतीक म्हणजे या व्यक्तिरेखा आहेत.

४.३.३ संवाद

प्रत्येक नाटकाच्या यशाचे गमक हे त्या नाटकातील भाषा, संवाद असते. भाषा प्रभावी आणि संवाद नाटकाला गतिमान करीत असतात. शोभायात्राही त्याला अपवाद नाही. या नाटकातील संवाद दुहेरी स्वरूपाचे आहेत म्हणजे पात्रे जेव्हा ऐतिहासिक असतात, तेव्हा त्यांची भाषा बोलतात व लौकिक असतात तेव्हा आताची वर्तमान भाषा बोलतात. त्यामुळे नाटक प्रभावी ठरते. उदाहरणार्थ–

राणी : हर हर महादेवऽऽऽ मेरी झाँसी मै नही दुंगी– दत्तक वारस नामंजूर करून, संस्थान खालसा करण्याचा इंग्रज सरकारचा प्रयत्न हाणून पाडीन. हर हर महादेवऽऽऽ (पृ.१)

यासारखे गांधीजी, टिळक, सुभाष बाबू बोलतानाचे प्रसंग नाटकात ठिकठिकाणी आलेले आहेत. याउलट वर्तमानाची भाषा बोलताना–

प्राध्यापक : बाई, तुमचा मेकप कुणी केला?

बाई : मी स्वतःच केला... का?

प्राध्यापक : थोडी लिपस्टिक लावायला हरकत नव्हती.

बाई : छे हो... लिपस्टिक कशाला?

प्राध्यापक : या सबनिसांना बघा– किती लिपस्टिक लावली आहे. ओठ अगदी कोटावरच्या गुलाबाला मॅचिंग वाटतात की नाही, तुम्हीच सांगा. (पृ. ७)

याशिवाय नाटकातील पात्रा-पात्रांमधील संवादांमधून वर्तमान वास्तवावर कधी कधी मार्मिक भाष्य केल्याचे दिसून येते.

उदाहरणार्थ,

सबनीस : कुत्र्यांना माणसांना इतिहास कळत नाही. (पृ. ७)

बापट : मला माहीत आहे. या घड्याळात आता वाजणार नाहीत तरी वेळ घालवायला गांधीचं घड्याळ बघतोय (प. ६)

जाधव : बिन त्रासाचं गांधी कसे होता येईल बापट? (पृ. ८)

जाधव : (बाबूबद्दल) आपल्यात तो एकच असा आहे जो इतिहासात असूनही बाहेर जाऊ शकतो... (पृ. १०)

बापट : राष्ट्रभाषेतून बोलतोय का? म्हणजे तो नक्की मवाली गुंडच असणार (पृ. २९)

अशा प्रकारे संवादाच्या अनेकविध वैशिष्ट्यांनी नाटकामध्ये परिणामकारकता साधण्याचे महत्त्वाचे काम केलेले आहे.

४.३.४ नेपथ्य

प्रत्येक नाटकामध्ये नेपथ्याची आवश्यकता कमी-अधिक स्वरूपात निर्माण केलेली असते. हे नेपथ्य न बोलता काही गोष्टींचे प्रतीकात्मक सूचन करण्याचे महत्त्वाचे कम करते. तसेच नाटकामध्ये वातावरणनिर्मितीसाठीही आणि काही अंशी परिणाम साधण्यासाठी नेपथ्याची गरज असतेच. या नाटकामध्ये फार कमी नेपथ्य आहे. मात्र बऱ्याच गोष्टीचे सूचन करून नाटकामध्ये परिणाम साधताना दिसते. अत्यंत जुन्या, इंग्रजकालीन इमारतीतील तळमजल्यावरच्या प्रशस्त हॉलचा गोदामासारखा केलेला वापर, भपकेबाज-केबिनवजा कार्यालय, सामान ठेवण्यासाठीचा पोटमाळा, दोन-चार खोल्या, मागे मोठी खिडकी आणि हॉलमधील असंख्य पेटारे या खोक्यांच्या मांडणीतून नेपथ्यात आडोशाच्या जागांचे सूचन केले आहे. नाटकाच्या नेपथ्यात प्रत्येक पात्राला त्याचा-त्याचा कोपरा आहे. भिंतीवर दोन-चार कागदी झेंडे खोवून ठेवलेले आहेत. एक मोठा कापडी झेंडा भिंतीला अडकवलेला आहे. एका कोपऱ्यात एका मोठा आरसा आहे. आरशासमोर एक बाकडे असून बाकड्याखाली व्यायामाचे सामान पडलेले आहे. अशा प्रकारे नेपथ्यातील या सर्व वस्तू प्रयोग सुरू असताना नाटकामध्ये जिवंतपणा आणणाऱ्या आहेत.

४.३.५ घटना-प्रसंगांचे चित्रण

भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीला पन्नास वर्षे पूर्ण झाली ही मोठी घटना व या घटनेनिमित्त 'शोभायात्रा' काढण्याचा प्रसंग हा या नाटकाचा केंद्रवर्ती भाग आहे. अनेक प्रसंगांनी नाटकाला गती दिली आहे. या नाटकातील अनेक प्रसंग वाचक प्रेक्षकाला चिंतन करायला लावणारे आहेत. नाटकात चहा घेऊन येणाऱ्या छोट्याला स्वातंत्र्य म्हणजे काय? ते भारताला केव्हा मिळालं? हे माहीत नाही. शिवाय गांधी कोण? बापूजी आणि करमचंद या वेगवेगळ्या व्यक्ती आहेत का? असा प्रश्न त्याला पडतो. शाळा न शिकल्याने व इतिहास पुस्तकातच बंदिस्त असल्याचे चित्र स्पष्ट होते. स्वातंत्र्याच्या

पन्नाशीनंतरसुद्धा अनेकांना शिक्षण घेता येत नाही, ही चिंतनीय बाब नाटककार येथे स्पष्ट करतात. चित्ररथाच्या कमी आकारामुळे एका पात्राला रद्द करण्याचा प्रसंग येतो तेंव्हा बाबू गेनूला रद्द केले जाते, ही घटना विचार करायला लावणारी आहे.

हा कार्यक्रम गुंड असणाऱ्या भाईसाठी असल्याने बाई काम करण्यास नकार देतात त्या वेळी पावलस त्यांचा हात पिरगाळून ढकलून देतो. तेव्हा गांधी, नेहरू, टिळक फक्त बघत बसण्याशिवाय काहीही करू शकत नाही, हा प्रसंग मनाला विषण्ण करतो. अशा अनेकविध घटनाप्रसंगांनी नाटक रंगले आहे. बाबूने बाईंवर पिस्तूल रोखल्यानंतर छोट्याने त्याला त्यापासून रोखणे आणि तिरंगा घेऊन बाई, बापू आणि छोट्या यांनी नवीन शोभायात्रेचा प्रवास सुरू करणे ही घटना एका आशावादी भारतीय जनमानसाचे अंतर्मनातील भावनेचे रूप प्रकट करते.

४.३.६ नाटकाचे विशेष

- शफाअत खान यांचे हे प्रायोगिक रंगभूमीवरील एक यशस्वी नाटक आहे.
- स्वातंत्र्याच्या पन्नाशीनंतरचे बदललेल्या जीवन व्यवहारावरील भाष्य करते.
- मराठी, हिंदी तसेच किंचित इंग्रजी भाषेचा उत्तम सहबंध या नाटकामध्ये आला आहे.
- आपल्या आदर्श व्यक्तिमत्त्वांबद्दल असणारी आपली कमालीची अज्ञान अवस्था या नाटकामधून व्यक्त होते.
- राजकारणाचे गुन्हेगारीकरण व गुन्हेगारांचे राजकीयकरण याबद्दल हे नाटक विचार करायला लावते.
- स्त्रियांबद्दलची अवस्था आणि एकूणच समाजाकडे स्त्रीकडे बघण्याची दृष्टी यांचे विदारक दर्शन घडवते.
- माणूस हा स्वतःसाठीच जगण्याचा विचार करतो, इतरांचे जीवन विचारात न घेणारी प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे, या वास्तवावर हे नाटक बोट ठेवते.
- आदर्श, नैतिकता, मूल्ये यांच्याकडे सहजपणे डोळेझाक करून जीवनव्यवहार सांभाळणाऱ्या वृत्ती-प्रवृत्तींचे दर्शन घडवते.
- निवडक पात्रांच्या शोभायात्रेची ही कहाणी असली तरी समस्त भारतीयांच्या सर्व स्तरावरील जगण्याची शोभायात्रा वाटते.
- नाटकाचा आशय विचार करायला लावणारा व चिंतन करायला लावणारा आहे.
- नाटकामधील भाषा सर्वस्तरीय आहे, सामान्य माणसांची, गुंडगिरीची, मध्यमवर्गीयांची, तसेच परकीय नागरीकाची व कामगाराची भाषा नाटकामधून येते.

४.४ वाचनासाठी उतारा

टिळक प्राध्यापक : बाई, तुमचा मेकप् कुणी केला?

बाई : मी स्वतःच केला. का?

प्राध्यापक : थोडी लिप्स्टीक लावायला काही हरकत नव्हती.

बाई : छे हो – लिप्स्टीक कशाला ?

प्राध्यापक : या सबनीसांना बघा – किती लिप्स्टीक लावली आहे. ओठ अगदी कोटावरच्या गुलाबाला मॅचिंग वाटतात की नाही, तुम्हीच सांगा –

नेहरू/सबनीस : अहो, नेहरू, नेहरूंसारखे दिसायला हवेत. शेवटी मी नेहरूंसारखा दिसतो की नाही हे महत्त्वाचं. बाई – तुम्ही शाळेत इतिहास शिकवता – तुम्हीच सांगा, मी नेहरूंसारखा दिसतो की नाही?

बाई : तुम्ही उगाच चिंता करू नका – खरं सांगू का सबनीस, तुम्ही अगदी नेहरूंसारखे दिसता – तसेच रूबाबदार देखणे –

सबनीस : हेच – हेच महत्त्वाचं आहे, बाई एक विचारायचं राहीलं –

बाई : काय–?

सबनीस : लिप्स्टीक लावून पाणी प्यायलेलं चालतं ना–?

बाई : हो – (काळजीच्या सुरात) आहो, इथे जवळपास कुठे फोन आहे का हो–?

सबनीस : या रस्त्याच्या पलीकडे एक फोन आहे.

बाई : अहो पण – या कपड्यात मी बाहेर कशी जाऊ?

प्राध्यापक : अजिबात जाऊ नका – अहो, मघाशी बाहेर काय चाललंय हे बघायला जरा दाराबाहेर गेलो, तर एक कुत्रा मागे पडला. हरामखोर – मांडीचा घासच घेणार होता.

सबनीस : अहो प्राध्यापक – कुत्र्यांना माणसांचा इतिहास कळत नाही.

प्राध्यापक : म्हणजे?

सबनीस : अहो, कुत्र्यांनी तुम्हाला या कपड्यात बघून काय कुर्निसात करायला हवा होता की काय?

(बाई आत जातात – सगळे हसतात – सुभाषबाबू आतून बाहेर येतात. (आता ते आझाद हिंद सेनेच्या गणवेशात))

सुभाष/जाधव : चला, चला, चला – आय ॲम रेडी

प्राध्यापक : आय ॲम रेडी, आय ॲम रेडी म्हणजे काय? आम्ही तुमच्यासाठी खोळंबलेलो नाही आहोत. आपल्यासाठी सगळ जग थांबलंय - हे आधी मनातून काढून टाका - अहो, आम्ही तुमच्या शिवाय देखील हा कार्यक्रम उरकून टाकला असता - पण -

जाधव : तुम्ही कुणाची वाट बघताय ?

सबनीस : आम्ही सगळे, अगदी तयार आहोत - पण तुमचा तो चित्ररथ कुठे आहे?

जाधव : म्हणजे? चित्ररथ अजून आलेलाच नाही का?

प्राध्यापक : कसला चित्ररथ आणि कसलं काय? इथं सगळाच गोंधळ आहे. पाच वाजता शोभायात्रा निघणार होती. आता सहा वाजत आले तरी कशाचा पत्ता नाही.

जाधव : युस्लेस - या लोकांना वेळेची अजिबात किंमत नाही. रात्रभर मी झोपलेलो नाही, आज रात्री पुन्हा उशीर होणार - सकाळच्या फ्लाईटनं मला दिल्लीला जायच आहे. (दरवाज्याकडे जात) अरे कोण आहे? कुणी आहे का तिकडे -

सबनीस : अहो जाधव - ओरडताय कशाला? काही उपयोग नाही.

जाधव : म्हणजे?

सबनीस : अहो इथे ऐकायला आहे को? हे, हे कपडे आपल्या अंगावर चढवून सगळे पसार झालेले आहेत. या कपड्यामुळे कुठे बाहेरही जाता येत नाही.

बापट : खरंच - या कपड्यात अगदी कसतरीच होतंय. भयंकर अन्कम्फर्टेबल वाटतंय.

प्राध्यापक : हे मात्र खरं आहे. ही पुणेरी पगडी - या पगडीचं जरा वजन बघा. डोक्यावर घातली की गरगरायला होतंय. कधी एकदा हा खेळ संपवतोय असं झालंय.

बापट : नाहीतर काय! या खादीच्या धोतराने मांड्यांना खाज सुटलीय. हे घड्याळ कमरेला चावतंय. हा चष्मा सारखा कानाला टोचतोय, शिवाय समोरच सगळं धुरकट दिसतंय ते वेगळंच-

जाधव : किती किती तक्रारी कराल बापट ? अहो, गांधी म्हणून मिरवायचं आहे ना, मग थोडा त्रास सहन करायलाच हवा. बिन-त्रासाचं गांधी कसं होता येईल बापट?

(बाहेरून बाबू प्रवेश करतो. सगळे त्याच्याकडे बघतात)

जाधव : अरे बाबा इथली सगळी कामं सोडून तू बाहेर कुठे भटकतोयस?

बाबू : आपण भटकायला गेलो नव्हतो. कामासाठीच बाहेर गेलो होतो.

जाधव : तो चित्ररथ कुठे आहे?

बाबू : चित्ररथ तयार आहे. वर्कशॉप मधून निघाला आहे. अर्धा तास - फक्त अर्ध्या तासात जुलूस निघेल.

प्राध्यापक : नाही पाच वाजल्यापासून तू आपलं हेच सांगतो आहेस.

बाबू : (उत्साहाने) खोटं नाय - आपण आता डायरेक्ट फोनवर बोललो. आपण एकदम रेडी रहायला पाहिजे. अहो, बाहेर जाम तुफान गर्दी जमलीय. रस्त्याच्या दोन्ही बाजूला शाळेची पोरं हातात झेंडे घेऊन उभी आहेत. अहो, पोरं एकासुरात ''जयहिंदऽऽऽ'' म्हणाली ना, तेव्हा अक्षरशः अंगावरचे केस उभे राहीले. माँ कसम ! खोट नाय सांगत. फटाके, ढोल, ताशे, बँड, धमाल येणार बघा आज.

बापट : हे बघ ... या, या सगळ्या बातम्या कुठून आणतोस तू?

बाबू : बातम्या म्हणजे - डायरेक्ट बीबीसी न्यूज. फालतू वार्ता करताच नाय आपून - डायरेक्ट पावलसच बोलला मला.

बापट : पावलस्-?

बाबू : (अत्यंत सलगीने) अहो पावलस. क्रिष्णा पावलस - पावलसको कौन नही पहचानताय बोलो? अहो असं काय करताय. मघाशी, मघाशी माझ्या खांद्यावर हात टाकून बोलत होता बघा. मोठा माणूसं पण गर्व नाय. उसका अपना सॉलीड है. त्याची बायको मला भाऊ मानते.

बापट : हे बघ, जरा नीट सांग - कोण हा पावलस-?

बाबू : (समजावण्यासाठी बापटांच्या जवळ सरकतो... पण ही सलगी बापटांना आवडत नाही. बापट दूर सरकू पाहतात.) अहो - मघाशी तुमचा पाया नाही का पडला. क्रिष्णा पावलस! भाईचा राईट हँड! नंबर वन शूटर! आजचा प्रोग्राम तोच मॅनेज करतोय. उसका अपना सॉलीड है.

जाधव : (बाबूच्या स्पष्ट बोलण्याने अस्वस्थ होतात. त्याच्यावर खेकसतात) हे बघ इथे चकाट्या पिटत बसू नकोस. पुढच्या तयारीला लाग, जा-

बाबू : तयारी कसली. आपून तैयार है. ट्रकचा आवाज आला की झेंडा उचलायचा, भारतमाता की जय म्हणायचं आणि ट्रकखाली जाऊन मरायचं, चला, आपण रेसल करूया.

प्राध्यापक : नको, आम्हाला सगळा स्वातंत्र्याचा इतिहास पाठ आहे.

बाबू : पण मला वाटतं...

सबनीस : तुला काय वाटतं हे कुणी विचारलेल नाही, ते महत्त्वाचही नाही.

बाबू : व्वा, महत्त्वाचं नाही कसं - पावलस अपूनको बोला है.

बापट : काय?

बाबू : प्रोग्रॅम बरा व्हायला पाहीजे - इतिहास चांगला दाखवा. प्रोग्रॅम भाईचा आहे, तुम्हाला काय, भाईके इज्जत का सवाल है. भाईचं नाव खराब होता कामा नये.

(दारातून छोट्या हाक मारतो बाबूऽऽऽ. बाबू लगबगीने बाहेर निघून जातो.)

बापट : पाहिलंत - कसा मांडीला मांडी लावून बसतो. चुरूचुरू बोलतो. फार माजलेत. आपण ह्यांच्याशी जरा सलगीन वागावं - प्रेमान बोलावं, तर हे पार डोक्यावर चढून बसतात हो.

प्राध्यापक : अहो तो भाईशी संबंध असल्याचं दाखवून आपल्यावर इंप्रेशन मारायला बघतोय.

जाधव : प्राध्यापक मला सगळं कळतंय. मी दूधखुळा नाही. वकील आहे वकील! मी मघाशीच त्याला हाकलून लावला असता - पण काय करणार? आपण सगळे हे असे इतिहासात अडकून पडलोय. आपल्यात तो एकच असा आहे, जो इतिहासात असूनही बाहेर जाऊ शकतो. बाहेर काय घडतय ते येऊन सांगू शकतो.

प्राध्यापक : खरयं. या घटकेला तरी, आपल्यात तोच काय तो एक वर्तमानाशी संबंधित आहे.

(बाहेर एखादं राष्ट्रीय गाण सुरू होतं. मग अचानक गाणं थांबतं आणि अत्यंत भसाड्या आवाजात अनाऊन्समेन्ट ऐकू येते-

''स्वातंत्र्याचा रोमहर्षक इतिहास दाखवणारी भव्य शोभायात्रा थोड्याच वेळात सुरू होत अहे.''

''राष्ट्रपुरुषांना ओवाळणाऱ्या बायकांनी कार्यालयामागे हजर रहावे.''

''सुरेश चव्हाण - सुरेश चव्हाण ऽऽऽ कार्यालयात ताबडतोब यावे.''

पुन्हा गाण सुरू होतं-)

(बाहेरून एक १६-१७ वर्षाची अत्यंत देखणी मुलगी प्रवेश करते. सोनेरी केस. अत्यंत तंग कपडे. ती परदेशी बाहुली वाटते आहे. अत्यंत आकर्षण आणि शैलीदार हालचाली. तिच्या खांद्यावर कॅमेऱ्याची बॅग, सगळ बोलणं इंग्रजीतून, अथवा इंग्रजी मराठीतून. सगळे थक्क होऊन तिच्याकडे बघतात.)

बार्बी : हाय - हाय एव्हरीबडी - आय ॲम बार्बी - तुम्ही सगळ्यांनी मला बार्बी म्हणायच. बार्बी - ओ. के. तुमच्या इंडिपेन्डन्टसला पन्नास वर्ष झाली - कॉन्ग्रॅज्युलेशन्स. तुमच्या कंट्रीत जो कलरफुल सेरेमनी चालू आहे त्याचं कव्हरेज करायला मी इथे आली आहे. अमेरिकन मिडीयासाठी मी हे कव्हरेज करते आहे. (मग गांधींकडे बघते.) हे कोण -? महात्मा गांधी का? माय गॉड! काय क्यूट दिसता हो तुम्ही - बेन किंग्जले पेक्षाही तुम्ही जास्त रियल गांधी वाटता - मी तर प्रेमातच पडले तुमच्या. (ती पटकन गांधींच चुंबन घेते - बापट गोंधळतात.) मला वाटलं तुम्ही दुसरा गालही पुढे कराल. (हसते तिच्याबरोबर सगळे हसू लागतात.

प्राध्यापक वाकून तिला अभिवादन करतात.) आणि हे कोण? जवाहरलाल - आणि - ते - ते - सुभाषचंद्र बोस - राईट - ? आणि हे -

बापट : हे मि. बाल गंगाधर तिलक -

बार्बी : काय ब्युटिफुल हॅट आहे.

प्राध्यापक : ही हॅट नव्हे - ही पगडी. ह्याला पुणेरी पगडी म्हणतात.

बार्बी : तुमचं काम झालं की ही हॅट मला द्या. आठवण म्हणून द्याल ना? - माय गॉड! या मॅडमकडे माझं लक्षच गेलं नाही. काय सुंदर ड्रेस डिझाइन केलाय या मॅडमचा. सिम्पल पण किती सेड्युसिंग आहे. ब्लाऊझचा कट मला खूप आवडला.

(बाबू बाहेरून प्रवेश करतो. आ वासून बार्बीकडे बघत उभा राहतो. बार्बी बाबूकडे बघत -)

बार्बी : छान सेक्सी वाटतं - हो की नाही रे? तू पण हिस्ट्रीतलाच आहेस का?

बाबू : (उत्साहाने) हो - मी - मी - बाबू गेनू.

बार्बी : म्हणजे - मीच तुमच्यात काय ती, एक रीयल - खरीखुरी.

सबनीस : म्हणजे आम्ही सगळे खोटे की काय?

बार्बी : आय ॲम सॉरी - माझ मराठी जरा वाईट आहे. तुम्ही सगळ्यांनी मला जरा सांभाळून घ्यायच बरं का - ? मि. गांधी -

बापट : डोन्ट कॉल मी मि. गांधी

बार्बी : आय ॲम सॉरी महात्मा गांधी-

बापट : हे तर अजिबात चालणार नाही. मी बापट - मला मिस्टर बापट म्हणायच.

४.५ समारोप

शोभायात्रा हे नाटक अत्यंत गंभीर अशा विषयावर बेतलेले आहे. स्वातंत्र्याला पन्नास वर्षे पूर्ण झाली असताना परिवर्तन, विकास आणि संपूर्ण मानव्याचा विकास होण्याऐवजी दिसणारे चित्र अत्यंत विदारक आहे. स्वातंत्र्य संग्रामाची आठवण तर राहू द्या; मात्र माणसं 'मीपणात' प्रचंड अडकलेली आहेत. स्वार्थ गैरव्यवहार आणि फक्त स्वतःचा विचार करणारी व भवतालाविषयी निर्ढावलेली मानसिकता स्पष्ट करणारी आहेत. काही अपवाद वगळता तमाम जनतेची असलेली अवस्था या प्रातिनिधिक घटनाप्रसंगांच्या साह्याने नाटककाराने यशस्वीपणे मांडली आहे.

एवढ्या वर्षानंतरसुद्धा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही, गुन्हेगारीचे प्रस्थ वाढलेले आहे. किंबहुना एक कुणीतरी मोठा गुंडच इथल्या बऱ्याच लोकांचे जगणं त्याच्या पद्धतीने

जगायला लावतोय, 'गुन्हेगारीचं राजकीयीकरण' का 'राजकारणाचं गुन्हेगारीकरण' झालयं हे कळायला वाव नाही, अजूनही निरक्षरता आहेच व अजूनही इथल्या सामान्य माणसाला त्रासालाच सामोरे जावून त्याची दुय्यम म्हणूनच गणना केली जातेय. माणसाची भोगलोलुपता व भ्रष्टाचारी वृत्ती वाढतेच आहे. अशा अनेक मानसिक घालमेलीस नाटककार शफाअत खान यांनी या 'शोभायात्रा' नाटकातून वाट करून दिलेली आहे. वरवर साधा व सोपा वाटणारा विषय, विनोदी वाटणारे प्रसंग वाचक-प्रेक्षकाला विचार करायला लावतात. आतून हादरवून सोडतात हे या नाटकाचे वैशिष्ट्य आहे.

४.६ नमुना प्रश्नोत्तरे

अ) वस्तुनिष्ठ प्रश्न / योग्य पर्याय निवडा.

१. नाटकामध्ये गांधीजींची भूमिका करणाऱ्या व्यक्तीचे नाव काय?

अ) जाधव ब) सबनिस क) बापट ड) पावलस

२. झाशीच्या राणीचे पात्र करणाऱ्या शिक्षिका कोणता विषय शिकवितात?

अ) अर्थशास्त्र ब) इतिहास क) गणित ड) मानसशास्त्र

३. नाटकातील जाधव हे व्यवसायाने कोण आहेत?

अ) प्राध्यापक ब) उद्योजक क) डॉक्टर ड) वकील

४. 'शोभायात्रा' या नाटकाचा पहिला प्रयोग कधी झाला?

अ) १९९८ ब) २००१ क) १९९९ ड) १९९०

५. 'शोभायात्रा' हे शीर्षक नाटकाला कुणी सुचवले ?

अ) आचार्य अत्रे ब) गिरीष कर्नाड क) राजीव नाईक ड) विजय तेंडूलकर

उत्तरे : १. बापट, २. इतिहास, ३. वकील, ४. १९९९, ५. विजय तेंडूलकर

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

प्रश्न : 'शोभायात्रा' नाटकातील पात्रांच्या वृत्ती-प्रवृत्तीचे चित्रण करा.

उत्तर : प्रास्ताविक : 'शोभायात्रा' हे शफाअत खान यांचे नाटक स्वातंत्र्योत्तर कालखंडातील भारतीय जनमानसांच्या वास्तव जीवनाचे दर्शन घडविते. बुरखा पांघरून जगणारी माणसे कशी चुकीच्या मार्गाने आपले आयुष्य जगताहेत याचे वास्तव दर्शन या नाटकातून होताना आपणास निदर्शनास येते. स्वार्थापोटी माणसे भ्रष्ट, भोगलोलूप आणि संवेदनशून्य कशी बनलेली आहेत याचे प्रत्यंतर या नाट्यसंहितेवरून प्रत्ययास येते.

विवेचन : 'शोभायात्रा' या नाटकामध्ये स्वातंत्र्याची पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आहुती दिलेल्या स्वातंत्र्यवीरांचे स्मरण करणे व त्यांच्याविषयी आदर, स्वाभिमान, आत्मसन्मान इत्यादी भाव जनमानसात पुन्हा एकदा आठवणीवजा जागृत करण्यासाठीचा काही

निवडक पात्रांच्या साह्याने (म. गांधी, नेहरू, टिळक, सुभाषबाबू, बाबू गेनू, झांशीची राणी इ.) प्रयोग केला आहे. पण प्रत्यक्षातील या स्वातंत्र्यवीरांचे काम आणि त्यांची भूमिका करणारी पात्रे यांच्या वर्तनप्रणालीविषयीचे अत्यंत मार्मिक दर्शन होते. उपरोधात्मक पद्धतीने वाचक-रसिकांना चिंतन करायला लावणारे असे हे नाटक आहे.

या पात्रांची भूमिका करणाऱ्या माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तींचे एक अनोखे दर्शन लेखकाने घडविले आहे. गांधीजीचे सोंग घेणारे बापट प्रसिद्ध उद्योजक आहेत पण त्यांनी त्यांच्या व्यवसायातील मित्राला फसवून अटक केली आहे. तेही 'भाई' या गुंडाच्या मदतीने. म्हणजेच स्वातंत्र्यासाठी असहकार, सत्याग्रह इत्यादी मार्गाने ज्या महात्मा गांधीनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला; हा वारसा पन्नास वर्षांनंतर पूर्णपणे विसरून स्वार्थांध व भ्रष्ट असणाऱ्या बापट या व्यक्तीने केले आहे. ही बाबच चिंतन करायला लावते.

जाधव हे सुभाषचंद्र बोस यांचे सोंग घेणारे पात्र आहे. हे व्यवसायाने वकील आहेत. मात्र ते भाईच्या गुंडांना शिक्षा होऊ न देता सहीसलामात सोडवतात, एका शिक्षिका असणाऱ्या बाईना ते आपल्या मित्रासाठी घटस्फोट घेण्यासाठी त्रास देतात. प्रसंगी पोटातील मूल खाली करा, पण घटस्फोट द्या असे सांगून तो आग्रही राहतो. ज्या सुभाषबाबूंनी स्वातंत्र्यासाठी क्रांतीचं स्वप्न बघितलं, त्यांच्याविषयी या जाधवला विस्मरण तर झालेच आहे. देशातील न्यायव्यवस्था इथल्या प्रत्येक भारतीयांना सुखाची व सुरक्षिततेची खात्री देतेय त्या न्यायमंदिरात काम करणारा जाधव आपल्या स्वार्थासाठी भ्रष्ट कामे करतो आहे.

लोकमान्य टिळकांची भूमिका करणारे प्राध्यापकच पेपरफुटीच्या प्रकरणात सापडताहेत व भाईने आपल्या मुलाला कॉन्व्हेंटमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी मदत केली या एका गोष्टीसाठी ते गुंड प्रवृत्तीला सहकार्य करताहेत. ज्या टिळकांनी मराठी माणूस, मराठी अस्मिता यासाठी व स्वराज्याच्या प्राप्तीसाठी लढा दिला त्याच स्वतंत्र भारतातील मराठीचे प्राध्यापक आपल्या मुलीला इंग्रजी शाळेत घालण्यासाठी एका गुंडाची मदत घेतात, ही स्वतंत्र भारतातील स्वार्थी आणि अविचारी प्रवृत्ती किती भयानक आहे हे सांगितले आहे.

अशा प्रकारची या नाटकातील पात्रे विविध स्वभावविशेषाची आहेत. झाशीच्या राणीचे सोंग घेणाऱ्या शिक्षिका स्त्रीला घटस्फोटी, परित्यक्त्या म्हणून राहायचे नाही. ती आगतिक, हतबल आहे. मात्र गुंड भाईसाठी काम न करण्याचे धाडसही ती दाखवते. त्यामुळे इतर पात्रांच्या तुलनेत हे पात्र विचार करायला लावते. दुसरी बार्बी हे पात्र आत्ताच्या स्वैर पिढीचे चंगळवादाचे प्रतीक म्हणून समोर येते. अत्यंतिक देहप्रदर्शन व अनैतिक व्यवहाराविषयीची कमालीची स्पष्टता व्यक्त करणारी व स्वतःवरसुद्धा कोणतेही बंधन न ठेवणारी अशी प्रवृत्ती आहे. या दोन स्त्रियांच्या वर्तनातील कमालीचा फरक आपणांस दिसून येतो. भागलोलुपतेचे चित्रण सबनीस यांच्या प्रवृत्तीतून दिसते. स्वतःच्या मुलीच्या वयाच्या बार्बीकडे ते भोगवादी दृष्टीनेच पाहतात. शिवाय बार्बीने त्यांना झिडकारल्यावर ते शिक्षिका बाईकडेसुद्धा त्याच हेतूने जवळिकता साधण्याचा प्रयत्न करतात.

भाई हा गुंड प्रवृत्ती व त्याच प्रवृत्तीचा शिकार झालेला कृष्णा पावलस हा या कार्यक्रमाचं आयोजन करतोय तो भाईचा आदेश म्हणूनच. या सर्व लोकांना दम देऊन कार्यक्रम घेण्याचा प्रयत्न करतोय. तो शिक्षिका असणाऱ्या (झांशीची राणी) धक्काबुक्कीसुद्धा करतो. अशा गुंड प्रवृत्तीचे

चित्रणही येथे येते. परिस्थितीने सामान्य व दरिद्री असणारा बाबूसुद्धा या प्रवृत्तीचा शिकार झालेला आहे व तोही भाईसाठी काम करणारा पण सरतेशेवटी ही गुंडप्रवृत्ती झिडकारणारा असा बाबू एका बदलाचा, आशावादी प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून येताना दिसतो.

समारोप : स्वातंत्र्योत्तर कालखंडातील लोकांच्या बदललेल्या अनेक वृत्ती-प्रवृत्तीचे चित्रण या नाटकात प्रभावीपणे प्रत्ययास येते. स्वार्थांध, भोगलोलूप, भ्रष्ट आणि आत्ममग्न मनोवृत्तीची माणसे भवताल अस्वस्थ करणारी आहेत.

क) लघुत्तरी प्रश्न

'शोभायात्रा' या नाटकातील कथानक तुमच्या भाषेत विशद करा.

उत्तर : प्रास्ताविक : भारतीय स्वातंत्र्याला खूप मोठी उज्ज्वल परंपरा आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठी अनेकांच्या जगण्याचा प्रवास संघर्षमय आणि त्रासदायक झालेला आहे. अनेक वीरांनी आपल्या प्राणांचे बलिदान स्वातंत्र्यासाठी दिले आहे. स्वातंत्र्य मिळाले मात्र या स्वातंत्र्याच्या पन्नाशीनंतर सर्वसामान्य माणसांच्या वाट्याला काय आले? प्रत्येक भारतीयांमध्ये कोणकोणते मूलभूत बदल झाले? जनमाणस कोणत्या दिशेने प्रवास करते आहे, या सर्वाबद्दल कमालीच्या भेदक दृष्टीतून बघणारे नाटक म्हणून शफाअत खान यांच्या 'शोभायात्रा' या नाटकाचा उल्लेख/विचार करावा लागतो.

स्वातंत्र्याच्या पन्नाशीनंतर निवडक स्वातंत्र्यवीरांच्या शोभायात्रेच्या निमित्ताने हे नाटक सुरू होते व त्यानुशंघाने येणाऱ्या अनेक गोष्टींबद्दल कमालीचे चिंतन मांडणारे हे नाटक प्रेक्षकांना विचारप्रवृत्त करते. ते या संपूर्ण कथाशयात गुंतवून ठेवते. नाटकामध्ये कथानकाचा विचार करता शोभायात्रेमध्ये सहभागी होणाऱ्या स्वातंत्र्यवीरांपैकी अनुक्रमे गांधी, नेहरू, सुभाषबाबू, झासीची राणी तसेच बाबू गेनू यांच्या अनुषंगाने येणारा कथाभाग एका परदेशस्थित असणाऱ्या भाईद्वारे म्हणजेच त्याच्या आदेशाने स्थानिक पातळीवर गुंडगिरी करणाऱ्या पावलसकडून हा शोभायात्रेचा कार्यक्रम निश्चित केला जातो. नाटकातील राणीचे पात्र वगळता इतर सर्वांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पावलस आणि त्यायोगे ओघानेच असणारे भाईशी संबंध या सर्वांना ही शोभायात्रेतील भूमिका करायला भाग पाडते.

या नाटकात वर उल्लेख केलेली सर्व पात्रे ही त्यांनी भलेही स्वातंत्र्यविरांची भूमिका केली असली तरी लौकीक जिवनात ती अत्यंत भ्रष्ट, अनैतिक व भोगलोलूप अशाच स्वरूपाची आहेत. प्रत्येक जन स्वान्तसुखायचा विचार करतो आहे. मग यामध्ये गांधीची भूमिका करणारा बापट असो अथवा नेहरूंची भूमिका करणारा सबनिस ही सर्व माणसे आपल्या वैयक्तिक जीवनामध्ये कोणत्या ना कोणत्या स्वार्थी हेतूनी ग्रासलेली आहेत व तो विचार त्यांच्या मनात इतका बळकट झाला आहे की, स्वातंत्र्यविरांची भूमिका करत असताना कमीत कमी मला माझ्या देशाबद्दल, क्रांतीबद्दल, क्रांतीविरांबद्दल कमी-अधिक माहिती असायला हवी हे सुद्धा ही माणसे विसरली आहेत. मला या भूमिका वटवताना अनेक मर्यादा सांभाळाव्या लागणार आहेत हेही यातील माणसे विसरली आहेत, या नाटकातील प्रत्येक पात्राला स्वतःला सुरक्षित ठेवण्याच्या ओघात आपणांसमोर असणारे आदर्श, त्यांचे कार्यकर्तृत्व यांच्याविषयी सहजपणे विस्मरण होताना दिसते. उलट गांधीच्या भूमिकेत असणारा बापट मित्राला फसवतोय, सुभाषबाबूंची भूमिका करणारा जाधव गुंडांचे वकिलपत्र घेतोय. बाबू गेनूंचे

काम करणारा मुलगा पावलस या गुंडाच्या हाताखाली काम करतोय. शिवाय नेहरूंची भूमिका करणारा सबनिस हा त्याचा मूळ स्वभाव जो स्त्रीलंपटपणाचा आहे तो सोडायला तयार नाही. या सर्व प्रवासामध्ये खरी शोभायात्रा ही तमाम भारतीयाची बेमालूमपणे होते आहे हे लक्षात येते.

स्वातंत्र्याच्या पन्नाशीनंतर लोकांना स्वातंत्र्यवीरांबद्दल माहिती नाही. गुन्हेगारीचे प्रमाण वाढून त्याला राजाश्रय आहे आणि आदर्शाच्या शोभायात्रेतून लोकांना प्रेरणा आणि त्यांच्याविषयी आदरभाव, श्रद्धा निर्माण होण्याऐवजी ही माणसं या आदरणीय व्यक्तीनी केलेला त्याग, कर्तृत्व याकडे कसे सहजासहजी दुर्लक्ष करीत आहेत याचा विचार या नाटकातून समोर येतो. गुन्हेगारी, बालमजूरी, निरक्षरता, भ्रष्टाचार व स्वार्थाने आंधळी झालेली माणसे यांचं विदारक दर्शन प्रस्तुत नाटकात घडते.

एकूणच या नाटकातील कथानक आपले स्वातंत्र्य व स्वातंत्र्यवीरांबद्दल, त्यांच्या कार्याबद्दल विचारप्रवृत्त करून प्रत्येक व्यक्तीच्या डोळ्यात अंजन घालण्याचे काम करते.

४.७ सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. 'शोभायात्रा' या नाटकातून आपल्या देशातील वर्तमान स्थितीवर कसे भाष्य केले आहे, ते साधार स्पष्ट करा.

२. 'शोभायात्रा' या नाटकाच्या शीर्षकाची समर्पकता तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

ब) लघुत्तरी प्रश्न

१. 'शोभायात्रा' या नाटकाचे वेगळेपण स्पष्ट करा.

२. 'शोभायात्रा' या नाटकातील उपहासात्मक भाषाशैलीचे वैशिष्ट्य सांगा.

४.८ उपक्रम

- 'शोभायात्रा' नाटकाचे मित्रांसमोर साभिनय वाचन करा.

४.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

१. देशपांडे वि. भा. : मराठी नाटक, स्वातंत्र्योत्तर कालखंड (१९४७-९०) व्हीनस प्रकाशन, पुणे १९९२.

२. कुलकर्णी गो. म. : मराठी नाट्यसृष्टी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९६.

❑❑❑

सत्र २ : घटक १

जनाबाईंचे अभंग

संपादक – रा. चिं. ढेरे

१.१ उद्दिष्टे :

विद्यार्थी मित्रांनो, प्रस्तुत घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणास पुढील गोष्टी समजून येतील.

- वारकरी संप्रदायातील संत कवयित्री जनाबाई यांचे चरित्र व लेखनकार्य यांचा परिचय होईल.
- समकालीन सामाजिक-सांस्कृतिक वातावरणाचा साहित्यिकाच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वावर कसा व किती प्रभाव पडतो, ते समजून घेता येईल.
- जनाबाईंची कविता कोणकोणत्या आशयसूत्रांभोवती फिरते ते स्पष्ट होईल.
- जनाबाईंच्या कवितेत समकाळाचे प्रतिबिंब कसे पडले आहे, ते पाहता येईल.
- अभंग या वाङ्मय प्रकाराचे गुणविशेष स्पष्ट होतील.
- मध्ययुगीन मराठी साहित्यातील संत जनाबाईंचे योगदान व स्थान स्पष्ट होईल.
- एक लेखक अभ्यासपद्धतीचा सर्वांगीण वापर कसा करायचा, ते समजून घेता येईल.

१.२ प्रास्ताविक :

मराठी भाषेत साहित्य निर्मिती ही साधारणतः १२ व्या शतकात सुरू झाली. आद्यकवी मुकुंदराजाने आपला 'विवेकसिंधू' हा काव्यग्रंथ शके १११० (इ.स. ११८८) मध्ये लिहिला असा उल्लेख आहे. मुकुंदराजाने आपल्या लेखनाचे श्रेय यादवराजा जैतपाळ याला दिले आहे. जरी मुकुंदराजाचा काळ व स्थळ याबद्दल वादविवाद असले, तरी अंतर्गत प्रमाणांच्या आधारे हा आद्यग्रंथ आहे, असे म्हणता येते.

नंतरच्या काळात महानुभाव साहित्याची निर्मिती होऊ लागली. या संप्रदायाचे प्रवर्तक श्रीचक्रधर यांच्या उत्तरापथे गमनानंतर म्हाइंभट सारोळेकर या महानुभाव पंडिताने मराठीतील पहिला चरित्रग्रंथ 'लीळाचरित्र' हा इ. स. १२७८ मध्ये लिहिला. तर 'श्रीगोविंदप्रभूचरित्र' हा ग्रंथ इ.स. १२८८ मध्ये लिहिला. पुढे महानुभाव साहित्याची समृद्ध गद्य-पद्य परंपरा सुरू झाली.

वारकरी संप्रदायातील प्रथम संत नामदेव हे बालभक्त होते. वयाच्या दहाव्या वर्षीच त्यांच्या उत्कट भक्तीचा परिचय सर्वांना होऊ लागला होता. त्यांनी वयाच्या १६ व्या वर्षी अभंगलेखन सुरू केले असे गृहित धरले, तर इ.स. १२८६ च्या दरम्यान मराठीतील पहिला 'अभंग' लिहिला गेला,

असे मानता येते. संत नामदेव हेच मराठीतील आद्य अभंगकार आहेत. याच दरम्यान संत ज्ञानदेवांनी आपेगाव येथे इ.स. १२९० मध्ये 'ज्ञानेश्वरी' हा भाष्यग्रंथ लिहिला. पुढे अनेक संतकवींनी मराठीतून अभंग लेखन व ग्रंथलेखन सुरू केले. लोकमनावर प्रभाव गाजविला. म्हणजेच १२ व्या, १३ व्या शतकात मराठीत समृद्ध वाङ्मय निर्माण होऊ लागले. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात या कालखंडातील साहित्यास मध्ययुगीन साहित्य म्हणतात. महानुभाव व वारकरी हे या कालखंडातील अत्यंत प्रभावी संप्रदाय होय. दोन्ही संप्रदायात विपुल साहित्य निर्माण झाले.

१.३ विषय विवेचन

वारकरी हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा भक्तिसंप्रदाय आहे. श्रीविठ्ठल हे या संप्रदायाचे आराध्य दैवत. विठ्ठल हा मुळात गोपजनांचा लोकदेव आहे. इ.स. ५१६ च्या ताम्रपटात पंढरपूरचा उल्लेख पल्ली म्हणजे लहान खेडे असा आहे. इ.स. १२३७ च्या शिलालेखात पंढरपूरचा उल्लेख महाग्राम असा आहे. म्हणजेच ६ वे शतक ते १३ वे शतक या दरम्यान पंढरपूर हे तीर्थक्षेत्र म्हणून विकसित होत गेलेले दिसते. हे क्षेत्र मूळचे शैवक्षेत्र आहे. शंकराचार्यांच्या 'पांडुरंगाष्टकात' पंढरपूरास महायोगपीठ म्हटले आहे. पुढे या स्थळाचे वैष्णवीकरण झाले.

पंढरपूरात श्रीविठ्ठल हा भक्त पुंडलिकामुळे आला, असे सांगितले जाते. स्कंद पुराण व पद्मपुराणात या संदर्भातील काही उल्लेख आहेत. परंतु या पुराणांचा निर्मितीकाळ निश्चित नाही. या पुराणांमधील पांडुरंगमाहात्म्य हे श्रीविठ्ठलाचे वैष्णवीकरण करण्याच्या हेतूने रचले आहे, असे रा. चिं ढेरे म्हणतात. (श्रीविठ्ठल : एक महासमन्वय : २००५)

श्रीविष्णूच्या चोवीस अवतारात किंवा सहस्रनामात विठ्ठलाचा उल्लेख नाही. विष्णूचे सगळे अवतार दुष्टांच्या संहारासाठी आहेत. श्रीविठ्ठलाचा अवतार मात्र भक्तिसुखासाठी आहे. पंढरपुरातील विठ्ठल निःशस्त्र आहे.

येथे हे स्पष्ट होते की, संत नामदेव, ज्ञानदेव, जनाबाई यांच्यापूर्वी कितीतरी वर्षे पंढरपुरात विठ्ठल हे दैवत होते. या दैवताची लोकप्रियता वाढत होती. धनगर-मेंढपाळ यांच्या 'येरजार'मध्ये वारी या उपासना पद्धतीमुळे मूळ दडले आहे. भक्त पुंडलिकाची जनमानसात असणारी कथा नामदेवांनी प्रथम आपल्या अभंगातून शब्दांकित केली आहे. त्यानुसार माता-पित्याची सेवा करणाऱ्या पुंडलिकाच्या भेटीस प्रत्यक्ष कृष्ण रूपातील विष्णू आला. पुंडलिकाने त्याच्याकडे वीट भिरकावली व थांबण्यास सांगितले. पुंडलिकाच्या मातृपितृभक्तीने प्रसन्न होऊन देव तिथेच उभा राहिला.

अशा या विठ्ठलाची, पंढरपुरची, चंद्रभागेची व भक्तीची महती नामदेवादी संत आपल्या अभंगातून गाऊ लागले. श्रीविठ्ठलाचे रूप, गुण व माहात्म्य गाणे आणि पंढरीचे मोठेपण वर्णन करणे त्यांनी सुरू केले. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की नामदेव-ज्ञानदेवादी संतांचा काळ हा वारकरी संप्रदायाच्या निर्मितीचा, जडणघडीचा काळ आहे. संतांनी अत्यंत जाणीवपूर्वक आपल्या संप्रदायाची निर्मिती केली, प्रचार-प्रसार केला.

इ.स. च्या १२ व्या, १३ व्या शतकात योगी गोरक्षनाथांनी ऊर्जितावस्था दिलेला नाथ संप्रदाय, महात्मा बसवेश्वरांचा लिंगायत संप्रदाय, श्रीचक्रधरांचा महानुभाव संप्रदाय आणि संत नामदेव-ज्ञानदेवांचा वारकरी संप्रदाय उदयास आले. या नव्या संप्रदायांची निर्मिती का झाली असावी, असा प्रश्न स्वाभाविकपणे पुढे येतो. त्याचे उत्तर आपणास तत्कालीन राजकीय, धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थितीत शोधावे लागते.

या काळात महाराष्ट्रात चालुक्य, कळचुरी व यादव या राजघराण्यांची सत्ता होती. ही सर्व राजघराणी वैदिक परंपरेला अनुसरणारी होती. त्यामुळेच या कालखंडात यज्ञ, व्रत-अनुष्ठाने, तीर्थयात्रा यांना महत्त्व आलेले दिसते. वैदिक ब्राह्मण, शास्त्री, पंडित यांना अग्रहार, इनाम देऊन संतुष्ट करण्याचा मार्ग या राजांनी चोखाळला होता. या संदर्भात यादव राजाच्या कालखंडातील इ.स. १२७१ चा पैठणचा ताम्रपट, इ.स. १२७२ चा ठाणे जिल्ह्यातील ओवळे ताम्रपट आणि शेवटचा पुरुषोत्तमपुरी ताम्रपटमधील दान स्वीकारणाऱ्या ब्राह्मणांच्या याद्या पाहिल्या, तरी राजसत्तेचा वैदिकांबद्दलचा उदार दृष्टिकोण स्पष्ट होतो.

यादव राजांनी ब्राह्मण पंडितांना राजाश्रय दिला. त्यामुळे संस्कृत ग्रंथनिर्मिती व विविध शास्त्रांचा विकास यांना चालना मिळाली. आर्थिक सुबत्ता व एकछत्री राजवट यांमुळे कलेला पोषक वातावरण होते. त्यामुळे जैत्रपालापासून रामदेवापर्यंत प्रत्येक राजाच्या राजवटीत ग्रंथनिर्मिती झालेली दिसते.

या संदर्भात थोर अभ्यासक शं. दा. पेंडसे म्हणतात, ''यादव राजे हे वैदिक संस्कृतीचे व विद्यांचे भोक्ते होते. त्यांनी यज्ञयाग केले व विद्यांना उत्तेजन दिले. त्यांच्या कारकिर्दीत ज्योतिष, संगीत, वेदान्त, धर्मशास्त्र, व्याकरण, वैद्यक इत्यादी शास्त्रांवर अनेक ग्रंथ झाले व मराठी भाषेत ग्रंथरचनेला सुरुवात याच काळात झाली.''

रामदेवराव यादवाचा प्रधान हेमाद्री म्हणजेच हेमाड पंडित होता. त्याने 'चतुर्वर्गचिंतामणी' हा व्रतकोश लिहिला. या ग्रंथात वर्षभरात करावयाच्या सुमारे २००० व्रतांची माहिती व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड, मोक्षखंड आणि परिशेषखंड अशा पाच खंडात दिली आहे. प्रत्येक व्रत हे ब्राह्मणभोजन व दान यांच्याशी जोडलेले आहे. याचा अर्थ असा की या काळात वैदिक ब्राह्मण, शास्त्री, पंडित यांचा राजावर आणि समाजावर प्रभाव होता. त्यामुळे सगळा समाज या व्यर्थ कर्मकांडात गुरफटून गेला. धार्मिक कर्मकांडाचे वाढते प्राबल्य राजसत्तेला क्षीण बनवते. समाज पंगू बनतो. सामान्य लोक अनेक देव-देवतांची पूजा करू लागतात. अंधश्रद्धा बोकाळते. बहुदैवतवाद अस्तित्वात येतो. समाजाला योग्य मार्गदर्शन मिळेनासे होते. धर्माला साचलेपण येते. विचारी माणसाला याचे फोलपण उमजते. या गोंधळातून बाहेर पडण्याचा मार्ग तो शोधतो. म्हणजेच साचलेला धर्मप्रवाह प्रवाहित करणारे नवे भागीरथ जन्मास येतात. ते नवे उपासना मार्ग, नवे संप्रदाय सुरू करतात. गोरक्षनाथ, बसवेश्वर, चक्रधर, नामदेव हे असे युगप्रवर्तक अध्वर्यु आहेत.

अर्थात नवे संप्रदाय निर्माण करणे सोपे नसते. कारण मूळ धर्मप्रवाह त्या परिवर्तनाला परवानगी नाकारतो. तत्कालीन वैदिक परंपरेनेही नव्या संप्रदायांना मान्यता दिली नव्हती, असे दिसते. त्यामुळेच

श्रमाला व ज्ञानाला प्रतिष्ठा देणारा बसवेश्वरांचा लिंगायत संप्रदाय जेव्हा जाती-वर्ण व्यवस्था मोडू लागतो, तेव्हा राजसत्ता लिंगायत शरणांच्या विरोधात जाते. राजा सोवीदेव रायमुरारी आपलाच प्रधान बसवेश्वरांच्या विरोधात संघर्ष छेडतो, तेव्हा लिंगायतांना जीव वाचवून पळून जावे लागते. तसेच रामदेवराव यादवांचा प्रधान हेमाद्री हा महात्मा चक्रधरांच्या विरोधात राजाकडे तक्रार करतो आणि शिक्षा देववितो. म्हणजेच धर्मसत्ता व राजसत्ता एकत्र येऊन नवा विचार, नवी उपासना पद्धती मोडून काढू पाहात होते.

असे असले तरी, नवी उपासना पद्धती, नवे संप्रदाय ही त्या काळाची गरज होती. अज्ञान अंधःकारात दिशाहीन झालेल्या शूद्रातिशूद्रांना व स्त्रियांना उन्नतीचा पारमार्थिक मार्ग दाखविणे गरजेचे होते. या गरजेतूनच संत नामदेवांनी नवी भक्तिचळवळ उभी केली. नामसंकीर्तन हे सर्वजनसुलभ साधन निर्माण केले. नामवेदाची स्थापना केली. 'न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध। नामाचे प्रबंध पाठ करा।।' असे खुले आवाहन केले. याच दरम्यान नामदेवांना साथसोबत मिळाली ती प्रज्ञावंत योगमार्गी ज्ञानदेवांची. ज्ञानदेव हे मूळचे नाथपंथी, योगमार्गी. निर्गुण निराकाराची उपासना करणारे. तर नामदेव सगुण साकार विठ्ठलाची उपासना करणारे. निवृत्ती-ज्ञानदेवादी भावंडांनी नामदेवांना योगमार्गात घेण्याचा प्रयत्न केला. मात्र नामदेवांनी आपला भक्तिमार्ग सोडला नाही. कारण योगमार्गात खडतर साधना करणारा व्यक्ती स्वतःच ईश्वर रूपाचा साक्षात्कार घेतो, तर भक्तिमार्गात एकाच वेळी अनेक सामान्य भाविक परमेश्वराशी आपले नाते जोडू शकतात. म्हणूनच काळाची-समाजाची गरज लक्षात घेऊन या भावंडांनी भक्तिमार्ग स्वीकारला. ज्ञानोत्तर भक्तीची कल्पना मांडली. 'ज्ञानेश्वरी' हा ज्ञानदेवांचा वारकरी संप्रदायात प्रवेश करण्यापूर्वी लिहिलेला ग्रंथ. परंतु या ग्रंथाला वारकरी संप्रदायाने आपला तत्त्वज्ञानात्मक आधारग्रंथ म्हणून स्वीकारले. 'नामा म्हणे ग्रंथ। श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी। अनुभवावी।।' असे म्हटले. ज्ञानेश्वरीत विठ्ठल नाही. विठ्ठलभक्ती नाही. मात्र तो भक्तिमार्गप्रदीप आहे. असा नवा संप्रदाय मांडताना परंपरा नाकारणे ओघानेच आले. वारकरी संतांनी वेद, यज्ञयाग, मंत्रतंत्र आदी गोष्टी बाजूस सारल्या.

> जरी वेद बहु बोलिलें। विविध भेद सूचिलें।
> तरी आपण हित आपुले। तेचिं घेणें।। ज्ञा. २-२६०

अशी भूमिका ज्ञानदेवांनी मांडली. वारकऱ्यांनी स्वतःला अवैदिक घोषित केले नाही. परंतु वेद, वैदिक परंपरा निमूटपणे स्वीकारली नाही. या परंपरेला छेद देणारा एक भक्कम पर्याय उभा केला. त्यामुळेच सगळ्या संतांना कमी अधिक प्रमाणात छळ, अपमान, अवहेलना यांना सामोरे जावे लागते. कारण वेद नाकारणे म्हणजे धर्मद्रोह, पाखंड होय. धर्माला, धर्ममार्तंडांना आव्हान देणे होय. परंतु वारकरी संतांनी थेट संघर्ष टाळला. याचे कारण स्पष्ट करताना अ. ना. देशपांडे म्हणतात, ''बहुतांश संत हे हीन जातीतले. वैदिकांच्या दृष्टीने समाजाच्या तिरस्कृत स्तरातले. आम्हाला ज्या भक्तीचे जीवापलीकडे वेड आहे, ती वेदमान्य आहे, असे वैदिकांच्या, उच्चवर्णियांच्या निदर्शनास

आणावयाचे व सौजन्यपूर्वक रीतीने त्यांच्याशी जुळते घ्यावयाचे, असाही भक्तीचा वेदाशी संबंध जोडण्यातला संतांचा हेतू असावा.''

एकंदर, वारकरी संप्रदाय हा आचार-विचाराच्या पातळीवरील बंडखोरपणा होता. परंतु ही बंडखोरी सार्वजनिक हिताची होती. संतांनी मोठ्या कौशल्याने संघर्ष टाळला आणि नवी मांडणी केली. नामसंकीर्तन, शुद्ध आचरण, एकादशी व वारी या चार घटकांना प्राधान्य देऊन वारकरी संप्रदायाची स्थापना झाली.

१.३.१ संत जनाबाई : चरित्र आणि कार्य

जनाबाईचे लौकिक चरित्र फारसे उपलब्ध नाही. गंगाखेड (जि. परभणी) या गावात दमा व करुंड या दाम्पत्याच्या पोटी जन्मलेली ही मुलगी. तिच्या अजाणत्या वयातच तिचे आई-वडील वारले. ती पंढरपूरच्या चंद्रभागेच्या वाळवंटात भटकत राहिली. लोकांनी तिला कदाचित विचारले असेल, ''तुझ्या वडिलांचे नाव काय? तू कुणाची?'' तेव्हा तिने वडिलांचे नाव 'दमा' असे सांगितले. ऐकणाऱ्यांना ते दामा वाटले. मग त्यांनी दामाशेटी या नामदेवांच्या वडिलांकडे या छोट्या मुलीस आणले. दामाशेटींनीही या मुलीस घरी आश्रय दिला. अशा प्रकारे जना ही नामदेव कुटुंबात दासी म्हणून काम करू लागली. आयुष्यभर तिने स्वतःला या कुटुंबाशी जोडून घेतले.

संत चरित्रकार महिपतीबुवा कांबळे (ताहराबादकर) यांनी इ.स. १७६२ मध्ये लिहिलेल्या 'श्रीभक्तविजय' ग्रंथात जनाबाईचे त्रोटक चरित्र लिहिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, '७ वर्षाच्या जनाबाईस घेऊन दमा व करुंड पंढरपुरास देवदर्शनास आले असताना जनाबाईने 'मी येथेच राहीन' असा हट्ट धरला. त्यानुसार तिला पंढरपुरात महाद्वारी सोडून आई-वडील स्वतःच्या गावी परतले. नंतर नामदेवाला ही छोटी मुलगी दृष्टीस पडली. तेव्हा त्याने तिला घरी नेले.' परंतु ही हकिकत खरी वाटत नाही.

जनाबाईंच्या अभंगात नामदेवांच्या जन्माचे, बारशाचे वर्णन आले आहे. त्यावरून असेही वाटते की जनाबाई नामदेवापेक्षा थोडी मोठी असावी. येथे पोरक्या जनाबाईला नामदेवांच्या कुटुंबात स्थान मिळाले, हे सत्य स्पष्ट झालेले दिसते.

संत जनाबाई व संत नामदेव यांचे नातेसंबंध कसे असतील हा एक कुतुहलाचा प्रश्न आहे. महिपतींनी त्यावर भाष्य केले आहे.

जनी उत्तर देतसे त्यांसी। म्हणे मी नामयाची अनन्यदासी।
त्याजविण मायबाप मजसी। आणिक नाही सर्वथा।
संसारधंदा करितां जाण। अखंड करी हरिस्मरण।
रात्री ऐकोनि हरिकीर्तन। तैसेंचि मनन करीतसे।

येथे जनाबाईचे नामदेवाशी असणारे नाते स्पष्ट होते.

जनाबाईने आपल्या एका अभंगात, 'धन्य मायबाप नामदेव माजा। तेणें पंढरीराजा दाखविले' असे म्हटले आहे. तर दुसऱ्या एका अभंगात 'बाई, मी लिहिणे शिकलें सद्गुरूरायापाशी' म्हटले आहे. येथे कसे लिहायचे? त्याचबरोबर काय लिहायचे? कुणासाठी व कशासाठी लिहायचे? याची चर्चा/मार्गदर्शन झालेले असणे शक्य आहे.

संत नामदेवांचे कुटुंब पंढरपुरात विठ्ठल मंदिरासमोरच राहात होते. जवळच चंद्रभागेचे वाळवंट होते. ज्ञानेश्वरादी संतमंडळी एकत्र जमत होती. अनेक विषयांवर चर्चा झडत होत्या. संतमंडळी अनेक प्रसंगांना सामोरी जात होती. नवे लिहिले, गाईले जात होते. या सर्व घडामोडींचे जवळून दर्शन जनाबाईला घडत होते. कळत-नकळत तिचे प्रशिक्षण घडत होते. ज्ञानदेवांबद्दल तिला विलक्षण जिव्हाळा होता. म्हणूनच ती म्हणते, 'ज्ञानाचा सागर, सखा माझा ज्ञानेश्वर'. येथे असे दिसते की नामदेव हे गुरू, तर ज्ञानदेव हे परीक्षक व मार्गदर्शक होते.

जनाबाईंच्या भावजीवनात विठ्ठलाला फार महत्त्वाचे स्थान आहे. कारण विठ्ठल हा तिचा सखा सांगाती आहे. तो तिच्याशी बोलतो, तिला मदत करतो, असे अनेक अभंगातून दिसते. जनाबाईने विठ्ठलाला मानवी पातळीवर आणून ठेवले आहे. तो दिवस-रात्र तिला कामात मदत करतो, तर कधी तिच्याशी सुखसंवाद करतो, असे जनाबाईने स्वतःच लिहिले आहे.

जनाबाईने लिहिलेल्या अभंगांमुळेच तिच्यावर शृंगापत्ती आलेली दिसते. विठोबाच्या गळ्यातील सोन्याचे पदक चोरल्याचा आळ तिच्यावर येतो. बडवे तिला मारतात, गावच्या पाटलाकडे फिर्याद करतात. तेव्हा तिला सुळी देण्याचा निर्णय होतो. परंतु तिच्या भक्तीमुळे आणि अन्य भाविकांच्या पाठिंब्यामुळे कठोर माणसांचे अंतःकरण द्रवते. तिची शिक्षा माफ होते.

जनाबाई संत नामदेवांमुळे लिहिती झाली. तिने वारकरी आचारधर्म स्वीकारला, वारकरी तत्त्वज्ञान अंगी बाणवले. त्यामुळे जनाबाईचे काव्य वारकरी संप्रदायाला आधार देणारे, संप्रदायाचा विकास करणारे ठरले. नामदेवांना मनोभावे अनुसरणारी जनाबाई भजन, कीर्तनातही सहभागी होऊ लागली. हाती टाळ आणि खांद्यावर विणा घेऊन ती वारकरी संप्रदायाची प्रचारक संत बनली. एका यत्किंचित दासी असणाऱ्या, धुणे-भांडी करणाऱ्या स्त्रीने अध्यात्म सांगावे, हे तत्कालीन धर्मपरंपरेला रूचले नसावे. त्यामुळेच जाणीवपूर्वक तिच्यावर चोरीचा आळ आणला असावा, असे दिसते.

असे घडले तरी न डगमगता तिने स्वतःला वारकरी संप्रदायात झोकून दिले. लवकरच तिला संत म्हणून ख्याती मिळाली. संत ज्ञानदेव व सोपानांनी इ.स. १२९६ मध्ये तर मुक्ताबाई व निवृत्तीनाथांनी इ.स. १२९७ मध्ये समाधी घेतली. सावता माळींचे देहावसान इ.स. १२९५ मध्येच झाले होते. गोरा कुंभार पंढरपूरापासून दूर तेर (जि. उस्मानाबाद) येथे होते. तर चोखोबा मंगळवेढ्यात. नामदेवांनी या भावंडांच्या समाधीनंतर प्रथम दक्षिणेत व नंतर उत्तरेत तीर्थयात्रा केल्या. या सगळ्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांची पताका पंढरपुरात दिमाखात फडकती ठेवण्याचे कार्य जनाबाईने पंढरपुरात केले. स्त्रीजन्म म्हणून उदास न होता व न डगमगता केले. नामदेव इ.स. १३३९ ते १३४९ ही दहा वर्षे उत्तरभारतात होते. पंजाबमधील गुरूदासपूर जिल्ह्यात घुमान येथे त्यांचा मुक्काम होता. ते शेवटी पंढरपुरी परतले

आणि (इ.स. १३५० मध्ये) समाधीस्त झाले. संत जनाबाईंनीही त्यांच्यासोबत समाधी घेतली, असे मानले जाते.

१.३.२ संत जनाबाईंचे काव्य

कोणत्याही कवीच्या काव्यलेखनाचा अभ्यास करताना आपणास प्रथम विकासक्रम लक्षात घ्यावा लागतो. कवी हा एकाच वेळी इतरांसारखा लौकिक जीवन जगणारा आणि त्याचवेळी अलौकिक कार्य करू पाहणारा असतो. म्हणजेच कवीचे लौकिक व्यक्तिमत्त्व वेगळे असते, तसेच वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व वेगळे असते. त्यामुळेच कवीवरील वाङ्मयीन संस्कार, त्याच्यासमोरील आदर्श, काव्यलेखन प्रेरणा, त्याचे लेखन प्रयोजन यांचाही विचार करावा लागतो.

जनाबाई ही लौकिक जीवनात नामदेवांच्या कुटुंबातील दासी आहे. घरातील पडेल ते काम करणे ही तिची जबाबदारी आहे. मोबदल्यात तिच्या अन्न-वस्त्र-निवाऱ्याची सोय झालेली असावी. एका अभंगात ती असे नोंदविते की, नामदेवांच्या कुटुंबात चौदा माणसे आहेत आणि पंधरावी ती दासी जनी आहे. झाड-लोट करणे, धुनी-भांडी करणे, दळण-कांडण करणे, गोवऱ्या लावणे-वेचणे अशी कामे ती करते. तिच्या संपूर्ण कवितेत कुठेही या कामाबद्दल तक्रार नाही. नामदेवाच्या कुटुंबाने त्रास दिल्याचा उल्लेख नाही. खंत, असंतोष, वैताग, दुःख, निराशा, उदासीनता, नशिबाला दोष देणे असा कुठलाही प्रकार तिच्या कवितेत नाही. यावरून एकच लक्षात येते की तिचे जगणे जरूर कष्टप्रद होते, परंतु असमाधानाचे नव्हते. उलट ती स्वतःला या कुटुंबाचा घटक मानते, कुटुंबाचे सुख-दुःख हे तिचे सुख-दुःख असते, असे दिसते.

असे असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे संत नामदेवाचा सहवास होय. बालभक्त नामदेव, अध्यात्मज्ञानासाठी शास्त्री-पंडितांच्या पायाशी लागून निराश होऊन परतलेले नामदेव, स्वतःचा भक्तिमार्ग चोखाळणारे अभंगकर्ते नामदेव, भजन-कीर्तनाची नवी वाट निर्माण करणारे नामदेव आणि अठरापगड जातींना एकत्र करून नामसंकीर्तनाचे सर्वजनसुलभ साधन त्यांच्या हाती देणारे, आचरणशुद्धी सांगणारे नामदेव जनाबाईने जवळून पाहिले. या प्रत्येक टप्प्यावर ती नामदेवांसोबत उभी राहिली. भजन-कीर्तनात देहभान हरपून नाचणाऱ्या, गाणाऱ्या नामदेवांना तिने अनुभवले. नामदेवांचे शिष्यत्व पत्करले. भक्तिमार्गातील आपले अनुभव शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यातूनच कवयित्री जनाबाईचा जन्म झाला. 'बाई मी लिहिणे शिकले सद्गुरूरायापाशी' अशा स्पष्ट शब्दात तिने नामदेवांना लेखनाचे श्रेय दिले.

नामदेवांच्या संगतीत जनाबाईला लौकिक जीवनातील छोट्या-मोठ्या सुखदुःखाचा विसर पडला. आपण दासी आहोत याची खंत किंवा न्यूनत्वभाव तिच्या मनी जन्मला नाही. उलट तिचे विठ्ठलाकडे असे मागणे आहे, की पुढच्या जन्मातही मला नामदेवाच्या दारातच जागा दे.

> देवा देई गर्भवास। तरीच पुरेल माझी आस
> परि हे देखा रे पंढरी। सेवा नामयाच्या द्वारीं।।

असे तिचे मागणे आहे. पक्षी, डुक्कर, कुत्रा, मांजर किंवा कोणताही प्राणी कर, पण नामदेवाच्या दारात स्थान दे, इतकी नामदेवांशी भावभक्तीने जोडलेली जनाबाई आहे.

जनाबाईने मंदिरातील पारायणे ऐकली आहेत. पुराणिकांनी, हरिदासी बुवांनी तिचे काही प्रमाणात भरणपोषण केले आहे. पुढे नामदेव, ज्ञानदेवादी मंडळी, गोरोबा, सावता माळी, नरहरी, चोखोबा यांना तिने ऐकले आहे. त्यांच्या चर्चेत ती श्रोता म्हणून तर कधी अज्ञ प्राश्निक बनून सहभागी झाली आहे. यातून तिच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे भरणपोषण झाले आहे. त्याचबरोबर जात्यावरच्या ओव्या, लोकपरंपरेतील गीते यांचाही तिला परिचय आहे. या सर्व प्रभावाचा उत्तम पारिपाक म्हणजे जनाबाईचे काव्यलेखन होय.

हे लिहिणे कशासाठी याचाही काहीसा विचार तिच्या काव्यात दिसत राहतो. आत्माविष्कार ही मुख्य प्रेरणा आहेच, परंतु ईश्वराची आर्त आळवणीदेखिल आहे. त्या सोबतच अज्ञ जनांच्या मनीमानसी भक्तिपरंपरा रूजविणे आहे. त्यासाठी वारकरी संप्रदायाची जडणघडण करणे आहे. त्याचाच भाग म्हणून जनाबाईने श्रीविठ्ठल माहात्म्य, पंढरीमाहात्म्य, संतगौरव, उपदेश आदी गोष्टी रचलेल्या दिसतात. भक्तिपंथाच्या प्रचार-प्रसाराचा हेतू जनाबाईच्या लेखनात आहे, असेही इथे जाणवत राहते. कृष्णलीला, दशावतारवर्णन, हरिश्चंद्र आख्यान यांच्या माध्यमातून देवाची भक्तवत्सलता रूजवण्याचा प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे लौकिक जीवनाबद्दलचा उपदेश आहे. ज्ञानोत्तरभक्तीचा पुरस्कार आहे.

या जडणघडणीचे नेमके विवेचन महिपतीने आपल्या काव्यात केले आहे. विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना जनाबाई म्हणते,

संसारधंदा करितां जाण। अखंड करी हरिस्मरण।
रात्री ऐकोनि हरिकीर्तन। तैसेंचि मनन करितसे।।

नामदेवांचे उभरते व्यक्तित्व जनाबाईने जवळून पाहिले. स्वतःच्याही नकळत तिने नामदेवांचा वसा-वारसा उचलला. तिही भक्तीत दंगली, अभंगात रंगली. नामदेवरचित अभंग म्हणता म्हणता तिला तो छंद सापडला, ती लय सापडली. दासी जनी लिहू लागली.

इथे पुन्हा जनाबाईच्या व्यक्तित्वाचा विकास लक्षात घेतला पाहिजे. ती प्रथम दासी आहे. नामदेवाच्या घरची आश्रित आहे. लौकिक जीवन जगताजगता तिला भक्तिमार्गाचा परिचय झाला आहे. मग ती सगुण साकार रूपाने वेधली गेली आहे. तिला हळू हळू संसाराचे खरे स्वरूप आणि भक्तीचे सुख कळू लागले आहे. याच वाटेवर चालताना तिला कवित्वस्फूर्ती झाली. ती लिहू लागली. तिला नामदेव-ज्ञानदेवांचे मार्गदर्शन लाभले. तिला वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान समजू उमजू लागले. तिचा मनपालट झाला. देहभावाच्या पलीकडे जाऊन ती उन्मनी अवस्था भोगू लागली. चराचरात व्यापून राहिलेल्या परमेश्वराशी ती नाते शोधू लागली. हळू हळू तिला संत म्हणून मान्यता मिळाली. तिने सांप्रदायिक विचारधारा सांगायला, उपदेश करायला सुरुवात केली. असा तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासक्रम आहे.

स्वाभाविकच तिचे पहिले पहिले अभंग हे आर्त भक्ताची भावना व्यक्त करणारे आहेत. देव भेटावा अशी इच्छा आहे. देवाचा गुणगौरव आहे. कृष्णलीला वर्णन आहे. पुढच्या टप्प्यात भक्तीचे स्वरूप स्पष्ट करणे आहे. नाममहात्म्य, पंढरीमाहात्म्य, वारकऱ्यांची आचारसंहिता, संतगौरव यावर भर आहे. तर शेवटच्या टप्प्यावर लोकांना केलेला उपदेश आहे. ईश्वराकडे व्यापक भूमिकेतून केलेले मागणे आहे. जनाबाईच्या अभंगनिर्मितीचा कालक्रम सर्वसाधारणपणे असा असणार आहे.

१.३.४ लेखन हीच बंडखोरी

संत जनाबाईंचा काळ हा १३ वे शतक व १४ वे शतक आहे. हा काळ यादव राजांचा अखेरचा काळ आणि अल्लाउद्दीन खिलजीच्या रूपाने मुस्लीम राजवट सुरू होण्याचा काळ आहे. या काळात समाजावर राजसत्तेबरोबरच धर्मसत्तेचा अंकुश आहे. वैदिक ब्राह्मणांचे वर्चस्व असल्यामुळे संस्कृतमधून अध्यात्मज्ञान मांडावे, तेही ब्राह्मण या श्रेष्ठवर्णाने मांडावे असा धर्मशास्त्राचा नियम आहे. अशा कालखंडात कोणत्या तरी निम्न जातीत जन्मलेली, दासी म्हणून दुसऱ्याच्या घरी धुणे-भांडी करणारी स्त्री मराठीतून धर्मविचार, अध्यात्मविचार मांडते हीच मोठी बंडखोरी आहे. त्यामुळे जनाबाईची कवयित्री म्हणून सुरू असलेली कारकिर्द म्हणजे परंपरा मोडून निर्माण केलेली नवी पायवाट आहे. एका शूद्र गणल्या गेलेल्या स्त्रीचा हा काव्याविष्कार अचंबित करणारा आणि मराठीत नव्या संस्कृतीची जडणघडण करणारा ठरला आहे.

१.३.५ आर्त भावभक्तीचा अविष्कार

जनाबाईचे संपूर्ण काव्य हे भक्तिभावनेने भरलेले आहे. कारण भक्ती हीच त्या युगाची प्रवृत्ती होती. जेव्हा जनाबाईने या भक्तिमार्गात प्रवेश केला, तेव्हा स्वाभाविकच तिला परमेश्वराची आर्त ओढ लागून लाहिली. सगुण साकार रूपाने ती वेडावली. त्याच्या दर्शनाची तिला ओढ लागली. अंतःकरण व्याकूळ करणारी ही विरह अवस्था तिने आपल्या अभंगांमधून मांडली.

ये गे माझे विठाबाई। कृपादृष्टीनें तूं पाही।
तुजविण न सुचे कांही। आतां मी वो करूं काहीं।
माझा भाव तुजवरी। आतां रक्षी नानापरी।
येई सखये धांऊनी। म्हणे नामयाची जनी।।

असे तिचे विठ्ठलाला आवाहन आहे. मी निढळावर हात ठेवून तुझी वाट पाहात आहे. पांडुरंगा, जीवलगा, सखया धाव धाव. तुझ्यावाचून मला दाहीदिशा ओस झाल्या आहेत. माझे चार लोकांत हसे करू नकोस, असेही जनाबाई म्हणते.

'सख्या घेतले पदरी । आता न टाकावे दुरी', असेही ती म्हणते. गंगा समुद्राजवळ गेली आणि त्याने तिला नाकारले तर कुणाला सांगायचे? पाण्याने जलचरांना नाकारले किंवा आईने मुलाला

नाकारले, तर कसे होईल? देवा मी तुला शरण आले आहे. मला तू नाकारलेस तर भक्तवत्सल हे तुझे ब्रीद लयास जाईल, असे जनाबाई म्हणते.

माय मेली बाप मेला। आता सांभाळी विठ्ठला।
मी तुझे गा लेकरूं। नको मजशी अव्हेरू।

असेही ती म्हणते. विठ्ठला, तू का येत नाहीस? मला कोणता दोष लाभला आहे? तूच मायबाप धनी आहेस. तू अनेकांचा उद्धार केला आहेस. मी कितीतरी पामर आहे. तू मला मदत कर, असे ती म्हणते.

माझी आंधळ्याची काठी कोणत्या बेटात अडकली आहे? मी आता कोणाला सांगू? हृषिकेशा धाव! कारण ''तुजवांचुनी विठ्ठला। कोणी नाही रे मजला।'' अशी तिची स्थिती आहे. मला तुझ्या पायाजवळ जागा दे. तुझे रूप डोळ्यांनी पाहीन आणि वेळोवेळी मुखाने तुझे नाव घेईन, असेही ती म्हणते. 'पोट भरूनी व्यालासी। मज सोडुनी कोठे जासी।।' असेही ती म्हणते.

माझे हात शिणले आहेत. तू येऊन मदतीचा हात दे. तू माझे माहेर आहेस. माझे अंतरंग काय पाहतोस? मी माझा जीवभाव तुझ्यावर ओवाळला आहे. मी तुझी धर्माची लेक आहे, तू माझा धर्माचा वडील आहेस, असेही जनाबाई एका अभंगात म्हणते.

राजाई, गोणाई, नारा, गोंदा, महादा, विठा या नामदेव कुटुंबातील सर्वांना जवळ घेतले आहेस आणि मला नीच म्हणून बाहेर ठेवले आहेस, असा बोल ती विठ्ठलाला लावते.

काय करू पंढरीनाथा। काळ साह्य नाहीं आतां।।
मज टाकिलें परदेशीं। नारा विठा तुजपाशीं।।
श्रम बहू जाला जीवा। आता सांभाळी केशवा।।
कोण सखा तुजविण। माझें करी समाधान।।
हीन दीन तुझें पोटीं। जनी म्हणे द्यावी भेटी।।

असे जनाबाईचे मागणे आहे.

आता वाट पाहूं किती। देवा रुक्माईच्या पती।।
येई येई पांडुरंगे। भेटी देई मजसंगें।।
मी बा बुडतें भवजळीं। सांग बरवी ब्रीदावळी।।
राग न धरावा मनीं। म्हणे नामयाची जनी।।

असा व्याकूळ भाव ती आपल्या अभंगातून व्यक्त करते. 'करूणा' आणि 'भेट' या शीर्षकाखाली येणारे सुमारे ४० अभंग जनाबाईची आर्त ओढ स्पष्ट करतात. ती देवाला विविध प्रकारे आवाहन करते. कधी माता-पिता, कधी सखा, तर कधी भक्तवत्सल देव या स्वरूपात पाहते.

१.३.६ देवाचे रूप–गुण वर्णन

वारकरी संतांनी परंपरेने चालत आलेल्या देवाच्या रूप-गुणांपेक्षा वेगळा देव आपल्या अभंगात रंगविला. वैदिक असे मानतात की देव हा मंत्रवश्य आहे. सगळे मंत्र हे ब्राह्मणांच्या आधीन आहेत. त्यामुळे देवाला प्रसन्न करून घ्यायचे असेल, तर प्रथम ब्राह्मणाला प्रसन्न करून घ्यावे लागेल. वारकरी संतांनी ही मध्यस्त व्यवस्था नाकारली. देव मंत्रवश्य नव्हे, तर भक्तिवश्य आहे, हे रूजविणे सुरू केले. मुळात उपनिषदापासून भक्तीचा गौरव सुरू झाला होता. पुढे भागवतासारख्या पुराणांनी देव भक्ताच्या हाकेला धावून येतो, हे सांगणाऱ्या अनेक कथा रचल्या. वारकरी संतांनी हीच देवाच्या भक्तवत्सल रूपाची महती आपल्या अभंगातून गाईली. 'देवाची कीर्ती कलियुगात पसरवण्यासाठी संत आहेत,' असे नामदेवांचे म्हणणे होते. जनाबाईने आपल्या गुरूचे वचन सार्थ बनविलेले दिसते. देव भक्ताच्या हाकेला धावून येतो. त्याच्या कामकाजात मदत करतो, अशा अनेक कथा त्यांनी रचल्या. काही पुराणातील दाखले दिले.

देव भावाचा लंपट। सांडुनि आला हो वैकुंठ।।
पुंडलिकापुढे उभा। सम चरणींची शोभा।।
हातीं चक्र पायीं वांकी। मुख भक्ताचें अवलोकीं।।
उभा बैसे न सर्वथा। पाहे कोठें भक्तकथा।।
सर्व सुखाचा सागर। जनी म्हणे शारंगधर।।

असे वर्णन जनाबाई करते. देव हा भावाचा लंपट आहे. तो भक्तिसुखासाठी वैकुंठ सोडून खाली आला आहे. तो सर्व सुखाचा सागर आहे, अशी मांडणी जनाबाई करते.

ज्याचा सखा हरी। त्यावरी विश्व कृपा करी।
उणें पडों नेदी त्याचें। वारे सोसी आघाताचे।।

असा या भगवंताचा विशेष आहे. एकदा का या देवाची संगत जोडली की सर्व विश्व कृपावंत होते. आपल्या भक्तावरील आघात देव स्वतः सोसतो. कारण तो भक्तीने अंकित झाला आहे.

संतांनी देवाला आई-बाप म्हटले आणि वत्सलभाव भक्तीशी जोडला. त्यामुळे देव आणि भक्ताचे नाते अधिकच विलोभनीय झालेले दिसते. या नात्यातील मधुरता अधिकच वाढली आहे. एका अतिशय सुंदर अभंगात हा वात्सल्यभाव जनाबाईने मांडला आहे.

पक्षी जाय दिगंतरा। बाळकांसी आणी चारा।
घार हिंडते आकाशी। चित्त तिचे पिल्लांपाशी।।
माता गुंतली कामासी। चित्त तिचें बाळापाशीं।।
वानर हिंडे झाडावरी। पिलीं बांधुनी उदरीं।।
तैसी आम्हांसी विठ्ठल माये। जनी वेळोवेळां पाहे।।

असे देवाचे रूप जनाबाई रेखाटते. कधी 'हें तो नवल नव्हे देवा। तूं भुललासी भक्तिभावां।।' असा आश्चर्याचा भावही ती व्यक्त करते.

द्रौपदीला वस्त्रे पुरविणारा कृष्ण, भिल्लीणीची फळे चाखणारा राम, गोकुळात दही दूध चाखणारा बालकृष्ण, दुर्योधनाला मारणारा, पांडवांचे रक्षण करणारा, विदूराघरी कण्या खाणारा कृष्ण अशा अनेक कथा जनाबाईने शब्दबद्ध केल्या आहेत. 'देव तारक तारक। देव दुष्टांसी मारक,' असे ती म्हणते. 'शत्रुलाही आधीं मारी। भक्तसंकटीं रक्षी हरी' असे तिचे सांगणे आहे.

एकंदर, जनाबाईने देवाच्या सगुण-साकार रूपाचे, भक्तवत्सल स्वभावाचे, मातृहृदयाचे अतिशय मनोरम वर्णन केले आहे. भक्तीला भुलणारा हा देव साक्षात वैकुंठाहून खाली अवतरतो, भक्ताची कामे करतो, तो तारक-संजीवक आहे, असे वर्णन जनाबाई करते.

१.३.७ जनाबाईचा सखा विठ्ठल

जनाबाईच्या अनेक अभंगात विठ्ठल मानुष रूपात वावरताना दिसतो. तो जनाबाईला सर्व कामात मदत करतो. इतकेच नव्हे तर तिला आंघोळ घालतो, तिची वेणी घालतो असे दिसते. जनाबाईने आपल्या अभंगातून अतिशय भावमधुर अशी प्रसंगचित्रे रंगविली आहेत. येथे एक प्रश्न पडतो की हे खरे की खोटे? खरे मानले तर हे सगळे चमत्कारच म्हणावे लागतील. भक्तीच्या बळावर संतांनी देवाला ऋणाईत आणि वेळाईत बनविले आहे. त्यामुळे देवच संतांच्या दारी तिष्ठत उभा आहे, असे अविश्वसनीय, अलौकिक चित्र निर्माण झालेले दिसते.

आजच्या विज्ञानवादी, बुद्धिनिष्ठ, विवेकी दृष्टीने पाहून हे चमत्कार मिथ्या म्हणता येतात. मग प्रश्न असा पडतो की जनाबाई सारखी संत खोटे का लिहील? की या अभंगातील वाच्यार्थ वेगळा आणि भावार्थ वेगळा आहे?

आपणास निश्चितपणे असे म्हणता येते की संतांनी जाणीवपूर्वक या चमत्कार कथा रचल्या. विठ्ठलाच्या मिथस तयार केल्या. अभंगातील ही वर्णने म्हणजे जनाबाईची कल्पनाचित्रे किंवा भावचित्रे आहेत. हे तिला जाणवले आहे. कसे जाणवले, याचा खुलासा एका अभंगात आहे. 'उन्मनीच्या सुखा आत, पांडुरंग भेटी देत' असे ती म्हणते. उन्मनी अवस्था म्हणजे देहभाव विरहित अवस्था. मानसिक पातळीवरील जाणीव.

जनाबाईच्या विविध अभंगात विठ्ठल कोणत्या रूपात अवतरतो? तर दळण-कांडण, धुणे-भांडी, गोवऱ्या वेचणे अशा कामात तो मदत करतो. तिला आंघोळ घालतो. तिची वेणीफणी करतो. रात्री एकांती तिला भेटायला येतो. तिच्या सुखशेजेवर पहुडतो. तिच्याशी गप्पा मारतो. म्हणजे जिथे जिथे मदतीला, सोबतीला कुणीतरी असावे असे जनाबाईला वाटते तिथे तिथे तो येतो. खरे तर, या प्रत्येक प्रसंगात कुणातरी परोपकारी स्त्री-पुरुषाची मदत तिला झाली असणे शक्य आहे. कारण ती आदर्श भक्त आहे, संत आहे. तिने स्वतःच एका अभंगात लिहून ठेवले आहे, की 'ज्याचा सखा हरी, विश्व त्यावरी कृपाकरी।' जनाबाईलाही अशी कुणाची तरी मदत झालेली असणे शक्य आहे. दुसऱ्या एका

अभंगात ती म्हणते 'नारीरूप होऊनी हरी। माझे न्हाणें धुणें करी।।' यावरून हे स्पष्ट होते की वेगवेगळ्या रूपात मदत करणाऱ्या व्यक्तींना जनाबाई साक्षात परमेश्वर मानते, विठ्ठल मानते. 'जे जे भेटिजे भूत, ते ते मानिजे भगवंत' अशी वारकरी संप्रदायाची धारणा आहे. त्याला अनुसरूनच हे जनाबाईचे लेखन आहे, असे म्हणता येईल.

जनाबाईने आपल्या अभंगातून रंगविलेली ही प्रसंगचित्रे मोठी विलोभनीय व मनमोहक आहेत. जनाबाईचा हेवा वाटावा अशी आहेत.

झाडलोट करी जनी। केर भरी चक्रपाणि।
पाटी घेऊनि डोईवरी। नेऊनियां टाकी दुरी।
ऐसा भक्तीसी भुलला। नीच कामें करूं लागला।
जनी म्हणे बा विठ्ठला। काय उतराई होऊं तुला।।

या एकाच अभंगातून अनेक गोष्टी साध्य झालेल्या दिसतात. दासी जनीकडे पाहण्याच्या समाजाच्या दृष्टिकोणात फरक पडला. तिच्याबद्दलचा तुच्छभाव जाऊन त्या ठिकाणी आदरभाव आला. दुसरे म्हणजे काही कामे परंपरेने हलकी मानली आहेत आणि असे काम करणारी व्यक्तीही हलकी कनिष्ठ दर्जाची मानली गेली आहे. इथे साक्षात विठ्ठलच ही नीच कामे करतो. म्हणजेच अप्रत्यक्षरित्या जनी हे बिंबवू पाहते की कोणतेचे काम हलके-नीच नसते आणि ते काम करणारी व्यक्तीही नीच नसते. श्रम आणि श्रमिक यांना प्रतिष्ठा देण्याचा हा प्रयत्न आहे.

एके दिवशी न्हावयास। पाणी नव्हते विसणास
देव धांवोनियां आले। शीतल उदक घे घे बोले
आपुल्या हातें विसणी। घाली जनीच्या डोयीं पाणी
माझ्या डोईच्या केसांस। न्हाणें नव्हतें फार दिवस
तेणें मुरडी केशांस। का म्हणे उगीच बैस
आपुल्या हातें वेणी घाली। जनी म्हणे माय आली।।

येथे जनाबाईवर लेकीप्रमाणे प्रेम करणारी मातृहृदयी स्त्री अपेक्षित आहे. जनाबाईच्या मदतीला जे कुणी आले असेल त्याला जणू देवाने धाडले असे जनीला वाटले असेल किंवा ती व्यक्ती देवासारखी योग्यवेळी मदतीस धावली असे वाटले असेल. सत्य काहीही असो, जनाबाईची ही प्रसंगचित्रे मोहक आहेत, हेच खरे!

जनाबाईने विठ्ठलाला अनेक रूपात पाहिले. तो माय-बाप आहेच, पण त्याही पलीकडे तो सखा सांगाती आहे. तिच्यावर त्याचे निरातिशय प्रेम आहे म्हणूनच तो तिला प्रत्येक कामात मदत करतो. तिचे कष्ट, दुःख हलके करण्याचा प्रयत्न करतो. इतकेच नव्हे तर सखा म्हणून तो तिला एकांतातही भेटतो. सुखदुःख बोलतो.

एके रात्रीचे समयीं। देव आले लवलाही
सुखशेजें पहुडले। जनीसवें गुज बोले
गुज बोलता बोलता। निद्रा आली अवचिता
उठा उठा चक्रपाणि। उजाडलें म्हणे जनी।।

मग देव पदक, माळा तिथेच टाकून तातडीने वाकळ घेऊन देवळाकडे पळतात. भक्त महाद्वारी येऊन पाहतात तर देव्हाऱ्यात चोरी झालेली. चोराने पदक माळा नेल्या पण जाताना गडबडीत त्याची वाकळ देव्हाऱ्यात पडली, असे त्यांना वाटते. मग खरा प्रकार कळतो की देव जनीच्या घरी राबतो.

या घटनेचा फायदा बडवे उठवितात. ते जनीवर पदक चोरीचा आळ घेतात 'म्या नेले नाही जाण, सख्या विठोबाची आण' असे ती म्हणते. तरी ते ऐकत नाहीत. जनीच्या घरी झडती घेतात. पदक तिच्या वाकळेत सापडते. चाळीस ब्राह्मण तिला मारू लागतात. तिच्या दंडाला काढण्या बांधून तिला चंद्रभागेत सुळावर देण्यासाठी नेले जाते. ती विठ्ठलाला साद घालते पण तो येत नाही. तेव्हा 'जनी म्हणे विठो मेला' असा निर्वाणीचा उद्‌गार काढते. त्याच वेळी त्या सुळाचे पाणी होते. जनीला मुक्त केले जाते. येथे जनीला साह्यकारी होणारा विठ्ठल आलेला दिसतो.

इतकेच नव्हे तर जनीचे बोल हे स्वानंदाचे डोल आहे, असे विठ्ठल म्हणतो. तो साक्षात तिचे अभंग लिहून घेणारा लेखनिक होतो.

जनीचिया पदा अखंडीत गाये,
तयाचे मी पायें वंदी माथा।।

असेही हा विठ्ठल म्हणताना दिसतो.

थोडक्यात, विठ्ठल हा जनीच्या भावजीवनाचा गाभा आहे. विठ्ठलाचे मानुषीकरण करण्याचे महत्त्वाचे कार्य जनाबाईने केले आहे. विठ्ठलाला साजीवंत करणे, चालता बोलता करणे, नाट्यात्म अनुभवातील व्यक्तिरेखा बनविणे हे येथे जनाबाईंनी साधले आहे. ही भावचित्रे जनाबाईच्या भक्तीला अधिक गहिरी बनवितात.

१.३.८ जनाबाईकृत संतगौरव

आपल्या काही अभंगातून जनाबाईंनी संतांचे त्रोटक चरित्र मांडले आहे. जनाबाईंचे समकालीन संतांविषयीचे उद्‌गार हे अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. कारण त्यातूनच संतमंडळाचे स्वरूप आणि त्यांचे कर्तृत्व हे अधोरेखित झाले आहे. या संतांचे वारकरी संप्रदायातील स्थान आणि जनीशी त्यांचा असणारा ऋणानुबंध या गोष्टींचेही दर्शन या अभंगातून घडते. कळत-नकळत समकाळाचे दस्तऐवजीकरण (Documentation) केलेले असते. या अभंगलेखनामुळे तत्कालीन संतांच्या चरित्रावर काही प्रमाणात प्रकाश पडलेला आढळतो.

गुरू नामदेवांचे चरित्र जनाबाईने सुमारे १७ अभंगातून रेखाटले आहे. गोणाईने नवस केला आणि पोटी नामदेव जन्मला. दामाशेटीस खूप आनंद झाला. परंतु लवकरच नामा विठ्ठलाच्या भक्तीत रंगला. नामदेवाची आई गोणाई हिला ते खपेना. तेव्हा ती देवळात गेली आणि विठ्ठलाशीच वाद घालू लागली. जनाबाई तो प्रसंग चित्रित करताना म्हणते,

माझा नामा मज देई। जीव देईन तुझे पायीं
पुंडलिका भुलविलें। तैसें माझिया बाळे केलें
तें गां न चले मजपाशीं। दे गा माझ्या नामयासी
तुझ्यासंगे जे जे गेले। ते त्वां जिवेची मारिले
विठ्ठल म्हणे गोणाबाई। नामा तुझा घेवोनियां जाई
हाती धरोनिया आली। दासी जनी आनंदली

नामदेवाने ईश्वरभक्तीत आकंठ बुडू नये म्हणून गोणाईचा प्रयत्न होता. परंतु तो यशस्वी झाला नाही. नामदेव लवकरच भजन-कीर्तनात रंगून गेला.

पुंडलिकापाशीं नामा उभा कीर्तनाशी।
येऊनिया पांडुरंग स्वयें टाळ धरी अंग।
गाऊ लागे बरोबरी। नाही बोलायाची उरी।
स्वर देवाचा उमटला। दासी जनीने ओळखिला।

असे नामदेवांच्या कीर्तनाचे महिमान जनाबाई गाऊ लागली.

सुंबाचा करदोडा रकट्याची लंगोटी।
नामा वाळवंटी कथा करी।।

अशी नामदेवाची स्थिती झालेली असते. नामदेवाचा अधिकार मोठा होता. तो सांगताना जनाबाई म्हणते

मागें किती संत जाले। नाम्या ऐसें कोण बोले।।
नामा जाता राउळासी। देव बोले आधि त्यासी
केवढें नवल सांगावें। दासी जनीचें पद लिहावें।।

नामदेवाचा देवावर अधिकार चालतो असे सांगणारे अनेक प्रसंग आहेत. एकदा दिवाळीच्या सणात नामदेव देवळात गेला आणि त्याने विठोबाला हाताला धरून घरी नेले. घरात चंदनाच्या पाटावर बसविले. गोणाईने उटणे लावले. दामाशेटीने आंघोळ घातली. गोणाईने स्वतःच्या पदराने त्याचे तोंड पुसले मग पंचारती घेऊन ओवाळले. तेव्हा देव जेऊन तृप्त झाला. स्वतः जनाबाईने त्याला पानविडा दिला.

जनाबाईने नामदेवाच्या जीवनातील एक चमत्कार सदृश्य कथा सांगितली आहे. एकदा आषाढी एकादशीला नामदेव उपवासी होता तर विष्णूने स्वतः गरूड पाठवून त्याला बोलावून घेतले.

दुसऱ्या एका प्रसंगात नामदेव मंदिरात आरती करून घरी आला. त्याने उपवास करायचे ठरविले. मग देव ब्राह्मणाचा वेश घेऊन त्याच्या घरी आला. नामदेवाने फराळ देण्याची तयारी दर्शविली. तो अन्नच मागू लागला. मग अन्नावाचून तडफडून मेला. मग ब्राह्मण बोलवून चंद्रभागे तीरी सरण रचले. नामदेवही त्यावर झोपला व अग्नी द्या म्हणू लागला. अग्नी देताच देव प्रगटला त्याने नामदेवाची पाठ थोपटली. असा नामदेव गौरव करणारा कथाभाग जनाबाईने आपल्या अभंगात मांडला आहे.

नामदेवांच्या कुटुंबाचे वर्णन व त्यांचे स्वभावदर्शन जनाबाईने तीन अभंगात मांडले आहे.

गोणाई राजाई दोघी सासू सुना।
दामा नामा जाणा बाप लेक।।
नारा विठा गोंदा महादा चवघे पुत्र।
जन्मले पवित्र त्याचे वंशी।।
लाडाई गोडाई येसाई साखराई।
चवघी सुना पाहा नामयाच्या
लिंबाई ती लेकी आऊबाई बहिणी।
वेडीपिशी दासी त्याची जनी।।

या कुटुंबात पंधरावी ती दासी जनी आहे. येथे स्वतःचे वर्णन जनाबाई घड्याळ मोगरी करते. घटका भरल्यावर टोला मारायचे काम ती करते आहे. अशा प्रकारे जनाबाईने नामदेवांचे लौकिक व अलौकिक चरित्र रेखाटले आहे. स्वतःला या नामदेवचरित्राशी जोडले आहे.

जनाबाईच्या भावजीवनात अनन्यसाधारण महत्त्व असणारे दुसरे व्यक्तिमत्त्व म्हणजे संत ज्ञानदेव होय. वारकरी संप्रदायातील ज्ञानदेवांचे स्थान व महत्त्व जनाबाईने नेमके अधोरेखित केले आहे. जनाबाईचे ज्ञानदेवाशी भावपूर्ण नाते आहे. कारण ती 'सखा माझा ज्ञानेश्वर' असा उल्लेख करते. ज्ञानेश्वर हे 'मायेहून माय' आहेत. परलोकीचे तारू आहेत. म्हणूनच ती म्हणते,

ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर।।
मरोनियां जावें। बा माझ्या पोटा यावें।।
ऐसे करी माझ्या भावा। सख्या माझ्या ज्ञानदेवा।।
जावे वोवाळुनी। जन्मोजन्मीं दासी जनी।।

ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व इतके रूजू, नम्र आहे की हा आपला मुलगा असावा आणि आपण त्याच्यावर मातृवत प्रेम करावे, असे जनाबाईला वाटते.

वारकरी संप्रदायात ज्ञानेश्वरीला महत्त्वाचे स्थान आहे. या ग्रंथाबद्दल आपला अभिप्राय नोंदविताना जनाबाई म्हणते.

भावअक्षरांची गांठी। ब्रह्मज्ञानानें गोमटी
ते हे माय ज्ञानेश्वरी। संतजना माहेश्वरी
ज्ञानेश्वर मंगळ मुनी। सेवा करी दासी जनी।।

भक्तिभाव, स्नेहभाव आणि अक्षरे यांची एकत्र गाठ असणारा आणि ब्रह्मज्ञानाने नटलेला ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी होय. हा ग्रंथ लिहिणारे ज्ञानेश्वर हे मंगलमुनी आहेत. म्हणजेच ज्यांचे दर्शन, साहचर्य शुभंकर आहे, असे हे मुनी आहेत. मी दासी जनी त्यांची सेवा करीत आहे. येथे हे आवर्जून लक्षात घ्यावे लागेल की वैदिक परंपरा ज्ञानेश्वरादी भावंडांना धर्मजाती बहिष्कृत ठरवून चांडाळाचा दर्जा देत होती, ज्यांचे दर्शन हे अमंगळ, अभद्र आहे म्हणत होती, त्याच ज्ञानेश्वरांचा मोठा गुणगौरव जनाबाई आणि पर्यायाने वारकरी परंपरा करताना दिसत आहे.

दुसऱ्या एका अभंगात जनाबाई म्हणते, ज्ञानेश्वरीहून अन्य गीताटीका या सोन्याच्या ताटात भाताची पेज वाढावी आणि पोटभरून घ्या म्हणावे, तशा आहेत.

ज्ञानदेवांचा अधिकार मोठा आहे. त्यांचे ज्ञान, अध्यात्मातील त्यांची गती मोठी आहे. हे जाणून सगळे त्यांचे मार्गदर्शन घेतात. आपली कवणे, आपले अभंग ज्ञानदेवांना दाखवून त्यांची प्रशस्ती मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळेच एका अभंगात साक्षात विठ्ठल ज्ञानदेवांसमोर स्वतःची आणि जनाबाईची तरफदारी करताना दिसतो.

जनीनें बोलिलें तैसेंच लिहिलें।
साध्य परिसिलें तुम्हीं संतीं।
अहो ज्ञानदेवा असावें तुम्हा ठावें।
येणें काय लहाणीव आणिली आम्हां।।

असे विठ्ठल म्हणतो. जनीचे अभंग मी लिहून घेतले म्हणजे मला कमीपणा आला असे होत नाही, असे विठ्ठल म्हणतो. जनीचे हे बोल म्हणजे स्वानंदाचे डोलणे आहे, असा त्याचा अभिप्राय आहे. अशा या जनीचे वचन ज्याला आवडेल, त्याच्यावर नारायण कृपा करेल, असा वर ज्ञानेश्वराने द्यावा, असे पांडुरंगाचे मागणे आहे. परंतु वारकरी संप्रदायात संतांना जे अनन्यसाधारण महत्त्व आहे, ते पाहता ज्ञानेश्वरांनी अन्य संतकवीच्या काव्याला प्रशस्ती देणे महत्त्वाचेच ठरत असले पाहिजे. ज्ञानदेव हे वारकरी स्कूलचे परीक्षक व मार्गदर्शक होते, हेच येथे स्पष्ट होते.

जनाबाईने चोखामेळा, सावता माळी, सोपानदेव अशा अन्य संतांचाही गौरव केला आहे. तिने चोखामेळाचा केलेला गौरव विशेष लक्षणीय आहे. कारण चोखामेळा वर्णव्यवस्थेत अंत्यज व म्हणून अस्पृश्य आहे. या चोखामेळाने अभंग लिहावेत ही मोठी गोष्ट होती. ती म्हणते,

चोखामेळा संत भला। तेणे देव भुलविला।।
भक्ति आहे त्याची मोठी। त्याला पावतो संकटी।।
चोख्यामेळ्याची करणी। तेणें देव केला ऋणी।।
लागा विठ्ठल चरणीं। म्हणे नामयाची जनी।।

अशा या महान संताने देव बाटविला, असे काही लोक म्हणतात. दासी जनीला हसू येते. या पढतमुर्खांची तिला कीव येते.

१.३.९ जनाबाईकृत संतमाहात्म्य

वारकरी संप्रदायातील सर्वोच्च पद म्हणजे संत! संत होणे सोपे नसते. मानवी जीवनातील विकासाची चरम अवस्था म्हणजे संत. आर्त एकविध भक्ती, सदाचरण, भूतदया अशा गुणांनी मंडित झालेला आणि लौकिक सुखदुःखादी भावनांच्या पलीकडे गेलेला, आप-पर भाव त्यागून सर्व प्राणिमात्रांकडे समदृष्टीने पाहणाराच खरा संत असतो. मात्र सर्वच काळात भोंदू साधूंचे प्राबल्य असते. त्यामुळे समाज खऱ्या संतांवरही अविश्वास दाखवितो. अशा काळात संत कुणाला म्हणावे? त्यांचे गुण-दोष कोणते? त्यांचे कार्य काय? त्यांचे महत्त्व काय? ते सांगणारे अभंग वारकरी संतांना आवर्जून लिहावे लागले. जनाबाईनेही असे संतस्तुती करणारे अभंग लिहिले आहेत.

जानाबाई लिहिते, संत हे देवाचे डोळे आहेत. या डोळ्यांनी देव सर्वसामान्य माणसांकडे पाहतो. त्यामुळे संतांना आवडेल असे कृत्य करा. संत हे देवाचे काम करतात. त्यांनी दुर्लक्ष केले तर सामान्यांचे सुखदुःख कोण ऐकेल? संत हे देवाचे वचन बोलतात, देवाचे हितगूज सांगतात.

क्षर ते नासिले अक्षर ते काढिलें
निःशब्दाचें जाले बोल संत।।

असे जनाबाई म्हणते. जे मर्त्य आहे, नष्ट होणारे आहे ते सोडून जे चिरंतन टिकणारे आहे, ते व्यक्त करण्याचे काम संत करतात. आजपर्यंत ज्या भावभावना जे विचार शब्दबद्ध झाले नव्हते, त्यांना शब्दरूप देणारे संत असतात. म्हणून संतांना जीवेभावे ओवाळावे असे जनाबाई म्हणते.

संतांचा तो संग नव्हे भलतैसा।
पालटावी दशा तात्काळिक।।
चंदनाचे संगे पालटती झाडे
दुर्बल लांकडे देवमाथा।।

असे संतसंगतीचे मोठेपण जनाबाई व्यक्त करते. विठ्ठल हा वटवृक्ष आहे, तर संत हे पारंब्या आहेत, असेही ती म्हणते. संतांनी अवघे वैकुंठ पंढरपुरी आणले आहे. याचा प्रारंभ पुंडलिकापासून झालेला दिसतो. त्याच्या कृपाप्रसादामुळेच साधुसंत तरले असे वाटते. या वैष्णव संतांमुळे अवघी पंढरी दुमदुमते. आनंद सोहळा रंगतो. त्याचे अत्यंत सुंदर वर्णन जनाबाईने अन्य एका अभंगात केलेले आहे.

संतभार पंढरींत। कीर्तनाचे गजर होत।।
तेथें असे देव उभा। जैशी समचरणांची शोभा।।
रंग भरे कीर्तनात। प्रेमें हरिदास नाचत।।
सखा विरळा ज्ञानेश्वर। नामयाचा तो जिव्हार।।
ऐशा संता शरण जावे। जनी म्हणे त्याला ध्यावें।।

१.३.१० भक्तीचा दृढनिश्चय आणि 'स्व'रूपाचे ज्ञान

संत नामदेवाच्या संगतीत भक्तिमार्गाचा परिचय झाला. दासी जनी या नव्या अनुभवाने आनंदली. तिला नामसंकीर्तनाचे सहजसोपे साधन भावले. तिने ते स्वीकारले. 'अवघाचि संसार सुखाचा करीन।' हे नामदेवांचे ब्रीद होते. संसाराचा कामधंदा करता करता भक्ती करण्याचा हा मार्ग होता. संन्यास घेणे, वनांतरा जाणे किंवा देहदंडण करणे येथे अपेक्षित नव्हते. तर मन ईश्वराला अर्पण करणे, परमेश्वर सर्व चराचराला व्यापून उरला आहे हे अनुभवणे, तो स्वतःमध्ये आहे हे जाणणे आणि स्वतः सत्प्रवृत्त बनणे हाच खरा भक्तिमार्ग होता. जनाबाईने तो तत्त्वतः नामदेव व ज्ञानदेवांकडून जाणून घेतला. मग तिची वाटचाल आत्मविश्वासपूर्वक त्या दिशेला होऊ लागली.

दळितां कांडितां। तुज गाईन अनंता।।
न विसंबें क्षणभरी। तुझें नाम गा मुरारी।।
नित्य हाचि कारभार। मुखी हरि निरंतर।।

असे तिने ठरविले. त्या विठ्ठलाच्या चरणी मिठी घालावी, त्याचे रूप न्याहाळावे, त्याचे नाम गावे असे तिने ठरविले. एकदा का परमेश्वर, भोवतालचा संसार आणि आपण यांचे खरे स्वरूप कळून चुकले की निर्भयपणे भक्तिमार्गावर चालता येते. 'आता भीत नाही देवा। आदि अंत तुझा ठावा।।' असे सहजपणे तिच्या तोंडी येते.

चला पंढरीसी जाऊं। रखुमादेवीवर पाहूं।।
हातीं टाळी मुखीं हरी। गात जाऊं महाद्वारीं।।
स्नान करूं भिवरेसी। पुंडलिका पायांपाशीं।।
डोळे भरून पाहू देवा। तेणे विसरूं देहभावा।।
ऐसा निश्चय करूनी। म्हणे नामयाची जनी।।

असा आत्मानंद ती व्यक्त करू लागते. कारण हेच तिचे खरे सुख असते. ती स्वतः तर हे भक्तिसुख घेतेच. परंतु या भक्तिमार्गाचा प्रचार प्रसार ही तिची जबाबदारी ठरते. त्यामुळेच ती म्हणते की,

करूं हरीचें कीर्तन। गाऊं निर्मळ ते गुण।।
सदा धरूं संतसंग। मुखीं म्हणूं पांडुरंग।।
करूं जनांवरी कृपा। रामकृष्ण म्हणवूं लोकां।।

जनी म्हणे किती करूं। नाम बळकट धरूं।

भक्तिसुख अनुभवणे, सामूहिक भक्तीचा प्रसार करणे, नामस्मरण-भजन-कीर्तनात रंगून जाणे हा एक भाग आहे, तर सगुण साकाराच्या भक्तीकडून निर्गुण निराकाराच्या उपासनेकडे जाणे, हा पुढचा टप्पा आहे. नामदेवांनी सर्वजनसुलभ भक्तीचा पाया घातला, तर ज्ञानदेवांनी चराचराला व्यापून उरलेल्या परमेश्वराचे भान दिले. लौकिक जीवनातील 'मी' गळून जाणे आणि स्वतःमध्ये असणाऱ्या परमेश्वरी अंशाला अनुभवणे महत्त्वाचे मानले. 'मी' गळून जावा, राग-लोभादी देहभाव निरसावेत आणि अद्वैताचा अनुभव व्हावा, हे वाटते तितके सोपे नाही. यामध्ये काही भाग योगमार्गाचा आहे. हटयोगाची साधना करून योगी कुंडलिनी जागृत करतात आणि ब्रह्मरूपाचा अनुभव घेतात. तोही मार्ग जनाबाईने अनुभवला आहे. हे परतत्त्वाचे ज्ञान झाल्यानंतरची अनुभूती म्हणजेच ज्ञानोत्तर भक्ती होय. जनाबाईने अनेक अभंगामधून आपला हा अनुभव शब्दबद्ध केला आहे. एका सामान्य कष्टकरी स्त्रीची अध्यात्मिक क्षेत्रातील ही उंच झेप पाहून स्तिमित व्हायला होते.

दळूं कांडुं खेळूं। सर्व पाप ताप जाळूं।।
सर्व जीवामध्यें पाहूं। एक आम्ही होऊनी राहूं।।
जनी म्हणे ब्रह्म होऊं। ऐंसे सर्वांघटीं पाहूं।।

स्वतः ब्रह्म होण्याचा आणि सर्वाघटी ब्रह्म पाहण्याचा हा अनुभव अलौकिकच म्हटला पाहिजे. हा परमेश्वर जळ-स्थळ-काष्ठ-पाषाण व्यापून राहिला आहे, याची स्वसंवेद्य जाणीव होणे महत्त्वाचे असते. एका अभंगात जनाबाई म्हणते,

वामसव्य दोहींकडे। देखें कृष्णाचें रूपडे।।
आतां खाले पाहूं जरी। चहुंकडे दिसे हरी।।
चराचरीं जें जें दिसे। तें तें अविद्याची नासे।।
माझें नाठवे मीपण। तेथे कैचें दुजेपण।।
सर्वांठायीं पूर्ण कळा। दासी जनी पाहे डोळां।।

जनाबाई आता एक अधिकारी स्त्री झाली आहे. तिने अविद्येचा नाश करून आत्मज्ञानाच्या प्रांगणात पाऊल टाकले आहे. त्यामुळे ती आपला अनोखा अनुभव तितक्याच समर्थपणे मांडत आहे. नामदेवांच्या एका अभंगाच्या प्रभावातून जन्मलेला जनाबाईचा 'धरिला पंढरीचा चोर' हा अभंग म्हणजे तिच्या अलौकिक प्रतिभेचे आणि भावगर्भ अनुभूतीचे दर्शन म्हणावे लागते. अध्यात्मिक अनुभवाला अशी भावरम्य डूब देणे फक्त तिलाच शक्य झालेले दिसते.

धरिला पंढरीचा चोर। गळा बांधोनियां दोर
हृदय बंदिखाना केला। आंत विठ्ठल कोंडिला
शब्दे केली जवाजुडी। विठ्ठल पायी घातली बेडी

सोहं शब्दाचा मारा केला। विठ्ठल काकुलती आला
जनी म्हणे बा विठ्ठला। जीवे न सोडी मी तुला।।

इथे तिला विठ्ठल हा चित्तचोर सापडला आहे. तिने त्याला ह्रदयात कोंडला आहे. आणि सोहं म्हणजेच 'तो ईश्वर मीच आहे' या भावनेचा मारा केला आहे.

ही सोहं अनुभुती केव्हा होते? जेव्हा देहभाव पूर्ण जातो तेव्हा. या विदेही अवस्थेत आनंदकळा मनी संचारते. लिंगदेहभाव विसरून सर्वांग सुखी होते. हा अनुभव जनाबाई प्रत्ययी घेत असली पाहिजे, म्हणूनच ती मोठ्या आत्मविश्वासाने म्हणू शकते,

देव खाते देव पितें। देवावरी मी निजते।
देव देते देव घेते। देवासवे व्यवहारितें।
देव येथे देव येथे। देवाविणें नाहीं रितें।
जनी म्हणे विठाबाई। भरुनि उरलें अंतरबाही।

याचा पुढचा टप्पा म्हणजे समाधी अवस्था होय. अष्टांग योग अनुसरून स्वतःच्या आत डोकवावे आणि आत्मज्योती जागी करावी ही अत्यंत दुर्लभ अनुभुती होय. ती जनाबाईला लाभलेली दिसते. तो अनुभव व्यक्त करणारे योगाची परिभाषा असणारे काही अभंग तिने लिहिले आहेत. एका अभंगात ती म्हणते,

नाहीं आकाश घडणी। पाहा स्वरूपाची खाणी
स्वरूप हे अगोचर। गुरू करिती गोचर
गोचर करिताती जाणा। दृष्टि दिसे निरंजना
नाही हात पाय त्यासी। जनी म्हणे स्वरूपासी

ही स्वरूपाची जाणीव होणे म्हणजे अध्यात्म मार्गातला चरमबिंदू म्हटला पाहिजे. जनाबाईने तो अनुभवला. ती धन्य झाली. गुरूकृपेने आणि विठ्ठलाच्या प्रेमप्रसादाने हे शक्य झाले. म्हणूनच त्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करताना ती म्हणते,

माझे मनीं जें जें होतें। तें तें दिधले अनंतें
देह नेउनी विदेही केलें। शांति देऊनी मीपण नेलें
मूळ नेलें हें क्रोधाचें। ठाणे केलें विवेकाचें
निज पदीं दिधला ठाव। जनी म्हणे दाता देव।।

१.३.११ जनाबाईचे मागणे

परमेश्वराकडे काही कृपादान मागावे हे स्वाभाविकच होय. सामान्यांचे मागणेही सामान्यच असते, तर असामान्यांचे अलौकिक असते. भक्त स्वतःसाठी मागतो, तर संत समाजासाठी हा फरक

दृष्टिकोणाचा असतो, तसाच तो अनुभूतीचाही असतो. अपरिपक्व विचाराचा साधक स्वतःच्या अडचणींचा विचार करेल. मोक्ष-मुक्तीचा विचार करेल, तर परिपक्व साधक म्हणजेच संत नेहमी समष्टीचा विचार करेल. जनाबाई प्राथमिक अवस्थेतून पुढे गेल्या. संत झाल्या. त्यामुळे त्यांच्या अभंगात दोन्ही तऱ्हेचे मागणे दिसते.

माझे दुःख नाशी देवा। मज सुख दे केशवा
आम्हां सुख ऐसे देई। तुझी कृपा विठाबाई

असे जनाबाई एका अभंगात म्हणते. तर दुसऱ्या एका अभंगात ती मुक्ती मागत नाही, तर पुढच्या जन्मातही नामदेवाच्या संगतीत भक्तिसुख मिळावे अशी अपेक्षा व्यक्त करते. ती म्हणते,

देवा देई गर्भवास। तरीच पुरेल माझी आस
परि हे देखा रे पंढरी। सेवा नामयाचे द्वारीं
करीं पक्षि का सूकर। श्वान श्वापद मार्जार
ऐसा हेत माझे मनी म्हणे नामयाची जनी।।

तिचे हे मागणे व्यक्तिगत पातळीवर थांबलेले दिसते. त्याचवेळी ती नामदेव-ज्ञानदेवादी संतांप्रमाणे सगळ्या समाजासाठी काही मागणे मागते. हे मागणे संत सज्जनांसाठी आहे. वारकरी परंपरा अखंडित चालावी यासाठी आहे. ती म्हणते,

ऐसा पुत्र देई संता।
तरी त्या आवडी पंढरीनाथा।।
गीता नित्य नेमें।
वाची ज्ञानेश्वरी प्रेमें।।
संतांच्या चरणा।
करी मस्तक ठेंगणा।
कन्या व्हावी भागिरथी।
तुझें प्रेम तिचे चित्तीं।।
ऐसे करी संतजना।
दासी जनीच्या निधाना।।

येथे वारकरी परंपरा चालवू शकतील असे कन्या-पुत्र जनाबाईने सर्व संतांच्या घरी जन्मावेत, असे मागणे मागितले आहे.

१.३.१२ जनाबाईची उपदेशपर कविता

जैसा अधिकार तैसा उपदेश, हा संतांचा एक गुणविशेष होय. अध्यात्म मार्गातील विशिष्ट स्थान प्राप्ती, दीर्घ अनुभव यांच्या आधारे जनाबाईंनी अज्ञ, भोळ्याभाबड्या समाजाला मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. जनाबाईचा उपदेश विविध प्रकारचा आहे. भक्तिमार्ग अनुसरण्यासंबंधी केलेला उपदेश मुख्य आहे. त्यासोबतच आचरण शुद्धीला महत्त्व देण्यात आले आहे. हे करताना समाजात पसरलेले ढोंग, भ्रांत कल्पना आणि मुठभर पुरोहितांनी माजवलेले कर्मकांडाचे प्रस्थ यावरही प्रहार करण्यात आला आहे.

वारकऱ्यांचा भक्तिमार्ग हा सहजसोपा आहे. एकविध भाव, आचरण शुद्धी या मार्गाने हे परब्रह्म सहज हाती येते. त्यासाठी संसार त्यागण्याचीही जरूरी नसते. म्हणून जनाबाई म्हणते, ''सुखे संसार करावा। माजी विठ्ठल आठवावा।।' देहाने संसारात तर मनाने ईश्वरापाशी राहता आले पाहिजे. ती म्हणते,

जगीं विठ्ठल रुक्मिणी। तुम्ही अखंड स्मरा ध्यानीं।।
मग तुज काय उणे। जाले सोयरे त्रिभुवनें।।
साराचें जे सार। भवसिंधु अंतरी पार।।
मन ठेउनी चरणीं। म्हणे नामयाची जनी।।

यासाठी 'पंढरीसी जावे। संतजनीं भेटावें।' लागते. ज्याच्या मनी भक्ती आहे, त्याला विठ्ठल पावतोच. याकरिता 'देव आणि संत संत आणि देव। म्हणे जनी भाव एक ऐसा।' असेही जनाबाई म्हणते.

विवेकाची पेठ। उघडी पंढरीची वाट
तेथें नाहीं कांहीं धोका। उठाउठी भेटे सखा।।

असेही ती म्हणते.

वीराल्यावाचुनी देह अहंभाव।
जनी म्हणे देव। हाता न ये।।

असे तिचे सांगणे आहे. कीर्तनाला जाणे म्हणजे बापाची कीर्ती ऐकणे. एक कीर्तन ऐकणे म्हणजे अश्वमेध केल्याचे पुण्य लाभते, असे जनाबाई म्हणते.

भक्तीला शुद्धाचरणाची जोड असली पाहिजे हा संतांचा कटाक्ष आहे. जनाबाईने आपल्या एका अभंगात सूत्रशैलीत हा आशय वर्णिला आहे. या अभंगाचा प्रभाव पुढे तुकारामांवर पडला हे दिसून येते.

अंगी ल्याला शांती। दया क्षमा सर्वांभूतीं
तेथें जाऊन पाहे देवा। ब्रह्मादिक करिती सेवा

आवडी असे पैं कीर्तनी। लवे संतांचे चरणीं
जैसी दया पुत्रावरी। तेंचि पाहे चराचरीं
बहु अपराध केला। म्हणे जनी तो रक्षिला

असे दया-क्षमा-शांतीचे महत्त्व जनाबाई सांगते. 'अखंडित शुद्ध असावे अंतर' असे तिचे सांगणे आहे. 'बोलें तें वचन बहु हळूवट।।' असा तिचा आग्रह आहे.

त्याचवेळी काही कर्मकांडे करून 'गेले ते पितर मोक्षालागीं तुझे। आतां देई माझे दक्षिणेसे' असे म्हणणाऱ्या ब्राह्मणांवर ती टीका करते. 'पहा श्वानसमची पंडित' असेही ती म्हणते. 'चोरा संगतीनें गेला। वाटें जातां नागवला' असा तिचा उपदेश आहे.

१.३.१३ काही महत्त्वाचे अभंग

जनाबाईंचे काही अभंग तिची लेखनभूमिका, तिचे विचार, तिचा अधिकार समजून घेण्यासाठी महत्त्वाचे आहेत. त्यापैकी तीन अभंगांचा विचार येथे आपण करणार आहोत. ते अभंग असे:

१. डोईचा पदर आलां खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी।।
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा। आतां मज मना कोण करी।।
पंढरीच्या पेठे मांडियेलें पाल। मनगटावर तेल घाला तुम्ही।।
जनी म्हणे देवा मी जालें वेसवा। रिघालें केशवा घर तुझें।।

प्रस्तुत अभंगातून जनाबाईचा कृतनिश्चय, वारकरी संप्रदायाची प्रचारक म्हणून स्वतःवर असलेल्या जबाबदारीचे जाणीव स्पष्टपणे दिसून येते. स्त्रीच्या डोईवर पदर असणे किंवा नसणे याला फार मोठा सांस्कृतिक अर्थ आहे. भारतीय परंपरेत डोईवर पदर असणे म्हणजे सभ्य, सुसंस्कृत, शालीन, मर्यादाशील असणे होय. याला अपवाद फक्त ब्राह्मण स्त्रियांचा आहे. त्या डोक्यावर पदर घेत नाहीत. बहुजन स्त्री डोईवरचा पदर खांद्यावर पाडून जात असेल तर त्याचे दोन अर्थ घेतले जात होते. एक म्हणजे, तिने मर्यादा सोडली आहे. ती स्वैरिणी झाली आहे. दुसरे म्हणजे, ती संघर्षास, भांडणास उभी ठाकली आहे.

येथे जनाबाईने परंपरेची मर्यादा मोडली आहे. कोणती मर्यादा? तर स्त्रीने पुरुषांच्या अधिन राहावे, विचार करू नये, अध्यात्माच्या क्षेत्रात स्वतःचे विचार मांडू नयेत, मला परमात्मसाधना माहीत आहे, असे म्हणत कवित्व करू नये, अशा अनेक मर्यादा जनाबाईंनी मोडल्या आहेत. हे मर्यादांचे उल्लंघन जाणीवपूर्वक व अत्यंत आत्मविश्वासाने तिने केले आहे. तिला विरोध करणाऱ्यांच्या विरुद्ध संघर्षाला ती सज्ज झाली आहे.

ती म्हणते, ''डोईचा पदर मी खांद्यावर घेतला आहे आणि भरल्या बाजारात जिथे आजूबाजूच्या गावातील लोक येतात तिथे मी जाणार आहे. हातामध्ये टाळ व खांद्यावर वीणा घेऊन चालले आहे. आता मला कोण अडवते ते मी पाहते? मी पंढरीच्या बाजारपेठेत दुकान मांडून भक्ती वाटत आहे.

ज्याला माझ्या नावाने बोंब मारायची असेल त्याने खुशाल मारावी. मी मर्यादा सोडून केशवाच्या घरात शिरले आहे.''

इथे प्रश्न असा पडतो की जनाबाईला ही आव्हानात्मक भाषा उद्‌गारावी असे का वाटते? तिला भक्ती करण्यापासून कोण रोखत आहे?तर सनातनी परंपरा आणि तिचे पालन करणारे धर्मशास्त्री तिला रोखत असले पाहिजेत. म्हणूनच तिला आपली भक्तिप्रसाराची भूमिका भरबाजारात मांडायची आहे. जनाबाईचा हा अभंग म्हणजे तिची लेखनविषयक भूमिका आहे, असे म्हणता येते.

२. स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावें उदास। साधुसंतां ऐसे केलें मज
संतांचे घरची दासी मी अंकिली। विठोबाने दिली प्रेमकळा
विदूर सात्त्विक माझिये कुळीचा। अंगीकार त्याचा केला देवें
न विचारितां कुळ गणिका उद्धरिली। नामें सरती केली तिहीं लोकीं
ऋषींची कुळें उच्चारिलीं जेणें। रौरवी तेणें वस्ती केली
नामयाची जनी भक्तीतें सादर। माझें ते साचार विटेवरी

स्त्रीवादी चळवळीत या अभंगाचा पहिला चरण महत्त्वाचा मानला जातो. कारण या अभंगातून वारकरी संप्रदायाची स्त्रीविषयक भूमिका अधिक स्पष्टपणे अधोरेखित झाली आहे. यादवकाळात स्त्री शूद्र मानली जात होती. स्त्रीला धार्मिक क्षेत्रात कोणताच अधिकार नव्हता. पुरुषांची सेवा हाच तिचा धर्म होता. अशा काळात जनाबाईला विठ्ठलभक्तीची आस लागली होती. सावळ्या विठ्ठलाच्या रूपात एकरूप होण्याची तळमळ लागली होती. आणि आपला भक्तिमार्गातील प्रवासाचा अनुभव तिला इतरांना सांगायचा होता. लोकांना हा भक्तिसुखाचा अनुभव मिळावा असेही वाटत होते. धर्मशास्त्र आडवे येत होते. परंपरा स्त्रीला हे उपासनेचे स्वातंत्र्य नाकारत होती. अशावेळी संत नामदेव-संत ज्ञानदेवादी संतांनी तिला प्रेरणा, बळ व आत्मविश्वास दिला. तिच्या पारंपरिक विचाराच्या बेड्या तोडल्या.

म्हणूनच ती म्हणू शकली, 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावें उदास! साधुसंतांनी मला या भावस्थितीला आणले आहे. मी संतांच्या घरची दासी आहे. मला विठोबाने प्रेमकळा दिली आहे. दासीपुत्र असणारा सात्त्विक विदूर माझ्याच कुळाचा होता. देवाने त्याचा स्वीकार केला. कूळ न विचारता गणिकेचा उद्धार केला. जो ऋषींचे कूळ शोधतो त्याला रौरव नरकात जावे लागते. म्हणूनच मी नामयाची जनी विश्वासाने विठ्ठलाच्या भक्तीत सादर झाली आहे.'

३. देव खातें देव पितें। देवावरी मी निजतें।।
देव देतें देव घेतें। देवासवें व्यवहारितें।।
देव येथें देव येथें। देवाविणें नाहीं रितें।।
जनी म्हणे विठाबाई। भरून उरलें अंतरबाही।।

जनाबाईची भक्ती ही विकसित होत जाणारी होती. सगुण साकाराची उपासना ही भक्तीची पहिली पायरी. हळू हळू ईश्वराचे सामर्थ्य, ईश्वर संकल्पना समजून घेण्याची तिची दृष्टी विकसित होते. देव मूर्तीत नाही, तर चराचरात भरून राहिला आहे. जेव्हा याची स्पष्ट जाणीव होते तेव्हाच प्रौढ व प्रगल्भ भक्तिसंकल्पना व्यक्त होऊ शकते. अन्न-पाणी, भूमी, वस्तू आणि माणूस हे सर्व ईश्वरी स्वरूपातून साकार झालेले म्हणून साक्षात ईश्वर आहेत. देव सर्वत्र आहे. देवाविणा कोणतेच ठिकाण रिते नाही. त्यामुळेच माझ्या आत-बाहेरही विठ्ठल भरून राहिला आहे, असे ती म्हणते. जनाबाईचा हा अभंग अर्थाचे अनेक पदर व्यक्त करतो. तिचा निर्गुण निराकाराकडील प्रवास स्पष्ट होतो. ज्ञानोत्तर भक्तीचा एक उत्तम अविष्कार म्हणून या अभंगाकडे पाहता येते.

१.३.१४ जनाबाईंचे आख्यानकाव्य

मराठीतील पहिले आख्यानकाव्य लिहिले ते संत नामदेवांनी। त्यांनी २६४ चौकाच्या दीर्घ अभंगात हरिश्चंद्राचे आख्यान रचले. आपल्या गुरूंना अनुसरत जनाबाईनेही राजा हरिश्चंद्र-तारामतीचे आख्यान २३ अभंगामधून ३३९ चौकात व्यक्त केले. ब्रह्मपुराण, मार्कण्डेय पुराण व देवीपुराणातून प्रथम हरिचंद्र-तारामतीची कथा आलेली दिसते. यादवकाळात चातुर्मासादी काळात मंदिरांमधून पुराण लावले जाई. अशा पुराणिकांच्या तोंडून नामदेव-जनाबाई यांनी हरिश्चंद्र-तारामतीची कथा ऐकली असेल. तीच कथा मराठीत थोडा बदल करून आली आहे.

या कथेची सुरवात देवलोकात होते. नारदमुनी राजा हरिश्चंद्राची थोरवी गातो. हरिश्चंद्र वशिष्ठांचा शिष्य. त्याच्या स्तुतीमुळे विश्वामित्र दुखावला जातो. मग त्याची सत्त्वपरीक्षा पाहण्याचे विश्वामित्र ठरवितो. तो राजाच्या स्वप्नात ब्राह्मणवेशात जातो व दान मागतो. राजा त्याला प्रत्यक्ष राजमहालात यावयास सांगतो. पण ब्राह्मणाच्या आग्रहाखातर तो दान द्यावयास तयार होतो. 'अंकुश कडिया लेखणी' या तीन गोष्टी मागितल्या जातात. अंकुश म्हणजे राजाची दंडसत्ता, प्रजेवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार होय. कडिया म्हणजे राजाच्या ताब्यात असणाऱ्या धन-भूमी आदी वस्तूंवरील मालकी अधिकार होय. तर लेखणी म्हणजे राजाज्ञा देण्याचा अधिकार होय. या तीन शब्दांत राजाचे सर्व सामर्थ आणि संपत्ती यांचे हारण विश्वामित्राने केले.

पुन्हा प्रातःकाळी विश्वामित्र प्रत्यक्ष आला. तो थोडे सुवर्ण/सोने मागू लागला. राजाने पुन्हा संकल्प केला. दान देण्याचे कबूल केले. आणि तो विश्वामित्रास घेऊन अयोध्येस आला. राजा नगरात प्रवेशिला, पण विश्वामित्र दारातच थांबला. तो म्हणाला, तू मला राज्यदान दिले आहेस. तेच पुन्हा परत घेत आहेस. मग हरिश्चंद्राने काशी-वाराणसी येथे जाऊन कष्ट करून तुमचे ऋण एका महिन्यात फेडीन असे कबूल केले.

मग राजा पत्नी तारामती व पुत्र रोहिदास यांना घेऊन जाऊ लागला. विश्वामित्र म्हणाला, खरे बोला नाहीतर मी तुम्हाला शाप देईन. तेव्हा रोहिदास म्हणाला, मी गहाण/जामीन राहीन. मी पितृऋण चुकवेन. मग विश्वामित्राने परवानगी दिली.

मार्गात विश्वामित्राने अनेक अडचणी आणल्या. जंगलात वणवा लावला. तिघांची ताटातूट केली. ब्राह्मण वेशात येऊन त्यांच्या पायातील जोडे काढून घेतले. सूर्याला बारा पटीने अधिक तळपायला सांगितले. रोहिदास तहानेने व्याकूळ झाला, तेव्हा वाटेत पाणपोयी व विश्रांतीस्थलाची निर्मिती केली. तिथे तिघे गुंततील व त्यांचे एक महिन्यात सोने देण्याचे वचन विसरतील असे विश्वामित्रास वाटले. परंतु ते तसेच पुढे चालत राहिले. मग ते काशीस आले. तिथे त्यांनी स्वतःला विकले. तारामती व राहिदासास ब्राह्मणाने विकत घेतले तर राजास डोंबाने विकत घेऊन स्मशानात काम करावयास लावले. पुढे तारामती कौशिक ब्राह्मणाच्या घरी पाणी भरू लागली. रोहिदास समीधा आणण्यास जंगलात गेला असता त्याला सर्पदंश झाला. मग ब्राह्मणाने अग्निसंस्कार करण्यास सांगितले तेव्हा स्मशानात हरिश्चंद्राने तिला अडविले आणि डोंबाला द्यायचा वाटा मागितला. तारामती म्हणाली हा तुमचाच पुत्र. तरीही त्याने ऐकले नाही. मग ती रात्री जवळच्याच मंदिरात गेली. विश्वामित्राने पुन्हा नकळत तिथे प्रवेश केला. रोहिदासाचे पोट नखाने फाडून तेथील मांस खाल्ले व पुन्हा बाहेर येऊन म्हणू लागला, ''धावा, धाव एक लास आपल्या मुलाचे मांस खात आहे.'' लोक जमले. त्यांनी तारामतीला पकडले. हरिश्चंद्राला तिचा शिरच्छेद करण्यास सांगितले. राजा तेही करू लागला. तेव्हा ऋषी मध्ये पडला आणि प्रसन्न होऊन वर माग म्हणाला मग ताराराणीने पती, पुत्र, याचक सगळे जन्मोजन्मी मिळावे असे मागितले. मग विश्वामित्राने त्याला पुन्हा राज्य दिले. सर्वत्र आनंद झाला.

जनाबाईने ही कथा अत्यंत आटोपशीरपणे मांडली आहे. राजा, तारामती, रोहिदास व विश्वामित्र या चार व्यक्तिरेखांचे स्वभावदर्शन नेमकेपणाने घडविले आहे. त्याबरोबरच स्वप्नदृष्टांत, प्रत्यक्षातील विश्वामित्राला दिलेला दान संकल्प, काशीयात्रे दरम्यान रस्त्यात आलेली संकटमालिका आणि शेवटी रोहिदास मृत्यू व तारामतीवर आलेला आळ हे सगळे प्रसंग जनाबाईने प्रभावीपणे पण सूचक शब्दात मांडले आहेत. कमीत कमी शब्दात एक दीर्घ कथानक मांडण्याचा आदर्श वस्तुपाठ या आख्यान काव्यातून आला आहे. भावनेचे अनेक रंग या काव्यात मिसळले आहेत. पौराणिक व सांस्कृतिक संकेतांचे सूचन करणारी भाषा आणि गतिमानता हा या काव्याचा विशेष आहे.

'थालीपाक' ही १४ अभंगातून व्यक्त झालेली कथा आहे. डॉ. सुहासिनी इर्लेकर या काव्यास 'कथाकाव्य' म्हणतात, कारण या काव्याचा विस्तार अल्प आहे. अवकाश छोटा आहे. या थालीपाकात पांडव व दुर्वास ऋषीची कथा आली आहे.

एकदा दुर्योधन दुर्वास ऋषींची सेवा करतो व ते प्रसन्न होता. वर माग म्हणतात. मग वनवासात असलेल्या पांडवांकडे जाऊन इच्छाभोजन मागावे व न दिल्यास शाप द्यावा असे दुर्योधन म्हणतो. त्यानुसार दुर्वास अनेक ऋषींना घेऊन मध्यरात्री पांडवांकडे जातात व इच्छाभोजन मागतात. धर्मराज त्यांना स्नान करून येण्याची विनंती करतो. द्रौपदी घाबरते कृष्णाचा धावा करते. तो येतो. खायला काहीतरी दे म्हणतो. घरात काहीच नसते. पण शेवटी ताटाला चिकटलेले एक भाजीचे पान सापडते. ते खाऊन तो तृप्त होतो. मग इकडे गंगातीरावर कृष्ण चमत्कार घडवितो. रत्नखचित मंडपात नानापरीचे दिव्य अन्न ऋषींना देतो. ते भरपूर जेऊन तृप्त होतात.

नंतर पुन्हा सहदेव येतो आणि ऋषींना जेवण्यास चलण्याचा आग्रह करतो. तेव्हा धर्मराजाला आशीर्वाद देऊन ऋषी निघून जातात.

अशा प्रकारची महाभारतातील कथा जनाबाईने येथे मांडली आहे. लघुत्व, रंजकता, नाट्यमयता व प्रसंगचित्रे हे गुणविशेष या कथाकाव्यात प्रगटलेले दिसतात.

१.४ समारोप

वारकरी संप्रदायात स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान असलेली संत कवयित्री जनाबाई अभंगांच्या माध्यमातून आजही घराघरात पोहोचली आहे. दुसऱ्याच्या घरी घरकाम करणारी दासी वारकरी संप्रदायात संत म्हणून गौरविली जाते हाच एक मोठा चमत्कार आहे. कवित्व करणारी पहिली श्रमिक स्त्री असेही तिचे वर्णन करता येते. संत नामदेवाचा गुरूउपदेश प्रमाण मानून तिने वाटचाल केली. स्वतःच्या प्रतिभेने अलौकिक अनुभवविश्वाची मांडणी केली. जनाबाईचे लेखन हे मूलतः अध्यात्मिक अनुभूतींवर बेतलेले असले तरी त्यामध्ये स्त्रीमनाचे विविध भावरंग आलेले आहेत. त्यामुळेच एकूण मराठी साहित्यात स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान, वेगळी ओळख तिने मिळविली आहे.

विठ्ठल ही तिच्या काव्याची केंद्रस्थानी असणारी व्यक्तिरेखा आहे. वस्तुतः, ईश्वराबद्दल सामान्य भाविकाच्या मनात आत्यंतिक आदर असतो किंवा आदरयुक्त भीती असते. त्यामुळे कळतनकळत देव आणि भक्त यांच्यामध्ये अंतराय निर्माण होतो. वारकरी संतांनी हे अंतर मिटविले आहे. प्रथम नामदेवाने, नंतर जनाबाईने विठ्ठलाला माय-बाप म्हटले, सखा म्हटले. प्रसंगी शिव्याही दिल्या. भांडण केले. उपास्य दैवताची इतकी विविधरंगी लडिवाळ रूपे अन्यत्र क्वचितच पाहावयास मिळतील. जनीची सगळी कामे करण्यासाठी तिच्या मागे धावणारा विठ्ठल आहे. पण त्याच विठ्ठलाला ती 'अरे विठ्या विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या। तुझी रांड रंडकी झाली। जन्मसावित्री चुडा ल्याली।।' असे म्हणू शकते. अशा विस्तिर्ण परिघात फिरणारी तिची अनुभूती वाचकांना थक्क करून सोडते.

अभंग, भूपाळी, पाळणा, कूट, गौळण, आख्यान, कथाकाव्य असे अनेक काव्यप्रकार तिने सहजपणे हाताळलेले दिसतात. तिच्या लेखनातील सफाईदारपणा व अनुभवाची खोली यामुळे तिची कविता अर्थबहुल व भावपूर्ण होते. गेयता हाही तिच्या काव्याचा गुण आहे. तिच्या कवितेत सांगितिक सामर्थ्य आहे. त्यामुळे जनाबाईच्या अनेक अभंगांना सुंदर चाली लावलेल्या आणि अनेक गायकांनी ते अभंग गायलेले दिसतात. असेही दिसते की जनाबाईच्या अनेक अभंगावर नामदेवांच्या विचारांची, कल्पनेची छाप आहे. परंतु नामदेवांची कविता थोडीशी तटस्थ, वस्तुनिष्ठ आहे, तर जनाबाईची कविता भावमधुर आणि सौंदर्यपूर्ण आहे.

एकंदर, वारकरी संप्रदायाचा वसा-वारसा आनंदाने मिरवणारी आणि पुढे घेऊन जाणारी संत कवयित्री म्हणून जनाबाईचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. तिच्या काळाचा विचार करता तिने बंडखोरी केली आहे. शीर्षस्थानी असणारे धर्ममार्तंड आणि परंपरेतील काही प्रथा-परंपरांवर तिने आघात केला आहे, असेही दिसते. 'आम्ही स्वर्ग लोक मानू जैसा ओक' असे धाडसी विधान ती करते. मुक्तीपद

नाकारते. जुने प्रभाव पचवून, परंपरेतील अनुकूल भाग स्वीकारून नवी मांडणी करणे, हे तिचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शूद्रातिशूद्र स्त्रीपुरुषांना आत्मविश्वास व सन्मान देणारी तिची कविता आहे. अध्यात्मिक समतेची भूमिका घेऊन ती पुढे आलेली दिसते.

१.५ शब्दार्थ व टीपा

सुखाचे आगर - सुखाचा मोठा साठा / अनुभव; **वत्स** - वासरू; **शेष** - श्रीविष्णू ज्यावर पहुडला आहे असा समुद्रातील पंचफडीचा सर्प; **बोळविले** - सोडून दिले; **काय वानूं?** - काय वर्णन करू?; **अग्रवाटा** - प्रथम मान/ पहिला मान; **चोखट** - शुद्ध, चांगले; **अहर्निशी** - दिवसरात्र; **ध्यावे** - धारण करावे; **उन्मनी** - देहभाव विरहित अवस्था; **वास करणे** - राहाणे; **लवडसवडी** - गडबडीने; **टांकसाळ** - नाणी तयार करण्याचा कारखाना/ठिकाण; **यातिहीन** - हलक्या जातीचा; **स्कंधी** - खांद्यावर; **श्रुती** - वेद; **उच्छिष्ट** - उष्टे; **स्मृती** - मनुस्मृती सारखे इतर स्मृतिग्रंथ; **जातिया वैरण** - जात्यात घालायची धान्यमूठ; **इक्षुदंड** - ऊस; **शेट्या** - सावकार; **सांडी** - सोड/सोडून दे; **अळंकापूर** - आळंदी; **घररिघी** - घरात जबरदस्तीने घुसून पत्नीप्रमाणे राहणारी स्त्री; **रौरव** - एक प्रकारचा नरक; **गोचर** - इंद्रियांना जानवणारे

१.६ प्रश्नोत्तरे

विद्यापीठ परीक्षेत अपेक्षित प्रश्न व उत्तरांचे नमुने येथे दिले आहेत. वस्तुनिष्ठ विभागातील उत्तरे सुस्पष्ट व नेमकी असावीत अशी अपेक्षा आहे. तर लघुत्तरी व दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे मुद्देसूद, सुसंगत, समीक्षात्मक व उदाहरणे, संदर्भ यांचा वापर करून लिहावीत, अशी अपेक्षा आहे.

१.६.१ वस्तुनिष्ठ प्रश्न

अ) योग्य पर्याय निवडा.

१) 'स्त्री जन्म म्हणवुनी न व्हावें उदास' अशी मनोभूमिका ...... केली आहे.

(विठ्ठलाने/ समाजाने/ नामदेवाने/ साधुसंतांनी)

२) संत जनाबाईच्या काळात महाराष्ट्रावर ..... या हिंदू राजाचे राज्य होते.

(रामदेवराव यादव/ चालुक्य/ शिलाहार/ भिल्लम यादव)

३) 'धन्य नामदेव धन्य पंढरीनाथ। तयाने ...... उद्धरिले'

(भक्त/ लोक/ अनाथ/ मज)

४) 'पक्षी जाय .....। बाळकांसी आणि चारा।।'

(आकाशी/ दिगंतरा/ रानी/ घरा)

५) 'चला पंढरीसी जाऊं। ...... पाहूं।।'

(पांडुरंगा/ विठ्ठलासी/ रखुमादेवीवर/ संतजन)

उत्तरेः १) साधुसंतांनी

२) रामदेवराव यादव

३) अनाथ

४) दिगंतरा

५) रखुमादेवीवर

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

विठ्ठलाची विविध रूपे जनाबाईच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहेत, स्पष्ट करा

उत्तरः प्रस्तावना

इ.स. ११ वे १२ वे शतक- परंपरागत धर्मात साचलेपणाचा काळ-नव्या पंथांचा उदय-वारकरी संप्रदायाचा शिस्तबद्ध प्रारंभ- संतांची बंडखोरी-मराठीतून लेखन- सर्वजनसुलभ भक्तीचा प्रारंभ-अभंगाच्या माध्यमातून समाज प्रबोधन-समाजाच्या सर्व स्तरातून संतकवी- पंढरपुरात संतमेळा-जनाबाईस पुरक-पोषक वातावरण- भक्तिमार्गाच्या प्रचार-प्रसारार्थ लेखन.

संत जनाबाईः चरित्र व काव्य

मूळ गाव गंगाखेड(जि. परभणी)- दमा-करूंड माता-पिता- पंढरपुरात पोरकी जना-नामदेवाच्या घरी आश्रय-दासी जनी-घरकाम-नामदेवाची साथसोबत- नामदेवाची भक्ती व भक्तिमार्ग निर्मितीची धडपड जवळून अनुभवली-नामदेवांच्या अभंगांचा, भजन व कीर्तनाचा प्रभाव-नामदेवांना गुरू मानले-स्फुट लेखन-सुमारे ३४० अभंग-भक्तिमार्ग-नाममहिमा-विठ्ठल महिमा-संतगौरव-उपदेश-हरिश्चंद्राख्यान व थालीपाक यांचे लेखन

विठ्ठलाचे वत्सल रूप

जनाबाई विठ्ठलाला मातापिता संबोधते-जवळचे आपुलकीचे नाते-आईवडिलांकडे हट्ट करता येतो-मागता येते-अनेक अभंगांची उदाहरणे-

येगे माझे विठाबाई। कृपादृष्टीने तूं पाही
तुजविण न सुचे कांही। आतां मी वो करूं कांहीं।।

किंवा

धाव धाव पांडुरंगे। सखे जिवलगे अंतरंगे
तुजवांचुनि दाही दिशा। वोस मज जगदिशा

किंवा

कां गा न येसी विठ्ठला। ऐसा कोण दोष मला
मायबाप तूंचि धनी। मला सांभाळी निर्वाणीं

किंवा

माय मेली बाप मेला। आतां सांभाळी विठ्ठला
मी तुजे गा लेकरूं। नको मजशी अव्हेरूं

किंवा

ये ग ये ग विठाबाई। माझे पंढरीचे आई

जनाबाईच्या दृष्टीने विठ्ठल हा कधी आई तर कधी बाप आहे. तो नारीरूप होऊन तिला न्हाऊ घालतो. वेणी घालतो 'आपुल्या हाते वेणी घाली, जनी म्हणे माय आली' असे हे मातृरूप आहे.

सखा विठ्ठल

जनाबाईने विठ्ठलाचे मानुषीकरण केले- देवत्वाचे वलय दूर करून थेट नाते जोडले-दळणकांडण, धुणीभांडी, गोवऱ्या वेचणे अशा कामात तो सदैव तिच्या मागेपुढे असल्याची शब्दचित्रे रेखाटली-इतकेच नव्हे तर रात्री-मध्यरात्री तो तिला भेटायला जातो-तिच्या सुखशय्येवर पडून तिच्याशी हितगूज करतो-कधी तिच्याकडे खायला मागतो (तिचे अभंग लिहून घेतो)-इथे देव भक्तिवश्य आहे हे ती बिंबवते- तसेच जनी जे काम करते ते सगळे काम विठ्ठल करतो, म्हणजेच कोणतेही काम हलके नसते किंवा कामामुळे कुणाला कमीपणा येत नाही हे तिला बिंबवायचे आहे-आजच्या संदर्भात, सखा असणारा पुरुष स्त्रीला घरकामात मदत करतो, हे खरे प्रेम असे म्हणता येते-

विठ्ठलाशी भांडण

विठ्ठल भेटत नाही, त्याची कृपा होत नाही म्हणून त्याच्याशी लटके भांडण आहे. उदा.

स्मरतासी पावसी। तरी भक्तांसी लाभसी
ऐसे काही न घडे देवा। वायां कोण करी सेवा
न पुरतां आस। मग कोण पुसे देवास
कोठे चक्रपाणि। तुज आधीन नाही जनी

किंवा

जनाबाई विठ्ठलाला चार शहाणपणाच्या गोष्टी सांगतात.

किती सांगू तूतें। बुद्धि शिकवणें हें मातें
सोमवंशाच्या भूषणा। प्रतिपाळीं हर्षे दीनां
शिकवावे तूतें। हाचि अपराध आमुतें

किंवा

ती विठ्ठलाला असेही म्हणते की,

विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या
तुझी रांड रंडकी झाली। जन्मसावित्री चुडा ल्याली
तुझे गेले मढें। तुला पाहून काळ रडे
उभी राहूनि अंगणीं। शिव्या देत दासी जनी

अर्थात, हे भांडण खोटे खोटे आहे. अतिव प्रेमातून आले आहे. तिच्या आर्त हाकेला तो प्रतिसाद देत नाही, म्हणूनही ती असे म्हणते. विशेषतः बडवे तिला सुळावर देण्याचे ठरवितात तेव्हा विठ्ठल धावून येत नाही. म्हणून ती 'विठ्ठल मेला' असे म्हणताना दिसते. तिचा अधिकार मोठा होता, हेच इथे स्पष्ट होते.

श्रीविठ्ठल गौरव

श्रीविठ्ठलाचे माहात्म्य/ गौरव अनेक अभंगातून – तो भक्तवत्सल आहे. दातारा आहे. सर्वसमर्थ आहे, असे वर्णन

अनंत लावण्याची शोभा। तो हा विटेवरी उभा
पितांबर माळ गांठी। भाविकासी घाली मिठी

असे वर्णन ती करते.

पाय जोडुनी विटेवरी। कटी हात उभा हरी
रूप सांवळे सुंदर। कानी कुंडले मकराकार

असे त्याचे अनोखे वर्णन ती करते.

देव भावाचा लंपट। सांडुनि आला हो वैकुंठ
पुंडलिकापुढें उभा। समचरणीची शोभा

असेही वर्णन ती करते.

समारोप

जनाबाई विठ्ठलाला विविध रूपात पाहते. तो मातापिता, सखा-सांगती आहेच पण महत्त्वाचे म्हणजे भक्तजनाचा चाहता व भक्तिवश्य आहे. जनाबाईची कविता विठ्ठलाच्या या विविध रूपांभोवती फिरत राहते. कधी प्रेमाने, कधी रागाने ती विठ्ठलाशी सुखसंवाद करण्याचा प्रयत्न करते.

क) लघुत्तरी प्रश्न

जनाबाईच्या हरिश्चंद्र आख्यान या काव्याचे गुणविशेष सांगा.

उत्तरः प्रास्ताविक

वारकरी एक वैशिष्ट्यपूर्ण धर्मसंप्रदाय-संप्रदायातील संतकवींचे स्थान-योगदान-नामदेव-ज्ञानदेवांच्या मार्गदर्शनाखाली जनाबाईची जडणघडण-भक्तिमार्गाचा प्रचार-प्रसार करणारी संतकवयित्री-आराध्य दैवताला सखा बनविण्याचे सामर्थ्य-संतचरित्रे, विठ्ठलमाहात्म्य-मागणे, करूणा, तीर्थावळी, उपदेश आदी विषयांवर अभंगरचना-संत नामदेवांचे अनुकरण करणारे आख्यानकाव्य हरिश्चंद्र आख्यान.

कथानकाचे विशेष

जनाबाईंचे गुरू नामदेवांनी २६४ चरणांच्या दीर्घ अभंगात हे कथानक प्रथम रचले. त्याला अनुसरत २३ अभंगात ३३९ चरणांत जनाबाईने हे आख्यान रंगविले- हरिश्चंद्र, तारामती, रोहिदास व विश्वामित्र या चार महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा-तीन सुष्ट, एक दुष्ट-शोकात्म सुखांतिका-करूण, शोक, वत्सल, बीभत्स, भय अशा विविध रसांची निष्पत्ती-पाल्हाळ नसलेली आटोपशीर रचना-तत्कालीन रूढी परंपरांचे दर्शन-भाषेच्या लक्षणा व व्यंजना शक्तीचा वापर-सत्त्वशील राजा विरूद्ध सत्त्वभंग करू पाहणारा ब्राह्मण असा संघर्ष-

आख्यानाचा प्रारंभ देवलोकात तर प्रत्यक्ष घडणाऱ्या घटना मृत्यूलोकात-हरिश्चंद्राचा अतिचांगुलपणा हाच दोष-प्रथम विश्वमित्राला स्वप्नात सिंहासनासह मेदिनी (पृथ्वी) दान-त्यामुळे राजा निष्कांचन-पुढे पुन्हा विश्वमित्र याचक-पुन्हा सुवर्णदान देण्याचा संकल्प-त्यासाठी काशी-विश्वेश्वराकडे प्रयाण-वाटेत विश्वामित्रांनी निर्माण केलेली मायावी विश्रांतिस्थले-जंगली श्वापदे-काशीत हरिश्चंद्र तारामती व रोहिदासाचा लिलाव-रोहिदासाचा मृत्यू-हरिश्चंद्र डोंबा घरी दास-स्मशानात काम-तारामतीवर स्वतःच्या मुलाचे मांस खाल्याचा आरोप-शिरच्छेदाची शिक्षा-हरिश्चंद्राला मुंडके उडविण्याचा आदेश-मग विश्वामित्राला उपरती-शेवट गोड-

समारोप

भावरंगाची उधळण करणारी कविता-भय-अनुकंपा-आश्चर्य यांचे दर्शन-सत्त्व शुद्धाचरण यांचे महत्त्व बिंबविण्यासाठी हे आख्यान-कीर्तन प्रसंगी दृष्टांत सांगण्यासाठी उत्तम कथा-(उत्तरात काव्यपंक्तीचा वापर करावा)

१.७ सरावासाठी नमुना प्रश्न

अ) गाळलेल्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) संतभार पंढरीत। ..... गजर होत।।
(हरिनामाचा/ भक्तीचा/ विठ्ठलाचा/ कीर्तनाचा)

२) ..... सात्त्विक माझिये कुळीचा। अंगिकार त्याचा केला देवे।।
(नामदेव/ अक्रुर/ विदूर/ प्रल्हाद)

३) ..... संत भला। तेणे देव भुलविला

(नामदेव/ ज्ञानदेव/ चोखामेळा/ गोरा कुंभार)

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१) जनाबाईच्या वाङ्मयीन जडणघडणीचा परिचय देऊन तिच्या उपदेशपर अभंगांचे स्वरूप सांगा.

२) जनाबाईच्या अभंगात संतगौरव कशाप्रकारे आला आहे?

३) वारकरी संप्रदायाचा थोडक्यात परिचय करून देऊन त्यामधील संत जनाबाईच्या योगदानाचा परामर्ष घ्या.

क) लघुत्तरी प्रश्न

१) जनाबाईने कोणकोणते काव्यप्रकार हाताळले ते सोदाहरण सांगा.

२) जनाबाईने आपल्या अभंगातून संत नामदेवांचे चरित्र कसे रेखाटले आहे?

३) ज्ञानेश्वरांशी असणारे भावबंध जनाबाईच्या अभंगातून कसे व्यक्त होतात?

१.८ उपक्रम

१) जनाबाईच्या अभंगाच्या ध्वनिफिती (mp3 गाणी) मिळवून ऐका.

२) वारकरी संप्रदायाचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टिकोणातून वारकरी भजन व कीर्तन पाहा.

१.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

१) संत कवयित्री जनाबाईः चरित्र, काव्य आणि कामगिरी- डॉ. दा. बा. भिंगारकर, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

२) संत जनाबाई- डॉ. सुहासिनी इर्लेकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

३) संत कवी आणि कवयित्रीः एक अनुबंध- डॉ. सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

४) जनाबाईचे निवडक अभंग- डॉ. सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

५) जनाई- संपा सचिन परब, श्रीरंग गायकवाड, अक्षर प्रकाशन, आजरा.

६) स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर- तारा भवाळकर, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई.

७) श्रीनामदेवः जनी आणि नागरी- रा. चिं. ढेरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

८) 'समर्था'ची दासी जनाबाईंचे माणूस असणे - माधव पुटवाड (तीन लेख) पाक्षिक परिवतनाचा वाटसरू, फेब्रुवारी-मार्च २०१८.

❑❑❑

सत्र २ : घटक २

मराठी गौळण

संपादक – वसंत स. जोशी

२.१ उद्दिष्ट्ये :

या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपणास पुढील गोष्टी समजून येतील–

- मराठीतील गौळण या काव्यप्रकाराचा परिचय होईल.
- गौळणी लिहिणारे संतकवी व शाहीर यांच्या चरित्राचा व लेखनाचा परिचय होईल.
- कवीच्या लेखनकाळात त्याच्या भोवताली असणाऱ्या समकालीन समाज–सांस्कृतिक वातावरणाचा त्याच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वावर कसा प्रभाव पडतो, ते समजून घेता येईल.
- संत व शाहिरांच्या गौळणीत समकाळाचे प्रतिबिंब कसे पडले आहे, ते स्पष्ट होईल.
- एकूण मराठी कवितेतील गौळण या काव्यप्रकाराचे महत्त्व व गौळणी लिहिणाऱ्या कवींचे योगदान स्पष्ट होईल.
- एका लेखकाचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त अभ्यासपद्धती कशी वापरावी, ते समजून येईल.

२.२ प्रास्ताविक :

मराठी साहित्याचा प्रारंभ इ.स. च्या १२ व्या, १३ व्या शतकात झाला. हा यादव राजांचा कालखंड होता. यादवांपासून पेशवाईपर्यंत मराठीत जे साहित्य निर्माण झाले ते मध्ययुगीन साहित्य म्हणून ओळखले जाते. या कालखंडात शैव, नाथ, महानुभाव, वारकरी व समर्थ अशा संप्रदायात संतकवी उदयास आले. नंतर पंडित कवींचा काळ सुरू झाला. शिवशाही ते पेशवाईत शाहीर कवींचे काव्य बहरत गेले. म्हणजेच संत–पंत–तंत व बखरकार यांनी या काळातील साहित्य समृद्ध केले. त्यामध्ये महानुभाव पंडित व बखरकार यांनी गद्य ग्रंथांची निर्मिती केली. तर संत, पंडित व शाहीर या सर्वांनी विविध प्रकारचे काव्य लिहिले. मराठीच्या प्रारंभ काळात म्हाइंभटाचा 'लीळाचरित्र' आणि ज्ञानदेवांचा 'ज्ञानेश्वरी' हा काव्यग्रंथ निर्माण झाला आणि समृद्ध साहित्य परंपरेची सुरूवात झाली.

संतकवी व पंडित कवी हे मुख्यत्वे अध्यात्मप्रवण भक्तिकाव्य लिहिणारे कवी होते. ते स्वतः ज्या भक्तिसंप्रदायाचे त्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा त्या कवीच्या लेखनावर प्रभाव, असे चित्र आपणास पहावयास मिळते. वारकरी हा सर्वात प्रभावी असा भक्तिसंप्रदाय होय. संत नामदेवांपासून या संप्रदायाचा प्रारंभ झाला. संत ज्ञानदेवांनी या संप्रदायाला ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून तात्त्विक अधिष्ठान प्राप्त करून दिले. अभंग, ओवी, भारूडे, गौळणी, भूपाळी, आरती, पाळणे, आख्यान

काव्य असे अनेक प्रकार संतकवींनी हाताळले. त्यातून विपुल वाङ्मयनिर्मिती झाली. 'गौळण' हा संतकवीनी निर्माण केलेला भक्तिपर भाव व्यक्त करणारा काव्यप्रकार आहे.

२.३.१ विषय विवेचन

गौळण म्हणजे श्रीकृष्ण व गोपी किंवा श्रीकृष्ण व राधा यांच्या भावसंबंधावर अध्यात्मिक दृष्टिकोनातून लिहिलेले गीत होय. गोपालिनी या संस्कृत शब्दापासून पुढे गवळण > गौळण असा शब्द बनला असावा अशी व्युत्पत्ती महाराष्ट्र शब्दकोशात सांगितली आहे. हाल या सातवाहन राजाने संपादित केलेल्या 'गाहासत्तसई' (गाथासप्तशती) या महाराष्ट्री प्राकृत भाषेतील ग्रंथात किंवा कवी जयदेवाच्या 'गीतगोविंद' सारख्या रचनेत गौळण या काव्यप्रकाराची प्रेरणा शोधता येते.

'महाभारत' या महाकाव्यातील एक महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा म्हणजे श्रीकृष्ण होय. श्रीकृष्णाचे व्यक्तिमत्त्व प्रभावी व अनेक आयाम असणारे आहे. म्हणून तो अनेकांना अनेक रूपांत प्रिय आहे. त्याच्या बाललीला, खेडकरपणा, प्रीतिभाव, शौर्यकथा, तत्त्वतेत्ता म्हणून असलेला उपदेश, नीती अशा अनेक अंगांनी श्रीकृष्ण असंख्यांना प्रिय वाटतो. बाल्य व तारूण्य या अवस्थेत श्रीकृष्णाचा संबंध गोकुळातील त्याचे बालसवंगडी व गोपी यांच्याशी आला. त्याने गोपींच्या काढलेल्या खोड्या या दहीदूधलोणी चोरणे, पाण्याचे माठ फोडणे, गोपींची वस्त्रे पळविणे अशा अनेक पातळींवर घडत होत्या. अशा वेळी गोपी यशोदेकडे तक्रारी करत. परंतु त्यामध्ये तक्रारीची भावना कमी व कौतुकाची जास्त असे. कळत-नकळत गोपी श्रीकृष्णाच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वावर प्रेम करू लागल्या. त्याच्याशी रासक्रीडा रचू लागल्या. यामधून कृष्ण-गोपी यांच्यामध्ये प्रेमभाव वाढू लागला.

राधा ही श्रीकृष्णचरित्राला व्यापणारी एक महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा होय. मूळात ती महाभारत किंवा भागवत या ग्रंथात सापडत नाही. मात्र लोकपरंपरेत राधा ही व्यक्तिरेखा खोलवर ठसलेली आहे. ती विवाहिता आहे. परकिया नारी आहे. तरीही तिचा प्रेमभाव कमी होत नाही. उलट तिचे श्रीकृष्णावरील प्रेम हळूहळू भक्तीत रूपांतरित होते. मधुराभक्ती असा नवा प्रकार गोपी व राधेच्या माध्यमातून आलेला दिसतो.

प्रेम ही मानवी जीवनातील सर्वात सुखद व चिरतरूण भावना होय. पती-पत्नी प्रेमापेक्षा प्रियकर-प्रेयसी या नातेसंबंधातील प्रेमाची खुमारी वेगळी असते. अंतरी निर्माण झालेली तीव्र ओढ, चोरून होणाऱ्या भेटीगाठी, प्रेमात येणारे अडथळे, विरह, अतृप्ती, मनावर व देहावर होणाऱ्या परिणामातून येणारी व्याकूळता, प्रेमभावनेच्या अतिव जाणिवेतून होणारी वेडी-पिशी अवस्था; निराशा व निरसता यांचा अनुभव, प्रेमप्राप्तीतून मनाची होणारी उत्फुल्लता, अवीट आनंद, जीवनाचा सौंदर्यात्मक अनुभव अशा अनेक अवस्था, भावना प्रियकर-प्रेयसी या भावबंधात अनुभवता येतात. प्रत्यक्ष मीलनापेक्षा प्रेमभावनेत झुलणे अधिक सुखद व हवेहवेसे असते. प्रेमाची ही सगळी मधुरता परमेश्वरभक्तीत वापरण्याचा प्रयास प्रथम संतांनी केला. त्यातूनच मधुराभक्ती उदयास आली.

'जिवीचा जीवलग' असणारा परमेश्वर / विठ्ठल भेटत नाही. त्यामुळे होणारी तडफड व येणारी व्याकूळता संतकवींनी अनेक अभंगातून व्यक्त केली. या अवस्थेची तुलना स्त्री-पुरुष प्रेमातील उत्कट विरहातून व्यक्त होऊ शकेल, हे जाणून संतांनी परमेश्वराला प्रियकर व स्वतःला प्रेयसी कल्पून काव्य लिहिले. यासाठी प्राचीन साहित्यात / पूर्व परंपरेत मिळणारे सर्वमान्य उदाहरण म्हणजे कृष्ण-गोपी किंवा कृष्ण-राधा यांचा प्रेमभाव. त्यामुळे अशी भावना व्यक्त करणारी रचना संतांनी लिहिली. ही काव्यरचना 'गौळण' म्हणून प्रसिद्ध झाली.

वारकरी संतांचा मूळचा कल शृंगारात रमणारा नाही, तर तो वात्सल्य भावनेत दंगणारा आहे. म्हणूनच वारकरी संतांच्या कवितेत विठ्ठल हा कधी विठाई होतो, तर कधी विठोबा होतो. संत देवाला आपले माय-बाप असे संबोधतात. आईने जशी स्वतःच्या बालकाची काळजी घ्यावी तशी देवाने आमची चिंता वहावी असे सुचवितात. त्यामुळेच वारकरी संतांच्या गौळणी शृंगारात बुडालेल्या आढळत नाहीत. अतिशय सूचकपणे संयत शृंगार व्यक्त होतो आणि भावार्थ हा परमेश्वर प्राप्तीपर्यंत पोहोचतो.

उत्तर भारतातील काव्य मात्र याउलट दिसते. तेथे कृष्ण-गोपी, कृष्ण-राधा शृंगाराची रसभरित वर्णने आढळतात. मराठी शाहिरांवर या शृंगाराचा मोठा प्रभाव आहे. कारण एक तर शाहीर सामान्य लोकभावना व्यक्त करत होते. तसेच पेशवाईत या शृंगाराला राजमान्यता मिळू लागली होती. त्यामुळे शाहिरांच्या गौळणीतील शृंगार हा अध्यात्मिक पातळीवर न जाता, लौकिक मानवी पातळीवर थांबलेला दिसतो. त्याच बरोबर उघडपणे मानवी भाव-भावना कवितेतून व्यक्त करण्याची पद्धत त्या काळी नव्हती. त्यामुळेच श्रीकृष्ण कथेच्या माध्यमातून प्रेमभावना व शृंगारवर्णन करण्याचा प्रयत्न पंडित कवी व शाहिरांनी केला. लोकपरंपरेतील लोकगीते अधिक धीटपणे मानवी भावभावना व्यक्त करताना दिसतात.

गौळणी हे स्फुटकाव्य म्हणजे छोट्या आकाराचे काव्य असते, हे स्पष्ट करून या स्फुटकाव्याचे विशेष सांगताना. डॉ. वसंत स. जोशी म्हणतात, ''स्फुटकाव्य (हे) गायनाच्या अंगाने मुख्यतः लिहिले गेलेले असल्याने गेयता, तालबद्धता, वाद्यापेक्षता, गायनकाल आणि प्रसंग यांशी निबद्ध आहेत. भावार्तता हा त्यांचा विशेष आहे. व्यक्तिमनाचे नितळ दर्शन त्यात घडू शकते. आधुनिक भावगीतांशी त्यांचे निकटचे नाते आहे. ही कविता अल्पाक्षररमणीय, भावमधुर आणि अर्थबहुल आहे. व्यक्तिसापेक्षता हा तिचा विशेष असला तरी ती समूहमनाचेही प्रतिनिधित्व करते. त्यामुळे ती समूहाकडून एकत्रितरीत्याही गायिली जाते. आध्यात्मिकता आणि भक्तिप्रवणता हे या कालखंडातील काव्याचे प्रातिनिधिक स्वरूप असल्याने या स्फुटकाव्यातही ते प्रतिबिंबित झालेले आहे. परमेश्वर गुणगानात रमणारी भक्ताची भावुक अवस्था काव्यरूप घेऊन अवतरते आणि ही मराठी समाजमनाच्या तत्सदृश्य भावनेचा अविष्कार करणारी असल्याने ती केवळ व्यक्तिगत पातळीवर न राहता सामूहिक पातळीवर अविष्कृत होते. या गीतातील प्रमुख भाव, टाळ, वीणा, मृदंग, एकतारी यासारख्या वाद्यांच्या साक्षीने प्रकट होत राहतो.'' (मराठी गौळण, १९८८, पृ. ३)

२.३.२ संत ज्ञानदेव: चरित्र व काव्य

वारकरी संप्रदायातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण संत म्हणजे ज्ञानदेव होय. विठ्ठलपंत व रुक्मिणी या ब्राह्मण दाम्पत्याच्या पोटी त्याचा जन्म इ. स. १२७६ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांनी म्हणजेच विठ्ठलपंतांनी लग्न झाल्यानंतर काही काळातच संन्यास स्वीकारला. परंतु पुढे गुरूच्या आज्ञेने त्यांनी पुन्हा संसार सुरू केला. नंतर त्यांना निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई ही चार मुले झाली. विठ्ठलपंतांनी आश्रम व्यवस्था मोडली. संन्यास घेतल्यानंतर पुन्हा गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला. धर्माज्ञा मोडली. महापातक केले. म्हणून त्यांच्या कुटुंबाला वाळीत टाकण्यात आले. त्यांना जातिबहिष्कृत करून चांडाळ ठरविण्यात आले. अशा कठीण प्रसंगाला धीराने सामोरे जात विठ्ठलपंतांनी आपल्या मुलांना वेद-शास्त्र-पुराणांचे ज्ञान दिले. पुढे निवृत्ती-ज्ञानदेवादी भावंडांनी नाथसंप्रदाय स्वीकारला. नाथ संप्रदाय हा अतिवर्णाश्रमींचा मानला जातो. ज्ञानदेवांनी नंतर आळंदी व पैठण येथील ब्रह्मवृंदाकडून शुद्धिपत्र मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना ते मिळू शकले नाही. त्यांची मुंज झाली नाही.

याच दरम्यान पंढरपूरात ख्यातकीर्त असलेले नामदेव या भावंडांना भेटावयास गेले. त्यांना आधार दिला. संत नामदेवांच्या संपर्कामुळे निर्गुण निराकाराची उपासना करणारे ज्ञानी नाथपंथी ज्ञानदेव सगुण साकाराची उपासना असणाऱ्या वारकरी संप्रदायात प्रवेशकर्ते झाले. संत ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायात प्रवेश करण्यापूर्वीच भगवद्गीतेवर भाष्य करणारा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ इ. स. १२९० मध्ये लिहिला. पुढे वारकऱ्यांनी 'ज्ञानेश्वरी' हा आपल्या संप्रदायाचा तत्त्वज्ञानात्मक आधारग्रंथ म्हणून स्वीकारला. ज्ञानदेवांनी 'अमृतानुभव', 'चांगदेव पासष्टी' हरिपाठाचे अभंग व इतर स्फुट अभंग असे काव्य लिहिले. संत ज्ञानदेव अत्यंत प्रतिभावान होते. त्यांनी संस्कृतमधील अध्यात्मज्ञान मराठीत प्रतिपादिले. सनातनी ब्रह्मवृंदाने ज्या ज्ञानदेवांना जातिवर्ण बहिष्कृत केले त्या ज्ञानदेवांनाच वारकरी संप्रदायाने संत हा सर्वोच्च दर्जा दिला. त्यांना 'माउली' म्हटले. अनेक संतांनी अनेक प्रकारे ज्ञानदेवांचा गौरव केला.

२.३.३ ज्ञानदेवांच्या गौळणी

संत ज्ञानदेवांचे काव्य म्हणजे मराठीच्या कोंदणातील अनमोल रत्न होय. त्यांनी आपल्या काव्यग्रंथातून उच्च दर्जाचे तत्त्वज्ञान मांडले. चिद्विलासवादाचा सिद्धांत मांडला. ज्ञानोत्तर भक्तीचा पुरस्कार केला. त्यांचे काव्य उपमा-दृष्टांतांनी भरलेले आहे. रूपक-अनुप्रास आदी अलंकारांचा वापर करत त्यांनी भावपूर्ण काव्य रचले. ज्ञानेश्वरीतून शांतरसाचा अविष्कार केला.

ज्ञानदेवांच्या गौळणी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. भक्तिसुखाचा आर्त अनुभव आणि सगुण साकार रूपाच्या भेटीची ओढ या गौळणींमध्ये दिसते. या संदर्भात वसंत स. जोशी लिहितात. ''ज्ञानदेवांची गौळण जनमनाशी संवाद साधणारी नसून ती मनमोहनाशी सुखसवांद करते. ती त्याच्या मीलनाच्या कल्पनेने सुखावते. विरहाने हिंपुटी होते. बाललीलात रमते. खोड्यांनी कातावते. आत्मपीडनाच्या अनेकविध भावच्छटा ज्ञानदेवांची गौळण प्रकट करते. ही त्यांची एक प्रकारची

आत्मरतीच आहे. आत्मरंगात मुसावलेले अपूर्व सुख 'स्वसंवेद्य' च असते, याची जाणीव ज्ञानदेवांची गौळण वाचताना जितकी होते, तितकी अन्य कवींच्या 'गौळणी' मुळे होत नाही. ज्ञानदेवांची गौळण अनेकविध रूपे धारण करीत असली तरी तिचे आंतरिक रूप परमात्मवेड्या ज्ञानदेवांचेच असते.'' (मराठी गौळण, १९८८ पृ. १४)

विठ्ठल भेटीची आर्त तळमळ लागलेले ज्ञानदेव येथे आपल्या भावना गौळणीच्या रूपाने मांडत आहेत. येथे कवी स्वतः प्रेयसीच्या/ गोपीच्या भूमिकेत आहे. तर तिचा प्राणप्रिय सखा म्हणजे कृष्ण किंवा विठ्ठल आहे. प्रियकराच्या भेटीविना तळमळणारी, व्याकूळ होणारी ही गोपी म्हणते, 'तुजविण एकली रे कृष्णा न गमे राती, तव तुवा नवल केलें वेणू घेऊनि हाती।।' तो तिचा प्रियकर दुरूनच वेणू वाजवितो. क्षणात त्याच्याशी तिचे भावात्मक नाते जोडले जाते. या चैतन्याच्या चोराने माझा स्वीकार करावा, असे ती म्हणते.

ज्ञानदेवांच्या गोपिका कृष्णरूपात इतक्या तल्लीन झाल्या आहेत, की त्या व्यवहाराचे भान विसरतात. मथुरेला बाजारला जातात, पण 'गोरस घ्या' असे म्हणण्या ऐवजी 'गोविंद घ्यावो दामोदर घ्यावो' म्हणू लागतात. या गौळणीला कृष्णाच्या तर ज्ञानदेवांना विठ्ठलाच्या सावळ्या रूपाने वेधियले आहे. या सावळ्याचे रूप मनी धारण केले की स्वतः सावळे होत असल्याचा अनुभव येतो.

ज्ञानदेवांची विरहिणी कृष्ण रूपाने वेधली आहे. त्यामुळे ती म्हणते की,

> चंद्रमा करितो उबारा गे माये
>
> न लावा चंदनु न घाला खेंजणवारा
>
> हरविणें शून्य शेजारू गे माये।।

चंद्र, चंदन या प्रेमाच्या खुणा आहेत. त्या पाहिल्यावर विरहाग्नी वाढतच जातो. त्या विरहाग्नीपासून सुटका होण्यासाठी श्रीकृष्ण (पंढरीनाथ) आणा, असे ती म्हणते. दुसऱ्या एका गौळणीत ही विरहिणी म्हणते, लावण्याचा पुतळा असलेला पंढरपूरचा निळा विठो या डोळ्यांनी पाहिला. त्याच्या गुणांनी मन वेधले गेले आहे. म्हणून ती म्हणते,

> पौर्णिमेचे चांदिणे क्षणक्षणा होय उणे
>
> तैसें माझे जिणें एक विठ्ठलेंविण।।

'पैल तो गे काऊ कोकताहे' या विराणीत कावळा हा शुभशकून सांगणारा असल्याचे गोपिका मानते, ती त्याला सोन्याने पाय मढविण्याचे आश्वासन देते. दहिभात, दूध, रसाळ आंबे देण्याचे आश्वासन देते. मात्र माझा पंढरीराणा कधी भेटेल, असा प्रश्न ती विचारते.

'घनु वाजे घुणघुणा' ही सर्वांगसुंदर विरहिणी आहे. विरहाग्नीने तिचे सर्वांग पोळत आहे. चंद्र, चांदणे, चाफा, चंदन या शीतल गोष्टी मनातील प्रेमभाव अधिकच वाढवितात. सुमनाची शेज,

कोकिळेचे गाणे या गोष्टीच्या माध्यमातून प्रेमभावच वाढू लागतो. शेवटी 'दर्पणी पाहता रूप न दिसे आपुले।।' अशी तिची अवस्था होते.

अवचिता परिमळु झुळकला अळुमाळु
मी म्हणे गोपाळु, आला गे माये।।

असाही अनुभव ती गोपिका घेत असते.

ज्याच्यासाठी घरादाराचा त्याग करावा, संसार सोडावा तोच प्रियकर (जगजेठी) भेटत नाही, याचे दुःख गौळण व्यक्त करते.

भेटवा वो त्यासी चरण झाडीन केशी
सगुण रूपाशी मी वो भाळलिये।।

असे ती म्हणते. त्याला क्षेमअलिंगन देण्यासाठी जीव उतावीळ झाला आहे, पण तो भेटत नाही. त्याने वेड लावले आहे. माझे चित्त स्वतःसोबत नेले आहे आणि मलाही स्वतःसारखेच करून ठेवले आहे, असे ती म्हणते.

भेटिसी गेलीये तंव तीच जालिये
भुलली ठेलिये मज न कळे कांही।

अशी तिची अवस्था झाली आहे.

एकंदर, ज्ञानदेवांची गौळण भावकोमल व लडिवाळ आहे. मनोवृत्तीचा पालट आणि हरीचे लागलेले वेड या गौळणीतून व्यक्त होते. मूळचे योगमार्गी व निर्गुण निराकाराची उपासना करणारे ज्ञानदेव येथे गौळणीत मात्र सगुण साकार रूपाने वेडावले आहेत. पंढरीचा सावळा भेटावा अशी आस त्यांच्या मनाला लागली आहे. विरह आणि अतृप्तीच्या भावनेचे त्यांनी केलेले सांकेतिक वर्णन त्यांच्या उच्च अभिरूचीला साजेसे आहे. मुळात त्यांनी कवितेतून मांडलेला शांतरस शृंगाराच्या माथा पाय ठेवणारा असल्यामुळे संयतपणे, प्रतीक-प्रतिमा-संकेतांच्या माध्यमातून शृंगारभाव व्यक्त झाला आहे.

२.३.४ नामदेवः चरित्र आणि काव्य

वारकरी संप्रदायातील प्रथम संत म्हणजे नामदेव होय. त्यांचा जन्म पंढरपुरातला इ. स. १२७० सालचा. ते बालभक्त होते. श्री विठ्ठलावर त्यांची उत्कट आणि एकनिष्ठ श्रद्धा होती. भक्ती ही नित्योपचारापुरती मर्यादित असावी, हा आईचा उपदेश त्यांनी मानला नाही. उलट ते अध्यात्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी घडपडू लागले. परिसरातील वैदिक ब्राह्मण, शास्त्री, पंडित, पुराणिक, हरिदास अशा सर्व ज्ञानी लोकांकडे गेले. मात्र त्यांना या उच्चकुलीन लोकांनी ज्ञान दिले नाही, त्यांचे समाधान केले नाही. तेव्हा थकले-भागलेले नामदेव विठ्ठलाचा शरण गेले आणि स्वयंप्रेरणेने भक्ती करू

लागले. या विठ्ठलमंदिरातच तल्लीन होऊन नामस्मरण करता करता त्यांना अभंग सुचले. नामदेव मराठीतील पहिले अभंगकार झाले. पुढे अनेक लोक जमवून त्यांनी वाद्यसंगीताच्या साथीने अभंग गायन सुरू केले. त्यातून भजनाची परंपरा सुरू झाली. अभंगाचा अर्थ स्पष्ट करणे आणि वारकरी तत्त्वज्ञान रुजविणे यासाठी त्यांनी वारकरी कीर्तनाची पद्धत सुरू केली.

संत नामदेव हे मराठीतील पहिले अभंगकार, पहिले वारकरी कीर्तनकार, पहिले पद्य आत्मचरित्रकार, पाहिले भावकवी, पहिले संतचरित्रकार, पाहिले युगप्रवर्तक प्रयोगशील कवी आहेत. संवादात्मकता हे त्यांच्या काव्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भावनेचे अनेक रंग त्यांच्या काव्यात पाहावयास मिळतात. विठ्ठल या आराध्यदैवताची अनेक रूपे ते रेखाटतात. त्यांच्या कवितेत हा विठ्ठल सखा, सांगाती, मातापिता झालेला दिसतो. नामदेवांचे सुमारे २४०० अभंग उपलब्ध आहेत.

अभंग व भजनाच्या माध्यमातून नामदेवांचा पंढरपूरात नावलौकिक वाढत होता. याच दरम्यान आळंदीत ज्ञानदेवांचा ब्रह्मवृंदाकडून शुद्धिपत्र मिळविण्याचा प्रयत्न चालला होता. या भावंडांचे अलौकिक प्रज्ञासामर्थ्य आणि बिकट परिस्थिती याची बातमी लागताच नामदेव स्वतः त्यांना भेटण्यास गेले. त्यांना पाठबळ दिले. पुढे ज्ञानदेवांच्या आग्रहाखातर ते दोघे तीर्थयात्रेस गेले. या दरम्यान योगमार्ग श्रेष्ठ की भक्तिमार्ग यावर चर्चा होऊन वारकरी संप्रदायाची शिस्तबद्ध मांडणी करण्यात आली. सर्वजनसुलभ भक्तिमार्ग श्रेयस्कर असल्याचे जाणून या भावंडांनीही वारकरी संप्रदाय अनुसरला. ज्ञानदेवांची योग्यता मोठी आहे हे जाणून नामदेवांनी त्यांचा मोठा गौरव केला. त्यांना संत संबोधले, 'ज्ञानेश्वरी' चे महत्त्व जनमानसात रूजविले.

नामदेव हे उत्तम संघटक आणि प्रचारक होते. त्यांनी अनेक जातीतील सद्गुणी व प्रतिभावंत माणसांना एकत्र केले. त्यातून वारकरी संतमंडळ पंढरपुरी जमा झाले. दक्षिण भारत व उत्तर भारतात भक्तिमार्गाचा प्रचार-प्रसार करण्यासाठी त्यांनी पाच तीर्थयात्रा केल्या. त्यांनी शेवटची दहा वर्षे पंजाबमधील गुरूदासपूर जिल्ह्यातील घुमान येथे वास्तव्य केले. उत्तर भारतातील निर्गुणवादी संप्रदाय आणि शिख धर्म यांचे प्रेरणास्थान संत नामदेव आहेत. शिखांच्या 'गुरूग्रंथसाहेब' या पवित्र ग्रंथात नामदेवांची ६१ पदे आहेत. नामदेवांचा समकालीन व उत्तरकालीन संतकवींवर मोठा प्रभाव पडला.

२.३.५ नामदेवांच्या गौळणी

नामदेव हे विठ्ठलाशी विविध स्वरूपात आपले नाते जोडतात. विठ्ठलाला माय-बाप संबोधणे त्यांना आवडते. मग ते या विठाईची मनधरणी करतात, तिच्याशी लाडे-कोडे वागतात, प्रसंगी रुसतात, भांडतात. नामदेवांच्या गौळणीतही हे भावजीवनाचे विविध रंग आले आहेत.

'परब्रह्म निष्काम तो हा गौळिया घरी' असा त्यांचा अभिप्राय आहे. प्रत्यक्ष परमेश्वर एका गवळ्याच्या म्हणजे नंदाच्या घरी अवतरतो. हा छोटा मुलगा लोणी चोरतो. गौळणी त्याला धरा, धरा

म्हणतात. तो रांगत राजमंदिरी जातो. कधी लपत छपत राजभुवनात जाऊन सिंहासनी बसतो. शेवटी तो देव्हाऱ्यावर सापडतो. तेव्हा गवळणींच्या मुखातून नामदेव म्हणतात,

बहुता कष्टे बहुता पुण्यें जोडिले देवा
अनंत पवाडे तुमचे न कळती मावा।।

या केशवाने जन्मोजन्मी चरणसेवा द्यावी, अशीही त्यांची मागणी आहे.

'यशोदे घराकडे चाल, मला जेवू घाल' हे नाट्यात्म असे बालगीतच आहे. येथे कृष्ण विविध प्रकारे आईची विनवणी करतो आहे. लहान मुलाची लडिवाळता नामदेवांनी येथे अचूक टिपली आहे. तसेच

हाती घेऊनिया काठी। शिकविते श्रीपती
यमुनेची माती। खासी कां कां कां।।

या बालगीतात यशोदा कृष्णाला खोड्या न करण्याविषयी समजावते आहे. वात्सल्य भावनेचा सुंदर अविष्कार येथे झालेला दिसतो.

नामदेवांनी एका गौळणीत गोविंदाच्या दर्शनाला सगळा निसर्ग आसुसला आहे, असे वर्णिले आहे. 'मल्हार महूडें गगनी दाटलें। विजु खळें गर्जिन्नले गे माय।।' असे ते वर्णन करतात. आकाशात मेघ दाटतात, वीज कडाडते, गोविंदाला पहायला मधुधारांचा वर्षाव होतो. आनंदाने मोर नाचतात, असे वर्णन नामदेव करतात.

सावळ्या कृष्णाचा इतका प्रभाव पडलेला आहे की 'रात्र काळी घागर काळी यमुनाजळें ही काळी हो माय' असा हा श्यामरंग सर्वत्र भरून राहिला आहे. त्यामुळे वस्त्र, अलंकार इतकेच नव्हे तर गोपिकेचा देहही काळा झाला आहे.

कृष्णाने पाच प्रांतातल्या पाच भिन्न भाषा बोलणाऱ्या गौळणी ठकविल्या हे नामदेवांनी एका गौळणीत चित्रित केले आहे. मराठी, कानडी, मुसलमानी, कोंकणी, गुजरणी अशा त्या पाच गौळणी आहेत. या पाच जणी एकमेकींच्या संगतीने यमुनेवर आंघोळीस जातात. वस्त्रे कळंबावर काढून ठेवतात. कृष्ण वस्त्रे लांबवतो. मग त्या बाहेर येऊन आपापल्या भाषेत विनवणी करतात, असे नाट्यमय वर्णन नामदेव करतात.

'हरी तुझी ऐसी कैसी खोड' या गौळणीत कृष्णाचा खोडकरपणा रंगविला आहे. तर दुसऱ्या एका गौळणीत कृष्ण हा स्त्रीरूपात, मातृरूपात भेटतो आहे. त्यामुळे पितांबराने अंग झाकणारी कृष्णाई नामदेव चित्रित करतात. नामदेवांच्या बहुतेक साऱ्या गौळणी वत्सल रसात भिजलेल्या आहेत. त्या कृष्णाच्या खोडकरपणाजवळ येऊन थांबतात. शृंगारात रमणे हा नामदेवांचा स्वभाव नाही. त्यामुळे या गौळणी लडिवाळ, मोहक रूप घेऊन आलेल्या दिसतात.

नामदेवांच्या गौळणी या बहुरूपा आहेत, त्या एकसाची नाहीत. या गौळणीतून कधी सरळ साधा अर्थ व्यक्त होतो, तर कधी ती अध्यात्मिक परिभाषेत बोलते. गोपी, कृष्ण, यशोदा, बहुभाषक गौळणी व स्वतः कवी यांच्या मुखातून या गौळणी आलेल्या दिसतात. नामदेवांनी 'मल्हार महूडे गगनी दाटले', 'ध्यान सांवळे गोकुळींचे' आणि 'रात्र काळी घागर काळी' या गौळणींमध्ये वेगळीच शब्दकळा व प्रतिमासृष्टी वापरलेली दिसते. वारकरी परंपरेला शोभेल अशी, कीर्तनातून मांडता येईल अशी नाट्यात्मता असणारी गौळण नामदेवांनी लिहिली आहे.

२.३.६ संत भानुदास चरित्र व काव्य (इ. स. १४४५– १५१३)

संत भानुदास हे संत एकनाथांचे प्रपितामह म्हणजे पणजोबा होय. संत नामदेवांनंतर १००-१२५ वर्षांनी वारकरी संप्रदायाला उर्जितावस्था प्राप्त करून देण्याचे कार्य त्यांनी केले. असे म्हटले जाते की, विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याने पंढरपूरची विठ्ठलमूर्ती आपल्या राजधानीत नेऊन तेथे भव्य मंदिर उभारले. कृष्णदेवरायाचा कालखंड इ. स. १५०९ ते इ. स. १५३० आहे. भानुदासांनी आपल्या भक्तीच्या प्रभावाने राजास जिंकले व मूळ मूर्ती परत आणली. 'सकलसंतगाथा' मध्ये त्यांचे ११७ अभंग उपलब्ध आहेत.

भानुदासांची एकच गौळण 'मराठी गौळण' या संग्रहात आहे. श्रीकृष्णाच्या वेणूवादनाची निसर्ग, पशू-पक्षी व मनुष्यप्राणी यांच्यावर पडलेली मोहिनी या गौळणीत व्यक्त झाली आहे. गोपिका म्हणते, वृंदावनात कुणाचा वेणू वाजतो आहे? त्या वेणुनादाने गोवर्धन पर्वत भारावला आहे. मोर पिसारा फुलवून नाचत आहेत. ते यादवराजांसारखे भासत आहेत. गवत खायचे विसरून गाय आणि वाघ एकत्र पहुडले आहेत. पक्षिकुळे निवांत बसली आहेत. सगळे वैरभाव विसरले आहेत. यमुनेचे पाणी आवाज न करता संथ संथ वाहत आहे. सूर्यही थोडा थांबला आहे. शेषकुर्मवराह चकित झाले आहेत. आई बाळाला दूध पाजायचे विसरली आहे. मंजूळ ध्वनी उमटतोय. पायातील वांकी रुणुझुणु वाजत आहे. देव विमानात बसून हे संगीतसुख अनुभवतात व स्तुती गातात. अशी प्रेमभक्ती भानुदासांना सापडली आहे.

श्रीकृष्णाच्या वेल्हाळ रूप-गुणांची जादू कशी सर्वत्र पसरली होती, ते कवी इथे सांगतो. चराचरावर प्रभाव टाकणारा श्रीकृष्ण ते रंगवितात.

२.३.७ संत एकनाथः चरित्र व काव्य

मुस्लीम राजवटीच्या अत्यंत प्रतिकूल वातावरणात वारकरी संप्रदायाला गतिमान बनवणारे संत म्हणजे एकनाथ होय. त्यांचे पूर्ण नाव एकनाथ सूर्यनारायण पंत होते. पैठण हे त्यांचे गाव. इ. स. १५२८-१५९९ हा त्यांचा कार्यकाल. ते गुरू परंपरेने दत्त सांप्रदायी होते. पुढे त्यांनी वारकरी परंपरा स्वीकारली. अत्यंत कठोरपणे त्यांनी सनातनी परंपरेवर कोरडे ओढले आणि वारकरी पंथाचा प्रचार-प्रसार केला. त्यांनी 'चतुःश्लोकी भागवत', 'भागवताच्या एकादशस्कंदांवरील मराठी टीका', 'रुक्मिणी स्वयंवर' 'भावार्थ रामायण' अशी दीर्घ प्रबंधकाव्ये लिहिली. याशिवाय 'हस्तामलक',

'स्वात्मसुख', 'शुकाष्टक', 'आनंदलहरी', 'गीतासार', 'चिरंजीवपद', 'गीतामहिमा' अशी अनेक स्फुट प्रकरणे लिहिली. अभंग, गौळणी, भारूड, अर्जदस्त असे अनेक काव्यप्रकार त्यांनी लिहिले. त्यांच्या गौळणी व भारूडांमध्ये नाट्यात्मकता आहे. त्यांच्या गौळणींवर नामदेवांचा प्रभाव आहे.

२.३.८ एकनाथांच्या गौळणी

वारकरी संप्रदायाच्या पूर्वपरंपरेचे प्रभाव पचवून एकनाथांची गौळण पुढे जाते. त्यांच्या काही रचनांवर ज्ञानदेवांचा, तर काही रचनांवर नामदेवांचा प्रभाव जाणवतो. 'ज्ञानदेवांचा एका आणि नामदेवांचा तुका' असे म्हटजे जाते. एकनाथांच्या काळात परकीय मुस्लीम सत्ता होती. त्या काळात भक्तिसंप्रदाय वाढविणे कठीण होते. एकनाथांनी लोकपरंपरेतील अनेक रचनाबंध वापरून आपले काव्य लिहिले. त्यांच्या काव्यात नाट्यात्मकतेला विशेष प्राधान्य मिळालेले दिसते. शृंगाराचे थोड्या चढत्या श्रेणीचे सूचन त्यांची गौळण करते.

खोडकर बालकृष्ण आणि त्याची तक्रार यशोदेकडे मांडणाऱ्या गोपिका, असे चित्र सर्व संतांच्या गौळणीत दिसून येते. एकनाथांनी हा तक्रारीचा सूर अचूक पकडला आहे. यशोदेला गाऱ्हाणे सांगताना त्या म्हणतात,

खाऊनी दहीं दूध तूप लोणी।
फोडिली अवघी विरजणी।।
हा गे बाई कोणासी आवरेना।
यशोदे बाळ तुझा कान्हा।।
कोठवर सोसू धिंगाणा।।

दुसरी गौळण म्हणते, 'हा मुखचुंबन घेतो. गळ्यात हात घालतो. याने माझा घात केला आहे. याला धरायला गेले तर तो सापडत नाही.' तिसरी म्हणते, 'याने माझी वेणी व नवऱ्याची दाढी यांनी गाठ मारिली. ती सुटता सुटेना.' मग या सगळ्या गौळणी नंदाच्या अंगणात येऊन म्हणू लागतात, 'आम्ही लेकीसुना घेऊन गोकुळ सोडून जातो.' अशी गाऱ्हाणी एकताना यशोदेच्या डोळ्यात पाणी येते. ती कृष्णाला खोड्या सोडून द्यायला सांगते.

दुसऱ्या गौळणीत एकनाथांनी राधेची खोड काढणारा श्रीकृष्ण रंगविला आहे, काही सुंदर गोपस्त्रिया मथुरेला गोरस विकायला चालल्या आहेत. कृष्ण त्यांमध्ये राधेला पाहतो. जवळ जाऊन तिची वेणी धरतो. तेव्हा ती त्याला सोड सोड म्हणते. माझ्या संसारात तू पाणी घातले आहेस. चार लोकात माझे नावरूप बुडविले आहेस. चावटपणा करतोस घरात चोरी करून पुन्हा वाटेत अडवतोस. थांब तुला तुझ्या आईकडे ओढत नेते. तेव्हा कृष्ण तिचा पदर, निरी न सोडता माझे दान दे म्हणतो. बाकीच्या गोपी हसू लागतात. मात्र शेवटी एकनाथ या खोडकरपणाला आध्यात्मिक डूब देतात.

भक्तीचिया पोटी राधा समरस झाली

कृष्णरूप पाहुनिया देहभावा विसरली

असे म्हणतात.

पाच रंगाचे शृंगार करणाऱ्या पाच गौळणी एकनाथांनी एका गौळणीत मांडल्या आहेत. ही गौळण वाचताना आपणास नामदेवांच्या पाच प्रांतातल्या गौळणींची आठवण होते. पहिली गौळण शुभ्र रंगाने सजली आहे. जशी चंद्रांची ज्योत असावी किंवा आकाशात चांदणी लखलखावी तशी ती आहे. ती कृष्णाचा हात धरून दारात मंथन करते. दुसरी साधीभोळी पिवळी आहे. लहान तनू उमर कवळी, जशी चाफेकळी आहे. तिसरी चंद्रकला नेसलेली, डोळ्यात काजळ घातलेली सावळी आहे. चौथी लाल असून तिने कपाळी कुंकू चिरी, मुखी विडा असा लाल रंग धारण केला आहे. ती डाळिंबाची कळीच आहे. पाचवीने हिरवा शृंगार केला असून ती कृष्णासंगे फुगडी खेळताना दंग झाली आहे.

मथुरेला गोरस विकायला गेलेल्या गौळणी गोरस घ्या म्हणायचे सोडून गोविंदू घ्या, दामोदर घ्या म्हणतात तेव्हा मथुरेच्या नारी हसतात, अशी एक गौळण एकनाथांनी लिहिली आहे.

ऐक ऐक सखये बाई नवल मी सांगू काई
त्रैलोक्याचा धनी तो हा यशोदेसी म्हणतो आई

असा सुंदर मुखडा असणाऱ्या एका गौळणीत कृष्णलीलांचे वर्णन आले आहे.

असा कसा देवाचा देव बाई ठकडा
देव एका पायाने लंगडा।।

असे सुंदर ध्रुपद असलेली नाट्यपूर्ण गौळण एकनाथांनी लिहिली आहे. चोरून दहीदूध खातो, शिंकी मडकी फोडतो, हे तर आहेच, परंतु हा कृष्ण पंढरपुरी कीर्तनही करताना दिसतो.

वाळंवटी जातो, कीर्तन करतो
घेतो साधुसंतांशी झगडा।।

असे अभिनव चित्र एकनाथ रंगवितात. दुसऱ्या एका गौळणीत घरोघरी जाऊन 'माझा कृष्ण देखिला काय' असे विचारणारी वात्सल्यभक्ती करणारी यशोदा आली आहे.

भिंगाचे भिंगुले खांद्यावर अंगुले
नाचत तान्हुले यशोदेचे।।१।।
येती गौळणी करीती बुझावणी
लागती चरणीं कान्होबाच्या।।२।।

या सुंदर गौळणीत कृष्णरूपाचे वर्णन आले आहे.

'दिव्य तेज झळकती' या गौळणीत देवाच्या अलौकिक अनुभूतीचे वर्णन आले आहे. तो कानडा म्हणजे अगम्य आहे, तरी सुंदरही आहे. आतबाहेर उघडा आहे. त्याला अलिंगन देण्यासाठी मन

उतावीळ होते. आणि क्षेम देता मीपण जाते. त्याचा 'बाहेरी पाहू जाता अंतरी भासे' अशी समरसता अनुभवास येते. उच्च दर्जाच्या अभिव्यक्तीचा इथे प्रत्यय येतो.

'वारियाने कुंडल हाले, डोळे मोडित राधा चाले।।' ही एकनाथांची सर्वात सुंदर व लोकप्रिय गौळण आहे. या राधेला पाहून हरी भुलला आहे. तो बैलाची धार काढायला बसला आहे. दुसरीकडे कृष्णाला पाहून राधाही भुलली आहे. ती रिकामा डेरा घुसळत आहे. मन मनाला मिळाल्या नंतर जगाचे भान विसरले आहे.

एकनाथांची गौळण थेट आशय व्यक्त करणारी व नाट्यात्म रूप धारण करणारी आहे. पूर्वप्रभावाने तिचा रसपरिपोष झाला आहे. सांसारिकांचे मन रिझवणारी आणि भक्तीत एकरूप होण्याचे आवाहन करणारी ती आहे. कृष्णलीलांचे ओसंडते कौतुक एकनाथ प्रासादिक शैलीत मांडतात. त्यांच्या गौळणींविषयी वसंत जोशी म्हणतात, ''वारियाने कुंडल हाले। डोळे मोडित राधा चाले, अशा एखाद्या गौळणीपेक्षा त्यांची फारशी रसपूर्ण गीते आढळत नाहीत. बोधप्रधानता आणि वैचारिकता ही एकनाथांच्या काव्याची बैठक असल्याने असे घडले असावे. सूक्ष्म नाजूक शृंगाराच्या छटा त्यांच्या गौळणीत आढळत नाहीत.'' (मराठी गौळण, १९८८, पृ. २६)

२.३.९ संत तुकारामः चरित्र व काव्य

वारकरी संप्रदायातील अत्यंत प्रभावी व परखड कवी म्हणजे संत तुकाराम. त्यांचे पूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले-मोरे असे आहे. कार्यकाल इ. स. १५९८ ते १६४९ असा आहे. ज्या काळात पाच मुस्लिम सत्ता भारतावर राज्य करत होत्या आणि शिवशाहीचा अद्याप प्रारंभ व्हायचा होता, त्या काळात तुकाराम अभंगलेखन व उपदेश करीत होते. आत्यंतिक बंडखोरपणा हा त्यांचा विशेष होता. पारंपरिक सनातनी धर्मव्यवस्थेवर त्यांनी जोरदार प्रहार केले आणि जातिवंतांपासून अंत्यजांपर्यंत सर्वांसाठी वारकरी संप्रदायात मुक्तद्वार असल्याची घोषणा केली. सामान्य माणसांचे आचरण शुद्ध व परोपकारी असावे याकडे त्यांचा कटाक्ष होता. 'अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची' असे त्यांच्याबाबत म्हटले जाते. सुभाषितांसारखी सहज सोपी पण विचारप्रवर्तक रचना हे त्यांचे वैशिष्ट्य होय. शासकीय गाथामध्ये त्यांचे ४६४४ अभंग संकलित करण्यात आले आहेत. महाराष्ट्राचे सत्त्वशील जीवन उभे करण्यात वारकरी संप्रदायाचा त्यातल्या त्यात तुकारामांचा मोठा हातभार आहे.

२.३.१० तुकारामांच्या गौळणी

दंभ आणि ढोंगावर तुटून पडणारे तुकाराम गौळणीत मृदू आणि हळूवार होतात. कारण इथे स्त्रीमनाचा अविष्कार करावयाचा असतो. कृष्णरूपाची, मीलनाची ओढ लागलेली गौळण ही एक प्रकारे अभिसारिका असते. तिचे वागणे व्यभिचार गणले जाणे सहज शक्य असते. पण तुकाराम त्याला जीव-शिव भेटीची आध्यात्मिक डूब देतात. हे प्रेम प्रथम मानस पातळीवर, नंतर शारीर पातळीवर व शेवटी आत्मिक पातळीवर पोहोचते.

एका गौळणीला कृष्णविरहाचा अग्नी पोळतो आहे. तिच्या सख्या तिला थंडावा देण्याचा, तिची मदनबाधा कमी करण्याचा भाग म्हणून तिला शीतलोपचार देऊ पाहतात. तेव्हा ती म्हणते,

नका कांही उपचार माझ्या शरीरा

करूं न साहावे मज बहु होतो उबारा।

ती त्यांना स्पष्टपणे सांगते मनोजन्य व्यथेमुळे माझा देह तापला आहे. त्या नंदाच्या मुलाला लवकर आणा. या सख्या तिच्यासाठी प्राणप्रिय आहेत. म्हणूनच तिने मनीचा भाव त्यांना सांगितला आहे. अंगात सावळी प्रभा उमटली हेच तिच्या क्षोभाचे कारण आहे. ही गोष्ट इतर कोणालाही कळता कामा नये, उलट उत्कट एकांत लाभावा, असे तिला वाटते. असे भाग्य कोण्या काळी उदयास येईल हा प्रश्नच आहे. हळूहळू तिचे देहभान हरवते. डोळे उन्मीलित होतात. शेवटी तिचे मन कृष्णाच्या, परमेश्वराच्या चरणावर स्थिरावते. त्या दर्शनाने तिला पुन्हा जीवन प्राप्त होते.

दुसऱ्या एका गौळणीतही ही विरहाची भावना व्यक्त झाली आहे.

पडिली भुली धांवतें सैराट

छंद गोविंदाचा चोजविते वाट

अशी ती गोपिका म्हणते, तिचे मन कृष्णाने वेधले आहे. परंतु देहबुद्धी आड येते, असे तिला वाटते. मागीच सर्व चुका, दोष यांची कबुली दिल्यावर तुकयाचा स्वामी प्रकट होतो.

तुकारामांनी एक गौळण यशोदेच्या मुखी वदविली आहे. कृष्णाबद्दलच्या तक्रारींनी ती त्रासली आहे. आपल्या मुलाने शहाणे व्हावे, खोडकर असू नये, असे तिला वाटते. ती त्याला घरात कामात गुंतविते, पण तो हळूच नजर चुकवून बाहेर पळतो.

काय उणें कां करितोसी चोरी

किती सांगों तुज नाइकसी हरी।।

असे यशोदा म्हणते.

गोरस घेऊन निघालेल्या सात गौळणींची कथा एका गौळणीत आली आहे. कृष्ण त्यांची खोडी काढतो. त्यांच्या अंगाशी झटतो. तेव्हा त्या त्याला म्हणतात, ‘आम्ही परनारी आहोत. घरी पतीला कळले तर तुझे खरे नाही.’ तरी शेवटी तुकाराम म्हणतात, ज्या कृष्णाच्या हाती सापडल्या त्यांचा जन्ममरण फेरा चुकला.

हरी तुझी कांति रे सावळी

मी रे गोरी चांपेकळी।

असे म्हणणारी एक गौळण लोकनिंदेपासून वाचण्यासाठी कृष्णाला दूर हो म्हणते.

यशोदेकडे गाऱ्हाणे मांडण्यासाठी आलेल्या तरूण प्रौढ गौळणीचे एक प्रसंगचित्र तुकारामांनी मांडले आहे. त्या म्हणतात, ''तू जगावेगळे चोरटे पोरटे व्याली आहेत. तो दूध-दही-लोणी तर लुटतोच पण कन्यासुनांनाही नादवतो. त्याला नीट समजावून सांग, नाही तर जीव उरणार नाही.'' वैतागून यशोदा कृष्णाला त्यांच्या ताब्यात देते, तेव्हा कृष्णाला स्पर्श होताच त्याच्या तनमनात अमृताचा कल्लोळ वाढत जातो. त्यांचा देहभाव विसरतो.

अन्य एका गौळणीत कृष्णाने चित्त वेधल्याने कामातुर झालेल्या गोपिकांचे वर्णन येते. पाण्याच्या निमित्ताने त्या यमुनेकाठी येतात आणि कृष्णाला पाहातच राहतात. 'कोठे मी तुझा धरू गेलें संग। लावियेलें जग माझ्या पाठी।।' असे वर्णन दुसऱ्या एका गौळणीत येते. एका अर्थाने तिच्या मनाला लागलेला हा छंद कृष्णाचा आहे, तर दुसऱ्या अर्थाने प्रत्यक्ष परमेश्वराचा आहे.

कृष्णाला भुलून त्याच्यासवे रानीवनी भटकणारी एक गोपिका आपले वेगळेच निवेदन करताना दिसते.

कान्हो एकली रे एकली रे।

तुजसवे चुकले रे।

भय वाटे मनीं मज अबळा धाकली रे।।१।।

आई-वडील नको म्हणत असताना मी आले आहे. लोक असे म्हणत होते की ही वाट खरी नाही. तरी मला याची चटक लागली. समोर पिकलेल्या बोरी दिसल्या म्हणून मी पुढे गेले. इतक्यात कान्हा मागे कुठेतरी राहिला. त्याने माझी थट्टा करायचे ठरविले. शेवटी तुकोबा म्हणतात, आलेल्या वाटे जाऊ आणि हरी पाहू. या वाटेवर काटा टोचणार नाही. येथे सावळा विठ्ठल(कृष्ण) भक्तीच्या मार्गाकडे खचून घेतो. नंतर दिसेनासा होतो, असे सुचविले आहे. आई-वडील व इतर लोक या मार्गावरून जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात, पण एकदा हरीचा छंद लागला की मागे फिरणे होत नाही, असे तुकोबा सुचवितात.

तुकारामांच्या गौळणीतील काही गोपिका अत्यंत धीट आहेत. त्या हरीला अनुसरतात, पण त्यांचे एकत्र येणे हे फक्त शारीर पातळीवरचे नाही.

नव्हती देखिली म्यां वाट

म्हणोनी हा धीट संग केला।

असे ती म्हणते. या एकत्र येण्यातून जे व्हायचे ते होतेच. जीव-शिवाच्या मीलनातून दोघांनाही संपूर्णतः येते.

लोकापवाद, जननिंदा या कारणाने गोपींनी या मार्गावर येऊ नये, असेही तुकाराम म्हणतात. कारण हे कृष्णाचे (विठ्ठलाचे) वेड जगाच्या निंदेचे कारण घडते. तरीही या गौळणी पुढे येतात. त्यांना जननिंदेची बहिष्काराची चिंता नसते.

वाळो जन मज म्हणोत शिंदळी
परी हा वनमाळी न विसंबे।।

असा दृढभाव त्या व्यक्त करतात. लौकिक जीवनाबद्दल त्या उदास झाल्या आहेत. आणि स्वतःच्या जीवाबद्दलही त्यांना भय वाटेनासे झाले आहे. म्हणून लोकांचा उपदेश न ऐकता गोपी या मार्गावर येतात.

आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा।
म्हणोनि व्यभिचारा टेकलिये।।

असा अचंबित करणारा खुलासा एक गौळण करते. तो अनंत रात्रंदिवस जवळ असावा या भावनेतून तिने हा मार्ग स्वीकारला आहे.

एकदा या परमेश्वराजवळ आल्यावर परत माघारी फिरणे नाही. पट्टराणी असल्याप्रमाणे मी त्याच्या घरात शिरले आहे. एका सामर्थ्यवान पुरूषाचा अंगसंग झाल्यामुळे कसलीही भय-चिंता उरलेली नाही. असे असले तरी ही गौळण इतर सासुरवासिनी स्त्रियांना मात्र या मार्गावर येऊ नका म्हणते. कारण लोकांचे निंद्य बोलणे सहन होणार नाही, असे तिला वाटते. जे स्तुती-निंदेपासून उदास झाले आहेत, तेच या कृष्णासवे हिंडू शकतात, असे तुकाराम म्हणतात.

तुकारामांची गौळण शारीर अनुभवातून अलौकिक भक्तीकडे जाऊ पाहणारी आहे. समकाळातील चोरटे प्रेमसंबंध कवीने येथे प्रतीकात्मक पद्धतीने मांडले आहेत. स्त्री-पुरुष मीलनाचा उत्कट अनुभव, एकात्मता व तादात्म्य प्रत्यक्ष परब्रह्म भेटीशी नाते सांगू शकते. वास्तव जीवनानुभवाचा अत्यंत चांगला वापर त्यांनी अध्यात्मिक एकविधा भक्ती रुजविण्यासाठी केलेला दिसतो.

२.३.११ संत निळोबाः परिचय व काव्य

वारकरी संप्रदायातील अखेरचे संत म्हणजे निळोबा मकासरे होय. त्यांचे जन्मसाल ज्ञात नाही. त्यांनी इ. स. १७५३ मध्ये समाधी घेतली. संत तुकारामांना गुरूस्थानी मानून त्यांनी वारकरी संप्रदायाचा प्रचार प्रसार केला. त्याचा जन्म पुणे जिल्ह्यातील शिरूर इथे झाला, तर प्रवरा नदीकाठी पिंपळनेर येथे त्यांनी समाधी घेतली. 'सकलसंतगाथा' मध्ये त्यांचे १५७० अभंग उपलब्ध आहेत.

२.३.१२ निळोबांच्या गौळणी

निळोबांच्या गौळणी या कृष्णरूपाला, त्याच्या सहवासाला आसुसलेल्या आहेत. परंतु हे आसुसलेपण शृंगारासाठी नाही, तर प्रेमसुखासाठी आहे. त्यांनी मनोभावे कृष्णाला स्वीकारले आहे. जर हा हरी जन्मोजन्मी सोबत असेल तर आनंदाने गर्भवास सोसता येईल, मुक्तीची गरजच नाही, असे त्या सुखानंदाने भारलेल्या गौळणी म्हणतात.

धन्य प्रेमळा त्या रंगल्या श्रीरंगी
नेणती दुसरें वो संसारी विरागी।

अशी त्यांची अवस्था आहे. ज्याप्रमाणे मंदिरात मूर्तीची पूजा–अर्चा म्हणजेच अंगभोग असतात त्याप्रमाणे त्या गौळणी कृष्ण सहवासाचा आनंद लुटतात, तरीही त्या भोगातीता व सर्वदा निःसंग असतात. त्यांचे देहभान नाहीसे झालेले असते. त्या हरीरूपात विलीन होतात.

हरीचि होऊनि त्या हरीते भजती

हरिरूप झाली त्यांची अंगकांती।

अशी त्यांची एकरूप अवस्था होते. जणू काही त्या अद्वैताचा अनुभव घेतात. कृष्णाची छाया असल्याप्रमाणे त्यांचे वर्तन असते.

'यासी पाहता वो हृदयस्थ पाहिला' या गौळणीत निळोबांनी कृष्ण सहवासाने कोणता लाभ होतो, ते मांडले आहे. प्रत्येकाच्या हृदयमंदिरी एक कल्पित प्रतिमा असते, जिची आशा, अपेक्षा ती व्यक्ती करते. गौळणी जेव्हा कृष्णाला पाहतात, तेव्हा त्यांना हाच अनुभव येतो. त्यांचे कल्पित त्यांना साक्षात समोर दिसू लागते. त्याचे बोलणे म्हणजे साक्षात वेदवचन, त्याच्याशी खेळणे म्हणजे सर्व दोषांचे हरण, त्याला भोगणे (अनुभवणे) म्हणजे सर्व अडथळ्यांची समाप्ती होय. असा हा निजानंद परमात्मा श्रीहरी या भाग्यवंत संसारी स्त्रियांना सखा म्हणून लाभतो. तेव्हा त्या त्याला हृदयात धारण करतात. परमार्थ, सिद्धांत, पुरूषार्थ अशा सर्व गोष्टी त्याच्या संगतीने लाभतात. त्यामुळे जनीवनी फिरताना, भोजन किंवा शयन करताना त्याला सोबत घ्यावे, असे त्यांना वाटते. शेवटी त्यांच्या भावस्थितीविषयी निळोबा लिहितात.

ध्यानीं मनी जिवी ध्यातां या गोपाळा

गेल्या विसरोनिया संसार सोहळा वो।

येथे या गौळणी अभिन्न भावाने हरीचिंतन करतात. हरी संगतीचे सुख अनुभवतात असे दिसते. हे अवीट सुख जन्मोजन्मी लाभावे, अशीही त्यांची इच्छा आहे.

आत्यंतिक भक्तीने देवाला वश करणाऱ्या गौळणींचे वर्णन निळोबांनी पुढे एका गौळणीत केले आहे. 'भावभक्तिचिया प्रीति जेवविला' असा त्यांचा अधिकार आहे. तो सावळा या भक्तिप्रेमापोटी जेवतो. तृप्तीचा ढेकर देतो. भक्तिसुखाचा आनंद त्याच्या वाणीतून प्रकटतो. गोपींना वर देताना तो म्हणतो, 'पुन्हा नातळो हा तुम्हासि संसार वो।।'

निळोबांनी आपल्या गौळणीत शृगांर पूर्णतः टाळला आहे. या गौळणी कृष्णावर जीव लावतात, त्याला अनुसरतात. परंतु ही ओढ देहाची नसून मनाची आहे. वसंत जोशी या संदर्भात म्हणतात, ''निळोबांच्या गौळणीत कृष्णप्राप्तीचे समाधान, तृप्ती आढळते. सात्त्विक भावाने त्या श्रीकृष्णाच्या दैवी स्वरूपाचे गायन करतात. एका परीने ते एक कृष्णस्तोत्रच असते. सर्वव्यापक परब्रह्म सांगाती म्हणून आपण जोडल्याची धन्यता त्यांना वाटते. कृष्णाच्या ठायी अनादी, सर्वव्यापक मायेचे मूळ

कारण अशा परब्रह्माचा प्रत्यय गौळणींना येतो. त्याचे स्तवन त्या करतात.'' (मराठी गौळण १९८८, पृ. ३६)

२.३.१३ शाहीर रामजोशी परिचय

पंडितकवी व शाहीर या दोन परंपरांना जोडणारा दुवा म्हणजे रामजोशी होय. तो स्वतःला कविराय म्हणवितो. 'कविराय चमकला हीर, इतर शाहीर काजवे' असे त्याचे प्रतिपादन आहे. त्याचा जन्म सुमारे इ. स. १७५८ चा. सोलापूर हे मूळ गाव. वडील जगन्नाथ जोशी व चुलते अनंत जोशी दोघेही वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण. रामजोशींचा थोरला भाऊ मुद्‌गल हाही शास्त्रात पारंगत व व्युत्पन्न कवी. असा बुद्धीचा व प्रतिभेचा वारसा घरातून बालपणीच मिळाला. परंतु त्याची वृत्ती उनाडक्या करण्याची. त्याच्या घराशेजारी असणाऱ्या धोंडिंबा शाहिराच्या फडातच तो अधिक रमायचा. तेथे बैठक मारून लावण्या लिहिण्यात त्याला मौज वाटायची. त्याच्या या स्वच्छंदी वागण्याची भावाला चीड यायची. शेवटी भावाने इ. स. १७७८ मध्ये त्याच्याशी फारकत घेतली. मग रामजोशीला वाईट दिवस आले. तो पंढरपुरी गेला व तेथे वे. शा. सं. बाबा पाध्ये यांच्याकडे अध्ययनास राहिला. काही वर्षात तेथे विद्या संपादन करून एक विद्वान कीर्तनकार म्हणून तो सोलापूरात परतला. थोड्याच काळात त्याने मोठे नाव कमावले. महाराष्ट्रभर कीर्तने देत फिरला. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत पुणेकरांवर व खुद्द पेशव्यांवर त्याचा मोठा प्रभाव होता. बाजीरावाकडून त्याला दरमहा २५ रूपयांची वृत्ती आणि प्रत्येक कथा कीर्तनाच्यावेळी कमीत कमी १००० रू. मिळाल्याची नोंद आहे. परंतु रामजोशीने ही संपत्ती टिकविली नाही. कीर्तनासाठी गावोगाव फिरताना त्याचे राहणीमान विलासी होते. चिमा नायकीण नावाची उपस्त्री, मोठा शिष्यपरिवार, घोडी, कुत्री, माकडे, राघू असा लवाजमा घेऊन तो हिंडायचा. परिणामी त्यास दारिद्र्य आले. शेवटी त्याची काशीस जाण्याची इच्छा अपुरीच राहिली. बयाबाईचा त्याच्या जीवनातील प्रवेश महत्त्वपूर्ण ठरला. रामजोशीच्या अनेक लावण्या तिने सुंदर चालीवर म्हटल्या. इ. स. १८१३ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

२.३.१४ रामजोशीच्या गौळणी

रामजोशी हा वेदशास्त्रसंपन्न असल्याने त्याच्या काव्यावर संस्कृतचा प्रभाव होता. पंडिती वळणाचे काव्य त्याने मोठ्या प्रमाणात लिहिले. कल्पनारम्यता, नाट्यात्मकता यांनी त्याचे काव्य नटले आहे. वसंत ऋतूतील उत्सवात घडलेल्या कृष्णलीलांचे वर्णन करणारा काव्यप्रकार म्हणजे होरी होय. विशेषतः होळी नंतरचा रंगोत्सव इथे अभिप्रेत आहे. या होरीकाव्यात कवीने एक अभिनव कल्पना केली आहे.

कुंजात मधुप गुंजारव यमुनातटी।
होरी खेळतो हरी
करूनि राधा नट आपण नटी।।

निसर्गात फुले-वेली फुलल्या आहेत. आकाशात देवललनांची दाटी झाली आहे. पखवाज, खंजिरी, बासरी अशी वाद्ये वाजत आहेत. गोपी नृत्यात रंगल्या आहेत. अशावेळी 'रूपरम्य राधेचे राधावल्लभ आपण धरी', म्हणजे कृष्ण राधेचे रूप धारण करतो. मग 'कवण राधिकापति कवण राधा हे न कळे' अशी स्थिती होते. एक वेगळाच आनंद अनुभवास येतो.

इकडे राधाही कृष्णाचे रूप धारण करते. 'श्रीहरीचे वयरूप धरूनि राधा नट नागरधणी। पीतवसन बासुरी मुगुट शिरी तिळभर नाही उणी।' अशा मदनमूर्ती धारण करून ती नृत्य करते. शुक्राच्या चांदणीसारखी चमकते. स्त्रिया तिला ओळखत नाहीत. नयनबाण मारतात. काही सांगू पाहतात. तर तिकडे राधिकारूपी हरीला कुणी पुरुष जवळ ओढू लागतात. रासरंग वाढत जातो. मुली रंगात न्हातात. कृष्ण झालेल्या राधेचे चाळे पाहून सत्यभामा रूसते. अष्टनायिका कृष्ण म्हणून राधेला कवटाळू लागतात. कुणी त्याचे मुखचुंबन घेते. इतक्यात कुणीतरी सत्यभामेला येऊन सांगते, कपटी राधा तुझी समजून काढायला येईल. सावध राहा.

भामा रूसली हे कृष्णाला कळते. तो वेश पालटून तिच्या महाली पोहोचतो. तेव्हा ती म्हणते, हे सवती, माझ्यापुढे सोंग मिरवू नकोस. त्या कपटी कृष्णाचे रूप धरून तू किती जणींना कवटाळलेस आणि आता मला ठकवण्यास आलीस होय. हे ऐकून कृष्णाला काय करावे सुचत नाही. तो म्हणतो ''मीच खरा कृष्ण आहे. सखे संशय धरू नको फारसा. वाटले तर क्षणभर स्त्रीसुख घे. हातच्या काकणाला आरसा कशाला.'' अशाप्रकारची ही कृष्णाची होरी रामजोशीने रंगविली आहे.

'छेकापन्हुती' ही रामजोशीची अत्यंत सुंदर अशी रचना आहे. द्व्यर्थी शब्दरचना करून मूळ आशय झाकण्याचा यशस्वी प्रयोग इथे कवी करतो. ही वृत्ती मूळची स्त्रियांची आहे, असे सांगून राधा व सखीच्या संवादातून नर्मविनोद साधणारी ही गौळण कवीने लिहिली आहे. अपन्हुती म्हणजे झाकणे, दडवणे. छेकापन्हुती म्हणजे अंतरंग लपवणे होय. येथे राधा सखीला खुबीने काही गोष्टी सांगते, परंतु मूळ आशय दडवते, असे दिसते.

अंबरगतपरि पयोधरातें रगडुनि पळतो दुरी
काय हा धीट म्हणावा तरी। (राधा)
तो नंदाचा मूल काय गे सांग कन्हया हरी। (सखी)
नव्हे गे मारूत मेघोदरी।। (राधा)

असे हे संवाद आहेत. राधा म्हणते, 'अंबरात असणाऱ्या परोधरांना रगडून दूर पळतो. किती धीट म्हणावा हा!' येथे अंबर म्हणजे आकाश किंवा वस्त्र, तसेच पयोधर म्हणजे मेघ किंवा स्तन होय. सखी विचारते, 'तो नंदाचा मुलगा कन्हैया काय ग?' त्यावर चतुराईने राधा म्हणते, 'नव्हे ग तो मेघांमधून वाहणारा वारा आहे.'

असे द्व्यर्थी संवाद पुढे येत राहतात. सासूसासरा पती यांच्या समोर ओठातील माधुर्य चाखणारा-भुंगा, सुवर्ण (चांगला वर्ण) पाहून रात्री अंगावर हात टाकणारा-चोर, प्रणयेच्छा पूर्ण

करणारा सखा-पती, छातीवर लोळणारा-हार, अंगमर्दन करणारा-सखीचा हात, स्वतः श्रम घेऊन माझा ताप कमी करणारा-पंखा, असे अनेक द्व्यर्थी संवाद घडतात. स्वतःचा आनंद तर सांगायचा पण कृष्णाचे नाव उघड होऊ द्यायचे नाही, असा हा प्रकार आहे.

'बाई नको जाऊ यमुनातिरी' या गौळणीत कवीने कृष्णाचा खोडीलपणा वर्णिला आहे. तो वेणू वाजवून आणि गोड बोलून भुलवितो. त्याच्यावर कोणाचा धाक नाही. उलट सगळ्या गौळणींवर त्याचा शिक्का आहे. नीती नावाची गोष्ट त्याच्याजवळ नाही. त्याला पाहताच तुलाही भावना आवरणार नाहीत. त्याने गोकुळनगरी भुलवली आहे. असे नाजूक रूपसुंदर सासुरवाशीन तरूणीस सांगितले जाते.

'श्रीरंग गोपिकोत्संग' या गौळणीत वसंतोत्सवात रासक्रीडा करणाऱ्या कृष्णाचे, रुसलेल्या सत्यभामेचे वर्णन आले आहे. साक्षात मदन असणारा कृष्ण अनेक गोपींना रतिसुख देतो. आपणही ते घेतले पाहिजे असे कृष्णपत्नी म्हणताना दिसते.

एकंदर, रामजोशींच्या गौळणी त्यांच्या स्वभावानुसार अवतरल्या आहेत. चोरटे प्रेमसंबंध आणि शृगांर याला या गौळणीत स्थान आहे. लावणी व तमाशात जे लोकरंजन असते, त्या दिशेने जाणाऱ्या या गौळणी आहेत. वास्तव लौकिक भावभावनांचे दर्शन कवीने इथे घडविले आहे. रामजोशीच्या गौळणीत कृष्ण मानवी पातळीवर उतरतो. तो दांडगाई करणारा आणि मर्यादा सोडणारा आहे.

२.३.१५ होनाजी बाळा परिचय

उत्तर पेशवाईत अत्यंत गाजलेला शाहीर अशी होनाजी बाळाची ओळख आहे. होनाजी सयाजी शिलारखाने गवळी घराण्यातील होता. त्याचा जोडीदार बाळा करंजकर हा शिंपी होता. होनाजी लिहायचा. बाळा गायचा त्या दोघांची जोडी प्रसिद्ध होती. त्यामुळेच पुढे होनाजीने होनाजी बाळा असे नामभिधान स्वीकारले. होनाजीचे आजोबा साताप्पा शिलारखाने हे अत्यंत मातब्बर तमासगीर व शाहीर होते. त्यांस पेशव्यांचा आश्रय होता. होनाजीचा चुलता बाळा हाही नावाजलेला तमासगीर व कवी होता. घराण्याचे संस्कार घेऊन होनाजीचे लेखनकर्तृत्व बहरले. सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत त्याला पेशव्यांचा आश्रय मिळाला. (इ. स. १७७४ ते १७९६) रंगाचा दरबार, खर्ड्याची लढाई या प्रसंगावरील त्याचे पोवाडे याच काळातले. पुढे बाजीरावाच्या कारकिर्दीत (इ. स. १७९६ ते १८१८) तो लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचला. त्याच्यावर दुसऱ्या बाजीरावाची मर्जी होती. होनाजीने रागदारीवर आधारीत चालीवर लावण्या लिहिल्या. त्यामुळे बैठकीच्या लावणीचा घरंदाजपणा सुरू झाला. त्याच्यामुळे कलावंतीनींना फडावरील लावण्या बाजूस सारून बाळाच्या शांत स्वरातील लावण्या शिकाव्या लागल्या. 'घनः श्यामसुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला,' ही अभिजात भूपाळी लिहून होनाजीने मराठीच्या प्रांगणात मांगल्याचे शिंपण केले. त्याला पेशव्यांकडून भरपूर संपत्ती मिळाली. ती त्याने त्र्यंबकजी डेंगळ्याच्या वाड्यात साठवून ठेवली. परंतु मध्येच त्र्यंबकजी डेंगळ्याची संपत्ती लुटली गेली. त्यामध्ये होनाजीचीही संपत्ती लुटली गेली. पुढे होनाजीला दारिद्र्य आले. शेवटी त्याला

बडोद्याच्या सयाजीराव गायकवाड महाराजांकडून दरसाल दोनशे रूपयांचे वर्षासन मिळाले. होनाजीचा अंत दुःखद झाला. त्याचा खून झाला.

२.३.१६ होनाजीच्या गौळणी

होनाजीच्या गौळणी घरंदाज आहेत. त्यात प्रेम आहे, पण शृगांर नाही. त्यात अवखळ खट्याळपणा आहे. विरह, रूसवा, संशय, तक्रार अशा अनेक भावछटा येथे व्यक्त झाल्या आहेत. प्रेमाचे शालीन रंग या गौळणीतून व्यक्त झाले आहेत. लटक्या रागातून प्रेमाचे दर्शन घडले आहे.

'राधा म्हणे श्रीहरी तुम्ही रात्री होता कोणे ठाई।' या गौळणीत पहाटे डोळे चोळीत घरी आलेल्या कृष्णाला राधा प्रश्न विचारीत आहे. गोकुळात तुम्हाला अनेक गवळ्यांच्या मुली नववधू म्हणून उपलब्ध आहेत. तर रात्रीचे चार प्रहर तुम्ही कुठे होता? त्यावर कृष्ण उत्तरतो, ''माझी पवळी गाय कुठेतरी हरवली. तिला शोधण्यात रात्र गेली. त्यामुळे डोळे लाल आणि चेहरा उतरलेला दिसतो.''

राधा म्हणते, ''डोक्यावरचा मंदिल रूळलेला दिसतो, शिरपेच मोकळा दिसतो, वस्त्रांना सुगंध येतो, ओठ सुकलेले दिसतात, गालाला अंजन लागलेले दिसते. या सर्वाचे कारण काय?'' तेव्हा कृष्ण उत्तरतो, ''फुले आणण्यासाठी दुपारी मळ्यात गेलो, तर मध्येच पाऊस सुरू झाला. तिथेच झाडाखाली थांबलो. तेव्हा फुलांवरून सुगंधी थेंब अंगावर पडले. गाई शोधून ओठ सुकले. झाडात अडकून मंदिल-शिरपेच विस्कटले.'' अशा प्रकारची नर्म-विनोद असणारी प्रश्नोत्तरे या गौळणीत येतात. शेवटी होनाजी म्हणतो, 'जो चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे यांना नीट कळला नाही, तो राधेस कसा कळेल?'

दुसऱ्या गौळणीत यशोदेला बालकृष्ण फार दमवतो आहे आणि ती राधेला त्याला उचलून घरी घेऊन जा म्हणते.

'सांगा हा मुंकुद बाई कोणी पाहिला' या गौळणीत अचानक गोकुळातून कृष्ण नाहीसा झाल्यामुळे वेडावलेल्या गोपिकांचे भावविश्व आले आहे. तो रात्रीच नाहीसा झाला. त्यामुळे त्या सैरभैर झाल्या आहेत.

'श्रीरंगा कमलाकांता हरी पदराते सोड' या गौळणीत बाजारी चालेल्या व्रजनारींना कृष्ण अडवितो व त्या सोडण्याची विनंती करतात. घरी सासू-पती वाट पाहत आहेत. वाटले तर आम्ही तुला काही दान देतो पण आम्हाला लवकर सोड, असे त्या म्हणतात. आम्ही पतिव्रता आहोत आणि तू वाईट खोड शिकला आहेस, असे त्या म्हणतात. शेवटी शरणागत झालेल्या त्या गोपींना कृष्ण महाली घेऊन येतो.

अशाप्रकारे होनाजीने कृष्ण-राधा किंवा कृष्ण-गोपी प्रेमाची विविध वर्णने आपल्या गौळणीत केली आहेत.

२.३.१७ शाहीर प्रभाकर परिचय

प्रभाकर जनार्दन दातार. जन्मगाव गंगापूर (जि. नाशिक) जन्म अंदाजे सन १७५५. वयाच्या वीस-बाविसाव्या वर्षी पुण्यात येऊन कारकुनी पत्करली. इथेच त्याचा तमाशाच्या जगाशी संबंध आला. त्यावेळी पेशवाईत शाहीर गंगू हैबतीचा फड गाजत होता. हा शाहीर व त्याच फडातील गुणिराज, महादबा सुतार यांच्याशी प्रभाकरचा परिचय झाला. पुढे प्रभाकर कवणे रचू लागला आणि गंगू हैबती ती सादर करू लागला. सवाई माधवरावांच्या कारकिर्दीत रंगाचा मोठा समारंभ झाला होता. त्यावरील प्रभाकराचा पोवाडा पेशव्यांनी दरबारात गाऊन घेतला. पुढे दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत प्रभाकराची लोकप्रियता कळसास पोहोचली. पेशवाई बुडाल्यावर प्रभाकरास हालाखीची परिस्थिती आली. कोणाही धनिकावर कवण रचावे व सादर करावे, असे करण्याची वेळ आली. इ. स. १८४३ साली त्याचा मृत्यू झाला. उत्तर पेशवाईतील विलासी जीवन व रंगढंग त्याने जवळून पाहिले होते. त्यामुळे त्याचे चित्रण त्याच्या काव्यात आढळते. त्याच्या लावण्यांतील उत्तान शृंगाराचे हेच कारण आहे.

२.३.१८ प्रभाकराच्या गौळणी

'रडताना हृषिकेशी बाई माझा राहिना' ही गौळण वात्सल्य रसाचे दर्शन घडविते. श्रीकृष्ण हा यशोदेसाठी एक सामान्य बालकच आहे. त्याचे दैवी अलौकिक व्यक्तिमत्त्व तिच्या ध्यानी-मनी नाही. ही एका सामान्य स्त्रीप्रमाणे आपल्या रडणाऱ्या मुलाविषयी चिंतित आहे. तिला वाटते हा दूध पित नाही. याला दृष्ट झाली असावी. तो दचकून तीन तीनदा उठतो. त्याला कानफाट्याच्या हातून काही अंगारा केला पाहिजे, वगैरे गोष्टी इथे येतात. प्रभाकराच्या समकाळात सामान्य गृहिणी आपल्या मुलांसाठी जे करत असतील, ते सर्व इथे यशोदा करताना दिसते.

'वेडे करी विचरतां घरीं, हरी तुझी मुरली' ही नितांतसुंदर गौळण आहे. कृष्णाच्या बासरीने गोपींना वेडे केले आहे. त्यांचे भान हरपून जाते. त्या कामधंदा विसरतात. त्यांच्या हातातील काम तसेच राहते. त्या नादलुब्ध होतात.

वेणी सुमने गुंफिता, शिरीं राहिला हात।

नादें अंबर कोंदलें वाटे जाहली रात।।

अशी त्यांची अवस्था होते. त्या बासरीच्या अलौकिक मोहिनीने वेडावतात. साजशृंगार करणेही त्यांना नीट जमत नाही. कपाळाला अंजन, डोळ्यात कुंकू अशी त्यांची अवस्था होते. लहान-मोठ्या सगळ्या स्त्रियांची हीच अवस्था होते. त्या कुंजवनी धावतात गोपीच नव्हे तर ऋषी-मुनी व निसर्ग या सगळ्यांवर वेणुनादाचा प्रभाव पडतो आणि ते आपापली कर्मे विसरतात, असे प्रभाकर लिहितो. श्रीकृष्ण या व्यक्तिरेखेचा प्रभाव असा बहुस्तरीय, सर्वात्मक होतो, हे क्वचितच कोण्या कवीने मांडले आहे. शृंगाराला दूर सारत ही प्रीतिभावना व्यक्त होते.

२.३.१९ शाहीर परशराम परिचय

शाहीर परशरामाचा जन्म अंदाजे इ. स. १७५४ चा एका शिंपी कुटुंबातला. त्यांचे मूळ गाव वावी (ता. सिन्नर) शिवणकाम करता करताच तो तमाशाकडे वळला. त्याला बाबा सातभाई, मलुराज, नारायण, भवानी तेली उर्फ बाकेराव यांची साथ मिळाली. लवकरच तो रामजोशी, अनंतफंदी यांच्यापेक्षाही प्रसिद्ध झाला. इ. स. १८०८ च्या दरम्यान त्याचा तमाशा पुण्यात आला. एकदा बाजीराव पेशव्यांचा मुक्काम कोपरगावात असताना त्यांच्या सोबत सगनभाऊ, होनाजी बाळा, धोंडी महत्या इ. तमासगीर होते. त्यावेळी त्रिंबकजी डेंगळेंनी निरोप्या पाठवून परशरामास तमाशासह बोलावून घेतले. तेव्हा होनाजीने गंगेवरील एक कवण सादर केले. तत्काळ परशरामाने 'पश्चिमवाहिनी गोदा, प्रतिमूळ गंगा' ही लावणी म्हणून दाखविली. त्यावेळी त्याने केलेली पेशव्यांची स्तुती ऐकून बाजीराव खूष झाले व त्याला जहागीर देऊ लागले. परंतु स्वाभिमानी परशराम उत्तरला,

पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा
महाल मोकासे जहरी वळसे करितील अपुला बंदा
सुईदोऱ्याला हयात असो द्या तोचि इनाम मोकासा
निज कर्मी नर रत झाल्यावर काय उणा मग त्या पैसा

पेशवाई नंतरच्या काळात त्याने इंदोर, ग्वाल्हेर, बडोदे अशा उत्तरेत मोहिमा केल्या. तिकडे त्याची पुष्कळ वहाव्वा झाली. असे म्हणतात की त्यांना मृत्यूचे पूर्वसूचन चार दिवस आधी झाले होते. मृत्यूच्या आदल्या दिवशी त्याने बाकेराव, गोविंदा सोनार यांचेकडून लावण्या म्हणवून घेतल्या. दुसरे दिवशी देह ठेवला. निर्व्यसनी, निःस्पृह, स्वाभिमानी असे त्याचे व्यक्तिमत्त्व होते. त्याने आयुष्यभर कपडे शिवण्याचा धंदा केला. सात्विक व पवित्र वागणूक ठेवली.

२.३.२० परशरामाच्या गौळणी

'मी चांगट फांकडी रूपाने', या गौळणीतील गोपिका ही भलतीच धीट आहे. मथुरेच्या बाजारी चाललेल्या गोपीची वाट कृष्ण व त्याच्या सवंगड्यांनी आडवली आहे. त्यावेळी ही मोठ्या तोऱ्यात त्यालाच दरडावते आहे.

वय तरण्या, आम्ही गरती देखण्या, एकीहून एक रूपचढी,
वाट सोड आज हाट मथुरेचा आहे, जाणे तातडी।।

असे ती म्हणते. दही-दूधाच्या कावडी, माठ भरून नेत असताना हे आडवे आले आहेत. तेव्हा ती त्यांना दुरूनच बोलण्यास सांगते.

भीड नंदाची म्हणून गय केली मुरवत धरली जरा।
कान कातरून हाती देईन मुकाच जाशिल घरा।।

असा दम ती भरते. गळ्यात फुलमाळा, डोक्यावर मोरपीस आणि हातात बासरी घेऊन कशाला मिरवतोस. काणे-कुबडे सवंगडी जमवून धिटाई करू नकोस. दुरून बोल. माझ्याकडे नजर वाकडी करून पाहण्याची हिम्मत कोणाची आहे? असे ती म्हणू लागते.

येथे परशरामाने रोखठोक व रांगडी भाषा वापरली आहे. काही फारसी भाषेतील शब्द योजले आहेत. येथे गोपी विरोधभक्ती करत आहे. मनातून हरी भेटावा वाटतो, पण वरकरणी ती त्याला झिडकारते, असे दिसते.

२.३.२१ शाहीर पठ्ठे बापूराव

पठ्ठे बापूराव (जन्म ११ नोव्हें., १८६६ मृत्यू २२ डिसें., १९४५) पूर्ण नाव- श्रीधर कृष्ण कुलकर्णी जन्मगाव रेठरे हरणाक्ष (ता. वाळवा, जि. सांगली) इंग्रजी चौथी पाचवी पर्यंत शिक्षण झाले होते. यथासमय लग्नही झाले. परंतु त्यांनी तमाशाच्या आवडीमुळे संसार सोडला. स्वतःचा फड उभा केला. त्यांच्या फडात पवळा नावाची सुंदर नर्तिका होती. तिच्या प्रेमाने पठ्ठे बापूरावांची लेखणी बहरली. गण, गौळण, भेदिक, लावणी अशा सर्व प्रकारात त्यांनी विपुल लेखन केले. आजही अनेक फडातून त्यांच्या लावण्या सादर होतात. त्यांच्या आयुष्यातून पवळा निघून गेली. त्यांचा तमाशा बसला. पुणे येथे त्यांचा मृत्यू झाला.

श्रेष्ठ वर्ण मी ब्राह्मण असुनि सोवळे ठेवले घालुनि घडी
हाती घेतली मशाल तमाशाची लाज लावली देशोधडी

असे स्वतःचे वर्णन ते मोठ्या अभिमानाने करतात. रंगबाजी हा प्रकार तमाशात सुरू करण्याचे श्रेय त्यांचेच. त्यांची मुंबईची लावणी प्रसिद्ध आहे.

२.३.२२ पठ्ठे बापूरावांच्या गौळणी

पठ्ठे बापूरावांच्या गौळणी शृंगाराच्या विविध छटांचे दर्शन घडवितात. 'मी लाजुन धरिते करा' या गौळणीत उत्तान शृंगाराचे सूचन आले आहे. येथील गोपी जरी लाजून हात धरते म्हणत असली, तरी ती स्वतः कामविव्हल आहे. कृष्णाने तिला तृप्त करावे, बहुरंगी अनुभव द्यावा, असे तिला वाटते. ती त्याला शयनमंदिरी बोलावते. तिथे विलासी थाट केला आहे. ती म्हणते,

चार प्रहरावरचा संग
मधे रंगाचा नको बेरंग
सारी रात्र होउनी निःसंग
करा वाटेल तेवढे ढंग

ती त्याला लाजू नका म्हणते, 'चौऱ्यांशी तऱ्हेच्या चवी, चाल दावा एक एक नवी' असेही म्हणते. रसभंग करू नका असे तिचे सांगणे आहे. इथे पठ्ठे बापूरावांनी शृंगाराचे मीलनाचे खुले आव्हान व्यक्त केले आहे. पेशवाईत भोगविलासाला राजमान्यता मिळाली होती. त्याचा हा उघड परिणाम असावा.

'ह्याने फोडिला गे चुडा' या गौळणीत गोपी कृष्णाची तक्रार करताना दिसते. तिच्या पदराला झोंबणारा हा कृष्ण कानडा म्हणजे न कळणारा आहे, असे ती म्हणते. 'पाहू वाजव वेणू' या गौळणीत एक नवथर गोपी कृष्णाला वेणू वाजवायला सांगते. तो वेणुनाद ऐकून तिचा नवा कोरा डेरा पाझरतो. तिच्या प्रेमभावना अनावर होतात. तरीही ती म्हणते, मला बाजाराला वेळ झाला आहे. चंद्रावळ किंवा राधा सहज फसल्या तशी मी फसणार नाही.

याशिवाय पदर धरणाऱ्या आणि गेंद चुरणाऱ्या कृष्णाची तक्रार करणारी गौळण आहे. कृष्णाच्या मुरलीने भुललेल्या राधेचे वर्णन आहे. सकाळ-संध्याकाळ आळीमाळीत हिंडून कळ काढणाऱ्या कृष्णाबद्दल तक्रार आहे. साऱ्या गावाला दमविणारा हा कृष्ण उद्या कंसाची होळी करेल असेही ती म्हणते. अशाप्रकारे पठ्ठे बापूरावांनी गोपींचे कृष्णाप्रती असणारे विविध भाव वर्णिले आहेत.

२.३.२३ कवी मध्वमुनीश्वर परिचय

पेशवाईत एका बाजूस शौर्य व पराक्रम होता, तर दुसऱ्या बाजूस विलासी जगणे होते. त्याचा प्रभाव तत्कालीन लोकजीवनावर पडला. तत्त्वज्ञानपर वाङ्मय मागे पडले आणि पदे, आख्याने, कटाव, लावणी, गौळणी यांनी त्याची जागा घेतली. याचकाळात मात्रावृत्तात्मक गेय रचना करणारे कीर्तनकार मध्यमुनी उदयास आले. त्यांचा जीवितकाल अंदाजे इ. स. १६८९ ते १७३१ असा आहे. त्यांचे मूळ नाव त्र्यंबक होते. मध्वाचार्यांनी त्यांना आशीर्वाद दिला व नाव बदलले. पंडितकाव्य व शाहिरी काव्य यांचा समन्वय त्यांच्या काव्यात दिसतो. त्यांचे मूळ गाव नाशिक होते. त्यांनी १७३१ मध्ये औरंगाबादनजिक सेंदूरवाड्यास समाधी घेतली.

२.३.२४ मध्वमुनीश्वरांच्या गौळणी

'याचे हातींचा वेणु कुणी घ्या गे' या गौळणीत विवाहित गोपीच्या भावना व्यक्त झाल्या आहेत. कृष्ण बासरी वाजवितो. त्या नादाला लुब्ध होऊन कामधंदा विसरला जातो. तान्हे बालक घरी टाकून ती बाहेर धावते. घरात जावानणंदांचा जाच आहे, तरी तिचे वागणे बहकते. संसाराचा ठावठिकाणा राहात नाही. म्हणून ती म्हणते,

> वेणु नोहे हा विष मला वाटे
> नाद एकोनी काम मनीं दाटे

मध्वमुनींची दुसरी गौळणही कृष्णाची तक्रार करणारी आहे. हा गोपाळ नाटकी आहे. तो त्रिभुवनाचा सांभाळ करतो. परंतु गोकुळी लहानसा बाळ दिसतो. त्याची मुरली चेटूक करते. प्रेमपाशी अडकवते. म्हणून ती म्हणते,

> कृष्णे मोहित मज केलें।
> माझें माणुसपण गेलें।।

मध्वमुनींच्या गौळणी प्रासादिक आहेत. कृष्णाने वेडावलेले गोपींचे मन त्यांच्या गौळणीतून व्यक्त होत राहते.

२.३.२५ कवी अमृतराय : परिचय व काव्य

अमृतराय यांचा जीवितकाल इ. स. १६९८-१७५३ मानला जातो. ते प्रसिद्ध कीर्तनकार होते. त्यांचे मराठी, हिंदी, फार्सी, संस्कृत भाषांवर प्रभुत्व होते. बुलढाणा जिल्ह्यातील फतेखेरडा(साखरखेरडा) हे त्यांचे गाव. त्यांनी ध्रुव, शुक्र, सुदाम यांची पद्य चरित्रे लिहिली. याशिवाय आख्यानपर कविता, स्फुट रचना व पदे लिहिली. मराठीत प्रथम कटाव या काव्यप्रकाराचा वापर त्यांनीच केला. त्यांच्या काव्यातील रागादिकांच्या उल्लेखावरून ते संगीतज्ञ असावेत, असे दिसते. त्यांची समाधी औरगांबाद येथे आहे. 'महाराष्ट्र कवी अमृतराय कृत कवितासंग्रह' या पुस्तकात त्यांच्या सगळ्या रचना एकत्रित करण्यात आल्या आहेत. (मराठी विश्वकोश, खंड १ पृ. ३६९-३७०)

'नेऊ नको यदुवीर अक्रुरा' या गौळणीत कृष्णाला गोकुळातून मथुरेला घेऊन जाण्याचा प्रसंग आला आहे. कंसमामा अक्रूर हा आपला दूत पाठवून कृष्णाला बोलावून घेता. तेव्हा नंदराजा आणि यशोमति त्या अक्रुराला विनवणी करतात. कृष्णाला नेऊ नको, कारण तो कंस दुरात्मा घातकी व कपटी आहे. गोपीही एकत्र येऊन विनवणी करत राहतात. तरीही अक्रूर कृष्णाला रथावर नेतो, तेव्हा

गोपी विरहे व्याकुळ होती
नयनीं झिरपिति नीर।।

अशी त्यांची अवस्था होते.

२.३.२६ कवी रमणात्मज

'आणा ना यदुराज' या गौळणीत रमणात्मज हे गोपिकेचा विरहभाव व्यक्त करतात. तो भेटावा अशी तिच्या जिवाची तगमग आहे.

वेळ नका बहु लावुं
तयाविण राहिना जीव आज

अशी ती म्हणते. तिला वियोग-सहन होत नाही, असे दिसते. तिच्या रूपाने कवी आपलीच भावना व्यक्त करताना दिसतो.

२.३.२७ कवी कृष्णकिंकर :

कवी कृष्णकिंकर यांच्या 'भक्तजना सांभाळी सावळ्या' या गौळणीत कृष्णाच्या रूप गुणांचे वर्णन आले आहे. अत्यंत सहज शैलीत ही गौळण उतरली आहे. खरे तर इथे गोपीची भावना व्यक्त झालेली नाही, तर कवीचाच देवाशी संवाद आहे. हे सावळ्या, कृपादृष्टीने पाहा. कदंबातळी त्याचे आसन आहे. तिथेच तो वेणुवादन करतोय. मोर, मुगुट शिरावर आहे. त्याने कामक्रोध रूपी कालियाला पायातळी रगडले आहेत. तो एका बाजूस दहीभात खातो तर दुसऱ्या बाजूस असुरांचा नाश करतो, असे वर्णन कृष्णकिंकर करतात.

२.३.२८ कवी माणिक प्रभू : परिचय व काव्य

माणिक प्रभू (इ. स. १८१७ ते १८६५) कर्नाटकातील लाडवेती (ता. कल्याण) येथे जन्म. पूर्ण नाव माणिक मनोहर हरकुडे. ते दत्तोपासक होते. त्यांनी 'सकलमतसंप्रदाय' स्थापन केला. त्यामध्ये विविध धर्म व पंथांच्या तत्त्वांचा समन्वय साधण्यात आला होता. सगळे धर्म व संप्रदाय आपापल्या अनुयायांना ईश्वरप्राप्तीप्रत पोहचवितात. सर्व देवता एकरूप आहेत. त्यामुळे एका विशिष्ट देवतेचा व त्याच्या मंत्रांचा आग्रह धरणे योग्य नव्हे. श्रीचैतन्यदेव हे त्यांच्या संप्रदायाचे उपास्य दैवत होय. माणिक प्रभूंना मराठी, संस्कृत, कन्नड, हिंदी, उर्दू, फारसी या भाषा अवगत होत्या. त्यांनी मराठी, हिंदी व कन्नड मधून अनेक पदे लिहिली. माणिक प्रभू संस्थानाने 'पद्ममाला' नावाने त्यांच्या रचना संग्रहित केल्या आहेत. त्यांनी इ. स. १८६५ मध्ये जिवंत समाधी घेतली. (मराठी विश्वकोश खंड १३ पृ. १८०)

माणिक प्रभूंच्या गौळणीत विरह भावना प्रकटली आहे. यशोदेचा सुकुमार आता नयनी दाखवा. सावळी सुंदर मूर्ती पितांबर नेसली आहे. त्याचे रूप सुंदर व अनिवार आहे. यमुनातीरी तो गाईगुरे घेऊन गेला आहे. त्याला लवकर भेटवा, असे ही गौळण म्हणत आहे. तसेच माझा स्वामी गोकुळी जन्मला व तो दुष्टांचा संहार करतो, असे माणिक प्रभू म्हणतात.

२.३.२९ लोकगीतातील गौळणी

लोकगीते (Folk-lore) ही लोकांची सामूहिक निर्मिती असते. लोक आपल्या उत्स्फूर्त भाव-भावनांचा अविष्कार या लोकगीतातून करतात. लोकगीतांचा रचनाबंध हा मुक्त व सैलसर असतो. लोकगीतांचा कर्ता अज्ञात असतो. परंतु अंगभूत सामर्थ्य, गोडवा, अनुभवाचे सच्चेपण आणि कल्पनारम्यता असणारी लोकगीते समाज स्वीकारतो. गरजेनुरूप, काळानुरूप त्यामध्ये योग्य ते बदल करतो. ही लोकगीते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सांस्कृतिक ठेवा म्हणून सोपवली जातात.

राधा-कृष्ण ही लोकमानसातील प्राचीन व आदर्श जोडी आहे. प्रेमाच्या विविध भावछटा व्यक्त करण्यासाठी या प्रियकर-प्रेयसीचा वापर करण्यात आला आहे. दोघे एकमेकांना अप्राप्य आहेत. तरीही एकमेकांवर अनुरक्त आहेत. पु. शि. रेगेंनी 'राधाःयुगानुयुगीची मनःबाधा' म्हटले आहे. हे प्रेम

उत्कट आहे. ते शारीर आहे, पण त्याहून अधिक मनोमय आहे. लोकपरंपरेत राधा-कृष्णाचे अनोखे भावसंबंध व्यक्त झालेले दिसतात.

लोकगीते साधारणतः नाचत, ताल धरून म्हटली जातात. त्यामुळे त्यात यमक-अनुप्रास असतो. नादानुवृत्ती असते. गेयता असते. रचना साधी सोपी, सहज लक्षात राहणारी असते. पांडित्य, अलंकारिक भाष्य यांना थारा नसतो. बोलभाषेतील शब्दकळा हेच लोकगीतांचे सामर्थ्य असते. कल्पनेच्या अतर्क्य भराऱ्या हेही लोकगीतांचे वैशिष्ट्य असते.

राधे कृष्णाला कडेवर घे ग
कडेवर घेती घरात नेती
परोपरीचा मेवा देती
बाळ बघेना मेव्याकडे।।

ही लोकप्रिय गौळण आहे. हा बाळ हट्टी आहे. तो म्हणतो, मला वाघ धरून दे. त्याचा घोडा करून दे. नाग धरून दे, त्याचा हार करून दे. घार धरून दे, त्याचा पतंग करून दे, इत्यादी. येथे राधा ही कृष्णापेक्षा वयाने मोठी आहे, याचे सहज सूचन होते.

कृष्णाचे रूप-गुण वर्णन करणाऱ्याही गौळणी आहेत. त्याचे काळे-सावळे असणे, वेणू वाजवणे व पराक्रम गाजवणे सगळेच कौतुकाचे आहे.

हरी माझा किती छान
जसं केवडयाचं पान

असं सहज वर्णन लोकगीतात येते.

यमुनेत आंघोळीला गेलेल्या गोपी आणि त्यांची वस्त्रे लांबविणारा कृष्ण याचेही चित्रण गौळणीत येते. हुडहुडी भरलेल्या गोपी पाण्यातूनच त्याला विनंती करत राहतात. तेव्हा तो त्यांना पाण्याबाहेर यावयास सांगतो. गोपी बाहेर येतात, तर प्रत्येकीला पितांबर नेसवलेले असते.

'छप्पन गवळणी' हे लोकगीत वैशिष्ट्यपूर्ण आहे. ५६ घरच्या या गौळणी कृष्णाभोवती जमल्या आहेत. राधा आणि चंद्रावळी या दोघी मुख्य आहेत.

सोडूनि आपला घरधंदा गीत गाती गोविंदा
हरिनामाचा परिबंध नित्य नवा करिती छंद

अशी त्यांची अवस्था आहे. कोणत्या जातीची कोणती गवळण आहे, याचे तपशीलवार वर्णन आले आहे. विशेष म्हणजे त्यांमध्ये मुस्लीम जातीतील काही गौळणी आहेत. त्यावरून हे लोकगीत मुस्लीम आमदानीत तयार झाले असावे, असा अंदाज करता येतो.

गवळणी घरकाम करत असतात. त्याचवेळी कृष्ण खोड्या काढत राहतो, हा लोकगीतांचा एक आवडता आशय आहे. या सासुरवाशीन गवळणींना सासूचा त्रास असतो. तरीही खडा मारणे, हात धरणे, दूधपिणे, लोणी खाणे अशा खोड्या चालूच असतात. तेव्हा

आता मारील गं आता मारील
आता मारील ग सासूबाई
हरी पडलाय आमच्या डायी

अशी शब्दांची आवृत्ती करत संकटाची परिणामकारकता वाढविली जाते.

काय रे कृष्णा लंपट झाले
मुरलीच्या नादाने धावून आले

असे म्हणत गवळणी स्वतःची अवस्था सांगू लागतात. कुणी आंघोळ करता करता, कुणी वेणी-फणी करता करता, कुणी तान्ह्या बाळाला भरवता भरवता, तर कुणी विडे बांधता बांधता धावून आलेले असते. प्रसंगी या गवळणी यशोदेकडे गाऱ्हाणे मांडतात, पण कृष्ण कानावर हात ठेवतो व म्हणतो, 'मी तर वनामध्ये गाई राखत होतो.'

लोकगीतातील गौळणीत वात्सल्यभावही दिसतो. यशोदा स्वतःच बालकृष्णाच्या खोड्यांनी त्रस्त आहे. ती त्याला विविध खेळ खेळण्याचे सुचविते.

सोड मला तू करू दे रे धंदा
का मशी छळशील बाल मुकुंदा।।

असे ती म्हणते. जांभळ, सीताफळ, दूधभात, साखर लोणी, भुईचक्र, विटीदांडू अशी अनेक प्रलोभने ती दाखवते. कधी कधी मंथन करू दे, असेही म्हणते.

चंद्रावळीसाठी विविध वेश धारण करणारा आणि विविध कामे करणारा कृष्ण एका गौळणीत आला आहे. चंद्रावळ ही लोकपरंपरेत उभी राहिलेली राधेइतकीच महत्त्वाची गवळण आहे.

थोडक्यात, लोकगीतातील गौळणी वात्सल्य, प्रेम, शृंगार, भय अशा अनेक भावभावनांचे दर्शन घडवितात. लोकगीतातील कृष्ण अधिक मानवी असतो.

२.४ समारोप

मराठी कवितेतील एक महत्वाचा रचनाबंध म्हणून गौळणीकडे पाहावे लागते. श्रीकृष्ण आणि त्याच्याभोवती असणाऱ्या विविध नातेसंबंधातील स्त्रिया यांचे भावसंबंध हा गौळणींचा मुख्य विषय असतो. मराठी गौळणी ह्या कालपरत्वे व कविपरत्वे बदललेल्या दिसतात. यादवकालीन संतांच्या गौळणी या मातृसंमिताच्या जवळ जाणाऱ्या, क्वचित विराणी स्वरूपाच्या दिसतात. कृष्णभक्ती/विठ्ठलभक्तीचाच एक मानुष अविष्कार येथे दिसतो.

पुढे एकनाथ, तुकारामांच्या काळात यवनी राजसत्ता आहे. अध्यात्माची परिभाषा थोडी मागे पडली आहे. कृष्णराधा हे समकालीन वाटावेत असे चित्रण आहे. अर्थातच या मधुराभक्तीला परतत्त्वाचा स्पर्शदेखिल आहे.

शाहिरांनी गौळण नाट्यात्म केली. शृंगाराच्या आणि मानवी कामभावनेच्या तुष्टीसाठी गौळणींचा वापर झाला. कृष्ण नटखट आहेच, परंतु गोपीही नादावल्या आहेत. चटावल्या आहेत. पेशवाईत वाढत गेलेला विलासभोग गौळणीतही विविध रूपात अवतरला तर काय नवल! संतांची गौळण कीर्तनात रंगणारी सोज्वळ तर शाहिरांची गौळण तमाशात रंग भरणारी शृंगारिक अशी स्पष्ट विभागणी येथे दिसते.

याउलट लोकसाहित्यातील गौळण मानवी मनाचे सहज रंग व्यक्त करणारी गानसुलभ आहे. तिला अंतर्गत लय आहे. नाद आणि ठेका आहे. स्त्रिया नाचता नाचता गात राहतात. या गौळणीचे प्रदर्शन इतरांसाठी नाही. पुरूषांसाठी तर नाहीच नाही. स्वभावनेचे रंग आणि कल्पकता येऊन ही गौळण सहजपणे अवतरते.

या संदर्भात डॉ. वसंत स. जोशी लिहितात, ''मराठी गौळणींची एकंदर वाटचाल विविधरंगी आणि विविधढंगी झाली आहे. राजकीय व सामाजिक परिवर्तनाच्या अनुषंगाने ऐहिक जीवनाविषयी आस्था वाढीस लागली आणि तिचा परिणाम 'गौळणी' सारख्या वाङ्मय प्रकारावरही झाला, असे म्हणता येईल. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथादि कवींच्या गौळणीत त्यांच्या व्यक्तित्वाचाही प्रभाव पडला आहे. ज्ञानेशांची योगानुभवातून प्रकटलेली काव्यसृष्टी, नामदेवांची भावुकता, एकनाथांचा हरिदासी विनोद, इ. तून गौळणींना विशिष्ट रंगरूप प्राप्त होत गेले आहे. 'मराठी गौळणी' चे स्वरूप पारलौकिकाकडून लौकिकाकडे बदलत गेले आहे. गौळणीतील प्रतिकात्मक अर्थ बाजूस राहून त्यांचा वाच्यार्थ रूढ झाला. शाहिरांच्या गौळणी हा प्रेमकाव्याचाच अविष्कार होय.''(मराठी गौळण, १९८८, पृ. ६)

२.५ शब्दार्थ व टीपा

न गमे- करमत नाही

नेणा - न जाणा

पायरऊ - पावलांचा आवाज

पैल - पलीकडे

परिमळु - सुगंध

क्षेमालागी - अलिंगन देण्यासाठी

नावरे - (भावना) आवरत नाहीत

नवनीत - लोणी

दातारा - देणारा, दानशूर

गर्जिन्नले - गर्जत आहे

वरूषताहे - वर्षाव करतांहेत

हिंव - थंडी

झिलो - मुलगा

पुच्छ - पिसारा

कूर्म - कासव

शेष - शेषनाग

वैजयंती - विजय मिळून देणारी

वराह - डुक्कर

दोहणे - धार काढणे

उमर - वय

सैराट - बेभानपणे

ठकडा - ठकवणारा

नाइकसी - ऐकत नाही

पदांबुज - पदकमल

वाळी - वाळीत टाकतात

पानसरा - जकात घेणारा

जीवन्मुक्त - जन्म-मरण फेऱ्यातून मुक्त

चीर - वस्त्र

सर रे परता - बाजूस सर

चाटा - पल्ला/ अंतर

आपपर - आपला-परका

सिरजोर - डोईजड

चाड - पर्वा, भीड, संकोच, इच्छा

गोरस - दूध

प्रत्यवाय - अडथळा

रळी - थट्टा

बळिया - बलवंत, सामर्थ्यवान

विचरणे - हिंडणे

घररिघी - घरात जबरदस्तीने घुसून पत्नीप्रमाणे राहणारी स्त्री

होरी - वसंतोत्सवातील कृष्णलीलांचे वर्णन करणारा काव्यप्रकार

छेकापन्हुती - एक शब्दालंकार, अंतरंग झाकणे.

२.६ प्रश्नोत्तरे

या विभागात नमुना प्रश्न व अपेक्षित उत्तरे दिली आहेत. अशा प्रकारचे प्रश्न परीक्षेत विचारले जातील. उत्तरे मुद्देसूद, सुसंगत व उदाहरणे, संदर्भ यांचा वापर करून लिहिणे अपेक्षित आहे.

वस्तुनिष्ठ प्रश्न

अ) योग्य पर्याय निवडा.

१) ज्ञानदेवांची गवळण गोरस घ्या म्हणण्या ऐवजी ...... म्हणते.

(दही घ्या / लोणी घ्या / गोविंद घ्या / राधा घ्या)

२) रात्र काळी घागर काळी ..... ही काळी वो माय.

(राधा / यमुनाजळे / कांचोळी / बासरी)

३) असा कसा देवाचा देव बाई .....। देव एका पायाने लंगडा।।

(फाकडा / ठकडा / वेंधळा / गोवळा)

४) सुवर्ण पाहुनि तनुवरी ..... रात्री शिरतो घरी। हात टाकि तसे अंगावरी।।

(कृष्ण / चोर / प्रियकर / वंचक)

५) संतांच्या गौळणीतून व्यक्त भावना या ..... म्हणून ओळखल्या जातात.

(मधुरा भक्ती / योग भक्ती / विरोध भक्ती / शृंगार)

उत्तरे: १) गोंविद घ्या

२) यमुनाजळे

३) ठकडा

४) वंचक

५) मधुराभक्ती

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

भक्तियुगाचा प्रभाव संत ज्ञानदेवांच्या गौळणींवर कसा दिसून येतो, ते सोदाहरण लिहा.

उत्तर: प्रस्तावना

इ. स. १२ वे शतक-वारकरी संप्रदायाचा शिस्तबद्ध प्रारंभ-यादवकाळ- संतांचे बंडखोर कार्य-मराठीतून अध्यात्मज्ञान- सर्वजनसुलभ भक्तीचा पुरस्कार- नामसंकीर्तनाला महत्त्व- अभंग रचना-भजन-कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन- उत्कट व आर्त भक्तीचा अविष्कार- समाजाच्या सर्व स्तरातून संतकवी-सामाजिक व्यथा/ वेदना तसेच वैयक्तिक अनुभव शब्दबद्ध-मराठी कवितेत ओवी, अभंग, भूपाळी, भारूड, आरती, गौळण, गोंधळगीत असे नवे काव्यप्रकार निर्माण झाले.

संत ज्ञानदेव: चरित्र व काव्य

आई-वडील विठ्ठलपंत व रूक्मिणी- मूळ वारकरी घराण्याचा वारसा-विठ्ठलपंतांची संसारातच संन्यस्थवृत्ती-संसार त्याग व संन्यासाश्रम- गुरूआज्ञा-पुन्हा संसार-पुत्रप्राप्ती-ब्रह्मवृंदाकडून बहिष्कार-मुलांच्या मुंजीत अडचण-शुद्धिपत्रासाठी प्रयत्न-आळंदी-पैठण-मातापित्यांना देहत्यागाचे प्रायश्चित्त-दरम्यान नाथ संप्रदायाचा स्वीकार-मुलांचे घरी शिक्षण- प्रज्ञावंत भावंडे-पुढे नामदेव भेट-भक्तिमार्गाचा परिचय-वारकरी संप्रदायाची पायाभरणी-संत म्हणून सन्मानित.

लेखन ज्ञानेश्वरी (शके १२१२) अमृतानुभव, चांगदेवपासष्ठी- हरिपाठाचे अभंग-स्फुट अभंग-मराठीतून अध्यात्मज्ञान-पहिली बंडखोरी-रूजुता-नम्र प्रज्ञावंत.

ज्ञानदेवांच्या गौळणी

ज्ञानदेवांच्या गौळणींचे तीन प्रकार–

१) **विराणी**– प्रियकराचा विरह झालेल्या प्रेयसीचे रूपक परमेश्वर हाच प्रियकर-भेटीची तीव्र तळमळ– उदा. तुजविण एकली रे कृष्णा न गमे राती-कृष्णे वेधिली विरहिणी-घनु वाजे घुणघुणा– अवचिता परिमळू-ज्याचिये आवडीं संसार त्यजिला इ. गौळणी.

२) **मनोवेधक कृष्णाचे वर्णन(मधुराभक्ती)**– उदा. दुडिवर दुडि साते निघाली-सांवळी प्रतिमा घेऊनि सुकुमार-सांवळिये बुंथी इत्यादी.

३) **विठ्ठल भेटीची आस**– उदा. पैल निळाचिये वेळी-पंढरपुरींचा निळा– पैल तो काऊ कोकताहे– इत्यादी.

समारोप

ज्ञानदेवांच्या गौळणी सूचक, प्रतिमा-प्रतीकांच्या भाषेत बोलणाऱ्या-भावनांचा उत्कट अविष्कार नादमय ओघवती रचना-उच्च दर्जाचे काव्य-मधुराभक्ती-प्रेमभक्तीचा अनोखा अविष्कार

क) लघुत्तरी प्रश्न

पेशवेकालीन शाहिरी काव्याचे कोणते गुणविशेष होनाजी बाळाच्या गौळणीत व्यक्त होतात, स्पष्ट करा.

उत्तर: प्रस्तावना

उत्तर पेशवाईतील गाजलेला शाहीर-होनाजी सयाजी शिलारखाने (गवळी)-साथीदार बाळा करंजकर (शिंपी)– आजोबा साताप्पा शिलारखाने व चुलता बाळा यांचेकडून कवित्वाचा वारसा– सवाई माधवराव व दुसऱ्या बाजीरावाकडून राजाश्रय-रंगाचा दरबार, खर्ड्याची लढाई या प्रसंगावरील पोवाडे– 'घनःश्याम सुंदरा' ही गाजलेली अजरामर भूपाळी– बैठकीच्या रागदारीवर आधारित लावण्या लिहिल्या-संपत्ती मिळाली, साठवली पण लुटली गेली-पुढे बडोद्याला वाषिक २०० रू. वर्षासन– दुःखद अंत.

होनाजीच्या गौळणी

प्रेमभावनेचा शालीन, सुसंस्कृत अविष्कार करणाऱ्या गौळणी-विरह, रुसवा, संशय, तक्रार अशा विविध भावछटा

'राधा म्हणे श्रीहरी' या गौळणीत राधेचा विरहभाव व संशय व्यक्त होतो-रात्री कुठे होता?– पवळी गाय हरविली तिला शोधण्यात रात्र गेली, असे उत्तर-त्यातून अनेक उपप्रश्न व उत्तरे-शेवटी वेद-पुराणांना न कळालेला कृष्ण राधेला कसा कळणार हा समारोप–

'राधे हा मुकुंद उचलुनी कडिये घेई' या गौळणीत यशोदेला दमविणारा कृष्ण व शेवटी राधेला त्याला घेऊन जा असे सांगणे-

'सांगा हा मुकुंद बाई कोणी पाहिला' या गौळणीत अचानक गोकुळातून कृष्ण नाहीसा झाल्यामुळे वेडावलेल्या गौळणींचे वर्णन.

'श्रीकांता कमलाकांता' गौळणीत बाजारला निघालेल्या व्रजनारींना कृष्ण अडवितो-संवाद.

समारोप

राधा-कृष्ण किंवा गोपी-कृष्ण प्रेमाची अनेक वर्णने- रंजनपर-पेशवाईतील प्रेम-शृंगाराच्या वातावरणाचा प्रभाव.

२.७ सरावासाठी नमुना प्रश्न

अ) गाळलेल्या जागी योग्य पर्याय निवडा.

१) ...... चोळी, माझे सर्व अंग पोळी।

कान्हो वनमाळी, वेगी भेटवा का।।

(कस्तुरीची / चंदनाची / फुलांची / मखमलीची)

२) विष्णुदास नाम्याची ...... काळी।

कृष्णमूर्ति बहु काळी वो माय।।

(आई / पत्नी / स्वामिणी / देवता)

३) भानुदास हे संत एकनाथांचे ..... होय

(वडील/ गुरू / आजोबा / प्रपितामह)

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१) 'संत एकनाथांच्या गौळणी या वैचारिक व रंजक अशा दोन स्तरांवर वावरताना दिसतात', या विधानाची साधार चिकित्सा करा.

२) शाहीर रामजोशी यांचे वाङ्मयीन योगदान कोणते, ते स्पष्ट करून त्यांच्या गौळणींचे गुणविशेष सांगा.

क) लघुत्तरी प्रश्न

१) शाहीर प्रभाकर यांच्या गौळणींचे आशयसौंदर्य स्पष्ट करा.

२) लोकगीतातील गौळणींचे वेगळेपण सांगा.

२.८ उपक्रम

१) महाजालावर उपलब्ध मराठी गौळणींचे दृकश्राव्य सादरीकरण पाहा. त्याआधारे गौळण हा काव्यप्रकार समजून घ्या.

२) मराठी गौळणींच्या ध्वनिफिती (mp3) मिळवून ऐका.

३) शाहीर होनाजी बाळा, शाहीर पठ्ठे बापूराव यांच्या जीवनावरील चित्रपट महाजालावर पाहा.

२.९ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

१) पैंजण- म. ना. अदवंत- साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

२) वारकरी संतसाहित्यातील मधुरभाव व वत्सलभाव- डॉ. अंजली पांडे-जोशी-विसा बुक्स, नागपूर

३) मराठी विश्वकोश

४) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ भाग १-महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

५) प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास- डॉ. ल. रा. नसिराबादकर-फडके प्रकाशन कोल्हापूर.

❑❑❑

सत्र २ : घटक ३

आठवणींचे पक्षी

– प्र. ई. सोनकांबळे

३.१ उद्दिष्ट्ये

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला–

- एक लेखक अभ्यासपद्धतीचा उपयोग कसा करावा, हे समजून घेता येईल.
- प्र.ई.सोनकांबळे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आणि त्यांचा समकाल समजून घेता येईल.
- प्र.ई.सोनकांबळे यांच्या साहित्यात समकालाचे प्रतिबिंब कशा प्रकारे व्यक्त होते, याचा अभ्यास करता येईल.
- प्र.ई.सोनकांबळे यांच्या इतर साहित्यकृती विचारात घेऊन लेखकाच्या वाङ्मयीन जडणघडणीचा विचार करता येईल.
- एकूण वाङ्मय परंपरेत लेखकाचे योगदान समजून घेता येईल.

३.२ प्रस्तावना

विद्यार्थी मित्रहो, प्रस्तुत प्रकरणात आपल्याला एका लेखकाचा अभ्यास करणे अपेक्षित आहे. हा अभ्यास करत असताना आपणाला चरित्रात्मक समीक्षापद्धतीचा वापर करावयाचा आहे. चरित्रात्मक समीक्षापद्धतीमध्ये लेखकाचे व्यक्तिगत जीवन व त्याचे साहित्य यांच्या परस्पर संबंधाचा विचार केला जातो. त्याच्या आयुष्यात आलले अनुभव त्यांने आपल्या साहित्यलेखनातून कशा प्रकारे व्यक्त केले, याचा विचार केला जातो. त्या अनुषंगाने प्र.ई.सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाचा विचार करणे या ठिकाणी अभिप्रेत आहे. हा अभ्यास करत असताना प्र.ई.सोनकांबळे यांचे एकूण साहित्यलेखन किती आहे याविषयीदेखील माहिती असणे महत्त्वाचे आहे. एखाद्या लेखकाची साहित्यकृती अभ्यासक्रमाला लावली असता त्यामागचा उद्देश जाणून घेणे गरजेचे असते. संबधित लेखकाने वाङ्मयीन क्षेत्रात केलेले सर्व तऱ्हेचे योगदान लक्षात घ्यावयाचे असते. असे केल्याने संबधित लेखकाचे वाङ्मयीन कर्तृत्व लक्षात येते. त्याचबरोबर लेखकाने वाङ्मय प्रकारानुसार केलेले लेखन, त्यातील आशयाचे स्वरूप, मांडणीची पद्धत, जीवनानुभव घेण्याची आणि तो मांडण्याची पद्धती, केलेले भाषिक प्रयोग, समकाळातील वेगळेपण, समाजजीवनाचे चित्रण यासारख्या

अनेक बाबी समजून घेता येतात. त्या अनुषंगाने प्र.ई.सोनकांबळे यांच्या साहित्याचा विचार करता येईल.

३.३ विषय विवेचन

लेखक हा समाजाचा एक घटक असतो. तो ज्या समाजात राहतो त्या समाजाचा व भोवतालच्या परिसराचा त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. त्यातूनच त्याच्या जीवन जाणिवा विकसित होत असतात. लेखक अनेक बिंदूंमधून समाजजीवन बारकाईने न्याहाळत असतो. तो त्या समाजाच्या वृत्ती, प्रवृत्ती आपल्या साहित्यातून आविष्कृत करत असतो. प्रत्यक्ष वास्तवातील अनुभवच त्याच्या साहित्याचे विषय झालेले असतात.

लेखक आपले अनुभव आपल्या साहित्यलेखनातून मांडत असतो. त्याला भावणाऱ्या वाङ्मय प्रवाहातून तो आपले अनुभव व्यक्त करत असतो. यासाठी तो एक किंवा त्यापेक्षा अनेक साहित्यप्रकार हाताळत असतो. हे करत असताना तो लेखनप्रक्रिया, भावना, विचार, प्रतिभा, कल्पना, शैली यांचा वापर करत असतो. तसेच त्याच्या आजूबाजूला असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचा देखील त्याच्यावर प्रभाव पडत असतो. लेखकाची ही प्रक्रिया व्यक्तिगत जीवनाबरोबर सामाजिकदृष्ट्याही महत्त्वपूर्ण असते. सर्वसामान्य वाचक अशा लिखित साहित्याचा आस्वाद घेत असतो.

कोणत्याही साहित्यिकाचे साहित्य अभ्यासण्यापूर्वी त्याच्या जीवनातील स्थित्यंतरे व एकूण त्या लेखकाचा जीवनपट जाणून घेणे, त्याच्या साहित्याच्या नेमक्या आकलनासाठी उपकारक ठरते. लेखकाच्या घडणीचा व संस्काराचा त्याच्या निर्मितीशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध असतो. त्याच्या जीवनातील बहुतेक सर्वच ठळक स्थित्यंतरे त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंबित झालेली असतात. त्यामुळे लेखकाचे साहित्य अभ्यासण्याआधी त्याच्या वाङमयीन जडणघडणीचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरते. प्र.ई.सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाचे स्वरूप पाहण्याआधी त्यांची वाङ्मयीन जडणघडण जाणून घेणे क्रमप्राप्त आहे. ते पाहण्याआधी आपण दलित साहित्याविषयी थोडे समजून घेऊयात.

दलित साहित्य हे व्यक्तिनिष्ठ नसून ते समूहनिष्ठ आहे. एका विशिष्ट समाजाचा आविष्कार त्यातून झालेला आहे. ते व्यक्तिकेंद्री आणि समूहकेंद्री अशा दोन्ही पातळीवर आविष्कृत झालेले आहे. दलित साहित्याच्या निर्मितीमागचा हेतू हा केवळ मनोरंजन नाही, तर स्वतःला आणि स्वतःच्या समाजाला पारंपरिकतेच्या बेड्यातून सोडविणे हा आहे. या साहित्यात विचाराला अधिक प्राधान्य आहे. भगवान गौतम बुद्ध, म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श या साहित्यनिर्मितीमागे आहे.

दलित साहित्य ही संकल्पना १९६० नंतर उदयाला आलेली दिसते. साठनंतरच्या काळातील हा एक मोठा साहित्यप्रवाह म्हणून ओळखला जातो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेने मोठ्या प्रमाणात दलित तरूण वर्ग शिक्षण घेऊन बाहेर पडू लागला. स्वतःवर होत असलेल्या अन्यायाची, अत्याचाराची त्याला जाणीव झाली. स्वतः माणूस म्हणून जगण्यासाठी तो धडपडू लागला. स्वतःवर होणारे अन्याय अत्याचार तो आपल्या साहित्यातून व्यक्त करू लागला. दलित साहित्याच्या उदयाने मराठी साहित्यात एक नवे अनुभवविश्व, नवे संवेदनविश्व तयार झाले. अनेकविध मूल्यांचे, जाणिवांचे, नव्या तत्त्वज्ञानाचे समग्र चित्रण या साहित्यातून दिसू लागले. वेदना, विद्रोह, नकार, भूक, अज्ञान, दारिद्र्य यांच्या आत्मशोधातून दलित साहित्य तयार होऊ लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षणातून परिवर्तन अपेक्षित होते. म्हणून त्यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा मंत्र दिला. त्यांच्या या संघर्षातून औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना झाली. बहुतांशी दलित साहित्य चळवळीतील शिक्षण घेऊन जी पहिली पिढी बाहेर पडली ती याच महाविद्यालयातून. दलित साहित्याची संपूर्ण चळवळ या परिसरातून उभी राहिली. या महाविद्यालयात पुस्तकी साहित्याबरोबरच साहित्यिक, सांस्कृतिक व परिवर्तनवादी चळवळ तयार झाली. लोकशिक्षणाचा प्रांरभ झाला. कविता आणि आत्मकथनाच्या पाऊलखुणा या ह्याच महाविद्यालयात सापडतात. दलित आत्मकथनांची बीजेही या महाविद्यालयाच्या वार्षिकांकात सापडतात. १९६४ साली या महाविद्यालयाचा एक वार्षिकांक प्रसिद्ध झाला. या अंकातून प्र.ई.सोनकांबळे यांचा 'वाटाड्या' हा आत्मकथनपर लेख प्रकाशित झाला. या लेखाने दलित आत्मकथनपर लेखनाला सुरूवात झाल्याची दिसून येते. त्यानंतर मराठीतील पहिले आत्मकथन 'बलुतं' चा जन्म झाला. मराठवाड्याच्या खेड्यापाड्यातून थोडेथोडे विद्यार्थी दलित समाजातून येऊ लागले. समाजातील तळागाळातून आलेल्या विद्यार्थ्यांचे हादरून टाकणारे अनुभव ऐकून आणि त्या अनुभवातील सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व सामंतशाही समाजरचनेवर प्रकाश टाकणारे किरण पाहून तत्कालीन प्राचार्य डॉ.म.ना.वानखेडे यांनी त्यांचे अनुभव कॉलेजच्या वार्षिकांकातून छापण्यास सुरूवात केली. त्यातील काव्यगुण आणि वाङ्मयीन गुण पाहून कला साहित्याच्या जाणिवा वाढविणारे एखादे व्यासपीठ असावे म्हणून 'मिलिंद साहित्य सभा' आणि 'अस्मितादर्श' हे त्रैमासिक सुरू करण्यात आले. यातून अनेक नवनवीन तरूण लेखन करू लागले.

हजारो वर्षे पिढ्यान्‌पिढ्या सहन करत आलेल्या अन्यायाला, दैन्याला, दुःखाला वाचा फोडण्याचे काम दलित साहित्याने केल्याचे दिसून येते. अशा या दलित साहित्याच्या जडणघडणीत प्र.ई.सोनकांबळे यांचे स्थान महत्त्वाचे ठरते. त्यांनी लिहिलेल्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. दलित जीवनानुभवांना कथारूपांमधून अगर कुठल्याही वाङ्मय प्रकारामधून परावर्तित न करता ते जसेच्या तसे सांगता येतात हे प्रथमतः प्र. इ. सोनकांबळे यांनी

दाखवून दिले. या आत्मकथनात्मक लेखांमधून व्यक्त झालेले अनुभव, त्यातील व्यथावेदना या एकट्या लेखकाच्या नसून संपूर्ण दलित समाजाच्या आहेत. त्यांच्या अनुभवविश्वाचे हे मनोगत आहे. दलित साहित्य हे व्यक्तिनिष्ठ नसून समष्टीमनाचा आविष्कार त्यात असतो. दलित जाणीव ही समाजनिष्ठ जाणीव आहे. ही जाणीव दलित संवेदनशीलता, दलितविषयक दृष्टिकोन, दलित मानसिकता स्वीकारणारी जाणीव आहे. ती व्यक्तिकेंद्री आणि समाजकेंद्री अशा दोन्ही पातळीवर आविष्कृत होऊ शकते. या सर्वांचा आविष्कार प्र. ई. यांच्या आत्मकथनातून साकार होताना दिसतो.

३.३.१ लेखक परिचय

लेखकाचे वाङमयीन व्यक्तिमत्त्व ही एक स्वतंत्र संकल्पना आहे. त्या अनुषंगाने लेखकाच्या जडणघडणीचा विचार येथे करावयाचा आहे. प्र.ई.सोनकांबळे यांच्या आत्मकथनातून त्यांची जडणघडण कशी झाली ती दिसून येते. त्यांच्या या आत्मकथनातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते. यातून त्यांच्या जडणघडणीचा शोध घेता येतो.

प्रल्हाद ईरबाजी सोनकांबळे यांचा जन्म १६ जुलै, १९४३ रोजी उस्मानाबाद जिल्ह्यातील सुल्लाळी (सध्या हे गाव लातूर जिल्ह्यात जळकोट तालुक्यात आहे) या गावी झाला. लहानपणीच आईवडिलांचे छत्र हरवल्यामुळे थोरल्या बहिणीने त्यांचा सांभाळ केला. थोरल्या बहिणीचे सासर गरीब. मोलमजूरी करून दिवसाचा डोंगर पार करणे. अशा गरिबीत प्र.ई.सोनकांबळे यांचे बालपण, किशोरपण गेले. एका निराधार मुलाने, एका मोलमजुरी करणाऱ्या बहिणीच्या पोरक्या भावाने सामंतशाहीच्या विषमतामूलक समाजात जे जे पाहायचे, सहन करायचे ते सर्व सहन केलेले आहे. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयात झाले. त्यानंतर ते मराठवाडा विद्यापीठातून इंग्रजी विषय घेऊन एम.ए. झाले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयातून त्यांनी एल.एल.बी.चे शिक्षण पूर्ण केले. सुरुवातीला गल्ले बोरगाव येथे शिक्षक म्हणून नोकरी केली. इ.स.१९६६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालय येथे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक म्हणून रूजू झाले. पुढे त्याच विभागाचे प्रमुख झाले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य पद आणि १९८८ मध्ये प्राचार्यपदही त्यांनी भूषविले आणि प्राचार्य पदावरून निवृत्त झाले. यातील अनेक प्रसंग 'आठवणींचे पक्षी' मधून साकार झालेले आहेत. त्यांच्या या वाङ्मयीन जडणघडणीचा बराचसा आलेख या आत्मकथनातून पावलोपावली दिसून येतो.

प्र.ई.सोनकांबळे यांनी 'अस्मितादर्श' या त्रैमासिकामधून लिखाणास प्रारंभ केला. त्यावेळी 'आठवणींचे पक्षी' हे त्यांचे आत्मचरित्र खूप गाजले. दलित समाजातील शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या हजारो तरूणांना आपले अनुभव व्यक्त करण्यासाठी या आत्मकथनाने वाट करून दिली. या आत्मकथनाचा मराठीशिवय इतर अकरा भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. याशिवाय

प्र.ई.सोनकांबळे यांची 'असं हे सगळं', 'पोत आणि पदर' अशी इतर पुस्तकेही आहेत. साहित्य व सामाजिक संस्थाशी त्यांचा जवळचा संबंध होता. एक सहृदयी आणि प्रेमळ साहित्यिक अशी त्यांची ओळख होती. मराठी साहित्य परिषदेच्या आखाडा बाळापूर येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे त्यांनी अध्यक्षपद भूषविले होते. तसेच १९७९ मध्ये औरगांबाद येथे झालेल्या तिसऱ्या दलित साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. १९८१ मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या 'ऑल इंडिया बुद्धिस्ट कॉन्फरन्स'चेदेखील ते स्वागताध्यक्ष होते. १९८२ मध्ये झालेल्या पहिल्या दलित नाट्यमहोत्सवाचे स्वागताध्यक्ष म्हणून त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली.

१९८३ मध्ये प्र.ई.सोनकांबळे यांना साहित्य अकादेमीचा महत्त्वाचा पुरस्कार मिळाला. त्यांच्या साहित्यलेखनाची कामगिरी पाहून राज्यशासनानेदेखील पुरस्कार देऊन त्यांच्या साहित्याचा गौरव केला. लातूर नगरपरिषदेने त्यांचा भूमिपुत्र म्हणून विशेष सत्कार केला होता. अंबाजोगाई येथील यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. रयत शिक्षण संस्थेचा आणि राज्य शासनाचा आदर्श शिक्षक हा पुरस्कार १९९७ मध्ये त्यांना प्राप्त झाला. ६ जानेवारी, २०१० रोजी त्यांचा मृत्यू झाला. आपल्या ६७ वर्षाच्या कारर्किदीत त्यांना जात, धर्म, अस्पृश्यता यासारख्या अनेकविध गोष्टींशी संघर्ष करावा लागला. हा संघर्ष करत असताना त्यांना अनेक व्यक्तींनी मदत केली. यामध्ये प्राचार्य म.ना.वानखेडे, रा.ग.जाधव, ल.बा.रायमाने, श्री.म.पिंगळे, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, नागनाथ कोत्तापल्ले, वा.ल.कुलकर्णी, अर्जुन डांगळे, विजय तेंडूलकर, भाऊ लोखंडे, दादा कर्डक यांसारख्या अनेक मान्यवरांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. या महान साहित्यिकांच्या सहवासात प्र.ई.सोनकांबळे यांची वाङ्‌मयीन जडणघडण झालेली दिसून येते. त्यांची जडणघडण पाहिल्यानंतर आता 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनासंबधी पुढीलप्रमाणे विवेचन करता येईल.

३.३.२ आठवणींचे पक्षी : वास्तव जीवनाचा दाहक अनुभव

प्रत्येक व्यक्तीला आपले दुःख, आपला आनंद केव्हा तरी, कुणाला तरी सांगण्याची इच्छा होते. अंतर्मनात कुठेतरी असलेली ही सुप्त भावना त्याला व्यक्त करावीशी वाटत असते. आपण जे भोगलो, जे सहन केले आणि हे सर्व करत असताना जो मानसिक, भावनिक अथवा शारिरिक ताण पडलेला असतो, तो या व्यक्त होण्यामुळे हलका होत असतो. शिवाय काही जुन्या आठवणीही त्यातून उजळून निघतात. गतकाळातील विस्मृत झालेल्या आठवणी ताज्या होतात. त्यामुळे लेखक आपल्या आयुष्यातील घटनाक्रम पुस्तकरूपाने लिहीत असतो.

आत्मकथन म्हणजे स्वतःच्या जीवनाचे दूरस्थपणाने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजळ निवेदन होय. आत्मकथनामध्ये लेखक आपल्या स्वतःच्या जीवनाचा कालनुक्रमाने वृत्तांत कथन करतो. आयुष्यात घडलेल्या अनेक घटना, प्रसंग वाट्याला आलेले बरे वाईट अनुभव चित्रित

करत असतो. आत्मचरित्र हे आयुष्याच्या उत्तरार्धामध्ये लिहिले जाते. परंतु आत्मकथनांचा विचार केला तर ती एका ठरावीक काळापर्यंत लिहिलेली असतात. लेखक जो जगला, त्यांने जे अनुभवलं, जे पाहिलं तेच तो साहित्यातून आविष्कृत करीत असतो. ते त्याचे आणि त्याच्या समाजाचे, भवतालाचे अनुभवविश्व असते. त्यातून तो आपले जीवन साकारीत असतो. आठवणींचे पक्षी हे आत्मकथनदेखील याच प्रवाहातून जन्माला आलेले आहे.

'आठवणींचे पक्षी' हे आत्मकथन पुस्तकरूपाने प्रसिद्ध होण्यापूर्वी ते अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले होते. प्र.ई.सोनकांबळे यांचा पहिला लेख 'वाटाड्या' हा मिलिंद महाविद्यालयाच्या वार्षिकांकातून प्रसिद्ध झाला. हा लेख वाचून बाबूराव बागूल व प्रा.म.ना.वानखेडे यांनी प्र.ई.सोनकांबळे यांना त्यांच्या आयुष्याविषयी लिहायला सांगितले. त्यातूनच या आत्मकथनाचा जन्म झाला. सुरूवातीच्या काळात पंधरा लेखातून विभागलेले हे आत्मकथन चौथ्या आवृत्तीच्या वेळी २८ लेखांतून प्रसिद्ध झाले.

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातून अनेक व्यक्ती साकार झाल्या आहेत. या व्यक्ती कौटुंबिक आहेत. सामाजिक आहेत. जिवंत वाटणाऱ्या आहेत. प्र.ई.सोनकांबळे यांनी मोजक्या आणि नेमक्या शब्दात व्यक्तिचित्रणे रेखाटली आहेत. त्यांना भेटणारी माणसे ही चांगली आणि वाईट अशा दोन्ही प्रवृत्तीची आहेत. या दोन्ही प्रवृत्तींच्या लोकांबद्दल सोनकांबळे प्राजंळपणे लिहिताना दिसतात.

'आठवणींचे पक्षी' ही एका व्यक्तीच्या जीवनाची कहाणी तर आहेच, पण त्याबरोबरच ती एका समूहाची, एका प्रदेशाची आत्मकथा आहे. दलित आणि ग्रामीण समाजातील सुख-दुःख, रूढी, परंपरा या आत्मकथेत आहे. सामाजिक सांस्कृतिक व धार्मिक चित्रण या आत्मकथेत आहे. हे आत्मकथनात्मक आठवणींचे संकलन आहे. यातील प्रत्येक लेख वेगळा आणि स्वतंत्र असा आहे. आत्मानुभवांचा एक आविष्कार या आत्मकथनातून साकार झालेला दिसतो. आपल्या मनोगतात सोनकांबळे म्हणतात, 'मी माझ्या लिखाणात माझ्या जीवनात आलेल्या अनेक खडतर व भयानक अनुभवांचं नागडं-उघडं चित्रण माझ्या बोली भाषेत केल्याचे पाहून वानखेडे सर म्हणाले, तुम्ही सारखं लिहित चला, न लाजता. तुम्हाला खूप सांगायचंय. तुमच्या पोटात खूप साचलयं. ते बाहेर येऊ द्या. म्हणजे मोकळं कॅथारसिस झाल्यासारखं वाटेल तुम्हाला. (मनोगत)' अशा प्रकारे ते आपल्या आत्मकथनाच्या निर्मितीबद्दल सांगतात.

आईवडिलांच्या मृत्यूने लहापणीच पोरका झालेल्या प्र. ई. सोनकांबळे यांच्या अनुभवविश्वाचे चित्रण 'आठवणींचे पक्षी'मधून साकार झाले आहे. संपूर्ण आत्मकथनात आपण पोरके आहोत. परदेशी आहोत, दुसऱ्याच्या घरी आश्रित म्हणून राहतो, यांची जाणीव दिसून येते. काम कोणतेही असले तरी लहान प्रल्हाद ते नाही म्हणत नाही. आपल्या बहिणीवरच्या कामाचा भार कमी व्हावा

म्हणून वाटेल ते कष्ट करणारा हा लहानगा प्रल्हाद आहे. आपले जीवन स्वतःच घडवत तो जगतो. लहानपणीच आईवडिलांचा मृत्यू झाल्याने मोठी बहीण त्याला आपल्या घरी चेऱ्याला आणते. चेऱ्याला आल्यानतंर तो शाळेत जाऊ लागतो. परंतु शाळेत राम नावाच्या एका मित्राची पाटी त्याच्या हातून फुटल्यामुळे तो घाबरतो. त्याला वाटते आपली आक्का किंवा रामची आई आपल्याला रागावतील. भांडतील. शेवटी तसेच घडते. प्रल्हादचे पुस्तक हिसकावून घेतले जाते. रामच्या आईने त्याचे पुस्तक घेतले होते, तरी त्याच्या मनात तिच्याबद्दल राग नाही. कारण तो पोरका आहे. कधी कधी त्याची बहीण त्याला टाकून बोलते. तरीही तो राग विसरून बहिणीला कामात मदत करतो. गवतचारा आणतो. गावोगाव हिंडून शिष्यवृत्तीचे अर्ज वाटतो. शेतीच्या कामासाठी गुत्त्यात जातो.

प्रल्हाद हा कोणतेही काम करतो. बायकांपेक्षा जास्तीचे काम करूनही त्याला बायकांइतकाच मोबदला मिळत असे. तो कधी कधी मेलेल्या जनावरांच्या मांसाचे वाटे आणण्यासाठी जातो. तेव्हा तेथील लोक त्याला परदेशी म्हणून मांस देतात. शाळेत असताना आपले गुरूजींवरचे प्रेम व्यक्त करण्यासाठी तो स्वतः उपाशी राहून गुरूजींना लालभडक सीताफळे आणूण देतो. आक्काला व तिच्या घरच्यांना बरं वाटावं तसेच आपण त्यांच्या घरी आश्रित आहे, म्हणून तो जे हाती लागेल ते काम करतो. त्याची अक्का त्याला कधी कधी शिव्या द्यायची. कधी मारायची. अशा वेळी प्रल्हादला सतत पोरकेपणाची जाणीव होते. तेव्हा तो आपल्या दुसऱ्या बहिणीच्या गावी निघून जातो.

प्रल्हादला दोन बहिणी होत्या. दुसरी जगळपूरला होती. जगळपूरला गेल्यावर दाजी त्याला दुकानाऐवजी डोक्यावर मिरच्या घेऊन विकण्याचे व निदंण्या खुरपण्याचे काम लावतात. तिथेही त्याला पोरकेपणाची जाणीव होते. परंतु प्रल्हाद या सर्व गोष्टींवर सयंम ठेवताना दिसतो. तो रागराग अथवा चीड व्यक्त करत नाही. प्राजंळपणे या सर्व गोष्टी सहन करताना दिसतो. खूपदा तो बहिणीच्या गावी जातो. परंतु तिच्या घरी न जाता गावच्या देवळात जाऊन बसतो. कधी कधी घरी न जाताच परत माघारी फिरतो. पडेल ते काम आणि मिळेल तो मोबदला घेऊन तो आपले जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. आपण पोरके आहोत याची त्या बालमनावर खोलपर्यंत झालेली जखम आत्मकथन वाचताना दिसून येते.

शाळा नसेल त्यादिवशी शेंगा काढणे, कापूस वेचणे, शेतात भांगलणे, तण काढणे यासारखी कामे प्रल्हाद करतो. आक्का ओरडू नये म्हणून तो गुत्त्यावरही कामाला जातो. शाळू कापणीसाठी जातो. कामाचा मोबदला म्हणून त्याला मक्याची कणसं दिली जातात. कच्चे दाणे काढून सुपातून जात्यात आणि पुन्हा जात्यातून पोटात ढकलून तो दिवस काढून पोटाची भूक भागवतो. प्रल्हादच्या आक्काची परिस्थिती ही अंत्यत गरीब आहे. त्यामुळे तो आपल्यामुळे आपल्या बहिणीला त्रास होणार नाही, याची काळजी घेतो. पाटलाच्या वाड्यात जाऊन जे देतील ते शिळेपाके घेऊन

बहिणींच्या मुलांसोबत खातो. परंतु पोट भरत नसल्यामुळे पाणी पिऊनच भूक भागवतो. रानात काम करण्यापेक्षा मेलेल्या जनावराचे पाय धरणे, त्यांचे मांस घरी आणून शिजवणे प्रल्हादला बरे वाटते.

चेऱ्याची आक्का जगलपूरच्या बहिणीस बाळंतपणासाठी घरी आणते. रात्रभर चिमणी ठेवावी लागत असल्याने एक दिवशे चिमणी पडून आक्काचे घर जळते. आक्काचे घर जळाल्याने तिचा संसार उद्धवस्त होतो. त्याचा परिणाम प्रल्हादवरही होतो. तीन वेळचे जेवण व महिना साडेचार रूपये रोजीने प्रल्हादला चाकरी ठेवले जाते. सुरूवातील प्रल्हादला बरे वाटते. नंतर वाईटही वाटते. कारण मालक त्याला जनावरं वळायला, त्यांचे शेणघाण काढायला, कडबा आणायला सांगायचे. काम झाल्यानंतर हागणदारीजवळ त्याला जेवायला बसवतात. प्रल्हादला या सर्वाचे वाईट वाटते पण पोटासाठी आणि पोटातील भूक शांत करण्यासाठी, आपल्या बहिणीला बरे वाटावे यासाठी तो सर्व सहन करतो.

तहान भागवण्यासाठी जेव्हा प्रल्हाद चेलम्यावर म्हणजे जनावरांना पाणी पाजण्याच्या ठिकाणावर जाऊन पाणी पिऊ लागतो, तेव्हा चेलमा बाटवला म्हणून त्याला समज दिली जाते. पाच ओंजळी पाणी बाहेर फेकून चेलम्याला पवित्र केले जाते. अस्पृश्यतेबद्दलची जाणीव या ठिकाणी लेखक करून देतात.

शाळेत गेल्यावर केरबा नावाच्या एका मुलाशी प्रल्हादची मैत्री जुळते. त्याच्याशी मैत्री झाल्याने त्याचे आई, वडील, भाऊ प्रल्हादला जवळ करतात. कधी कधी त्याला पोटभर जेवण देतात. केरबाच्या वडिलांना महारोग झालेला पाहून प्रल्हादला किळस येते. परंतु जेवण मिळाल्यामुळे तो आनंदी होतो. पोटाची भूक भागवण्यसाठी तो हाडे गोळा करण्याचा धंदा करतो. हाडोळती येथे शाळेत गेल्यावर मधल्या सुट्टीत मुले व्हरांड्यात जेवण्यासाठी बसली की प्रल्हाद त्यांना चोरून पाठीमागच्या शेतात जातो. शेतकऱ्याने अगोदरच शेंगा काढलेल्या असतात. त्या शेतात अंगाला खरूज झालेली असूनही दगडाने शेतातील माती उकरून सापडणाऱ्या शेंगा खातो. माळ्याच्या मळ्याभोवती फिरून जनावरे हाणतो. कारण पाटलाने ते पाहून भाकरी-बिकरी द्यावी हा त्यामागचा हेतू असतो. केवळ मासांचा तुकडा मिळावा व भूक शांत व्हावी म्हणून कुत्र्याच्या तोंडातील मांस घ्यायचा प्रयत्न करतो. परंतु दोघांच्या संघर्षात कुत्रा विजयी होतो. प्रल्हादला त्याच्यासमोर हार मानावी लागतो. संपूर्ण अंगभर कुत्र्याने त्याला चावलेले असते. भुकेमुळे होणारी जीवनाची वाताहत, भुकेची तीव्र जाणीव या आत्मकथनातून प्रकट होते.

शिरिधर मास्तरच्या लग्नाला केवळ जेवायला मिळेल म्हणून राजूरपर्यंत प्रल्हाद पायी चालत जातो. राजूरच्या बोर्डिंगात असताना त्याला कावीळ आणि खरूज दोन्ही आजार होतात. त्याचे अंग

नासल्यासाखे होते. डोक्यात उवा बुळबुळतात. खरूजामुळे त्याला नीट बसताही येत नसे. त्याच्या अंगाचा व कपड्यांचा घाण वास येतो. परिणामी बोर्डिंगातील मुले त्याला पाहून छिःथुः करतात.

आपण मॅट्रिक पास होऊ याबद्दल विश्वास नसताना देखील १९६० मध्ये दुय्यम श्रेणीतून तो मॅट्रिक पास होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबादला दीन-दलितांसाठी शिक्षण सुरू केले असल्याने पुढील शिक्षणासाठी त्याला औरंगाबादला जाण्याबद्दल सांगितले जाते. त्याला औरंगाबादला जाण्यासाठी लोकवर्गणी काढून सतरा रुपये गोळा करून दिले जातात. त्यातील पाच रूपये आपल्या बहिणीच्या संसाराला मदत म्हणून प्रल्हाद देतो व उर्वरित पैसे घेऊन औरंगाबादला निघतो. औरंगाबादला आल्या नंतर मिलिंद महाविद्यालयात प्रवेश घेतो. त्याला राहण्यासाठी बोर्डिंगमध्ये जागा मिळते. इथूनच प्रल्हादच्या आयुष्यात चांगले दिवस यायला सुरूवात होते. याच महाविद्यालयात राहून तो एम.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करतो. प्राचार्य म.ना.वानखेडे यांच्या सहवासात प्रल्हादची जडणघडण होते. त्यांना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना आदर्श मानून प्रल्हाद पुढील वाटचाल करतो. शिक्षण पूर्ण होत असतानाच एम.ए.झाल्यानंतर मुंबईहून प्रल्हादला इंग्रजी विषयासाठी प्राध्यापक म्हणून कॉल येतो.

मॅट्रिक पास झाल्यावर प्रल्हाद पहिल्यांदा सवड मिळाली म्हणून पायातील काटे काढतो. दोन्ही पायातून जवळजवळ २५ आणि २६ असे एकूण एक्कावन्न काटे निघतात. औरंगाबादला शिक्षणासाठी आल्यावर तो पहिल्यांदा चप्पल घेतो. त्यातही मसूरी मोळे त्याला टोचायला लागतात. हुरडा खायला गेल्यावर केवळ मास्तरांनी आग्रह केल्यामुळे तो घोंगड्यावर सरकून बसतो. हे तिथल्या माळ्याला आवडत नाही. त्या ठिकाणी प्रल्हादची जात आडवी येते. त्यामुळे प्रल्हाद नाराज होतो. औरंगाबाद मध्ये वसतिगृहात जेव्हा रंगपंचमी खेळली जाते तेव्हा सर्वांचे लक्ष रंग खेळून आनंद घेण्यात असते परंतु प्रल्हादचे लक्ष रंगाने भरलेले कपडे खेळून झाल्यावर मुले कुठे टाकतात त्याकडे असते. टाकलेली कपडे तो स्वच्छ धुऊन स्वतः वापरतो. सर्व मुले जेवली की प्रल्हाद संपूर्ण खानावळी झाडण्याचे काम करतो. खानावळीतल्या काम करणाऱ्या स्त्रियांना मदत म्हणून भाजीपाला कापून देतो. त्यांच्या दळणातले खडे वेचण्यास मदत करतो.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आपल्या पत्नी व मुलांसोबत तो जेव्हा गावी जातो, तेव्हा त्याला गावाविषयी आपुलकी वाटते. गावातील मिणमिणते दिवे, माणसांची कुजबुज, गाई-गुरे यात तो आपले बालपण शोधतो. केरबाच्या वडिलांमध्ये तो आपल्या वडिलाला तर धर्माच्या आईमध्ये मातृत्वाचा शोध घेतो. प्रल्हादचे मन सतत प्रेमाचे भुकेले आहे. तो माणसांमध्ये नाती शोधण्याचा प्रयत्न करतो. पुढे मोठ्या पदावर काम करतानासुद्धा तो जुनी नाती शोधत जातो.

प्र. ई. सोनकांबळे यांचे व्यक्तिमत्त्व हे प्रगल्भ, समजूतदार, समंजस, क्षमाशील आणि शांत असे आहे. त्यांना कुणीही काम सांगितले तरी ते आर्वजून करताना दिसतात. लहानपणी बहिणीने सांगितलेली, तिच्या नवऱ्याने सांगितलेली किंवा गंगा म्हातारीने वतलात मेलेलं कुत्रं ओढण्यासाठी सांगितलेलं असो किंवा बोर्डिंगातील शिक्षकांनी सांगितलेली कामे असोत, ती कामे प्र. ई. करतात. उंट राखण्याच्या एका प्रसंगाबद्दल ते म्हणतात की, 'दाजीला सांगावसं वाटायचं की मी जात नाही म्हणून. पण नाही कसं म्हणणारं? कारण मी होतो हुकुमाचा ताबेदार. जणू काय वतनदार बलुतेदार. त्याला सारेच हक्क, फक्त हक्क नाही, नाही होय म्हणायचा. दाजी दुसऱ्याचा गुलाम तर मी त्याचा. पर्यायाने मी गुलामाचा गुलाम.' (पृ.३२) एकूणच काय तर कोणतेही काम करताना ते कमीपणा मानत नाहीत, तर ते प्रामाणिकपणे पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. सर्वांबद्दल आदर व्यक्त करतात. या सर्वांबद्दल ते स्वतःच्या परिस्थितीला आणि नशिबाला दोष देतात. सर्वांबद्दल क्षमाशील वृत्तीने वागताना दिसतात.

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनात सुरूवातीला पंधरा लेख होते. नंतरच्या आवृत्तीत ही संख्या अठ्ठावीस झाली आहे. यापैकी बारा लेख हे ग्रामीण जीवनातील जसे आहेत, तसेच ते बाल व किशोर वयातीलही आहेत. तर 'आठवणीची छावणी', 'उंटावरचा प्रवास' आणि 'कथा आणि व्यथा' हे तीन लेख प्रौढ नागर जीवनातील अनुभव व्यक्त करणारे आहेत. हे सर्व वेगवेगळे लेख असले तरी त्यात एक प्रकारची काळाच्या दृष्टीनेही सुसंगतता आहे. आईच्या मृत्यूनंतर परदेशी झालेल्या परलादापासून ते प्राध्यापकी पेशात पडलेले प्र.ई.सोनकांबळे आपल्या बायको व मुलांसोबत दिवाळीच्या सुट्टीत गावी येतात इथपर्यंतचा जीवनप्रवास या आत्मकथनात आलेला आहे.

एकूणच आपल्या जीवनविषयक आत्मानुभवांचा आविष्कार या आत्मकथनातून प्र.ई.सोनकांबळे यांनी केलेला दिसून येतो.

३.३.३ 'आठवणींचे पक्षी'मधील समाजजीवनाचे चित्रण

लेखक ज्या समाजात राहतो त्या समाजाचे चित्रण तो आपल्या साहित्यलेखनातून करत असतो. अशा वेळी तो आपल्या आजूबाजूचे समाजजीवन न्याहाळत असतो आणि तेच साहित्याच्या माध्यमातून आविष्कृत करत असतो. हे अनुभव त्याच्या एकट्याचे नसून त्या संपूर्ण समाजाचे असतात. समाजात जगत असताना त्याला आलेले अनुभव हे त्याच्या लिखाणाचे विषय झालेले असतात. या विषयाला सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व ऐतिहासिकतेचे अनेकविध पदर प्राप्त झालेले असतात. यातून काळाचा एक पट साकारत असतो. आठवणींचे पक्षी हे आत्मकथन वाचत असतानादेखील आपल्याला यासर्वांचा अनुभव येतो.

या आत्मकथनातील लेखक हा महार समाजाचा आहे. घरची परिस्थिती अंत्यत गरिबीची. लहानपणीच आईवडिलांचा मृत्यू झाल्यामुळे परदेशी झालेला लेखक आपल्या बहिणीच्या घरी वास्तव्यास आहे. बहिणीची परिस्थिती देखील अंत्यत गरिबीची आहे. दिवसरात्र काबाड कष्ट करून आपला संसार चालवणारी ही बहीण आहे. आपल्या बहिणीच्या संसारास हातभार म्हणून लेखक शक्य तेवढे प्रयत्न करतो. प्रसंगी स्वतः शेतीच्या कामाला जातो. वेळप्रसंगी बहिणीच्या सांगण्यावरून चाकरीसुद्धा राहतो. मेलेल्या जनावरांचं मांस स्वतः खात नसला तरी बहिणीच्या घरी खातील म्हणून बराच वेळ जनावरांचे मांस काढणाऱ्या ठिकाणी उभा राहतो. जे देतील ते घेऊन बहिणीला आणून देतो. भूकेने व्याकूळ असलेल्या समाजाला हे खाऊ नका म्हणून सांगणे फार अवघड असते. भुकेसाठी धडपडणाऱ्या समाजाला हे कळायला वेळ लागला. यासंदर्भात प्र.ई.सोनकांबळे लिहितात, 'कदी कदी मोट जनावर मरायचं, तर ते लोक, खास करून सटवा मामा, ते म्हणायचे, अर हा पाय धर, तो पाय धर. मला आवरायचा नाही सटक दिशा निसटायचा हातातून पाय व कातड्यातलं रगत लोकांच्या अंगावर उडायचं. मी जरा जपूनच रहायचो कारण कपड्यावर जर रगत पडलं तर शाळेतले लोक बोलतील. वाटायचं अिकडं आक्का न आणलं तर बोलतीया वाटायचं, पण पाय न धरला तर लोक बोलतील वाटून मन नसताना धरावंच लागायचं. काही पोरं तर तितच मास लपून ठिवायचे व घराला फरार व्हायचे व कधी कधी माणसायनी कापायला सुरू केलं की पोरं मासांच्या टुकड्यावरून भांडून घ्यायचे व तुला न मला घाल कुत्र्याला करून सोडायचे. आजूबाजूला कदी कदी कुत्रे असायचे ते लचकुन घेऊन पळायचे. अस व्हयाचं कदी कदी मासासाठी. कोणी बाचाबाची करायचे, तर कोणी मारामारी करायचे. तेव्हा ढोरंबी लई मरायची व ते खावून माणसंही खूप मरायचे.'(पृ.०२) भुकेसाठी धडपडणाऱ्या समाजाचे चित्रण प्र.ई.सोनकांबळे या ठिकाणी करताना दिसून येतात.

आदिम काळात आणि मेलेल्या जनावरासाठी कुत्र्यागिधाडांसोबत आपापसात भांडणाऱ्या माणसांच्या काळात काहीच फरक दिसून येत नाही. कुणी सांगितले की हे मांस खाऊ नका तर हा समाज ही गोष्ट स्वीकारत नाही. ती स्वीकारण्यास त्याला बरांच वेळ गेला. आज ही परिस्थिती बदलली आहे. परंतु त्याकाळाचा विचार केला तर पोट भरण्यासाठी या समाजासमोर पर्याय नव्हता. त्यामुळे मेलेल्या जनावरांचे मांस खाण्यात त्यांना वाईट वाटत नव्हते. इथल्या धर्माने, जातिव्यवस्थेने, वर्णव्यवस्थेने तळातील या माणसांची गोची केली होती. त्यांचे आर्थिक जीवनच संकटात टाकले होते. त्यामुळे या समाजाला सतत भुकेचा प्रश्न सतावत असल्याचे दिसून येते.

सामाजिक विषमतेचे चित्रण या आत्मकथनात दिसून येते. तत्कालीन काळातील उच्चवर्णीय शिक्षक शिक्षित असूनदेखील अस्पृश्य जातीतील लोकांबद्दल त्यांना किळस वाटते. प्रल्हाद गणिताच्या तासात इतर मुलांसारखे पळून जाण्यापेक्षा फाटक्या तुटक्या वहीत गणित सोडवून पहिल्याच दिवशी शिक्षकांना दाखवण्याचा प्रयत्न करतो. परंतु शिक्षक त्याच्याकडे कधी आपुलकीने, कौतुकाने पाहून

सही करत नाहीत. उलट आता ठेवून दे. उद्याला बघू, असे म्हणतो. शाळेतील शिक्षक दलितांच्या मुलांना काम सांगतात. लेखकाला आणि रामाला कुपाटी आणायला सांगितल्याने व त्यांना गणेशाने पाहिल्याने तो या दोघांना वाकवून अंगावर घाण आणि थंड पाणी टाकतो. हे दुःख केवळ दलित म्हणूनच वाट्याला आलेले असते. प्रल्हादजवळचे लालहिल्याळ बिबे पाहवत नसल्याने त्याने शेंगा खाल्ल्याचा आरोप करून बिबे घेणारी परयागबाई देखील लेखक केवळ दलित समाजातील आणि पोरका असल्यानेच अशी वागते. तसेच चेलम्यावर म्हणजे ज्या ठिकाणी जनावरे पाणी पितात त्या ठिकाणी तहानेने व्याकूळ झालेला लहान प्रल्हाद पाणी पिल्यावर तंबी देणारा झुपकेदार मिशावाला माणूस दलितांवर अन्याय करणारा, माणुसकीहीन, निष्ठूर असल्याचे दिसते. एकीकडे हा किळस तर दुसरीकडे लेखकाच्या पोटात भगभग, खांवखाव. त्यातच त्याला सुटलेली खरूज असूनदेखील तो शेतात जाऊन दगडाने शेंगा उकरून खातो. उच्चवर्णीय लोकांकडून मागून ओंजळीने पाणी पितो. अर्धी चतकोर भाकरी मिळेल या आशेपोटी वतलात मेलेलं कुत्र लांब टाकतो. परंतु भाकरी घेताना जातीवरून बोलणी खावी लागते. लक्ष्मी नावाच्या बाईला चुकून प्रल्हादचा पाय लागतो तेव्हा ती बाई शिवाशिव झाली म्हणून ओरडते. सामाजिक विषमतेची एक दुखरी सल याठिकाणी दिसते.

या आत्मकथनात लेखकाच्या बहिणीचे आणि त्याअनुषंगाने दलित समाजाचे दुःखच चित्रित झाले आहे. हे दुःख या समाजाचे प्रातिनिधिक दुःख आहे. ते एकट्या आक्काचे नसून समस्त दलित स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुःख आहे. लहानपणी जेव्हा प्रल्हादच्या हातून पाटी फुटते तेव्हा रामची आई आणि अक्का या दोघींमध्ये भांडणे होतात. दलित समाजातील या अंतर्विरोधाचे चित्रण या आत्मकथनात आहे. ज्या ठिकाणी दोन वेळचे अन्न मिळेल की नाही याची खात्री नसते अशावेळी फुटलेली पाटी पुन्हा घेणे शक्य नसल्याने हा वाद सुरू होतो.

दिवाळीच्या पूर्ण सुट्टीभर शेण आणून टाकायचे काम करूनही फक्त एक रूपयाचा व तो पण आखूड कुडता घेणारा पाटील या आत्मकथनात येतो. गवत कापत, खुरपायला जात, दुकान सारवीत, शेण काढत, आंबे राखीत, शेंगा काढीत, कापूस वेचीत, पळसाच्या पानांच्या पत्रावळ्या लावत आयुष्य जगणाऱ्या दलित समाजाचे हे चित्रण आहे.

प्र.ई.सोनकांबळे प्राध्यापक झाल्यावरही त्याच्यासोबत अस्पृश्यता जोडीलाच असते. कारण उंटावरून गावी जाताना जेव्हा त्यांची जात कळते तेव्हा उंटवाला फितूर होतो. 'मी म्हाराचा आहे' असे सांगताच उंटवाल्याचा नातेवाईक म्हातारा हा जातीने वंजारी असूनदेखील आपले बोलणे बंद करतो. प्रल्हाद हा सुल्लाळीचा आहे असे समजते, तेव्हा मरसावंगीचा पाटील नाक मुरडतो. औरंगाबादला राहून उच्च शिक्षण घेऊन देखील आपल्याला अशी वागणूक मिळाल्याचे प्र.ई.सोनकांबळे सहजपणे सांगतात. त्यांच्या लेखनात थोडासा उपरोध दिसतो, पण त्यापाठीमागे दुखरी सल असल्याचे आपल्या लक्षात येते.

मारूतीच्या पारावर श्रावण महिन्यात व आखाडीत पोथी, भजन चालते. प्रल्हाद देखील यात लांबून सहभाग घेतो. वारकरी पंथाविषयी त्याला आकर्षण आहे. त्याच्या आईने त्याला लहानपणी पंढरपूरला नेले होते. म्हणून तर तो मांस खात नाही. वेळप्रसंगी पाणी पिऊन पोटाची भूक भागवतो. प्रल्हाद लहानपणांपासून ते प्रौढ होईपर्यंत प्रामाणिक आहे. त्याची वृत्ती सरळ आणि साधी आहे. तो तोंडाने पखवाज, खंजिरी, एकतारा व चिपळ्यांचे आवाज काढतो. भजन करण्याने दुःख हलके होते अशी त्याची भावना आहे. भजन झाल्यानंतर त्याचे मित्र त्याला थोड्याशा अंतरावरूनच जेवण वाढतात. यातून उच्चवर्णीय जीवनस्तराची कल्पना येते.

यात्रा, उत्सव यांचे चित्रण या आत्मकथनात येते. माळेगावला भरत असलेल्या खंडोबाच्या यात्रेचे 'माळेगाव माळावरी तिथे नांदतो मल्हारी' किंवा 'वाघ्यामुरळी नाचती जिभंग कवड्या वेचिती' असे चित्रण प्र.ई.सोनकांबळे करतात. उंट प्राण्याविषयीचे बरेचसे चित्रण प्र.ई.करतात. लेखकाचे दाजी हे उंटावरून प्रवासी ने-आण करण्याचे काम करतात. तेव्हा उंटाला फिरवायला नेणे, त्याचे संगोपन करणे याची जबाबदारी बऱ्याचदा लेखकावर असे. त्यामुळे उंटाचा आणि लेखकाचा फार जवळून संबंध येतो. उंटाची लेंडी चुलीसाठी, वतलासाठी, बाळंतिणीच्या बाजेखाली शेगडी म्हणून उपयोगी पडते. प्रस्तुत आत्मकथनात संपूर्ण एक प्रकरण 'दोन प्राणी मी आणि उंट' अशा स्वरूपाचे आहे. यामध्ये लेखकाने उंटासोबतचे आपले अनुभव कथन केल्याचे दिसते.

गाव, परिसर, शेती याबद्दलची माहिती लेखकाला आहे. सुगीचे चित्रण, आंबाड्याचे खळे, कडब्याची बांधणी, यासारख्या शेती संस्कृतीशी निगडित गोष्टींचे चित्रण याठिकाणी येते. शेर, आटवा, चिपटं, आदील, पायली असे मोजमापनविषयक शब्दही सहजपणे येतात. गोट्या, विटीदांडू, कुस्ती इ. खेळांचे चित्रण येते. कावीळ, खरूज, नायटा यासारख्या रोगांचे, गोधडी, घोंगडी, लुगडं, नेहरू शर्ट यासारख्या पेहरावांचे चित्रण येते.

एकूणच प्र.ई.सोनकांबळे आपल्या आत्मकथनातून स्वतःची, स्वतःच्या समाजाची आत्मकथा तर सांगतातच, पण त्याचबरोबर गावगाडा, तेथील ताणतणाव, तिथल्या चालीरिती, सांस्कृतिक पर्यावरण, सण, श्रद्धा-अंधश्रद्धा, अस्पृश्यता, जातिभेद याविषयीचे विवेचन करतात. हे सर्व विवेचन त्यांच्या जगण्याशी, त्यांच्या अनुभवविश्वाशी सुसंगत आहे. व्यक्तिगत जीवनातील हे अनुभव त्यांच्या समाजाचे, समाजजीवनाचे व तत्कालीन काळाचे चित्रण करताना दिसते.

३.३.४ आठवणींचे पक्षीमधील प्रल्हाद

प्रल्हाद हा पोरका आहे. त्याला आईवडील नाहीत. प्रल्हाद लहान असतानाच आईवडिलांचा मृत्यू झालेला आहे. तो परदेशी आहे. बहिणीच्या घरी आश्रित म्हणून राहतो. काम कोणतेही असले तरी तो नाही म्हणत नाही. आपल्या बहिणीवरचा कामाचा भार कमी व्हावा म्हणून वाटेल ते कष्ट

करणारा हा लहानगा प्रल्हाद आहे. आपले जीवन स्वतःच घडवत तो जगतो. लहानपणीच आईवडिलांचा मृत्यू झाल्याने मोठी बहीण त्याला आपल्या घरी चेऱ्याला आणते. चेऱ्याला आल्यानतंर तो शाळेत जाऊ लागतो. कधी कधी त्याची बहीण त्याला टाकून बोलते. तरीही तो राग विसरून बहिणीला कामात मदत करतो. गवतचारा आणतो. गावोगाव हिंडून शिष्यवृत्तीचे अर्ज वाटतो. शेतीच्या कामासाठी गुत्त्यात जातो.

आक्काचे घर जळाल्याने तिचा संसार उद्ध्वस्त होतो. त्याचा परिणाम प्रल्हादवरही होतो. त्याला तीन वेळचे जेवण व महिना साडेचार रूपये रोखीने प्रल्हादला चाकरी ठेवले जाते. सुरुवातीला प्रल्हादला बरे वाटते. नंतर वाईटही वाटते. कारण लोक जनावरे वळायला, त्यांचे शेणघाण काढायला, कडबा आणायला सांगायचे. काम झाल्यानंतर हागणदारीजवळ त्याला जेवायला बसवतात. हे सर्व प्रल्हादला वाईट वाटत असे, पण पोटासाठी आणि पोटातील भूक शांत करण्यासाठी, आपल्या बहिणीला बरे वाटावे, यासाठी तो सर्व सहन करतो.

हाडोळती येथे शाळेत गेल्यावर मधल्या सुट्टीत मुले व्हरांड्यात जेवण्यासाठी बसले की प्रल्हाद हळूच शेंगा काढून नेलेल्या पाठीमागच्या शेतात जातो. अंगाला खरूज झालेली असूनही दगडाने शेतातील माती उकरून शेंगा खातो. माळ्याच्या मळ्याभोवती फिरून जनावरे हाणतो कारण पाटलाने ते पाहून भाकरी द्यावी, हा त्यामागचा हेतू असतो. शिरिधर मास्तरच्या लग्नाला केवळ जेवायला मिळेल म्हणून राजूरपर्यंत प्रल्हाद पायी चालत जातो. राजूरच्या बोर्डिंगात असताना प्रल्हादला कावीळ आणि खरूज दोन्ही आजार होतात. त्याचे अंग नासल्यासाखे होते. डोक्यात उवा बुळबुळतात. खरूजामुळे त्याला नीट बसताही येत नसते. त्याच्या अंगाचा व कपड्यांचा घाण वास येतो. परिणामी बोर्डिंगातील मुले त्याला पाहून छिःथुः करत असत.

वारकरी पंथाविषयी प्रल्हादला आकर्षण आहे. त्याच्या आईने त्याला लहानपणी पंढरपूरला नेले होते. म्हणून तर तो मांस खात नाही. वेळप्रसंगी पाणी पिऊन पोटाची भूक भागवतो. प्रल्हाद लहानपणापासून ते प्रौढ होईपर्यंत प्रामाणिक आहे. त्याची वृत्ती सरळ आणि साधी आहे. तो तोंडाने पखवाज, खंजिरी, एकतारा व चिपळ्यांचे आवाज काढतो. भजन करण्याने दुःख हलके होते, अशी त्याची भावना आहे.

३.३.५ आठवणींचे पक्षीमधील इतर व्यक्ती

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातून अनेक व्यक्ती साकार झाल्या आहेत. या व्यक्ती कौटुंबिक आहेत. सामाजिक आहेत. जिवंत वाटणाऱ्या आहेत. प्र.ई.सोनकांबळे यांनी मोजक्या आणि नेमक्या शब्दात व्यक्तिचित्रणे रेखाटली आहेत. त्यांना भेटणारी माणसे ही चांगली आणि वाईट अशा दोन्ही प्रवृत्तीची आहेत. या दोन्ही प्रवृत्तींच्या लोकांबद्दल सोनकांबळे प्रांजळपणे लिहिताना दिसतात.

प्र.ई.सोनकांबळे यांनी आपल्या आत्मकथनात अनेक व्यक्ती चित्रित केलेल्या आहेत. या लोकांचा लेखकांशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे अनेकदा संबंध आलेला आहे. अनेक व्यक्तींचे मोजक्या आणि नेमक्या शब्दात त्यांनी चित्रण केलेले आहे. आईवडिलांच्या मृत्यूनंतर बहिणीकडे आल्यापासून ते एका महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून म्हणून रूजू झाल्यानंतर आपल्या पत्नी मुलांसोबत पुन्हा गावी येईपर्यंतच्या आठवणी या आत्मकथनात आहेत. या प्रवासात जी अनेकविध माणसे भेटलीत त्यांचे चित्रण या आत्मकथनात आहे. त्यातील काही लोकांचा हातभार त्यांच्या जडणघडणीत आहे. अशा काही व्यक्तींविषयी माहिती याठिकाणी महत्त्वाची वाटते.

१. आक्का

'आक्का' हे या आत्मकथनातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे. ती प्र.ई.सोनकांबळे यांची सर्वात मोठी बहीण आहे. तिची परिस्थिती अंत्यत गरीब आहे. तिचे लग्न आत्तीच्या मुलाशी धोंडिबाशी झालेले आहे. धोडिंबा हा गरीब स्वभावाचा आहे. उंट राखण्याचे काम तो करतो. त्यातून जे काही पैसे मिळायचे त्यावर त्यांचा संसार भागत नसे. परिणामी आक्काही काम करते. फाटक्या संसाराचा गाडा ती स्वतःच ओढते. बिदवा गोळा करण्याचे काम ती करते. बिदवा म्हणजे साऱ्या गावातील रस्त्यावरची माती सावडून गोळा करून केरकचरा काढून व त्याला भल्या मोठ्या चाळणीने गाळून घेणे. धोंडीबाला याबद्दल काहीच वाटत नाही. तो मुलांप्रमाणे जे असेल ते गिळायचा. त्यामुळे आक्का आपल्या नवऱ्यावर चिडते. त्याला शिव्या देते. यातून दोघांत वाद व्हायचे. प्र.ई. म्हणतात, 'मग दाजी लई मायचं एकून चिडायचा व मज्या आक्काला जे बेहद मारायचा ते कधी कधी तिचं डोस्कं फुटायचं व रगत भळ येयाचं भाईर. भईन मेलो रे मेलो बापरे म्हनीत शिव्या देत खाली बसायची. तरी माय लावून देयाचीच व दाजी लगवायचाच. मला लई वंगाळ वाटायचं. पण करणार काय. मला वाटायचं की अपून बी त्याला मारावं, पण मजा जीव व्हता न्हानगा.' (पृ. २२) अशा परिस्थितीतही अक्का आपल्या संसाराचा गाडा ओढते. आईवडिलांच्या मृत्यूनंतर ती प्रल्हादला आपल्या घरी आणते. गावातील शाळेत त्याचे नाव घालते. आपल्या भावाविषयी तिला प्रेम आहे. तसेच ती त्याच्यावर रागावतेही. शाळेत गेल्यावर राम नावाच्या मुलाची पाटी प्रल्हादकडून फुटते तेव्हा ती त्याला शिव्या देते. प्रल्हाद हा मटण खात नाही. तेव्हा ती त्याला म्हणते, ''आरं बापू चिंचोक्यानं पोट भरत नाही, खा रं.'' स्वतःची प्रकृती जेव्हा बिघडते किंवा तिला कसर येते तेव्हा ती वाळवून ठेवलेल्या 'चाण्या' खाते. आपले आईवडील नाहीत म्हणून ती आपल्या लहान बहिणीला बाळंतपणासाठी आपल्या घरी आणते. परंतु बाळंतपणात रात्री रॉकेलचा दिवा ठेवल्याने तिचे घर जळते. तिचा पूर्ण संसार उघड्यावर पडतो. अशावेळी इच्छा नसतानादेखील ती प्रल्हादला पाटलाकडे चाकरीस ठेवते.

जळालेला संसार ती नव्याने उभा करते. शेतात कामाला जाते. आपल्या मुलाबाळांसाठी शेण काढते. लाकडे टाकते. हाडं गोळा करते. हळद विकण्याचे काम करते. या सर्व कामातून जे पैसे मिळतात त्यातून ती तेल मीठ आणते. त्यातून स्वतःच्या कुटुंबाची भूक भागवण्याचा प्रयत्न करते. आक्काचे तिच्या भावावर खूप प्रेम आहे. त्याच्या अंगावरील छत्रीच्या काडीने डागलेले डाग बघून तिला वाईट वाटते. महिनाभर शेण गोळा करून जेव्हा त्याला फक्त एक रूपया आणि आखूड कुडता बघून ती प्रल्हादवर रागावते. परंतु तिचे हे प्रेमापोटीचे रागावणे आहे. आपल्या भावाने इतके दिवस काम करून त्याला योग्य असा मोबदला मिळाला नाही म्हणून तिच्या अंतःकरणातील ही तळमळ आहे.

औरंगाबादवरून जेव्हा प्र.ई.सोनकांबळे आक्काकडे जातात तेव्हा प्रल्हादला पाहून ती आनंदाने वेडी होते. आपला भाऊ खूप शिकला, याविषयी तिला अभिमान वाटतो. ती प्रेमाने त्याचे मुके घेते. डोक्यावरून, गालावरून हात फिरवून कडकड बोटे मोडते. तिची ही भावाबद्दलची वेडी माया आहे. आपल्या गतकाळातील काही प्रसंग आठवून दुःख आणि आनंद दोन्ही वाटून घेणारी ही आक्का आहे. तिचे हे वागणे तिच्या परिस्थितीतून आकार घेताना दिसते. तिची ही जगण्याविषयीची धडपड आहे. हे केवळ एकट्या आक्काचे चित्रण नसून समस्त दलित समूहातील स्त्रीजीवनाच्या वाट्याला आलेल्या जगण्याचे चित्रण आहे.

२. मुक्ता

आक्काबरोबरच प्रल्हादला मुक्ता नावाची आणखी एक बहीण आहे. प्र.ई.तिचा उल्लेख मुगता असा करतात. तिचेदेखील लग्न जगळपुरातील आत्तीच्या मुलाशी किसनशी झालेले आहे. ती साधी भोळी आणि येडसर बिचारी आहे. ती गरीब गाय आहे. जेव्हा चेऱ्याला आक्काच्या घरी भांडणे व्हायची तेव्हा प्रल्हाद भिऊन जगळपूरच्या बहिणीकडे जातो. तिथेपण तो थेट तिच्या घरी न जाता दाजीच्या भीतीपोटी तो नेहमी गावातील मऱ्याआईच्या देवळात जातो. आपला भाऊ आला आहे, हे तिला गावातील लोकांकडून कळत असे. तेव्हा ती देवळात जाऊन प्रल्हादला घरी घेऊन येत असे. प्र.ई.म्हणतात, 'तितल्या दाजीचा सबाव जरा अलक व्हता. ते निसते डोळं वटरायचे व धुमकारतच बोलायचे व तेयला मज जानं बरं वाटायचं न्हाई, व वाटलं तरी मी तेयला खसपटासारंक वाटायचो.'(पृ.२३) प्र.ई. आपल्या दाजींना भीत भीतच घरी जात असे.

कधी कधी प्रल्हाद तिला न सांगताच आक्काकडे जातो. तेव्हा ती प्रल्हादचा शोध घेते. त्याला शोधण्यासाठी तिचा जीव हुरहुर करतो. तिच्या डोळ्यातून पाणी येते. आपला भाऊ कुठे गेला असेल, त्याने काही खाल्लं असेल की नाही, असे अनेक प्रश्न तिच्या मनात येतात. आक्काप्रमाणे हिच्या अंतःकरणातही भावाबद्दल प्रेम, आपुलकी, माया आहे. परंतु नवऱ्याच्या आणि सासूच्या दबावापुढे

ती असमर्थ आहे. आपल्या भावाने खूप शिकावे, मोठा माणूस व्हावे असे तिला सतत वाटते. 'ती सांगितलेल्या कामाची व दिल्या भाकरीची सासूरवाशीण होती' (पृ.२३) अशा पद्धतीचे आपल्या बहिणीचे चित्रण प्र.ई.करतात.

३. वानखेडे सर

आक्का, धोडिंबा, मुक्ताबाई आणि किसन या प्र.ई.यांच्या कुटुंबातील महत्त्वाच्या व्यक्ती असल्या तरी याशिवायही अनेक व्यक्ती या आत्मकथनात भेटतात. त्यातीलच एक म्हणजे प्रा.म.ना.वानखेडे होय. प्र.ई.सोनकांबळे यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आणि वाङ्मयीन जडणघडणीत वानखेडे सरांचा महत्त्वाचा वाटा आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना प्र.ई.यांचा वानखेडे सरांशी सतत संपर्क येत असे. इंग्रजी शिकवायला आलेल्या या प्राध्यापकाचा लेखकांवर गाढ असा प्रभाव पडलेला दिसतो. वसतिगृहात जेव्हा प्र.ई.ना अंथरूण नव्हते, तेव्हा ते पाहून वानखेडे सर त्यांना म्हणतात, 'उद्या सर्वाबरोबर एक अर्ज कर. गादी घे एक. १० रु. मिळतील तुला.' असे म्हणून त्यांना अंथरूणाची व्यवस्था करून देतात. त्यांचे हे आपलुकीचे बोलणे प्र.ईं.ना भावते. ते जेव्हा पहिल्यांदा मुंबईला जातात तेव्हा त्यांना इंग्रजी प्रश्न विचारणारे, हाताला धरून जाता-येता रस्ता पार करायला मदत करणारे प्राचार्य सर हे दयाळू होते. सतत प्रसन्न असणारे हे व्यक्तिमत्त्व प्र.ई.यांना उल्हासी, रूबाबदार व तेजस्वी वाटते. १९६८ साली मुंबईत भरलेल्या जागतिक बुद्धिस्ट कॉन्फरन्सला ते प्र.ई.ना स्वतः बोलावून घेऊन जातात. विद्यार्थी असूनही त्यांचे पाहुण्यांसाखे स्वागत करतात. मोठमोठ्या लोकांशी ते आर्वजून प्र.ई.ची ओळख करून देतात. लक्ष्मी कॉलनीतल्या त्यांच्या घरात स्वतःच्या ताटात घेऊन प्र.ई.ना जेवू घालतात. 'तुम्ही तरूण आहात जास्त खा... शरीरयष्टी चांगली ठेवत जा' (पृ. ५७)असा प्रेमाचा सल्लाही वानखेडे सर देतात.

एक माणूस म्हणून प्रा.म.ना.वानखेडे यांचे वागणे श्रेष्ठ दर्जाचे होते. त्यांनी प्र.ई.सोनकांबळे यांना विद्यार्थिदशेपासून खूप लळा लावला. प्रेम दिले. त्यांच्या आकस्मिक निधनाने प्र.ई.यांना खोल जखम झाली होती. दलित साहित्य चळवळीच्या एका महान अशा व्यक्तीचा सहवास प्र.ई.यांना लाभला होता. त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव या आत्मकथनामधूनही दिसून येतो. याशिवाय प्रा. रा. ग. जाधव, प्रा. ल. बा. रायमाने, वा. ल. कुलकणी, शंकरराव खरात, बाबूराव बागूल, अर्जुन डांगळे, विजय तेंडूलकर यासारख्या अनेक व्यक्तींचा प्रभाव प्र. ई. सोनकांबळे यांच्यावर झालेला दिसून येतो. त्यांच्या जीवनात अनेकविध प्रकारची माणसे, वेगळवेगळ्या स्वभावाच्या व्यक्ती येत गेल्या. त्या सर्वांची चित्रणे थोड्याफार प्रमाणात या आत्मकथनातून दिसून येतात.

३.३.६ आठवणींचे पक्षीमधील अन्य विशेष

भाषा हा साहित्यलेखनाचा महत्त्वाचा घटक आहे. भाषेच्या वापरातून साहित्याची निर्मिती होत असते. प्र.ई.सोनकांबळे यांच्या आत्मकथनाची भाषा ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या या कलाकृतीचा सर्वांगाने विचार करता भाषाशैली हा घटक महत्त्वाचा ठरतो. आशयाचे साकारत्व हे भाषेच्या माध्यमातून होत असते. हे माध्यम समाजघटकाच्या कोणत्या भागातून निवडावे याचे पूर्ण स्वातंत्र्य लेखकाचे ठरते. त्यामुळे अनुभवक्षेत्राच्या परिघातील भाषा निवडून लेखक त्या त्या अनुभवाला न्याय मिळवून देत असतो.

भाषा आणि निवेदशैली हा या आत्मकथनाचा एक महत्त्वाचा असा पैलू आहे. हे आत्मकथन हे आत्मानुभवाचा एक आविष्कार आहे. विशिष्ट अशा प्रदेशातील प्रादेशिक महारी बोलीभाषेचा वापर या आत्मकथनात येतो. प्र. ई. सोनकांबळे ज्या भागात वाढले तो भाग तेलगू आणि कानडी भाषिक प्रदेशालगतचा असल्याने त्यांच्या आत्मबंधनात भाषेची अनेकविध रूपे सापडतात. इतर भाषेचा परिणाम त्यांच्यावर वेगवेगळ्या प्रकारे होताना दिसतो. प्र. ई. यांच्या आत्मकथनातून येणारी भाषा ही त्यांच्या अनुभवविश्वातून साकार झालेली आहे. त्यांच्या जगण्याविषयीचे आणि भाषेविषयीचे अनेक संदर्भ या आत्मकथनातून येतात.

साठनंतरच्या दशकात दलितांच्या वाट्याला जे जगणे आले त्याचे चित्रण ही भाषा करते. संताप, आगतिकता, घृणा, तिरस्कार, नैराश्य, एकटेपण, बकालपण, बेकारी या सगळ्यांचा अनुभव प्रकट करते. सहजसुलभ जीवनापासून अलिप्त असलेल्या या समाजाच्या एकूण जगण्याचे चित्रण या आत्मकथनातून चित्रित झाले आहे. वास्तवदर्शी जगण्याचे चित्रण ते आपल्या लेखनातून करतात. जगण्याविषयी तळमळ, तसेच भावनांचे, दुःखाचे दर्शन यासारख्या अनेक गोष्टी याठिकाणी दिसून येतात. प्र.ई.सोनकांबळे यांच्या आत्मकथनात जात-वास्तव सांगणाऱ्या बोली भाषेचा वापर दिसून येतो. बोलीभाषेची ही रूपे सामाजिक जाणिवेचे भान करून देणारी आहेत. या आत्मकथनात विशिष्ट प्रादेशिक महारी बोलीचा वापर केल्याने अनेक ग्रामीण शब्द येतात. उदा. विदवा, वटरू, फिटरू, परदिसा, लई, पुराड्या, चाण्या, सागोनी, हलाल, चारटफिरट, लोकाशी, वंजळ चेलमा, धमदिशा, चिकूल, निवद, कुपाटी, वळणी वस्तरी यासारखे शब्द येतात. मराठवाड्यातील बोली भाषेचे अनेक पदर या आत्मकथनातून साकारतात.

साहित्यकृतीमध्ये निवेदक हा घटक महत्त्वाचा असतो. लिखित अथवा मौखिक स्वरूपात कथा सांगणाऱ्याला निवेदक असे म्हटले जाते. कथेला कथनात्मक संहितेची आंतरिक जुळणी करून परिभाषेतून श्रोत्याशी संवाद साधण्याचे काम निवेदक करत असतो. 'निवेदकाच्या दृष्टिकोणामागे लेखकाचा विशिष्ट कलाहेतू असतो. या कलाहेतूनुसार कथाकार निवेदन पात्राच्या दृष्टिकोणातून

कथेतील विविध घटकांची विशिष्ट रीतीने संघटना करत असतो. एका अर्थाने तत्त्वतः कथेतील समग्र भावविश्वाचे सूत्रचालन कथाकार करत असतो.' (सुधीर रसाळः१९८७:२९४) निवेदनपद्धतीचे प्रथमपुरूषी, द्वितीयपुरूषी आणि तृतीयपुरूषी असे तीन प्रकार असतात. प्रथमपुरूषी व द्वितीयपुरूषी निवेदक हे कथेतील एक पात्र असते. हे पात्र कथेत केंद्रवर्ती असते. तर तृतीयपुरुषी निवेदक हे कथेबाहेरील एक निवेदक पात्र असते. ती कथाविश्वात उपस्थित नसलेली व्यक्ती असते. प्र.ई.सोनकांबळे यांच्या आत्मकथनात प्रथमपुरूषी निवेदनपद्धतीचा वापर दिसून येतो.

संवाद हा वर्णन, कथन, भाष्य या निवेदन प्रकाराप्रमाणेच साहित्यलेखनाचा एक भाग आहे. पात्रापात्रांच्या संवादातून व कथासंहितातून संवाद अभिव्यक्त होत असतात. त्या त्या व्यक्तीचा सामाजिक स्तर, लिंगभेद, वर्तनस्वभाव हा या संवादातून व्यक्त झाला आहे. 'पात्रांचे एकमेकांना उद्देशून बोलणे ही त्यांची एक भाषिक कृतीच असते. त्यामुळे स्वाभाविकपणेच कथानक पुढे नेण्याचे, गतिमान करण्याचे कार्य संवादाद्वारे घडत असते.' (विजया राजाध्यक्ष : २००२ :३७०) संवादामुळे प्रसंगाना प्रत्यक्षतेचा परिणाम लाभत असतो. संवादाच्या वापरातून त्या-त्या व्यक्तीचे स्वभावदर्शन वाचकांसमोर घडते. संवादातून त्या त्या व्यक्ती आणि त्यांची मूल्यदृष्टी, विविध मनोवस्थांतरे व्यक्त होत असतात. संवाद हे विशिष्ट स्थलावकाशातले आहेत. ग्रामीण परिसरातील लोकांच्या बोलीतील भाषारूपांचा संवादासाठी वापर केला आहे. त्या त्या व्यक्तीचे मनोगत सांगण्यासाठी हे संवाद महत्त्वपूर्ण ठरतात. एकूणच आपल्या जीवनविषयक आत्मानुभवांचा आविष्कार या आत्मकथनातून प्र.ई.सोनकांबळे यांनी केलेला दिसून येतो.

३.४ सारांश

एकूणच शेकडो वर्षे पिढ्यान्पिढ्या सहन करत आलेल्या अन्यायाला, दैन्याला, दुःखाला वाचा फोडण्याचे काम दलित साहित्याने केल्याचे दिसते. अशा या दलित साहित्याच्या जडणघडणीत प्र. ई. सोनकांबळे यांचे स्थान मोलाचे ठरते. आपल्या आत्मकथनातून स्वतःची, स्वतःच्या समाजाची आत्मकथा ते सांगतातच पण त्याचबरोबर गावगाडा, तेथील ताणतणाव, तिथल्या चलीरिती, सांस्कृतिक पर्यावरण अस्पृश्यता, जातिभेद याविषयीचे विवेचन करतात. एकूणच वाङ्मयीन परंपरेत प्र. ई. सोनकांबळे यांचे योगदान महत्त्वाचे ठरते.

३.५ शब्दार्थ व टीपा

बिदला भरणे - घराच्या भिंतीवर मातीचे लेप लावणे.

मोट - विहिरीतून पाणी काढण्याचे साधन

बलुतं – गावात वर्षभर नेमून दिलेले काम मोफत करणाऱ्या काही जातींना सुगीच्या वेळी दिले जाणारे धान्य

चतकोर – पाव भाग, एक चतुर्थांश

कोस – सुमारे दोन मैल अंतर

आवगड – अवघड, कठीण

ताबेदार – अधीन, बंदी

कवळ – कावीळ

खरूज – त्वचेचा एक रोग

चेलमा – जनावरांना पाणी पिण्यासाठी तयार केलेली जागा

वर्दी देणे – सांगावा धाडणे

बुजणे – घाबरणे

दचकणे – अचानक भीती वाटणे

सदा रोगी – सतत आजारी असणे

चवताळणे – संतापणे

३.६ स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे

■ **वस्तुनिष्ठ प्रश्न**

अ) गाळलेल्या जागी योग्य पर्याय निवडा.

१. प्र. ई. सोनकांबळे यांच्या .... या लेखाने दलित आत्मपर लेखनाला सुरुवात झाली.

(वाटाड्या / असं हे सगळ / पोत आणि पदर / आठवण छावणीची)

२. प्र. ई. सोनकांबळे यांनी .... या त्रैमासिकातून लिखानास प्रारंभ केला.

(अस्मितादर्श / मराठवाडा दिवाळी अंक / प्रबुद्ध भारत / सिंहगर्जना)

३. .... यांच्या सहवासात प्र. ई. सोनकांबळे यांची महाविद्यालयीन जडणघडण झाली.

(डॉ. बाबासाहेब आंबेडकर / प्रा. म. ना. वानखेडे / प्रा. म. भि. चिटणीस / बाबूराव बागूल)

४. .... केल्याने दुःख हलके होते असा प्रल्हादचा समज होता.

(पोटभर जेवण / विलाप / भजन / कष्ट)

५. प्र. ई. सोनकांबळे यांच्या बहिणीचे नाव .... आहे.

(मुक्ता / ललिता / सुमन / शांता)

उत्तरे : १. वाटाड्या, २. अस्मितादर्श, ३. प्रा. म. ना. वानखेडे, ४. भजन, ५. मुक्ता

३.७ सरावासाठी स्वाध्याय

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. दलित आत्मकथनामध्ये 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाचे योगदान स्पष्ट करा.

२. 'आठवणींचे पक्षी' मधील समाजजीवनाचे चित्रण करा.

३. 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातील अनुभवविश्व स्पष्ट करा.

ब) टीपा लिहा.

१. 'आठवणींचे पक्षी'मधील प्रल्हाद

२. 'आठवणींचे पक्षी'मधील आक्का, मुक्ता

३. प्रा. म. ना. वानखेडे

४. 'आठवणींचे पक्षी'चे भाषाविशेष

३.८ उपक्रम

१) इतर दलित आत्मकथने वाचून त्यांच्या तुलनेत 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनाचे योगदान तपासा.

२) स्वतःच्या आयुष्याविषयी लिहिण्याचा प्रयत्न करा.

३.९ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :

१. कटारे, मोतीराम. २००० : मूल्यशोध, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद.

२. कऱ्हाडे, सदा, २००१ : दलित साहित्य चिकित्सा, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद,

३. कवठेकर, बाळकृष्ण १९८१ : दलित साहित्यः एक आकलन, अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

४. कुलकर्णी, गो.म. १९९७ : दलित साहित्य : प्रवाह आणि प्रतिक्रिया, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

५. कुंभार, प्रकाश १९९१ : दलित कथा साहित्य, प्रियदर्शनी प्रकाशन, कोल्हापूर.

६. फडके, भालचंद्र १९७७ : दलित साहित्य वेदना आणि विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

७. बागूल, बाबुराव १९८१ : दलित साहित्य : आजचे क्रांतिविज्ञान, दिशा प्रकाशन, नाशिक.

❑❑❑

सत्र २ : घटक ४

चाळेगत

– प्रवीण दशरथ बांदेकर

अनुक्रमणिका

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय-विवेचन

४.४ समारोप

४.५ नमुना प्रश्नोत्तरे

 ४.५.१ योग्य पर्याय निवडा

 ४.५.२ एका वाक्यात उत्तरे

४.६ सरावासाठी प्रश्न

 ४.६.१ दीर्घोत्तरी

 ४.६.२ लघुत्तरी

४.७ उपक्रम

४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

४.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला पुढील गोष्टी समजून येतील.

- एकोणीसशे नव्वदनंतरच्या मराठी कादंबरीचे स्वरूप लक्षात येऊन त्यामध्ये प्रवीण बांदेकरांच्या 'चाळेगत'चे स्थान निश्चित होईल.
- प्रवीण दशरथ बांदेकर यांची वाङ्मयीन जडणघडण समजून घेता येतील.
- कादंबरीच्या इतिहासातील 'चाळेगत' या कादंबरीचे स्थान स्पष्ट होईल.
- 'चाळेगत' या कादंबरीतील सामाजिक समस्या व तिला लाभलेला सामाजिक परिवेश समजून घेता येतील.

- 'चाळेगत' या कादंबरीच्या आधारे नव्वदोत्तरी मराठी कादंबरीचे बदलते स्वरूप समजून घेता येतील.
- कादंबरी या साहित्यप्रकारच्या अभिव्यक्तीच्या शक्यता समजून घेऊन 'चाळेगत'चे अभिव्यक्ती विशेष लक्षात घेता येतील.
- एकूण वाङ्मय परंपरेतील एका लेखकाचे व त्याच्या साहित्यकृतीचे योगदान समजून घेता येईल.
- कादंबरी या वाङ्मय प्रकारच्या क्षमता व प्रयोगशीलता याचा अभ्यास करता येईल.
- आस्वादक व रसिकाच्या भूमिकेतून 'चाळेगत' कादंबरीचा आस्वाद व रसग्रहण करता येईल.

वरील उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रस्तुत घटकाचा अभ्यास करावयाचा आहे.

४.२ प्रास्ताविक

प्रवीण दशरथ बांदेकर हे नव्वदोत्तरी मराठी साहित्यातील महत्त्वाचे लेखक. त्यांनी कविता, कादंबरी, ललित गद्य, बालसाहित्य व साहित्य समीक्षेच्या क्षेत्रातही आपला स्वतंत्र ठसा उमटविला आहे. स्वतंत्र जाणिवा मुखर करणारा कवी म्हणून मराठी साहित्यक्षेत्रात त्यांना विशेष स्थान आहे. त्यांचे *येरू म्हणे* व *खेळखंडोबाच्या नावानं...* हे दोन कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. *चाळेगत* व *उजव्या सोंडेच्या बाहुल्या* या दोन कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. त्याच बरोबर *घुंगुरकाठी* सारखे ललित गद्य व *चिंटू चुळबुळे* हे बालसाहित्यही त्यांनी लिहिले आहे. त्यांचा *येरू म्हणे* पासून *उजव्या सोंडेच्या बाहुल्या* पर्यंतचा प्रवास आत्मनिष्ठ जीवन जाणिवांना समाजनिष्ठ बनवण्याकडचा आहे. त्यांनी प्रथम येरू म्हणेच्या माध्यमातून आत्मनिष्ठ स्वरूपाची कविता लिहिली. नंतर *खेळखंडोबाच्या नावानं...* मधून कथनात्मक स्वरूपाची दीर्घ कविता लिहिली त्यानंतर *चाळेगत* मधून कादंबरीच्या एका प्रयोगशील रूपबंधाचा उपयोग केला. त्यांनी आपल्या सबंध लेखनामध्ये जे वेगवेगळे रूपबंध वापरले आहेत त्यामध्ये कोठेही जाणीवपूर्वकता नाही. आशयाच्या गरजेतून हे वैविध्यपूर्ण रूपबंध अवतरले आहेत. त्यांच्या साहित्यातील अभिव्यक्ती बरोबरच आशयामधील प्रयोगशीलताही विशेष लक्षणीय आहे.

चाळेगत या कादंबरीने आपल्या आशय, विषय व अभिव्यक्तीतील वैविध्यामुळे आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ही कादंबरी १९९० नंतरच्या कोकणातील घडामोडींवर बेतलेली आहे. समकाळातील महाराष्ट्रातील विशेषत: कोकणातील सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक उलथापालथ वेगवेगळ्या एपिसोडमध्ये होताना दिसते. हे बहुमुखी सामाजिक वास्तव एकरेषीय कथनात्मक संहितेतून मांडणे शक्य नाही. त्यामुळे बांदेकरांनी हे बहुमुखी सामाजिक वास्तव मुखर करण्यासाठी व मच्छिमार, शेतकरी वर्गाच्या अस्ताव्यस्ततेला सामावून घेण्यासाठी आवश्यक असलेल्या बहुमुखी कथनात्मक पद्धतीचा प्रयोगशीलतेने वापर केला आहे. या कादंबरीमध्ये गोष्ट सरळ एका दिशेने पुढे न सरकता तीमधून अनेक गोष्टी अनेक दिशांनी पसरत जातात. ही कादंबरी

प्रथमदर्शनी तिच्यातील बहुमुखी कथानकामुळे व मांडणीतील अस्ताव्यस्ततेमुळे गुंतागुंतीची वाटते. परंतु या प्रयोगशील रूपबंधामध्ये आविष्कृत झालेले सामाजिक वास्तवच इतके बहुमुखी, अस्ताव्यस्त व गुंतागुंतीचे आहे की त्याला सामावून घेण्याच्या गरजेतूनच या रूपबंधाने आकार घेतला आहे. त्यामुळे लेखकाला भेटलेल्या या समकालीन वास्तवाइतकीच कादंबरीची संहिताही गुंतागुंतीची झाली आहे.

४.३ विषय–विवेचन

४.३.१ प्रवीण बांदेकरांची वाङ्मयीन जडणघडण

प्रवीण बांदेकर यांचे मूळ घराणे गोव्यातल्या कारवारचे होते. मात्र सुमारे तीनशे वर्षापूर्वी शिवकालाच्या दरम्यान त्यांचे पूर्वज दक्षिण कोकणातील तेरेखोल नदीच्या काठी शेर्ले बांदा या गावी स्थायिक झाले. त्यांच्या वडिलांनी मॅट्रीकनंतर एक शेती संबंधित कोर्स करून शेती खात्यात नोकरी पत्करली. दर तीन–चार वर्षांनी त्यांची वेगवेगळ्या ठिकाणी बदली होत असे. वडिलांच्या या बदलीच्या नोकरीमुळेच बांदेकरांना लहानपणापासूनच कोकणातील लांजा, राजापूर, गुहागर, सावंतवाडी, वेंगुर्ले, मालवण या भागातील छोट्या छोट्या गावातून फिरता आले. त्यामुळे लहानपणापासून संपूर्ण कोकण बांदेकरांच्या जाणिवेत व नेणिवेतही बसला होता. वाचनाचे संस्कार लहानपणापासून त्यांच्या घरात होते. त्यांच्या आजोबांना शेकडो अभंग तोंडपाठ होते. त्यांनी स्वतःही काही अभंगांची रचना केली होती. त्यांच्या वडिलांनाही वाचनाची आवड होती. ते काही कामानिमित्त तालुक्याच्या गावी गेले की येताना मुलांच्या वाचनासाठी वृत्तपत्रे, मासिके व गोष्टींची पुस्तके घेऊन येत. बांदेकरांच्या लहानपणी त्यांना शाळेत चांगले गुण मिळाले की त्यांचे वडील त्यांना गोष्टीची पुस्तके भेट देत. यातूनच त्यांच्यावर वाचनाचे संस्कार घडत गेले.

बांदेकर जरी मूळचे बांद्याचे असले तरी त्यांचा जन्म त्यांच्या आजोळी वेंगुर्ल्याला झाला असल्यामुळे व महाविद्यालयीन शिक्षणही वेंगुर्ल्यातल्या बॅरिस्टर खर्डेकर महाविद्यालयात झालेलं असल्यामुळे वेंगुर्ल्याशी त्यांची अतूट नाळ जुळलेली. तिथेच त्यांना मराठीतील ज्येष्ठ कवी गुरूनाथ धुरी व सत्यकथेतून कथा लिहिणारे शशिकांत यार्नाळकर हे प्राध्यापक लाभले. यांच्या मार्गदर्शनामुळेच कविता म्हणजे काय याचे डोळस भान बांदेकरांना आले. याच काळात राष्ट्र सेवा दलासारख्या सेवाभावी संघटनेशी बांदेकर जोडले गेले. राष्ट्र सेवा दलाचे काम करताना त्यांना स्त्री–पुरुष समानता, बुद्धिप्रामाण्यवाद, न्याय, सामाजिक समता, ज्ञाननिष्ठा या मूल्यांचा परिचय झाला. साने गुरुजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, महात्मा गांधी या विचारवंतांचे संस्कार राष्ट्र सेवा दलामुळेच त्यांच्यावर झाले. नंतरच्या काळातही हेच विचार आपल्या कवितेतून झिरपत राहिल्याचे बांदेकर सांगतात. पदव्युत्तर शिक्षणासाठी बांदेकर गोव्याला गेल्यानंतर तिथे त्यांना भालचंद्र नेमाडे शिक्षक म्हणून लाभले. भालचंद्र नेमाडेंनी त्यांना मराठी बरोबरच इंग्रजी व जगातील अन्य भाषेतून इंग्रजीत आलेल्या कविता वाचायला लावल्या. यातून बांदेकरांची वाङ्मयीन समज व संस्कार विकसित होत गेले. त्यांच्या साहित्यविचाराचं क्षितिज व कक्षा आणखीनच रुंदावल्या.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बांदेकर सावंतवाडीच्या राणी पार्वतीदेवी ज्युनिअर कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य करू लागले. सावंतवाडीतील वातावरणात बांदेकरांची सर्जनशीलता अधिक बहरली. तिथेच त्यांच्यातल्या कवी-लेखकाचा खरा विकास झाला. तिथे त्यांना वसंत सावंतांसारखे कविमित्रही भेटले. बांदेकरांच्या *येरू म्हणे* या पहिल्या कविता संग्रहातील कवितांचा काही भाग वसंत सावंतांच्या सहवासाने संस्कारित झाला आहे, असे बांदेकर स्वतः सांगतात. अलीकडच्या काळात आ. ना. पेडणेकर, सतीश काळसेकर, राजन गवस, रंगनाथ पठारे,वर्जेश सोलंकी, वीरधवल परब, श्रीकांत देशमुख व अरुण काळे या समकालीन कवी लेखकांचेही संस्कार कळत नकळत आपल्या लेखनावर झाल्याचे बांदेकर मान्य करतात. एकूणच कोकणची भूमी कोकणातील या माणसांनी दिलेले संस्कार अंगाखांद्यावर बाळगूनच बांदेकरांची वाङ्मयीन जडणघडण झाली. या सहवासाच्या व संस्काराच्या सर्व खुणा त्यांच्या साहित्यातून स्पष्टपणे जाणवतात.

४.३.२ नव्वदनंतरची मराठी कादंबरी आणि *चाळेगत*

नव्वदनंतरच्या मराठी कादंबरीचा विचार करताना काही गोष्टी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. १९९० नंतर मराठी कादंबरी आशय आणि अभिव्यक्ती अशा दोन्ही बाजूने स्वत:ला बदलताना दिसते. कादंबरीतील या बदलाला जागतिकीकरण व औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेची पार्श्वभूमी आहे. जागतिकीकरण व औद्योगिकीकरणाच्या आक्रमणात भोवतालचे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक पर्यावरण प्रचंड गतीने बदलत आहे. या बदलामध्ये माणसाचे व सबंध सृष्टीचे निरागसपण यंत्राच्या दाबात अत्यंत क्रूरपणे चिरडले जात आहे. यामुळे निसर्गाच्या ऋतुचक्रापासून मानवी नातेसंबधापर्यंत सर्वच नैसर्गिक प्रक्रियेत कमालीची गुंतागुंत निर्माण झाली आहे. नव्वदोत्तरी कादंबरी या बदलत्या सामाजिक वास्तवामध्ये निर्माण झालेली ही गुंतागुंत तितक्याच सक्षमपणे सामावून घेताना दिसते. या सामावून घेण्याच्या गरजेतून तिने रचनेचे अनेक प्रयोग केले आहेत. यातून कादंबरी रचनेच्या अनेक शक्यता निर्माण झाल्या आहेत. मानवी जगण्यातील ही गुंतागुंत स्वाभाविकपणे कादंबरीचा आशय, विषय आणि रूपबंधामध्येही आली आहे .

नव्वदनंतरच्या मराठी कादंबरीने अनेक आश्वासक कादंबरीकार दिले आहेत. राजन गवस, प्रवीण बांदेकर, रंगनाथ पठारे, श्याम मनोहर, मकरंद साठे, कृष्णात खोत, आनंद विंगकर, दिनानाथ मनोहर, महेंद्र कदम, अशोक कौतिक-कोळी, मेघना पेठे, कविता महाजन, शिल्पा कांबळे ही नावे प्रामुख्याने नव्वदनंतरच्या मराठी कादंबरीचे प्रतिनिधित्व करतात. या सगळ्याच कादंबरीकारांनी आपापल्या सामाजिक वास्तवाशी प्रामाणिक राहून ते कादंबरीतून चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे .

कृषिजन व्यवस्थेशी आणि चळवळीशी प्रत्यक्ष संबंध असलेले राजन गवस हे नव्वदनंतरच्या कादंबरीतील एक महत्त्वाचे नाव आहे. शेती, शेतकरी व त्याच्यावर अवलंबून असलेला गावगाडा यांच्या बदलत्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे काम त्यांची कादंबरी करते. या दृष्टीने त्यांच्या तनकट, कळप, चौंडकं, भंडारभोग व ब-बळीचा या सर्वच कादंबऱ्यांना मराठी कादंबरीमध्ये विशेष महत्त्व आहे. भूमी व भूमिपुत्रावरील निष्ठा हे राजन गवस यांच्या कादंबरी लेखनामागील मुख्य प्रेरणा आहे.

नव्वदनंतरच्या समाज व्यवस्थेवरील जागतिकीकरणाच्या अघोरी आक्रमणानंतरही मराठी माणसाला कृषिजन व्यवस्थेशी जोडून ठेवण्याचे महत्त्वाचे काम यांच्या कादंबरीने केले. जागतिकीकरण व औद्योगिकीकरणाच्या रेट्यातही त्यांच्या कादंबरीने कृषिजन व्यवस्थेवरील आपली श्रद्धा व निष्ठा कमी होऊ दिली नाही, हे त्यांनी नव्वदनंतरच्या मराठी कादंबरीला दिलेले योगदान आहे.

राजन गवस यांच्या प्रमाणेच कृषी संस्कृती व श्रम संस्कृतीशी इमान राखणारे महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून कृष्णात खोत यांचा उल्लेख करावा लागतो. गावठाण, रौंदाळा, झड-झिंबड व धूळमाती या चारही कादंबऱ्यांमधून कृषी संस्कृतीचे विविध पदर उलगडून दाखविण्याचा प्रयत्न कृष्णात खोत यांनी केला आहे. गावकरी, शेत-शिवार, गुरं-ढोरं, पाऊस-पाणी या सर्वांनाच खोत आपल्या कादंबरीची पात्रे बनवतात. बदलत्या गावगाड्यातील चित्र-विचित्र वृत्ती-प्रवृत्तीवर नेमकेपणाने भाष्य करण्याची मराठी कादंबरीतील दुर्लभ होत चाललेली परंपरा खोतांनी बदलत्या सामाजिक व वाङ्मयीन पर्यावरणातही जपली आहे. महेंद्र कदम हे समकालीन मराठी कादंबरीतील एक आश्वासक नाव. त्यांनी आपल्या *आगळ* व *धूळ पावलं* या कादंबऱ्यांमधून बदलत्या खेड्याचे व ग्रामसंस्कृतीचे त्याच्यातील बारकाव्यासह नेमके चित्रण केले आहे.

रंगनाथ पठारे यांच्या कादंबरीने नव्वदनंतरच्या कादंबरी वाचकांचे व अभ्यासकांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे. त्यांच्या *नामुष्कीचे स्वगत, त्रिधा* या कादंबऱ्या विशेष महत्त्वाच्या आहेत. नव्वदनंतरच्या महत्त्वाच्या कादंबरी लेखकांमध्ये श्याम मनोहरांचे नाव आवर्जून घ्यावे लागते. त्यांच्या *खूप लोक आहेत, खेकसत म्हणणे आय लव्ह यू* या महत्त्वाच्या प्रयोगशील कादंबऱ्या आहेत. मकरंद साठे यांच्या *अच्युत आठवले* आणि *आठवण* या कादंबरीने मराठी कादंबरी अभ्यासकांचे लक्ष वेधून घेतले आहे.

या लेखकांनी तयार केलेली ही समृद्ध परंपरा पुढे घेऊन जाण्याचे कार्य प्रवीण दशरथ बांदेकर या कविमनाच्या कादंबरीकाराने केले. यांनी आपल्या *चाळेगत* व *उजव्या सोंडेच्या बाहुल्या* या दोन कादंबऱ्यांमधून मराठी वाचकांना परिचित कोकणापेक्षा एका वेगळ्या व वास्तवदर्शी कोकणाचे दर्शन घडविले. आजपर्यंतच्या मराठी साहित्यामध्ये श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, मधु मंगेश कर्णिक, चिं. त्र्यं. खानोलकर आदी साहित्यिकांनी कोकणाचे अत्यंत लोभस व रोमॅन्टिक असेच चित्रण केले आहे. परंतु बांदेकरांनी आपल्या कादंबरीतून तळकोकणातील कुणबी, मच्छिमार, आंबा-काजू पिकविणारे शेतकरी व त्यांच्या शेतात शेतमजुरी करणारे शेतमजूर यांचे प्रश्न, त्यांचा सृष्टीकडे बघण्याचा उदात्त दृष्टिकोन यांचा मराठी कादंबरीला नव्यानेच परिचय करून दिला. थोडक्यात हरिश्चंद्र थोरात म्हणतात त्याप्रमाणे, 'कोकणातील जीवनाची ऐतिहासिक गतिशीलता पकडण्याचा प्रयत्न मराठी साहित्यात चाळेगतच्या निमित्ताने प्रथमच होतो आहे.' नव्वदनंतरच्या मराठी कादंबरीमध्ये या अर्थाने चाळेगतचे महत्त्व वादातीत आहे.

बांदेकरांनी या कादंबरीच्या निमित्ताने आशय व अभिव्यक्तीच्या पातळीवर जे प्रयोग केले आहेत, त्यांनी नव्वदनंतरच्या मराठी कादंबरीला निश्चितपणे पुढे नेले आहे. इतर समकालीन व

गतकालीन लेखकाच्या लेखणीचा प्रभाव पचवून त्यांनी आपली एक स्वतंत्र शैली निर्माण केली आहे. त्यांच्या कादंबऱ्या प्रथमदर्शनी भालचंद्र नेमाडे, राजन गवस यांच्या प्रभावाखाली वाढत आहेत, असे वाटते. परंतु शेवटी त्या आपला स्वतःचा प्रभाव मागे ठेवून जातात. त्यांची कादंबरी या साहित्यप्रकाराची जाण त्यांच्या कादंबरीला साहित्यशास्त्रीय दृष्ट्या अधिक प्रगल्भ बनवते. यातूनच त्यांच्या कादंबरीचे वाङ्मय मूल्य व निर्मिती मूल्यही वाढले आहे.

४.३.३ *चाळेगतची* वाङ्मयीन वैशिष्ट्ये

प्रवीण बांदेकरांना साहित्यशास्त्राबरोबरच समाजशास्त्राची उत्तम जाण आहे. विशेषत: कादंबरी या लवचिक व प्रसरणशील वाङ्मय प्रकाराच्या क्षमतेची त्यांना पूर्ण जाणीव आहे. या क्षमतांचा अत्यंत परिणामकारक उपयोग त्यांनी चाळेगतमधून केला आहे. साहित्य व्यवहाराकडे बघण्याची प्रगल्भ समाजशास्त्रीय दृष्टी त्यांच्याकडे आहे. समाज, संस्कृती, कोकणी लोकपरंपरा, साहित्य, भाषा, शास्त्र यांच्या अभ्यासातून त्यांना ही दृष्टी लाभली आहे. *चाळेगत* बरोबरच त्यांच्या संपूर्ण साहित्यातून समाजशास्त्रीय निरीक्षणे नोंदविली गेली आहेत. समाजातील लहान मोठ्या घटितांना त्यांचे मन संवेदनशीलपणे प्रतिसाद देते. हा अभ्यास, निरीक्षणे व संवेदनशीलता यांच्या स्पष्ट खुणा चाळेगतमधून दिसत आहेत. कादंबरीच्या रूपबंधाचे आकलन व सामाजिक व्यवहाराकडे बघण्याच्या प्रगल्भ दृष्टीमुळे आशय व अभिव्यक्तीच्या पातळीवर त्यांनी अनेक अनोखे प्रयोग केले आहेत. कादंबरीमध्ये कादंबरी लेखकाचेच एक स्वतंत्र पात्र योजून कादंबरी लेखनाअगोदरची घालमेल, कादंबरी लेखकाची आपल्या भोवतालाकडे बघण्याची पद्धत व निर्मिती प्रक्रियेतील अनुभव या सर्व गोष्टींना सामावून घेणारे कादंबरीच्या निर्मिती प्रक्रियेचे शास्त्रच बांदेकरांनी प्रतुत कादंबरीतून निर्माण केले आहे. बांदेकरांच्या वाट्याला आलेले विस्कळीत व गुतागुंतीचे सामाजिक वास्तव, बांदेकरांनी कादंबरीसाठी निवडलेले आशयद्रव्य, त्याच्यातील सरमिसळ, ओढाताण व या आशयद्रव्याने मूर्त केलेला कादंबरीचा गुंतागुंतीचा आकृतिबंध हे सर्व एकजात जरी गुंतागुंतीचे वाटत असले, तरी ही गुंतागुंतच पुढे जाऊन त्यांना एक सुसूत्रता प्रदान करते. आशय व अभिव्यक्तीच्या पातळीवर या कादंबरीला काही वैशिष्ट्ये प्राप्त झालेली आहेत त्याचा विचार याठिकाणी क्रमप्राप्त ठरतो.

बदलत्या कोकणचे वास्तवदर्शी चित्रण :-

चाळेगत कादंबरीतून प्रवीण बांदेकरांनी कोकणच्या भूमीचे वास्तव चित्र तिच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व आर्थिक वैशिष्ट्यांसह उभे केले आहे. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर येऊ घातलेल्या बदलामुळे कोकण आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा सगळ्याच अंगांनी बदलत चालले आहे. नैसर्गिक सौंदर्य लाभलेला अत्यंत शांत प्रदेश असे कोकणच्या भूमीचे वैशिष्ट्ये आहे. परंतु गेल्या पंचवीस तीस वर्षापासून जागतिकीकरणामुळे या प्रदेशाचे हे वैशिष्ट्य एका अनियंत्रित गतीने नष्ट होत आहे. या सर्व बदलाचा साक्षीदार असलेला लेखक या विकासाच्या पोटातील विध्वंसामुळे कमालीचा अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेतूनच लेखकाने चाळेगतमधून या बदलत्या कोकणाचे वास्तवदर्शी चित्र उभे केले आहे. मुळात लेखकाच्या मनात कादंबरी लेखनाची

इच्छाच या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक बदलाला प्रतिक्रिया देण्यातून निर्माण झाली आहे. ते एका ठिकाणी म्हणतात, 'समाजवादी मित्राच्या सेना प्रवेशानंतर मनात सुरू झालेली ही घालमेल कादंबरीच्या फॉर्ममध्ये मांडायला हवी या हेतूने लेखकाच्या मनात कादंबरी लेखनाची इच्छा निर्माण झाली.' (चाळेगत पृ.क्र.३९) अशा छोट्याशा राजकीय फेरबदलातून निर्माण झालेली कादंबरी लेखनाची इच्छा पुढे जाऊन कोकण भूमीच्या भूसांस्कृतिक वैशिष्ट्यांशी व इथल्या सबंध वर्तमानाशी संवाद साधते. चाळेगतमधून बांदेकरांनी कोकणातील कुणबी, मच्छिमार या कष्टकरी वर्गाच्या श्रमसंस्कृतीचे व पडझडीचे वास्तवदर्शी चित्रण केले आहे. कोकणी माणसांच्या परंपरांमुळेच आजपर्यंत कोकणातील समृद्ध निसर्ग सुरक्षित राहिला आहे. परंतु यांत्रिकीकरणामुळे येथील व्यवहारात शहरी प्रवृत्तींचा व भांडवलशाहीचा हस्तक्षेप वाढत आहे. माणसांच्या वाढत्या अप्पलपोटेपणामुळे येथील नैसर्गिक साधन सामग्रीचा व पर्यायाने श्रमजीवी वर्गाच्या उपजीविकेच्या साधनांचा नाश होत आहे.

नद्या, नाले, डोंगर, दऱ्या, आंब्या-नारळाची झाडं, रानात मिळणारा रानमेवा व समुद्रातील मासे कोकणी माणसाच्या जगण्याच्या गरजा भागविण्यास पूर्वापार समर्थ आहेत. परंतु शहरीकरणाच्या संसर्गाने या ठिकाणी यांत्रिकीकरण व भांडवलशाहीने मूळ धरले आहे. अनियंत्रित नफा कमविण्याच्या हेतूने उभ्या राहिलेल्या भांडवलशाहीची व्यापार व व्यवसायाची गरज भागविणे मात्र कोकणच्या नैसर्गिक साधनसामग्रीला शक्य नाही. परंतु भांडवलदारांच्या अनियंत्रित नफा मिळविण्याच्या हव्यासाने येथील नैसर्गिक साधनसामग्री पुरती ओरबाडून काढली आहे. कोकणी माणसाचे जगण्याचे मार्ग व जीवनाचे तत्त्वज्ञान खूपच साधे व सरळ आहे. ते निसर्गाच्या चक्राशी सुसंगत आणि पूर्वापार चालत आलेले आहे. त्यांच्या लोकजीवनातील व लोकसंस्कृतीतील प्रत्येक प्रथेला काही तरी नैसर्गिक अर्थ आहे. आणि या प्रथा व परंपरा पाळणे कोकणी माणसाच्या जगण्याचाच एक भाग आहे. परंतु अलीकडच्या काळात हे कोकण तसे राहिले नाही. ते यंत्राच्या अनियंत्रित गतीने बदलत आहे. हे बदल नैसर्गिक बदलाशी जुळवून घेऊन आपले एकरेषीय जगणे पत्करलेल्या कोकणी माणसासाठी जितके विध्वंसक आहेत तितकेच अनाकलनीय आहेत. या विध्वंसकारी बदलाचे नेमके व वास्तवदर्शी चित्रण बांदेकरांनी आपल्या *चाळेगत* या कादंबरीतून केले आहे. बांदेकर स्वतः या विध्वंसकारी बदलाचे साक्षीदार आहेत. त्यांच्या नेणिवेत कोकणचा निसर्ग वास करतो आहे. त्यामुळे या बदलाचे खोल घाव व त्याचे व्रण त्यांच्या संवेदनशील मनावर नैसर्गिकपणे उमटले आहेत. ते त्यांच्या कादंबरीतूनही तितक्याच ठळकपणे आले आहे.

समुद्र हा कोकणी माणसाच्या जगण्याचा अविभाज्य घटक आहे. तो शेकडो वर्षांपासून येथील मच्छीमारांना जगवत आला आहे. तो लेखकाने खूप जवळून अनुभवला आहे. परंतु आज हाच समुद्र भांडलदारांच्या वक्रदृष्टीने पुरता दूषित झाला आहे. त्याची भांडवदार व राजकारणी सत्ताधारी लोक यांच्या संगनमताने अनियंत्रित लूट चालू आहे. ट्रॉल सारख्या आधुनिक यंत्रांच्या साहाय्याने केल्या जाणाऱ्या मच्छीमारीमुळे कोकणात भयंकर मत्स्यदुष्काळ निर्माण झाला आहे. त्यामुळे मच्छीमारी सारख्या पारंपरिक व्यवसायावर गुजराण करणारा गरीब व कष्टाळू समाज पुरता हतबल झाला आहे. त्याच्या उपजीविकेच्या उत्पादन साधनांवर आक्रमण झाल्यामुळे बेकार झालेला तरूण वर्ग हिंसक

राजकारणाकडे आकर्षित होतो. तर दामू तांडेलसारखी जुनी पिढी हा विध्वंस सहन न होऊन या विध्वंसाविरुद्ध लढण्याचा प्रयत्नही करते. पण मुजोर ट्रॉलर्सवाल्यांच्या पुढे त्याचा टिकावं लागत नाही. पारंपरिक श्रमसंस्कृती व आधुनिक यंत्रसंस्कृती यांच्यातील या संघर्षात यंत्रसंस्कृती जिंकते. अशाप्रकारे कोकणच्या बदलत्या सांस्कृतिक जीवनाचे चित्रण बांदेकरांनी ससंदर्भ उभे केले आहे.

कोकणातल्या कष्टकरी माणसांचं विविधांगी चित्रण :–

समुद्रावर प्रत्यक्ष राबणाऱ्या मच्छीमारांच्या रोजच्या जगण्याचे प्रश्न मांडण्याच्या हेतूने लिहिलेली ही कादंबरी समकालीन कोकणी माणसाच्या दैनंदिन जीवनव्यवहारातील अनेकविध प्रश्नांवर विविधांगी चर्चा करताना दिसते. कोकणामधील मच्छीमार व शेतकरी यांच्याशी संबंधित सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय प्रश्न घेऊन ही कादंबरी वाचकासमोर उभी राहते. कोकणाची खरी ओळख असलेल्या मच्छिमार व शेतकरी वर्गाला गेल्या काही वर्षापासून बदलत्या राजकीय, सामाजिक व आर्थिक संदर्भांनी उद्धवस्त करण्याचे एक अदृश्य छुपे कारस्थान नव्या व्यवस्थेकडून आखले जात असल्याची एक अस्वस्थ करणारी जाणीव सबंध कादंबरीभर दिसून येते. हे उद्‌ध्वस्त करणे व उद्‌ध्वस्त होणे विविधांगी स्वरूपाचे आहे. भांडवलशाही व यांत्रिकीकरणाच्या आक्रमणाने सर्व प्रथम कोकणातील सर्वसामान्य माणसाच्या उपजीविकेच्या साधनांवर घाला घातला आहे. त्यातून कोकणी माणूस पुरता हतबल झाला आहे. ही हतबलताच त्यांना जगण्याचे नवे मार्ग शोधायलाही भाग पाडते. आणि यातूनच एक आंतरिक संघर्ष निर्माण झाला आहे. कधी हा संघर्ष जुनी–नवी असा दोन पिढ्यांमध्ये निर्माण होतो. कधी तो गरीब–श्रीमंत असा दोन वर्गांमध्ये उभा राहतो. तर कधी श्रमसंस्कृती व यंत्रसंस्कृती अशा दोन संस्कृतीमध्ये निर्माण होतो. परंतु संघर्ष कोणामध्ये का असेना यामध्ये भरडला जातो तो सामान्य माणूसच. अशी कोकणातील संघर्षाची विविध रूपे बांदेकरांनी आपल्या *चाळेगत* या कादंबरीतून मांडली आहेत.

या संघर्षाबरोबरच कोकणातल्या सामान्य माणसाच्या सुख–दु:खाचे विविध पदर बांदेकरांनी *चाळेगत* मधून दृगोचर केले आहेत. माणसांची सुखदु:खं, मच्छिमारांचं जगणं अस्सलपणे मराठीत *चाळेगत*मधून आलं आहे. दु:ख जिव्हारी भिडल्याखेरीज ते व्यक्त करता येत नाही. नंतरच त्याची नस शोधता येते. शोषकांचे नवे अवतार, शोषणाच्या नव्या रीती, सामान्य माणसांची हतबलता, त्याच्या दुर्दैवाचे दशावतार हे या कादंबरीचे एक मध्यवर्ती सूत्र आहे. कोकणातील मच्छिमार व शेतकरी वर्गाच्या वेदना आणि त्यांना प्रभावित करणाऱ्या राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतराचा वेध घेण्याचा प्रयत्न बांदेकरांनी चाळेगतमधून केला आहे.

मराठी साहित्यातून अपवादानेच दिसणारा समुद्र चाळेगतच्या केंद्रस्थानी आहे. तो चाळेगतमधून आपल्या जैवविविधतेसह प्रकट झाला आहे. समुद्र कोकणी जीवनव्यवहाराचे एक अविभाज्य अंग आहे. तेथील श्रमजीवी वर्गाचे ते एक महत्त्वाचे उपजीविकेचे साधन आहे. परंतु समुद्र व समुद्रजीवनावर १९९० नंतरच्या जागतिकीकरण, औद्योगिकीकरण व शहरीकरणाचा प्रभाव उशिरा परंतु तीव्र गतीने झाला आहे. भांडवलशाहीच्या प्रचंड वेगाने नफा मिळविण्याच्या लालसेने येथील

समाजव्यवस्थेला पुरते उखडून टाकले आहे. समुद्रामध्ये अत्याधुनिक ट्रॉलर्सच्या द्वारे बेसुमार मासेमारी केली जाऊ लागली आहे. यामध्ये समुद्रातील जीवजंतूंची निर्घृण हत्या होऊन नैसर्गिक समतोल ढासळू लागला आहे. या नव्या व्यवस्थेकडून नफ्यासाठी येथील कुशल, अकुशल कामगारांबरोबरच संपूर्ण निसर्गाचे अनियंत्रित शोषण चालू आहे. समुद्रासारखीच स्थिती येथील डोंगर, नद्या, खाणींचीही झाली आहे. कालपरवापर्यंत दिसणारे डोंगर बघता बघता भुईसपाट होत आहेत. पांढऱ्या शुभ्र दुधासारख्या वाहणाऱ्या नद्या कमालीच्या प्रदूषित झाल्या आहेत. यातून धनदांडगे व राजकारणी लोकांना अमाप नफा मिळत असला तरी समुद्र, समुद्रातील जीवजंतू व समुद्राच्या आधाराने उपजीविका करणारे पारंपरिक मच्छिमार यांची मात्र बेछूट हानी होत आहे. या आक्रमणात श्रमजीवी वर्गाची उपजीविकेची साधने नष्ट होऊन एका विचित्र बेकारी व बेरोजगारीला तेथील तरुणाला सामोरे जावे लागत आहे. यातून राजकीय लोकांच्या वरदहस्ताने गुन्हेगारीही वाढत आहे. गेल्या पंचवीस वर्षातील कोकणाचे हे बदलते चित्र प्रवीण बांदेकरांनी सक्षमपणे चाळेगतमधून मांडले आहे.

प्रवीण बांदेकर यांनी *चाळेगत*मधून आपल्या मुलखाची गोष्ट सांगितली आहे. त्यामुळे तीमधून मुलखाच्या गोष्टीबरोबर मुलखातील आपल्या माणसाच्या गोष्टीही स्वाभाविक व अपरिहार्यपणे आल्या आहेत. त्यांनी आपल्या मुलखातील श्रम करणाऱ्या शोषितांमधून काही पात्रे निवडून त्यांची गोष्ट सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या यातनांचे प्रतिध्वनी या कादंबरीतून उमटले आहेत. बांदेकर जरी या गोष्टीला आपल्या मुलखाची गोष्ट मानत असले तरी त्यांचे हे अनुभव सार्वत्रिक स्वरूपाचे आहेत. ते स्वत: म्हणतात, माझ्या मुलाखत घडणाऱ्या या गोष्टी असं जरी मी म्हणत असलो, तरी देशाच्या कुठल्याही भागात हे असंच, या सारखंच घडत होतं. राजकीय हत्या, धार्मिक व जातीय संस्थांचं समाजातलं वाढतं प्रस्थ, चिमटीभर विकासाच्या नावाखाली भूमिपुत्रांचं विस्थापित होत जाणं, खेड्यांचा आणि देशी संस्कृतीचा ऱ्हास, शहरीकरण, चंगळवाद आणि गुन्हेगारी, विचारांची जागा आक्रमकतेने घेणं, विचार करू शकणाऱ्या संवेदनशील लोकांचं औदासीन्य ... हे थोड्याफार फरकाने सगळीकडेच दिसत होतं (चाळेगत पृष्ठ क्र. ४०) थोडक्यात बांदेकरांचे हे विवेचन कोकणपुरते मर्यादित असले तरी ते प्रदेशनिष्ठ व भूमिनिष्ठ जीवनानुभवाच्या कक्षा ओलांडून सार्वत्रिक जीवनानुभावाविषयी भाष्य करते. म्हणूनच केवळ कोकणच्या भूमीतील जीवनानुभव मूर्त करत असतानाच ते देश काळ परिस्थितीच्या सीमा लांगते.

शांत निसर्गाला अनुसरणारा, विकृत उपभोगापासून दूर असलेला, आक्रमणाची सवय नसलेला आणि प्रतिकाराची आयुधं हरवून बसलेला हतबल समाज *चाळेगत*च्या केंद्रस्थानी आहे. *चाळेगत* मधून एक सुविहित कथानक साकार होत नाही, तर अस्वस्थ करणारी, अनेक दिशांनी जाऊ पाहणारी, अनियंत्रित आणि अंतर्विरोधांनी भरलेली एक ऐतिहासिक समग्रता आपल्या समोर साकार होते आहे, असे वाचकांना वाटू लागते. (हरिश्चंद्र थोरात :२०११:११५) हरिश्चंद्र थोरात यांचे वरील विधान चाळेगतमधील समाजजीवनाच्या गुंतागुंतीचे व अस्ताव्यस्ततेचे नेमके आकलन मांडणारे आहे. कोकणच्या सामान्य माणसाच्या व्यग्र जीवनाचे सचेतन चित्र उभे करणे ही चाळेगतच्या निर्मिती

मागची मुख्य प्रेरणा आहे. प्रवीण बांदेकर *चाळेगत*मधून कोकणातल्या सामान्य माणसाचे सुखदु:ख, तेथील मच्छिमारांचे जगणे मूर्त करण्यात यशस्वी झाले आहेत.

समकालीन राजकीय परिस्थितीचे धीट चित्रण :-

प्रवीण बांदेकरांनी चाळेगतमधून १९८० नंतरच्या महाराष्ट्र व विशेषत: कोकणातील बदलत्या राजकीय संस्कृतीचे नेमके व धीट चित्रण केले आहे. कोकणातील पुरोगामी समाजवादी चळवळीची वाताहत व शिवसेनेसारख्या आक्रमक व हिंसक पक्षाचा विकास या दोन बिन्दुमधून बांदेकरांनी कोकणातील राजकीय परिस्थिती समजून घेतली आहे. शिवसेनेसारख्या आक्रमक पक्षाच्या कार्यपद्धतीवर खोचक व धीट टिप्पणी करतानादेखील ते मागेपुढे पाहत नाहीत. एक प्रकारची जोखीमच त्यांनी पत्करली आहे. स्वत: कादंबरीतील लेखक कोकणातील राजकीय परिस्थितीवर बोलू पाहतो आहे. त्याला टायगर सेनेतील गुंड प्रवृत्तीची व त्यांच्या हिंसक स्वभावाची कल्पना आहे पण तो लेखक त्याची तमा न बाळगता लिहितो आहे. कारण लेखकाचं त्याचं म्हणून एक साहित्यशास्त्र आहे. कादंबरी अंतर्गत लेखक एका ठिकाणी म्हणतो. लेखकाचं काम बोलणं, मनापासून ऐकवणं, तेवढं त्यानं करावं अर्थात लेखकानं बोलावं प्रवृत्तींबद्दल. आपल्या वाट्याच्या काळाबद्दल. ना ह्याच्याबद्दल ना त्याच्याबद्दल. (चाळेगत पृ. क्र. १५) त्यानुसार बांदेकरांच्या वाट्याला जो काळ आला त्या काळातील सर्वच गोष्टींवर ते बोलत आहेत.

नाथ पै व मधू दंडवते यांच्या सारख्या समाजवादी नेत्यांच्या उपस्थितीतही कोकणावरचा समाजवादी विचारांचा प्रभाव का व कसा ओसरला. शिवसेनेसारख्या आक्रमक पक्षाचा जनाधार कसा वाढला. या व अशा अनेक राजकीय प्रश्नांची उत्तरे लेखकाने *चाळेगत*मधून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कोकणात निर्माण झालेल्या राजकीय साठमारीला बुद्धिजीवी लोकांची राजकीय उदासीनताच जबाबदार आहे. बुद्धिजीवी लोक राजकारणापासून दूर राहिल्यामुळे यथा राजा तथा प्रजा या नियमानुसार गुंड प्रवृत्तींच्या हातात राजदंड गेला आहे. वैयक्तिक नफ्याचे राजकारण करणारी मंडळी सत्तेवर आल्यानंतर एक क्रयवस्तू म्हणून कोकण त्यांच्या नजरेसमोर येऊ लागले. सृष्टिसौंदर्यामुळे निसर्गत:च प्राप्त झालेले पर्यटनमूल्य वीजेपासून खाणीपर्यंत आणि पंचतारांकित हॉटेलांपासून ट्रॉलर्सच्या साहाय्याने केल्या जाणाऱ्या मासेमारीपर्यंत नफा आणि शोषण केंद्रस्थानी असलेले प्रकल्प कोकणातील शांतता ढवळून काढू लागले. विकासाच्या बदललेल्या संकल्पनांमुळे कोकण अंतर्बाह्य हादरू लागले. (हरिश्चंद्र थोरात :२०११:११४) ऐंशीच्या दशकात हळूहळू सर्वच पक्षांची मूल्यविचारांवरची निष्ठा डळमळीत झाली आहे आणि यातूनच राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले आहे. सब घोडे बारा टक्के अशीच अवस्था आजच्या राजकीय पक्षांची झाली आहे. या लोकांनी भांडवलशाहीशी हात मिळवणी करून नफ्याची गणिते मांडली. या नफ्याच्या गणितामध्ये कोकणच्या समुद्रापासून डोंगरापर्यंत आणि प्राण्यांपासून माणसांपर्यंत सर्वच गोष्टींचा बाजार मांडला आहे. या बाजारात एका अनियंत्रित वेगाने कोकणच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची लूट चालू आहे. कोकणच्या वाताहतीला विद्यमान राज्यकर्ते,

राजकीय परिस्थिती व बुद्धिजीवी लोकांची उदासिनताच जबाबदार असल्याचे निरीक्षण बांदेकर नोंदवितात.

बांदेकरांनी कादंबरीतील व्यक्तिरेखा व घटना प्रसंग उभे करताना राजकीय व्यक्ती व राजकीय पक्षांची जी नावे योजली आहेत त्यातील साधर्म्यामुळे ती पात्रे अधिक ठळकपणे उभी राहतात. तिच्यातील वास्तववादी चित्रणामुळे वाचक आणि लेखक यांच्यातील अंतर कमी होते. धोका पत्करून केलेल्या धीट राजकीय चित्रणामुळे लेखकाची अनुभूती व अभिव्यक्तीशी असलेली बांधिलकी अधोरेखित होते. चाळेगतच्या निमित्ताने अनेक गोष्टी मराठी कथनात्मक साहित्यामध्ये प्रथमच घडताना दिसत आहेत. समुद्राचे लौकिक चित्रण असेल किंवा कुठलाही आडपडदा न ठेवता राजकारणातील अपप्रवृत्तींचा धीटपणे परामर्श घेणे असेल. या गोष्टी मराठी कथनात्मक साहित्यामध्ये नव्यानेच आल्या आहेत. त्याच बरोबर निसर्ग वर्णने व कोकणी माणसांची स्वभाव वैशिष्ट्ये यांच्या पुरतेच मर्यादित असलेल्या मराठी साहित्याला कोकणी समाज व्यवस्थेचे सांगोपांग व वास्तव दर्शन घडविले आहे.

जागतिकीकरणाच्या बऱ्यावाईट परिणामाचे चित्रण :-

जागतिकीकरणाने समाजजीवनाच्या सर्वच अंगांना कमालीचे प्रभावित केले आहे. त्याने विशेषत: मानवी जीवनामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. हे बदल दुहेरी स्वरूपाचे आहेत. एका बाजूला सर्व संसाधने हाताशी आल्यामुळे जनजीवन अत्यंत सुखासीन झाले आहे. तर दुसऱ्या बाजूला प्रचंड नफा मिळविण्याच्या अट्टाहासापोटी नैसर्गिक साधनसामग्रीची बेछूट नासाडी होऊ लागली आहे. नफा हे एकच सूत्र माहीत असलेल्या भांडवलशाहीच्या तीव्र आक्रमणात सामान्य माणूस पुरता भरडला जातो आहे. यातून सबंध समाजजीवन असुरक्षित झाले आहे. जागतिकीकरणाचे हे गंभीर परिणाम थोडे उशिरा परंतु अतिशय तीव्र गतीने कोकणच्या भूमीमध्ये पसरू लागले आहेत. जागतिकीकरणाबरोबर भांडवलशाही व यांत्रिकीकरणाच्या वक्रदृष्टीने कोकणचा संपूर्ण समुद्र, नद्या, डोंगर अनियंत्रित नफ्याच्या लालसेतून खरडून काढले जात आहेत. परिणामस्वरूप कोकणात मत्स्यदुष्काळ पडला आहे.

समुद्रातील मासेमारी हेच कोकणच्या सामान्य माणसाच्या उपजीविकेचे साधन आहे. ट्रॉलर्सवाले जेव्हापासून या व्यवसायात घुसले आहेत, तेव्हापासून कोकणी माणसाच्या उपजीविकेच्या साधनावरच हल्ला झाला आहे. उपजीविकेची साधने उध्वस्त होत चालल्यामुळे कोकणी माणूस पुरता हतबल झाला आहे. ही हतबलताच दामू तांडेलसारख्या सामान्य मच्छिमाराला ट्रॉलर्सवाल्यांच्या विरुद्ध लढायला भाग पाडते. तर उत्पादन साधनावरील या अतिक्रमणाने बेरोजगार झालेल्या तरुण वर्गाने हा बदल स्वीकारला आहे. या बदलांचा स्वीकार करून दामू तांडेलचा मुलगाच थोड्या पैशाच्या आमिषाने ट्रॉलर्सवाल्यांना मदत करतो आहे. तर मोठ्या संख्येने तरुण वर्ग टायगर सेनेसारख्या आक्रमक राजकीय पक्षाचा कार्यकर्ता होऊन व्यसनाच्या आहारी जाऊन दिशाहीन झाला आहे. या तरुण पिढीची झालेली ही वाताहत म्हणजेच जागतिकीकरणाचा कोकणच्या भूमीवर झालेला नकारात्मक प्रभाव

होय. लेखक प्रवीण बांदेकर हे या बदलाचे साक्षीदार आहेत. हे सर्व बदल त्यांच्या नजरेसमोर होत आहेत. एवढेच नव्हे तर या बदलाचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम लेखकाच्या जगण्यावरही होत आहेत. त्यामुळे कोकण भूमीवरील जागतिकीकरणाच्या या बऱ्यावाईट परिणामाचा विस्तृत पट बांदेकरांनी चाळेगतमधून मांडला आहे.

नव्वदनंतरच्या नव्या आर्थिक धोरणाचे दूरगामी परिणाम कोकणी माणसाच्या जगण्यावर झाले आहेत. यांत्रिकीकरण, खुली अर्थव्यवस्था, यातून होत चाललेले सर्वच गोष्टींचे बाजारीकरण व चुकीची सरकारी धोरणे यामुळे नष्ट होत चाललेले कोकणचे निसर्ग सौंदर्य, पोटापाण्यासाठी करत असलेल्या उद्योग व्यवसायांचे मोडीत निघणे, आधुनिकतेचा स्वीकार करता येत नसल्याने पदरी आलेली हतबलता, खनिज उत्पादन, औष्णिक प्रकल्प यांमुळे कोकणातल्या निसर्गाचा, पर्यावरणाचा होऊ लागलेला विनाश अशा प्रकारचे जागतिकीकरणाच्या प्रभावातून वाट्याला आलेले जगणे बांदेकरांनी सूत्रबद्ध पद्धतीने या कादंबरीतून मांडले आहे.

लोकपरंपरा, लोकसंस्कृती व लोकभाषेचा वापर :-

कादंबरी हा युरोपियन वाङ्मयीन परंपरेकडून आपल्याकडे आलेला साहित्यप्रकार आहे, असे जरी म्हटले जात असले, तरी या साहित्यप्रकारचे मुख्य तत्त्व असलेली कथन परंपरा आपल्याला नवीन नाही. लोककथा व लोकनाट्यामध्ये ती प्राचीन काळापासून चालत आली आहे. परंतु मराठी कादंबरीने तिचा म्हणावा तसा वापर करून घेतला नाही. प्रवीण बांदेकरांनी मात्र आपल्या या कथनपरंपरेला आपलेसे करून घेतले आहे. 'कोकणातील सर्वसामान्य कष्टकऱ्यांचं-शेतकरी मच्छिमार अशांचं जगणं या पद्धतीनं केंद्राशी आणून त्याला संकासुराच्या प्रारूपाप्रमाणे उभं करणं, त्याला दशावतारी खेळाच्या लौकिक फॉर्ममध्ये उभं करणं, हे मोठं काम प्रवीणने या कादंबरीमध्ये केलेलं आहे. दशावतारी खेळाचा फॉर्म वापरला गेल्यामुळे त्या कथन परंपरेतील लवचिकताही आपोआप या लेखनाला प्राप्त झालेली दिसते.' (पठारे रंगनाथ :२०१४:२२८) अशाप्रकारे त्यांनी आपल्या दशावतारासारख्या प्रयोगरूप लोककलेचा, तिच्यातील पात्रांचा व तिच्यातील निवेदन तंत्राचा अतिशय खुबीने वापर केला आहे. त्यांनी *चाळेगत* या बहुचर्चित कादंबरीचा रूपबंध दशावतारी खेळाच्या प्रयोगातून निवडला आहे. तर *उजव्या सोंडेच्या बाहुल्या* या कादंबरीचा रूपबंध कोकणातील कळसूत्री बाहुल्याच्या सुप्रसिद्ध खेळातून शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आपल्या कादंबरीसाठी निवडलेली पात्रे, घटना, प्रसंग, भाषा या सर्वच गोष्टी आपल्या लोकसंस्कृतीशी व लोकपरंपरेशी नाते सांगतात.

बांदेकरांनी दशावतारी खेळ त्याच्यातील बारकाव्यासह उभा केला आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी दशावतारी खेळाप्रमाणेच लवचिक रूपबंध आपल्या कादंबरीसाठी निवडला आहे. 'दशावतारी नाटकाच्या खेळाला कसलीही लिखित संहिता नसते ! प्रयोगाआधी कलाकार, सूत्रधार, मंडळाचा मालक हे सगळे मिळून फक्त ठरवतात, आज अमुक एक आख्यान रंगवायचय; अमकी पात्रं, अमक्याने अमकी भूमिका करायची, अमुक असं एक कथानक... बस्स ! बाकी सगळं प्रत्यक्ष

रंगभूमीवर जे घडत जाईल ते कथानकाच्या अनुषंगाने सुचतील ते संवाद पात्रांनी बोलायचे. संपूर्ण लवचिक खेळ.' (पृष्ठ क्र. ३२) थोडक्यात काय तर बांदेकरांनी कोकणच्या लोकसंस्कृतीचे दर्शन कोकणच्या भूसांस्कृतिक वैशिष्ट्यांसह घडविले आहे. कुलाचारापासून लोकांच्या वृत्ती प्रवृत्तीपर्यंतच्या सर्वच गोष्टींचा लेखाजोखा त्यांच्या साहित्यातून पहावयास मिळतो. कोकणी भाषेतील वाक्प्रचारांचा मुबलक व चपखल वापरामुळे चाळेगतला एकप्रकारचे भाषिक सौंदर्य प्राप्त झाले आहे.

देशीवादी जाणिवांचा आविष्कार :-

भालचंद्र नेमाडे यांच्या देशीवादाच्या प्रतिपादनानंतर मराठी साहित्य व्यवहारावर या देशीवादी जीवनजाणिवांचा खोल प्रभाव पडला. मराठी साहित्यातील हा देशीवाद म्हणजे वसाहतवादाच्या प्रभावाला दिलेली प्रतिक्रिया आहे. प्रवीण बांदेकरांच्या वाङ्मयीन जाणिवांवर नेमाडेंचे संस्कार असले तरी त्यांच्या कादंबरीतून व्यक्त होणाऱ्या देशीवादी जाणिवांचा आशय मात्र निराळाच आहे. तो केवळ वसाहतिक जीवनजाणिवांनी प्रभावित नसून तो एका सकारात्मक स्वयंचिकित्सेवर भर देणारा आहे. भूमिनिष्ठ वास्तवाचे बदलते संदर्भ पृष्ठस्तरावर ठेऊन समाजाच्या आंतरिक परिवर्तनांचे सूक्ष्म विश्लेषण करणे, ही या कादंबरी लेखनामागची मुख्य प्रेरणा आहे. कोकणच्या सीमांमध्ये ही कादंबरी घडत राहते. त्यामुळे तिला भूविशिष्टतेचे संदर्भ लाभले आहेत. एका विशिष्ट परिसरातील निसर्ग, त्याच्याशी एकरूप झालेला माणूस, त्याच्या वृत्ती-प्रवृत्ती व या सगळ्यांनी नियत केलेली संस्कृती या सर्वांशी ही कादंबरी एकरूप झाली आहे. वर्ण्य भूसांस्कृतिक वैशिष्ट्यांशी लेखकाने एकरूप होण्यातूनच ही एकताणता साधू शकते. बांदेकरांचे लहानपणापासून कोकणच्या मातीशी एकरूप होणे चाळेगतमधून फळास आले आहे.

कोकणचा समुद्र नद्या डोंगर जंगले वाड्या वस्त्या या कादंबरीतील अपरिहार्य पात्रे आहेत. कारण ही नैसर्गिक तत्त्वे कादंबरीतून केवळ निसर्ग वर्णने व वातावरण निर्मिती करण्यापुरती येत नाहीत. कोकणी माणसांचे जसे प्रश्न आहेत तसे समुद्र, नद्या, डोंगर, जंगले, वाड्या, वस्त्या यांचेही काही प्रश्न आहेत. हे सर्वजन आपापली कहाणी घेऊन आले आहेत. लेखकाच्या तोंडून हे सर्वजण आपापली कहाणी व प्रश्न कादंबरीतून मांडत आहेत. मग त्यामध्ये भांडवलशाही हव्यासातील अनियंत्रित नफा मिळविण्याच्या प्रवृत्तीतून कोकणचा पोशिंदा असलेल्या समुद्राची होणारी बेछूट लूट असेल किंवा डोंगरांची व जंगलांची रातोरात होणारी कत्तल असेल. या सर्व गोष्टी म्हणजेच *चाळेगत*चे मुख्य आशयसूत्र आहे. आपल्या भूसांस्कृतिक वैशिष्ट्यांशी प्रामाणिक राहून देखील ही कादंबरी निव्वळ प्रादेशिक जाणिवांच्या पलीकडे जाऊन सर्वच भूसांस्कृतिक वैशिष्ट्यांच्या रसिक वाचकांना आपलेसे करून घेते, हे चाळेगतचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. *चाळेगत*मधून येणारा निसर्ग पूर्वसुरीच्या कोकणी साहित्यातून येणारा चिरपरिचित निसर्ग नाही. तसा तो पर्यटकांनी पाहिलेला रोमँटिक निसर्ग नाही. तो आपल्या जगण्यातील लहानसहान तपशिलासह येतो. तो समुद्र, नद्या, डोंगर, जंगले, यांच्या उग्र खारवट वासासह येतो. माशा, सुकाटाच्या चव, गंधासह येतो. कोकणी जनजीवनातील रूढी- परंपरा,

दशावतार.... आदी लोकसंस्कृतीच्या वाहक असलेल्या गोष्टी येथील लोकांच्या जगण्याचा अपरिहार्य भाग म्हणून कादंबरीतून येतात.

प्रवीण बांदेकर सबंध कादंबरीभर त्यांना भोवतालच्या सामाजिक वास्तवातून जो आशय मिळाला आहे त्याच्याकडे देशीवादी दर्शनबिंदूमधून पाहत असले तरी त्यांची दृष्टी भूतकाळाच्या उदात्तीकरणात रमलेली नाही. कादंबरीमध्ये अपरिहार्यपणे देशी वास्तव अवतरले आहे. समकालीन कोकणी समाजजीवनातील अनेक पेच बांदेकर या ठिकाणी उघड करू पाहत आहेत. कोकणातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर होणारे आक्रमण असेल, अनियंत्रित नफ्याच्या हव्यासा बरोबर येणारे शोषण असेल, भ्रष्टाचाराचा हात धरून येणारी हिंसा असेल, विकासाच्या नावाखाली होणारी निसर्गाची नासाडी असेल, उपजीविकेच्या साधनाच्या उद्‌ध्वस्तिकरणाने निर्माण झालेल्या बेकारीबरोबर येणारे गुन्हेगारीकरण असेल, हे सगळे बदलत्या कोकणी समाजजीवनातील पेच आहेत. यातून आधी निसर्ग व त्यामागून मनुष्य या दोघांच्याही असण्याला धोका निर्माण झाला आहे. निसर्ग व त्याच्या बरोबर माणूस या दोघांचे कणाकणाने उद्‌ध्वस्त होणे बांदेकरांनी साक्षीदाराच्या किंवा निवेदकाच्या भूमिकेतून न सांगता स्वत: कादंबरीमध्ये वस्तीस येऊन पीडिताची भूमिकेतून मांडले आहे. त्यामुळे चाळेगत वर्णन, विश्लेषण व निवेदनाच्या पातळीवर न राहता अनुभव कथनाची अगतिक व आर्त लय पकडते व लेखक स्वत: जागतिकीकरण व यांत्रिकीकरणाच्या आक्रमणात उद्‌ध्वस्त झालेल्या दामू तांडेल पासून समुद्राच्या नसण्याने मेलेल्या कासवाचे प्रतिनिधित्व करू लागतो. कादंबरीतील पात्रं, पात्रांची सुखदु:खं, त्यांच्या आयुष्यातील बरेवाईट घटनाप्रसंग, यांच्याशी व पर्यायाने कादंबरीच्या आशयाशी लेखकाने कमालीचे तादात्म्य साधले आहे. यातून लेखकाच्या अभिव्यक्तीच्या सर्वच क्षमता अधोरेखित झाल्या आहेत.

४.३.४. *चाळेगत*मधील पात्र रचना

कादंबरी लिहिण्याच्या प्रक्रियेलाच बांदेकरांनी कादंबरी लेखनाचे एक आशयसूत्र बनविले आहे. त्यामुळे लेखक, निवेदक, घटना, प्रसंग, वास्तव, पात्रांची जडणघडण या सर्व वस्तू कादंबरीचे आशयद्रव्य व पात्रे बनल्या आहेत. *चाळेगत*मध्ये बांदेकरांनी स्वत: लेखक प्रवीण दशरथ बांदेकर हे पात्र योजले आहे. सोबतीला एक निवेदकही घेतला आहे. कादंबरीच्या अवकाशामध्ये घडणाऱ्या सर्व घटनाप्रसंगामध्ये लेखक व निवेदकाला सामील करून स्वत:चीच सोय करून घेतली आहे. त्यामुळे लेखक व निवेदकाच्या संवादातून विघटनात्मक जीवनानुभवांना एकत्रित जोडणे सोपे झाले आहे. लेखक स्वत:च पात्र बनून कादंबरीतून वास करत असल्यामुळे कादंबरीतील शतखंडित वास्तवावर नियंत्रण ठेवणे साधले आहे. बांदेकरांच्या या कलात्मकतेमुळे त्यांच्या कादंबरीकार म्हणूनच्या नवेपणाच्या सर्व खुणा संपुष्टात आल्या आहेत. बांदेकर स्वत: जसे पात्र होतात त्याप्रमाणे अवती भवतीच्या वास्तवातील माणसांना व कोकणचा समुद्र, नद्या, डोंगर, दऱ्यांमधून व्यक्त होणाऱ्या निसर्गालाही पात्र करतात. सहजसाधी कादंबरीतील व्यक्तिरेखा/पात्र म्हणून वावरू लागते हे लेखकाचे व्यक्तिरेखा उभी करण्याचे कसब अफलातून आहे. *चाळेगत* मधील प्रत्येक व्यक्तिरेखा एका स्वतंत्र

प्रवृतीचे प्रतिनिधित्व करते. सर्वसामान्य माणसाची जगण्यातील अगतिकता व्यक्त करणारा व एकाच वेळी अनेक भूमिकात वावरणारा संकासूर असेल, किंवा बुद्धिजीवी पुरोगामी मंडळीच्या नैतिक घसरणीचे प्रतिनिधित्त्व करणारे खानोलकर मास्तर असोत सर्वच जन कादंबरीतील आपापली भूमिका चोख बजावतात. हे निर्मितीचे श्रेय बांदेकरांच्या वाङ्मयीन संस्कारांना जाते.

कादंबरीतील सर्वात महत्त्वाचे पात्र स्वत: लेखक प्रवीण दशरथ बांदेकर हे आहे. लेखकाने स्वत:लाच कादंबरीतील एक पात्र बनवून एक नवीन प्रयोग केला आहे. या कादंबरीतील या लेखकाला त्याच्या वाट्याला आलेल्या शतखंडित वास्तवाला सामावून घेणारे काही तरी लिहायचे आहे. मुळात कवी असलेल्या लेखकाला हे वास्तव कवितेसारख्या साहित्यप्रकारातून व्यक्त करणे शक्य होत नाही, म्हणूनच तो कादंबरीसारख्या साहित्यप्रकाराची निवड करतो आहे व कादंबरी लिहिण्यासाठी आपल्या अनुभवाची जुळवाजुळव करतो. इथेच कादंबरी अंतर्गत लेखकाची कादंबरी लेखनाची प्रक्रिया सुरू होते. कादंबरी बाहेरच्या मूळ लेखकाची प्रत्यक्ष कादंबरीही याच आसाभोवती फिरत राहते. कादंबरी अंतर्गत लेखक त्याला जी कादंबरी लिहायची आहे, त्यासाठी काही योजना बनवितो आहे. त्यासाठी तो स्वत:च्या जीवनातील, अवतीभवतीच्या लोकांच्या जगण्यातील घटना प्रसंगाची जुळवाजुळव करतो आहे. टिपणे काढतो आहे. काही साधने जमवितो आहे. पात्रे तयार करतो आहे. प्रत्यक्ष वास्तव प्रसंग व कल्पनेच्या साहाय्याने आशयसूत्रांचे जोडकाम करतो आहे. थोडक्यात कादंबरी अंतर्गत लेखकाने आपल्या कादंबरी लेखनासाठी आपल्या भवतालातून काही घटनाप्रसंग जमविलेले आहेत. ते कादंबरी लेखनासाठी निवेदकाला विस्कळीतपणे कथन केले आहेत. त्याचे हे कथन करणे व कादंबरी लिहिण्याची त्याची ही धडपड म्हणजे *चाळेगत*ची संहिता आहे.

लेखकाला *चाळेगत*मधून केवळ एक गोष्ट सांगायची नाही. त्याला त्याच्या मुलखाची गोष्ट सांगायची आहे. लेखकाच्या वाट्याला आलेला भोवताल अतिशय विघटनात्मक स्वरूपाचा आहे. समुद्र, पारंपरिक मासेमारी, ट्रॉलर्सवाले, त्यांनी चालवलेली समुद्राची बेदरकार लूट, बदलती राजकीय समीकरणे, उपजीविकेच्या साधनाच्या उद्ध्वस्त होण्यामुळे हतबल झालेला समाज, या हतबलतेतून निर्माण होणाऱ्या शोषणाच्या निरनिराळ्या पद्धती, वाढते गुन्हेगारीकरण या आणि अशा अनेक गोष्टींनी लेखकाच्या मुलखाची गोष्ट बनते. तिला जगण्याचे व सुख-दु:खांचे अनेक पदर आहेत. जगण्याची ही सगळी गुंतागुंत कथन करण्यासाठी तिच्यावर कादंबरीच्या बाहेर राहून नियंत्रण ठेवणे जिकिरीचे आहे. म्हणूनच लेखक स्वत: कादंबरीमध्ये वस्ती करतो आहे. एवढेच नव्हे तर त्याने ही कथानकावरची पकड अधिक मजबूत करण्यासाठी कादंबरी साहित्यप्रकारातील निवेदकाचे महत्त्व ओळखून निवेदकासही कादंबरीमध्ये वस्तीस आणले आहे. त्यामुळे कादंबरीचे स्वरूप अधिकच गुंतागुंतीचे झाले आहे. परंतु अनेक दिशांनी प्रसवत जाणाऱ्या कादंबरीच्या विघटनात्मक कथानकावर नियंत्रण ठेवण्यासाठी लेखकाला निवेदकाची खूप मदत झाली आहे. त्याचबरोबर अधून मधून लेखकाने निवेदकाशी केलेल्या चर्चेतून कादंबरीच्या निर्मिती प्रक्रियेचे शास्त्रच व्यक्त झाले आहे. थोडक्यात *चाळेगत*चे रंग रूप निश्चित करण्यात कादंबरी अंतर्गत लेखक व निवेदकाचे महत्त्वाचे योगदान आहे.

संकासूर हे बांदेकरांनी उभे केले दुसरे महत्त्वाचे पात्र आहे. मुळात संकासूर हे कोकणातील दशावतार या प्रयोगारूप लोककलेतील मध्यवर्ती पात्र आहे. लोकनाट्यातील सोंगाड्या सारखे विदुषकी चाळे करीत आपल्या भोवतालच्या सामाजिक वास्तवावर व्यंगात्मक टिप्पणी करून तो प्रेक्षकांचे मनोरंजन व प्रबोधन करण्याचा प्रयत्न करीत असतो. बांदेकरांनी *चाळेगत*साठी रूपबंधाच्या पातळीवर जो प्रयोग केला आहे तो संकासुराच्या पात्रावरून घेतला आहे. संकासूर प्रत्यक्ष मंचावर वावरताना कोणत्याही प्रयोगरूप कलेतील इतर कोणत्याही पात्रापेक्षा वेगळाच भासतो. तो प्रयोगातील कोणतेही विधीनिषेध पाळत नाही. तो अगदी सहज कोणत्याही घटनाप्रसंगातून कोणत्याही घटनाप्रसंगामध्ये प्रवेश करू शकतो. एवढेच नाही तर खेळातील त्याची प्रत्यक्ष भूमिका व त्याचे प्रत्यक्ष वास्तव जीवन यामध्ये देखील तो तितक्याच सहजतेने व बेमालूमपणे येजा करत राहतो. त्याचे खेळातील असणे पूर्णपणे बद्धमुक्त आहे. त्याच्यावर कोणतीही बंधने नाहीत. कादंबरी अंतर्गत लेखकाच्या वाट्याला आलेले हे अनियंत्रितपणे सर्व दिशांनी पसरत जाणारे वास्तव कादंबरीमध्ये पकडण्यासाठी संकासुराच्या या बद्धमुक्त व खुल्या पद्धतीचा उपयोग केला आहे.

लेखकाच्या या संकासुरी पवित्र्यामुळेच लेखक पात्र म्हणून कादंबरीत वस्ती करायला येतो. यामुळेच तो घटनाक्रमाकडे वेगवेगळ्या पातळ्यावर जात वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यांमधून पाहू शकतो. पात्रांच्या वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून ती घडवली जात असताना पाहणेही त्यामुळेच शक्य होते. आपलीच निर्मिती आपल्या तळहातावर घेऊन पाहणेही यातून साधते. यामुळेच कादंबरीतील घटनाक्रमाच्या पातळीवरील एकरेषीयता सर्जनशील रीतीने उद्ध्वस्त केली जाणे शक्य होते. आणि वास्तवाची अस्ताव्यस्तता व जटिलता कादंबरी आपल्यात मुरवून घेऊ शकते (हरिश्चंद्र थोरात : २०११ : ११९) त्याचबरोबर स्वत: कादंबरीतील लेखक होऊन कधी कादंबरी बाहेरच्या आपल्या लौकिक जीवनाशी जुळवून घेत आहे, तर कधी आपल्या भोवतालचे घटना प्रसंग, पात्रे, प्रश्नोत्तरे या आणि अशा सर्व गोष्टी घेऊन कादंबरीमध्ये वावर करतो आहे. आपल्या कादंबरी लेखनासाठी या सामग्रीची मांडामांड करतो आहे. काही गोष्टींविषयी कादंबरी अंतर्गत निवेदकाशी विचारविमर्श करतो आहे. हे लेखकाचे एकाच वेळी वेगवेगळ्या पातळीवर वावरणे दशावतारी खेळातील संकासुराच्या पात्राशी नाते सांगणारे आहे. दशावतारी खेळातील संकासुराचा दशावतारी खेळातील वावर आणि चाळेगत मधील लेखकाचा कादंबरीतील व कादंबरी बाहेरील वावर यामध्ये फारसा फरक दाखवता येत नाही.

बांदेकरांनी कादंबरीच्या विघटित आशयद्रव्याच्या निवेदनाच्या सोयीसाठी योजलेल्या लेखक, निवेदक व संकासूर या पात्रांशिवाय कथानकाची गरज म्हणून आपल्या भोवतीच्या सामाजिक वास्तवातूनही बांदेकरांनी दामू तांडेल, लेखकाची प्रेयसी प्रिया, खानोलकर मास्तर, जनार्दन, दिगू कुबल अशी अनेक पात्रे निवडली आहेत. ही पात्रे कोकणातील माणसाच्या निरनिराळ्या वृत्ती प्रवृत्तीचे प्रतिनिधित्व करतात. त्यांनी भोवतीचे वास्तव व पात्रं यांना सरधोपटपणे कादंबरीमध्ये न भरता त्यांच्यावर प्रक्रिया केली आहे.

४.३.५ *चाळेगत*ची निवेदन शैली

बांदेकरांनी आपल्या एका मुलाखतीमध्ये आपल्या कादंबरी निर्मिती प्रक्रियेबद्दल केलेले पुढील विधान खूप महत्त्वाचे आहे. 'डोळ्यांसमोर घडलेलं हे अशा एका अस्वस्थ अवस्थेत लिहिलं गेलं. त्याला काहीही फॉर्म वैगेरे नव्हता. ती कादंबरी नव्हती की कविताही नव्हती की आणखी काही. ते फक्त स्वत:ला छळणाऱ्या गोष्टींपासून सुटका करून घेणं होतं.' (बांदेकर, प्रवीण :२०१६ : १६३) त्यामुळेच बांदेकरांनी *चाळेगत*साठी निवडलेली निवेदन शैली मराठी कादंबरीतील नावीन्यपूर्ण व प्रयोगशील शैली ठरली आहे. लेखकाने कादंबरीमध्येच एक लेखकाचे पात्र योजले आहे. या कादंबरीतील लेखक त्याच्या कादंबरीलेखनाची प्रक्रिया कथन करतो आहे. हे एक मध्यवर्ती कथासूत्र चाळेगतमध्ये आलेले आहे. कादंबरीतील समुद्र, मच्छिमारी किंवा शेती करणारे लोक राजकारण यांच्यासह लेखकाच्या वाट्याला आलेले वास्तव तपशिलासह आपल्या कादंबरीमध्ये कसे आणता येईल याचा सततचा विचार कादंबरी अंतर्गत लेखक करतो आहे. त्यासाठी तो आवश्यक त्या ठिकाणी निवेदकाबरोबरही संवाद साधत आहे. त्या गोष्टींचा त्याला अनेकदा तापही होतो आहे. मात्र तरी देखील कादंबरीची निर्मिती करण्याची त्याची चाह कमी झालेली नाही. म्हणून लेखकाने कादंबरीमध्येच एका ठिकाणी म्हटले आहे. 'ही माझ्या कादंबरी लिहिण्याची गोष्ट. मला कादंबरीत जे काही लिहायचंय त्याची गोष्ट किंवा हे आपल्या मनातल्या आपल्याला सतत छळणाऱ्या कादंबरीचा शोध घेणंही म्हणता येईल... मी प्रवीण बांदेकर वयवर्षे वीस ते तीस. याच दरम्यान मी अनुभवलेल्या जगाविषयी मला बोलायचंय. मी या गोष्टींचा लेखक किंवा या गोष्टीतला लेखकसुद्धा' (चाळेगत पृष्ठ क्र. ४१) बांदेकर या निवेदनातून स्वतः कादंबरीमध्ये उपस्थित राहिले आहेत व एक निवेदकही संगतीला घेतला आहे. लेखकाने स्वतः एक पात्र म्हणून कादंबरीमध्ये उपस्थित राहून निवेदकाकरवी आपले अनुभव कथन करणे असा एकूणच या कादंबरीचा रूपबंध आहे. निवेदक व कादंबरीअंतर्गत लेखक यांच्यातील चर्चेने कादंबरीला चर्चात्मक स्वरूप प्राप्त झाले आहे.

प्रवीण बांदेकरांनी *चाळेगत*साठी निवडलेले कथानक एकरेषीय नाही. जगण्याचे अनेक पदर त्यामध्ये अंतर्भूत आहेत. अनेक दिशांनी पसरत जाणारे शतखंडित वास्तव त्यांनी *चाळेगत*मधून मुखर केले आहे. त्यामुळे ठरीव कथन परंपरेचा व रूढ निवेदनतंत्राचा वापर करून वर्ण्य बिंदूच्या गाभ्यापर्यंत पोहोचणे शक्य नव्हते. म्हणूनच बांदेकरांनी *चाळेगत*साठी कादंबरी या साहित्यप्रकारच्या पारंपरिक रचनातंत्राचा वापर न करता आशयाला पूरक अशा नावीन्यपूर्ण प्रयोगशील रूपबंधाची निवड केली आहे. हा रूपबंध कादंबरीतील आशयाचा एक भाग म्हणून आला आहे. नव्हे तर कादंबरीतील बहुकेंद्री आशयाने स्वत: तो रूपबंध शोधला आहे. त्यामुळेच ही कादंबरी सलग कथानकामधून न घडता ती वेगवेगळ्या एपिसोड मधून आपल्या भोवती घडत राहते. कादंबरीला एक सलग असे कथानक नसल्यामुळे कथा सांगण्याचा सोस कोठेही दिसत नाही. जागतिकीकरणाच्या झपाट्यात वेगाने बदललत चाललेले सामाजिक जीवन हेच तिचे मुख्य आशयसूत्र आहे. हे बदल जितके अनाकलनीय व गुंतागुंतीचे आहेत, तितकाच कादंबरीचा रूपबंधही अपरिहार्यपणे अनाकलनीय व गुंतागुंतीचा झाला आहे. वेगवेगळ्या अवकाशात घडत जाणारे वेगवेगळे घटनाप्रसंग हीच चाळेगतची

उपकथानके आहेत. परंतु या सर्वच कथानकांच्या मध्यवर्ती कोकणच आहे. ती वाचकाला भूतकाळात घेऊन जात नाही की स्वप्नरंजनात ठेवीत नाही. ती सतत अवती भवती घडणाऱ्या भल्याबुऱ्या वास्तवाशी जोडून ठेवते. हे या कादंबरीचे वेगळेपण आहे. त्यामध्ये कसलीही जाणीवपूर्वकता नाही. हा प्रयोग सहज साधला आहे.

*चाळेगत*चे निवेदनाचे स्वरूप, पद्धती व निवेदक सगळेच आशयसूत्राच्या मागणीप्रमाणे बदलत राहते. कादंबरी लिहिणारा कादंबरी अंतर्गत लेखक स्वत: विषयी सांगताना प्रथमपुरुषी निवेदनतंत्राचा वापर करतो. कादंबरी अंतर्गत लेखकाचा वास्तवाची मांडणी करण्यातला हस्तक्षेप टाळण्यासाठी निवेदक हे स्वतंत्र पात्र निर्माण केले आहे. त्यामुळे निवेदकाच्या उपस्थितीमध्ये आपोआपच तृतीयपुरुषी निवेदन पद्धतीचा स्वीकार झाला आहे. निवेदक हे स्वतंत्र पात्र असल्यामुळे तोही स्वत: विषयी बोलताना प्रथमपुरुष निवेदन तंत्राचा वापर करतो आहे. अशाप्रकारे *चाळेगत*ची रचना भारतीय कथन परंपरेतील परिमंडळ कथेसारखी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

थोडक्यात, कादंबरी लिहिण्याच्या प्रक्रियेलाच बांदेकरांनी कादंबरी लेखनाचे एक आशयसूत्र बनविले आहे. त्यामुळे लेखक, निवेदक, घटना, प्रसंग, वास्तव, पात्रांची जडणघडण या सर्व वस्तू कादंबरीचे आशयद्रव्य बनल्या आहेत. ही एका अर्थाने कादंबरीच्या निर्मितीची कहाणीच आहे. ही कहाणी लेखकाने स्वत: कादंबरीमध्ये वस्तीस राहून निवेदकाला सोबतीला घेऊन सांगितली आहे. एखादी कादंबरी निर्मितीच्या प्रक्रिये दरम्यान जशी विस्कळीत व अस्ताव्यस्त असते ती अस्ताव्यस्तता सबंध कादंबरीभर दिसून येते.

बांदेकरांनी *चाळेगत*मधून कोकणी भाषेचा मुबलक व चपखल वापर केला आहे. वाचनाच्या प्रवाहात ती कोठेही अडथळा ठरत नाही. याउलट त्यामुळे कोकणी माणसाचे व भूमीचे वेगळेपण अधिक गडद आणि ठाशीव झाले आहे. त्याचबरोबर कोकणीच्या वापरामुळे पात्र रचनेतील बांदेकरांचे कौशल्यही अधोरेखित झाले आहे. कारण कोकणी भाषेच्या वापराशिवाय तेथील भूसांस्कृतिक वैशिष्ट्ये मुखर करणे शक्य नव्हते. लोकपरंपरा व लोकसंस्कृतीतील ताणेबाणे लोकभाषेच्या वापरामुळे अधिक जिवंत झाले आहेत. घटनाप्रसंगाच्या उभारणीमध्ये कोकणी संवादाचा केलेला चपखल वापर पाहिल्यानंतर या भाषेची कादंबरीतील अपरिहार्यता आपल्या लक्षात येते.

कोकणी लोकजीवनातील म्हणी, वाक्प्रचार व मराठीतील प्रसिद्ध कवींच्या कवितेच्या ओळींचा वापर हे *चाळेगत*चे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. या गोष्टी सोस म्हणून आलेल्या नाहीत, तर कोकणी बोलीचा विशिष्ट बाज, लहेजा, म्हणी, वाक्प्रचार त्याच्यातील खटके व हेल यांच्या वापराने कादंबरीच्या भाषेमध्येही एकप्रकारची आंतरिक लय निर्माण झाली आहे. त्यांनी वापरलेल्या म्हणी व वाक्प्रचारांना कोकणच्या भूसांस्कृतिक वेगळेपणाचे काही संदर्भ चिकटले आहे. 'आपलं नाय जागेवर आणि जगाला घे उरावर'. कादंबरी अंतर्गत लेखकाच्या कादंबरी लेखनाच्या धडपडीतील वाचकाचा सहभागही महत्त्वाचा आहे.

४.४ समारोप

चाळेगत या कादंबरीचा पोत एकरेषीय कथानक घेऊन रूढ अर्थाची पाल्हाळीक गोष्ट सांगण्याचा नाही. बांदेकरांना लाभलेले सामाजिक वास्तव हे अत्यंत गुंतागुंतीचे आहे. त्यांना लाभलेल्या भोवतालच्या वास्तवातील अनेक घटिते व त्यांच्यातील गुंतागुंत बांदेकरांनी *चाळेगत* मधून मुखर केली आहे. त्यामुळे या कादंबरीला कोणतेही एक मुख्य कथानक नाही. त्यामध्ये अनेक वेगवेगळी पात्रे आपापली गोष्ट सांगत आहेत. प्रत्येकाची गोष्ट वेगळी आहे. तसा जगण्याचा आशयही वेगळा आहे. यातूनच त्यांच्या कादंबरीलाही अनेक आशयसूत्रे लाभली आहेत. त्याची गुंतागुंतही त्यामध्ये आहे. या कादंबरीमध्ये अनेकविध आशयसूत्रे आलेली आहेत. समाजातील वेगवेगळ्या प्रवृत्तींचे चित्रण माणसाच्या स्वभावासह तीमधून आले आहे. त्यासाठी त्यांनी अनेक प्रतीके वापरली आहेत. उदा. शेतात शिरलेले हत्ती, जाळ्यासह मासे फस्त करणारे केंड मासे, तीक्ष्ण दाताचे इतरांना भक्ष्य बनवणारे शार्क मासे यांच्यामध्ये व यांत्रिकीकरण व भांडवलशाहीच्या रेट्यात नफा हे एकाच सूत्र जाणणाऱ्या माणसांच्या प्रवृत्तींमध्ये लेखकाला फार फरक जाणवत नाही.

*चाळेगत*च्या काही मर्यादा हरिश्चंद्र थोरात यांनी सांगितल्या आहेत, *उदाहरणार्थ संकासुराचे प्रारूप अधिक प्रभावी रीतीने दाखविता आले असते. संकासुराचे दशावतारी खेळातील वर्तन आणि वास्तवाच्या पातळीवर येऊन त्याने लोकांशी साधलेला संवाद यांच्या मध्ये स्वच्छ विभाजन रेषा काढता येते. म्हणून तर तो लवचिक ठरतो. कादंबरीमध्ये वास्तव आणि कल्पित यांच्यामधील विभाजन रेषा कधीही सुस्पष्ट होत नाही. कादंबरी बाहेरचा लेखक कादंबरीतील एक पात्रही आहे. कादंबरीच्या कल्पित जगात तो वावरतो आहे. या लेखकाला कादंबरीबाह्य वस्तुनिष्ठता ठळकपणे प्राप्त करून देण्यात कादंबरी अपुरी पडते. संकासुराचे प्रारूप लेखकाने अधिक कसोसीने वापरले असते तर तिला खात्रीने अधिकाची परिमाणे प्राप्त झाली असती.* (हरिश्चंद्र थोरात :२०११:११९-१२०) तरीही चाळेगतने मराठी कादंबरीला जे दिले आहे ते कमी महत्त्वाचे नाही. कारण कोकणच्या भूसांस्कृतिक वैशिष्ट्यांवर झालेल्या आक्रमणाला भूमिनिष्ठ देशी जाणिवांनी दिलेली प्रतिक्रिया *चाळेगत*च्या पानापानातून उमटली आहे. एका बाजूला खुणावत असलेला भौतिक विकास आणि दुसऱ्या बाजूला विकासाच्या नावाखाली नष्ट होत चाललेला भवताल. यातून आलेली हतबलता. यांच्यातील द्वंद्व बांदेकरांनी *चाळेगत*मधून नेमकेपणे पकडले आहे.

साधन ग्रंथ :-

बांदेकर, प्रवीण, *चाळेगत*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००९.

संदर्भ ग्रंथ :-

थोरात, हरिश्चंद्र : *कथनात्मक साहित्य आणि समीक्षा*, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०११.

पठारे, रंगनाथ : *आजची कादंबरी : नोंदी आणि निरीक्षणे*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१४.

धोंगडे, बाळासाहेब (संपा.) : *कादंबरी निर्मितीप्रक्रिया विशेषांक*, अक्षरपेरणी, पुणे, डिसेंबर २०१६.

४.५ नमुना प्रश्नोत्तरे

अ) गाळलेल्या जागी योग्य पर्याय निवडा.

१. कादंबरी अंतर्गत लेखकाच्या प्रेयसीचे नाव काय होते ?

अ. प्रिया   ब. आरती   क. मनी   ड . सावित्री

२. बांदेकरांनी *चाळेगत*मध्ये मराठी बरोबरच कोणत्या भाषेचा वापर केला आहे?

अ. कोकणी   ब. अहिराणी   क. गुजराती   ड. हिंदी

३. प्रवीण बांदेकर यांच्या पहिल्या कविता संग्रहाचे नाव काय ?

अ. गोलपीठा   ब. येरू म्हणे

क. खेळखंडोबाच्या नावानं   ड. मरणकळा

४. लेखकाने कोणत्या विद्यापीठातून एम. ए. ची पदवी घेतली ?

अ. शिवाजी विद्यापीठ   ब. कोकण कृषी विद्यापीठ

क. मुंबई विद्यापीठ   ड. गोवा विद्यापीठ

(उत्तरे: १-अ, २ - अ , ३ - ब, ४ - ड)

४.६ सरावासाठी प्रश्न

अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. *चाळेगत*ची वाङ्मयीन वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

२. नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतील *चाळेगत* या कादंबरीचे स्थान निश्चित करा.

३. प्रवीण बांदेकरांचे पात्रनिर्मितीचे कौशल्य चाळेगत मधील व्यक्तिरेखांच्या आधारे स्पष्ट करा.

४. कोकणी समाजजीवनावरील जागतिकीकरणाच्या प्रभावाचे सचित्र दर्शन घडवणारी कादंबरी म्हणून *चाळेगत*चे महत्त्व अधोरेखित करा.

ब) लघुत्तरी प्रश्न

१. नव्वदोत्तरी मराठी कादंबरीचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

२. रूपबंधाच्या पातळीवर प्रवीण बांदेकर यांनी मराठी कादंबरीच्या क्षेत्रामध्ये कोणत्या नवीन शक्यता निर्माण केल्या आहेत, चर्चा करा.

३. *चाळेगत* म्हणजे एका कादंबरीच्या निर्मितीची गोष्ट आहे, या विधानाची चर्चा करा.

४. '*चाळेगत* कादंबरी इतर कोकणी साहित्याच्या तुलनेत अधिक वास्तववादी आहे', हे विधान सिद्ध करा.

५. *चाळेगत* मधील देशीवादी जीवन जाणिवांचे स्वरूप स्पष्ट करा.

६. जुन्या व नव्या विचारसरणीतील पारंपरिक संघर्षाचे स्वरूप *चाळेगत*च्या आधारे स्पष्ट करा.

४.७ उपक्रम

१. प्रवीण बांदेकारांचे संपूर्ण साहित्य संकलित करून त्यातील कोकणी भाषेतील शब्द, वाक्य एकत्रित करून त्याचे प्रमाण मराठी भाषेमध्ये रूपांतर करणे.

२. *चाळेगत*मधील छोटे छोटे घटना प्रसंग वेगळे करून त्याचे नाट्यरूपांतर करणे.

४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. थोरात, हरिश्चंद्र, *कादंबरीविषयी*, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६.

२. खोले, विलास (संपा.), *गेल्या अर्ध शतकातील मराठी कादंबरी*, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००२.

३. राजाध्यक्ष, विजया, *मराठी कादंबरी आस्वादयात्रा*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००८.

४. बांदेकर, प्रवीण, *उजव्या सोंडेच्या बाहुल्या*, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०१७.

❑❑❑